३६।।= पिराजी वाा संभाजी जाधव अज इ।। छ २४ सफर लगायत छ २४ शवाल वाजिब महिने ८ दरमाह रुपये ५ वजा ०।=।।। बाकी ४।।-। प्राा.

३६।।=· माहदु वाा वाघोजी कामटे अज इ।। छ २९ सफर लगायत छ २९ शवाल वाजिब महिने ८ दरमाह रुपये ५ वजा ·।=।।।· बाकी ४।।—।·

३६।।=· अंधोजी वाा निबाजी झेंडे अज इ।। छ २९ सफर लगायत छ २९ शवाल वाजब महिने ८ दरमाह रुपये ५ वजा कसूर ·।=।।।· बाकी ४।।—।·

३२८।।।· विठोजी वाा हसाजी भेंडे अज इ।। छ ८ रबिलावल लगायत छ ८ शवाल वाजिब महिने ७ दरमाहे रुपये ५ वजा ८।=।।।· बाकी ४।।—।·

३२८।।।· निंबाजी वाा जिवाजी झेंडे यैवजी देवजी वाा माहदजी बोरसे अज इ।। छ २४ रबिलावल लगायत छ २४ शवाल वाजिब महिने ७ दरमाह रुपये ५ वजा ·।=।।।· बाकी ४।।—।·

३२८।।।· माणकोजी वाा खंडोजी अज इ।। छ १ रबिलाखर लगायत आखर शवाल महिने ७ दरमाह रुपये ५ वजा कसूर ८।=।।।· बाकी ४।।—।· प्राा.

३२८।।।· सटवाजी वाा आपाजी राऊत अज इ।। छ १ रबिलाखर लगायत आखर शवाल वाजबी माहे ७ दरमाहे ५ वजा ·।=।।।· बाकी ४।।—।· प्राा.

३२८।।।· पिराजी वाा केरोजी चव्हाण अज इ।। छ १ रबिलाखर लगायत आखर शवाल वाजबी माहे ७ दरमाहे रुपये ५ वजा ·।=।।।· बाकी ४।।—।· प्राा.

३२८।।।· सेटी वाा नागोजी मेढे अज इ।। १ रबिलाखर लगायत आखर शवाल वाजब माहे ७ दरमाहे ६ रु।। वजा ·।=।।।· प्राा. ४।।—।· प्राा.

३६।।=· मल्हारी वाा माहदजी माारनुले यैवजी धोंडजी वाा माणकोजी मोरे अज इ।। छ २४ सफर लगायत छ २४ शवाल वाजिब महिने ८ दरमाहे रुपये ५ वजा ·।=।।।· बाकी ४।।—।·

३६॥=· सयद माा वाा सयेद मियन माारनुले यैवजी जोगोजी वाा पुंजाजी अज इ॥ छ १९ सफर लगायत छ १९ शवाल वाजब माहे ८ दरमाहे रुपये ५ वजा ·।=।॥· बाकी ४॥⁻।· प्राा.

३६॥=· हैबती वाा बाळोजी माारनुले यैवजी संताजी वाा राणोजी फळके अज इ॥ छ २४ सफर लगायत छ २४ शवाल वाजिब माहे ८ दरमाहे रुपये ५ वजा ·।=।॥· बाकी ४॥⁻।· प्राा.

२७।≡॥· राघोजी वाा तावजी अज इ॥ छ १ जाालावल लगायत आखर शवाल वाजब माहे ६ दरमाहे रुपये ५ वजा ·।=।॥· बाकी ४॥⁻।· प्र॥

२७।≡॥· येसाजी वाा भानजी अज इ॥ छ १ जाालावल लगायत आखर शवाल वाजिब माहे ६ दरमाहे रुपये ५ वजा ·।=।॥· बाकी ४॥⁻।·

३८॥८॥. कृष्टणाजी वाा माहदजी नाईक अज इ॥ छ १ जाालावल लगायत आखर शवाल वाजिब माहें ६ दरमाहे रुपये ७ वजा अडीच रोजा ॥⁻।· बाकी ६।=।॥· प्राा..

५४२८=

६८८⁻॥· यासिवाय असाम्या बरतरफ केल्या सबब नाकाऱ्या.

२८८॥· माहदु खेनट वाा यसाजी अज इ॥ छ २४ सफर लगायेंत छ २८ शाबान दरमाहे रुपये ५ वजा· ।=।॥·बाकी ४॥⁻। प्राा.

२७।≡॥· महिने ६ दरमाहे ४॥⁻।·

०॥⁻ रोज ४.

२८८॥·

२४।॥⁻।· संभू वाा मकाजी यादव अज इ॥ छ ८ रबिलावल लगायेत छ २१ शाबान दरमाहे

रुपये ५ वजा ·।=।।। · बाकी ४।।⁻। · प्राा. २२।।।=। · महिने ५ दरमाहे ४।।⁻। ·

१ ।।।≡ रोज १३ ·

२४।।।⁻। ·

१५८≡।।। · लक्ष्मण वाा गंगाजी बोरकर अज इ।। छ ४ ज।।लावल लगायत छ १४ शाबान दरमाहे रुपये ५ वजा ।=।।। · प्राा बाकी ४ ।।⁻। · प्राा. १३।।≡।।। · महिने ३ दरमाहे ४।।⁻। ·

१।। · रोज १०.

१५८≡।।। ·

६८८⁻।। ·

६१०८≡।। ·

सदरहूप्रमाणें खर्च जासूदांचा यास यैवज पेशजी नवाब विकारुदौला बहादर यांनी हुंडी रामाजी लक्ष्मणजी खंदारकर यांचे दुकानची पाठविली मेाा रुपये ४८५ फाजल रुपये

१२५८≡।।

सदरहू रुपये फाजल पडले आहेत याप्रमाणें बहादर मवसूफास समजाऊन हुजूरही विनती करावी मी हुजूरांत अर्जी या विषईंची लिहिली नांहीं. सारांश स्वामीनी स्पष्ट पुसोन जे उतर करतील ते आज्ञा करावी हे विनंती.

A. R. No. 9.

२ मोहरम ११९१ हिजरी

१० फेब्रुवारी १७७७

पै।। छ १५ माहे मोहरम सोमवार सन ११९१ हिजरी दीड प्रहर दिवस आल्यास खासगत जोडीबराबर.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान ता. छ २ मोहरम माघ शुध चतुर्थी भौमवासर पर्यंत वास्तव्य काा सासवड स्वामीचे कृपेकरून क्षेम व स्वामीकडील आनंदवृत्त श्रवणविषईं चित सापेक्षित असे. विशेष. पूर्वी छ २९ जिल्हेजीं छटूचे विद्यमानचे जासूदांसमागमें पत्र पाठविलें तें पावून सविस्तारें वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी इकडील विशेष वृत्त पृथकपत्रीं लिहिलें आहे. त्यावरून श्रुत होईल. स्वामींनी श्रीमंत पंतप्रधान स्वामी व कार्यभागी आदि येथील स्नेहित मंडलीस पत्रें व सक्रमण प्रयुक्त तीळ शर्करामिश्र पाठविले होते ते श्रीमंत व सर्वत्र मंडलीस पावते केले व सर्वत्रांनी बहुत प्रीती करून स्वीकारिले हे वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिले आहे. सांप्रत प्रत्योत्तरें सर्वत्रांचीं पाठविलीं आहेंत. रा माधवराव सदासिव व चिमापा पानसे यांजकडील उत्तर माघाहून येईल.

ताा.

१ श्रीमंत	१ हरिपंत तात्या
१ बापू	१ माधवराव रामचंद्र
१ नाना	१ गोविंदराव भगवंत
१ कृष्टणराव बलाल.	नि।। कृष्टणराव.
४	३

७

सदरहू सात पत्रें स्वामीचे पत्रांची उतरें व रो कासीपंत गु।। पानसे यानी पुण्याहून पत्र पाठविलें होतें तें पाठविलें असे. सवताडयांत सरकारचे आमिलाचा दखल जाहला म्हणोन रो चिमापानी सांगितलें. वरकड बंदोबस्ताविषईं स्वामीचे आज्ञेप्रमाणें चिमापाकडून जें काये होईल ते विनती लिहीन. रो हरिपंत तात्यास स्वामीनीं पूर्वी उभयताप्रमाणें लिहिली होती त्यास सरदारापैकीं उच्च पूर्वीस बाबूजी नाईक व मुतसद्यापैकीं सखारामपंत व फडनीस व कृष्टण-

रावजीची गणना बंधुत्वांत. याकरितां रावजीस श्रीमंत पूर्वी योग्य. हरिपंतांनी सरदारी केली व करीत आहेत. परंतु स्वामीची व त्यांची परस्परें समान गणना. याकरितां त्यास राजश्रियां विराजित यापूर्वीचें पत्र लिहून पावतें केलें. या उपरी जो अलकाब स्वामीचे मर्जीस योग्य भासेल तोच ल्याहावा. सेवकास संमत आहे. बहुत काय लिहिणें. हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुरदर अज इा छ २९ जिल्हेज लगायत छ २ मोहरम मंगळवार सन १९९० हिजरी.

पूर्वी छ २९ जिल्हेजीं अखबार पाठविली त्यांत हरिपंतास लोकांचे समजाविसी करितां कांही दिवस लागतील, कूच सत्वर होयाचा मनसुबा दिसत नांहीं व रघोजी भोंसले श्रीमंताचे दर्शनार्थ येणार व करनल इपटैन मुंबईहून वकील येणार, त्याचे मार्गप्रतीक्षेकरितां कूचास विलंब व अन्यत्र वर्तमान लिहिलें होतें. त्या उपरी विशेष वृत्त तपसीलवार लिहिले असे.

राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस मोरो बाबूराव फडनीस याचे लेकास बरें वाटत नांहीं. याकरितां पुण्यास गेले होते. ते काल छ १ मोहरमीं पुरंदरास आले. श्रीमंत पंतप्रधान यांस चौल संस्कार उदईक माघ शुध्द पंचमी बुधवारीं नेमिला. यास्तव पार्वतीबाईस रो नाना फडनीसानी विनती करून पुरंदरास घेऊन आले.

धारवाडेस महमद अली कुमनेदानानें मोरचे लाविले आहेत, हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. त्यास येथील कारभाऱ्यांचे मुखें चर्चा आहे कीं परशरामपंत मिरजकर व कृष्टणराव पानसे वगैरे येकत्र होऊन धारवाडचे रुखें गेल्यानंतर कुमनदान माार मोरचे उठऊन गेला, या प्रकारें बोलत आहेत. परंतु यांचे बोलणें प्रमाण अप्रमाण, हा निश्चय होत नांहीं.

लोकांचे जुबानी चर्चा आहे की परशरामपंत वगैरे वीस कोसाचे अंतराने आहेत व कुमनदानाने मोरचे लाऊन बसला आहे.

करनल इपटैन यांस मीर महमद आहमद हुजुरीहून पेडगांवास ग्रहस्त आले आहेत. त्यांनी पत्र पाठविले होतें की तुम्हास निरोप घेऊन महिना होत आला. अद्यापी कूच होत नांहीं. याचें कारण काय? फार दिवस लागत असलियां आपण माघारा जाऊं. त्याचें उतर येतसामुदीन मुनसी व करनलाने पाठविले की मुंबईहून तीन च्यार दिवसांत पुन्हा पत्रे येणार, ते आल्यानंतर यथार्थ तहकीक वर्तमान लिहून पाठऊं. सेवकाचे तर्फेनें चिरजीव रघोतमराव येतसामुदिनाकडे गेले होते. त्याने सांगितले कीं माष्टीस कांहीं कार्याचा गुंता पडला. याकरितां त्याचे यण्यास विलंब लागला. सांप्रत करनल साहबांनी मुंबईकरास साफ लिहून पाठविले आहे कीं माष्टीचे येण्याकरितां आम्हीं मुकामात करून राहिलों. येणार असलियां सत्वर पाठऊन देणे. अनमान असलियां त्याचप्रमाणें लिहिणं. म्हणजे आम्ही कूच करून जाऊं. या पत्राचे उत्तर तीन च्यार दिवसांत येईल. त्या पत्रावर सलाह कूच मुकामांची निश्चय होईल.

हरिपंत फडके यांचे कुच्याचा नेम नांहीं. सुमुहूर्तानें कूच करून कृष्टणातीरपर्यंत जाणार म्हणोन येथील कारभारी म्हणत आहेत. परंतु अद्यापि सिलेदार व सिपाही व सरदारांची समजाविश जाहली नांहीं. सर्वत्रांस रुपये दिधले म्हणजे येके दिवसांत समजूत पडोन पंत माारनुले समागमें जावयास रजावंद आहेत. परंतु झाडून तलबेचे रुपये द्यावयास माघेंपुढें अंदेशा करीत आहेत याकरितां लांबणीवर मनसुबा पडला आहे.

रामचंद्र गणेश व बाजीपंत गु।। फडनीस येसाजी [illegible] रुख सोडून गेले. सिदे [illegible] गालब जाहला व पनाळा व कोल्हापुराचे भोंवताले दाहा पंधरा कोसी समग्र प्रांत उज्याड करून लढाईस सिध आहे. हैदर

नायकाचा सिलसिला पनाळेकरांसी बहुत असे. रामचंद्र गणेशानी श्रीमंतास लिहून पाठविलें आहे कीं तैनाती लोक उपयोगी नांहींत. हुजुराती सरंजाम व त्यां लोकाचे खर्चास रुपये पाठऊन द्यावे. म्हणजे आम्हीं येसाजी सिंद्याचें पारपत्य करितों त्यास येथील कारभाऱ्यानीं उतर वकीलास सांगितले जे फौज देतो रोजमऱ्याचा यैवज तुम्ही देणें. सरकारांत रुपये नांहीत. सांप्रत रुपयाकरितां वोढ बहुत आहे.

करनल इपटैन यांस उष्टण साहत नांहीं. आजीपर्यंत सीतकाळ होता म्हणोन मैदानांत डेरे देऊन राहिले होते. सांप्रत उष्टण तीव्र लागते. याकरितां नकलमकान करून भिवंडीचे आलिकडील आमराईंत येऊन राहिले आहेत.

श्रीमंतांचा चौल उदईक पंचमीस नेमिला होता. त्यास मातोश्री गंगाबाई अस्पृश्य जाहलीं याकरितां चौलसंस्कार राहिला.

या उपरी जें वर्तमान नवल अपूर्व होईल तें सेवेसी लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणें. हे विनती.

A. R. No. 10.

३ मोहरम ११९१ हिजरी
११ फेब्रुवारी १७७७

श्री

विनंती विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ ३ माहे मोहरम मुा॥ कसबे सासवड जाणून स्वामीनी लेख(ना)ज्ञा करीत असले पाहिजे. विशेष. येथील वर्तमाण छ २९ माहे जिल्हेज रोज रविवारी विनंतीपत्र छटु मिरधे याचे जोडीसमागमे रवाणे केले, ते पाऊन सविस्तर वर्तमाण विदित जाहलेच असेल. तदनंतर येथील वर्तमाण छ १ माहे मजकुरा

रोज सोंमवांर करनेल वकील यांनी ममईवाल्यास पत्र लिहिले कीं वकील लवकर पाठवावा कीं ते आल्यानतर आम्हीं कूच करूं. वकील मजकूर येथे आल्यानंतर हे कूच करणार. कूच केलियावर लेखन केले जाईल. शृत होये. रा।ो विसाजीपंत आठवले यांचा निश्चये होता की याबरोबर पाच सांत हजार फौज देऊन पुढे रवाना करावे. त्यास मौकूफ होऊन रा।। नरसिगराव धायेगुढे व मालोजी घोरफडे वगैरे यास रवाना करावे, व त्याचे मागून कूच हरीपंताचे व्हावे यैसे होते. त्यास रा।। नाना फडनीस पुणियास गेलियावर नरसिगराऊ वगैरे यास मोकूफ करून विसाजीपंत आठ(व)ले यास पुढे पाठवावे, यैसा निश्चये होऊन पंत माारनिलेचे कूच पाच हजार स्वारानसी करविले ते जेजूरी नजीक येऊन उतरले आहेत. नाना फडनीस याणी फौजेची समजूती देण्याघेण्याची थोडीबहुत करून, रा।। हरीपंताचे कूचाचा निश्चये छ ५ माहे मोहरमी माघ शुध सप्तमीचे नेमस्त करून, आपण छ २ माहे मोहरमी सध्याकाली पुणियाहून निघाले, ते प्राथःकाली छ माारी किल्यास आले. मालोजी घोरफडे याचे लोकासी व हरीपंताचे लोकासी खानाजगी जाली. दोन्हीकडील पाच सात माणसे जायां जाली व काही जमखी (जखमी) जाली. त्यास रा।। नाना फडनीस प्रसगी होते त्याची समजूत परस्परे केली. हरीपंताचे कूचाचे निश्चये जाला आहे. कूच जालियावर लेहून पाठऊन पेशजी तोतियाचे प्रसगी ममईहून माष्टी फिरिगी आले होतें, त्यास जाबसाल करून आपले ठिकाणास गेल्यानतर श्रीमंताचे ठिकाण साष्टी घेतली. त्याजवरून कारभारी त्याजवर श्रमी बहुत. त्यास मौकूफ करून दुसरियास पाठवावे, यैसा निश्चये करनेल फिरगी याचे लिहिल्यावरून जाला आहे. येथे आलियावर सविस्तर लेखन केले जाईल. रा।। तुकोजी होलकर यास नाना फडनीस यानी पैगाम केला की तुम्ही रा।। हरीपंतासमागमे जावे. त्यास याणी उजर केला की हिदुस्तानात मोठा हगामा जाला आहे. शुज्याउदौला वगैरे यांची फौज अतरवेदीत आली आहे. आम्ही इकडे राहिल्याने उजेनेपर्यंत मुलक राहणे कठिण. दुसरे तीन वर्शाचे पेचामुले कर्जदारी विशेषात्कार जाली. याजमुले

पेच. याप्रमाणे भाशण जालियावर मौकूफ राहिले. सिदे आलियावर काय जाबसाल होणे तो लेहून पाठऊ. राजश्री हरीपताचे कूच जालिया लेखन केले जाईल. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास आलिया लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे. कृपालोभ कीजे. हे विज्ञाप्ती.

A. R. No. 11. ३ मोहरम ११९१ हिजरी
११ फेब्रुवारी १७७७

पैा छ १८ मोहरंम सन ११९१ हिजरी रो। गुरुवार च्यार घटका दिवस असता पावले.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान तााा छ ३ मोहरम बुधवार पर्यंत स्वामीचे कृपेकरून क्षेम असे. विशेष. इकडील वर्तमान छ २ माहे माार पर्यंत खांसगत जोडी देवजी व सटवाजी समागमें लिहून पत्र अर्जीसहित रवाना केलें, तें पावलें असेल. त्या उपरी पुण्याहून वर्तमान आलेंजे राा हरिपंत फडके यांनीं तीन कोसी कूच करून हडपसरापुढें लोणीसमीप जाऊन उतरले. पूर्वी विसाजीपंत दिवाण निा हरिपंत यांचे रवानगीचें वर्तमान लिहिले होते. त्यास पांच हजार फौज व सरदार मानाजी फांकडे व मालोजी घोरपड़े व सटवाजी भोंसले व नरसिंगराव धायगौडे सुधां परशरामपंत मिरजकराचे कुमकेस दरकूच गेले. रामचंद्र गणेश व बाजीपंत मिरज प्रांतास आले आहेत. राजश्रीचे मदतीकरितां तीन हजार फौज व च्यार तोफा नेमिल्या आहेत. त्या पैकीं हजार बारासे स्वार गेले. परशरामपंत व कृष्टणराव पानसे मुनेहलीसमीप आहेत व धारवाडचे मोरचे उठून महमद अली कुमनदान गेला, म्हणोन तहकीक वर्तमान यैकिलें. हैदरनायकाचा लेंक

टिपू दाहा बारा हजार स्वार व वीस हजार बार व तोफा सुधां धारवाड प्रांतेस येणार म्हणोन वर्तमान यैकिलें. मोरोपंत फडनीस यांची व उभयतां कार्यभागियांची यैक्यता करावी याकरितां राजश्री बालाजी जनार्दन फडनीस यांचे सलाहानुरूप राजश्री कृष्टणराव बलाळ आजी छ ३ माहे माार बुधवारीं पुण्यास गेले. राजश्रीचे पुत्र गोविंदराव व गोविंदराव भगवंत व डेरे वगैरे सरजाम गडासमीप आहे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

———

A. R. No. 12. ९ मोहरम ११९१ हिजरी
१७ फेब्रुवारी १७७७

पैाा छ २१ मोहरम सन ११९१ हिजरी रविवार

श्रीनिवास.

पोष्य हैबतराव गोपाळ साा नमस्कार विनती. उपरि येथील वर्तमान ताा छ ९ मोहरम मंगळवार पर्यंत स्वामीचे कृपेकरून क्षम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वी छ ४ मोहरमीं छटु मिरध्याचे विद्यमानें यजमानास अर्जी व विनतीपत्र सेवेसी पाठविलें, तें पाऊन वर्तमान कळलें असल. त्या उपरी इकडील वर्तमान पृथक विनतीपत्रांत लिहिलें आहे, त्यावरून सेवेसी श्रुत होईल. हरीपंत फडके यांचें कूच होऊन हैदर नायकाचे रुखावर जाण्यास सिलेदार व हुजुराती लोकांची समजावीस होऊन येकदिल जाहले पाहिजेत व मोहिमेस गेल्यानंतर खर्चाची सरंजामी छावबणीस कोणे प्रकारें होईल याची तरतूद व मुबारुजुलमुलुक बहादर व हुजूरचे सरदार नाईक माराचे तंबीस कोणते प्रकारें रवाना होत आहेत, इतकी इंतजारी आहे. याच प्रकारें. करनल इपटैन यांस रुखसत होऊन येक महिना जाहला. मुंबईहून इंगरेजाचा वकील येऊन रघुनाथरायांचे समजाविसीचा ज्वाबसाल

कुरसीनिसीन जाहल्या वितिरिक्त करनल माार येथून कूच करीत नांहीं. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

———

पैा छ २१ मोहरम सन ११९१ हिजरी रविवार.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इा छ ४ मोहरम लगायत छ ९ मोहरम मंगळवार सन ११९० हिजरी. राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस आपले लग्नाकरितां छ ७ माहें माारीं पुरंदरीहून कूच करून चिचवडास गेले. घांटाखाले कोंकणात खोंपवलीस वधूचा निश्चय जाहला आहे. माघ वद्य द्वितीया छ १५ मोहरमीं लग्नाचा निश्चय जाहला आहे. श्रीमंत पंतप्रधान यांचे चौलाचा निश्चय पूर्वील पत्रीं लिहिला होता. सांप्रत छ ८ माहे माार माघ शुध दशमीस चौल संस्कार जाहला. सेवेसी श्रुत होय.

रा हरीपंत फडके यानीं विसाजीपंतासमागमें मानाजी फांकडे व मालोजी घोरपडे वगैरे तीन हजार फौज देऊन कृष्टणराव पानसे व परशरामपंत मिरजकर यांचे कुमकेस रवाना करून हुजुराती वगैरे सिलेदारांचे समजाविसीकरितां व मुबारुजुलुमुलक बहादर वगैरे हुजूरचे सरदारांचे रवानगीचा निश्चय होऊन रवाना व्हावे याकरितां पुण्याहून तीन कोसी घोरपडीसमीप उतरले आहेत. लोकांची समजावीस होऊन हुजूरचे सरदारांचे रवानगीचा निश्चय जाहल्यानंतर पंत माार कूच करतील. तोपर्यंत मुकामात आहेत. दुसरें कारण रघोजी भोंसल्यानीं नागपुरीहून कूच केलें व श्रीमंत पेशव्यांचे दर्शनाकरितां पुरंदरास येणार हें वर्तमान पूर्वीं लिहिलें होतें. त्याअर्थीं भोंसले आल्यानंतर हरीपंत कूच करून जाणार हांही नेम रो कृष्टणरावजी बोलत होते. रघोजी भोंसले गंगातीरास आजीपर्यंत आले असतील. सत्वरच येणार म्हणोन येकिलें. रामचंद्र गणेश व बाजीपंत तीन हजारपर्यंत

जमावसुधां मिरजेसमीप आहेत. पुरंदरीहून हजार बारासे स्वार कुमकेस गेले आहेत. पुन्हा हजार स्वार रवाना होणार. पांच सात हजार स्वार जमाव जाहल्यावितरिक्त येसाजी सिंद्याचे मुकाबल्यास जावयाचा मकदूर नांहीं.

कृष्टणराव पानसे व परशरामभाऊ मिरजकर मुलेहलीसमीप आहेत. धारवाडेस महमदअली कुमदान होता. येथील मुतसद्याचे मुखें यैकिलें कीं धारवाडचे मोरचे उठऊन कुमदान बांकापुरास गेला व जनवदंता यैकतों कीं कुमदान माार अद्यापि धारवाडेसमीप मोरचे लाऊन बसला आहे व हैदरनायकाचा लेंक टिपू कुमदनदानाचे कुमकेस येणार किंवा आला असेल.

कृष्टणराव बलाळ मोरोपंत फडनीस यांचे मध्यस्तीचें निमित करून पुण्यास गेले आहेत. प्रस्तुत पुरंदरी राव माारनुलेंस विशेष काम नांहीं व गोविंदराव पुत्र व गोविंदराव हस्तक उभयतां येथें आहेत व दिवस उष्ण-काळाचे याकरितां रावजी पुण्यांतच राहणार. जरूरीस पुरंदरास येतील.

करनल इपटैनास रुखसत होऊन येक महिना जाहला. अद्यापि येथोन कूच होत नांहीं. याचें कारण रघुनाथराव मुबईस इंगरेजाचे आश्रयानें आहेत. राव माारनुलेचे यैक्यतेचा ज्वाबसाल लागला आहे. तामस माष्टी मुंबईकर इंगरेजांचा वकील पुरंदरास येणार तो आल्या-नंतर करनल मााराचें कूच होईल. येतसामुदिन मुनसीचे जुबानीं वर्तमान यैकिलें कीं पांच साता दिवसांत येथोन कूच होईल. परंतु सांप्रत येतसामुदिन मुनसीचे बोलण्याची अप्रमाणिकता दिसते.

राजश्री सखारामपंत बापू सेवकासीं कृत्रिम भाषण करीत नांहींत. त्यांचे बोलण्याचा भाव रघुनाथरायांकडील निश्चये जाहल्या वितरिक्त करनल कूच करून जात नांहीं. याचप्रमाणें हरीपंतासही विलंब सापेक्ष आहे.

सेवेसी शृत होय हे विनंती.

———

A. R. No. 13. (पो.ता.) १३ मोहरम ११९१ हिजरी
२१ फेब्रुवारी १७७७

पैा छ १३ रोज शनवार माहे मोहरमं सन ११९१ हिजरी वख्त दोन घटका रात्र प्रथमं.

श्रीनिवास

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी. पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती. उपरी येथील वर्तमान स्वामीचे कृपेकरून क्षेम असे विशेष. मौजे लांक पो वैजापूर हुजूरचे सनदेप्रमाणें व मौजे चितली पा आळंद श्रीमंत पेशव्यांचे तर्फेनें कैलासवासी सख जोसी यांस पुत्रपौत्रादि वंशपरंपरा इनाम आहे. सांप्रत पा मारचा अमल हजुरांत श्रीमंता नियाज केला ते समईं दोन्ही गांव वजा करून जागीर दिल्ही व यादीचे पटांत वजा केले म्हणून फडनिसांनीं सांगितलें. त्यावरून सख जोसी यांचे बंधु वो गंगाधर जोसी यानीं श्रीमंतांचें पत्र स्वामीचे नांवें घेतलें व कारभाऱ्यांनी मजलाही सांगितलें. त्यावरून सेवेसी विनती लिहिली आहे. यादीचा पट श्रीमंताचे मोहरेनसीं राजश्री जिवाजीपंत घेऊन गेले आहेत. जोसी बावा समर्थ व धर्मकार्याविषईं स्वामी तत्पर आहेत. श्रीमंतांचे पत्राप्रमाणें हुजुरांत अर्ज करून दोन्ही गांव निर्वेध गंगाधर जोसी यांजकडें चालवावे म्हणून श्रीमंत राजश्री बापू व नानानी सांगितल्यावरून विनती लिहिली असे. राजश्री केशो भिकाजी दातार यांची वरात कैलासवासी राजे जगदेव यानीं राजश्री बालाजी केशव यांजवर देविली ते बाळाजीपंत सुभेदारांनी कबूल करून वरातेप्रमाणें रो घ्यावे यैसा करार करून रुपये देत नांहींत, हें वर्तमान रा. केशोपंतानी स्वामीस श्रुत केलें व सेवकानेंही विनती केली होतो. राजश्रीचा स्नेह स्वामीचे सेवेसी अकृत्रिम व आपली कृपा त्यांजवर विशेष. राजश्री बालाजीपंत सुभेदारास सूचना केलियां ते अमान्य करणार नांहींत. बहुत काय लिहिणें. हे विनती.

———

A. R. No. 14. १०मोहरम ११९१ हिजरी
१८ फेब्रुवारी १७७७

पैा छ २१ मोहरम सन ११९१ हिजरी रविवार.

श्री

विनंती विज्ञापना. यथील कुशल त।। छ १० माहे मोहरम मुा काा सासवड येथास्थित जाणौन स्वानद लेखनआज्ञा करीत असिले पाा. विशेष. यथील वर्तमान छ माारी दोप्रारा छट मिरधे याचे जोडी समागमे विनंतीपत्र सेवेसी रवाना केले. ते पावोन सविस्तर वर्तमान विदित होईल. तदनतर यथील वर्तमान नाना लग्न करावयास गेले, लग्न करून सत्वर येणार, राजश्री हरीपताचे कूच येका दो दिवसानी होणार. कूच जालिया लेखन केले जाईल. श्रीमतास सेडी छ ८ माहे माारी राखली. उभयेता कारभारी यानी पाच पाच से रुपये पावेतो आहेर केला. येकयेक दोन दोन रकम ज्यवाहेर दिल्हे. कृष्णरावजी पुन्यासच अद्याप आहे. दोचौदिवसा येथे येणार छ माारी मिरध्याकडील जोडी रवाना जाली. त्या समागमे विनंती पत्र लिहिले आहे. त्याजवरून अक्षरशाहा वर्तमान शृत होईल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे. हे विज्ञाप्ती.

A. R. No. 15. (पो. ता.) १ सफर ११९१ हिजरी
११ मार्च १७७७

पैा छ १ माहे सफर सन ११९१ हिजरी मंगलवार साईकाल मये दारोग

श्रीनिवास

पु।। श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. छ ५ जिल्हेजीं रामजी व शंकराजी जासूद पत्रासहित सेवेसी रवाना केले

त्यास शंकराजी परतोन आला व यानें सांगितलेंजे रामजी जासूद श्रीमंत राजश्री भाऊसाहबांचे कारखान्यांत नौकर राहिला. त्यास या प्रांतीचे लोक बहुत हरामजादे. जबरदस्तापासीं साळसूदीने वर्तणूक करीत आहेत. च्यार पांच जासूद दुखण्याचा बहाना करून गेले. त्याचे यैवजी दुसरे ठेविले. त्यास तगीरी व बहालीविषईं यैवज मुबादला करून दुसऱ्यास ठिवांवें हे परवानगी जाहली. यांत सेवकाचा बच्याव जाहला नांही. तरी बहुत फजीती होती. सांप्रत रामजी वलद गंगाजी निकम छ १४ शवाली यैवजी जासूद ठेविला व आगाऊ रुपये ४ च्यार दिधले. प्रथम येकवार सेवेसी रवाना केला होता. तो उतरें घेऊन आला. प्रस्तुत श्रीमंत भाऊसाहेबांचे जासूदांचे कारखान्यांत राहिला आहे व दरमाहे रुपये ६ साहा प्रमाणें मवाजिब केला म्हणोन त्याच जोडीदारानें येथें सर्वत्रांस सांगितलें त्यावरून समग्र जासूदास स्वामीचे सेवेसी किवा अन्यत्र स्थली चाकरीस रांहांवें हे इछा उत्पन्न जाहली आहे व रामजीकडे तीन च्यार रुपये फिरतात त्यास सदरहू रुपये रामजी जासूदापासून द्यावे. यांत दुसऱ्यावर जप्त बसतो. स्वामी मुख्तार आहेत व रामजी श्रीमंत भाऊसाहबांचे कारखान्यात आहे. सूचनार्थ विनती लिहिली असे. हे विनती.

———

A. R. No. 16. १६ मोहरम ११९१ हिजरी
२४ फेब्रुवारी १७७७

पैाा छ १ माहे सफर सन ११९१ हिजरी मंगळवार साइंकाल मय दारोगे.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इ।। छ १० मोहरम लगायत छ १६ माहे म।।र सन ११९० हिजरी माघ वद्य ३ मंगळवार अस्तमानपर्यंत.

राजश्री बाळाजीपंत फडनीस आपले लग्नाकरितां कोकणांत गेले आहेत हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. फडनीस मजकूर अजिपर्यंत पुण्यास आले नाहींत.

राजश्री मोरो बाबूराव फडनीस यांची समजाविश करावयाकरितां रो॥ कृष्टणराव बलाळ पुण्यास गेले हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे त्यास रा॥ फडनीस मजकूर श्रीमंत पंतप्रधान स्वामीचा जन्म जाहला ते समईं पुरंदरास आले आहेत ते समईं मोरोपंतांचा पैगाम होता कीं नाना फडनीस व सखारामपंत ज्या प्रमाणं मदारुलमहाम आहेत त्या प्रमाणें आपल्यास शरीक करून फौजेचें काम सांगावें ते समईं सखारामपंतांचे प्रत्यास गोष्ट आली नाहीं व उत्तर केलें कीं बतरीक मुसाहबाप्रमाणें राहांवें व आम्हीं सांगू त्या प्रमाणें वर्तणूक करावी. या प्रकारचें उत्तर मोरोपंताचे ध्यानास न आलें व पुणें व जुनेरीं राहून कालक्रमणा केली. सांप्रत मोरोपंताची समजाविस करून त्यांस शरीक कामांत करांवें हें बापू व नाना उभयतांचे तजविजीस पसंद येऊन रो॥ कृष्टणरायांस पुण्यास पाठविलें आहे.

राजश्री हरीबल्लाळ यानीं बापू व नानाचे आज्ञेप्रमाणें अजिपर्यंत सरदारी केली व पुढेंहीं उभयतांचे अनुमतानुरूप हरीपंताची चाल आहे त्यास हरीपंताचा नेक सलूक सिपाही लोकांसीं बहुत व दाब नांहीं याकरितां सिलेदारांची समजाविस पडत नांहीं व पंत मजकूर रुपयावितरिक्त सीरीं जुबानीनें समजाविस करितात अजिपर्यंत लोक समजले. सांप्रत सालझाडयाची बाकी झाडून दिधल्या वितिरिक्त सिपाही लोक समजत नांहींत. याकरितां कित्येक लोकांचे जुबानीं वर्तमान यैकिलें कीं हरीपंतास हजार स्वाराची सरदारी सांगोन फौजेचे सरदारीचें काम मोरोपंतास सांगावें या प्रकारचा निश्चय येथील कारभाऱ्यांचा आहे म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें. जे गोष्ट अमलांत येईल ते सेवेसी विनती लिहीन.

मुंबईकरांकडील वकील आल्यानंतर कर्नल इपटैनाचें कूच होईल हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. त्यास सांप्रत कलकत्त्याहून पत्रें श्रीमंतास आलीं. त्यांत मार आहे कीं श्रीमंतांचा व आमचा जो करार होऊन करारनामे जाहले आहेत त्यांत सरेमो तफावत होणार नांहीं. रघुनाथराव मुंबईस गेला आहे त्यास भयें करून जो आमचे आसऱ्यास येईल त्यास मीं अभय देऊन ठेवितों हा कायदा कदीम आमचा आहे. रघुनाथराव आसऱ्यास आला आहे. त्याची कुमक करून पेशव्यांसी बिगाड करणें सर्वथैव होणार नांहीं. तुम्हीं राव माराची समजाविस करून घेणें याविषयीं इंगरेज मानेमुजाहिम सर्वथैव होणार नांहींत. कर्नल इपटैन यांस एक वर्ष होऊन गेलें. अद्यापि रुखसत केलें नांहीं याचें कारण काय? प्रस्तुत कर्नल मारास सत्वर रुखसत करणें. सखारामपंत सेवकासीं बोलिलेजे, नाना फडनीस पुरंदरास आल्यानंतर सात आठ दिवसाचे संधीत कर्नलास निरोप देतों. कलकत्तेकरांचीं पत्रें कर्नलास व मुंबईचे जरनलास होती. मुंबईकरांची पत्रें मुंबईस पाठविलीं. उतर येण्याची मार्गप्रतीक्षा आहे. उतर आल्यानंतर कर्नल इपटैन मुतसद्यांचा निरोप घेऊन कूच करून हुजूर येईल.

रो हरी बलाळ फडनिसांचे गुमास्ते व काम सरदारीचें करीत आहेत. याकरितां मोरोपंतास हरीपंताविषईं आजुर्दगी बहुत आहे. रो हरी बलाळ यानीं एकदां पुरंदरास यांवें या विषईं बापू व नानाची आज्ञा आहे. बहुशा बालाजी जनार्दन आल्यानंतर येतील.

महादजी सिंदे बिडास जाऊन माघारा जामगांवास आले. पेंडगांवास येणार. बाळाराव दिवाण निमा सिंदे सिद्याकडें मामलत संबंधीं बाकी आहे. त्याची तडमोड करावयास व रघुनाथरायाकडील स्नेहाचें ज्वाबसालांत पूर्वीपासून राव मार आहेत याकरितां छ ११ मोहरमीं बाळाराव सासवडास आले. वटेश्वरासमीप उतरले आहेत. शंभर स्वार समागमें आहेत. तुकोजी होळकर जेजारीस आहेत. पुरंदरास येणार.

रामचंद्र गणेश व बाजीपंत मिरजेसमीप तीन हजार स्वारानसीं आहेत. श्रीमंताकडील तोफा व फौज मातबर गेल्यावांचून येसाजी

सिंद्याचे रुखावर जात नांहींत. सिदा माार रामचंद्र गणेशावर गालिब आहे.

परशरामपंत मिरजकर व कृष्टणराव पानसे मुलेहलीसमीप आहेत. दाहाबारा हजारपर्यंत फौज जमा जाहली आहे म्हणोन यैकतों. महमद अली कुमनदान यानें धारवाडेस वेढा घातला होता. परशराम-पंतासमीप जमियत भारी. येकाने मोरचे उठऊन च्यार पांच कोसी हुबलीस जाऊन उतरला म्हणोन तहकीक व कलमीं वर्तमान यैकिलें त्याप्रमाणें सेवेसी विनती लिहिली असे. श्रुत होये. हे विनती.

———

A. R. No. 17. १७ मोहरम ११९१ हिजरी
२५ फेब्रुवारी १७७७

पौा छ १७ सफर सन ११९१ हिजरी मंगळवार साइंकाळ मये दारोगे.

श्रीशंकर

विनती विज्ञापना येथील कुशल ताा छ १७ माहे मोहरम मुा काा सासवड स्वामीचे कृपावलोकणे करूण यथास्थित जाणौन स्वानंद लखज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. यथील वर्तमान छ १० माहे मोर रोज बुधवारी विनंतीपत्रे दोण, यक छेटू मिरधे याचे जोडी-समागमे व दुसरे रो हयेबतराव याचे जाडीसमागमे, यकून दोण पत्रे सेवेसी रवाणा केली ते पाऊण सविस्तर वर्तमाण विदित जाले असेल. तदनंतर यथील वर्तमाण बापूकडे दरबार वगैरे जाला होता विदित होये. छ ११ माहे मोरी रोज गुरवार रो हरीपंत यांचा मुकाम अद्याप पुन्याहून दीड दो कोसावर घोरपडीवर आहे. लोकाचा देण्याचा दंगा विशेष दोण वरशे नालबंदी वगैरे नाही

याजमुले लोक म्हणतात की मागील आमचे फडचे करून द्यावे. फडचे जालियानंतर आम्ही आपले हमराहच आहो ऐसा जाबसाल आहे. यास्तव हरीपताचे कूचांस दिवसगत आहे. हरीपंतही लोकाची समजायश बहुतां प्रकारे करितांत. परतु विण्या पैसया वांचून लोकाची समजायश होये ऐसा प्रकार नाही. प्रस्तुत नाना आपले लग्न करावयास कोकनात गेले आहेत तेही दो चौ दिवसा यथ येणार. आलियानतर लोकाचे काहीं समजुती करूण उपरांतिक हरीपताचे कूच होणार ऐसे आहे. पुढे काये निश्चये होऊण हरीपंताचे कूच होईल ते लखन केले जाईल. हरीपंताचे कूचास रो कृष्णरावजी बहुंत बाजिदी करितांत की ये विशयी आम्हास नवाबसाहेब इनायेतनामे वरचेवर पाठवितांत. शृत होये. छ १२ माहे मजकूर रोज शुकरवार ममईहून वकील येणार होता. तो-आलिया नतर उपरांतिक यथून करनेल वकील याही कूच करावे ऐस आहे. त्यास वर्तमाण आहे की ममईहून वकील प्रस्तुत यत नाही. जो परियेत ममईकराचा वकील येत नाही तो परियत करनेल वकील याचेही येथून कूच होत नाही. श्रीमंत दादासाहेब ममईस बाहिर बागात आहे. वर्तमाण आहे की त्यांपासी दोण तीन पलटणे जमा जाली आहेत. ममईवालाही कांही नवनिगादास्त करितो म्हणून येथे वर्तमाण आहे. ममईवाल्याने दोन तीन जहाज तयार केली आहेत. आंगरयाचे मुलकांत उपद्रव करणार आहे म्हणून वर्तमाण आहे. शृत होये. रो भिवराव पानशे कोकनात कल्यान प्रांती आहेत. त्याचे येथे फालगुन मासी लग्न आहे. उभयता कारभारेचे मर्जीस आहे की त्यांही लग्नांस न यावे परंतु भिवराव लग्नास येणार. आल्यावर लेखन केले जाईल. हयेदरनाइकाची फौज बंकापुरास दाहा बारा हजार आहे व दाहा पंधरा हजांर बारही आहे. आनिकही नाईक मजकुराही पांच सात हजांर फौज कुमकेस बंकापुरास पाठविली म्हणून वर्तमान आहे. श्रीमंतांकडील फौज परसरामपंत भाऊ गोपालराव याचे बंधू फौजसहित धारवाड प्रांती बंकापूरचे शहावर आहेत. परसराम-पताचे कुमकेस फौज पाठवयांची योजना करितांत. पाठविलियास लखन केले जाईल. विदित होये. छ १३ माहे मोर रोज शणवार रो यसाजी

सिंदा पनाळ प्रांती तीन च्यार हजार फौजनसी आहे. त्या प्राती त्याणे बहुत उपद्रव मांडला आहे. त्याचे शहावर रो रामचंद्र गणेश दो ती हजार फौजनसी आहे. रामचद्र गणेशाकडील दोन च्यारशे लोक खाया खर्चा वांचून उठून आले. शृत होये. रो हरीपताचे फौजेच्या देण्याचा बंदोबस्त करून लौकर हरीपताचे कूच करवावे या उद्योगात कारभारी आहेत. निश्चये आहे की नाना आलियावर हरीपताचे कूच व्हांवे. मधे ऐसही वर्तमाण आहे की दो ती कोसाचे कूच करूण हरीपंत थेवरास जाणार. परंतु नाना आलिया विरहित कूच होईल ऐस नाही. तथापि कूच जालिया लेखन केले जाईल. नानाही सत्वरच येणार. शृत होये. तुकोजी होलकर विठलवाडीहून दोण तीनशे लोकानसीं माघी पौनिमची दिवसी जेजुरीचे यात्रेस आले आहेत. देवदेव करून पुन्हा विठलवाडीस फौजंत जाणार. शृत होये. छ १४ माहे मोर रोज अदितवार रो महादजी सिंदे पारनेराजवल जामगावांस आहे. येथे यणार आहे म्हणून वर्तमाण आहे. सिंद्याकडील बालाराव पांच च्यार दिवस जाले येथे आले आहे. बालाराव यांसी व बापूसी यक दोन खिलवत जाला. खिलवताचा भाव की पेशकशेपैकी बापू म्हणतांत की दाहा लक्ष रुपये द्यावे. होलकराही दाहा लक्ष रुपये दिल्हे त्या प्रमाणे तुम्हीही द्यावे. ये विशई बालाराव यानी उतर केले कीं सरदारीस खर्च भारी. यंदा कोकन प्रांतींही तोतियाची स्वारी जाली यास्तव खर्चवच भारी पडला. ऐस असून स्वामी आज्ञा करितांत ये विशई आम्ही माहदजी सिंदे यांस लिहितो. त्याचे उतर आलियावर विनंती करूं. बालाराव, पुन्यास हरीपंताकडे यका दो दिवसा जाणार. विदित होये. छ १६ रोज सोमवार रो जिवाजीपताचे पत्रे डाकेबरोबर रो कृष्णरावजीकडे नित्य यका दिवसा आड येत असतांत. पत्राचा भावगर्भ कांही ऐकिलियात येत नाही. वर्तमाण आहे की नवाब जफरदोला बाहादर यांची व येजमान साहेबाची मुलाजमत जाली म्हणौन वर्तमाण आहे. शृत होये. छ १६ माहे मोर रोज मगलवार हरीपंताचे कूच विना नाना आल्यावाचून होत नाही. नाना आलियावर सिबदीचा काये फडच्या होईल तो पाहावा परतु सिबदीचा गवगवा भारी आहे.

के. म. म. द वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

विदित होये. प्रस्तुत हरीपताचे कूचास दिवसगत आहे. शृत होये. छ २७ माहे जिल्हेजचे आज्ञापत्र हैबतराव याचे जोडीसमागमे पाठविल ते छ १२ माहे मा।।री पावले. बहुत संतोश जाला. आज्ञा की हजूरचा दरज्यवाब इनायेतनामा मागून पाठवून देऊन नवाब विकारुःदौला बहादुर याचे ज्यवाब दोन पाठविले आहे. ते पावतील. ते पावेल. फालगुन मासी सेवकाचे पुत्राचे लग्न आहे. आज्ञा विशई पूर्वीचे विनतीपत्रात सविस्तर लेखन केले आहे त्याजवरून ध्यानास येईल. गतवर्शी मुलीचे लग्न जाले. तेव्हाही जाणे न जाले. कृपाकरून महिन्या दिडा महिन्याची आज्ञा आल्यास लग्न प्रसगास जाऊ. विनंती मान्य करावी. सर्व भरवसा स्वामीचे चरनाचा आहे. विदित होय. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 18. २१ मोहरम ११९१ हिजरी
१ मार्च १७७७

पैाा छ ६ माहे सफर सन ११९१ हिजरी, रविवार.

श्रीनिवास

पोष्यें हैबतराव गोपाळ सां। नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ २१ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वी छ १७ माहे माारीं राणोजी पुंड वगैरे हरकारे यांजसमागमें छटूचे विद्यमानें पत्र पाठविलें तें पाऊन सविस्तारें वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी स्वामीचें कृपापत्र छ ६ माहे माारचें हुजूरचे इनायतनाम्यासहित जासूदांचे ततमे तलब आखर शवालपर्यंत माो रुपये १३४।। पैकीं हुंडनावळ बाा रुपेये ३ तीन वजा करून बाकी रुपेये १३१।। येकसें साडे यकतीसा रुपयाचे हुंडीसहित पाठविलें तें छ १८ माहे माारीं पाऊन सविस्तारें

वर्तमान कळोन संतोष जाहला. इकडील राजकी वर्तमान पृथक पत्रीं सविस्तारें लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल. हरकाऱ्यांचें कबज आखर शवालपर्यंत घेणें म्हणोन आज्ञा त्यास इप्तदाय निगाहदास्ती-पासून यैवज मुबादला बहुतांचा जाहला आहे व स्वामीनीं पूर्वील इस्मनवीसीवर खास दसखत करून घेतले आहेत. त्याचप्रमाणें सिलसिला चालविला आहे व आखर शवालपर्यंत हिशोब करून पाठविला त्यास मोहरमांत रुपये आले. दोन महिन्याची तलब चढली व इकडील लोकांस श्रीमंतांचे दरबारचा सिरस्ता किंवा त्यांची समजूत पडेल त्याप्रमाणें समजाऊन द्यांवें लागेल. सांप्रत स्वामीचे आज्ञेप्रमाणें जासूदांचे नायकाचे नांवचें कबज व वरकड लोक त्याचे सिकमात लिहून घेतों. मानूरावर तनखा घेऊन पाठवितों म्हणोन आज्ञा केली. उतम असे. जिलकादेपासून तनखा माह बमाहीची पाठवावी. च्यार हरकारे नवे ठेविले म्हणोन आज्ञा तरी चौघें जासूद यैवजी ठेविले आहेत. या चौघापैकीं येक रामजी नामे हैदराबादेंत श्रीमंत राजश्री भाऊसाहबांचे सरकारांत राहिला म्हणोन यैकिलें. त्यास जासूद यैवज मुबादल्यावितरिक्त नांहींत व स्वामीनीं सेवकाचे विनती-प्रमाणें पूर्वींच हुजूरचे दसखत यैवजीविषईं करून घेतले आहेत. साल आखरीं पुन्हां राजीनामे घेऊन बहाल व बरतफ करावे लागतील. वर्षाचे करारानें लोकांस ठेविलें आहे. सविस्तारें वर्तमान स्वामीस श्रुत व्हांवें याकरितां विनती लिहिली असे. बहुत काय लिहिणें. हे विनती. वेदमूर्ती राजश्री विश्वंभरदेवास अनुष्ठानाचे आरंभाविषईं सांगितलें आहे. हे विनती. यतसामुदी मुनसीचा रुका नवाब विकारुदौला बाहदरांचे अर्जीत घातला असे.

———

पैा छ ६ सफर, रविवार, सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इ।। छ १७ मोहरम लगायत छ २१ माहे

मा॥ र सन ११९० हिजरी माघ वद्य अष्टमी रविवार राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस स्वकीय विवाहाकरितां कोंकणांत गेलें म्हणोन पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत लग्न सिधी करून छ २० माहे माार शनिवारीं पुण्यास आल्याचें वर्तमान यैकिलें. राजश्री कृष्टणराव बलाळहीं पुण्यांत आहेत. उभयतां येकत्र पुरंदरास येतील. मोरोपंत फडनिसांचे यैक्यतेंचें वर्तमान शोध घेऊन माघाहून लिहून पाठऊं.

रो हरी बलाळ फडके पुण्यासमीप आहेत. सिलेदारांस आजीपर्यंत रोजमरे पावले नांहीत. सालझाडा व नालबंदीची चर्चाहीं नांहीं. सारांश रघुनाथरायांकडील वेध सुटून पनाळेकराचे मुकाबल्यास मातबर फौजेची नेमणूक होईल. ते समईं हरीपंत किवा अन्यत्र फौजेसुधां मोहिमेस जातील. दरकूच जाण्याचा निश्चय जाहल्यानंतर सिपाही लोकांस सालझाडयाचा यैवज व रोजमरे द्यावे हा निश्चय व मसलत येथील कांरभाऱ्यांची दिसते. सांप्रत सिलेदार लोकांचा दंगा आहे.

कर्नल इपटैन यांचे कूचाच्या निश्चय राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस पुरंदरास आल्यानंतर होईल. येतसामुदीन मुनसीनें सेवकाचे रुक्यावर ज्वाब लिहिला आहे. तोच रुका बजिनस सेवेसी पाठविला असे.

रो बाळाराव दिवाण नि॥ सिंदे सासवडासमीप आहेत. फडनीस आल्यानंतर सिद्याकडून मामलत समंधी रुपये यण्याचा निश्चय होईल. तुकोजी होळकर श्रीजेजोरीस आहेत. फडनिसाचे आगमनोतर येतील.

सौ॥ वती आनदीबाई धारेहून नर्मदातीर मंडळश्वरास आली म्हणोन वर्तमान आलें.

रो परशरामपंत मिरजकर व कृष्टणराव पानसें दाहा बारा हजार फौजेनेसीं मुलेहलीसमीप आहेत. महमदअली

कुमदान नि।। हैदरनाईक धारवाडेहून पांच सात कोसी हुबलीसमीप आहे. कुमदान म।।राचे कुमकेकरितां हैदरनायकाचा पुत्र टिपू येणार म्हणोन पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत यैकिलें कीं पांच हजार फौज व पांच हजार बार कुमकी येऊन पावला. पंधरा वीस हजारपर्यंत स्वार व बार कुमदानासमीप जमियत जाहली. परशरामपंत मिरजकरास मुनहलीसमीप राहणें बहुत कठिण आहे. पर्जन्यकाळापर्यंत श्रीमंतांची मातबर फौज त्या प्रांती न गेलियां कृष्टणेपर्यंत नाई(क) म।।राचा अमल होईल यैसें दिसतें. रामचंद्र गणेश व बाजीपंत तीन च्यार हजार स्वारानसीं मिरजेसमीप आहेत. विसाजीपंत नि।। हरीपंत फडके व मालोजी घोरपडे हजार दोन हजार लोकानसीं पुण्याहून गेले होते ते व रामचंद्र गणेश येकत्र जाहले परंतु येसाजी सिंदे नि।। राजे पनाळेकर गालब आहे याकरितां रामचंद्र गणेशांची शक्ती मुकाबिल लढाई विषई नांहीं. येसाजी सिंदा नि।। राजे पनाळेकर कोल्हापुरीं पांच सात हजार स्वार व प्यादे सुधां आहे व तीन च्यार हजार प्यादा व तीन हजार स्वार रामचंद्र गणेशाचे तोंडावर मिरजेपासून सात आठ कोसी वडगांव म्हणोन ठाण्याचा गांव आहे ते स्थलीं आहे. समग्र पनाळे प्रांत बेचिराग करून मिरज प्रांतांत खंडणी घेत आहे व गांव पाहून खंडणी घेणें असलियां रुपये घेतो किंवा लुटितो. धामधूम फार मांडली आहे. येसाजी सिद्यांचा सिलसिला हैदरनायकांसी आहे हें वर्तमान पूर्वीच सेवेसी लिहिलें असे.

राजश्री जयवंतराव पानसें यांचें लेंकाचे लग्नाचा निश्चय फालगुण शुद्धांत आहे. शरीरसंमध पुरंदऱ्यासी जाहला आहें. लग्नानिमित्य राजश्री भिमराव पानसे जरीदे यणार म्हणून यैकिले.

रघुजी भोंसले श्रीमंताचें भेटीकरिता येंणार म्हणून त्यांचे वकीलाचे जुबानी वर्तमान यैकिले होतें ते लिहिले होतें. सांप्रत विशेष यैकिल्यात आले नांही. शोध घेऊन माघाहून लिऊन पाठऊ.

———

A. R. No. 19. २२ मोहरम ११९१ हिजरी
२ मार्च १७७७.

पैा छ ६ माहे सफर सन ११९१ हिजरी रविवार.

श्री

विनंती विज्ञापना येथील कुशल ताा छ २२ माहे मोहरम मुकाम सासवड स्वामीचे कृपावलोकनेकरून यथास्थित जाणौन स्वानंद लेखज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष यथील वर्तमाण छ १७ माहे म॥ र रोज बुधवारी विनंतीपत्र छेटु मिरधे याचे जोडीसमागमे रवाना केले ते पाऊण सविस्तर वर्तमान विदित जाहले असेल. तदनंतर येथील वर्तमान छ १८ माहे मोर रोज गुरुवार राजश्री हरीपताचा मुकाम पुन्याहून दीड कोस घोरफडीवर आहे. फौजेचे देन्याचा दंगा आहे. कूचाचे अद्याप ठीक नाही. फौजेचे लोकास प्रस्तुत वीस पचवीस लक्ष रुपये द्यावयास पाहिजेत. तेव्हा लोकाची समजुती पडल लोक मागील दो वर्शाचे फडचे करून मागतात. पुढे रोजमुरे वगैरे याची सोये करून द्यावी याप्रमाणे लोकाचा जाबसाल पडला आहे. काही येक फौजेची समजुती जाल्यावाचून हरीपताचे कूच होत नाही. नाना फडनीस कोकनात लग्न करावयास गेले आहेत. ते पुन्यास आलियावर काही लोकाची समजू(त)करणार म्हणौन वर्तमान आहे. नानाहीं येक दो दिवसा पुन्यास सत्वरच येणार कारन की राजश्री मोरोबादादा फडनीस यास समाधान वाटत नाही. दुसरे फौजेचे लोकाची समजुती करणे यास्तव लवकरच येणार. आलियावर लेखन केले जाईल. नाना पुन्यास आलियावर लोकाची समजुती जालियावर हरीपताचे कूचाचा निश्चये होणार. नाना पुन्यास आलियावर लोकाची काये समजू करितात हे वर्तमान कललियावर मागाहून लेखन केले जाईल. हरीपताचे कूचास दिवसगत आहे. पुढे मुल(ख)गिरीचे दिवसही थोडे राहिले. काये निश्चये होऊन हरीपताचे कूच जाल्यास लेखन केले जाईल. शृत होये. छ१९ माहे म॥ र रोज शुकरवार ममईस फिरंगी सिबदी वगैरे ठेवितो. ज्याहाजे वगैरे दोन तीन

तयार केली. आगऱ्याचे तालुक्यास उपद्रव करणार हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्रात लेखन केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. त्यास आगऱ्याचे मुलकास ममईकर उपद्रव करणार अन करितो यैसे वर्तमान आहे. दादासाहेबही ममईस बागात आहे. काही लोक वगैरे ठेवितात म्हणोन वर्तमान आहे. ममईकडून वकील येथे येणार होता तोही अद्याप आला नाही. वकील आल्यावाचून येथून करनेल अपैन वकील याचेही जाणे होत नाही. शृत होये छ २० माहे म।। र रोज शनवार हैदरचे लोक बाकापूर प्रांतात आहेत. याजकंडील राजश्री परसरामपंत भाऊ वगैरे फौजेसहित धारवाड प्रातात आहेत. उभयेताचे अतर पचवीस तीस कोसाचे आहे. त्याचे व याचे लोकाची परस्परे चोटपेट होते म्हणोन वर्तमान आहे. शृत होये. सध्याकाली बापूकडे दरबार वगैरे जाला होता. विदित होये. सध्याकाली नाना पुन्यास येणार म्हणोन वर्तमान आले. शृत होये. मछलीबदराहून करनेल वकील यांजकडे पत्रे घेऊन जोडिली. मछलीबंदरचे फिरंग्यानी करनेल यास लिहिले आहे की तुम्ही श्रीमतापासून रुखसत होऊन दीड पावणे दोन महिने जाले अद्याप तुम्ही तेथे मुकाम करून राहिला अंहा याचे कारन काये? काये तुम्हास अटकाव जाला आहे हे लिहून पाठवावे की त्याप्रमाणे तजवीज करू याप्रमाणे पत्र लिहिले आहे. शृत होये छ २१ माहे म।।र रोज रविवार नवाब सुज्यायेनमुलक बहादुर याजकडून शुतरस्वार आदोनीहून पत्रे घेऊन त्याचे वकीलाकडे आला शृत होये. राजश्री बालाराव सिद्याकडून पुन्यास जाणार होते ते गेले नाहीत. येथेच आहेत. सिदे जाबगावासच आहेत. येथे यणार. होलकर विठलवाडीवर मुकाम करून आहेत. राजश्री नाना फडनीस लग्न करून काल सध्याकाली पुन्यास आले. पुढे हरीपताचे फौजेचे लोकाची काये तजवीज करून कूच करवितील ते मागाहून लेखन केले जाईल. नानाचे चितात आहे की काही पुन्याचे सावकारापासून येवज कर्जाऊ घे(ऊ)न फौजेस द्यावा येसे आहे. विदित होये. छ ६ माहे म।।रचे आज्ञापत्र हैबतरावजीचे जोडीसमागमे रवाना केले ते छ १७ माहे म।।री पावले. विनंतीपत्रे दोन तीन वरचेवर पावले.

म्हणोन लेखन केले. आज्ञापत्र पाऊन बहुत संतोश जाला. आज्ञापत्री आज्ञा की सरकारचा ज्यवाब इनायेतनामा पाठविला आहे. पावला. स्वामीचे लिहिल्याप्रमाणे इनायेतनामा पावला. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 20. २२ मोहरम ११९१ हिजरी
२ मार्च १७७७.

पैा छ ९ सफर सन ११९१ हिजरी रोज बुधवार च्यार घटका दिवस राहता पावले.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां।। नमस्कार विनती उपरि येथील वर्तमान त।। छ २२ मोहरम माघ वद्य नवमीपर्यंत मो सासवड स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष स्वामीनीं छ ६ मोहरमचें पत्र हुजूरचे इनायतनाम्यासहित व जासूदांची ततमा तलब आखर शवालपर्यंत मो रुपये १३४।। पैकीं हुडणावळ वजा करून बाकी रुपये १३१।। येकसें साडे येकतीस रुपयाची हुंडी पाठविली ते पाऊन पत्राचें प्रत्योतर छ २१ माहे माारीं लिहून छटूचे विद्यमानें लिफाफे रहमायारखान दारोगे हरकारे यांजकडें पाठविले. तो लिफाफा स्वामीस पाऊन वर्तमान कळलें असल. पत्रें पाठविल्यानंतर गडावर राजश्री सखारामपंत बापूची भेट जाहली व बापूचें मुखें तथ्य वर्तमान यैकिलें तें यजमानांस व स्वामीस श्रुत व्हांवें याकरितां सविस्तारें पृथक लिहिलें असे. सारांश हरीपंत फडके यांजकडून फौजेची सरबराई होईना व येक रुपयापासून

लाखोपर्यंत विन्हां बापू व नानानी सरजामी केल्या वितरिक्त कारवाई न होय. याकरितां रो। हरीपंतांची सरदारी मवकूफ करून रो। मोरो बाबूराव फडनीस यांस सांगावी हा निश्चय बापू व नानानी करून कृष्टणराव बलाळ यांस पुण्यास मोरोबाचे मध्यस्तीस पाठविलें आहे. तह कोणे प्रकारचा ठराव जाहला हें वर्तमान अद्यापि निश्चय कळलें नांहीं. बापूनीं कारवाईवर द्रिष्ट देऊन मोरोपंतास शरीक करावयाचा उद्योग कला आहे. आरंभ सुखावह आहे. परिणाम कोणे रीतीनें होईल हें पाहांवें. बहुत काय लिहिणें. हे विनती.

———

पैा छ ९ सफर सन ११९१ हिजरी रोज बुधवार च्यार घटका दिवस राहता पावले.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इ।। छ २१ मोहरम लगायत छ २२ माहे म।।र सन ११९० हिजरी सोमवार माघ वद्य

रो। बालाजी जनार्दन फडनीस लग्न करून पुण्यास आल्याचें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं मोरोबाबा फडनीसांचे समजाविशीचा निश्चय करून पुरंदरास येणार. बहुशा सिवरात्रीचें पारणें करून येतील. कृष्टणराव बलाळहीं राजश्री समागमेंच येतील.

हरीपंत फडके याजकडून फौजेचे कामाची सरबराई होईना व मोरो बाबूराव फडनीस यांचा मुदा श्रीमंताचे हुजूर मुख्तारीचे काम करांवें किंवा कैलासवासी त्र्यंबकराव यांजप्रमाणें फौजेची सरदारी करावी यास्तव रो। सखारामपंत बापू व बाळाजी जनार्दन फडनीस यांचे विचारानें हरीपंताकडील सरदारी काढन मोरोपंतास सांगावी हा

निश्चय जाहला व सांप्रत नाना फडनीस व कृष्टणराव बलाळ पुण्यांत आहेत. बहुशा मोरोपंतास पुरंदरास घेऊन येतील. रघोजी भोंसले यांचें पत्र छ १७ मोहरमचें जालनापूरचे मुकामीहून आलें, पैठणचे मार्गें येणार. अजीपर्यंत गंगा उतरोन आले असतील. फालगुंण शुध द्वितीयेस छ ३० मोहरमीं भोंसले मा।र पुरंदरास येणार म्हणोन तहकीक वर्तमान बापूनीं सांगितलें.

रघुनाथरायांचे स्नेहाचा प्रकार करनल इपटैन कूच करून गेल्यानंतर निश्चय होईल. करनलास कूच करुन जावयाची त्वरा व रघुनाथराव तलवन मिजाज याकरितां माष्टी व करनलाचें रूबरू नेम होऊन करनल माार पुरंदरीहून कूच करुन जातील. करनलाचे रुखसतीकरितां सत्वर यांवें म्हणोन बापूनी नाना फडनीसास लिहून पाठविलें आहे. येसाजी सिद्यासमीप दाहा बारा हजार स्वार व प्यादे जमाव जाहला व रामचंद्र गणेशावर गालिब आहे, हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं शंकराजी घोरपडे वगैरे याज-बरोंबरी पांच साहा हजार फौज देऊन रामचद्रपंताचे मुकाबल्यास वडगांवास पाठविलें. वडगांवीहून सात आठ कोसीं मिरज आहें. मिरजे-समीप कृष्टणातीरीं रामचंद्र गणेश व बाजीपंत व विसाजीपंत नि।। हरीपंत एकत्र आहेत.

परशरामभाऊ मिरजकर व कृष्टणराव पानसे दाहा बारा हजार फौजेनसीं मुनहलीसमीप आहेत. महमदअली कुमनदान नि।। हैदर-नाईक धारवाडेहून कूच करुन हुबलीस गेला. कुमनदान माार यास दाहा हजार फौज स्वार व बार नाईक मशारनुलेकडून कुमक आली. पंधरा सोळा हजार फौजेनसीं हुबलीसमीप आहे. टिपू हैदरनायकाचा लेंक दाहाहजार स्वार व दाहाहजार बारानसीं बिदनूर प्रांती कुमनदानाचे पुस्तीस सिध आहे. श्रीमंताकडील फौज न गेल्यापक्षीं वैशाख जेष्ठांत कृष्टणातीरास नायकाची फौज येईल.

माहदजी सिंदे यानी दुसरें लग्न माघमासी केलें. सांप्रत जामगाव परगणें पारनेर येथें आहेत. तुकोजी होळकर जेजोरीस आहेत. रघुना॰ -

रायांची स्त्री सौ।।वती आनंदीबाई धारेहून उजनीस आली व उजनीहून नर्मदातीर मंडळेश्वरास राहावयास येणार होती. आली असेल.

आजी छ २२ माहे माारीं पुण्याहून वर्तमान आलें कीं हरीपंताचे समागमेची फौज पुण्याभोंवतालें सात आठ कोसी गवत व कडबा समग्र भरून नेला पुण्याचे मंगळवार व सोमवार पेंठेंत गवत व कडबा लोकांनी गजी करून ठेविला तो व लकडवाल्यांच्या गजी होत्या त्या समग्र लुटून नेल्या. गवत व कडब्याबरोबर लोकांचे दाणे लुटले गेले.

A. R. No. 21. २३ मोहरम ११९१ हिजरी
३ मार्च १७७७.

पौा छ ९ सफर सन ११९१ हिजरी रोज बुधवार च्यार घटका दिवस राहता पावले.

श्रीशंकर

विनती विज्ञापना. यथील कुशल ताा छ २३ माहे मोहरम मुा काा सासवड स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाा विशेष. येथील वर्तमान छ २२ माहे मजकूर रोज सोमवारी विनतीपत्र प्राथःकाली छटू मिरधे याचे जोडीसमागमे रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान अवगत होईल. तदनतर यथील वर्तमान राजश्री नाना फडनीस लग्न करुन पुन्यास आले हे वर्तमान प्राथःकाली विनतीपत्र सेवेसी रवाना केले त्यात लेखन केले आहे त्याजवरुन ध्यानास येईल. राजश्री हरीपत वगैरेचे वर्तमान त्यात सर्व लेखन केले आहे. हरीपताचे फौजेचे देन्याचा गवगवा विशेष. नाना आलियावर काही फौजेचे लोकाचा देन्याचा फड(शा) करावा यसा (नि) श्चये हरीपतानी

के. ब. म. द वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

केला आहे. प्रस्तुत नानाही आले. लोकाची काये समजुती करितात हे ध्यानास आणून मागाहून सविस्तर लेखन केले जाईल. विना लोकाची देन्याची समजूती जाल्यावाचून हरीपताचे कूच होत नाही. नानाचे चितात आहे की पुन्याचे सावकारापासून दाहा पाच लक्ष रुपये कर्जाऊ घ्यावे अनिही महाल वगैरेचे यैवजी पाच च्यार लक्ष रुपये घेऊन थोडा बहुत हरीपताचे फौजेचा गवगवा वारून हरीपताचे कूच करवावे यैसे आहे. पुढे ये विशई काये निश्चये होऊन हरीपताचे कूच होईल ते लेखन केले जाईल. फौजेचे लोक सिलेदार व सरदार वगैरे म्हणतात की मागील आमचे दो सालाचे फडचे करून द्यावे. पुढे रोजमुरे वगैरेची सोये करून द्यावी. तेव्हां आम्ही हरीपता-समागमे जाऊ यैसी भवति न भवति आहे. प्रसग तो दिसतो की लोकाची देन्याघेन्याची समजूती करावयास व लोकाची समजूती पडावयास आठपधरा दिवस पाहिजेत. तो परियेत काही हरीपताचे कूच होता दिसत नाही. पुढे मुल (ख) गिरीचे दिवसही थोडकेच राहिले. याप्रमाणे येथे कितिक लाहान थोर लोक म्हणतात. मग काये निश्चये होऊन कूच होईल ते लेखन केले जाईल. ममईकरही सिबदी वगैरे ठेवितो. राघोजी आगरे याचे तालुक्यास उपद्र (व) करणार यसे वर्तमान आहे. दुसरे श्रीमत दादासाहेबही तेथे आहेत. ममईकर सिबदी वगैरे ठेवितो हाही अदेशा येथे यास जाला आहे. शृत होये. करनेल अपैन वकील अद्याप येथेच आहे. विना ममईहून वकील आल्यावाचून करनेलचे जाणे होत नाही. विदित होये. राजश्री रामचद्र गनेश येसाजी सिदे याचे शहावर आहे. राजश्री परसरामपंत भाऊ गोपालराव याचे बधु वगैरे फौजेसहित धारवाडप्राती आहे. हैदरची फौज बाकापुराजवळ आहे. तमाम करणाटक प्राताचे सवस्तानिकापासून हैदर लोक खडन्या वगैरे घेतात म्हणोन वर्तमान आहे. शृत होये. राजश्री माहादजी सिदे जाबगावास आहेत त्याचे दिवान बालाराव येथे आहेत. उभयेता कारभारी बालाराव यासी पेशकसीचा जाबसाल करितात. बालाराव यानी सिद्यास लिहिले आहे. ये विशई काये जाबसाल होईल तो ध्यानास आलिया लेखन

केले जाईल. शृत होये. होलकर फौजेसहित विठलवाडीवरच मुकाम करुन आहेत. विदित होये. राजश्री कृष्णरावजी अद्याप पुन्यास आहेत. नाना समागमें येथे येणार. विदित होये. फारसी अखबार लिहिणारास समाधान नाही, म्हणोन लिहिलिया अखबारेची फारसी करवून हजूरात व नवाब विकारूःदौला बहादुर यास गुजरानावी. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ति.

———

A. R. No. 22. २४ मोहरम ११९१ हिजरी
४ मार्च १७७७

पाौ छ १२ माहे सफर शनवार सन ११९१ हिजरी दोन घटका दिवस राहता.

श्रीनिवास

पोष्य हेबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान ताा छ २४ मोहरम माघ वद्य येकादसी बुधवारपर्यंत माो सासवड स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ २२ माहे माारीं छटूचे विद्यमानें व छ २३ मोहरमी भींवजी व धोडी जासुदांसमागमें स्वामीचे सेवेसी हुजूरचे अर्जीसहित पत्रें पाठविलें तें पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें असेल. सांप्रत पूर्वील पत्रीं वर्तमानें लिहिलीं त्याचा गोशवारा दाखल पृथकपत्रीं वर्तमान लिहिलें असे. आजी छ माारीं रघोजी भोंसले समीप आल्याचें वर्तमान यैकिलें. त्यावरून भोंसल्याचे भेटीचे उदेशं श्रीमंत पंतप्रधान स्वामीचे डेरे गडाखालें जाहले. पूर्वील निश्चय यैकिला होता कीं फालगुण शुध द्वितिया छ ३० मोहरमीं भेटी होणार. बहुशा याच

नेमाप्रमाणें भेटी होतील. जासुदांची तनखा माहबमाही जिलकादा-पासून स्वामीनीं आपले पत्रासहित पाठवावी. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पौ छ १२ माहे सफर शनवार सन ११९१ हिजरी दोन घटका दिवस राहतां.

श्रीनिवास

अखबार पुरदर अज इ॥ छ २३ मोहरम लगायत छ २४ माहे माार सन ११९० हिजरी.

राजश्री बालाजी जनार्दन फडनीस व कृष्टणराव बलाळ मोरो बाबूराव यांचे समजाविसीचा सिधांत करून पुरंदरास येणार.

रो हरीपंत फडके यांजकडोन फौजेची समजावीस होत नांहीं याकरितां रो मोरो बाबूराव यांस सरदारी सांगोन मोहिमेस रवाना करांवें म्हणोन राो बापू व नानानीं योजना केली आहे.

माअली कुमनदान नि॥ हैदर नायक हुबलीवर आहे. नाईक माराकडोन स्वार व प्यादे कुमकेस आले. पंधरा सोळा हजार पर्यंत जमा जाहला आहे. परशरामभाऊ मिरजकर व कृष्टणराव पानसे मुनहलीसमीप आहेत. दाहा बारा हजार फौज माारनुले समीप आहे. श्रीमंताकडील कुमक गेल्यावितरिक्त कुमनदानाचे मुकाबिल्याविषयीं परशरामपंताचा मकदूर नांहीं.

येसाजी सिंदे नि॥ राजे पनाळेकर यांची फौज वडगांव मिरजेहून सात कोसी पांच हजार पर्यंत रामचंद्र गणेशांचे मुकाबिल आहे व सिंदे माार काल्हापुरी पनाळे प्रांत समग्र उध्वस करून मिरज प्रांती

खंडणी घेत आहे. रघोजी भोंसल्याची पत्रें छ १७ मोहरमीची जालनापूरचें मुकामीहून आली. छ ३० मोहरमी पुरंदरास येणार आहेत. आजी छ २४ माहे माारीं श्रीमंताचे डेरे गडाखालें जाहलें. भोंसले माार सत्वरच येतील.

करनल इपटैन यांची रवानगी सत्वरच होणार. रो नाना फडनीसानीं सत्वर यांवें याविषईं सखारामपंतानी पत्र पाठविलें आहे. बहुशा भोसल्याचे भेटीनंतर करनलास निरोप देतील.

या उपरि जे वर्तमान नवल अपूर्व होईल तें माघाहून लिहून पाठऊं हे विनंती.

पुण्याची सोमवार पेठ व मंगळवार पेठ गवताचे हंगाम्या-करिता लुटंली गेली हे वर्तमान पूर्वी लिहिले असे त्याजवरून श्रुत जाहले आसेल.

A. R. No. 23.

२५ मोहरम ११९१ हिजरी
५ मार्च १७७७

पौा छ ११ माहे सफर शुक्रवार सन ११९१ हिजरी जासूदाचे जोडीबराबर.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साा नमस्कार विनती उपरि येथील वर्तमान ताा छ २५ मोहरम माघ वद्य द्वादसी गुरुवासर माो सासवड स्वामीचे कृपे करून क्षम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा कीजे. विशेष येथील वर्तमान छ २४ पर्यंत लिहून सेवेसी पत्र पाठविलीं तें पावलीं असतील. विशेषार्थ करनल इपटैन यानीं जावयाकरितां बहुत निकड केली त्यावरून काल छ

२४ माहे माारीं अस्तमानी राजश्री सखारामपंतबापू करनलाचे डेऱ्यास जाऊन उदईक छ २६ मोहरम शुक्रवारीं कूच करून जांवयाचा निश्चय करून गेले. आजी त्रितिय प्रहरीं करनल इपटैन गडाखालें श्रीमंतानी डेरा उभा केला आहे त्या स्थलीं जाणार व उदईक येथोन स्वार होऊन दरकूच हुजूर येतात म्हणोन येतसामुदीन मुनसीनं सांगितलें व पूर्वी नवाब विकारुदौला बाहादर यांनी मुनसीस पत्र पाठविलें होतें त्याचें प्रत्योतर सांप्रत पाठविलें आहे. नवांबास पावतें करावें व करनल इपटैन यांस हुजूरचे मनसबदारांचे प्रांतापासून प्रत्यही ज्याफतीचें साहित्य करविलेंच असल. सांप्रत येतसामुदीन मुनसी यांनी करनलाचे इतल्यानें मजला चिठी पाठविली होती की प्रत्यही दर मजलीस तीन हातीस दाणा वगैरे व कडबा हजार पुले व काष्टें दाहा मण येणें प्रमाणें सरजाम पावता होत जावा. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती. राजश्री बालाजी जनार्दन फडनीस यांनी सत्वर यांवें या विषयीं बापूची पत्रें गेली होतीं. करनलाचे जाण्याकरितां रो फडनीस आजी प्राथःकाळची च्यार घटका रात्र असतां गडास आले. सेवेसी श्रुत होय. व जे कृष्टणाजी देवाजी यांनी प्रातःकालींच छटूचे विद्यमानें पत्र पाठविले याकरितां सांप्रत सेवकानें सूचना केली असताही पत्र पाठविलें नांही हे विनती.

———

A. R. No. 24. २५ मोहरम ११९१ हिजरी
५ मार्च १७७७.

पौ छ १२ माहे सफर शनवार सन ११९१ हिजरी दोन घटका दिवस राहतां.

श्रीशंकर

विनती विज्ञापना येसीजे. येथील कुशल ताा छ २५ माहे मोहरम स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणोन स्वानद

लेखन आज्ञा करीत असिले पा. विशेष. येथील वर्तमान छ २३ माहे माार रोज मगलवारी विनतीपत्र राजश्री हैबतराव याचे जोडी समागमे प्राथःकाली रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाहले असेल. तदनतर येथील वर्तमान पुन्यात नाना एक दोन दिवस जाले आले. हरीपताची व नानाची भेट जाली. हरीपतानी फौजेचे देन्याचे व गवगव्याचे वगैरेचे वर्तमान सर्व नानास सागितले की लोक दोवर्शाचा फडच्या करून मागतात. पुढे रोजमुरे वगैरे याची निशा मागतात. याप्रमाणे लोकाची समजूती पडल्यास लोक चाकरीस हजर आहेत. हे न जाल्यास गवगवा मात्र आहे ये विशई नानाचे व हरीपताचे खलवत जाले. खलवत होऊन नानानी हरीपतासी उतर केले की आम्ही पुरधरास जातो. बापूची व आमची भेट जाली. यावर लोकाचे देन्याची हरयेक तजवीज करून तुमचे कुचाचा निश्चये केला जाईल. नानाही उदईक येथे येणार. शृत होये. छ २४ माहें माार राज बुधवार उभयेता कारभाऱ्याचे चितात की राजश्री मारोबादादा फडनीस यास आपनात मेलऊन घ्यावे ते व आपन येक्या विचारे कारभार करावा. त्याचे व आपले अतरयाम येकच. परतु ज्यनामधे की याचे व कारभाऱ्याचे चित शुध नाही. यामुले कितीक राज्यभाराचे कामास बखेडा पडत जातो यामुले त्यानी व आम्ही येका विचारे असून कारभार करावा. याअर्थी उभयेता कारभाऱ्यानी राजश्री कृष्णराव बलाल यास पुन्यास मोरोबादादाकडे पाठविले. मोरोबादादा सिवराव माार यासी पाच च्यार खिलवत जाले. खिलवताचे भाव यैकिन्यात आले की राव माार यानी मोरोबादादास बहुत बोधाच्या गोष्टी सागितल्या की उभयेता कारभारी व आपन येकत्र होऊन राज्यभार चालवावा. द्वईत न दाखवावे. दुसरे सर्वत्र फौजेची सरदारी आपन करावी. फौज घेऊन आपन मुल(ख)गिरीस निघावे. राजश्री हरीपंत आपले समागमी मात्र राहातील. ज्या प्रमाणे आपन आज्ञा करतील त्या प्रमाणे वर्तणूक करतील. त्याजवरून मोरोबादादानी राव माार यासी उतर केले की आम्ही आपले स्वस्त स्नानसध्या करून

आहो. कोन्हाचे बऱ्या वाईटात किमपि नाही व आमचे चितात द्वईत काडी मात्र नाही. यैसी भवति न भवति येक दोन दिवस जाली. सेवटी मोरोबानी म्हटले की फौज घेऊन सरदारी करावी. त्यास आम्ही आपले स्वाधीनचा कारभार करू. दुसरे श्रीमत दादासाहेबाची समजूती करावी. तिसरे फौजेच्या देन्याचा दगा पचवीस तीस लक्ष रुपयें देणे हे वारावे. या प्रमाणे जाल्यास कबूल करू. त्याजवरून राव माार यानी उतर केले की दादाचे समजूतीचा प्रकार घडता घडता घडल. प्रस्तुत होत नाही. फौजेचे मात्र देन्याची वाट आपन व कारभारी येक होऊन करावी व सरदारी कबूल करावी याप्रमाणे जाबसाल आहे. त्यास हे काम कबूल करावयास थो(डा) बहुत मोरोबा हमवार जाले आहेत. त्यास रावजीनी मोरोबास म्हटले की फौजेची देन्याची वाट कोन्याप्रकारे काहाडावी. त्या वरून मोरोबानी उतर केले की प्रस्तुत फौजेस पचवीस लक्ष रुपये पाहिजेत. त्यास दाहा लक्ष रुपये याची तजवीज आम्ही करून देऊ व दाहाची तजवीज नानानी करावी. पाच बापूनी द्यावे. या प्रमाने जाल्यास फौजेचा गवगवा वारल. याप्रमाणे भवति न भवति राव माार याचे विद्यमाणे होते. मग काये निश्च (य) ठरेल तो पाहावा. श्रुत होये. रावजी आज येथे येणार होते. मोरोबाचे बोलन्याचा भाव बापूस सर्व समजावावा. नानास तो सर्व भाव पुन्यास समजाविला त्यास मोरोबानी रावजीस चिठी पाठविली की येकदान दिवस पुन्यास राहाणे त्याजवरून राव माार दोन तीन दिवस पुन्यास राहाणार. राव माार येथे आलियावर मोरोबाचा विचार कारभाऱ्याचे मते काये ठरेल तो ध्यानास आलिया लेखन केले जाईल. विदित होये. ममईहून पूर्वी वकील येणार होता तो रहित जाला होता. येथून करनेलने ममईकरास दाहापाच पत्रे लिहिली की वकील आल्या-वाचून आमचे जाणे होत नाही. त्याजवरून कोन्ही वकील येणार म्हणौन वर्तमान आहे. शृत होये. राजश्री मुधोजी भोसले प्राा सेवगावावर आले. फालगुन शुध ३ येस श्रीमताची भेट होणार म्हणोन वर्तमान आहे. आनिक मागाहून याचा शोध करून लेखन केले जाईल.

शृत होये. होलकर यानी तुलजापुरास जावयाचा उद्योग केला होता. येक दोन मजल कूच करून गेले होते. उपरातिक माघारा विठलवाडीवर आले. शृत होये. पुन्याजवलील खेडीपाडी वैरनीमुले हरीपताचे फौजेनी उज्याड केली देखील. पुन्याबाहेर पेठेतील वैरनी हरीपताचे फौजेचे लोक नेतात. विदित होये. राजश्री माहादजी सिदे जाबगावास आहेत. आनिक दुसरे लग्न केले. पारनेरचे पाटलाची मुल केली. शृत होये. राजश्री भिवराव पानसे सडे मात्र लग्नाकरिता घरास आले. फौज वगैरे सरजाम कोकनप्राती ठेविला शृत होये. राजश्री नाना फडनीस छ माारी दोन घटका दिवस पूर्व येता पुरधरास आले शृत होये. मुधोजी भोसले दाहा पध (रा) कोसावर आले. उदईक त्याच्या भेटी होणार. उदई छ २६ सावीस भेट न जाली तर फालगुन सुध ३ त्रियेस भोसल्याच्या भेटी होणार. शृत होये. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 25. २६ मोहरम ११९१ हिजरी
६ मार्च १७७७.

पौा छ १२ माहे सफर शनवार सन ११९१ हिजरी.]

श्रीशंकर

विनती विज्ञापना. यथील कुशल ताा छ २६ माहे मोहरम मुा काा सासवड स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणोन स्वानंद लेखन आज्ञा करीत असिले पाा. विशेष यथील वर्तमान छ २६ माहे माार रोज गुरुवारी प्रहर दिवस पूर्व येता विनतीपत्र छटू मिरधे याचे जोडीसमागमे रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित होईल. तदनतर यथील वर्तमान ममईकराची जोडी पत्रे श्रीमतास व करनल

वकील यास घेऊन आली. ममईकरानी श्रीमतास लिहिले की करनेल वकील यास निरोप द्यावा. ते गेलियानतर आम्हीही वकील तुम्हाकडे पाठऊन देतो. कोन्हेही प्रकारे आम्हाकडील आपन शंशये न आनावा. पूर्वीचे तुमचे आमचे करारमदार जे जाले आहेत त्यात अतर पडनार नाही. त्याजवरून करनेल यास रुखसत करावे यैसा निश्चये जाला. तिसरे प्रहरी गडाखाले उभयेता कारभाऱ्यानी डेरा देविला. च्यार घटका दिवस शेष राहाता करनल वकील व मेघफरसन स्वार होऊन श्रीमताचे डेऱ्यास गडाखाले कारभाऱ्याचे रुखसतीस गेले. दोन घटका दिवस शेष राहाता उभयेता कारभारी गडाखाले डेऱ्यास आले. उभयेता कारभारी व करनेल वकील याचा खिलवत च्यार घटका रात्र पावेतो जाला. उपरातिक करनेल वकील व मेघफरसन यास कारभाऱ्यानी रुखसत केले. श्रीमतापासून तो पूर्वीच रुखसत जाले होते. ममईहून जाबसाल आलियानतर कारभाऱ्यापासून रुखसत व्हवा येसे ठरले होते. प्रस्तुत ममईकराची पत्रे आली त्याजवरून करनैल वकील यास रुखसत केले. करनेल वकील यास कारभाऱ्यानी च्यार वस्त्रे व येक रकम सिरपेच देऊन रुखसत केले. याच प्रमाणे मेघफरसन यास दिल्हे. सा घटका रात्र पूर्व जाता करनेल रुखसत होऊन आपले डेऱ्यास गेले. उपरातिक उभयेता कारभारी गडावर गेले. उदईक करनेल वकी(ल) कूच करणार. छमारी करनेल वकील यानी ती कोसाचे कूच करून कोकेडीस मुकामास गेले. कूच दरकूच येज्यमान साहेबाकडे येतात. ममईकरास करनेल वकील यानी लिहिले की आम्ही कूच करून नवाब साहेबाकडे गेलो. श्रीमतान्नीही ममईकरास पत्रे लिहिली की करनेल वकील यास रुखसत केले, कूच करून गेले. ममईकरास श्रीमतानी दोन डाल्या अंगुराच्या पाठविल्या. ममईहून वकील आलियावर लेखन केले जाईल करनेल व

२

पौ छ १२ माहे सफर शनवार सन ११९१ हिजरी.

कील यासमागमे श्रीमताकडील सेवकराम म्हणोन वकील जातो. वकीलासमागमे कलकतेकरास श्रीमतानी येक हाती वस्त्रे

व काही ज्यवाहेर रकमा दिल्या आहेत. शृत होये. मुधोजी भोसलेही लवकरच येणार म्हणोन वर्तमान आहे. आलियानतर लेखन केले जाईल. विदित होये. राजश्री कृष्णरावजी पुन्याहून येथे येक दो दिवसा येणार विदित होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ती.

A. R. No. 26. २६ मोहरम ११९१ हिजरी
६ मार्च १७७७

पौ छ १२ माहे सफर शनवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान तााा छ २६ मोहरम शुक्रवार माघ वद्य त्रयोदसी पर्यंत मेंाा सासवड स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. करनल इपटैन आजी छ माारी पुरंदरीहून कूच करून हुजूर यावयाचे उदेशें दंरमजल येतात म्हणोन हुजूरांत अर्जी व नवाब विकारुदौला बहादर यांस पत्र व लेखकांचे पत्र वकारपूर्वकास लिहून पिराजी व संताजी खांसगुब्र जोडी सेवेसी छ २५ माहे माार गुरुवारी दोन प्रहरा रवाना केली ते सेवेसी पाऊन वर्तमान श्रुत जाहले असेल. त्यानंतर येक घटका दिवस असतां छ २५ गुरुवारी करनल इपटैन व मेघफरसन व मुनसी उभयतांचे श्रीमंत पंतप्रधानाचे डेऱ्यास गडाखाले उभा केला होता ते स्थलीं गेले. तेच समईं बालाजी जनार्दन फडनीस गडाहून उतरून डेऱ्यास आले. त्याउपरि एक घटका रात्रीस रो सखारामपंतबापू गडाहून डेऱ्यास आले. दोन घटका रात्रपर्यंत गडाखाले डेऱ्यांस नाना फडनीसांचे लग्नाच्या व अन्यत्र गोष्टी सांगत बसले होते. त्यानंतर खिलवतेचे डेऱ्यांत जाऊन दोन घटका येकांत केला. पुन्हां डेऱ्यांत आले. पूर्वी श्रीमंताकडील रुखसत व जवाहर व वस्त्रे करनलास दिल्ही होतीं. उभयतां कारभाऱ्यांकडील वस्त्र देणें बाकी

होते याकरितां नानां व बापूकडील वस्त्रे करनल व मेघफरसन व मुनसीस दिल्ही.

करनल इपटेन बापू नाना			बापू नाना		मेघफरसन
८	८	महमूदी थाने	६	६	महमूदी थाने
१	१	किमखाब	१	१	किमखाब
१	१	शालजोडी	१	१	शालजोडी
१	१	सिरपेच मुरसा	१	१	सिरपेच
११	११				

याचप्रमाणे येक खोन बापूकडील व एक खोन नानाकडील सदरहू प्रमाणे उभयतांस वस्त्र व जवाहर व उभयता मुनसीस पैठणी सेला व मुडासी व येके येक महमूदी देऊन रुखसत केलें. करनल इपटैन पांच घटका रात्रीनंतर डेऱ्याहून स्वार होऊन आपले डेऱ्यास गेला. मार्गीं जातां भिवडीसमीप करनलाचे डेरे होते. तो मार्ग सोडून रूद्रमाळा-समीपचा जेजोरीचा रस्ता धरून दोन कोस वाट चुकोन गेले. पुन्हां आडमार्गाने वाटेचा शोध करून आपले डेऱ्यास आले. रो बापू व नाना करनल गेल्यानंतर दोन घटका डेऱ्यांत बसून उपरांतिक गडावर गेलेजी छ २६ माहे माार शुक्रवारीं करनल इपटैन यानीं पुरंदरा-पासून पांच कोसी कूच करून गेले. श्रीकृपे करून

पो १२ माहे सफर शनवार चेतुरदशी सन ११९१ हिजरी. पु॥ श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी

दरकूच सत्वरच हुजूर येतील. रो बालाजी जनार्दन फडनीस करनलाचे निरोपाकरितां पुण्याहून सत्वर आले. मोरोबा फडनीसाचे समजाविसीचा निश्चय पुरता जाहला नांही. रो कृष्टणराव बलाळ पुण्यांतच आहेत. शोध घेऊन तहकीक लिहून पाठवितो.

सिपाही लोकांचा हगामा हरीपंतावर बहुत आहे. गवताचे निमित्तानें सोमवार मंगळवार पेंठ लुटली. हें वर्तमान पूर्वी लिहिलें होतें. त्यास लोकांस रोजमरा पावत नांहीं. याकरितां मनस्वी जाहले आहेत. हुकुमांत नांहींत. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

A. R. No. 27. ३० मोहरम ११९१ हिजरी
१० मार्च १७७७.

पौ छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरवार साइंकाळी

श्रीनिवास

पोष्यें हैबतराव गोपाळ साा नमस्कार विनंती उपरि येथील वर्तमान ताा छ ३० मोहरम फालगुण शुध २ मंगळवारपर्यंत मे।।सासवड स्वामीचे कृपे करून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वी करनल इपटैन इंग्रेज याचे कूचाचें वर्तमान व इतर अखबारेसहित छ २५ माहे माारी खांसगत जोडी व छ २६ रोज शुक्रवारीं छटूचे विद्यमानें हुजूरांत व वकारपूर्वकांस व स्वामीस अर्जीसहित पत्रें पाठविली तें पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें असल. त्या उपरि इकडील नवल विशेष वृत पृथकपत्रीं हुजूरांत व नवाब विकारुदौला बहादर व स्वामीस विनंती लिहिली आहे त्यावरून सेवेसी श्रुत होईल. हुजूरांत व वकारपूर्वकास फारसीपत्र लिहिले आहे त्यात न्यून असलियां स्वामीनी पूर्ती करावी. मुख्यार्थ राजश्री सखारामपंतबापू कैलासवासी नीलकंठराव आबा पुरंदरे यांचे स्त्रींनें बहिणीची कन्या दत घेतली तिचा संबंध रो भीमराव पानसे यांचे बंधू जयवंतराव पानसे यांचे पुत्रासी जाहला आनि द्वितीया मंगळवारी लग्न केलं. या लग्नाचे साहित्यास व्याही मुख्य सखारामपंत याजकरितां माघ वद्य १४ शनिवार छ २७ मोहरमी सिवरात्रीस श्रीवटेस्वरासमीप येऊन उतरले व काल सोमवारीं गांवात आपले हवेलीस येऊन राहिले. लग्नाचे

उत्सहानंतर गडास जातील. रो रघोजी भोंसले सेनासाहब सुभा काली छ २९ माहे माारीं सासवडासमीप येऊन उतरले. आजी बापू व नानाची भेट जाहली. येथोन कूच करून कोडितासमीप करहातीरीं जाऊन उतरले. श्रीमंताचे भेटीचा व गडास जाऊन भोजनाचा आजीच नेम होता त्यास मातोश्री गंगाबाई अस्पर्श जाहली. श्रीमंत प्रधान बाईवितरिक्त गडाखालें येऊन प्रहर दहा घटका स्वस्थ राहतील किंवा न राहतील हा भरवसा नांहीं. याकरितां आजीच्या भेटी राहिल्या. या उपरि बहुशा छ ३ सफर शुक्रवारीं किंवा येक दिवस न्यून अधिक भेटी होतील. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

पु।। अखबार छ ३० मोहरम विनतीजे. रो सखारामपंत बापूचे मतें रघुनाथरावदादास समजाऊन आणांवें व हरीपंताकडून रुपयाचे सरबराईचें काम होत नांहीं याकरितां व मोरोपंतासी स्नेह करावा म्हणून फौजेचे सरदारीचें काम मोरोबादादास सांगांवें हा निश्चय आहे. त्याप्रमाणें रो कृष्टणराव बलाळ मोरोबाचे समजाविसीकरितां पुण्यास गेले होते त्यास मोरोपंतानी रघुनाथरावदादास आणांवें हा मुख्य पैगाम घालून परस्परें कोणे रीतीनें चालांवें व कामकाज व सलाह मसलतींत त्रिवर्गाचा येकोपा असावा व आणखीं कितेक मतलबाचे मुदे घातले आहेत. याकरितां राजश्री कृष्टणराव बलाळ व गोपाळ नाईक तांबेकर उभयतां पुन्हां पुरंदरास आले आहेत. निश्चय कोणता होईल तो सेवेसी विनती लिहीन. सारांश राजश्री बापूचे मर्जीचे डौलाप्रमाणें आजीपर्यंत कारभार जाहला व पुढेहीं यांचेच सूत्रानें वलवट चालणार. काही येक नवल विशेष वर्तमान रो भीमराव पानसे यांनीं आजीच सेवकास सांगितलें ते माघाहून खांसगत जोडीसमागमे लिहून पाठवीन हे विनती.

पौ छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरुवार साइंकाळी

———

A. R. No. 28. १ सफर ११९१ हिजरी
११ मार्च १७७७.

पौ छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरुवार साइंकाळी.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इ।। छ २७ मोहरम लगायत छ ३० माहे माार सन ११९० हिजरी मंगळवार फालगुण शुध. करनल इपटैण छ २६ माहे माारीं स्वार होऊन हुजूर जावयाचे उदेशें कूच करून गेले हें वर्तमान पूर्वील पत्रावरून श्रुत जाहलें असल.

कैलासवासी नीलकंठराव पुरंदरे यांचे दत गृहीत कन्येचा विवाह भीमराव पानसे यांचे बंधू जयवंतराव पानसे यांचे पुत्रासीं जाहला. पुरंदरे माार यांचे सरदारीचें व घरचें काम रो सखारामपंतबापूचे विद्यमानचें याकरितां छ २७ माहे माारीं गडाहून उतरोन वटेश्वरासमीप येऊन उतरले. छ २८ रोजी देवासमीप राहिले. छ २९ सोमवारीं सासवडीं आपले हवेलीस येऊन उतरले. लग्नाचे समाप्तीनंतर पुन्हां गडास जाणार. राजश्री भीमराव पानसे लग्नाकरितां येणार म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें होते. त्यास कल्याणीसमीप फौज ठेऊन राजश्री पानसे माार छ २७ रोजीं सानोरीस आले. गडास श्रीमंतांचे व कारभाऱ्यांचे भेटीस गेले होते. सांप्रत मंडलीसहित लग्नाकरितां सासवडास आले आहेत.

राजश्री कृष्टणराव बलाळ व गोपाळ नाईक तांबेकर छ २९ माहे माार सोमवारीं पुण्याहून गडासमीप येऊन उतरले. मोरो बाबूराव फडनीस यांजकडील माार पृथक पुर्वणींत लिहिला आहे.

राजश्री हरीपंत फडके यांजकडील सरदारी काहडून मोरोबादादा फडनीसास सांगावी हा निश्चय व वर्तमान प्रसिध जाहलें आहे. याकरितां हरीपंत उदासीन व लोक बहुत बेमुरवत जाहले आहेत. सिबंदीचा

हंगामा फार आहे. रोजमऱ्याकरितां तिघे सिलेदार मुसलमान रो सदा-सिवपंत करमरकर गुमास्ते फडनीस हरीपंताचे तैनातीस होते त्यांसी उतर प्रत्योतर करितां सदासिवपंतानीं सख्त उतर केलें यास्तव सिलेदा-रांनीं तलवारेनें सदासिवपंतास जखमी केलें. च्यार घटका जिवंत होता. त्या उपरि समाप्त जाहला. सदासिवपंतासमागमे येक दोघें कारकून जखमी जाहले म्हणोन यैकिलें. तिघें सिपाही यापैकीं दोघांस जिवें मारलें व येकास धरलें किंवा लपला आहे म्हणोन पुण्याहून काल छ २९ म्हणजे तिसांवें तारखेचे रात्रीस गडास वर्तमान आलें. सिपाही लोकांचा दंगा फार आहे.

छ २९ माहे माारीं रघोजी भोंसले व दिवाकरपंत दिवाण नि।। भोंसले दोन हजार स्वारानसीं सासवडासमीप येऊन उतरले. छ ३० मंगळवारीं उभयतां कारभारी व श्रीमंतांचे भेटीचा निश्चय होता त्याप्रमाणें छ ३० मंगळवारीं गडाखालें डेरा उभा करून सतरांवे घटकेस श्रीमंतानी खाले उतरांवे हा निश्चय जाहला. रो सखारामपंतबापूस लग्नाची गडबडी होती याकरितां प्राथःकालीच स्नानसंध्या करून भोंसल्याचे लष्करासमीप गेले. रघोजी भोंसले व देवाजीपंत पुढें इस्तकबाल येऊन भेटले. बालाजी जनार्दन फडनीस इस्तकबाल येतील. श्रीमंतांचे भेटीस जांवें, आपण लग्नाकरितां जातों याप्रमाणें बोलून माघारा आपले घरास गेले. त्यानंतर रो नाना फडनीस बालाजी जनार्दन पुरंदरे यांचे घरास आहेराकरितां आले. बापूची व त्यांची भेट ते स्थलीं होऊन येकांतीं बोलणें जाहलें. मातोश्री गंगाबाई रजस्वला, याकरितां श्रीमंताचें येणे गडाखालें होत नांहीं. भोंसल्याच्या भेटी राहिल्या. हा निश्चय करून बालाजी जनार्दन भेटीस गेले. सांप्रदायाप्रमाणें भोंसल्यांची व नाना फडनीसाची भेट जाहली. त्याउपरि फडनीस गडास गेले व रघोजी भोंसले कूच करून कोडीत कऱ्हातीरीं जाऊन उतरले.

रामचंद्र गणेश व बाजीपंत व विसाजीपंत वगैरे मिरजेसमीप होते. पनाळेवाले येसाजी सिंद्याची फौज वडगांवी होती. त्यास रामचंद्र गणेश

यांनी दोन तीन कोसी कूच करून गेले म्हणोन वर्तमान आलें. परंतु येसाजी सिंदा रामचंद्र गणेशावर गालब आहे व रामचंद्रपंत बहुत हुशयारीनें व खबरदारीनें राहात आहेत.

परशरामपंत मिरजकर व कृष्टणराव पानसे मुनहलीसमीप आहेत. महमदअली कुमनदान हुबलीसमीप सोळा सतरा हजार फौजेनसीं आहे व खंदक व बातेऱ्या लष्कराचे गिर्दनवाह बांधल्या म्हणोन खबर आली आहे.

रो हरीपंत फडके यांजवर सरदारी कायम न रहावयाची मसलत करारांत आली व याउपरि पंत माारनुलेकडून सरदारीचे कामाची सरबराई घडून येणें बहुत दुस्तर आहे. बहुतकरून मोरो बाबूराव ठरतील. त्यानंतर सिलेदारांची समजावीस होऊन कदाचित चैत्र वैशाखमासीं श्रीमंतांकडील सरदार व फौज कूच करून गेले तर कृष्टणातीरपर्यंत जतील. कृष्टणापार जावयाची शकल दिसत नांहीं. या उपरि जें वर्तमान घडेल तें लिहून पाठवीन हे विनती.

पाा छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरुवार साइंकाळी मयेदारोगा

श्रीनिवास

पोष्यें हैबतराव गोपाळ साा नमस्कार विनंती उपरि. येथील वर्तमान ताा छ १ सफर फालगुण शुध त्रितिया बुधवारपर्यंत वास्तव्य सासवड जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष रघोजी भोंसले पुरंदरासमीप आले व उभयतां कारभाऱ्यांची भेट जाहली व मातोश्री गंगाबाई रजस्वला, याकरितां श्रीमंताची भेट मवकूफ जाहली इत्यादिक वर्तमान लिहून जोगू व सेरी जासूद यांस छ १ किंवा छ २ सफर फालगुण शुध त्रितिया बुधवारीं सेवेसी रवाना केले ते पावले असतील. त्यानंतर रो कृष्टणरावजीची भेट जाहली. रावजीनीं गोष्ट सांगितली कीं सरदारी विन्हा हरीपंत दुसरा कोण करणार आहे. हरीपंतच सरदारी करतील. मोरो बाबूराव यांचे सम-

जाविसीचा निश्चय सांप्रत राजश्री बापू गडास गेल्यानंतर होईल म्हणोन रावजीचे मुखे यैकिले. राजकी वर्तमान पूर्वील पत्रीं तपसीलवार लिहिलें आहे. सांप्रत विशेष यैकिले कीं रो हरीपंत फडके यानीं पुण्याहून दीड कोस घोरपडीवर होते तेथोन दोन कोस कूच करून तीन कोस खडीमांजरीवर मुकाम केला. थेऊरास जाणार. सारांश कूच करांवे म्हणोन केलें. भीमापार जाहल्यानंतर हरीपंत फौजेस घेऊन येतील हा निश्चय होईल. रो रघोजी भोंसले सेनासाहब सुभा यांस मेजमानी मो रुपये ५००० पांच हजार गडाहून आजी नक्त थैल्या पाठवून दिधल्या. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे हे विनती. पूर्वील पत्रीं सेवकानें रो भीमराव पानसे यांचे जुबानी वर्तमानाची पुर्वणी लिहिली हे सत्य असे हे विनंती.

श्रीनिवास

पु।। श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. छटू मिरध्या-कडील जोडी रवाना करितों म्हणोन मिरधे मार व कृष्टणाजी देवाजीनी सांगोन पाठविलें त्यावरून कागद लिहून सिध केले त्या उपरि त्यानीं जोडी रवाना करणें मवकूफ केली यास्तव विलंब लागला व खांसगत जोडी जोगू व सटवाजी दोघें जासूद सेवेसी विनतीपत्रासहित रवाना केले. इकडील विशेष वर्तमान माघाहून लिहून पाठवीन म्हणोन पूर्वील पत्रांत लिहिलें होतें त्यास प्रस्तुत जोडी स्वामीसमीप पावणार याकरितां विनती लिहितों. राजश्री भीमराव आबा पानसे सखारामपंताचे बहुतच यैक्यतेंत. आबाचे मुखें वर्तमान यैकिलें कीं हरीपंत फडके यानीं सखारामपंताचे बरखिलाफमर्जी वर्तणूक बहुत केली व फौजेंत लोकांच्या बोल्या चितास येतील त्या प्रमाणें केल्या व सेवटीं लोकांचा गवगवा आजीपर्यंत पडला याकरितां बापूनीं हरीपंताचे विषई वैषम्य भाव चितांत आणिला व मोरो बाबूराव यांसीं व हरीपंतासीं यैक्यता नव्हती याकरितां मोरोपंतासीं स्नेह बापूनीं केला व हरीपंताकडे मदारुलमाहामीं व फौजेची यख्तियारी नसावी. सरदार दुसरा करावा, हे तजवीज करून मोरोपंताचे यैक्यतेचें राजकारण करीत आहेत व

बापूचे चितापासून रघुनाथरावदादाची यैक्यता करावं. हरीपंत दादाचे स्नेहाविषई नेषजन आहेत याकरितां मोरोबासीं यैक्यता करून दादाचा स्नेह करावा हे मुख्य मानस बापूचें आहे. या प्रकारचें वर्तमान बहुत रहस्याचें यैकिलें तें सेवेसी विनती लिहिली असे. यजमानाचे सेवेसी व वकारपूर्वकास हेच पुर्वणी वाचून याचा खुलासा व अर्थ विनती करावा. फारसी पत्रांत हा माार लिहिला नांहीं. दुसरा प्रकार मोरोबादादा फौजेची सरदारी कबूल करून यावर्षीं मोंहिमेस जात नांहीत याप्रमाणें मोरोपंताकडील साफ उतर जाहलें. दुसरा कोण ठरतो हें पाहांवें हाहीं माार आबानीं सांगितला. सेवेसी श्रुत होय. वकारपूर्वकाकडून गोष्ट बोलण्यांत येत असलियां युक्तीनें त्यांस विनती करावी कीं सेवकाचं नांव व भीमरायाचें नांव जिवाजीपंत अथवा दुसरे कोण्हासमीपहीं उचार न करावा हे विनती .

पौ छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरुवार साईंकाळी .

श्रीनिवास

विनती जे पुण्याकडील पुन्हां वर्तमान यैकिले कीं सदासिवपंत करमरकर गुमास्ते फडनीस यांस ज्या लोकानी मारलें त्यापैकी दोघाचे सिरछेद केले व दोघांचे हात तोडले. सेवेसी श्रुत होय हे विनती.

पौ छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरुवार साइंकाळी .

A. R. No. 29.

२ सफर ११९१ हिजरी
१२ मार्च १७७७

पौ छ १७ सफर सन ११९१ हिजरी गुरुवार साइंकाळी मयेजोडी दारोगा.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना. यथील कुशल त।। छ २ माहे सफर मु।। क।। सासवड स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणोन

स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पा।। विशेष. यथील वर्तमान छ २६ माहे मोहरम रोज शुकरवारी विनतीपत्र च्यार घटका दिवस शेष राहाता कर्नेल वकील फिरगी येथून कूच करून गेल्याचे वगैरे वर्तमान लेखन करून सेवेसी छटू मिरधे याजकडील जोडी रवाना केली ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाहाले असेल. तदनतर यथील वर्तमान राजश्री रघोजी भोसले मोरेस्वरास जेजुरी पलीकडे साहा कोस आले म्हणोन वर्तमान आले. विदित होये. छ २७ माहे मोहरम रोज शनवार उदईक बापू सिवरात्रेस वटेस्वरास येणार व दुसरे आबा पुरधरे याचे सालीची कन्या राजश्री भिवराव पानसे याचे पुत्रास दिल्ही. लग्न माहे माारी सुध २ येचे आहे. लग्न समारंभ करून उपरातिक बापू गडास जाणार. राजश्री येसाजी सिदे पनाल प्राती आहे त्याजपासी पाच च्यार हजार फौज आहे. त्याचे शहावर राजश्री रामचद्र गनेश आहेत. रामचद्र गनेश याजपासी फौज थोडकी म्हणोन येथून दोन तीन हजार फौज त्याजकडे पाठविणार. येसाजी सिद्यानी त्या प्राती बहुतच उपद्रव माडला आहे. या अर्थी फौज आनिख पाठविणार. पाठविल्यावर लेखन केले जाईल. शृत होये. हरीपताचे लस्करचे वर्तमान येथे आले की तमाम लाहान मोठे सरदार पाटनकर व घोरफडे व निबालकर वगैरे मिलून हरीपताचे डेऱ्यास गेले. हरीपतासी जाबसाल केला की पुन्याजवल कोठवर बसावे. वैरन वगैरे मिलत नाही. सरकारातून पैका मिलत नाही. तुम्ही तो गोड बोलून आजची उद्यावर करिता. नाहीतो आम्हास आज्ञा द्यावी. दुसरे, आमचे देन्याचे फडचे करून द्यावे याप्रमाणे सरदार व सिलेदार वगैरे यानी जाबसाल केला त्याजवरून हरीपतानी उतर केले की काही तुम्हाविशई धन्यासी जाबसाल करीत नाही यैसा प्रकार नाही. तुम्ही व आम्ही कूच करून धन्याकडे जाऊ. उभयेता कारभाऱ्यास समजाऊन सागून बदोबस्त करून घेऊ. प्रस्तुत स्वारी करणाटक प्रातची आहे यैसी भवति न भवति हरीपतासी व सरदार वगैरे यासी जाली. त्याजवरून हरीपंत कूच करून येथे कारभाऱ्याजवल येणार. कारभाऱ्याजवल येऊन जाबसाल करून उपरातिक कूच करून सिधटेकापावेतो जावे यैसी वंदता आहे.

मग येविशई काये निश्चये ठैरल तो सेवेसी लेखन केले जाईल. परतु हरीपतांचे येथे येणे व कूच होणे हे दीर्घसूत्री आहे. दुसरे भोसलेही येका दो दिवसा येथे येणार यैसे आहे. शृत होये. छ २८ माहे मोहरम रोज रविवार दीड प्रहर दिवस येता सिवरात्र म्हणोन राजश्री बापू बटेस्वरास आले. रात्रौ तेथेच राहिले. दुसरे दिवसी भोज्यन करून सासवडास आले. माधवराव निलकठ याचे वाडचात जाऊन देव-देवक बसविले. उदईक भीवराव पानशाचे यथील लग्न येणार. राजश्री बापू पाच च्यार दिवस लग्नप्रसगास राहिलें. लग्नप्रसग जालिया उपरातिक गडास जाणार. शृत होये. होलकराकडील पेशकसी बाा दाहा लक्ष रुपये द्यावे यैसा करार ठैरला. यैवज हरीपताकडे देविला आहे. त्यापैकी दो ती लक्षाची निशापत्री जाली आहे. श्रुत होये. छ २९ माहे मोहरम रोज सोमवार राजश्री रघोजी भोसले सासवडास दाखल जाले. समागमे फौज दोन अडीच हजार आहे. देवाजीपंत चोरघोडेही समागमेच आहेत. उदईक कूच करून गडाखाले भिवडी व कोडीत या मैदानीत राहाणार. शृत होये. च्यार सा घटका दिवस शेष राहाता राजश्री कृष्णराव बलाल पुन्याहून पुरदरास आले. आपले डेऱ्यास न जाता तैसेच गडावर नानाचेभेटीस गेले. नानाचा व राव माार याचा खिलवत दोन तीन घटका रात्रपूर्व पावेतो जाला. उपरातिक राव माार आपले डेऱ्यास आले. शृत होये. सध्याकाली राजश्री भीवराव पानसे याचे लग्न सासवडास आले. वराचे श्रीमतपूज्यनास गावातून बापू व बज्याबा वगैरे गेले होते. श्रीमतपूज्यन जालिया बापू आपले घरास आले. बज्याबा वरास व भीवरावजीस समारंभे करून जानवशास प्रहररात्रपूर्व जाता घेऊन आले. उदईक लग्न मगलवारी सुध द्वितीयेस चवदावे घटकेस दिवसा आहे. शृत होये. राजश्री बालाराव सिद्याकडील यासी कारभारी जाबसाल करितात की होलकरानी पेशकसी बाा दाहा लक्ष रुपये दिल्हे. त्याप्रमाणे प्रस्तुत तुम्ही दाहा लक्ष रुपये द्यावे. अद्याप निश्चयात आले नाही. सिदे आलियावर निश्चये काये होणे तो होईल. श्रुत होये. राजश्री हरीपताजवल सदासिवपंत करमरकर फौजेचे फडनीसीचे कामावर होते. त्यास कुदबी साहेबाचे पुत्राकडील

पाच च्यार बारगीर रोजमुरा मागावयास सदासिवपंत फडनीस याजकडे गेले. ते बारगीर रोजमुरा मागू लागले. बारगीर मुसलमान होते. सदासिवपंत त्यासी धड जाबसाल करीनात. काही बारगीरास न्यून्यपूर्ण बोलले त्याजवरून त्या बारगीरानी सदासिवपतास कटारीने जेवच मारले. लस्करात येक गुल जाला. ते बारगीरही तेथेच हरीपताचे लोकानी जिवे मारिले. सिबदीचा गवगवा हरीपतावर बहुत आहे. हरीपताचे कूच होत नाही. शृत होये. छ १ माहे सफर राज मगलवार राजश्री भीवराव याचे पुत्राचे लग्न चवदा घटका दिवसात लागले. प्राथःकाली च्यार घटका दिवस येता बापू रघोजी भोसले याचे भेटीस गेले. होते. भेटेउ घेऊन बापू घरास आले. दीड प्रहर दिवस येता नाना गडाहून भोसल्याचे भेटीस आले. भेट घेऊन भिवराव याचे येथे लग्नासं आले. लग्न लाऊन मागती नाना गडास गेले. भोसले माार यानी सासवडाहून कूच करून कोडीतावर मुकामास गेले. श्रीमताची व भोसल्याची भेट येका दो दिवसा होणार. शृत होये. राजश्री कृष्णरावजी गडाहून बापूचे भेटीस सासवडास आले होते. बापू निलकठ माहादेव याचे वाडचात लग्नात होते. बापूचा व राव माार याचा सध्याकाल पावेतो खिलवत जाला उपरातिक रावजी गडाखाले आपले डेऱ्या

(अपूर्ण)

A. R. No. 30. १६ सफर ११९१ हिजरी
२६ मार्च १७७७

अखबार अज इ॥ छ ९ सफर लगा (का. फा.) सन ११९१ हिजरी

रो हरी बलाळ फडके यांस श्रीमंत पंतप्रधाना (का. फा.) जाहली जे होळकरा बाा रुपये दाहा लक्ष फौजेस रो (का. फा.) ऊन कूच दर कूच जाणें त्याजवरून पंत माार यानीं लोंकास रोजमऱ्याचा थैवज देऊन कूच करून भीमातीर सिधटेंकास गेले. आजी छ माारीं

सिधटेंकीहून कूच करून पंढरपुरापर्यंत जाणार म्हणोंन वर्तमान यैकिलें. कृष्टणराव बळवंत अद्यापीं पुणें व सासवडीं आहेत. त्यांचे जावयाचा निश्चय नांहीं. रो दिवाकर पुरुषोतम नि।। रघोजी भोंसले हरीपंताचे भेटीस छ ९ माहे माारीं गेले होते. छ १० रोजीं हरीपंतानी ज्याफत करून वस्त्रें देऊन रुखसत केलें. पुन्हां पुरंदरासमीप सैन्यास आले.

छ १२ सफरीं रघोजी भोंसले व दिवाकर पुरुषोतम गडावर श्रीमंताचे दर्शनास गेले होते. श्रीमंतांनी भोजनांचें आतिथ्य केलें. बापू व नाना व भोंसले व दिवाकरपंतांसी दोन घटका येकांत जाहला. त्याउपरि भोंसले निरोप घेऊन डेऱ्यास आले. छ १५ माहे माारीं रघोजी भोंसले व मुतसदीमंडली तमाम (का. फा.) स श्रीमंताचे सूचनेप्रमाणें भोजनास गेले होते. भोज (का. फा.) जी जनार्दन फडनीस व बाबूराव वकील व दिवाकर (का. फा.) टका येकांती बसले होते. गंगथडीस घांसद (का. फा.) आज्ञा द्यावी म्हणोन भोंसले..... कोल्हापूर प्रांती जांवें याप्रमाणें (का. फा.) स आहे. सिंदे माार पेड-गांवास येणार होते. तुकोजी होळकर पुण्यांत आहेत.

परशरामपंत व कृष्टणराव पानसे मुरंबासमी (का. फा) मद अली कुमनदान हुबलीसमीप आहे. पर्जन्य का (का. फा.) मार्गप्रतीक्षा हैदर-नायकास व परशरामपंतास आहे. मृग प्रवेशानंतर परशरामभाऊस कुमक न गेलियां कृष्टणापार राहात नांहींत व हैदरनाईक शानूर प्रांती येणार. याउपरि जें नवल विशेष वर्तमान होईल तें लिहून पाठवीन हे विनती.

पौ छ २९ माहे सफर मंगलवार सन ११९१ हिजरी, अडीच प्रहर.

श्रीनिवास

पोष्यं हैबतराव गोपाळ सां।। नमस्कार विनती उपरि येथील वर्तमान ताा छ १६ सफर फालगुण वद्य त्रितीया बुधवारपर्यंत मो

सासवड स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ९ माहे माारीं विनतीपत्र हुजूरचे अर्जीचेसहित पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्याउपरि इकडील ताजें वर्तमान पृथक पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. रो हरीपंत फडके यांचे जाण्या (का. फा.) बहुत उत्पन्न जाहला होता. परंतु मोरो बाबूराव फडनीस यांनी मोहिमेस जाणें अंगीकार केला नांहीं व हैदरनायकाचें पारपत्य व त्याजवर दाब फौज गेल्या वितरित्क पडत नांहीं व रो जिवाजी रघुनाथ यांचीं पत्रें वरचेवर आलीं कीं हरीपंताची रवानगी सत्वर करावी याविषई हुजूरची आज्ञा आहे त्याजवरून येथील कारभाऱ्यांचे सूचनेनुरूप रो हरीपंतानीं थेऊरचे मुकामीहून कूच करून मजल दरमजल सिधटेक भीमातीरास गेले. तेथोन पंढरपुरास जाणार. प्रस्तुत हरीपंत स्वतंत्र जाहले आहेत. श्रीकृपेकरून फौज फेरोजीसीं येकत्र होतील यैसें वाटतें. अमलांत येईल तें सत्य. हुजूरचा इनायतनामा अंताजी भगवंत याचें कर्ज गोंदीचे पाटलावर आहे. त्याचा रोखा व करारमदार जाहला असतां पाटील रुपये देत नांहीत याकरितां येथील मदारुलमहामास सागोन पाटलास ताकीद करून रुपये देववावे म्हणोन आला होता. त्याप्रमाणें रो कृष्टणरावजी व उभयतां कारभाऱ्यांस वर्तमान सांगितलें व रो जिवाजीपंतानीं रावजीस सविस्तारें लिहिलें होतें. याचें उतर येशवंत गंगाधर नि।। होळकर यांचे सागितल्याप्रमाणें बापूनीं केलें कीं आसल रुपये पांच सातसें बाकी राहिली आहे. साल गु।। जबरदस्ती करून पाटलांपासून कबुलीयत लिहून घेतली आहें तरी वाजबी मनास आणून फैसला करावा. वाजबीचें रुयीनें जे रुपये निघतील ते गांवकरास ताकीद करून देऊं. याच अन्वयानें कारभाऱ्यांनीं हुजूर अर्जी पाठविली आहे. पुन्हां हुजूरची आज्ञा येईल त्याप्रमाणें अमलांत आणतील. दुसरा हे (का. फा.) जूरचा निर्णय वगैरे माहाल जागीर मुबारुजुलमुलुक बहादर येथील चौथ व सरदेशमुखी व बाबती व साहोत्रा माफ करून माफीची सनद श्रीमंत पंतप्रधानांची पाठवावी. माफ करण्यांत बहुत नुकसानीं जाणून न करतील तरी ममता करून

पाठवावा. त्याप्रमाणें रुपये सरकारातून देऊं या माराचा व कृष्टणराव बलाळ यांस इनायतनामा सादर जाहला त्याची नकल व मुबारुजुल-मुलुक बहादरानीं आपलें पत्र सेवकास छ २८ मोहरमचें पाठविलें तें आजी छ १६ माहे मारीं रो गोविंदराव भगवंत नि।। कृष्टणराव बलाळ यानीं पावतें केलें त्यास रो कृष्टणरावजी बारामतीस गेले आहेत. रो बाबूजी नाईक यांचे प्रकृतीस स्वस्थता जाहली. रावजी सत्वर येतील. सेवक उदईक गडास जाऊन बापू व नानास वर्तमान सांगोन कृष्टणरायांचे इनायतनाम्याचा मार श्रुत करितों. श्रीकृपे-करून रावजी आल्यानंतर कार्य होईल. सांप्रत हुजूरीत व मकार-पूर्वकास अर्जी व पत्र पाठविलें तें वाचून.

(अपूर्ण)

A. R. No. 31. (पो. ता.) ४ रबिलाखर ११९१ हिजरी
१२ मे १७७७

पौ छ ४ रबिलाखर सन ११९१ हिजरी सोमवार येक घटिका रात्रीस.

श्रीनिवास

पु।। श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, विनतीजे, मौजे मदनूर वगैरे पा कौलास जागीर सेवकाची, येथील च्याहारुम विषई तकयुद फार आहे, व स्वामींनी हुजूरांत सेवकाचे विषईचा मार अर्ज केला, व बहुता दिवसाची बाकी राहिली म्हणोन आज्ञा केली, त्यास स्वामीनीं येकदां मजला सांगितलें होतें कीं च्याहारुमचा तकाजा आहे. माफ करून घेणें. परंतु ते समई प्रधान होते, याकरितां उपेक्षा जाहली. सांप्रतचा प्रकार तर मदनूर वगैरे गांवचा रुपया तनख्या-प्रमाणें समग्र येतो. त्याजवर प्रपंचे चालतो. निळें वगैरे गांवा-पासून गतवर्षीं तेरासे रुपये आले. सालहालीं काय वसूल येईल तो आखर सांली कळेल. श्रीमंताकडून स्वामीनीं पैठण परगण्यात

गांव देविला आहे. तथील पांच सातसें रुपये गत वर्षीं आले. त्यापैकीं दोन तीनसे रुपये खर्चून जरूरी दिखाऊ एकदोन वस्त केली, व वरकड रुपये सासवडीच खर्च जाहले. सांप्रत तरी त्रिवर्ग चिरंजीव व भाचा व जामात व कन्या व स्त्री व शालक व वैदिक ब्राह्मण व पाकाचा व उदकाचा ब्राह्मण इतका समुदाय पंक्तीस भोजनाचा. याविंतरिक्त ती।। आनंदरावजीचा पुत्र व मुकुंदराव येशवंत बीडकर रोजगाराचे तलाशास आले ते येथेंच आहेत, याविरहित शूद्र मनुष्यें येणेप्रमाणे आहेंत. तीर्थरूप राजश्री नानास्वामी माघमासी खेडास गेले. कनिष्ठबंधु सहकुटुंब खेडीं व मध्यम बंधु सहकुटुंब मदनूरीं येणेंप्रमाणें तीन स्थलीं खर्च आहे. सौ।। वती मातोश्री व चिरंजीव रघोतमरावदादाची स्त्रीस आणविले आहे. ते येणार. जगत्कुटुंबी श्री स्वामी तो सर्वांचा निर्वाह करितो, परंतु बाह्यात्कारें यजमानाचे परवरसेवर अन्नवस्त्राचा निर्वाह होतो. मदनूर वगैरे गांवची च्याहारुम माफ व्हावी याविषईं स्वामीनीं अर्ज केला व मी अर्जी व येक खुष्क फर्द मोहरी सेवेसी पाठविला आहे. तो पावला असेल. हे उपाय मात्र आहेत, कृपा करणें यख्तियार यजमानसाहबाचा. मनसब असल व इजाफा पांचसदी आहे. त्या हिशोबीं कांही तलबहीं बाकी निघते. त्या यैवजांत च्याहारुम इनायत व्हावी किंवा कृपा करून माफ करावी. स्वामीचा यत्न न चाले व यजमानाची मर्जी नसल्यास सर्वस्वें जागीर व मीं आपले शरीरें करून यजमानाचा आहे. जे आज्ञा करतील ते सर्वस्वें मान्य व च्याहारुम किंवा दरोबस्त जागीर मागतल्यास संतोषासच कारण. ज्याचें देणें त्यानें नेल्यास खेद किमर्थ? परंतु माघील तकाज्यास सर्वथैव उपाय नांहीं. समग्र जागीर सोडून तीर्थयात्रेस जाणें प्राप्त होईल. पुढें मागतील तर त्यास उपाय आहे. च्यार रुपयाचें वस्त्र घेत होतें ते दोन रुपयाचें घेऊन कालहरण करूं. यांत भूषण व कीर्ती यजमानांची आहे. सारांश हा सर्व अर्थ वकारपूर्वकासहीं सांगावा. स्वामीचे यत्नास जे साध्य होईल ते करावें. कुटुंबातील गणना, तेव्हां घरचे सर्व वर्तमान कळलें पाहिजे म्हणोन लिहिलें असे. कार्तिक मासापासून स्मार्त

सिध केलें आहे. प्रपंच आटोपाया योग्य स्त्रीची प्रौढ (पुढील एक अक्षर अस्पष्ट) नांहीं. जेष्ठ स्नुषा आल्यानंतर तिची परीक्षा कळेल.

२

पु॥ श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, खेड व बीड प्रांती दीड मण किंवा सवा मण म्हणजे मापी सोळा वीस पायल्याची धारण, व सासवड पुण्यांत पांच साहा पायल्या त्रिगुण (का. फा.) अंतर पडतें. खर्च भारी. इतके समुदायाचा निर्वाह होणें बहुत कठीण. परंतु च्यार वर्षे समाप्त होऊन पांचवें लागलें. लेंकी व सुना व बंधूची भेट नांहीं. याकरितां येथें आणवणें प्राप्त जाहलें. वर्षास येक महिना. घरास जावयाची परवानगी जाहलियां फार उपयोगी. परंतु गतवर्षीं स्वामीनीं यजमानास अर्ज केला व त्यांनी आज्ञा दिधली नांहीं. पुन्हां विनती किमर्थ करावी? सेवा म्हणजे शरीराचा विक्रय त्यास उपाय काय? राजश्री कृष्टणाजी देवाजी स्वामीचे आज्ञेप्रमाणें लग्नाकरितां गेले आहेत. व त्यांचा गुमास्ता येथे आहे. याजप्रमाणें मजला सोडणूक असती किंवा होईल तर फार उपयोगी. सारांश यजमानांचें अन्न भक्षून त्यांचे सेवेत येकनिष्ठ राहिल्यांत सर्व सुख व भूषण आहे. या निश्चयावर येक सेवा मुख्य करून, इतर सुख याचे योगें जाणून निश्चित व संतोष वृतीनें आहे. सविस्तारें वर्तमान स्वामीस विदित आहे. पुन्हां ध्यानारूढ व्हांवें याकरितां विनती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें हे विनती.

पौ छ ४ रबिलाखर सन ११९१ हिजरी सोमवार यक घटिका रात्रीस.

श्री

विनतीजें हरकाऱ्याचे तनख्याविशंई हुजूरचा इनायतनामा राजश्री नारायणराव बापूचे नांवचा येईल. परंतु परस्परेंही त्यास आज्ञा ल्याहंवीजें जासूदांची तनखा माहबमाह देत जाणें, हे विनती,

रामजी जासूद दुर्गादासासमीप आहे तो येक मास राहिला असेल. त्यास तलब पावली. त्याचा हिशोब माघाहून लिहून पाठवितों हे विनती.

पौ छ ४ रबिलाखर सन ११९१ हिजरी सोमवार येक घटिका रात्रीस.

———

A. R. No. 32. (पो. ता.) ४ रबिलाखर ११९१ हिजरी
१२ मे १७७७

पौ छ ४ रबिलाखर सन ११९१ हिजरी, इंदुवार मये नागोनाथ श्रीनिवास

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी.

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. राजश्री नरसिंगराव खटांवकर जागीरदार सरकार आलीचे, व प्राचीन मनसबदार उमदे खानदानचे, त्यास पेशव्यांकडील सरदाराचे उपद्रवाकरितां तीन चार वर्षें बहुत पेंचात आले. राजश्री भीमराव आबा पानसे यांचे शरीरसंमधी , याकरितां आबानीं बहुत साहित्य केलें व करीत आहेत. सांप्रत हुजूरीहून नजरेचा तगादा रो नरसिंगराव यास लागला आहे. प्रथमतां येकदां नजर घेतली आहे. जागीरीचा बंदोंबस्त असतां व चाकरीस हाजर नसते तरी तगादा लागावा. या अर्थीं आबानीं स्वामीस पत्र लिहिलें आहे व मजला बहुता प्रकारें सांगितलें कीं नरसिंगरावजी बहुत पेंचात आहेत. यांजविषईं जे साहित्य स्वामीकडून होईल तें करून हुजूरीहून नजरेचा तगादा न लागे. तो अर्थ जाहला पाहिजे म्हणून त्यास आबाचा व स्वामीचा स्नेह अकृत्रिम. त्या अर्थीं राजश्रीचे साहित्या-विषईं जो प्रयत्न तो स्वामीकडून अमलांत येईल, विशेष काय लिहिणें, हे विनती.

———

A. R. No. 33. २४ रबिलावल ११९१ हिजरी

२ मे १७७७

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी. खासगत जासूदाचे जोडीबराबर सा घटका दिवस येताना.

श्रीनिवास

पोष्यं हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान त।। छ २४ रबिलावल चैत्र वद्य येकादसीपर्यंत, वास्तव्य सासवड, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून, स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ १८ माहे माारीं भिवजी धोंडोजी जासूदांसमागमें विनतीपत्र हुजूरचे अर्जीसहित पाठविलें तें पाऊन वर्तमान सेवेसी श्रुत जाहलें असेल. सांप्रत स्वामीकडील पत्रें सेवकाचे पत्राचें रसीदीची हुजूरचे इनायतनाम्यासहित, जटचरल्याचे मुकामचीं, छ १ रबिलावलचें व छ ११ रबिलावलचं पाठविलें तें छ १६ व छ २४ रबिलावलीं पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें. यापूर्वी येक जोडी शंकराजी व सेटी राऊत जासूद जोडी छ ९ सफरीं येथील अखबार व विनतीपत्रासहित रवाना केली, ते स्वामीसमीप पावली किवा न पावली ? ते जासूद परतोन येथें आले नांहींत. ठिकाणदार आहेत त्यांचे घरीं शोध घेतला, घरीं नांहीत, त्यास ईश्वर क्षेम कर्ता ! पत्रें हुजूर पावली नांहीत. खबर फौत जाहलियाविषईं सेवक लाच्यार आहे. सांप्रत छ ११ रबिलावलचे पत्रीं माार होता कीं रो नारायणरावजी यांस इनायतनामा जासुदांचे तनख्याविषई पाठविला आहे व रावजी बहुत रसिक आहेत, माहबमाही रुपये देतील. आज्ञेप्रमाणं परवान्याची नकल व इनायतनामा रावजीकडें पाठऊन दिधला. कबजहीं लिहून पाठविलें आहे. राजश्री भीमराव आबाची पत्रें पाठविलीं ते अवलोकन करून लिफाफियास गोंद लाऊन जिवाजीपंतनानास पत्र पावतें करावें. त्यांचा माार तपसीलवार लिहिला आहे. स्वामीचे नांवं व सेवकाचें नांवेंही रुपये आबानी देणारास दिधले. परंतु समग्र रुपये खग्रास जाहले आहेत. राजकी विशेष वर्तमान मुख्तसर मुसारे सिवालियर सालूबे फरासीस

छ २२ रबिलावलीं पुरंदरासमीप येऊन उतरला. भीमराव पानसे इस्तकबाल गेले होते. श्रीमंताचे कारभाऱ्यांची व फरासीसाची भेट उदईक छ २५ रोजीं होणार. रघोजी भोंसल्यांचे डेऱ्यास श्रीमंत पंतप्रधान आले आहेत. बहुमान जवाहर व वस्त्रें सर्वत्र मंडलीस अपूर्व दिधलीं. छ २६ रोजी रघोजी भोंसले श्रीमंताचा निरोप घेणार व जेउरीं श्री देवीदर्शन घेऊन नागपुरास जाणार. देवाजी पंताचे राहावयाचा गुता राहिला नांहीं. माष्टी वकील येथेंच आहे. फरासीस त्याजवर दडपण आणले आहेत. सविस्तारें वर्तमान अखबारेंत लिहिलें आहे. यजमानसाहबांस व वकारपूर्वकास विनती करावी. बहुत काय लिहिणें. हे विनती.

———

पौ छ ११ माहे रबिवलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

पु।। पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी.

विनंती जे छ २५ माहें रबिलावली मुशोर सिवालीयेंदे सालुबें फरासीसाकडील येंलची याचे भेटीस्तव राजश्री सखारामपंतबापू व बाळाजी जनार्दन गडाहून उतरोन त्रितीय प्रहरीं गडाखालें डेरा उभा आहे त्या स्थळास आलें. त्या उपरि संकेताप्रमाणें फरासीसही डे-यास आला. रो कृष्टणराव बलाळ व रो माधवराव सदासिव वगैरें मंडली आली होती. परस्परे भेटी होऊन बेच्योब्यात उभयता कारभारी व माधवराव सदासिव कृष्टणराव बलाळ व फरासीस सरदार व दोघे दुभासे खलवतेस बसले होते. च्यार घटका येकांत करून अतर पानदान देऊन रुखसत केले. उपरांतिक बापू नाना गडास स्वार होऊन गेलें व फरासीस आपले डेऱ्यास आला. खलवतेतील माार अद्यापीवर कळला नांहीं. शोध घेऊन माघाहून लिहून पाठवीन.

छ माारी रो रघोजी भोसले सेनासाहेब सुभा रों भीमराव आबा पानसे यांचे घरास सोनोरीस भोजनास

दाहा वीस लोकासहित गेले होते. राजश्री भीमराव यानीं भोसले माार यांस पैठणी शेला पागोटे बेश किमती व येक सिरपेंच मुरसा दिधला. समागमीचे मातबर सिपाई लोकास पैठणी शेला पागोटी मध्यम प्रतीची पाच असाम्यास दिल्ही. भोजनास बेवीस आसाम्या गेल्या होंत्या, भोजनोतर अतर पानदान घेऊन भोंसलें आपले डे-यास आले. सेवेसी श्रुत होये. फरासीसाचे भेटीचा माार ल्याहावयाकरितां येक दिवस जासूद जोडी राहिली. आजी छ २५ माहे माारी सेवेसी रवाना केली आहे हे विनती.

———

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

पु।। पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचें सेवेसी, विनतीजें. विठलराम यानीं श्रीमंताकडून सरदेशमुखी व बाबती वगैरें मामलती केल्या आहेत, व पांढरें यांचे तालुकियाची जत्फीही होती. हुजूरांतून सरगराचे तालुकियाची जत्फी अजीमुदौला बाहादर यांजकडे जाहली आहें. यास्तव बाहादर मवसुफ पालिंब वगैरे तालुकियांत आलें. सरगरांचे कारभारी यांचे दरखास्तीप्रमाणे रोज साडे पांचसे रुपये कबूल करून मदतीस विठलराम आलें. मार्गीं येताना मौजे झोलपिंपरी पाा पालिंब हा गांव नवाब शर्फदौला बाहादरानीं चिरंजीव राजश्री कृष्टणराव दाजी यांचे तनख्यात दिल्हा आहें. पिंपरी सेवकाकडील गांव जाणून विठलरामजी कांहीं इलाका नसतां तीनसे रुपये मौजे म।।रापासून घेतलें. तीर्थरूप नानास्वामीनीं पत्र पाठविलें असतांही यैकिले नांहीं. यास्तव तीर्थरूपजीनीं वर्तमान मजला लिहिलें. सेवकाने राजश्री कृष्टणरावजीस व श्रीमंत राजश्री बापू नानास श्रुत केले. त्याजवरून उभयतानीं श्रीमंत पंतप्रधानस्वामीचे पत्र प्रखर देविले आहे कीं सेवकाकडील गांवापासून जे रुपये घेतले असतील ते माघारा देणे. व राजश्री रावजीनीं तों बहुता प्रकारें प्रखर लिहिले

आहे. परंतु राजश्री रावजी म्हणत होते कीं विठलराम हुजूर जाणार यास्तव विनती जे. याजविषई जे विठलरामास आज्ञा करावयाची असेल ते करावीं. श्रीमंताचा दस्तावेज सेवकासमीप आहे. आज्ञा जाहलियां सेवेसी पाठऊन देईन. विठलराम हुजूर जाईल म्हणोन नाना फडनीस व कृष्टणरावजीनीं सांगितलें त्यावरून विनती लिहिली असे. हे विनती.

विठलरामाचा माार राजश्री जिवाजीपंतनानास लिहून पत्र लिफाफा खुला पाठविला असे. व रहमायारखानाचा सिलसिला असावयास्तव त्याजला सदैव पत्रें लिहितों. सांप्रतचे पत्रीं तुमचे पत्राचें उतर येत नांही म्हणोन लिहिलें आहे हे विनती.

———

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

पु।। श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, विनतीजे, राजश्री भीमराव पानसे यांचे दुमोहरी सनदेचा माार स्वामीनीं लिहिला होता कीं विन्हा पेशकस बादशाही सनद व जमीनीची सनद होत नांही हा माार भीमराव आबास तपसीलवार सांगितला. त्यास येथील माार आबांनी तपसीलवार सांगितला, व मजला शफतपूर्वक सांगितलें की याची प्रसिधता न व्हावी. व स्वामीस विनती करून पेशकसीचा यैवज हुजूर घ्यावा. व सनद सिध करून पाठवावी. त्यास मजला जें वर्तमान कळलें तें स्वामीसच कळल्याप्रमाण. आपले चक्षू व श्रोत्र दोन्हीं इंद्रियें सेवक. यास्तव यैकिलें वर्तमान सविस्तारें लिहिलें असे. स्वामीनीं या पक्षीचे मंडलीसमीप किमपी उदगार न करावा. येथोन दरबार खर्च व नजर पेशकसीचा यैवज अकरा हजार रुपये भीमरायानी दिधले. त्याचा तपसील हुजूर नजर पेशकसी बाा व

दरबार खर्च--

२०००	नजर हुजूर	४०००	श्रीमंताकडील मुतसदी
३०००	दरबार खर्च हुजूरचे मुतसदी	२०००	मध्यस्त
	२००० रायरायाजी	१०००	वकील श्रीमंत
	१००० रायनानकराम	५००	गकारपूर्वक
	३०००	५००	हैबतराव गोपाळ
		२०००	
५०००		६०००	
	११०००		

सदरहू रुपयाची नक्त निशा भीमरायानीं दिधली. व कृष्टण रावजीनीं आबासीं नेम केला आहे कीं तुम्हीं निश्चिंत राहणें. दुमोहरी सनद आणून देवितों. दरबारी खर्च आमचे चितास येईल त्यास देऊं व करूं. याप्रमाणें उतर करीत आहेत. आबानी मजला सागितलें कीं दोन हजार रुपये पेशकस हुजूरची घेऊन सनद सिध करवावी. जिवाजी रघुनाथ रुपये देतील याप्रमाणें वर्तमान सांगितलें. व येथील मुतसद्यांचे नांवं बहुत श्रमी. परंतु उपाय नांहीं. याकरितां कांहीं उच्चार करीत नांहींत. सांप्रत पूर्वील सनदेच्या नकला खास मोहरी व दुमोहरी व कयफियत व स्वामीस व जिवाजीपंत व नागोपंतास येकून तीन पत्रें मजकडे पाठविलीं. व पत्रें वाचून लाखोटे करून पाठवणें म्हणोन लिहून पाठविलें. त्यास सेवकानें जिवाजीपंताचं पत्र खुलंच पाठविलें आहे. अवलोकन करून गोंद लाऊन जिवाजीपंतास पावता करावा. येथील मंडली आबारी सगट हाती गिळणार हें स्पष्ट आपणास विदित आहे. शूचनार्थ विनती केली असे. बहुत काय लिहिणं हे विनती.

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इ॥ छ १८ माहे रबिलावल सन ११९१ हिजरी लगायत छ २४ माहे माार सन ईले शनिवार राजश्री सखाराम-

पंत बापू सासवडास श्राधाकरितां आले होते. छ १९ व छ २१ तीन दिवस होते. त्या उपरी छ २२ रोजीं पुन्हां गडावर गेले.

फरासीसाकडील येलची मुशारे सिवालियदे सालुबे छ २२ माहे माार गुरुवारीं पुरंदरास येणार, यास्तव श्रीमंत पेशव्यांचे आज्ञे-प्रमाण भीमराव पानसे इस्तकबालास गेले होते. फरासीस माराची भेट जाहल्यानंतर भीमराव व भीमरायाचे बंधु चिमापास वस्त्रें च्यार पारचे प्रमाणं देऊन उभयतां समागमें आले. सासवडाचे व पुरंदराचे मध्यें अंबराईत डेरे दिधले होते. ते स्थलीं फरासीस माार येऊन उतरला, कारभाऱ्यांचे व श्रीमंताचे भेटीस मुहूर्त सापेक्ष याकरितां दोन तीन दिवस भेटी राहिल्या. रघोजी भोंसले सेनासाहब सुभा यांचे डेऱ्यास श्रीमंतानी यांवें, हा मनोदय भोंसले माराचा होता, यास्तव छ २२ माहे माार गुरुवारी त्रितीय प्रहरीं श्रीमंत पेशवे मातोश्री वितरिक्त गडाहून स्वार जाहले, नाना फडनीस वगैरे समागमें होते रो सखाराम-पंत वगैरे मंडली सासवडाहून परस्परें भोंसल्याचे डे-यास गेले. पांच घटका दिवस राहतां श्रीमंताची स्वारी भोंसल्याचे लश्करासमीप आली. रघोजी भोंसले घोडयावर स्वार होऊन इस्तकबालास गेले. श्रीमंत पालखींत स्वार होते, भोंसले माराचा पालखींतून हात धरून डेऱ्यापर्यंत आले, पसीना वगैर येण्याचे अयासाकरितां बेचोब्यांत अर्ध घटका विश्रांत करून सदरेस येऊन बसले. समागमें तमाम मुतसदी व सरदार होते. नाच व कवालांचे गायन व अरायश मजलसी बहुत चांगली केली होती. नदीचे कांठी आंब्याचे झाडा-खाले डेरे उभे केले होते.

१ श्रीमंत पेशवे
१ सखारामपंत
१ बालाजी जनार्दन
१ त्रिबकराव मामाचा नातू
१ गोविंद सिवरामाचा लेक व बंधु
१ माहदाजी नीलकंठ पुरंदरे
१ राघो लक्ष्मण पुरंदरे
२ कृष्टणराव बलाल मय पुत्र
१ धोंडो आपा पुरंदरे
२ भीमराव पानसे व त्यांचे बंधुसहित

१ बालकोबा तात्याचा पुत्र	१ मलबा पानसे बक्षी
१ त्रिंबकराव चिटनीस	१ फरासखान्याचे दारोगे
१ नारायणराव मुनसी	१ मुतबखचे दारोगे जनोबा
१ माहदाजीपंत मुजुमदार	१ मोरोपंत भावे
१ बालाजीपंत पोतेनीस	२ भगवंतराव मेडेकर
१ जवाहरखान्याचे दारोगे	२ माधवराव सदासिव पितापुत्र
१ कृष्टणराव बलवंत	
२ कृष्टणरायाचे दोघे पुत्र	
१ गणपतरायाचे पुत्र	
१५	१५

३०

१५ ब्राह्मण मंडली नि।। श्रीमंत	४ वकील मंडली
१५ सुद्र सरदार	१ हैबतराव गोपाल
१५ नि।। नाना फडनीस	१ नारोपंत नि।। सिंदे
१० नि।। सखारामपंत	१ नि।। भवानराव
५० सिलेदार नि।। श्रीमंत	१ दिगंबरपंत नि।। जाफरुदौला बहादर
१०५	४

१०९
३० किता
११ किता
१५०

सदरहू प्रो मंडली होती. त्यास सर्वत्रां पैठणी मुंडासी मरातबाप्रमाणें सात आठापासून पंचेवीसापर्यंत. व सेले पैठणी आठ रुपयापासून शंभर रुो पावेतो, व किमखाब व मशरू व बऱ्हानपुरी पोषाक व कळसपाकी व शालजोड्या शंभरपर्यंत सर्वत्रास दिधल्या. सेवकास शालजोडी व पैठणी मुंडासे दिधले. श्रीमंतास व मुतसद्यास वस्त्रांचा व जवाहराचा तपसील १ श्रीमंत पंतप्रधान.

१० पोषाक बादली भरजरी किमत रुो २५०० अडीच हजार.
२ चिरे
२ ज्यामेवार थानें
२ किमखाब बेश किमत विजारा
२ चादर भरजरी
२ शालजोड्या
१०

३ जवाहर मुरसा किंमत रुो १५०००
१ सरपेच
१ कंठी मोतीं व पाचाचे दाणे
सुमार मोतीं, पाच पदक अलमास
२५ १० १
१ लोलक मोती
३७
१ तुरा मोतीयाचा सर १२ दर
सरास मोती सुमारे दाणे ४०
३ हाती छांवा किंमत रुो ४०००
पैकी किमत दोन हजार हो-
तील निमच्या येक कबजा.

म | ५१३

सखारामपंत

पोषाक छीटी ब-हानपुरी
२ जामेवार थानें
१ मुंडासे
१ सेला
१ किमखाब थान
१ सरपेच मुरसा
६

बालाजी जनार्दन फडनीस

पोषाक छीट ब-हानपुरी
२ जामेवार थान
१ मुंडासे
१ सेला

१ किमखाब थान
१ सरपेच मुरसा
६

१ माहदाजी नीलकंठ पुरंधरे पोषाक छीटी ब-हानपुरी
२ जामेवार थान
१ मुंडासे
१ सेला
१ किमखाब
१ सरपेंच मुरसा
६

या वितरिक्त सखारामपंत व बालाजी जनार्दनास हाती देणार म्हणोन यैकिलें. सेवकास सखारामपंत बापूनीं पाचारिले याकरितां गेलों होतों.

श्रीमंत पेशवे येक घटका बसले होतें. उपरांतिक स्वार होऊन गडास गेले. त्यानंतर सखारामपंत व नाना फडनीस च्यार घटका बसले होते. सर्वत्रांस वस्त्रें व विडे व अत्तर व पानदान दिधल्यानंतर येक घटका रात्रीस स्वार होऊन गेले. बापू व नाना गडाखाले वरकड समुदाय आपले आपले स्थळास गेले.

फरासीसांचे भेटीस व भोंसल्याचे रुखसतीस मुहूर्ताकरितां तीन च्यार दिवस अवकाश जाहला. फरासीसांची भेट उदईक होणार व भोंसले श्रीमंतांचे रुखसतीस छ २६ रबिलावल सोमवारीं गडावर जाणार. व येथौन कूच करून जेऊरनजीक सातारा तेथें जाणार, तेथोन नागपूरास जातील.

माष्टी तामस नि।। इंगरेज मुंबई पुरंदरासमीप उतरला. मध्यस्तीस माधवराव सदासिव त्यांचे विद्यमाने उतर प्रत्यौत्तर होत आहे. हैदरनायकाचे पारपत्यास इंग्रजांनी शरीक व्हांवें व रघुनाथ-रायांस आश्रय न द्यावा हे दोन मतलब श्रीमंताचे आहेत. इग्रेजांकडील निश्चय अद्यापीवर नांहीं.

परशरामपंत मिरजकर व कृष्टणराव पानसे मुनहलीसमीप आहेत. कुमनदान पांच सात कोसी आहे.

रामचंद्र गणेश पनाळ्यापासून दाहा कोसी पांच हजार लोकानसीं आहेत. येसाजी सिंदे पनाळ्यास आठ हजार लोकानसीं आहे. शंकराजी घोरपडे सिंदे माारासमीप आहे. त्यानें क-हाडप्रांतीं कांही गांव लुटले व खंडणी घेतली. मिरजकरांचे वकिलाचे जुबानीं वर्तमान यैकिलें, कीं हैदर नायकानें पनाळेकरास लाख रुपये पाठविले आहेत. लोकांसी तलब झाडून दिधले पुढें निगाहदास्त करीत आहे. श्रीमंताकडून माहदाजी सिंदे पनाळेकरांचे पारपत्यास जाणार. परस्परें जातील म्हणोन बापूनी सांगितलें. दुसरी चर्चा यैकिली कीं सिंद्याचे मतें पुरंदरास येऊन पनाळयाकडें जांवं. छ १ रबिलाखरी मुहूर्त पनाळ्याचे रुखें जाव. याउपरि जे वर्तमान होईल तें लिहून पाठवूं हे विनंती.

छ २० रोजी रो सखारामपंत बापू देवाजीपंत नि॥ भोसले याचे डे-यास गेले होते. पंत माारनुलेची प्रकृती पोटदुखीकरितां अस्वस्थ होती याकरितां गेले होते. छ माारी रो नाना फडनीसही गेले होते. छ २१ रोजी कृष्टणराव बलाळ गेले होते. छ १९ माहे माारी रो देवाजीपंत बापूचे घरास भोजनास आले होते. वस्त्रें व सरपेच दिधला वस्त्रें पाच पारचे दिधले.

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

पु॥ श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, विनतीज. काा खेड विसाद येथें वाडा बांधला आहे व गोदातीर यास्तव तीर्थरूप राजश्री नानास्वामीं वास करून राहिले आहेत. कसबे माारचा अमल हुजूरांत आल्यानंतर तेथील काम सेवकाकडें सांगावे व तीर्थरूप स्वामीचे नांवं सनद पाठवावी, म्हणोन स्वामीनी आज्ञा केली. त्यास

सेवकास इतर रोजगार करावा हे इच्छाच नांहीं. तीर्थरूप स्वामीनीं तर सर्व प्रपंच्याचा त्याग करावा हेच इच्छा धरून स्नानसंधेंत सदैव आसक्त. यास्तव कामाचा अंगिकार केला नांहीं. सांप्रत तीर्थरूप स्वामीचें पत्र चैत्र शुध सप्तमी सोमवारचें खेडाहून आलें व सौ।।वती मातोश्री व तिघी सुना व नात व यादवराय भतीजे याची स्त्री याप्रमाणें मंडली येथे आलीं. तीर्थरूप स्वामीनीं पत्रीं माार लिहिला त्याची नकल पृथक पाठविली आहे. ते मनन करून मर्जीस येईल त्याप्रमाणं राजश्री नारायणराव बापूस स्वामीचं पत्र परस्परं जांवं, हे विनती आहे. याउपरि जे मर्जीस येईल त्याप्रमाणं तीर्थरूप स्वामीचा गोदातीरीं निर्वेध वास होय तो अर्थ करावा. जयवंतराव नामे सेखदार दि।। नारायणराव बापू कसबे खेडांत आहेत त्यांची रीति फार उन्मत्ततेची. पूर्वी श्रीमंताकडील कमाविसदार होते ते बहुत सन्मान रक्षीत होते. दावरजंगाकडील आठसे रुपयाचा रोखा आला. पांचसे रुपये नवाब विकारुदौला बहादरांची जागीर खतगांव वगैरे पासून दावरजंगानी घेतले. व चिरंजीव सदासिवरायांकडून देविले. ते देणें प्राप्त, याकरितां अंगिकार केला, त्यास पांचस्यापैकीं साडेतीनसे रुपयें येने व दीडसे रुपये गुंडो माहादेव नामे कारकून, यानें मधें आपले केले होते. तहकिकातेचे समईं कारकुनीचे रुपये जाणून साडेतीनसे रुपये दिधले, व बाकीचे रुपये १५० दीडसे गुंडो माहादेवास दिधले नांहींत. सांप्रत गुंडो माहादेव खेडास येऊन जयवंतराव नायब दि।। नारायणराव बापू यांसी यैक्यता करून रुपये मागायाची तीर्थरूपांसी बहुत सख्ती केली. तीर्थरूपांनी त्यास उठोन दिधले ते समईं जयवंतरायानी बहुत अमर्यादायुक्त भाषण करून, प्यादे घरास पाठवीत होते. वेंकटराव नामे सायरचे इजारदार आप्तविषयांत. त्यानीं जयवंतरायांचें शातवन केलें व उपाधि मवकुफ करविली, सांप्रत पाण्याची पखाल येत आहे ते पखाल परस्परें नेतात. व दाणें घराऊ खर्चाकरितां बाहेरून येणें त्यास हासल देणें म्हणोन तगादा करितात. याप्रमाणें उपद्रव त्यांचा बहुत आहे. याअर्थीं स्वामीचे आज्ञेनुरूप च्यार दिवस अन्यत्र स्थलीं राहणें योग्य असलिया तीर्थरूप व वरकड मंडली

राहील. व जयवंतरायाची सेखदारी अक्षई राहणार नांहीं. ते जातील ते समई राहतील. या विषई आज्ञेनुरूप वर्तणूक होईल हे विनंती.

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

नकल तीर्थरूप राजश्री नानास्वामीचे पत्राची आसीर्वाद उपरि. गुंडो माहादेव नि॥ लछीराम आमिल तरफ खतगांव याजपासून दावरजंग बहादरानीं रुपये घेतले होते. ते पुन्हां मदनूर वगैरे गांवापासून दावरजगानी रुपये घेतले तो यैवज रोखा सौभाग्यगिरी, चेला दौलतगीरीचा, यास रुपये आठसें व गुंडो माहादेवाचे विद्यमानें पांचसे रुपयेचा रोखा लछीरामास लिहून दिधला. त्यास श्रीमंत राजश्री नानाजीपंत नानाचे कृपेकरून, आठसें रुपयाचा रोखा माघारा आला. पांचसे रुपयापैकीं पावणेच्यारसे रुपये लछीरामाचे देणे, ते देऊन लछीरामाचे मोहरेनसीं रसीद घेतली. बाकी सवासे रुपये लछीरामास विदित नांहीत. गुंडोपंताचे पोटीस्थाचे त्याविषई गुंडोपंतानें मदनूरीं वेरझारा करून चिरंजीव भाऊपासून पंचेवीस रुपये घेतले. पुन्हां येकदोनदां येऊन पांच रुपये घेतले. येकूण तीस रुपये पावले असतील. त्यापासीं आपला दस्तायैवज नांहीं. रोखा होता तो उमा ज्या समई कलबुरग्यास गेला ते समई परतोन घेतला. दावरजंगाकडून पांचसे रुपये उगवतील ते समई तुमचे रुपये देऊं म्हणोन गुंडोपंतासीं बोलत होतो. चिरजीव दादा मदनूरीं होते ते समई गुंडोपताने कांहीं उपाधि केली, तेव्हां काहडून दिधला. सांप्रत खेडास येऊन, पांचसात दिवस राहोन खटपट केली. सामोप्च्यारानें सांगितल्यास त्याचे ध्यानास येईना. त्याउपरि येथील नूतन सेखदार राजश्री नारायणराव बापू, दिवाण नवाब शर्फदौला बहादर, यांचे नायब जयवंतराव दबडघाव येथें आले आहेत. त्यांच आचरण व व्यवहार त्यासमान. जे त्यासच मान्य. उन्मत यवनाप्रमाणं व्यवहार दिसतो. राजे जगदेव याचे शालक सदासिवरायाचे पधतीचे ग्रहस्त म॥रनुलेकडें गुंडो माहादेवानें जाऊन त्यासी साहय

केली. व येके दिवसीं येऊन उपोषण केलें व मनस्वी उन्मताप्रमाणें बोलूं लागला. ते समईं काहडून दिधला. त्यानें कचेरीस जाऊन जयवंतराव सेखदारास वर्तमान सांगितलें व सेखदाराचें आश्वासन हें आम्हांस ठाऊक नांहीं, सेखदारानें जे न बोलावयाचें तें भाषण केलें. अस्तु. तो हाकीम म्हणजे बादशाही बंदा व आम्हीं केवळ मुनिवृतीनें ये स्थलीं. उपाय काये ? सेवटीं घरावर प्यादें पाठवावयाची तजवीज केली. ते समईं वेंकटराव दबडघाव सायरचे इजारदार चिरंजीव कृष्टणराव दाजीचे स्नेहित यानीं बहुता प्रकारें समजाऊन सांगितलें व प्यादे मना करविले. व दुसरे दिवसी गुंडो माहादेवास घेऊन घरास आले. ते समईं आपण उतर केले कीं दावरजंगा बाा आठसे रुपयाचा रोखा परतोन आला. पांचसे रुपये येणें आहेत, ते रुपये उगवल्यावर देऊं किवा पावणेच्यारसे रुपयाची रसीद लछीरामाची आहे, बाकीचे सवासे रुपयाची रसीद लछीरामाचे मोहरेनसीं आणून देणे. रुपये देऊं ते समईं कायल होऊन गेला. सारांश येथील सेखदाराची रीती मुनिवृतीनें स्वस्थ राहूं हा हेत त्यास हे उपाधि प्राप्त होती. तुमचे चितास आलियां श्रीमंत राजश्री नानासह वर्तमान लिहून पाठवांवे, अथवा रो नारायणरावजीस ल्याहावें. व त्यांची पत्रें प्रखर सेखदारास यांवी कीं व्यापारी ग्रहस्त व ब्राम्हण भिक्षुक क्षेत्रीं राहात आहेत. त्यास सर्वथैव उपद्रव न लावणं व हुकुमतीची रीति त्यांस न दाखवण. दुसरा प्रकार हेल्यावर पखाल पाण्याची येते ते नित्यशाह घेऊन जातो. व बाहेरून धान्य येणं त्यास अटकाव करितो इत्यादिक उपद्रव फार आहेत. तुम्हांस कळांवें म्हणोन लिहिलें आहे.

पौ छ ११ माहे रबिलाखर सोमवार सन ११९१ हिजरी.

श्रीनिवास

पु॥ श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनंतीजे. हरकाऱ्यांचे तनख्याचा परवाना माहबमाहीचा खास मोहरी रो नारायणराव बापूचे नांवचा पाठविला, तो पावला. याचें उतर छ १८ माहे रबिलावलीं पाठविलें, तें सेवेसी पावलें असल. इनायतनामा

निशानीसुधां पाठवितों म्हणोन पत्रीं आज्ञा होती. याकरितां आजीं छ २४ माहे रबिलावलपर्यंत मार्गप्रतीक्षा केली. आजी छ २४ माहे माारीं हुजूरचा इनायतनामा रो नारायणराव बापूचे नांवचा स्वामीनीं पाठविला, तो पावतांच परवान्याची नकल, काजीचे मोहरेनसी, व मीं आपलें पत्र व हुजूरचा इनायतनामा, व कृष्टणाजी वगैरे जासूदांचे नांवचें कबज, अज इ।। छ १ जिलकाद लगायत आखर रबिलावल, पांच महिने पै।। तलब रुपये ३७५।।=, सदरहू रुपयांचें कबज लिहून, जासूद बीडास पाठविला आहे. राजश्री नारायणराव बापूचे स्नेहाची रीती व कारवाई व गार्हस्थ सांप्रदाय अपूर्व म्हणोन स्वामीनी लिहिलें, त्यास आपले योगें मजलांही थोडासा बापूचा सहवास जाहला आहे. परंतु मामलतीचें काम व रुपयाची भीड, व देणेंघेणें हा प्रकार स्वामीवितरिक्त इतरास बहुत बत्थ करीत आहे. स्वामीची उपमा स्वामीसच योग्य. सांप्रत हुजूरची आज्ञा व स्वामींनी परस्परें सूचना केली, त्यापक्षीं किमपि गुंता राहणार नांहीं. श्री-कृपेनें उतर येईल त्याप्रमाणं सत्वरच विनती करीन. हे विनती. विनती जे आठ जोड्या पूर्वी ठेविल्या होत्या, त्याची इस्मनविसी व ते हरकारे आहेत, सांप्रत दोन जोड्या नव्या ठेविल्या. त्यांची इस्मनविसी छ १८ रबिलावलचे पत्रीं लिहिली होती. व सांप्रतहीं फर्द आलाहिदा दोन जोड्याची इस्मनविसी बकयद तारीख लिहून पाठविली असे. स्वामीनी खास दसखत करवांवे, व दोन जोड्याचे तलबेची तनखा करून पाठवावी, हे विनती.

A. R. No. 34.

२६ रबिलावल ११९१ हिजरी
४ मे १७७७

श्री

विनंती विज्ञापना यैसीजे येथील कुशल तागाईत छ २६ माहे रौवल, मु।। पुणे, स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणोन

स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे, विशेष येथील वर्तमान छ २२ रोज मंगलवारी, त्रितीये प्रहर दिवसा, अखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले. ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान रोज माारी राजश्री हरीपंत फडके याणी राजश्री फत्तेसिंग भोसले अकलकोटकर याजला मेजमानी केली. दिढा प्रहरा दिवसा भोसले मजकूर व दिवान व कारभारी वकील वगैरे मानकरी आसामी पंचवीस तीस भोजनास आले होते. भोजने जाल्यावर त्याजला वस्त्रे वगैरे दिल्ही. उभयेता बंधु भासले माार यास सिरपेच २ व वस्त्रे वरील प्रा॥ व कासीराव आपाजी दिवान यास वस्त्रे च्यार वरकड मानकरी वकील याजला पैठणी सेले पागोटी पंधरा आसामियास या प्रा॥ दिल्हे. अतर पानदान व विडे देऊन दोन घटिका नाच जाला. सवादो प्रहरी भोसले माार याणी निरोप घेऊन आपले डेऱ्यास माघारे गेले आणि पहिले जागेवरून कूच करून भवानीपेठेचे भवानी सांन्निध्धे जाऊन उतरले. या उपर माार निले आपले गावास जाणार. भोसलें माार याचे तीर्थरूप शहाजी भोसले मृत्य पावले. त्याचे नावचा सरंजाम चालत होता तो हाली चिरंजीव फत्तेसिंग भोसले याचे नावे बहाल करून सनदापत्रे जाली पाहिजेत. ते करून घेऊन वस्त्रे द्यावी याकरिता माारनिले येथे आले होते. त्यास त्याचा जाबसाल सरकारात होऊन साबिक बदस्तूर बहालतेच्या सनंदा याच्या नावे करून दिल्हया. त्याजकरिता श्रीमंताची नजर सात लक्ष रुपये ठरले. सिवाय दरबार खर्च व अंतस्ते वगैरे खर्च तीन साडेतीन येकूण साडेदाहाचे घरास गेले. नजर वगैरे यैवज हप्तेबंदीने व वराता या प्रा॥ निशा घेतली. त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे वाडचात राजश्री हरीपंत फडके व बहिरो रघुनाथ मेहेदळे व मुत्सदी व दरकदार वगैरे सर्वत्र आले होते. त्यास राजश्री नाना फडनवीस व हरीपंत तात्या या उभयताचे खिलवत च्यार घटिकापर्यंत जाले. नंतर मेहेदले मा॥र याजला खिलवतात बोलाऊन अस्तमितपर्यंत त्रिवर्गाचे खिलव (त) होऊन उपरांत फडके आदिकरून आपलाले घरास गेले. खिलवताचा भाव

ध्यानास आला की कार्तिक वद्ये ५ पंचमीस मुहूर्ते करून राजश्री हरीपंत फडके याची स्वारी कर्नाटक प्रांती जावयाचे डेरे बाहेर होणार, यैसे वर्तमान होते. त्यास येविंसीचा माार या प्रो तपसील-वार मसलत प्रकर्णीचे बोलणे, की मदारुलमहाम याचे मानस राजश्री हरीपंत तात्या याणी स्वारीस निघावे, म्हणोन मसलत होत होती. यैसियासी फडके याणी उत्तर केले की पेशजी प्रांत मजकूरचे मोहिमीस जाऊन आलो, ते समईचे फौजेचे लोकाचे देणे तीस लक्ष रुपये निघाले होते, ते त्याजला अद्यापि पावले नाहीत. हाली मोहिमीस जावयाचे आपण म्हणतात. त्यास सदरहू मागील देण्याचा फडशा फौजेचा करून दिल्हा पाहिजे आणि पुढे वीस पंचवीस हाजार फौज बराबर यावी लागेल, त्यास नालबंदी वगैरे द्यावयाची तो सोय पडतच नाही. परंतु तूर्त दोन रोजमरे आधी पदरी घातले पाहिजेत. आणि सम-जाविश करावी तेव्हा फौज बराबर येईल, आणि न्यावयाचेही साआर्थ आहे नाहीतर हे दोण्ही प्रकार न घडल्यास आमचे जावयाचे कैसे घडेल ? त्याजवरून मदारुलमहाम याणी सागितले की मागील तिसा लक्ष्या पौ बारा लक्ष रुपयें व हालीचे रोजमऱ्यापैकी आठ लक्षे रुपये येकूण विसा लक्षाचा भरणा करून देऊ. स्वारीस जावे. त्यास फडके मजकूर याचे शरीर पोटदुखीमुळे ठीक नाही व फौजेचे मनोगतानरूप यैवज त्याचे पदरी पडत नाही. या संधिक्ततेकरिता निश्चंये ठरला नाही. म्हणोन राजश्री आपा बलवंत याजला पाठवावे त्यास त्याणी उत्तर केले की सालगुदस्ता गुजरात प्रांतीचे स्वारीस जाण्याची नेमणूक आमची करून रवाना केले होते. त्यास च्यार सा महिने बाहेर डेऱ्यात राहून मागती गावात आलो. मोहिमीस जाणे जाले नाही. आता कर्नाटकप्रांती जावयाची आज्ञा आपण करितात, त्यास जरीपटका व दाहा पंधरा हाजार फौज देऊन स्वतंत्रच पाठवावे, परंतु राजश्री परशराम रामचंद्र याचे तैनातीस पाठऊ नये या रदबदलीकरिता त्याचेही जाणे तूर्त राहिले. यैसियासी इंग्रेजाचे मसलत प्रकर्णी हुजूरची पत्रे पयेदरपये येतांत व इंग्रजाचे म्हणे बाजिदीचे आणि मिरजकरही मदतेविसी वरचेवर लिहितात. तेव्हा

फाजंवा रवाणगी सरदार नेमून केली पाहिजे. यैसे बोलणे जाल्यावर राजश्री माहादाजीपंत बेहेरे याजला पाठवावे. बराबर अठरा वीस पागा व सरंजामी व सिलेदार व इतलाखी वगैरे दाहा हाजारा फौजेची भर्ती करावी, पाच तोफा व मुसामुतरम फिरंगी या प्रो सरजाम देऊन जलद रवाना करावे यैसे ठैराविले. श्रुत होये. छ २३ रोज बुधवारी पहिले साहा घटिका दिवसा, राजश्री माहादाजीपंत बेहेरे याजला घेऊन, राा नारोपंत चक्रदेव बक्षी मदारुलमाहाम याचे वाडयात आले. त्यास मदारुलमाहाम याणी बक्षी माार याजला सागितले की बेहेरे यासी सरकार वाडचात घेऊन जावे. श्रीमंताणी आज्ञा केली आहे त्याजवरून बेहेरे याजला स्वारीस पाठवावयाचे ठैरले आहे. त्यास येविसी श्रीमंतास विनंती करून बेहेरे याजला रुकसतीचे विडे देवावे. त्या प्रो चक्रदेव श्रीमंतापासी बेहेरे माारास घेऊन जाऊन विनंती केली, आणि माहादाजीपंत बेहेरे कर्नाटकचे स्वारीस जावयाचे म्हणोन श्रीमंताणी रुकसतीचे विडे दिल्हे आणि ततःक्षणीच उभयेता मागती राजश्री नाना फडनवीस याजवल येऊन वर्तमान निवेदन केले. तेव्हा मदारुलमाहाम याणीही विडे मशार-निलेस देऊन निरोप दिल्हा. बेहेरे माार आपले घरास गेले. त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडयात सर्वत्र आले होते. राजश्री हरीपंत फडके आल्यावर उभयेताचे खिलवत मसलत प्रकर्णी च्यार घटिका जाले. नंतर राजश्री नाना व फडके उभयेतां निघोन ते भिकाजी-पंत पाळंदे अलीबाहादर याचे फौजेचे फडनवीस स्वारीबराबर हिंदुस्थानात गेले होते. त्यास पावटयाचे गढीवर लढाई जाली. तेथे पाळंदे माार यास गोली लागून मेले. हे वर्तमान येथे आले. सबब त्याचे मातुश्रीचे समाधानाकरिता त्याचे घरास जाऊन तेथोन फडके मजकूर निघाले. ते मागती राो नानाचे वाडचातच आले. आणि मदारुलमाहाम परभारा बेलंबागात जाऊन साइंकाली आपले घरास आले. तो मागती फडके व राजश्री नाना व मेहेदले यैसे बसोन दोन घटिका रात्रपावेतो बोलणे केले. यावर तिसरीचे आमलात सर्वत्र आपलाले घरास गेले. रा माहादाजीपंत बेहेरे याचे महूर्त रोज माारी

आकरा घटिका रात्रीस डेरे दाखल व्हावयाचे होते. सबब ते समई बेहेरे माार महूर्ते करून आपले येथोन निघाले ते गारपीरावर डेरे दिल्हे होते तेथे जाऊन राहिले. उदईक तेथून कूच करनार. श्रुत होये .छ २४ रोज गुरुवारी येकादसीस प्राथःकालीच श्रीमंत पर्वतीस गेले होते. येका प्रहरात देवाची पूज्याविधी करून माघारे येताना बेलबागात येऊन श्री विष्णूंचे दर्शण घेतले आणि तैसेच निघोन सवा प्रहरा दिवसा आपले वाडचात दाखल जाले. राजश्री नाना फडनवीस मागील दोन घटिका रात्र शेष राहता आपले वाडचा-तून निघोन नव्या वाडयात गेले. श्नानसंध्यादिक तेथे करून उपरांत बेलबागात आले. श्रीविष्णुंमूर्तीचे पूजन दाहा घटिकापर्यंत जाल्यावर आपले घरास आले. त्रितीये प्रहरी श्रीमंताचे वाडयात दरबार जाला. मदारुलमाहाम व हरीपंत फडके व मुत्सदी व दरकदार व मामलेदार सुभे आदिकरून सर्वत्र आले होते. श्रीमंत आर्शे माहालात आल्यावर दोन घटिका माली मुल्की कामे जाली. नंतर श्रीमंत उठोन सातखणीवर गेले. मागाहून मदारुलमाहाम व फडके व मेहेदले यैसे तेथे गेल्यावर, श्रीमंतासी खिलवत च्यार पाच घटिकापर्यंत मसलत प्रकर्णी जाहालें. उपरांत श्रीमंत मागील दोन घटिका दिवस शेष राहता, सातखणीवरून माहालात गेले. आणि मदारुलमाहाम याणी राा नारोपंत चक्रदेव बक्षी यास बोलाऊन, बेहेरे याचेबराबर फौजेचे रवानगीकरिता, पागा वगैरे सरंजामीची नेमणूक करावयाची त्याच्या यादी दोन घटिका रात्रपर्यंत बसोन पाहिल्या. नंतर तीन घटिका रात्र होता राा नाना आदिकरून आप-लाले घरास गेले. राा माहादाजीपंत बेहेरे याणी गारपीरावरून कूच करून राा बालाजी नाा भिडे याचे बागाजवल जाऊन उतरले. पागा वगैरे फौज जमा होऊन पुढे लौकरच जाणार. राजश्री फतेसिंग भोसले याणी भवानी पेठेचे देवीचे जवळ मुकाम केला होता. तेथून कूच रोंज माारी करून लोणीस मुकामास गेले. श्रुत होये. छ २५ रोज शुकुरवारी त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडचात मुत्सदी व दरकदार वगैरे सर्वत्र आले होते. राजश्री हरीपंत फडके

आल्यावर उभयेता व मेहेदले यैसे मसलत प्रकर्णी बोलत बसले होते. नंतर रा॥ नारोपंत चक्रदेव याजला बोलाऊन पागे व सरंजामी याच्या यादी निवडून फौजेची नेमणूक बेहेरे याजबरोबर द्यावयाची ठरवीत आहेत. कर्नाटक प्रांतीचे वर्तमान सोदे बिदनूर येथील राजे संस्थानिक याजकडे हे दोन्ही संस्थाने होती. ते टिपूनी घेऊन राज्यास परागंदा केली. म्हणोन राजे गोकाकास जाऊन राहिले होते. हाली या मसलतीची शुरुवात होऊन फौजा कर्नाटक प्रांती गेल्यावर कृष्णेपासून तुंगभद्रेपलीकडेपर्यंत व चहूकडील मुळुक व ठाणी वगैरे टिपूनी सोडिली. तेव्हा सोदे बिदनूर येथील राजे याणी किल्यात फितूर करून दाहा बारा हाजार फौज पाठविलीं. राजश्री परशराम रामचंद्र याणीही रा॥ गणपत आनंदराव मेहेदले पाच च्यार हजार फौजेनसीं तिकडे पाठविले होते. त्यास त्याणी राज्याची मदत केली. तेणेकरून राजे याणी सोदे बिदनूर येथील संस्थाने हस्तगत करून, तेथे ठाणी बसंविली. आसमंतात भागीं सतेताळीस ठाणी आहेत. त्याज पो सतावीस ठाणी घेतली, बाकीचीही घेत आहेत. यैसियासी रा॥ परशराम रामचंद्र याणी राज्यासी दावा लाविला की, संस्थाने आम्हीं घेऊ. तुम्ही आपली ठाणी उठवावी. यैसियासी राजे याणी सांगितले की तुम्हीं आपली खंडणी मात्र द्यावी. वरकड संस्थाने वगैरे ठाणी यांसी बोलो नये. त्यास ते गोष्ट मिरजकर मानीत नाहीत. मेहेदले मजकूर त्याचे मुलकात धूमधाम करितात. म्हणोन सोदे बिदनूरकर राजे याणी आपला वकील येथे पाठविला आहे. तो रोज माारी राजश्री सखारामपंत पानसे याचे विद्येमाने, मदारुलमहाम व फडके यास येऊन भेटून गेला. खंडणीचा तह येथेच करावा म्हणजे मिरजकर संस्थानासी बोलणार नाहीत. याकरिता राज्याकडून वकील आला आहे. टिपू तो घाटाखालेच आहे. सत्यमंगलावर फौजा ठेऊन कोयेमतुरावर इंग्रेज आहेत. त्यासी लढाईची शुरवात आहे. इकडे वीस पंचवीस हजार फौजेनसी टिपूने आपला भाऊ किंवा कोण्ही सरदार रवाना केला आहे, म्हणोन वर्तमान आहे. मदारुलमाहाम व फडके वगैरे

तिसरे घटिका रात्रीस खिलवतातून उठिले. त्यास फडके आदिकरून आपलाले घरास गेले. आणि राजश्री नाना फडनवीस बेलबागात गेले. मागील पाच घटिका दिवस शेष राहाता, श्रीमंत रमन्यात गेले होते. तेथे घोडी फिरऊन स्वारी माघारे निघाली ते साइंकाली आपले वाडयात येऊन दाखल जालें. राा बाबूराव वैद्ये याजला मदारुल-माहाम याणी पैटणी सेला पागोटे देऊन नागपूरास जाण्यांविसी निरोप दिल्हा. या उपर माारनिले स्वार होऊन जाणार. हिंदुस्थानचे वर्तमान अलीबहादर याची पत्रे आली. त्यास बहादर मवसूफ चमल नदीवर येऊन पावटचाचे गढीवर लढाई जाली. तेथील ठाणे घेऊन हाली मुकाम तेथेच आहे. मथुरेहून पंनास कोस पुढे आले. इकडे यावयाच्या उद्योगात त्यास राजश्री माहादाजी सिंदे याणी पत्रे येथे पाठविली. त्याचे उतर मदारुलमाहाम याणी सिंदे यास लिहिले की, सरकार कामाचे बदोबस्ताकरिता बहादर त्या प्रांती रवाना जाले. त्यास फौजेचे खर्चाची नेमंणूक आहे. त्याप्रमाणे त्याचा बदोबस्त येथास्थित तुम्हीं करून दिल्हचास, ते देसी काश्यास येतील. तेथे राहून सरकारकामच आहे. बदोबस्त मनोगतानरूप न जाल्यास इकडे सहजच येणे प्राप्त. या प्रो बहादरासही लिो गेले आहे. त्याजवरून सिंदे याणी होलकर व राजश्री सिवाजी विठल याचे विद्यमाने बोलणे घातले आहे. पाहावें काये तह ठरतो. पाचा घटिका रात्रीस राजश्री नाना फडनवीस बेलबागाहून परभारा बंगल्याचे बागात गेले. तेथे प्रदोषाचे भोजन जाल्यावर च्यार घटिका-पर्यंत नाच जाला. बारा घटिका रात्रीस तेथून माघारे निघोन तेरावीचे अमलात आपले घरास आले. राा परशरामभाऊपासी दोन पलटने पेशजी इंग्रेजाची कोकणातून आबेगावचे घाटाणे आली. त्यास हालीही दोन पलटणे आणखी ममईहून निघोन त्याच घाटाखाले आली आहेत. मिरजकराचे मदतीस येतात. त्याज बोर काही तोफाही आहेत. यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. या उपरि पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल

सदैव कृपाकरून आज्ञापत्र सादर होऊन, सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 35. १ रबिलाखर ११९१ हिजरी
९ मे १७७७

पौ छ १३ रबिलाखर सन ११९१ हिजरी, बुधवार, त्रितीय प्रहर, मुकाम तालीकुड्यांस पावले.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान छ १ रबिलाखर वैशाख शुध द्वितीया, भृगुवासरपर्यंत, मो सासवड स्वामीचे कृपेकरून क्षेम असे. विशेष पूर्वी छ २६ माहे रबिलावली, विनतीपत्र हुजुरचे अर्जीसहित पाठविलें, तें पाऊन सविस्तारें वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरि इकडील वर्तमान रघोजी भोंसले दिवाकरपंतांचेसहित सासवडीहून कूच करून गेले. व फरासीसांकडील येलची मुसार सीवालीयदे सालुबे यानीं छ २९ रबिलावलीं, श्रीमंत पंतप्रधान स्वामीची भेट घेतली. व पनाळेकरांकडील व परशरामपंत मिरजकराचें वर्तमान सविस्तारें पृथकपत्रीं लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होईल. मुबारजुलमुलुक बहादर यांसीं व हैदरनायकांसीं तिसा कोसाचा फासला राहिला. व हरीपंत फडके मुदगलाहून कूच करून बहादर म।।राचे रुखं गेले. व हैदर नायकाकडून कांही लोक फुटोन मुबारुजुलमुलुक बहादरांसी मिळाले म्हणोन मिरजेहून वर्तमान पुरंदरास आलें. सेवेसी श्रुत होये. फरासीसाकडील येलची आला आहे, त्याचे बोलण्याचा खुलासा समयोचित इंगरेजांसीं बिगाड करावा हा आहे. सांप्रत फरासीसाकडील मुसार सीवालयदे सालुबे च्यार महिने पर्जन्यकाळ पुण्यांत राहणार.

सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणं. रो भीमराव पानसे यांचे सनदेच्या नकला व स्वामीचे नांवची पत्रं व दरबार खर्च राजश्रीस पडला म्हणोन येवज घेणारानी घेतला. हे सविस्तारें वर्तमान सेवकाचे पत्रावरून श्रुत जाहले असेल हे विनंती.

———

पौ छ १३ रबिलाखर सन ११९१ हिजरी, बुधवार, त्रितीय प्रहर.

श्रीनिवास

पु।। श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. हैदर नायकाकडून नरसिंगराव नामे वकील आनंदराव रास्ते यांचे विद्यमानें येक वर्ष येथें आहे. सांप्रत मुबारुजुलमुलुक बहादर हैदरनायकाचे प्रांतात गेले, व हरीपंतही रवाना जाहले. यावरून खानमाारानें श्रीमंत पंतप्रधानाकरितां वस्त्रें व जवाहर नरसिंगरायाकडें पाठविलीं. वकील माारानें रो आनंदराव रास्ते यांचे वकीलाचे विद्यमानें, उभयतां मदारुलमाहाम व कृष्टणरायांस वर्तमान सागितलें. कार्य-भाऱ्यानीं उतर केलें कीं हजरत बंदगानआली खुद बदौलत मुतवजे होऊन गेले. व मुबारुजुलमुलुक बहादराचा व हैदरनायकाचा आजीपर्यंत मुकाबिला जाहला असेल. याहून पूर्वी तुम्हाकडील पत्र किंवा ज्वाबसालाचा सिलसिला आला असता तरी तुमचीं वस्त्रें घेतों. प्रस्तुत हजरत बंदगानआलीचे जनाबेंत तुम्हाकडील वकील जाऊन विनती करील. व हुजुरीहून जो इरशाद होईल त्या प्रमाणं आम्हांस मान्य आहे. हजूरचे इतल्याखेरीज आम्हीं तुम्हांसी ज्वाबसाल करीत नांही म्हणोन साफ उतर केलें व वस्त्रें घेतलीं नांहींत. सविस्तारें वर्तमान हुजूर विनती करावी. फरासीसाकडील येलची आला आहे. त्यानें सांगितलें कीं आम्हासी व इंगरेजांसी ऐक्यता आजीपर्यंत आहे, परंतु आमचें एक जहाज जंगी मुंबईचे गीर्दनवाहेत व एक जाहाज सुरतेचे समुद्रांत हमेशा फिरत आहे. सांप्रत येके जाहजांत आम्ही आलों

व तीन जाहाजें विलायतेहून निघालीं आहेंत. या प्रकारें सांगितले. याचें तात्पर्य येथील कार्यभाऱ्यांनी ध्यानास आणिले कीं फरासीसांसी व इंगरेजांसी बिगाड जाहला व फरासीसांचें ऐक्यतनें हुजूरचे कामाचा बंदोबस्त व श्रीमंतासी इंगरेजानी बदमामली केली, त्याचा तदारुक होईल. छ २९ रबिलावलीं खिलवत जाहलें. त्याचा भाव प्रगटांत नांहीं. रो कृष्टणराव बलाळ यांची प्रकृती स्वस्थ नव्हती, याकरितां दरबारास आले नांहीत. माधवराव सदासिव यांस बोलाविलें नांहीं. बापू व नाना व फरासीस व दुभासी चौघे मात्र होते. सेवेसी श्रुत होये.

राजश्री नाना फडनीस व कृष्टणराव बलाळ पुण्यास जाणार आहेत हे विनती.

———

पौ छ १३ रबिलाखर सन ११९१ हिजरी, बुधवार, त्रितीय प्रहर.

श्रीनिवास

अखबार पुरंदर अज इ।। छ २६ रबिलावल लगायत छ १ रबिलाखर सन ११९१ हिजरी, वैशाख. रघोजी भोंसले यांचे डेऱ्यास श्रीमंत पेशवे छ २२ रबिलावलीं आले व भोंसले माारांनीं सर्वत्रांस वस्त्रे व श्रीमंतास जवाहर दिधली व मुशार सिवाली फरासीस याची व कारभाऱ्याची छ २५ रबिलावलीं भेट जाहली. व छ २६ माहे माारीं भोंसले श्रीमंतापासून निरोप घेणार हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें होतें. त्यानंतर छ २६ माहे माारीं रघोजी भोंसले, पावणसें सिलेदार लोक, व दिवाकरपंत वगैरे कारकून व मुतसदी मंडली पंचेवीस एकून शंभर लोकानसी गडास गेले. व भोजने केलियानंतर श्रीमंत पेशवे व उभयतां कारभारी कृष्टणराव बलाळ वगैरे मंडळी भोंसल्यासहित कचेरींत बसले. मरातबाप्रमाणें च्यार वस्त्रें व दोन वस्त्रें सर्वत्रांस व भोसले व दिवाकरपंतास वस्त्रें व जवाहर व हाती दिधला.

उमदे मराठे मुतसदी यास
१ पैठणी मुडासें
१ पैठणी सेला
१ मशरू
१ महमूदी जामेवार
४

मध्यम व कनिष्ठास
१ मुडासें पैठणी
१ सेला पैठणी
सदरहूं प्रमाणे सर्वत्र मंडलीस वस्त्रे दिधली
तसे वस्त्रें दिवाकरपंत.

रघोजी भोंसले .
१ चिरा बादली
१ जामेवार कारचोब
१ किमखाबी तुमान
१ पैठणी सेला
१ सरपेच मुरसा
१ कंठी मोत्याची पदर आवे ज्या सहित.
१ तुरा मोत्याचा बारालडी
१ हाती.
८

दिवाकरपंत

किमखाब	पैठणी सेला	मुंडासे चंदेरी	महमुदी थान
१	१	१	२

सरपेच मुरसा	कंठी पदकासहित मोत्याची
१	१

सदरहू प्रमाणं वस्त्रें घेऊन पानदान घेऊन श्रीमंताचा निरोप घेतला व गडीहून उतरले. राजश्री कृष्टणराव बलाल यानीं आपले डेऱ्यास रघोजी भोंसले व दिवाकरपंत व बाबूराव वकीलास आणलें.

रघोजी भोसले	दिवाकरपंत	बाबूराव
१ पैठणी मुंडासे	१ मुंडासे चंदेरी	१ सेला पैठणी
१ पैठणी सेला	१ सेला चंदेरी	१ मुंडासे पैठणी
१ शालजोडी	२ महमुद्या	२ महमुदी
२ महमुदी थान	·॥· किमखाब निम थान	·॥· किमखाब निम
१ किमखाब	१ शालजोडी	४·॥·
१ सरपेच मुरसा	१ सरपेंच मुरसा	
७	६·॥·	

सदरहू प्रमाणं वस्त्रें देऊन विडे दिधले व येकांती आर्ध घटका भाषण करून निरोप घेऊन आपले डेऱ्यास गेले.

छ २७ रबिलावलीं भोसले म।।रीनीं कोडीतापासून कूच करून सासवडासमीप येऊन उतरले. दिवाकरपंत गडास गेले होते. बापू व नानांसी येकांती बोलणें होऊन श्रीमंतांचा व रघोजी भोंसल्याचा अकृत्रिम स्नेह व भोंसल्यानीं श्रीमंताचे लक्षांत राहांवें याविषईं परस्परें बेलभंडार व शफत होऊन देवाजीपंत पुन्हा आपले लष्करास आले. छ म।।रीं रघोजी भोंसले माहदाजी निळकंठ पुरंदरे, बज्याबाचे भाऊ, यांचे घरास गेले होते. पांच वस्त्रे व सरपेंच पुरंदरे म।।रांनी दिधली. त्यानंतर देवाजीपंतासही वस्त्रें दिधली. रो कृष्टणराव बळवंत यांनीं रघोजी भोसले व देवाजीपंतास आपले घरास नेऊन वस्त्रें दिधलीं व सरपेच दिधला.

छ २८ रोजीं रो दिवाकरपंत सोनेरीस रो भीमराव पानसे यांचे घरी भोजनास गेले होते. भोजनोतर वस्त्रें व सरपेंच देऊन मार्गस्त केलें.

छ २९ रबिलावलीं फरासीसांची व श्रीमंतांची भेट जाहली. व रो दिवाकरपंतासही बोलाविलें होतें. याकरितां भोसल्याचा मुकाम जाहला.

छ १ रबिलाखरीं रघोजी भोंसले यानीं सासवडासमीप होते. तेथोन कूच करून जेजोरीस गेले. येकदोन दिवस जेजोरीस राहून जेऊर-नजीक सातारा तेथे जाणार. तेथोन तुळजापुरास जाणार म्हणोन चर्चा येकिली. रो दिवाकरपंतांकरितां तीन दिवस रघोजी भोसल्याचे मुकाम जाहले होते. दिवाकरपंतासहित कूच करून गेले.

फरासीसांचीं व बापू व नानाची छ २५ रबिलाखरीं भेट जाहली. ते दिवसीं खिलवतेंत बोलणें जाहले ते रो कृष्टणरावजीचे मुखें सेवकानें श्रवण केलें. त्याप्रमाणं सेवेसी विनती लिहिली असे. मुसार सिवालीयानें उभयतांस सांगितलें कीं इंगरेजांकडील ज्वाब-

सालाचे मंध्यस्तीस जे ग्रहस्त असतील, त्यांनी आमचे खिलवतेंत नसांवें. बापूनीं उतर केलें कीं आमचे दरबारी बहुत प्रमाणिक चाल आहे. खावंदाचे मर्जीप्रमाणं सेवकाची वर्तणूक आहे. इंगरेजांकडील मध्यस्त असलियां चिंतां नांहीं. त्याउपरि फरासीसाचे वजीरानें बापू व नानास पत्र लिहिलें होतें. तेंही दिधलें व आपले बादशाहानें श्रीमंतास पत्र व कांही तोहफा जिनस दिधला आहे. तो श्रीमंतांचे भेटीनंतर देऊं म्हणोन बोलला. बापूनीं विचारिलें कीं इंगरेजांचा व तुमचा इतिफाक कोणे प्रकारचा. त्यानीं उतर केलें कीं इंगरेजांसीं व आम्हांसीं स्नेह आहे व आमचे बादशाहानें आज्ञा केली आहे कीं, जो श्रीमंताचा स्नेहित तो आमचा स्नेहित व श्रीमंत पेशव्यांचा जो दुष्मन तो आमचा दुष्मन. या बोलन्यांत थोडीसी कुन्हा आडळली. त्याउपरि छ २९ रबिलावल वैशाख शुध प्रतिपदा गुरुवारीं श्रीमंत पंतप्रधान गडाखालें डेऱ्यास आले व फरासीस श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें आपले जमावसुधां डेऱ्यास आले. घोडीं व हातीं वगैरे सरजाम श्रीमंतांचाच तैनात आहे. श्रीमंत पेशवे व सखारामपंत व नाना फडनीस व दिवाकरपंत नि।। भोसले व वरकड मंडली होती. मुसार सिवालीयानें श्रीमंताचे पायांस हात लावून डोळचांस चुंबन केलें व आपण येकला सन्मुख बसला. वरकड फरासीस उभे राहिले. त्यानंतर फरासीसांचे बादशाहानें श्रीमंतास पत्र दिधलें होतें, तें दिधलें. श्रीमंतानी आपले हातें घेऊन बापूचे स्वाधीन केलें. त्या उपरि

१ पस्तोल
१ तरवार गुप्ती
१ घडचाल थोर
२ रेशमाचीं फुलें घिलायती हरयेक जिनसाची दोन पेटारे.
२ आबखोरा व प्याला सोनेरी रंग हार येक धातूचें, जहराची बाधा न होय याकरितां भोजनास व पाणी पिन्यास.
२ डबिया दोन त्याजवर तसवीर फरासीसांचे बादशाहाची व त्याचे स्त्रीची.
६ कृष्णाची मूर्तीचे तसवीरा व येक माहादेवाची येकून साहा
५ कृष्णाची मूर्ती
१ माहादेव
६

सदरहू प्रमाणं येक येक श्रीमंतास दिधलीं. व हरयेकाचा तपसील सांगितला कीं पस्तोल व तरवार तुमचे शत्रूचे पारपत्याकरितां व घडयाल क्षण पळहीं तुमचे संरक्षणास कारभाऱ्यानीं असावध न राहांवें यास्तव, व पुष्पाचे पेटारे तुमचे सयरेकरितां, आबखोरा व प्याला पाणी पियास व भोजनास विष अन्नात किंवा पाण्यांत असलियां बाधित नांहीं, व दोन डब्या त्याजवर बादशाहाची व त्याचे बेगमेची तसवीर आहे. त्यास बादशाहानें सांगितलें आहेजे, तुमची व आमची भेट होणं दुस्तर, याकरितां आमची तसवीर नित्यशा पाहात जाणं व तुमची व तुमचे मातोश्रीची तसवीर लिहून आणविली आहे म्हणोन भाषण केलें. श्रीमंतांनी दोन्हीं डब्या आपले हातीं घेतल्या व अवलोकन केलें. त्याउपरि श्रीमंतांचं कौतुक पाहून मुसार सिवाली फरासीसाचे डोळयास उदक आलें. त्यानंतर श्रीमंतांनीं अतर व गुलाब व विडे देऊन आपण गडास जाण्याकरितां उठले. व स्वार होऊन गडास गेले. सूर्य अस्तमानानंतर सखारामपंत व नाना फडनीस व मुसा म।।र त्रिवर्ग बेचोब्यांत दोन घटकापर्यंत येकांती बोलिले. दुभासी एक प्रभु फरासीसांचे समागमीचा खिलवतेंत होता. त्याउपरि दिवाकर-पंतास खिलवतेंत बोलाविलें. दुभासी यास सरे आम कचेरींत बसविलें. फरासीस च्यार घटका रात्रपर्यंत बसले. त्यानंतर स्वार होऊन आपले मकानास आले. दिवाकरपंत व सखारामपंत व बालाजीपंत नाना प्रहररात्रपर्यंत होते. त्याउपरि दिवाकरपंतानी निरोप घेतला व आपले लष्करास गेले. नाना फडनीस गडावर गेले. सखारामपंताचे पुतन्याचे लेंकींचा विवाह तृतीयेचा, याकरितां सासवडास आले.

महमदअली कुमनदान परशरामपंत मिरजकराचे रुखावर होता. त्यास मुबारुजुलमुलक बहादर हैदराचे रुखावर गेले. याकरितां कुमनदान म।।र माघारा खान म।।राकडे गेला. दुसर वर्तमान परशरामपंत मिरजकरानीं लिहिलें आहे की हैदर नायकानें शबखूनाकरितां कांही प्यादे व स्वार मुबारुजुलमुलुकावर पाठविले. बहादर म।।र बहुत खबरदार व हुश्यार होते. छाप्याचे लोकांस लुटून घेतलें. दोन हाजार घोडीं पाडाऊ जाहली. दुसरी

खबर जे हैदराचे लष्करातील लोक आजुर्दा होते ते बहादर मवसुफास येऊन भेटले.

येसाजी सिंद्याकडें शंकराजी घोरपडे वगैरे नोकर होते. रामचंद्र गणेशांनी फोडून आपले मतलबावर आणिले, व येसाजी सिंदे बहुत घाबरे होऊन पनाळ्याचे आसऱ्यास गेले. माहादाजी सिंद्यानीं पनाळ्याचे मोहिमेस यावयाचें जरूर नांहीं म्हणून लिहिलें आलें, त्याजवरून माहदजी सिंद्याची मोहीम पनाळे प्रांतास जावयाची मवकुफ जाहली. मुबारुजुलमुलुक बहादरानीं हैदर नायकाचे लष्करांत कांहीं भेद केला होता. दोन हजार स्वार खान म॥राचे लष्करीहून फुटोन बहादराचे लष्करास आलें, व बाह्यात्कारें शोहरत घातली. जे शबखुनाकरितां लोक आले होते ते फौज बहादरानीं मारून घेतली. या प्रकारचें वर्तमान मिरजकर परशरामपंतानी लिहून पाठविलें होतें. सेवेसी श्रुत होये. हे विनती.

———

पै॥ छ १३ रबिलाखर सन ११९१ हिजरी, बुधवार, तृतीये प्रहर.

श्रीनिवास

पु॥ पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचें सेवेसी विनतीजें रघोंजी भोंसलें व दिवाकरपंतानी श्रीमंतास व कारभाऱ्यांस सांगितलें जें. हजरत बंदगानआलीचा व आमचा करार मामूल घांसदाणा घ्यावा यैसा नेम असतां, सवा दोन लक्ष रुपये आम्हास देतेंत, येणेकडून आंम्हीं फार खराबीत आलों. सांप्रत आंम्हीं कर्मळेकर निंबाळकराचे तालुक्यांतून व शरफौदौलाचे महालातून घांसदाणियाचा यैवज उगवून नागपूरास जातो. कारभारी यांनी उत्तर दिल्हेंजें नवाबसाहेब जे तुम्हास देतेंत हेच फार आहे. सांप्रत तुंम्ही नवीन कांहीं कराल तर लौकिकात प्रसिद्ध होईल. जे आमचे समतें केले यास्तव कांहीं उपद्रव न करितां ज्या मार्गानें आलात त्या मार्गें जाणें म्हणून

प्रखर सांगितलें आहें. दिवाकरपंताचें लक्ष हुजुरांत आहेच, परंतु येथील कांरभारी यांजकडूनही दृढ करून घेतलें जे हुजूरचे आज्ञेत राहांवे. कारभारियांचे सांगितलियाचे उतर दिवाकरपंती केलेंजे, तुमचे आज्ञेप्रमाणें हात पाय बांधून ज्या मार्गे आलो त्याच मार्गे जाऊ. सुमेरसिंगाचा पुत्र भोंसल्यासमीप होता. श्रीमंताचे दरखास्तीप्रमाणें भोसल्यानी कारभारीयांचे स्वाधीन केला. सांप्रत बेडी घालून पुरंदर गडावर ठेविला आहे. सेवेसी श्रुत होये. तामस माष्टी इंगरेज पूर्वी रघुनाथरायांकडील ज्वाबसाल करीत होता. कारभारी यानीं स्पष्ट सांगितलेंजे करनलाचे विद्यमाने जों करारमदार जाहला आहे त्याप्रमाणे जागीर देऊ. त्यानीं स्वस्थ राहावे. पूर्वील करारावितरिक्त दुसरी गोष्ट आम्हास बोंलणें नांहीं. याजवरून माष्टिनाने रघुनाथराया-कडील ज्वाबसालाचा सिलसिला टाकून, करनलाचे विद्यमानें ज्यागीर वगैरेचा जो करार जाहला आहे त्याचें बदोबस्ताविषईचा ज्वाबसाल करीत आहे. इंगरेजाचे विद्यमाने दादासाहेबाचा स्नेह न करावा हे मानस कारभाऱ्यांचे. यास्तव करनलाचे कराराचा ज्वाबसाल केला. परंतु कारभारीयांचे मानस आहेजे रघुनाथरायाची समजाविश सात आठ लक्षाचे जागीरीवर जाहलीयांही करावी. सेवेसी श्रुत होये.

A. R. No. 36.

१० सफर ११९३ हिजरी
२७ फेब्रुवारी १७७९

४

पुरवणी

बोरघांटावर आले. व बालाजीपंत वगैरे कूच करून त्यांचे रुखावर जाणार. ते समईं कृष्टणराव ब (ला) ळ यानी सखारामपंतास आपले घरास नेऊन परस्परें वचनप्रमाण जाहले कीं रघुनाथराव पुन्हा दखील रियासत जाहले तरी कृष्टणराव यास कांहीं उपद्रव न लागावा. हे वर्तमान खुफिया, परंतु बालाजी जनार्दन व हरीपंतास कळलें. व कृष्टणराव स्वारीसमागमें न येतां पुण्यांत राहिले. बालाजी

जनार्दन वगैरे मळेगांवास गेले. व दादइलाहीकरितां फते जाहली. व इंगरज खजील होऊन मुंबईस गेले. त्यानंतर बालाजीपंत व हरीपंत व माहदाजी सिंदे यकदिल होऊन पुरंदरास आले. व सखारामपंतास कैद केले. या मसलहतींत कृष्टणराव बिलकुल खारीज केलें होतें. ते समईं कृष्टणराव बलाळ यानीं बालाजीपंत व हरीपंत व माहदाजी सिंद्याची नालिश व हुजुरांत नादुरुस्त बदयेतकाद याचा तपसील सागितला. व बमोजिब इशारा दुसरा हुजूर लिहिणें म्हणोन फिदवीस सूचना केली. त्याउपरि महिना विसा रोजांत बालाजीपंतानी कृष्टणराव यांची तसफी केली. ते समईं रावजीनी सांगितले कीं आम्ही जो किसा सांगितला तो हुजूर न लिहिणें. राव म।।रनुलेचे जुबानीचा म।।र विन्हा त्यांचे इतिला न ल्याहावा. व लिहिण्यांत पेंच, याकरिता हुजूर इतिला केला नांहीं. त्याउपरि कृष्टणरावजीची आरजू फार होती व आहे कीं येक किला व जागीर द्यावी. त्यास कारपरदाज यांची समज आहे कीं कारभाराचे ज्वाबसालात हजारो रुपये रावजीस मिळत आहेत. मग जागीर किमर्थ द्यावी. त्यानंतर हैदरअलीखाना बाा रुपये वीस हजार रावजीस आले. ते रुपये सरकारांत देणें म्हणोन बालाजीपंतांनीं पैगाम केला याकरितां रावजी नाखुष होऊन पुण्यांत खानेनिसीन जाहले. सेवटीं रुपये वीस हजार रुपये कृष्टणरावजीनी दिल्हे व नाखुष फार जाहले. सारांश बालाजीपंतासीं व हरीपंतासीं दिली-इतिफाक आहे. व कृष्टणरावजीसी कार्यकारण जरूरी व जे समई जे काम वारद होत आहे त्या कामापुरता स्नेह व शरीक मसलहत करीत आहेत व सांप्रत मसलहत व हरयेक तजवीज हरीपंताचे सलाहावितिरिक्त होत नांही. माहदाजी सिंद्यासी करार होता कीं कुलकामांत दखील करावें व सिंद्याची आरजू होती, परंतु हरीपंताचे सलाहानें बेदखल केले. व पांच लाख रुपये प्रथमतां त्यानंतर वीस लाख रुपयाची भरती करून दिधली, किवा अधिक म्हणोन यैकिलें हे तपसीलवार वर्तमान हुजूर अर्ज करणे. हा आसीर्वाद.

———

A. R. No. 37. सुमारें ८ जिलकाद ११९३ हिजरी
१७ नोव्हेंबर १७७९

श्रीनिवास

बालाजी बाजीराव यांचा वाका जाहल्यानंतर, रघुनाथराव पोख्त म्हणोन दौलतचे काररवाईकरितां मुख्तार जाहले व पंत-प्रधानांचा खिलअत माधवराव बलाळ यास जाहला. माधवराव खुर्दसाल होतें याकरितां रघुनाथराव व सखारामपंत याजवर कारभार सोपून, आपण अयशआराम करीत होते. बाबूराव फडनीस व त्र्यंबकरावमामा यांचा इतिफाक व सखारामपंतांसीं व उभयता म॥रनुलेसीं निफाक. गोपिकाबाई व गोपाळराव मिरजकर व बाबूराव फडनीस व त्रिबकराव यांचा यका जाहला, व तजवीज केली कीं सखारामपंतासीं व रघुनाथराव यांसीं इतिफाक आहे. याचप्रमाणें रघुनाथराव सरदार व सखारामपंत कारपरदाज जाहले तरी माधवराव यांस कोण्हीं पुसणार नांहीं, व पसअंदाज होतील. याकरितां रघुनाथराव यांस कैद करावें. त्यानंतर सखारामपंत यांसही सजा पोंहचवावी. ते समईं सखारामपंताचा नवउरूज व मुतसद्यापैकीं चिंतो विठल व कृष्टणराव बलाळ व चिंतो अनंत व आबाजी माहादेव व रामचंद्र गणेश, व सरदारापैकीं नारो शंकर व विठल सिवदेव व होळकर व आणखीं लाहान मोठे सखारामपंताचे यैक्यतेंत. माहदाजी पुरंदरे यांचा लेंक नीळकंठराव पुरंदरे रघु-नाथराव यांचे शरीक होते. याकरितां सखारामपंतानीं हिकमतीनें रघुनाथराव यांस पुण्याहून काढून दिधलें, व राव म॥र नासिकास गेल्यानंतर नीलकंठराव पुरंदरे व सखारामपंत हेहीं राव म॥रनुलेसमीप गेले. त्यानंतर बाबूराव व त्रिंबकमामानीं पिराजी नाईक वगैरे फौज जमा केली, व रघुनाथरायांसमीप नारो शंकर व विठलराव सिदे व बमय फौज गेले, व सखारामपंतानीं हुजूरांत इलतिजा करून कुमकेस सरदार व फौजफेरोजी नेली. हुजूरचे फौजेचे इमदादीनें

माधवराव यांची सिकस्त होऊन दस्तगीर जाहले. व रघुनाथराव यांस फते जाहली. त्याउपरि बाबूराव फडनीस हुजूरचे पन्हांत आले. व त्रिबकराव यांस सखारामपंतानी बेहुरमत केलें. त्या दिवसापासून फडनीस व त्रिबकराव यांचा इतिफाक व सखारामपंतासीं ज्यानी दुषमनीं. जनार्दनपंत, बालाजीपंत फडनीसाचे वालद, ते व बाबूराव बिरादर, याकरितां व सखारामपंतानीं फडनीसीचें काम चितो विठलास सांगितलें याकरितां जनार्दनपंतासी व सखारामपंतासीही निफाक व नाखुषी जाहली. त्या दिवसांत कृष्टणराव बलाळ सखारामपंतासमीप पेशदस्त होते. यलगंदलचे सफरेंत रघुनाथराव त्या जिल्यांत आवारा जाहले ते समईं सखारामपंतानीं रघुनाथराव यांचे तरफेनें कृष्टणराव बलाळ यांस हुजूर ज्वाबसालाकरितां पाठविलें होतें. तें अवल येणें राव मा।।राचें. त्याउपरि राजे प्रतापवंत बाहादरांचे दिवाणींत रघुनाथराव याचेच तर्फेनें कृष्टणराव हुजूर आले होते. सखारामपंतास हरकोण्हांसीं दुषमनी ज्यानी नव्हती. याकरितां व रघुनाथराव तलवन मिजाज, रियासतीस उपयोगी नांहींत, याकरितां माधवराव यांस पेशवाईवर पुन्हा कायम केलें. बाबूराव फडनीस खानेनिसीन जाहले. त्रिबकरावमामा बहुत फंदी व शरीर, याकरितां रघुनाथराव यांचे हमराह त्रिबकराव यानीं राहांवें, हा करार होऊन राहिले. व माधवराव यांचे कारपरदाज सखारामपंत जाहले. कृष्टणराव बलाळ सखारामपंताचे पेशदस्त, बमोजिब मामूल जाहले. माधवराव याची मिजाज जाहाल होती, याकरितां सखारामपंत कितेक काम आपले तरफेचे अकसर कृष्टणराव याजकडून घेत होते. व सखारामपंताचे तरफेनें माधवराव यांजसमीप कृष्टणराव मुख्तार जाहले. व सन ११८१ हिजरींत जानोजी भोसल्याचे तंबीनंतर

२

पुरवणी

रघुनाथराव गोहदेस गेले. ते समईं त्रिबकरावमामास बरोबर नेलें. व सखारामपंत व कृष्टणराव माधवराव मुतवफीसमागमें राहिले.

त्याउपरि माधवराव खुदपसंद जाहले व सखारामपंताचे सांगितल्यास बरखिलाफ वर्तणूक करूं लागले. सबब सखारामपंतानीं कामातून चित काढलें व हरयेक कामास कृष्टणराव बलाळास नमूद केले. राव-म।।रनुलेनीं अंत्यस्थ बातनींत सखारामपंताचे स्नेहाचा सिलसिला कायम ठेविला व जाहिरा माधवराव मुतवफी यांचे रफीक व मुकरब जाहले. परंतु हुजूरांत इतिफाक राखून दुसरे मुखालिफाचीं तंबी करावी, हे सलाह सखारामपंताची माधवराव यांस दिलनिसीन जाहली. व हुजूरचे ज्वाबसालाचे सिलसिल्यांत कृष्टणराव, याकरितां माधवराव यांजपासी मुकरब व मुसाहब राव म।।र होते. कितेका दिवसानंतर मोरो बाबूराव फडनीस यांनी दिवाणीचें काम केलें. ते समईं कृष्टण-राव बलाळ यांचा सिलसिला सखारामपंताचे निसबतीचा म्हणोन, परस्परें निफाक होता. कृष्टणराव बलाळ यांजकडील मखलसीचें काम मवकूफ करविलें व कामांत माजी जाहले. त्याउपरि माधवराव यांचा वाका जाहला. नारायणराव रईस जाहले. बमोजिब वसीयत माधवराव सात आठ महिनेपर्यंत सखारामपंत मदारुलमाहाम व मुख्तारीनें काम करीत होते. कृष्टणराव बलाळ दस्तगिरफ्ते सखा-रामपंताचे. परंतु चाल दुरंगी पाहून येक हुजूरचे ज्वाबसालाचा सिलसिला मात्र रावजीकडे कायम ठेविला. वरकड कोणतेही कामांत दखील नव्हते. हरीपंत फडके व बालाजी जनार्दन उभयतां नारायण-राव यांसमीप मुकरब होते. यानीं सखारामपंताविषईं पैशुन्य, सिकवा नारायणराव यांजसमीप सागून चितांत गि-हे घातली. व सखा-रामपंतानीं कामातून चित काढिल. थोडकेच दिवसांत नारायणराव मारले गेले. त्यानंतर रघुनाथराव पेशवाईचे सरदारीवर कायम मुकीम जाहले. कृष्टणराव बलाळ माधवराव मुतफीचे मसलतींत शरीक होते. यासबब रघुनाथराव याची इतराजी कृष्टणराव यांजवर न्याहायत होती. सखारामपंत कृष्टणराव बलाळ यांची ज्यानब व राव म।।र सखारामपंताची ज्यानब परस्परें राखीत होते. व कृष्टण-राव यांचे बेइतिला कितेक म।।र बारहा फिदवीकडून हुजूर अर्ज करविला आहे. परंतु कृष्टणराव बलाळासीं व सखारामपंतासी

नाखुसी नव्हती. रघुनाथराव खुदपसंद व बेवास्ता हुजूरचे बदअंदेसीचा खियाल केला. सबब सखारामपंत आजुर्दा होऊन बाहना बिमारीचा करून रुखसत घेऊन गेले. कृष्टणराव बलाळ रघुनाथरायाचे तकयुदीकरितां हमराह राहिले. त्याउपरि बेदरचे मुकामीं जंगजदलचे मुकदम्यात फिदवीचे मारफातीनें कृष्टणरावजीचा पैगाम हुजूर अर्ज करीत होतों व रूबरू येऊन अर्ज केला. त्याची इतिला हुजूर आहे. हुजूरचे ज्वाबसालांत रघुनाथराव याजसमीप कृष्टणराव पुन्हा कायम जाहले. व हुजूरची रुखसत घेऊन गेले. त्यानंतर सखारामपंत व हरीपंत व बालाजी जनार्दनाची परस्परें अहदपैमान होऊन इतिफाक जाहला

३

पुरवणी

व हुजूर अर्जमारूज करावयाकरितां कृष्टणराव बलाळ यांस व फिदवीस केला. कृष्टणराव बलाळ यानीं जिवाजी रघुनाथ यांस हुजूर पाठविलें. व फिदवीनेंही अर्जी लिहिली ते मंजूर नजरआली जाहली. त्याउपरि कृष्टणराव बलाळ यानी हिकमतीनें रघुनाथराव यांपासून रुखसत घेऊन पुरंदरास गेले. व फिदवी बमोजिब इशारा सखारामपंत व रुकनदौला मरहूम पुरंदरास गेलों. त्याउपरि कृष्टणराव बऱ्हानपूरचे मुकामीं हुजूर मवकब मनसूरास गेले. फिदवी कारपरदाजासमीप हाजर होता. त्यानंतर माधवराव पंतप्रधानाचा तवलुद जाहला. व सखारामपंत व बालाजीपंत कांही दिवस बइतिफाक होते. परंतु कामाकाजाकरितां परस्परें चुरसाचुरसी होऊं लागली. त्यानंतर राजे अमानतराम हुजूरीहून पुरंदरास आले. सखारामपंताची व बालाजीपंताची परस्परें नाखुसी. याकरितां जागीरचे माहाल बारा लाखाचे गुजास्त जाहले व पूर्वी पाच लाख रुपये नजर केले होते. पुन्हा पांच लाख द्यावे म्हणोन करार असतां तफावतीची गोष्ट बोलूं लागले. त्यानंतर स्वारीमुबारक बऱ्हानपुरास गेली. व कारपरदाज मदारुलमहामहीं बऱ्हानपुरास गेले. व हुजूरची

मुलाजमत हासल केली. परंतु करारापा॥ पांच लाख रुपये दिल्हे नांहीत. सवारी मुबारक खुजस्तेबुनयादेस आली. व कारपरदाज पुरंदरास आले. त्यानंतर कृष्टणराव हुजूर औरंगाबादेस आले. ते समईं हुजूरचे दाबावर व हिकमतीनें इरशाद जाहला. या सबब सतरा लाखाचे माहाल गुजास्त करून हुजूर नियाज केले. त्याचे बाद हरीपंत पुरंदरास आले व बालाजीपंताची व हरीपंताची दोस्ती व इतिफाक जाहला. मोरो बाबूराव यास खारीज मसलहत व इतिफाक केलें. व सखारामपंतासीं निफाक शुरू जाहला. कृष्टणराव बलाळ यानीं येक गड किवा किला आपले सुपुर्द व जागीर चालीस हजार रुपयाची, पैकी वीस हजाराचे देहात आहेत, बाकी वीस हजाराची देणें म्हणोन पैगाम केला. तो कारपरदाजांनी कबूल केला नांहीं. सबब राव म॥र आपले स्थलीं सखारामपंत व बालाजीपंत व हरीपंत तिघांवरहीं आजुरदा व तमासबिनी करूं लागले. सखारामपंतासी व बालाजीपंतासी न्याहायत नाखुसी जाहली. ते समईं तुकोजी होळकर व मोरो बाबू(रा)व व सखारामपंत यकदिल होऊन फौज जमा करून पुरंदरास आले. ते समईं बालाजी जनार्दनानी सिद्यासी मवाफिकत व साजस करून मदतीस येणें व दरोबस्त पंतप्रधानाचे दौलतीचा बंदोबस्त करणें म्हणोन सिद्यासी पैगाम केला. ते समईं पाच लाख रुपये नख्त देण्याविषईं माहदाजी सिद्यानी पैगाम केला. रुंपयाची निशा परस्परें करवावी म्हणोन बालाजी जनार्दन यानीं कृष्टणराव बलाळ यास पैगाम केला कीं लाख रुपये तुम्ही दस्तगर्दा देणें. कृष्टणराव बलाळ यानीं पसोपेश अंदेशा करून बालाजीपंताचा पैगाम कबूल केला नांहीं. याची गिन्ह बालाजीपंताचे चितांत राहिली. त्याउपरि हरीपंत फडके कर्नाटकचे स्वारीहून माघारा आले व माहदाजी सिंदे कोल्हापुराकडून पुरंदरास आले, व मोरो बाबूराव यांस माजी व मगलूब करून दस्तगीर करून कैद केलें. व बज्याबा पुरंदरे यांस कैद केले. या मसलहतींत कृष्टणराव बलाळ शरीक मसलहत नव्हते. त्यानंतर मुंबईकर इंगरेज व रघुनाथराव मुतफीक होऊन

४

पुरवणी

येतमाद यकबयक कोणे प्रकारें पडेल. मगर हुजूरचे फिदवी मवरूसी आहेत. व बमोजिब कायदा हमेशा इनायतनामे कांहीं कामाचे सिलसिल्याचे येत आहेत. दरीविला इनायतनामे आले नांहींत परंतु येतील. व रघोतमराव आजीपर्यंत आमचे म्हणजे फिदवीचे गुमास्ते होते. सांप्रत हुजूरीहून मनसब व खिताब इनायत जाहला व खानजादीचे सिलसिल्यांत मुतजम जाहले. याकरितां हुजूरचे इरषादेवितरिक्त येक हरफ लिहिणार नांहींत. याप्रमाणें हरीपंतास उतर केल्यानंतर पंत म।।रानीं उतर केले कीं माधवराव मुतवफीपासून हुजूरचे तरफेचा ज्वाबसाल व कांही खुफिया मजकूर हुजूरचे इरषादेप्रमाणें तुम्हीं माधवराव यांस सांगत होतां व कृष्टणरायास बेइतिला. माधवराव तुम्हास म्हणजे फिदवीस हुजूर अर्ज करण्याचा म।।र सांगत होते. परंतु ते समईं रुकनदौला मरहूम दरमियान होते. सांप्रत मोइनुदौला बहादर पंतप्रधानांचे ज्वाबसालाचे बानीकार. परंतु बहादर म।।रांचा व तुमचाही ज्वाब तुटला नांहीं म्हणतात. मगर हुजूर तुम्हीं अर्जमारूज करीत असांल. परंतु हुजूरीहून ज्वाबसालाचा सिलसिला तुम्हांकडें कोणते प्रकारचा ज्यारी होतो याची अजमाश व परीक्षा करून उपरांतिक तुम्हांसीं कांहीं बोलूं. फिदवीनें उतम म्हणोन प्रत्योतर केलें. दरींविला फिदवीजादे रघोतमराव यांचें खत छ ८ जिलकादचें फिदवीस मुजरद आले. त्यांत फिदवीजादे यानीं लिहिलें होतें कीं कृष्टणराव बलाळ यांनी पुण्यांत जो अहद व वचनप्रमाण करून तुलसी व बेलभंडार दिधला, त्याची फरामोसी रावजीस जाहली. व जिवाजीपंताचे इतिफाकाची हवा पैवस्त जाहली. मगर इनायात व तफजुलात हुजूरीहून मवरद अहवाल आहेत. व सिवाय ज्वाबसाल पंतप्रधान व कृष्टणराव वगैरे मोइनुदौला बहादरही मेहरबानी करितात. वं राजे अमानतराम यांचा जो कदीम यखलास आहे त्यांत सरेमो तफावत नांहीं. त्यास मुलकी काम उमदें आहे.

ज्यांत रावजीनी पंतप्रधानाचे कामाची सरबराई व बेहबुदी व हुजूरची इनायत कारपरदाज बालाजीपंत व हरीपंताचे अहवालावर पाहिली असेल, त्या चालीनें चालत असतील. परंतु फिदवीस येक शुबाह न्याहायत जाहला कीं कृष्टणराव बलाळ यानीं जे गोष्ट न सांगावयाची व ज्या गोष्टीचे फाहिसींत रावजीचा इतबार पंतप्रधानांचे कार-परदाजासमीप किमपि न राहावा, याप्रमाणें बारहा बेदरचे खालीं रघुनाथरायाचे दौरांत व मोरो बाबूराव यांचे हगाम्याचे बाद सखा-रामपंतास कैद केल्यानंतर फिदवीसीं जे बोलिले व बमोजिब इशारा दुयम हुजूरअर्जी लिहिणें म्हणोन सांगितलें व मुलकी कामाचा तर कांहीच पडदा न ठेविला व आदरश इमान वचनप्रमाण जाहली. इतका खलामला असतां फिदवीजादे रघोतमराव यांसीही ज्वाब करून हुजूर व मोइनुदौलासीं खिलवत करितात. या करण्यांत फिदवीची नुकसानीं व रावजीसीं शरीक मसलहत असलियां फखर नांहीं. व रावजीचा स्नेह संपादून यांजपासून कांहीं नफा आपला व्हावा हे उमेद आजीपर्यंत धरली नांही व पुढें नांहीं. येक खौफ मात्र वाटतो कीं यांचे नाखुसींत गिरफ्तार बाला न व्हावें. याकरितां व हुजूरचा कांही नफा होईल यासबब राव म।।रनुलेसीं स्नेह राखितों. परंतु राव म।।राचे बोलण्याचा व कराराचा व इमानाचा इतबार फिदवीस न राहिला. त्यापक्षीं हुजूर तर उमदे कामाचा ज्वाबसाल रुबकार आहे. रावजीचे बोलण्याचा व इमानाचा विश्वास कोणे प्रकारें यईल? हरगीज येणार नांही. बहरहाल रावजी व रावजीचे पेशदस्त बेइमान व जमानसाज पके आहेत. ज्या चालींत हुजूरचा नफा व जाहिरी येखलास व वचनप्रमाणाचा दस्तायैवज न गुंते त्याप्रमाणें जमानसाजी करणें लागेल. कृष्टणराव बलाळ तर पोख्तकार आहेत. परंतु आजीपर्यंत सखारामपंत

५

रावजीचे मुरबी मुकमील होते. सांप्रत रावजी यकअंगी जाहले. व जिवाजी रघुनाथ व गोविंदराव भगवंत ना-आजुमुदाकार व वचनाचे व

इमानाचे मजबूत नांहीत. व आपली बुजरगी व फखर व नफा व्हावा हेच उमेद, व बाजीगर व फंदफरेब, मणनार येक म्हणवितात, व दानाईचा गरूर फार आहे. बलक गोविंदराव याचे बोलण्यांत कृष्टणराव मौनी देत आहेत. हुजूर अनेक प्रकारची अजिजी व आपली फिदवीयत व हुजूरचा नफा व नुकसान व बदनामी व नेकनामी याचे दरजे अर्ज करतील. बफजल इलाही हजरत खुदावंद न्यामत रईस दक्षणचे व अरस्तूचे दरज्याचे व अफलातूनचे कियाफाचे, बाजीगराची बाजी पशरफ्त व मंजूर होणार नांहीं, व सिरफ बाजीगर आहांत हा दोष व हरफ लाऊन खजील व लाजवाब होतील. याप्रमाणें इरषाद होईल. परंतु रावजीस फिलफौर बेइमानी व कराराची मजबुती नांहीं. याचा इलजाम हुजूरीहून लागावयाकरितां फिदवीस येक फिकरा अमलनालासेंत आला आहे. जिवाजीपंत व गोविंदराव भगवंतास खिलवतेंत बारयाब न करितां राव म।।रास इरषाद व्हावा कीं हैबतराव व रघोतमराव यासीं व तुम्हांसीं पडदा कोण्हेविषईं नांहीं. बलक ज्यानी गोष्टीची इतिला तुम्हीं यास दिधली व पेशज तुमचे येण्याचे रघोतमराव याचे जुबानी यैकिलें कीं हैबतराव व रघोतमराव यासीं व तुम्हांसी कांही करार व शरत जाहली आहे. त्याचे बरखिलाफ बिलफय तुमची चाल दिसती. याचा वास्ता काय? हे गोष्टी रावजीस फार शरमंदगी वारद करील व पुढें जे बोलणे हुजूर व करार करणे तो मजबूतीनें करतील. मगर या बोलण्याचे मसलतींत जिवाजी रघुनाथ व गोविंदराव भगवंत यांस हरगीज शरीक न करावा. हरसूरत हे दोघे शरीक मसलहत जाहले तरी गोविंदराव फार तरार आहे. हुजूरीहून इरशाद जाहला याचा ज्वाब रावजीस बोलूं न देतां आपण हजरत करीबी करून बोलेल. अखरश अर्ज करील कीं, हैबतराव यांसी वचनप्रमाण केलें. परंतु म।।रनुले व रघोतमराव यांजकडून राजदारी होणार नांहीं, व बिलकुल हुजूरचें काम बिगडेल व करोडींची नुकसानी हुजूरची होईल, हें आम्हास स्पष्ट कळलें. याकरितां कौलकरार व इमानाची शरत येकीकडे ठेऊन, ज्या चालींतं हुजूरचा नफा व पंतप्रधानाचे दौलतीचा बंदोबस्त, त्या चालीवर आम्हीं चालतों. येक खावंदाची नौकरी व

हुजूरची फिदवियत व दौलतख्वाही हचा दोन्हीं गोष्टी आम्हांस मंजूर आहेत. या तन्हेन अर्ज करील. करोत. परंतु बेइमानी व बदकौलीची शर्त व परीक्षा जाहली व इप्तदायपासून फिदवीस काबूची लोकांची बेइमानी ठाऊक आहे व हुजूर तर जमीर मुनीर आईना ज्याहानुमा आहे. हरयेक उमदा व गरीब सर्वांची चाल रोशन आहे. याप्रमाणें फिदवीनें अर्ज केला. हे तकसीर, माफ व्हावी हे उमेद. व फिदवीची नौकरी व वोहदा खबररसाईचा याकरितां जुरत करून अर्ज केला आहे. ज्यांत नफा व सलाहदौलत ते तदबीर हुजूर मंजूर होईल. फिदवीची कमाल आरजू होती व आहे की फिदवीजाद्याची सरफराजी व्हावी, व हमचष्मांत आबरू वाढावी. ते बेवसीला. व अर्ज हजूरीहून जाहली. याउपरि जे फिदवीजाद्याची सरफराजी होईल ते फिदवीस आपले सरफराजीपेक्ष्यां अधिक व खानजाद नवाजसीची प्रसिध सर्वत्र होईल. व फिदवीजाद्यास आरजू दिली आहे कीं हुजूरची खानजादी जोपर्यंत ध्यानकाल किंवा आलम व आलमियांत करावी. मंजूर करणें येख्तियार खावंदाचा.

A. R. No. 38. २४ रजब ११९४ हिजरी

२६ जुलै १७८०

पै॥ २ साबान

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. हुजूरचे इनायतनामे दोन किते व राजश्री बाळाजीपंत व राजश्री कृष्टणरावजीचे नांवचे इनायतनामे पाठविले ते उभयतांस दिल्हे. व सेवकानें इनायतनाम्याचें उतर अर्जी हुजूर स्वामीचे सेवेसी पाठविली आहे. हुजूर गुजराणावी. उभयतांचीं उतरें माघाहून येतील, ते सेवेसी पाठऊन देईन. छ १७ रजबचें पत्र व हुजूरचा इनायतनामा व चिरजीव रघोतमराव यांचा लिफाफा व रो। बालाजीपंत नाना व कृष्टणरावजीस हुजूरचे इनायतनामे सादर जाहले. त्याच्या नकला चिरजीवानीं पाठविल्या. त्या सर्व आजी छ २४ रजब, आषाढ वद्य येकादसी मंगळवारीं प्राथःकालीं पत्रें रवाना करतेसमई पावली. उतर माघाहून सेवेसी पाठवीन हे विनती.

पै।। छ २ साबान

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. मौजे निळें वगैरे देहातील प्र।। परभणी खालसा सरकारचा याकरितां सेवकानें दरख्वास्त मिनतवार करून जागीर मागितली. व स्वामीचे कृपेकरितां हुजूरीहून इनायत जाहली. जागीर घेतली. त्याचे दुसरे वर्षी जाबितजंग बहादरास परगणे मजकूर सुपुर्द जाहला. त्याचा उपद्रव अतिशय, परंतु वकारपूर्वकानें त्यास फार अगत्यवादानें सांगितलें व लिहिलें. व स्वामी तर साहित्यास अनकूळ. तीन च्यार वर्षेपर्यंत दान तीनसे रुपये खर्च पडोन निर्वेध होता. सांप्रत जाबितजंग समाप्त जाहले. त्यांचे पुत्र यहतशामजंग परंतु बापापेक्ष्यां अधिक बहादर व गुणवंत. प्रथमतां मिरजा नजरबेग यानें रुपये घेतले, हे वर्तमान हुजूर व स्वामीस लिहिलें. व मोइनुदौलाचे आर्जव फक्त याच कामाकरितां. परंतु त्यांची आसीर्वादपत्रें मात्र येत आहेत कीं निर्मलेस लिहून पाठविलें. याउपरि बंदोबस्त होईल. हुजूरीहून ताकीद जाहली किवा न जाहली हें वर्तमान कळत नांही. सांप्रत निळे वगैरेचा बोभाट पुन्हा आला आहे कीं चराईस उंट वगैरे निर्मलेहून परभणी परगण्यांत आले. त्यानीं दीगर जागीरीच गांव त्यांत निळचापासून कडबा कही करून नेला. चौथाईवाला कडू उदाजी यास निर्मलकरानीं आपले आश्रयांत ठेऊन दस्तबरदास्ते रुपये देतात. व निळे वगैरे गांवापासून कचे वसूलाचे वाटणीपेक्ष्यां अधिक रुपये घेतो. याच प्रकारें आमिलाचा उपद्रव. सारांश, यावर्षीं पांचसे रुपये निळचाचे आले नसतील. सेवकास हुजूरीहून सरदारीचें काम असतें, तरी याप्रमाणें बोभाट व नालिस सर्वथैव हुजूर न येती. सांप्रत जें होणे तें हुजूरचे आश्रयानें. हुजूरीहून बंदोबस्त न जाहलियां कांहीच उपाय नांही. यास्तव विनतीजे निर्मलकरास प्रखर ताकीद हुजूरची व त्याचे वकीलास ताकीद जाहलियां उदुलहुकुम करणार नांही. परंतु प्रखर ताकीद मात्र व्हावी किवा हुजूरीहून मदनजर सरफराजीवर त्यापक्षीं चिरंजीव रघोतमराव विनती करतील

त्याप्रमाणें यैवजी जागीर देऊन हे गांव सरकारचे खालस्यांत ठेवावे. याउपरि जें मर्जीस मुनासिब येईल ते आज्ञा करावी. त्याप्रमाणें वर्तणूक होईल हे विनती.

A. R. No. 39. (पो. ता.) ११ शवाल ११९४ हिजरी
१० अक्टोबर १७८०

पै॥ छ ११ शवाल

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. हुजराती लोक वगैरे सिलेदारास पुण्यास येण्याविषईं दोन ताकीद पत्रें गेली. परंतु अद्यापी लोक जमा जाहले नांहीत, याकरितां दसऱ्याचे मुहूर्तें राजश्री बालाजीपंत नाना डेरे गारपीरासमीप देणार, किंवा जातीनें बालाजीपंत नाना डेरे दाखल होणार म्हणोन चर्चा बहुताचे मुख यैकिली. राजश्री हरीपंततात्याची छ १ शवालीं रात्रौ भेट जाहली. इतर वर्तमानें विचारिलीं व तात्यानी सांगितली. डेरे उभे करणार याचा निश्चय विचारिला. तात्यानी उतर केले कीं डेरे द्यावे याचा निश्चय आहे. परंतु तारीख व दिवसा (चा) निश्चय अद्यापि जाहला नांहीं. निश्चय जाहल्यानंतर सांगू. खारिज सर्वतोमुखं यैकिले वर्तमान हुजूर व स्वामीस श्रुत व्हावे यास्तव विनती लिहिली असे हे विनती.

A. R. No. 40. २१ जिल्हेज ११९४ हिजरी
१८ डिसेंबर १७८०

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सं॥ नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान त॥ छ २० जिल्हेज रविवारपर्यंत मो॥ सासवड स्वामीचे

कृपे करून क्षेम असे. विशेष. पूर्वी छ ७ माहे म।।रीं हुजुरांत अर्जी व अखबार व विनतीपत्र सेवेसी पाठविलें. त्यानंतर श्रीमंत पेशव्यांचे जासूदांसमागमें अर्जी व हिंदवी पत्र छ १४ तारखेस पाठविली तें पावलें असेल. सांप्रत छ म।।रपर्यंत अखबार व अर्जी हुजूरांत व हिदवी अखबार सेवेसी पाठविली आहे. नवाब विकारुदौला बहादर व श्रीमंत राजश्री नानास्वामीं कुटुंबासहित आजी सासवडास आले. उदईक छ २१ रोजी राजश्री सखारामपंत बापू व बालाजीपंत नाना इस्तकबालास येऊन गडासमीप श्रीमंताचे डेऱ्यांत श्रीमंताचे दर्शनास घेऊन जाणार. भेटीनंतर सविस्तारें वर्तमान लिहीन. स्वामीकडील कुशळ वर्तमान प्रतिक्षणीं येत जांवें याविषई श्रीमंत नानास निजध्यास आहे. स्वामीचें दर्शनाचा लाभ होय तोपर्यंत सदैव क्षेम वृत्त लेखनीं अंतःकरण ताप दूर करावयाविषयीं आपण समर्थ आहेत. सेवकाचे संरक्षणाचा पूर्ण अभिमान व कृपेची वृधी म्हणून श्रीमंत नानानी सेवकास वर्तमान सांगितलें. त्यास पोष्य मंडलीवर विशेष कृपा करावी हा प्रसिध गुण स्वामीचा. मीं तर अंगीकृतांत आहे. त्यापक्षीं माझा परामृष करून कृपाद्रिष्टीनें संरक्षण करीत जांवें हे विनती लिहिणें किंवा करणें अयोग्य. परंतु कार्यासक्तास विचार थोडका असतो. त्या रीतीनें कृपेची अभिवृधीविषईं मी कार्यासक्त आहे. बहुत काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

पु।। श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी. पूर्वी छ २० जिल्हेजपर्यंत वर्तमान लिहिलें आहे. त्यानंतर छ २१ सोमवारीं सासवडापासून कूच करून श्रीमंतांचे व सासवडचे मध्यें पुरंदराचे रुखें नवाब विकारुदौला बाहादर यांचे लश्कर उतरलें. श्रीमंतानीच इस्तकबालास यांवें हा निश्चय होता. त्यास नवाब विकारुदौला बाहादरांनी निषेध केला कीं श्रीमंत आपले स्वाधीन नांहींत. मातोश्री वितरिक्त दूर येणें उतम नांहीं. त्यानंतर रो सखारामपंतबापू

व बालाजी जनार्दन फडनीस व रास्ते वगैरे इस्तकबालास आले. सांप्रदायाप्रमाणें भेटी जाहल्या. श्रीमंत नानासीं सखारामपंत बहुत प्रीतीनें भेटले. त्यानंतर सखारामपंतानी सांगितलेंजे श्रीमंत गडाखालें येत आहेत त्या स्थलीं श्रीमंताची व नवाब विकारुदौला बाहादरांची भेट व्हावी. उभयतांची स्वारी गडाचे रुखें गेली. गडाखालें पाव कोसावर डेरा उभा करून श्रीमंत मातोश्रीसहित आले होते. राजश्री सखारामपंत बापू प्रथमतां डेऱ्यास गेले. माघोन बालाजीपंत व नवाब विकारुदौला बहादर डेऱ्यास आले. डेऱ्याबाहेर सखारामपंत पुढें येऊन हात धरून डेऱ्यांत गेले. श्रीमंत आपले पायानें चालत मातोश्रीपासून बसावयाचे स्थलीं आले व भेट घेतली. सहवासी लोकांची वळख आहे. संकेतानें समजतात. येक घटका बसले होते. त्यानंतर सर्वत्रांस अतर पानदान दिल्हें. श्रीमंतानी आपले हातें बहादर मवसुफास व श्रीमंत नानास विडे दिल्हे. बापूनीं उभयतांस अतर लाविलें. समारंभ बहुत प्रीतीचा जाहला. त्यानंतर निरोप घेऊन नवाब विकारुदौला बहादर आपले डेऱ्यास आले व श्रीमंत गडावर गेले, व बापू व नाना आपले शैन्यास गेले. भेटीनंतर तोफा खुसीच्या सुटल्या. सेवेसी श्रुत होय हे विनती.

पुरवनी २*

ठवयाची तजवीजेत आहेत. विदित होये. छ २० माहे म।।री नवाब वकारुःदौला बहादुर व श्रीमत राये नानकराम सासवडास दाखल जाले. उदईक श्रीमताची व उभयेता कारभारी याच्या व वकारुःदौला याच्या भेटी होणार. छ२१ माहे म।।र रोज सोमवार वकारुःदौला बाहदुर आपला डेरा सोडून पऊन कोस आले. राजश्री बापू व नाना कोसभर पुढे इस्तकबाल येऊन याच्या भेटी जाल्या. उपराती श्रीमताचे भेटीस गेले. श्रीमत गडाखाले डेरा दिल्हा आहे तेथे आले होते. तेथे श्रीमताची भेट जाली. दोन घटका वकारुःदौला श्रीमताजवल बसले होते. उपरातिक रुख्त (रुखसत) होऊन आपले डेऱ्यास आले.

* या पूर्वीचें एक पान गहाळ दिसतें.

श्रीमतही याची (भे)ट घेऊ(न)मागती गडावर गेले. फिरंग्याकडील जाबसाल काही अद्याप निश्चयात आला नाही. विदित होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. येथे आम्हाजवल जोड्या नवत्या म्हणोन बारा तेरा दिवस जाले. अखबार न आलियास सेवकाचा उपाये काये? जोड्याविशई ताकीद जाली पाहिजे. विदित होये. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ति.

A. R. No. 41.

४ मोहरम ११९५ हिजरी
३१ डिसेंबर १७८०

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. स्वामीनीं छ ४ मोहरमचें पत्र पाठविलें त्यांत लेखनाज्ञा केली कीं चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचे रुखसतीचा प्रकार ज्या कारभाराकरितां चिरजीव आले आहेत ते समग्र हुजूर आले आहेत, त्यापक्षीं हुजूरीहून रुखसत मागणें विदित असलियां विचार करून लिहिणं म्हणोन आज्ञा. त्यास स्वामीचे कृपेचे व मुरब्बीपणाचे योगें करून यजमानसाहब चिरंजीवाचे अहवालावर मुतवजे व सरफराजी केली. व स्वामीचे कृपे करून विशेष सरफराजीची उमेद आहे. त्यास यजमानसाहब मुतवजे अहवाल व स्वामी कृपावंत असतां चिरंजीवानी हुजूर राहांवें यांत चिरंजीवांची सादत व माझाही मनोदय व स्वामी स्वहिताची बहुत कृपेकरून आज्ञा करीत आहेत. याविषई मीं सेवेसी विनती ल्याहावी हा अर्थ नांहीं. स्वामीची कृपा व यजमानांची नवाजिस होण्यांकरितां बहुत प्रयत्न लागतो. ते कृपा व नवाजिस असतां रुखसत मागावी हे सलाह सर्वथैव नांहीं. परंतु

दोन तीन कारणें प्राप्त, यास्तव विनती लिहिली होती. प्रथम हेच कीं कृष्टणरावजीचा निजध्यास होता कीं हुजूरीहून इनायतनामा सादर व्हावा. म्हणजे सादत मुलाजमत हासल करून ज्यांत हुजूरची दौलतख्वाही तें काम करून देऊ. हुजूरचे दौलतख्वाहीचें काम याकरितां चिरजीव हुजूर आले व स्वामीचे कृपेकरून कृष्टणरावजीस इनायतनामा सादर जाहला व रावजी हुजूर गेले. चिरंजीवानी जो उद्योग केला तो सिधीस गेला. याउपरि चिरंजीवांचे रुखसतीस कृष्टणरावजीकडील कामाचा गुंता सेवकाचे मतें दिसत नांहीं. दुसरें कारणें चिरंजीवांची सरफराजी होऊन ते येथें असले म्हणजे मजला सर्व प्रकारें निश्चिती. याकरितां चिरंजीवानीं रुखसत घ्यावी व स्वामीनी कृपा करून रुखसत त्यांची सरफराजी करून द्यावी म्हणोन विनती आहे. तिसरा प्रकार चिरजीवांची कन्या विवाहास योग्य. तिचा विवाह करावा म्हणोन गतवर्षीपासून उद्योग करितों. परंतु उद्योग सिधीस जात नांहीं. सांप्रत माघमासीं किंवा फालगुण शुध सप्तमीपर्यंत प्रयोजन सिधीस न्यांवें याकरितां चिरंजीवाचे रुखसतीविषई विनती लिहिली होती. व पृथक पुरवणींत पुन्हा लिहितों हे विनती.

A. R. No. 42.

१७ सफर ११९५ हिजरी
१२ फेब्रुवारी १७८१

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. छ १० माहे सफरचें कृपापत्र चिरंजीव राजश्री राय रघोत्तमराव यांचे लिफाफियासह दारोग्याचे विद्यमानें डांकेवर रवाना केलें ते छ १७ माहे मजकुरी पाऊन संतोष जाहला. सेवेसी श्रुत होय. चिरजीवास पत्र लिहून सेवेसी पाठविलें आहे हे विनती.

A. R. No. 43. (पो. ता.) २९ रबिलाखर ११९५ हिजरी
२४ एप्रिल १७८१

पै।। छ २९ रा।खर १

श्रीनिवास

पुरवणी पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी.

विनती उपरि. हैदरअलीखानास गरूर अतिशय जाहला आहे कीं सांप्रतकाळीं साहेब अज्म व साहेब फौज व तरतुदी दक्षण हिंदुस्तानांत येक आपण आहे, वरकड सरदारास ध्यानास आणीत नांहीं. हुजूर हजरत बंदगानआलीचे जनाबेंत मोतमद नांहीं. याचा विस्तार पत्रीं ल्याहावयास माझी शक्ति नांहीं. खान म।।रचे लश्करची अखबार हुजूर येत असेल. यैसियासी हुजूरीहून हैदरअलीखानांचीं तंबी करावयाचाच अज्म होऊन त्याचें पारपत्य जाहलें पाहिजे. देशकाळानुरूप तंबीचा अज्म होणें सलाह दौलत नसल्यास, त्यासीं यैक्यता करून ताबेदारींत आणावा. इतिफाक होण्यांविषई हैदरअलीखानाची आरजू आजपर्यंत आहे व कांही देणे व घेणें याची शर्त दरमियान न आणितां बेवास्ता खान म।।रानें हुजूरचे इतिफाकांत यांवें. हे मर्जीमुबारकेचे खुलासा असलियां खान म।।राकडील विश्वासूक कोण्ही ग्रहस्त पुण्यांत आहे त्याचा सिलसिला आजिपर्यंत सेवकासीं आहे. फरासीस खान म।।रनुलेस येऊन भेटणार. व त्यांचे इतिफाकानें इंगरेजांस जेरदस्त केल्यानंतर फारच मगरूर होईल. याकरितां फरासीस मुतिफीक होऊन इंगरेजास जेरदस्त केलें नांहीं, त्यापूर्वी त्यास हुजूरचे ताबेदारींत आणांवें. हे सलाहदौलत आहे म्हणोन कोण्ही ग्रहस्त सेवकाचा स्नेहित त्याचे बोलण्याचा आशय हुजूर व स्वामीस लिहिला असे. सारांश, हैदरअलीखानांचें पारपत्य करांवें किवा यैक्यता करावी हे दोन मार्ग बरे दिसतात. उपेक्षेंत ईश्वरइछेनुरूप जें घडावयाचें ते समयोचित होईल. हा निश्चये करून राहांवें. येथील कारपरदाजांस हैदरअलीखानाची खातरदारी फार दिसते. सांप्रत-

काळीं चितापासून खानम।।रनुलेचे रफीक व शरीक दिसत आहेत येविषईंची इतिला हुजूर व स्वामीस व्हावी म्हणोन लिहिलें असे हे विनती.

पै।। छ २९ र।।खर

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. मोइनुदौला बहादरांस मसीरुलमुलकीचा खिताब होऊन हुजूरीहून सरफराजी जाहली म्हणोन राजश्री गोविंदराव कृष्टण यांचे मुखं वर्तमान यैकिलें. त्यास ते अमीर व पंतप्रधानांचे व हुजूरचे ज्वाबसालाचे बानीकार यास्तव भक्तीची प्रीति किंवा भयाची प्रीति, भक्तीपेक्ष्यां भयाची प्रीति अधिक असते. याकरितां मुबारकबादेची अर्जी व पांच रुपये ५ नजर येथोन धावजी व बाळू जासुदांसमागमें स्वामीचे सेवेसी पाठविले आहेत. यांच जासूदासमागमें किवा आपल्याकडील जासूद अथवा खादमाबरोबर अर्जीचा लिफाफा व नजरे ब।। रुपये ५ नवाब मवसुफास पावते करवावे. मुख्य यजमानसाहब बहुत कदरदान व स्वामी चितापासून कृपावंत यांत सेवकाची सरफराजी व मनोरथ श्रीकृपेकरून पूर्ण जाहले व होतील हा निश्चय आहे. विशेष काय लिहिणें हे विनती.

पै।। छ २९ र।।खर

श्रीनिवास

विनतीजे. कोंकणी आंबसोल वाळलेंलें पका दोन सर धावजी वगैरे जासूदासमागमें सेवेसी पाठविलें आहे. पुन्हा दुसरे जोडीसमागमें दोन सेर पाठवण्यांत येईल हे विनती.

A. R. No. 44. २ जमादिलावल ११९५ हिजरी
२६ एप्रिल १७८१

पै।। छ ७ माहे जमादिलावल सन ११९५ हिजरी रोज गुरुवार दोन प्रहर दिवस आल्यावर डाकेवर मये सुलतानखा नूर रहमानखां दारोगे हरकारे.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ता। छ २ माहे जमादिलावल मु।। लष्कर दरजागा मौजे पुनालेनजीक चिचवड स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणोन स्वानंद लेखन आज्ञा करीत असिले पा।. विशष. येथील व (र्त) मान छ २८ माहे रबिलाखर रोज सोमवार प्राथःकाली विनंतीपत्र व हजूरात अर्जी व अखबार सरकारचे डाकेसमागमे रवाना केले. विनंतीपत्र पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनतर येथील वर्तमान इग्रज चौक्यावर होते. हरीपंत व होलकर वगैरे भोवताले होते. लडाई शुरू आहे. हे वर्तमान अक्षरशा लेखन केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. राजश्री हरीपतानी नानास पत्र लिहिले होते. इग्रज चौक्यावर आहेत. भोवताल्या आमच्या फौजा आहेत. त्यासी व आम्हासी लडाई निकडेची होत असती. श्रीमताचे पुन्यप्रतापेकरून त्याचे पारपत्य होईल. चिंता नाही म्हणौन लिहिले होते. त्याजवरून कारभारी बहुत संतोश जाले. दरबार वगैरे जाला होता. दोन घटका माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. शृत होय. छ २९ माहे रबिलाखर रोज मगलवार. करनल गाडर इग्रज चौक्यावर होता. तेथून पनवेलीस जाणार. पनवेलीस गेला म्हनजे मग याचा येत्न नाही. पनवेलीजवल कोसी आत कोसी समुद्राची खाडी आहे व काही थोडी बहुत झाडीही आहे. चौक्यापासून पनवेली साहा सात कोस आहे. पुढे कल्यानी दहा बारा कोस आहे. व बेलापूर आठ नव कोस आहे. चौक्यापासून पनवेलीपावेतो मैदान आहे. इग्रजानी चौक्याहून

दो ती कोसाचे कूच केले. पुढे पनवेलीस जातो म्हणौन हरीपंत व होलकर वगैरे यानी बहुत निकड करून लडाई केली. मागून व पुढून व बाजूस लडाईचा डौल घातला. इग्रजास अवलून तेथे उभे केले. व इग्रजही तेथेच उभे राहिले. लडाई निकड करून मातबर केली. हरीपंत व होलकर वगैरे याजकडील पाचच्यारसे मणुश ठार व जखमी मिलून जाले. दोनतीनसे मणुश तो ठारच जाले. दोनतीनसे घोडी जाया जाली. इग्रजाकडीलही तीनच्यारसे मणुश ठार जाले. येक लाहान तोफ इग्रजाची यानी आनिली. हरीपंत वगैरे याचे लोकानी भाल्याने इग्रजाचे लोक हानिले. येथ परीयेत पोहचले होते. याप्रमाणे मातबर लडाई होऊन उभयेपक्षी मानसे फार जाया जाली. इग्रज दोन कोस कूच करून गेले होते तेथेच मुकाम करून राहिला. हरीपंत वगैरे यानी त्याचे अलीकडे दो ती कोसावर मुकाम करून राहिले. पुढे इग्रज जुरत करून पनवेलीस जाणार व लडाई वगैरे मातबर जाली यैसे वर्तमान येथे सध्याकाली कारभाऱ्यास आले. शृत होय. इग्रजासी व हरीपत व होलकर वगैरे यासी लडाई मातबर जाली व लडाई शुरू आहे. इग्रजाभोवते याच्या फौजा आहे व इग्रजही काही येक जेर आहे. परतु इग्रज साभालून पनवेलीस जाणार. इग्रज पनवेलीस गेला म्हनजे तो साभालून गेला यैसे आहे. शृत होये. छ ३० माहे रबिलाखर रोज बुधवार इग्रज आपले सर्व सरजामानसी पनवेलीस गेला यैसे वर्तमान आले. हरीपंत व होलकर वगैरे यानी बहुत निकड करून लडाया केल्या की इग्रजास पनवेलीस पोहोचू न द्यावे, सिकस्त करावा. याअर्थी लडाया बहुत निकटीच्या केल्या. मणुश वगैरे घोडी फार जाया जाली. सेवटी इग्रज आपले मजबूतीने पनवेलीस पोहचला. याचे मुद्याप्रमाणे हासिल न जाले. इग्रज पनवेलीस पोचला. तेथे मुकाम करून आहे. पुढे तो कल्यानीकडे अथवा बेलापुराकडे जाणार. हरीपंत वगैरे सर्वत्र येकत्र होऊन इग्रजाचे अलीकडे तीन च्यार कोसी मुकाम करून आहेत. पुढे पनवेलीजवल जाऊन लडाई करावी तो अर्थ न राहिला. इग्रज

पनवेलीस गेला तेव्हा याचे हातचा गेला. पुढे इग्रज कल्यानीकडे अथवा बेलापुराकडे जाणार. त्यास रा। हरीपंत वगैरेही काही येक दिवस तेथे मुकाम करून माघारे येतील यैसे आहे. ज्या अर्थी इग्रज निघून गेला मग हे कशास राहातील ? मग काही येक दिवस तेथेच राहातात किवा माघारे फिरतात किवा दूरदुरून आनिक येखादी लडाई करितात हे वर्तमान आलिया लेखन केले जाईल. मुख्य प्रकार इग्रज निघून पनवेलीस गेला. शृत होये. छ १ माहे मा।र रोज गुरुवार ग्वालेरचा किला जाटाचे विद्यमाने फितुर करून सिद्यानी घेतला हे वर्तमान येक दोन विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून शृत जाले असेल. तिकडील इग्रज ग्वालेरीकडे जात होते. ग्वालेरचा किला इग्रजापासून फितुराने गेला यैसे वर्तमान आहे. दुसरे वर्तमान आहे की इग्रजानी सिद्यावर छापा घातला. दोन च्यारसे मणुश जाया जाले. उपरातिक सिदे आपले फौजेनसी कायेम होऊन सावध जाले. त्याचा छापा मारून काहाडला. प्रस्तुत इग्रजासी व सिद्यासी लडाई शुरू आहे यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. हैदर नायेकासी व इग्रजासी लडाई होते यैसे वर्तमान आहे. नाईक मा।र याजकडील वकील दरबारास आले होते. नाईक मा।र यास पत्रे लिहिणार. शृत होये. इग्रज पनवेलीस गेला. तेथे पोहचला. रा। हरीपंत वगैरे तीन-च्यार कोस अलीकडे मुकाम करून आहेत. माघारे येतात किवा काही येक दिवस मुकाम करून राहातात हे वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. काल बुधवारी येथे प्रज्यन्य फार पडला. गारा विशेष पडल्या. काली जमीनीत मुकाम आहे म्हणोन मागे पुढे कोस आत कोस माल जमीन पाहून कूच करून राहानार. कूच जाल्यावर लेखन केले जाईल. शृत होये. छ १९ माहे रा।।लाखर आज्ञापत्र सादर केले ते छ १ माहे मा।।री सेवकास पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव साप्रदायाप्र आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ति.

A. R. No. 45. ६ जमादिलावल ११९५ हिजरी
३० एप्रिल १७८१

पुरवनी २

राजश्री परशरामपताचे कूच दोन दीड कोसाचे जाले. परशरामपंत सडे मात्र आज तलावर होते. वर्जवार म्हणौन सोमवारी श्रीमताची व परशरामपताची भेट पुरदराखाले होनार. उपरातिक परशरामपंत कूच दर कूच मिरजेस जाणार. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. विदित होये. छ ३० माहे रा।खरचे आज्ञापत्र व छ २७ रा।वल परियेत ज्यवाबी इनायेतनामा सादर करून रा। हैबतराव याचे तैनाती जोडीसमागमे पाठविला, तो छ १५ माहे मा।री पावला. इनायेतनामा व आज्ञापत्र पावले. बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे इनायेतनामे व आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ आहे. सर्व प्रकारे सेवकास त्राते स्वामीचे चरन आहेत. बहुत काये लि (हिणे). कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ति.

A. R. No. 46. १६ जमादिलावल ११९५ हिजरी
१० मे १७८१

श्रीनिवास

पोष्य हयबतराव गोपाळ सां। नमस्कार विनतीजे. येथील वर्तमान त।। छ १६ माहे जमादिलावल वैशाख वद्य चतुर्थी शुक्रवारपर्यंत मो। लश्कर नजीकचिंचवड स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वी छ १५ माहे मा।रीं डांकेवर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र पाठविलें ते दारागे हरकारें यांचे विद्यमानें प्रविष्ट होऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल.

सांप्रत छ म।।रपर्यंत अखबार लिहून सांप्रदायाप्रमाणें पत्रें डांकेवर पाठविली आहेत. सविस्तारें पत्रावलोकनी ध्यानास येईल. कृपापत्रें दोन येक छ ३० माहे रबिलाखरचें व येक छ २ माहे म।।रचे सेवकाचे तैनाती जासूदासमागमें पाठविली, ते छ १५ रोजी व छ १६ रोजी यथाक्रमेंकडून पाऊन बहुत संतोष जाहला. हुजूरीहून इनायतनामा सादर जाहला तो पाऊन सरफराजी जाहली. जासूदांचे विषईं मीं अर्जी लिहिली होती, त्याचा दरजवाब इनायतनामा सादर जाहला नांहीं. याकरितां हुजूर अर्ज करून इनायतनामा पाठविला पाहिजे. व इनायतनाम्याप्रमाणें वर्तणूक करावी. हा सांप्रदाय सेवकाचा व स्वामीसमान आप्त मुरबी यांची नीती याचप्रमाणें, यास्तव विनती लिहिली असे. मौजे रेलेस पटी न घेण्याविषईंची याद मखलसी होऊन सिध जाहली. याउपरि पत्र लिहून राजश्री भगवंतरावजीकडें पाठऊन देतों. बहुत काय लिहिणें. भोसल्याची फौज बंगाले प्रांताहून माघारा आली. याकरितां कारभाऱ्यांचे चिंतात वैषम्यतेचा भाव दिसतो हे विनती.

श्रीनिवास

अखबार लश्कर पंतप्रधान अज इ।। छ १५ माहे जमादिलावल लगायत छ १६ माहे म।।र सन ११९५ हिजरी, रोज शुक्रवार. करनेल गाडर मौजे पनवेलीनजीक व हरीपंत व तुकोजी होळकर मौजे खालापुरानजीक आहेत. माधवराव रामचंद्र व बाजी गोविंद यांस सुरत प्रांती जावयाकरितां रुखसत करून उपरांतिक पंत म।।रनिले बोंरघांटावर येणार. व परशराम रामचंद्र मिरजकर येका दों दिवसा कूच करून मिरजेकडें जाणार. या वितरिक्त कितेक वर्तमान लिहून छ १५ माहे जमादिलावलीं प्रातःकालीं अखबार हुजूर पाठविली. त्याजवरून वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्यानंतर यैकिलें व जाहलें वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिले असे. परशरामपंत मिरज-कराचे विद्यमानें सवारांची निगाहदास्त बाळाजीपंतानीं करविली होती. त्याचे तलबाचे रुपये पंत म।।रनिले आदा करीत नांहींत,

म्हणून परशराम रामचंद्र आजुर्दा व छ १४ रोज बुधवारीं फडनवीस म।।र परशरामपंताचे डेऱ्यास गेले होते. व समजाविश अकसर केली म्हणून पूर्वी लिहिलेंच होतें. त्यास छ म।।रीं बाळाजीपंत म।।रनिलेचेथं गेले ते दिवसीं सवारांचे तलबेंपैकीं येक लाख रुपये नख्त म।।रनिलेस देऊन समजाविश केंली. त्यानंतर बाळाजीपंत आपल्या डेंऱ्यास आले. छ १६ रोजी परशराम रामचंद्र व रघुनाथराव नीळकंठ व हरिहरराव पुरुषोंत्तम मिरजकर, फडनवीसाचे सूचनें-प्रमाणें भोजनास फडनवीसाचे डेंऱ्यास आले. भोजनोतर बाळाजी-पंतानीं त्रिवर्ग म।।र व या वितरिक्त कारकून वगैरें मिलून पंचवीस आसामियांस पैठणी, वस्त्रें, सेला, पागोटं व म।।रनिलेस बऱ्हानपुरी व जैनाबादी सेलें पागोटी व महमूदी थानें व किमखाब, दर आसामीस च्यार पारचें या प्रों बारा पारचें देऊन सर्वत्रांस रुखसत केलें. व अस्तमानपर्यंत परशरामपंत व बाळाजीपंत खिलवत करीत बसलें होते. अस्तमानीं पंत म।।रनिले आपल्या डेंऱ्यास गेले. सुरापुराकडें परशराम रामचंद्र यांनीं जांवें म्हणून फडनवीसाचे मानस होतं, परंतु परशरामपंतानी कबूल केले नांहीं. याजकरितां सुरापुराकडें जाणें म।।रनिलेचें सध्यां मवकूफ जाहलें. पुरंधरीं श्रीमंत पंतप्रधानांची भेटी घेऊन श्रीपंढरपुरास जाऊन देवदर्शन करून मिरजकडें जाणार या प्रो निश्चय ठरला. व छ १६ माहे म।।र रोज शुक्रवारीं हरिहर-राव पुरुषोंत्तम फौजेसुधां कूच करून मौजे खडकीसमीप पुण्याचे रुखें गेले. परशरामपंत व रघुनाथराव जरीदा छ म।।रीं राहून फडन-वीसाकडे कांहीं बोलावयाकरितां त्रितीय प्रहरीं आलें. प्रहर रात्रपर्यंत फडनवीसासीं खिलवत जाहलें. उदईक छ १७ रोज मंदवारीं उभयतां म।।रनिले स्वार होऊन जाणार. व पुरंदरीं पंतप्रधानाची भेटी घेऊन पंढरपूरचे मार्गें मिरजकडे जातील म्हणून यैकिलें.

माधवराव रामचंद्र व बाजी गोविंद यांजसमागमें पांच साहा हजार फौज देऊन छ १४ माहे म।।रीं हरीपंत फडके यांणी उभयतां म।।रनिले रुखसत केले. वसई तालुकियांत जावयाकरितां कूच करून गेले म्हणून यैकिलें.

हरीपंत व तुकोजी होळकर घांटाखालें मौजे खोपवली व खालापुराचे दरमियान फौजसुधा आहेत. उभयेता म।।रनिले सत्वरच घाटावर येणार. व तुकोजी होळकर तळेंगांवासमीप छावणी करून राहणार म्हणून यैकिलें.

पुरंधरची हवा प्रकृतीस रास्त नांहीं म्हणून पंतप्रधानाचें मानस कीं पुण्यास यावें, व येविषईं बाळाजीपंतास बहुतवार सांगून पाठविलें. त्याजवरून पंत म।।रनिलेंनीं इंगरजाचा गलबा दूर जाहला म्हणून पंतप्रधानास पुण्यास आणावयाचा निश्चय केला. छ ३ माहे जमादिलाखरीं व छ १९ माहे जमादिलावलीं दोन मुहूर्तें नेमलीं आहेंत. प्रायाह छ १९ माहे म।।रींच पंतप्रधान पुण्यास येणार. छ म।।रीं न आले तर छ ३ माहे जमादिलाखरी येणार म्हणून यैकिलें.

श्रीनिवास २

पु।। अखबार छ १६ माहे जमादिलावल सन ११९५ हिजरी. गोविंदराव गाइकवाड बाळाजीपंताचे लश्करास आले म्हणून पूर्वीं लिहिले होतें. छ १६ माहे म।।र रोज शुक्रवारीं गाइकवाड म।।राचे दरखास्तीप्रमाणें बाळाजीपंत वगैरें पंतप्रधानाचे मुतसदी व कारपरदाज वगैरे आसाम्या पनासपर्यंत गाइकवाडाचे डेऱ्यास मामुली कायद्याप्रों गेले. दर आसामीस पारचे दोन पैठणीं व जालनापुरी सेले पागोटीं बमय फडनवीस यांस दिल्हीं. त्यानंतर गुलाब व अतर पानदान देऊन गाइकवाड म।।रानीं फडनवीस वगैरे मंडलीस रुखसत केले.

करनेल गाडर जंगी सरंजामानसी अद्यापी पनवेलीनजीक मुकामात करून आहे. बलके छावणीहीं मौजे म।।रींच करणार म्हणून यैकिलें. खंडेराव भोंसले मुधोजी भोंसल्याचे पुत्र, कटक प्रांतास बंगाल्याचे रुखें गेले होते, ते माघारा नागपूरचे रुखें फिरले म्हणून खारिज यैकिल्याप्रो पेशजी लिहिलें होते. सांप्रत पंतप्रधानाच्या वकीलाचीं पत्रें कारभारीयांस आलीं. त्यांत म।।र लिहिला आहे कीं, खंडोजी भोंसल्याचे हमराही फौजेतील घोडीं फार सक्त जाहलीं, व कांहीं हाल लोकांत राहिला नांहीं म्हणून खंडेराव म।।र माघारा फिरलें. सत्वरच

नागपुरास येणार म्हणून वर्तमान यैकिलें. चंदी चंदावराकडें हैदर नाईकाची फौज कांही गेली होती, त्यांणी चंदीचा किला फितुरानें घेतला म्हणून येथे वदंता आहे.

छ १६ रोज शुक्रवारी दोन प्रहर रात्रीनंतर परशरामपंत व रघुनाथराव बाळाजीपंताचा निरोंप घेऊन स्वार होऊन मौजे खडकीचे मुकामास गेले. तेथून पुरंधरास जाणार. श्रुत होये हे विनती.

A. R. No. 47. १७ जमादिलावल ११९५ हिजरी

११ मे १७८१

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल त।। छ १७ माहे जमादिलावल मु।। पुनालेनजीक चिंचवड स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणोन स्वानंद लेखन आज्ञा करीत असिले पा।। विशेष. यथील वर्तमान छ १५ माहे म।।र रोज गुरुवारी प्रातःकाली विनंतीपत्र डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत होईल. तदनतर येथील वर्तमान राजश्री परशराम रामचद्र व रघुनाथराव व हरिहरराव वगैरे दाहावीस आसामी नानाचे येथे डेऱ्यास भोज्यनास आले होते. रघुनाथराव व हरिहरराव वगैरे यानी भोज्यने केली. राजश्री परशरामपंत यानी भोज्यन केले नाही. कारन की त्याची मातोश्री शात जाली आहे म्हणोन वर्षभर कोठे भोज्यनास जात नाहीत. म्हणोन परशरामपतानी भोज्यन केले नाही. वरकडानी भोज्यने वगैरे केली. परशरामपंत वगैरे आदिकरून दाहा वीस असाम्यास वस्त्रे दिल्ही. याप्रमाणे समारंभ होऊन उपरातिक परशरामपताचा व नानाचा खिलवत जाला. खिलवत जाल्यावर रा।। दौलतराव घोरफडे, मुरारराव घोरफडचाचे बधु हे परशरामपताचे समागमे आहेत, हे नानाचे भेटीस आले होते. नानाची व घोरफडे

म।।र याची भेट जाली. दोन घटका बसले होते. उपरातिक घोरफडे म।।र उठून गेले. परशरामपंत सध्याकालपावेतो नानाचे डेऱ्यास होते. उपरातिक ते आपले डेऱ्यास गेले. उदईक परशरामपताचे कूच होनार. वर्तमान होते की परशरामपंत कूच करून सुरापुरचे रुखास जानार. उपरातिक मिरजेकडे जाणार यैसे होते. प्रस्तुत वर्तमान आहे परशरामपंत सुरापुराकडे न जाता पढ़रपुराकडून मिरजेस जाणार. मग काये निश्चये होऊन कोन्हीकडे जातील हे लेखन केले जाईल. बहुत करून मिरजेस जातील यैसे असे. शृत होये. इग्रज तो पनवेलीस आहेत. राजश्री हरीपंत वगैरे अलीकडे दाहा कोसाचे अतराने आहेत. हरीपत वगैरे घाट चहडून वरते येणार. वरते आलियावर घाटाचा बदोबस्त करून हरीपत व नाना येकत्र जालिया पुन्यास जावे यैसां निश्चये आहे, व श्रीमंतही पुन्यास येणार याप्रमाणे निश्चयात आहे. त्यास नानासी व परशरामपतासी खिलवत जाला. खिलवताचा भाव यैकिन्यात आला की इग्रजाचे पारपत्य न होता तो पनवेलीस आहे. अद्याप कोन्हीकडे जात नाही. तस्मात तेथे छावनी करितो, कदाचित त्याने तेथे छावनी केल्यास घट दाहा पधरा कोस आहे. यैसे असता शह सोडून पुन्यास जावे. कदाचित त्याने चाल करून घाट घेतला तेथे पाच च्यार पलटने ठेऊन खाले त्याने छावनी केल्यास पेच भारी पडल. याअर्थी हरीपताने घाटाखाले छावनी करावी. व आम्ही जेथे आहे तेथेच छावनी करून राहू. यैसी भवति न भवति परशरामपतासी होऊन हरीपतास व होलकरास नानानी पत्रे लिहिली की, ज्याअर्थी इग्रजाचे पारपत्य न होता तो पनवेलीस आहे, त्यास तुम्ही घाट न चहडता खाले घाटाजवल छावनी करावी. आम्ही मुकाम म।।रींच छावनी करू. यैसे पत्रे लिहिली कारन की इग्रजास शह पडावा. यैसी पत्रे यानी हरीपतास लिहिली. परतु घाटाखाले हरीपंत छावनी करितात यैसे नाही. फौजेचा गवगवा, अन छावनीही घाटावर अथवा खाले हरीपंत करितात यैसे नाही. परतु वदता यैसी यानी घातली आहे की इग्रजास शह पडावा. राजश्री बाजीपताची रवानगी सुरतअठाविशीकडे करावयाचा निश्चये

जाला आहे. त्याची रवानगी जालियावर हरीपंत घाट चहडून वरते येणार. जेष्ट सुद ५ पचमीस नाना हरीपतासहित पुन्यास दाखल होनार यैसे आहे. मग काये निश्चये होईल हे लेखन केले जाईल. शृत होये. श्रीमत माहे म।।री छ १९ वीस पुन्यास दाखल होनार यैसे आहे. शृत होये. छ १६ माहे म।।र रोज शुकरवार राजश्री परशरामपंत फौजेसहित कूच करून वानोडीस गेले. उदईक पुरदरास जाणार. पुरदरास जाऊन श्रीमताची भेट घेऊन पुढे कूच दरकूच परशरामपंत मिरजेस जातात. दोन हजार फौज परशरामपताची येथे राहनार. राजश्री नाना फडनीस वगैरे दाहावीस असाम्यासहित गोविदराव गायेकवाडाचे डेऱ्यास बहुमानास गेले होते. गायेकवाड म।।र यानी नानास वगैरे मडलीस वस्त्रे दिल्ही. उपरातिक नाना आपले डेऱ्यास आले. शृत होये. राजश्री बाजीपंताची रवानगी चिंचनी तारापुराकडे गुजरातचे लत्यास केल्यानतर हरीपंत घाट चहडून वरते येणार यैसे वर्तमान आहे. शृत होये.

श्री

छ २ माहे जमादिलावलचे आज्ञापत्र राजश्री हैबतराव याचे तैनाती जोडीसमागमे पाठविले ते छ १६ माहे म।।री पावले. पावोन सतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. रो परसरामपंत याचे फौवजचे कूच होऊण आज गेली, ते सडे नानाचे डेऱ्यास आलेत. खिलबत होऊण मुकामास जातील.

A. R. No. 48. २० जमादिलावल ११९५ हिजरी
१४ मे १७८१

पै।। छ २७ जमादिलावल सन ११९५ हिजरी रोज मंगलवार अस्तमान सरकारच्या डाकेबराबर आले, म।। दारोगे हरकारे.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां॥ नमस्कार विनतीजे. येथील वर्तमान त॥ छ २० माहे जमादिलावल वैशाख वद्य अष्टमी भौम्यवासर पर्यंत मु॥ लष्करनजीक चिंचवड, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केलीं पाहिजे. विशेष. पूर्वी छ १६ माहे म॥र पर्यंत अखबार लिहून छ १७ माहे म॥रीं हुजूर अखबार रवाना केलीं त्याजवरून वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत छ म॥रपर्यंत अखबार लिहून सांप्रदायाप्रमाणें अर्जी व अखबार हुजूर व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र डांकेवर दारोगे हरकारें यांजकडें पाठविलें असें. म॥र-निले प्रविष्ट करतील. हुजूरीहून डांक बसवण्याविषईं दारोग्यास आज्ञा जाहली व सेवकास इनायतनामा आला. त्यांत इरशाद होता कीं सत्वर वर्तमान कळत जांवें. याकरितां डांक बसविली आहे. डांकेवर अखबार पाठवीत जाणें. सेवकाचे निगाहदास्ती व तैनाती जासूद डांकेवर बसवणें म्हणोन आज्ञा नांहीं व दारोग्यानी लिहिलें की डांकेस उणे कमती जासूद जाहलियां साहा सात जोडया देणें. त्यास काम सरकारचें व इकडील उपयोगी व पत्राचा सिलसिला याच संमधीचा या अर्थी व हुजूर विचारून परवानगी दारोग्यानीं घेतली म्हणोन लिहिलें किवा कोणे प्रकारें म्हणोन संशय आणिला. परंतु जोडया साहा डांकेवर बसविल्या व हुजूर अर्जी व स्वामीस पत्र लिहिलेंजे. दारोग्याचे लिहिल्यावरून जोडया डांकेवर बसविल्या आहेत. याविषईं काय आज्ञा त्यास स्वामीनीं स्पष्टन लिहिलें व हुजूरचे इरशादेप्रमाणें कांहीं आज्ञा लिहिली व माघाहून इनायतनामा पाठऊं म्हणोन आज्ञा केली. त्यास इनायतनामा सिध जाहला असेल तो डांकेवर पाठवावा. किंवा येथोन जोडी उदईक रवाना करितों त्याजसमागमें पाठऊन द्यावा. डांकेवर पाठविल्यासही माझे मते चिंता नांहीं. याउपरि जे ध्यानास यईल त्याप्रमाणें अमलांत येईल. परंतु सेवकानें अर्जी लिहिल्याचें उतर यांवें व येविषईं हुजूर अर्ज करून उतर पाठवावें. बहुत काय लिहिणें. चिरजीव रघोतमराव यांस

सेवेसी पाठवायाचा उद्योग केला आहे. निश्चय करून पुन्हा सेवेसी विनती लिहीन हे विनती.

A. R. No. 49. २० जमादिलावल ११९५ हिजरी
१४ मे १७८१

पै॥ छ २७ जमादिलावल सन ११९५ हिजरी

श्रीनिवास

अखबार लष्कर पंतप्रधान. अज इ॥ छ १७ माहे जमादिलावल लगायत छ २० माहे म॥र सन ११९५ हिजरी, मंगळवार. पंतप्रधान पुरंधरीहून छ १९ माहे जमादिलावली किंवा छ ४ माहे जमादिलाखरी पुण्यास येणार, व परशरामपंत मिरजकर छ १६ माहे म॥रीं कूच करून गेले. पुरंधरी पंतप्रधानाची भेटी घेऊन पुढे मिरजकडें जाणार. व हरीपंत व तुकोजी होळकर मौजे खोलापुरावर व करनेल गाडर पनवेलीनजीक आहे. सुरत प्रांती जावयाकरितां माधवराव रामचंद्र व बाजी गोविंद यांस छ १४ माहे म॥र रोज बुधवारीं हरीपंतानी रुखसत केले. नकल मकान करून येका कोसावर जाऊन राहिले आहेत. या वितरिक्त कितेक वर्तमान छ १६ माहे म॥रपर्यंत लिहून छ १७ रोजी अखबार हुजूर रवाना केंली त्याजवरून वर्तमान श्रुत जाहले असेल. सांप्रत यैकिलें व जाहलें वर्तमान छ २० रोजपर्यंत सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिलें असें.

परशरामपंत छ १८ रोज रविवारीं पुरंधरास गेले. छ १९ रोज सोमवारीं प्रातःकालीच पंतप्रधानांची भेटी घेऊन तेच समईं रुखसत मिरजेस जावयाकरितां घेतली. रुखसतीचे वेळेंस पंतप्रधानानीं पंत म॥रनिलेस वगैरे जेवाहर व वस्त्रें दिल्हीं.

परशराम रामचंद्र
३ जेवाहर रकम
१ सिरपेंच मुरसा
१ मोत्याची कंठी
१ चौकडा
३

५ वस्त्रे जैनाबादी
१ पागोटं
१ सेला
२ ज्यामेवार थान
१ किमखाब
५

हरिहराव पुरुषोत्तम
२ जेवाहर
१ कंठी मोत्याची
१ चौकडा
२

५ वस्त्रें बन्हानपुरी
१ पागोटं
१ सेला
२ ज्यामेवार थानें
१ किमखाब
५

रघुनाथराव नीलकंठ,
परशरामपंताचा पुतण्या
२ जेवाहर
१ कंठी मोत्याची
१ चौकडा
२

पारचे बन्हानपुरी
१ पागोटं
१ सेला
२ ज्यामेंवार थान
१ किमखाब
५

दौलतराव घोरपडे, मुन्हार-
राव घोरपडयाचा पुतण्या यास
२ जेवाहर
१ सिरपेंच
१ चौकडा
२

५ वस्त्रें पैठणी
१ पागोटं
१ सेला
१ किमखाब
२ ज्यामेवार थान
५

या प्रमाणें जेवाहर व वस्त्रें पंतप्रधानानीं परशरामपंत वगैरेंस देऊन रुखसत केले व पंत म।।रनिलें मिरजकडें कूच करून गेले

पंतप्रधानाचे मानस पुण्यास यावयाचें, व येविषईं पैहम बालाजी-पंतास पत्रें येत गेली. त्याजवरून पंतप्रधानांस पुण्यास आणावयाचा निश्चय केला म्हणून पूर्वी लिहिलें होतं त्यास बाळाजीपंताचे सूचनेप्रमाणें छ १९ माहे म।।र रोज सोमवारीं प्रातःकाली पंतप्रधान

पुरंधरीहून स्वार होऊन छ म।।री अस्तमानी पर्वतीसमीप आलें. हवेली दाखल व्हावयाचे मुहूर्त रात्रौचं होतं. याजकरितां बेवीस घटका रात्र गुजरल्यानंतर छ म।।रीं पंतप्रधान हवेली दाखल जाहलें. हवेली दाखल जाहले म्हणून खुषीच्या तोफा पंचवीस सोडल्या. जनार्दन आपाजी वगैरें हमराह होते. त्यांनी नजरा केल्या. कृष्टणराव बलाळ पुण्यांत आहेत. ते श्रीमंताचे भेटीस छ म।।रीं गेले होते.

पै।। छ २७ जमादिलावल सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास २

पु।। अखबार छ २० माहे जमादिलावल सन ११९५ हिजरी. माधव रामचंद्र व बाजी गोविंद यांनी सुरत प्रांती जाऊन हंगामा करावयाकरितां छ १४ माहे म।।र रोज बुधवारीं हरीपंतापासून रुखसत जाहलें म्हणून पेसजी लिहिलेंच आहे. त्यास पंत म।।रनिले समागमें फौज जाणार त्यांची समजाविश होत नांहीं. माघील रोजमरें बाकी राहिले आहेत ते देणे म्हणजे जाऊं. या प्रमाणें आड पडली आहे म्हणून छ १८ रोज पर्यंत म।।रनिले कूच करून गेले नांहींत. छ १९ रोजी तीन कोसाचें कूच करून गेले. परंतु लोकाची समजाविश होऊन रुपये पावज्योपर्यंत म।।रनिल पुढें जात नांहींत. हरीपंताचे पासखातरेंकरितां छ म।।रीं कूच करून अलाहिदा जाहलें आहेत.

करनेल गाडर आजपर्यंत जंगी सरंजामासहित पनवेलीनजीक होंता. सांप्रत म।।रनिलेकडील वर्तमान यैकिलें कीं करनेल म।।रानें मौजे पनवेलीनजीक खाडीचे आश्रयास दोन पलटणें ठेऊन वरकड जमीयत खुष्कीचे मार्गानें झाडून कल्याणीस पाठविली, व आपण जातीनें मुंबईस कौसलाकरितां गेला आहे. या प्रमाणें बाळाजीपंतास हरिपंतानीं लिहिलें आहे म्हणून यैकिले.

हरीपंत फडके व तुकोजी होळकर सत्वरच घांटावर येणार म्हणून पूर्वी लिहिलें होतें. त्यास गाडरानें पनवेलीहून आपली जमीयत

कल्याणीस पाठविली व पंत म।।रनिले वगैरें घांटावर आल्यास येखाद्या किल्यास इंग्रेज लागतील. शह सोडून जाणें मुनासब नांहीं म्हणून सध्या आठ च्यार दिवस बोंरघांटावर म।।रनिले येत नांहींत. व मौजे खालापुरानजीक पाण्याची किलत फार म्हणून कल्याणीचे रुखें मौजे दंहींगांवावर पंत म।।रनिले येका दों दिवसां जाणार म्हणून यैकिलें.

परशरामपंतासमागमें सात आठ हजार फौज होती. त्यास सध्या फौज ठेवावयाचें प्रयोजन नांहीं म्हणून पंत म।।रनिलेनीं लोकास निरोप दिल्हा व पुंन्हा देत आहेत. या उपरि जें वर्तमान होईल ते सेवेसी लिहिण्यांत येईल हे विनती.

A. R. No. 50. २२ जमादिलावल ११९५ हिजरी
१६ मे १७८१

श्रीनिवास

पौष्यें हयबतराय गोपाळ सां नमस्कार. विनती उपरि. यंथील वर्तमान त।। छ २२ ज।।लावलपर्यंत वास्तव्य सासवड स्वामीचे कृपेकरून क्षेम असे. विशेष. पूर्वी छ १७ माहे म।।रीं पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असल. सांप्रत छ १० माह म।।री कृपा-पत्र पाठविलें तें छ २१ रोजी पावलें. स्वामीचे आगमनाचा म।।र रो॥ जिवाजी रघुनाथ यानीं श्रीमंत बापूस लिहिला होता. ज्यांत बंद-गानआलीचा संतोष व यजमानाचे व यांचे स्नेहाची वृधी, तोच प्रकार स्वामीचे आगमनोत्तर घडावा यैसा प्रकार राजश्री कृष्टणरावजीनी योजिला आहे. इकडील वर्तमान. आनंदराव रास्ते आपले प्रांताचे बंदोबस्ताकरितां विज्यापूर प्रांती गेले आहेत. रो॥ वामनराव यानी श्रीमंतासमीप राहांवें हा कारभाऱ्यांचा मनोदय. मिरजेस जाऊन पुन्हा समयास सत्वर यांवें यास्तव निरोप घेऊन जाणार. रघुनाथरायां-कडील वर्तमान बापूचे मुखोदगत यैकिलें कीं नर्मदा उतरोन आले.

चांदवडापर्यंत आल्यानंतर सिंदे व होळकर उभयतां सरदारातून येकानीं श्रीमंत पंतप्रधान स्वामीसमीप येऊन करारमदार निश्चयांत येईल. सरदारांचे रदबदलीकरितां कांहीं अधिकउणें यैकांवें लागेल या प्र॥ बापूनी सांगितलें. लोकिक चर्चा यैकतों कीं रघुनाथरायानीं कितेक खानदेशप्रांतीचे कमाविसदारास पत्रें पाठविलीं आहेत कीं सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन यांजकडें वसूल न देणें. हाही म॥र बापूस विचारिला. उतर केलें कीं असत्य आहे. रो मोरो बाबूराव यांचे यैक्यतेंचा प्रकार हा काळ घडिला नांहीं. रो कृष्टणराव बलाळ छ म॥रपर्यंत पुण्यांत आहेत. छ २४ जमादिलावलीं येणार म्हणोन त्यांजकडील कारकून सांगत होते. आपले येण्याचे संधीत येतील. रो धोडोराम कृष्टणरावजीसमागमें आले व बापू व नानाची भेट रावजीचे विद्यमानें घेतली. रावजी पुण्यास गेले त्या समईं समागमें गेले. रघुनाथरायांकडील लक्ष ठेवीत होते म्हणोन त्याजवर शब्द आला आहे. अद्यापि रघुनाथरायांकडील फितुर तुटला नांहीं, व येथेंहीं कितेक उभयपक्षीचे आहेत. यास्तव कोणाची भेट न घेतां रावजीचाच समागम धरला आहे. मदगिरीचा किल्ला टिपूनें घेतला म्हणोन पूर्वी सशयात्मक लिहिलें होतें. सांप्रत कलमी वर्तमान आलेजे मदगिरी घेऊन चेनरायदुर्गास माहासरा केला आहे. तें स्थळ घेतल्याचप्रमाणें. तेथोन गुरमकोंड्यास जाणार. रो भेवानराव प्रतिनिधीचा प्रांत श्रीमंताचे जप्तींत होता तो भवानरायास देविला. राव म॥र निरोप घेऊन किले वगैरे माहालाचे बंदोबस्तीस जाणार. श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

A. R. No. 51. १६ जमादिलाखर ११९५ हिजरी
९ जून १७८१

२

पुरवणी दुसरी

म राहिले यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलि-

यास लेखन केले जाईल. श्रुत होये. हिंदुस्थान प्रांती सिंद्यासी व इंग्रजासी लडाई होती. प्रस्तुत वर्तमान आहे कीं इंग्रज कोल्हर-सिपरीहून सिंद्याचा शह सोडून माघारा गेले. व सिंदे फौजेसहित त्यांचे पाठीमागे लागले आहेत यैसे वर्तमान आहे. सिंद्याचे दिवाण राजश्री बाळाराव मृत्य पावले हे वर्तमान पूर्वी लेखन केले होते, त्याज-वरून ध्यानास आले असेल. मागती सिंद्याकडील वर्तमान आल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये. दरबार वगैरे जाला होता. श्रीमंत वाड्यांत घोडी वगैरे फिरवीत असतात व तीरंदाजी करीत असतात. विदित होये. छ १५ शुक्रवार वाराणसीकर राजे बलवंतसिंग याचा पुत्र याणे पूर्वी इंग्रजाचे पारपत्य करून इंग्रज मारले हे वर्तमान पूर्वी सविस्तर लेखन केले होते, त्याजवरून ध्यानास आले असेल. प्रस्तुत वर्तमान आहे कीं मागती ते इंग्रज जमले. त्यास शामील सुज्यायेतदौलाचें पुत्र जाले. इंग्रज व सुजायेतदौलाचे पुत्र येकत्र होऊन वारणसीस आले. वारणसीचे ठाणे घेतले. वाराणसीकर बलवंतसिग राना याचा पुत्र धरला यैसे वर्तमान आले आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास लेखन केले जाईल. श्रुत होये. राजश्री नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयेताचा खिलवत जाला. खिलबत होऊन नाना आपले घरास आले. खिलबतीचा भाव यैकिल्यात आला कीं राजश्री कृष्णरावजीकडील पत्रे आली होती ते वाचली. पत्राचा भाव यैकिल्यात आला कीं येजमानसाहेब तहाचे काम आपले मुद्या-प्रो करून घेणार, येविसी काये मर्जी ते लिहून पाठवावी यैसे रावजीनी कारभारीयास लिहिले होते. त्याचे उतर येथून कारभारी काय लिहितात हे पाहावे. दुसरे माहे म।।री वद्य सप्तमीस र।। नाना डेरे दाखल होणार. याअन्वये खलवत जाला यैसे यैकिल्यात आले. नाना डेरे दाखल जालियास लेखन केले जाईल. श्रुत होये. छ १६ शनवार. राजश्री बाजीपंत अणा माहे म।।री छ १८ स बाहेर निघून डेरे दाखल होणार यैसे वदंता आहे. डेरे दाखल जाल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये . राजश्री गोविंदराव गायेकवाड याची उभारणी करितात . त्यांजवल हजार दीड हजार स्वार जमा

जाले आहेत. परंतु लोकास द्यावयास पैसा नांहीं हे पूर्वी विनंतीपत्री ता।वार लेखन केले होते, त्याजवरून श्रुत जाले असेल. वर्तमान आहे कीं गायेकवाड म।।र येथे येणार यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान जे ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शुत होये. छ ८ माहे म।।रचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर केले ते छ १६ माहे म।।री पावले. पावोन सतोश जाला. सदैव याच प्रकारे आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. बहुत काय लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ति.

A. R. No. 52. २२ जमादिलाखर ११९५ हिजरी
१५ जून १७८१

पै।। छ १ माहे रजेब सन ११९५ हिजरी, रविवार दीढ प्रहर दिवस मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरि . येथील वर्तमान ता।। छ २२ ज।।लाखर शुक्रवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून, स्वकीय कुशळ लेखनाज्ञा करावी (वि)शेष. पूर्वी छ १८ माहे म।।रीं हुजूरी अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें दारोगा हरकारे यांचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रत छ २२ माहे म।।रपर्यंत वर्तमान लिहून पत्र पाठविलें आहे तें सेवेसी पावेल. मोइनुदौला बाहादरानीं चौथाईचे तहाविषईं हुजूरचे आज्ञेप्रमाणें कृष्टणरावजीस व नानास पत्र पाठविलें आहे. त्याचें उतर अद्यापी गेलें नांहीं. प्रत्योतर इकडून रवाना होईल, त्याप्रमाणें हुजूर व सेवेसी खासगत जोडीसमागमें लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणें हे विनती.

पा॥ छ १ माहे रजेब सन ११९५ हिजरी, रविवार, दीढ प्रहर दिवस मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इ॥ छ १८ जा॥लाखर लगायत छ २२ माहे मा॥र सन ११९५ हिजरी, रोज शुक्रवार. तुकोजी होळकराकडें चौथ व सरदेशमुखीचे मख्त्या बाा रुपये बाकी होते, त्यापैकीं निमे पंतप्रधानांचे कारभाऱ्यानी होळकरास माफ केले. व निमे तवकूफ ठेविले. हुजराती फौजेस दरमाह रोजमरे मोकरर केले त्यापैकीं बाकी राहिले रोजमऱ्याचे यैवजीं कोण्हास दोन कोण्हास तीन येणें-प्रमाणें रोजमऱ्याचे रुपये देऊन रुखसत केलें. घोरपडे व पाटणकर वगैरे यांस रुखसत जाहली नांहीं. तळेगांव व बोरघांटावर फौज पाठवावयाची तजवीज येथील कारपरदाजांची आहे. परंतु फौजेची नेमणूक व रवानगी अद्यापी जाहली नांहीं . करनल गाडर मुंबईस हवेलींत उतरला आहे. परंतु मुबईकर जनरालाची व गाडराची भेट जाहली नांहीं. याकरितां लोकानीं कयासी वर्तमान उठविलें आहे कीं गाडरास जखम लागली व पनवेलीहून मुंबईस गेल्यानंतर मेला असेल. या वितरिक्त अवांतर वर्तमान लिहून पूर्वी हुजूर व स्वामीचे सेवेसी छ मा॥रीं पत्रें डांकेवर पाठविलीं तें पाऊन सेवेसी वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान दफेवार लिहिलें असे. मालोजी व शंकराजी घोरपडे व आपाजीराव पाटणकर वगैरे यांस रुखसत अद्यापी जाहली नांहीं. तलबेचे रुपये कराराप्रमाणें माहबमाही रोजमऱ्यापैकीं बाकी राहिला यैवज नख्त द्यावा व बाकीचे रुपये आखरसाल द्यावे याप्रमाणें निश्चय जाहला. घोरपडे वगैरेनी हमराही लोकांस रुखसत करून जरीदे पुण्यांत राहिले आहेत.

तळेगांव व बोरघांटावर फौज अद्यापी रवाना जाहली नांहीं. मुंबईकडून इंगरेजांची कांही हरकत दिसत नांहीं याकरितां येथील कारभारी इंगरेजांविषईं प्रस्तुत सुस्त आहेत.

करनेल गाडराची तहकीक खबर कळावी याकरितां येथोन कार-भाऱ्याचे तरफेनें कोण्हीं खिदमतगार व हरकारे खुफिया मुंबईस गेले होते, ते परतोन आले. त्यांचे जुबानी गाडर गोसेनिसीन होऊन बसला आहे. बाहेर निघत नांहीं. आपली मसलहत सेवटास गेली नांहीं व सिकस्त जाहली याची पशेमानीं व शरमिंदगी गाडरास फार जाहली आहे. लोकानीं कयास मेला म्हणून केला, तेंही वर्तमान लोकांचे जुबानी यैकिल्यांत येतें, परंतु गाडर मेला या वर्तमानाचा निश्चय येथील कारभारी करीत नांहींत.

गाडराचे हमराही जमीयतेपैकीं दोन पलटणें समुद्राहून तरीचे मार्गानें मुंबईहून जाहाजांत बसून चिनापटणास रवाना जाहलीं होतीं. तें त्यापैकीं दोन जाहजांतील जमीयत तुफानाचे गर्दीकरितां समुद्रांत बुडालीं म्हणून गोवे बंदरीहून बातनी आली म्हणून वर्तमान कारपरदाजांचें जुबानीं यैकिलें व गोवेकर वकीलानेंही सांगितलें.

भगवंतराव निंबाळकर सोळापुरीं आहे. व त्याचें दरख्वास्ती-प्रमाणें येथील कारपरदाजांची पत्रें पुण्यास येण्याविषईं गेलीं आहेंत. हें वर्तमान पूर्वी रबिलाखरचे महन्यांत लिहिलें होतें. सांप्रत भगवंतराव निंबाळकर शंभर स्वारानसीं छ २० माहें म।।रीं पुण्यास वानवडीसमीप येऊन उतरला.

पै।। छ १ माहे रजेब सन ११९५ हिजरी, रविवार.

२

पुरवणी अखबार छ २२ ज।।लाखर सन ११९५ हिजरी. छ २१ माहे म।।रीं हरीपंत व कृष्टणराव बलाळ उभयतां म।।रनुलेचे भेटीस पुण्याहून पाव कोस गेले होते. भगवंतराव आपले डेऱ्याहून स्वार होऊन आला. परस्परें भेटी होऊन भगवंतराव पुन्हां आपले डेऱ्यास गेला व हरीपंत व कृष्टणराव बलाळ आपले हवेलीस आले. भगवंतराव याचा वकील कृष्टणराव बलाळ यांचे विद्यमानें नौकर राहावयाचे विषईं बोलणार. चिमापा पानसे याचा पुत्र गणपत

विश्वासराव यास मातमीची वस्त्रें व इस्तकलालीचें श्रीमंताकडून देणें होतें. मातमीची वस्त्रें कारकूनासमागमें सोनोरीस पाठविलीं, व गणपतराव यास पुण्यास आणविलें. छ २१ माहे म।।रीं पंतप्रधानानीं आपले सन्मुख च्यार पारचें खलअत व येक कंठी मोत्याची गणपतराव यास देऊन, चिमापाचें जातीची जागीर जे होती ते गणपतराव याजवर बाहाल केली. म।।रनुलेचें वय साहा वर्षाचें आहे. सांप्रत तोफखान्याचा कारभार जयवंतराव व सखाराम वगैरे पानसे करीत आहेत.

कोंकणांत बिरेवाडीं म्हणून गड जंजीऱ्याचे रुखें पंतप्रधानांचे तालुकियाचा आहे. गड म।।रासमीप जंजीऱ्याहून हबसी यांचे हजार बारासे प्यादे आले होते. येकदोन दिवस मुकाम करून राहिले. हें वर्तमान पुण्यांत कारपरदाजांस कळल्यानंतर बिरेंवाडीचे गिर्दनवाह कितेक गड किले आहेत, तेथील किलेदारांस ताकीदपत्रें लिहून पाठविलीं कीं बिरेवाडीचे कुमकेस जमीयत सत्वर पाठऊन देणें. दोन हजारपर्यंत कुमकी प्यादे गेले होते. हबसीयांची जमीयत कुमकी लोक आल्याहून पूर्वी पुन्हां माघारा जंजीऱ्यास गेली. व कोण्हेहीं मकानास त्यांचा उपद्रव लागला नांही म्हणून येथील कारपरदाजांस वर्तमान आलें.

माहदाजी सिंदे सिपलीकोल्हारसाहून पांच सात कोस पुढें व इंगरेजांची पलटणें सिंद्यापासून च्यार पांच कोसी, हररोज सिंद्याची फौज तयार होऊन इंगरेजांचे मुकाबिल्यास जात आहे. तोफाची लढाई परस्परें होत आहे म्हणून सिंद्यांचे वकीलाचे जुबानी यैकिलें. खारीज वर्तमान यैकिलें कीं कालपीस इंगरेजांचीं पलटणें आलीं आहेंत. ते ग्वालेरीस येणार व कर्नल पापड ग्वालेरीस जाणार आहे.

बाजी गोविंद व माधवराव रामचंद्र पारनेरापर्यंत गेल्याचें वर्तमान पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत यैकिलें कीं नवापुरापर्यंत जाऊन सुरत जिल्याचे माहाल ताख्तताराज केले. गणेशपंत व दुरगोजी भापकर त्याच प्रांतांत आहेत. सोनगडांत इंगरेजांची कांहीं जमीयत होती, ते बाजीपंताचे रुखावर आली म्हणून पूर्वी लिहिल होतें. सांप्रत यैकिलें कीं सोनगडीहून

दोन पलटणें सुरतेस गेलीं. बाजीपंत व माधवराव रामचंद्र यांस छावणीकरितां पुण्यास येणें म्हणून पंतप्रधानांची पत्रें गेलीं आहेंत. रजबाचे महिन्यांत येतील. दुर्गोजी भापकरहीं माघारा येणार. गणेशपंत बहिरे कोंडाइबरीचे जिल्यांत राहतील.

हैदर नाईक चंदावर प्रांतीं आहे. सांप्रत ताजें वर्तमान नाईक मा॥राकडील विशेष अैकिलें नांहीं. याउपरि नवल विशेष होईल तें सेवेसी लिहिल्यांत येईल हे विनती.

A. R. No. 53. २७ जमादिलाखर ११९५ हिजरी
२० जून १७८१

पै॥ छ १० माहे रजेब सन ११९५ हिजरी मंगळवार. सांइंकाली मै डाक सरकार.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल ता॥ छ २७ माहे ज॥खर मु॥ क॥ पुणे स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले प॥. विशेष. यथील वर्तमान छ म॥री प्राथःकाली विनंतीपत्र सेवेसी व हजूरात अखबार व अर्जी सरकारचे डाकेसमागमे रवाना केले. विनंतीपत्र दारोगे याचे विद्यमाणे पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास येईल. यानतर प्राथःकाली डाकेसमागमे पत्रे रवाना जाली. दो प्रहरा हैबतराव यानी सागून पाठविले की जोडी रवाना होते. पत्रे काही द्यावयाची असली तर द्यावी. अखबार तो प्राथःकालीच सेवेसी डाकेसमागमे रवाना जाली, त्याजवरून सविस्तर ध्यानास येईल. काही जरूरी वर्तमान असल म्हणोन आजच हैबतरावजीनी जोडी रवाना केली. काये वर्तमान असेल ते ध्यानास येईल. शृत होये. वाड्यात श्रीमतानी मानकरी वगैरे

के. स. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

सरदार भोज्यनास आनिले होते. भोज्यने वगैरे होऊन मानकरी वगैरे सरदार आपले डेऱ्यास गेले. शृत होये. होलकर जेजुरीहून वाफगावाकडे गेले म्हणोन वर्तमान आले. शृत होये. राजश्री भगवतराव निबालकर येथे आले आहेत. त्याची व नानाची वगैरे भेट जाली. याच्या भेटी होऊन उपरातिक श्रीमताची व भगवतराव निबालकर याची भेट वाड्यात जाली. श्रीमताची भेट होऊन उपरातिक निबालकर म।।र आपले डेऱ्यास गेले. शृत होये. इग्रजाची पलटने कल्यानीवर छावनी करून आहेत. करनेल गाडर सुरतेस गेला होता. मागती तो ममईस आला यैसे वर्तमान आहे. ममईस व कल्यानीस इग्रजाचा जंगी सरजाम होतो. पुढे ते उद्वोग सत्वरच इकडे करनार, यैसे वर्तमान आहे. शृत होये. हफशानी कोकनप्राती तल्याघोसाल्याचे किल्याकडे उपद्रव माडला आहे. हपशासी व किलेवाल्यासी लडाई जाली, यैसे वर्तमान आले आहे. येथून त्याचे पारपत्यास काही गारदी वगैरे पाठविनार. शृत होये. राजश्री बाजीपंत आना सुरत प्राती होते ते कोडाईबारी चहडून वरते आले. इकडे येतात यैसे वर्तमान आले आहे. शृत होये. सिद्यासी व इग्रजासी लडाई सुरू आहे. इग्रजास कलकत्याहून काही पलटने मदत आली. इग्रज सिद्यावर गालिब आहेत, म्हणोन वर्तमान आहे. शृत होये. नाना व हरीपत याचा नित्य खिलवत होत असतो. भाव यैकिल्यात आहे की, पुढे दौलतीचा बदोबस्त येथास्थित करावा व इग्रजाचे पारपत्य करावे. या अनवये

पुरवनी २

खिलवत होत असतो. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. शृत होये. दो ती दिवसाआड सरकारचे डाकेसमागमे वरचेवर सेवेसी विनंतीपत्रे व हजुरात अर्ज्या व अखबार रवाना होतात. विनंतीपत्रे पावोन सविस्तर वर्तमान शृत होत असेल. विदित हाये. छ १० माहे म।।रचे आज्ञापत्र रा। हैबतराव याचे तैनाती जोडीसमागमे सादर जाले ते छ २३ माहे म।।री पावले.

दुसरे छ १७ माहे म।।रचे आज्ञापत्र डाकेसमागमे सादर जाले ते छ २५ माहे म।।री सेवकास पावले. पावोन बहुत सतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. बहुत काय लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ति.

पै।। छ १० माहे रजेब सन ११९५ हिजरी मंगळवार साइंकाळ मै डांक सरकार.

A. R. No. 54. २८ जमादिलाखर ११९५ हिजरी
२१ जून १७८१

पै।। छ १० माहे रजेब सन ११९५ हिजरी, मंगळवार, साइंकाळ मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साा नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान ता।। छ २८ ज।।लाखर ज्येष्ठ वद्य अमावास्या, गुरुवासरपर्यंत माो पुणें स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. छ १० व छ १७ माहे म।।रचें पत्र पाठविलें होतें त्याचें प्रत्योतर इकडील अखबारेसहित छ २६ माहे म।।रपर्यंत छ २७ रोजीं डाकेवर रवाना केलें, तें दारोगे हरकारे याचे विद्यमानें सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. येथील अखबार डांकेवर पय दर पय रवाना होत आहे व डांकेवरील पत्रें साहा साता दिवसात पावतात व जासुदांस बारा तेरा किंवा चवदा दिवस लागतात. याकरितां अखबारीं वर्तमान डांकेवरच पत्रें सेवेसी हुजूर येतांत त्यांत लिहितों.

कांही विशेष वर्तमान सांप्रत सेवेसी लिहिण्यांत येतेंजे. अजिमुदौला बहादरांस हरीबावाजी बा।। रुपये माघारा द्यावयाचा करार होऊन दोन किस्ती दुसाला ठराव जाहला. त्यापैकीं येके किस्तीच्या चिठ्या बहादर मा।।राकडें पाठविल्या. दुयम किस्तीच्या चिठयाकरितां बहादरानीं च्यार पांच पत्रें कृष्टणरावजीस कांहीं सेवकाचे विद्यमानें कांहीं आलाहिदा पाठवलीं. त्याचें उतरें कांही हीला उजर करून लिहिलीं. याचा तपसील पूर्वी पत्र पाठविलें त्यांत लिहिला होता. सांप्रत राजश्री कृष्टणराव बलाळ बारामतीहून पुण्यास आल्यानंतर, सेवकानें रावजीस सांगितलें कीं, अजिमुदौला बहादराकडील करारमदार तुमचे मारफतीनें जाहला, व चिठ्याचा जिमा तुम्हीं आपला केला असतां, सांप्रत बालाजीपंत फडनवीसांचे परवानगीचा उजर करितां वि(?)चिठ्या पाठऊन देत नांहींत. यांत तुमचे बोलण्यास दोष लागतो. ते समईं रावजीनीं उतर केलें कीं, वाजबी कामें पंतप्रधानांचे सरकारचे निसबतींची त्यास बहादर मा।।राकडून अडथळा पडला आहे. याकरितां बालाजींपंतांनी चिठ्या अटकाविल्या आहेत. सांप्रत पंतप्रधानाचे सरकारचीं कामें बहादराकडून जें होणें त्याचा जिमा आम्हीं आपला करून घेऊन, चिठ्या देण्याची परवानगी घेतों. याप्रमाणें बोलून परवानगी घेतली, व मजला सांगितलें कीं, सदासिवपंत नामे कारकून रावजीचे तरफेनें औरंगाबादेस आहेत, त्यांजसमीप चिठ्या पाठऊन देतों. ते बहादरास चिठ्या देतील. च्यार पांच कामाचे वेढे उगऊन द्यावे. याप्रमाणें बोलिले. चौथाईचे तहाचा प्रकार पूर्वी करार जाहला आहे कीं हजरत मगफरतमाब यांचे समईं अमल होता त्याप्रमाणें तह होऊन अमल ज्यारी व्हावा. त्या करारास येथील कारभारी रजावंद आहेत. परंतु हरयेक माहालांत कची रुजवात व्हावी, त्या उपरि तह व्हावा. त्यास मोरो गिरमाजी अठरा वीस महिने हुजूर राहिले, रुजवात होत नांहीं. व जमीदारांनी लिहून दिधल्याप्रमाणें अमल ज्यारी व्हावा म्हणून इरशाद हुजूरचा. तो यांस मान्य नांहीं. नवाब मोइनुदौला बहादरानीं कृष्टणरावजीस पत्र जिवाजीपंताचे विद्यमानें पाठविलें. त्यांत दोन शखला

२

पै॥ छ १० माहे रजेब सन ११९५ हिजरी.

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी. लिहिल्या होत्या. अवल जमीदारांनी जो वसूल लिहून दिधला आहे त्याप्रमाणें सध्या अमल ज्यारी करावा. व उपरांतिक रुजवात करावी. रुजवातीमुळें कमज्याद जे रुपये निघतील ते परस्परें मुजरा द्यावे. दुसरी शकल सुबे बेदर व विज्यापूर येथील चौथ सरदेशमुखीचा अमल जो चालतो त्याची तादाद करून त्यापैकीं हुजूर नियाज करावयाचा करार करून बाकीचे यैवजाची तफरीक करून घ्यावी. या प्र॥ दोन शकली लिहिल्या होत्या. रो॥ बालाजीपंत नानानी कृष्टणरावजीस याच कामाकरितां बारामतीहून बोलाऊं पाठऊन आणिलें व दोन तीन दिवस प्रत्यहीं येकांत होत होता. त्याउपरि मोइनुदौला बहादरास प्रत्योतर रावजीनी आपले तर्फेचें व नानाकडील लिहून पाठविलें. पत्राचा खुलासा कृष्टणरावजीनीं जुबानीं मजला सांगितला कीं हुजूरचे इरशादे-प्रमाणें पूर्वी कारपरदाजानी करार केला आहे कीं हजरत मगफरतमाब यांचे समई स्वराज्याचा अमल होता. त्याप्रमाणें ठराव रुजवातीनें करावा. आम्हास कबूल आहे. या करारास बालाजीपंत रजावंद आहेत. याप्रमाणें करार केला म्हणून रुजवातीस मोरो गिरमाजीस पाठविलें आहे. सांप्रत हुजूरचा इरशाद जमीदारानी लिहून दिधल्या प्र॥ अमल ज्यारी करावा. किंवा महमदाबाद व विज्यापूरचा वसूल चौथ व सरदेशमुखीचा निवडून त्यांत सोड द्यावी, हे बाबत नवीन आहे. पूर्वी जो इरशाद जाहला आहे तो मवकूफ होऊन दुसरे तऱ्हेनें इरशाद होत असल्यास याचें उतर हुजूरचे मर्जीप्रमाणें करूं. याप्रमाणें बालाजीपंत पेंचून बोलतात. याकरितां सांप्रत बालाजीपंताचे सांगित-ल्याप्रमाणें मोइनुदौलास पत्र लिहिलें आहे. हा म॥र हुजूर अर्ज करून हुजूरचा खुलासा लिहून पाठवितील. त्याप्रमाणें येथें उतर प्रत्योतर. दुसरा म॥र मोइनुदौलानीं कृष्टणरावजीचे पत्रीं बमोजिब इरशाद हुजूरचे लिहिला होता कीं खिसाऱ्याची बाबत सध्यां

मवकूफ केली. जे समईं पंतप्रधानास काम पडेल ते समईं समजोन घेऊं. याची चर्चा नानानी केली. ते रावजीचे जुबानीं सेवकानें यैकिली कीं इंगरेजासी बिगाड करावा म्हणून हुजूरीहून इरशाद होऊन नकशा जाहला. व आम्हीं हुजूरचे इरशादेप्रमाणें वर्तणूक केली. सांप्रत हुजूरांत नकशा केला तो इरशाद जाहला तो मंजूर नांहीं, व आम्हास गरज पडेल ते समईं हुजूरचे आज्ञेप्रमाणें खिसारा कबूल करावा. त्यानंतर इंगरेजांचे तंबीचा अज्म हुजूरीहून व्हावा. हा करार व शर्त रोज अवल बोलण्यांत आली नांहीं. श्रीमंत पंतप्रधानास वडील व आम्हांस पंतप्रधानांचे स्थलीं हजरत बंदगानआली आहेत याप्रमाणें बालाजीपंत बोलतात म्हणून रावजीनीं सांगितलें. याचा खुलासा चिरजीव राजश्री रघोतमराव यांजसमागमें जो निरोप मतालिबा हुजूर अर्ज करावयाचे सांगितले आहेत त्याचें उतर हुजूरीहून इरशाद होईल व कृष्टणरावजीस वर्तमान कळेल ते समईं निखालसतेनें सर्व कामाचा गुंता उरकेल. तोपर्यंत कागदपत्राचे लिहिण्यांत निखालसता होण्याचा मार्ग दिसत नांहीं. सविस्तारें वर्तमान सेवेसी व हुजूर विदित व्हावें म्हणून विनती लिहिली असे. बहुत काय लिहिणें हे विनती.

४ श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. प्रभाकरपंत नामे कोण्ही ग्रहस्त मकरंदनायका ब।। रुपयाचे हवाल्यांत व जिवाजीपंतानीं हुजूर रुपये दिल्हे असतां प्रभाकरपंत त्यास रुपयाचा फैसला करीत नांहीत. सबब जिवाजीपंतानी म।।रनुलेस तकाजा केला असतां श्रीमंत राजश्री राजे भाऊसाहबानीं प्रभाकरपंताचा पक्ष धरला व हुजूरांत रूबरू जिवाजीपंताचा. श्रीमंत राज्याजीचा कांहीं ज्वाबसाल जाहला हा म।।र जिवाजीपंतानीं रो कृष्टणरावजीस लिहिला होता. त्यावरून रावजी गोविंदरावजीनी सेवकास सांगितलें कीं पंतप्रधानांकडील वाजबी कामास उभयतां राज्याजीनीं अनकूळ होऊन हुजूर अर्जमारूज करीत जावा. जिवाजीपंत व आमचें काम

जें असेल तें उभयतांचे घरचे कामाप्रमाणें. वाजबीस तरी जिवाजी-पंताचा पक्ष धरावा. परंतु गैरवाजबी असल्यासहीं बाहयात्कारें येक पक्ष दाखवावा. घरांत समजाऊन सांगांवें कीं तुम्हीं अन्याय करितां. याप्रमाणें परस्परें स्नहाचा मार्ग असतां, राज्याजीनीं प्रभाकरपंताचा पक्ष दरबारीं धरला हें लोकांत विपरीत भासेल. याउपरि जिवाजी-पंतानी व उभयता राज्याजीनीं येकचितें असावें यांत आम्हास बहुत समाधान, म्हणून उभयतानी सांगितल्याप्रमाणें लिहिलें असे. हे विनती.

पै॥ छ १० माहे रजेब सन ११९५ हिजरी. मंगळवार साइंकाळ मै डांक सरकार.

५ श्रीनिवास

पुरवणी पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी. विनतीजे. येशवंतराव निंबाळकराचा म॥र खारिज कळला. व येथें कितेक हुजूरचे दौलतख्वाह फिदवी, त्यांचे सूचनेवरून सेवकास अवगत जाहला. त्यावरून हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्रीं व अर्जीत म॥र लिहिला आहे. व येथील कारपरदाज बालाजीपंत व कृष्टणराव बलाळ यांस हुजूरहून इनायतनामे येण्याचा मसवदा बमोजिब सलाह-दौलतख्वाह लिहून चिरजीव राजश्री रघोतमराव यांजसमीप पाठविला आहे. ते सेवेसी विनती करतील त्याप्रमाणें हुजूरीहून इनायतनामे उभयतांस व इनायतनामे उभयतांस पावते करावयाकरितां सेवकास इनायतनामा हुजूरचे डांकेवर यावा याचा आशय समग्र चिरजीव विनती करतील. त्याप्रमाणें जें मुनासिब जाणतील आपण त्याप्रमाणें हुजूर अर्ज करून इनायतनामे येण्याचा म॥र अर्ज करावा किंवा मसवदा दाखवावा. हे विनती.

पै॥ छ १० माहे रजेब सन ११९५ हिजरी. मंगळवार साइंकाळ मै डांक सरकार.

A. R. No. 55. ६ रजब ११९५ हिजरी
२८ जून १७८१

पै।। छ १४ माहे रजेब शनवार सन ११९५ हिजरी, अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ. सांग नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान त।। छ ६ रजब शुक्रवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ २ माहे म।।रीं डांकेवर पत्रें पाठविलीं तें व छ २८ ज।।लाखरीं जासूद जोडी रवाना केली, ते पत्रासहित सेवेसी पावली असेल. दारोग्याचे विद्यमानें डांकेवर पत्र पाठविलीं तें जासूदासमागमींचीं पत्रें सेवेसी व हुजूर पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रत छ ६ माहे म।।रपर्यंत इकडील प्रत्यक्ष पाहिलें व यैकिलें वर्तमान लिहून डांकेवर हुजूर व स्वामीचे सेवेसी अर्जी व अखबार व पत्र पाठविलें आहे. दारोग्याचे विद्यमानें पत्र पावेल. चौथाईचे प्रकरणाचें वर्तमान यैकिलें, व रो। कृष्टणरावजीस पुसोन माघाहून खांसगत तैनाती जोडीसमागमें लिहून पाठवितों. मानाजी फांकडे व येशवंतराव नाईक व सटवाजी भोंसले येकत्र होऊन तीन हजारपर्यंत जमीयत जमा केली. पंढरपुरासमीप आहेत. बाजीराव बरवेहीं यांत मिळनार. पंतप्रधानांचे प्रांतांत कांही हंगामा करीत नांहींत. येशवंतराव नाईकानें पूर्वी करमालें वगैरे सरकार आलीचे प्रांतांत हगामा केला व सांप्रत सरकार तालुकियांत हगामा करणार म्हणून यैकिलें. याचा तपसील पूर्वी लिहिला आहे. जे सलाह दौलत असेल त्याप्रमाणें तदबीर हुजूरीहून होईल. बहुत काय लिहिणें हे विनती.

विनतीजे. चिरजीव राजश्री रघोतमराव सेवेसी पावले असतील. त्यास पत्र लिहिले ते पावतें होईल. हे विनती.

पै॥ छ १४ माहे रजेब शनवार सन ११९५ हिजरी, अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इ॥ छ २ माहे रजब लगायत ६ माहे म॥र शुक्रवार सन ११९५ हिजरी, आषाढ मास. बिरेवाडी प्रांत कोंकण तालुका पंतप्रधान येथें हबसी व इंगरेज बइतिफाक येऊन मोरचे लाविले व लढाई शुरू जाहली. व करनल गाडराकडील पलटणें कल्याणीहून चौक्यास येणार. व बाजी गोविंद व माधवराव रामचंद्र गंगातीरास आले. सत्वर पुण्यास येतील. माहदाजी सिंदे इंगरेजांचे मुकाबिल सिपरीकालारसेसमीप व सिंद्यांची व इंगरेजांची लढाई जाहली म्हणोन खारीज वर्तमान यैकिलें. व हैदरअलीखान चंदावर प्रांतीहून पुन्हा अरकाट चिदांबरास जाणार. या वितरिक्त अवांतर यैकिलें वर्तमान लिहून हुजूर अखबार व स्वामीचे सेवेसी पत्रें डांकेवर पाठविलीं तें दारोग्याचे विद्यमानें सेवेसी व हुजूर पावलीं असतील. सांप्रत प्रत्यक्ष जाहलें व यैकिलें वर्तमान लिहिलें असे.

बाजी गोविंद व माधवराव रामचंद्र दोन हजार फौजेनसीं छ ५ माहे म॥रीं पुण्यास आले. राजश्री बाळाजीपंत व हरीपंत इस्तकबाल मुळामुठेचे पार गेले होते. परस्परें भेटी जाहल्यानंतर उभयतां म॥रनुलेस हरीपंत आपले समागमें पंतप्रधानासमीप घेऊन गेले. माधवराव व बाजीपंतानीं सांप्रदायाप्रमाणें पंतप्रधानास नजर करून भेटले. श्रीमंतानीं सर्वत्रांस विडें देऊन रुखसत केलें.

करनल गाडर व मुंबईकर जनरालांची पलटणें तीनपर्यंत पूर्वीपासून कल्याणीस आहेंत. सांप्रत वर्तमान यैकिलें कीं, पांच पलटणेंपर्यंत कल्याणीस इंगरेजांची जमीयत जमा जाहली आहे. पुढें चौक्यास येणार म्हणोन वदंता आहे. अद्यापि कल्याणीहून हरकत केली नांहीं.

बिरेवाडीचे किल्यास हबसी यानीं मोर्चे लाविले आहेत. त्यांची परस्परें अद्यापि लढाई होत आहे. बाजारी खबर बिरेवाडी हबसियानी घेतली. परंतु तहकीक खबर नांहीं. पंतप्रधानाचे कारभाऱ्यांचे सांगण्यांत बिरेवाडीस दोन तीन हजार प्यादा व जंगी सरजाम पोख्त आहे. कुमकी गाडद पुण्याहून रवाना जाहली तेही पोंहचले असतील. हबस्यास मुकाबिल लढाईंत मारून काढतील. किल्याचे आसऱ्यानें कायम व मजबूत राहावयाचें काय आश्चीर्य आहे. किंवा हबसी माघारा गेल्याचें वर्तमान सत्वरच येईल.

इंगरेज करनल पापड वगैरे पंधरा सोळा पलटणेंपर्यंत सिपरीकोलारसासमीप, व त्यांचे गिर्दनवाह माहदाजी सिंदे आहेत. सांप्रत तहकीक कलमी वर्तमान सिद्याचे लष्करीहून आलें कीं इंगरेजांचा मजहला दूर होय. जोपर्यंत सिंदे मा॥र इंगरेजांचे मुकाबिल्यावर मजबूत कायमीन राहिले, पर्जन्यकाळात व बादज दसहरा इंगरेजांचा मुकाबिला टाकून अलाहिदा होत नांहींत.

हैदरअलीखान यानीं कोण्हीं मातबर सरदार व दाहा हजार स्वार व बार दाहा हजार चंदावर प्रांती ठेऊन जातील. खान मा॥र आरकाट चिदांबरासमीप पूर्वी फौज करनल कूटाचे रुखावर ठेविली होती तिकडें गेला म्हणून वर्तमान यैकिलें.

बाजीपंताचे हमराह फौज गेली होती. त्यां लोकांस रवानगीचे समईं रोजमरे देऊन रवाना केलें होतें. सांप्रत सर्वत्रांस हरीपंतानीं सांगितलें कीं दसऱ्याकरितां पुण्यास येणें . नालबं(दी)

२

पुरवणी अखबार पुणें छ ६ रजब सन ११९५ हिजरी
व समजाविशीचे रुपयें येकादांच देऊं. बहुत करून आपले घरास गेले व बाकीचे जाणार.

गणेशपंत बहिरे पुण्यास यावयाकरितां माघारा फिरले होतें. परंतु दुर्गोजी भापकर यांजकडील पत्रें वरचेवर कारपरदाजास

येतात कीं आपल्यास खर्चास माकूल पाठवाल तरी आपण छावणीस या प्रांतीं राहूं. खर्चास न आलियां हमराही लोक उठोन जातील. ते समईं आम्हासहीं माघारा येणें प्राप्त होईल. भापकर मा।र नवमुलाजम. यांचा भरवसा पुरतेपणें नांही. याकरितां येथील कारपरदाजानीं गणेशपंतास लिहून पाठविलें कीं तुम्हीं कोंडाईबारी-समीप पूर्वीलप्रमाणें कायम राहणें. माघारा न येणें.

मानाजी फांकडे व यशवंतराव नाईक दहींगावकर येकत्र होऊन फौज जमा करणार. याचा तपसील पूर्वीं लिहिला आहे. सांप्रत वर्तमान यैकिलें कीं येशवंतराव नाईक अद्यापि दहीगांवी आहे. परंतु मा।रनुलेचे कारभारी भांबूराव व मानाजी फांकडे व सटवाजी भोंसले दोन तीन हजार पर्यंत स्वार जमा करून पंढरपुरासमीप आहेत. पंढरपुरकर सावकारांस कर्ज सूदी मागत आहेत. येकदोघा सावकारापासून दाहा हजार रुपयें कर्ज जबरदस्ती व रजावंदी ज्याप्रमाणें सावकार यैकतील त्या पधतीनें सागून रोखे लिहून देऊन रुपये घेतले व घेतात. पंतप्रधानाचे तर्फेनें प्रतिनिधीची फौज पांच सातसें स्वार मानाजी फांकडे वगैरेवर रवाना जाहलें. ते पंढरपुरीहून पांच कोस फासल्यानें उतरले आहेत. पंतप्रधानांचे हरकारे व बातनी लिहिणार मानाजी फांकडयाचे लश्करांत त्यांचे इतिल्यानें आहे. फौजेचे जमाव वरचेवर करीत आहेत. येशवंतराव नाईक दहीगांवकर मानाजी फांकडयासमीप सत्वरच जाणार, गेला असेल. परशरामपंत मिरजकराचे विद्यमानें पंतप्रधानाचे कारपरदाजासीं फांकडे वगैरेनीं यैक्यता केली. हें वर्तमान पूर्वील पत्री लिहिलें आहे. सांप्रत पंढरपूर प्रांती ताख्ततराज व लोकास उपद्रव किमपि करीत नांहींत. पंढरपुरकर सावकरास कर्ज मात्र मागतात. याउपरि त्यांचा दाइया फिसादाचा दिसतो.

बिरेवाडीचें कुमकेंस पंतप्रधानानी गाडदी रवाना केले ते आजीपर्यंत तळेगांवासमीपच आहेत म्हणून यैकिलें.

मानाजी फांकडे यांचे तंबीकरितां पंतप्रधानानीं प्रतिनिधीची फौज हजार स्वार पर्यंत रवाना केले होतें. ते व फांकडे पंढरपुरासमीप

पांच कोसाचे फासल्यानें आहेत म्हणून पंतप्रधानांचे कारभाऱ्या-समीप वर्तमान यैकिलें. प्रतिनिधीचे मुतालिक वासुदेवबाबा पुण्यांत आहेंत. त्यांचेथें बांतंनी आजी छ म।।री आलीं कीं फांकडयासीं व प्रतिनिधीचे फौजेसी लढाई जाहली. फांकडयाचा मोड होऊन फरारी जाहला. यैकिल्याप्रमाणें लिहिलें असे. पुन्हां शोध कळल्या-प्रमाणें सेवेसी सूचना लिहिण्यांत येईल. हे विनती.

पै।। छ १४ माहे रजेब शनवार सन ११९५ हिजरी, अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

A. R. No. 56.

७ रजब ११९५ हिजरी
२९ जून १७८१

श्रीशंकर

पै।। छ १४ माहे रजेब शनवार सन ११९५ हिजरी, अडीच प्रहर दिवस मै डांक सरकार.

विनंतीं विज्ञापना यैसीजे. यथील कुशल त।। छ ७ माहे रजब मु।। क।। पुणे, स्वामी कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन, स्वानद लेखनआज्ञा करीत असिले प।।. विशेष. यथील वर्तमान छ २ माहे म।।र रोज सोमवारी प्राथ:काली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले. ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर येथील वर्तमान जंजिरेवाले हपसी यानी कोकनप्राती तल्या-घोसाल्याकडे उपद्रव माडला आहे. हपशास इग्रजाचे येक दोन पलटन शामील जाले यैसे वर्तमान आहे. तल्याघोसाल्याचे किल्यासी हपशाने उपद्रव माडला आहे. किल्याचे लोकासी व हपशासी लडाई आहे. किल्याचे साहित्यास व हपशाचे पारपत्यास येथून दोन हजार गारदी रवा(ना) जाले आहेत. शृत होये. कोकनप्राती कितीक किले राहिले आहेत त्यास उपद्रव करावयास इग्रजानी प्रारंभ माडला आहे. इग्रजानी हपशास अपनात मेलऊन त्याजकडूनही उपद्रव माडविला आहे. शृत होये. राजश्री बाजीपंत अन्ना वगैरे येका दो दिवसा

पुन्यास दाखल होनार. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे काम जाले. उपरातिक राजश्री नाना व हरीपंत याचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की पुढे इग्रजाचे पारपत्याचे मसलतीविशई जाला. दुसरे, थोडेबहुत लोकास देऊन राजी ठेवावे कारन की पुढे दसऱ्याचे सधीस फौज जमा जाली पाहिजे या अनवये खिलवत जाला. शृत होये. छ ३ माहे म।।र रोज मगलवार इग्रजाची पलटने कल्यानीस आहेत. करनेल गाडर कल्यानीस व ममईस राहतो. पलटने सपूर्ण कल्यानीस आहेत. जंगी सरजाम वगैरे करितात. पुढे भाद्रपद मासीच इग्रज इकडे चाल करनार यैसी वदंता दाट आहे. दुसरे, कल्यानीही घाटाजवलून वीस पचवीस कोस आहे, याअर्थी कारभाऱ्याचे मानस आहे की श्रावन सुद पचमीस सरकारचे डेरे बाहेर करावे. कारन की दसऱ्याचे संधीस फौज जमा जाली पाहिजे. याकरिता श्रावन मासी डेरे बाहेर करावे यैसी यौज्यना करितात. शृत होये. सिद्यासी व इग्रजासी लडाई आहे. सिद्यावर इग्रजानी आनिक छापा घातला यैसे वर्तमान आहे. सिद्यावर इग्रज गालिब आहेत यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री सखारामपंत बापू याचे पायात बेडी आहे. रायेरीचे किल्यात कैदेत आहेत. त्या किल्याची हवा फार वाईट. फार दिवस त्या किल्यास मणुश राहिल्यास वाचत नाही. त्यास बापू बहुत श्रमी आहेत. पाये वगैरे सुजले, अवस्ता कठिन, यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री चिंतो विठल मासूरचे* किल्यात कैदेत आहेत. त्यानी आपले हाते आपली सेडी उपडली, संन्याशाचे रूप धरले आहे यैसे वर्तमान आहे. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. शृत होये. छ ४ रोज बुधवार फौजेचे लोकास दोन दोन रोजमुरे देऊन समाधान करून वाटे लाविताते. लोकास ताकीद करितात की दसऱ्यास सत्वर येऊन जमा व्हावें. ताकीद करावयाचे कारन की पुढे इग्रजावर स्वारीचा उद्वोग. शृत होये. होलकर वाफगावास दाखल जाले हे पूर्वीचे विनंतीपत्री लेखन केले होते. शृत जाले असेल. होलकर वाफगांवास आहेत फौजेस निरोप

* मंदोसर असावें.

दिल्हा. जवल दोन हजार स्वार आहेत. दसरा जालिया होलकरही फौज जमा करणार. शृत होये. हैदर नायेकाचे वर्तमान. नाईक म।।र यासी इग्रजासी लडाई चिनापटनाकडे आहे. प्रस्तुत इग्रजाचे शहावर फौज ठेऊन नाईक म।।र चंदावराकडे गेला, यैसे वर्तमान आहे. त्यास इग्रजाचा ज्यमा (व) भारी जाला. नाईक म।।र यासी लडाई आहे, यैसे वर्तमान आहे. दुसरे, नाईक म।।र याचा पुत्र टिपू तो काही फौज घेऊन वलदेज फिरगी आहेत त्याचे मुलकात गेला. वलदेजासी व टिपूसी लडाई आहे. वलदेजाची नागपटन म्हणौन ठिकान आहे तेथवर टिपू गेला. नागपटनास वलदेजाची कोठी होती ते टिपूने लुटली. तेथे दाहाबारा लक्ष होन साप (ड) ले व लूटही फार सापडली यैसे वर्तमान येथे आहे. त्याजवरून कारभारी म्हनत होते की हैदर नायेंकास मुल (ख) गिरी बरीच साधली. पैका फार मिळाला. व इग्रजावरही त्याचा शह बराच आहे. अन तारीफही करीत होते. यैसी भाशनें होत होती. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. शृत होये. उदईक रा। बाजीपंत वगैरे येथे पुन्यास दाखल होनार. त्यास सामोरे कारभारी कोस आत कोस जाणार. शृत होये. छ ५ रोज गुरुवार रा। बाजीपंत अना व राजश्री माधवराव रामचद्र व गगाधरराव रास्ते वगैरे पुन्यास येऊन दाखल जाले. बाजीपंत वगैरे आले म्हणौन त्यास पेशवा आत कोस नाना व हरीपंत वगैरे गेले होते. बाजीपंत वगैरेच्या भेटी जाल्या. भेटी होऊन बाजीपंत वगैरे श्रीमताचे भेटीस वाडयात आले होते. श्रीमताची भेट होऊन बाजीपंत वगैरे आपले डेऱ्यास गेले. बाजीपंत पुन्याबाहेर उतरले आहेत. येका दो दिवसा बाजीपंत मोहर्तानसी आपले वाडयात दाखल होनार. बाजीपंत वगैरे यानी सुरत अठाविसीचा मुलुक गुजरात प्रातीचा लुटून जालला. लोकानी गुरे वगैरे लूट आनली. तो प्रात वगैरे लुटून बाजीपत वगैरे येथे आले. गनेे (श) पत बेहेरे याचे शहावर दोन पलटने होती. ते बाजीपंत तिकडे गेले होते म्हणौन ते पलटने सुरतेस गेली यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री गनेशपंत बेहेरे यानी कोडाईबारीवर छावनी करावी यैसा निश्चये होता. त्यास लोकाचे देन्याचा गवगवा भारी. त्यामधे त्यास

तीन वरशे तिकडे जाली याकरिता गनेशपंतही पुन्यास येतात. तेथून कूच करून निघाले. पाचच्यार मजली आले. पुन्यास येतात यैसे वर्तमान आले. राजश्री दुर्गोजी भापकर हजार पाचसे स्वारानसी गनेशपतासमागमे होते. त्यास भापकर म।।र यास कोडाईबारीजवल ठेऊन गनेशपंत बेहेरे पुन्यास येतात. सत्वरच येणार.आलियावर लेखन केले जाईल. शृत होये. श्रीमंत राजश्री दादासाहेंब सुरतेत आहेत.आसपास वगैरे कोसी दो कोसी चौक्या इग्रजाच्या आहेत. त्याचे खर्चास इग्रजानी पचवीस हजार रुप्ये वसूलाची खेडी दिल्ही आहेत. सिवाये दोन हजार रुपये दरमाह देत असतात. यैसे वर्तमान आहे. शृत होये. तिसरे प्रहरी रा। नाना व हरीपंत व कृष्णरावजी याचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की पुढे कितीक बदोबस्ताविशई जाला. दुसरे, येज्यमानसाहेबाकडे व हैदर नायकाकडे पत्रे लिहिणार. शृत होये. छ ६ रोज शुकरवार राजश्री भगवतराव निबाळकर माढेकर हे आपले रोजगाराचे उद्वोगे व हजूरातून जागीरचा बदोबस्त करावा म्हणौन येथे आले आहेत. हे पूर्वी विस्तारे लेखन केले आहे त्याजवरून शृत जाले असेल. निबालकर म।।र चालीस पनास स्वारानसी येथे आहेत. मग काये त्याजकडील जाबसाल होईल हे ध्यानास आलिया लेखन केले जाईल. शृत होये. सिवराम नाईक नासिककर याजकडे नारो शकर याची दाहा पधरा लक्ष रुपयाची ठेव होती.तो देईना म्हणौन त्यास येथे आनिले होते. यैवज देंईना म्हणौन त्यास कैद करून किल्यास पाठविले. शृत होये. राजश्री भादूराव प्रतिनिधी व मानाजी फाकडे वगैरे यानी हजार बारासे स्वार मेलऊन मसवडाजवल खूल माजविले होते. भादूराव प्रतिनिधी यानी खूल केले म्हणौन भवानराव प्रतिनिधी याचे हजार दीड हजार स्वार त्याजवर गेले होते.पढरपुरापलीकडे दाहा बारा कोसावर भादूराव प्रतिनिधी व मानाजी फाकडे यासी व भवानराव प्रतिनिधी याची फौजे गेली होती त्यासी लडाई जाली. भवानराव प्रतिनिधीचे फौजेनी भादूराव प्रतिनिधी धरला. पाचसातसे घोडे पाडाऊ करून आनिलें. मानाजी फाकडा पलून गेला. त्याचा दिवान धरला गेला.

यैसे वर्तमान सध्याकाली सरकारात आले. मानाजी फाकडा सुरा-पुराकडे गेला. तिकडे सटोजी भोसले वगैरे यानी ज्यमाव केला आहे. त्याजकडे गेला. यैसे वर्तमान आलें. शृत होये. सोहोलतजंग बाहादूर बीडाकडे गेले यैसे वर्तमान आहे. शृत होये. राज.....

पुरवनी २

पै।। छ १४ माहे रजब शनवार सन ११९५ हिजरी, मै डांक सरकार.

श्री भगवंतराव निबालकर याजला पाचसे रुपये मेजमानी भेट जाल्यावर दिल्ही. भगवतराव याजसमागमे पनास पऊ(न)से स्वार आहेत. त्याचे खर्चाची वगैरे नेमणूक करून द्यावी यैसी रदबदली आहे. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. राजश्री बाजीपंत नानाचे घरी आले होते. नाना व हरीपंत व बाजीपंत या त्रिवर्गाचा खिलवत जाला. खिलवत होऊन हरीपंत व बाजीपंत आपले घरास गेले. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. सेवकाचे जागिरीस याजकडील सुभ्याचा व सरदार वगैरेचा उपद्रव लागतो. घासदाना वगैरे घेतात. दुसरे,खानदेशचे सुभेदार मोगलाई जागीर असता सुभेपट्टी घेतात. नानाप्रकारचा उपद्र(व). यामुले गावची वसाहत येथास्थित होत नाही ये विशई कारभाऱ्यास इनायेतनामे सादर जाले पाहिजेत. ये विशई येक दोन विनंतीपत्री विनंती लिहिली होती. त्यास विनंती मान्य करून लिहिल्याप्रमाणे सेवकाचे साहित्य जाले पाहिजे. सर्व उमेद सेवकास स्वामीचे चरनाची आहे. जे विनंती करणे ते स्वामीचे चरनासी आहे. विनंती मान्य करून कारभाऱ्यास इनायेतनामे व स्वामीचे पत्रे माझे गावखेडयाचे साहित्याविशई आले पाहिजेत. सर्वस्वे दास स्वामीचा आहे. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विनंती.

———

A. R. No. 57.

७ रजब ११९५ हिजरी
२९ जून १७८१

पै।। छ २० माहे रजेब शुक्रवार सन ११९५ हिजरी . अडीच प्रहर दिवस मै जोडी तैनाती राये हैबतरावजी

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल ता।। छ ७ माहे रजब मु।। पुणे स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानंद लेखन आज्ञा करीत असिल पा।। विशेष. येथील वर्तमान छ मा।।री प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास येईल. तदनतर यथील वर्तमान राजश्री बाजीपंत अना वगैरे सुरतअठाविसीकडे गेले होते. तो प्रात ताराज करून बाजीपत वगैरे येथे पुन्यास येऊन दाखल जाले. श्रीमताच्या कारभारी वगैरे याच्या व बाजीपंत वगैरे याच्या भेटी जाल्या. शृत होये. इग्रज कल्यानीवर छावनी करून आहेत. पलटने सपूर्ण कल्यानीस आहेत. करनेल गाडर ममईस जातो. पुन्हा कल्यानीस येतो. कल्यानीस सरजाम वगैरे होतो. भाद्रपद मासीच ते इकडे उद्वोग करणार यैसी वंदता आह. याअर्थी कारभारीही श्रावन मासी सरकारचे डेरे बाहेर करविणार. कारन की दसऱ्याचे सधीस फौज जमा जाली पाहिजे म्हणोन श्रावन मासी डेरे बाहेर करावें यैसी यौज्यना करितात. शृत होये. राजश्री भादूराव प्रतिनिधी व मानाजी फाकडे वगैरे यानी हजार बारासे स्वार मेलऊन मसवडाकडे खूल उभे केले होते. त्यांजवर भवानराव प्रतिनिधी याची फौज गेली होती. त्यासी व भादूराव वगैरे यासी लडाई जाली. भादूराव प्रतिनिधी धरले गेले. पांच च्यारसे घोडी वगैरे लुटली गेली. मानाजी फाकडे पलून गेले. त्याचा दिवान धरला गेला. याप्रमाणे वर्तमान येथे आले. शृत होये. जजीरेवाले हपसी याजला येक दुसरे इग्रजाचे पलटन मिळाले. त्यानी तल्याघोसाल्याकडे कोकनप्राती उपद्रव माडला

आहे. तल्याचे किल्यासी व हपशासी लडाई आहे. हपशाचे पारपत्यास येथून दोन हजार गारदी रवाना जाले आहेत. शृत होये. सिद्यासी व इग्रजासी लडाई आहे. सिद्यावर इग्रजानी आनिक छापा घातला यैसे वर्तमान आहे. शृत होये. होलकर वाफगावास दाखल जाले. लोकास निरोप दिल्हा. दोन हजार स्वार याचजवल आहेत. दसऱ्या(स) फौज जमा करणार. शृत होये. हैदर नायेकासी व चिनापटनकर इग्रजासी लडाई आहे. नाईक म।।र याचा पुत्र टिपू वलदेज फिरगी याचे मुलकात गेला होता. वलदेजाची कोठी नागपटनास होती. ते कोठी टिपूने लुटली. दाहाबारा लक्ष होन सापडले व लूट बहुत सापडली यैसे वर्तमान आहे. शृत होये. कारभाऱ्यास इग्रजाची मसलत दरपेश आहे येविशई नित्य खलवत होता. शृत होये. हे सविस्तर वर्तमान प्राथःकाली डाकेसमागमे विनंतीपत्र रवाना केले त्यात लेखन केले असे. त्याजवरून ध्यानास येईल. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 58.

८ रजब ११९५ हिजरी
३० जून १७८१

पै।। छ २० माहे रजेब शुक्रवार सन ११९५ हिजरी. अडीच प्रहर दिवस मै जोडी तैनाती राये मजकूर

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार, विनती उपरि. येथील वर्तमान त।।छ ८ माहे रजब आषाढ शुध दशमी रविवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून, स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. येथील अखबार डांकेवर छ ६ माहे म।।रपर्यंत सेवेसी लिहून पाठविली, त्यावरून वर्तमान श्रुत जाहलें असेल. पुन्हां वरचेवर डांकेवर अखबार रवाना करितों, तें पत्रें या जासूदापूर्वी सेवेसी

पावतील. सांप्रतचे प्रसंगोपाद्य इकडील कारभाऱ्याचे मसलतीचा खुलासा यैसाजे. हैदरअलीखानाचे सलाहानुरूप इंगरेजासीं बिगाड किंवा सलूक करावा. तोपर्यंत बिगाडाचे शकलेवर परस्परें चाल आहे. बादज बरसात पुन्हां मोहिमेचा अज्म होणार. याकरितां परस्परें जंगी सरंजामाची सिधता होत आहे. हैदरअलीखान तर बरसर मोहीम व लढाईस मुस्तैद आहेत. याचप्रमाणें माहदाजी सिंदे करनल पापड वगैरे इंगरेज सिपरीकोल्हारासमीप परस्परें लढाई काबूनें करीत आहेत. पर्जन्यकाळांत छावणी किंवा परस्परें लढाई रूबकार आहे. हुजूरीहून पंतप्रधानावर इनायात आहे. त्याप्रमाणें सांप्रत इंगरेजांचे बिगाडाविषयीं पूर्वी इरशाद जाहल्याप्रमाणें व नकशा ठरल्या अन्वयानें इंगरेजांची तंबी हुजूरीहून व्हावी किंवा पुढें तजवीज कोणे प्रकारची व काय करावें याची सलाह उतम इरशाद व्हावी. याप्रमाणें बालाजीपंताचा आशय कृष्टणरावजीचे चितांत इंगरेजांसी बिगाड करावा व हुजूरीहून त्यांची तंबी होईल, याप्रमाणं इरशाद जाहला. त्याप्रमाणें पंतप्रधानांचे कारपरदाजानीं अमलांत आणिलें. हुजूरीहून इंगरेजांचे तंबीचा अज्म होत नांहीं, याकरितां हुजूरचे इरशादेचा व जमीर मुबारकेचा खुलासा काय हें वर्तमान कागदीपत्रीं लिहितां कळत नांहीं. यास्तव आपल्यास इनायतनामा मुतजमीनतलब हुजूर पाठवावा म्हणजे आपण हुजूर येऊन सादत मुलाजमत हासल करूं. व येथील कारपरदाजांचा खुलासा जनाबेंत अर्ज केल्यानंतर, ज्या कामांत मर्जी मुबारक मुतवजे असेल, त्याच रीतीनें कारभाऱ्यांस समजाऊन सांगोन हमवार करून हुजूरचे सागितल्या मार्गावर यांजकडून वर्तणूक करऊं. यांत उभयपक्षीं स्पष्टता व सफाई होऊन परस्परें संशय राहात नांहीं. याउपरि इनायतनामा येण्याकरितां नच पाठवावा हेंच मंजूर असल्यापक्षीं चिरंजीव रघोतमराव यांस कितेक

२

पुरवणी पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी

वर्तमान हुजूर अर्ज करावयाकरितां समक्ष सांगितलें आहे, ते

स्वामीचे आज्ञेप्रमाणें हुजूर अर्ज करतील, त्याचें उतर येईल त्याप्रमाणें आपण वर्तणूक करूं म्हणून कृष्टणरावजी म्हणतात. दुसरा प्रकार राव म।।रचे सांगण्यात आपल्यास इनायतनामा पाठऊन हुजूर बोलाऊन न्यांवें किंवा हुजूरीहून मातबर मुख्तार पंतप्रधानाकडे यावा.या दोन्हीं वितरिक्त परस्परें संशय दूर होऊन इतिफाकानें येके कामावर सरगरम होण्याचा मार्ग दिसत नांहीं. चौथाईचा तह व्हावा म्हणून हुजूरचे इरशादेप्रमाणें नवाब मुइनुदौलानीं कृष्टणरावजीस पत्र लिहिलें होतें. त्याचें उतर राव म।।रनुलेनीं जें पाठविलें तें पूर्वी लिहिलें आहे. त्याउपरि जिवाजी रघुनाथ यानीं येथील कारभाऱ्यास पत्रें पाठविलीं त्यांत म।।र लिहिला होता कीं चौथाईचा तह जाहल्यांवितिरिक्त चौथ वगैरे मामलतीचे रुपये न देणें म्हणून समग्र जागीरदार व आमीलास हुजूरीहून इनायतनामे सादर जाहले आहेत. यावरून कारपरदाजानीं हुजूर अर्ज करावयाविषईं जिवाजीपंतास म।।र पत्रीं लिहून पाठविला कीं हजरत मगफरतमाब यांचे समईं ज्याप्रमाणें अमल चालत होता त्या पधतीनें अमल ज्यारी व्हावा म्हणून प्रथमतां जो इरशाद हुजूरीहून जाहला तो आम्हीं कबूल केला व उभयपक्षीचे आमिल पाठऊन हरयेक माहालाची रुजवात करावी म्हणोन करार जाहला असतां रुजवात होत नांहीं. व सांप्रत नवीन शकलेनें इरशाद होतो व चौथाईचा अमल बंद व्हावा म्हणोन सांप्रत जागीरदार व आमिलास ताकीद जाहली. त्यास पूर्वी मुबारुजुलमुलुक बहादराकडून अमल ज्यारी होत नांहीं, म्हणून हरयेक मामलतदार नालिस व सिकवा सांगत होते व सांगतांत. त्याची समजावीस आम्हीं करीत होतों कीं जनाब मुबारकेंत अर्ज करून तुमचे मामलतीचा फैसला करऊन देऊं. सांप्रत हुजूरीहून मामलतीचे रुपये न द्यावे म्हणून इरशाद जाहला. त्यापक्षीं कारपरदाजांस तालुकदारांची समजावीश करावयास कांहीच मार्ग राहिला नांहीं, व मामलेदार राज्याचे चाकर व चौथाईची मामलत राजे शाहूपासून सर्वत्रांस आहे. याकरितां आमचे म्हणजे कारपरदाजांचे ताबेदारींत मामलतदार राहणार नांहींत, व ज्यास ज्या प्रमाणें

कळेल त्या रीतीनें मुफसदी करून हंगामा करतील. याप्रमाणें जिवाजीपंतास उतर हुजूर अर्ज करावयाकरितां गेलें, व कृष्टणरावजीनी बालाजीपंताचे जुबानीचा इजहार मजलाहीं याप्रमाणें सांगितला. सविस्तारें वर्तमान हुजूर व स्वामीस कळावें म्हणून लिहिलें आहे. अजिमुदौला बहादरांकडील किस्त दुयमच्या चिठ्या रो कृष्टणराव-जीनी औरंगाबादेस सदासिवपंतनामे कारकून रावजीचे तरफेनें तेथें आहे त्यासमीप पाठविल्या. कितेक लहान मोठीं कामें बहादर मा॥राकडून होणें त्याची याद लिहून पाठविली आहे. यादी प्रो कामें जाहल्यानंतर चिठ्या बहादरांस देईल. बहुत काय लिहिणें. हे विनती.

पै॥ छ २० माहे रजेब सन ११९५ हिजरी. मै जोडी तैनाती राये मजकूर रो शुक्रवार.

A. R. No. 59. १२ रजब ११९५ हिजरी
४ जुलै १७८१

पै॥ छ १९ माहे रजेब गुरवार सन ११९५ हिजरी. च्यार घटका दिवस बाकी असता मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरि येथील वर्तमान ताा छ १२ रजब गुरुवासरपर्यंत माो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ७ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें होतें ते पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्याउपरि छ माारपर्यंत सविस्तारें दफेवार वर्तमान लिहून सेवेसी व हुजूर पत्रें डांकेवर पाठविलीं

आहेंत. दारोग्याचे विद्यमानें पत्रें सेवेसी पावतील. छ ८ रजबीं पृथक जोडी पत्रासहित सेवेसी पाठविली तेही पावेंल. सांप्रत हैदर-अलीखानांचे वकीलासीं व येथील कारपरदाजासीं खिलवत दोन तीनदां जाहली. त्याचा शोध घेऊन माघाहून सेवेसी लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणें, हे विनती.

श्रीनिवास

विनतीजे. हैदर नायकाची व इंगरेजांची लढाई त्रिचनापली-समीप जाहली. त्याचें वर्तमान हैदरअलीखानांचे वकीलानीं समक्ष सेवकास सांगितलें, त्याची इतिला हुजूर व स्वामीस व्हावी म्हणोन लिहिलें असे. तीन च्यार हजार स्वार, व येक हजार बार व तोफासहित छ २१ जमादिलाखरीं चंदावरापासून स्वार होऊन बारा १२ कोस त्रिच-नापलीस रातोरात घटका दिवस प्राथःकाळचा आला, ते समईं जाऊन पोंहचले, व किल्यासमीप हजार बारासे लोक नमूद जाहले, ते समईं त्रिचनापलीहून तीन पलटणें जमियत व तोफा बाहेर निघाल्या. गोरा फिरंगी शंभरपर्यंत होते व तुरकस्वारही कांही होते. हैदरखानाचे लोकावर शलक करीत आले. खान म।।राचे लोकानीं त्यांस आंगावर घेऊन पसपा जाहले. दोन कोसपर्यंत इंगरेजांचे लोकास कसीस करून आणिलें. हैदरअलीखानाकडील आणखीं कुमकी बार व स्वार व खांसा येऊन पोंहचले व परस्परें लढाई जमले. ते समईं हैदरखानाचे लोकांनी बहुत निकड करून चालून घेतलें. ते समईं पांचसातसे लोक खान म।।राकडील व हजारपर्यंत इंगरेजांकडील लोक जखमी व ठार जाहले, व इंगरेजांची जमियत पसपा जाहली, व त्यांचे पिछाव्यावर खान माारचे स्वार व बार लढाई करीत गेले. त्रिचनापलीचे किल्यापर्यंत गेंले. ते समईं किलेवाल्यानीं दरवाजे बंद करून तोफाचा मार केला, त्यांत दुतरफा लोक जाया जाहले व इंगरेजांचे लोक बेहिमत होऊन कांहीं

खंदकांत पडले, व कांहीं पळाले व कांहीं मारले गेले. व दोन तीनसें बार व कांही तुरक स्वार व येक दोघें कुमनदान सरदार व तीन तोफा पाडाऊ खानम॥रांचे फौजेत आले. त्याउपरि त्रिचनापल्लीसमीप चिंतामणीपेंठ म्हणोन होती ते लुटून जाळली व श्रीरंग व जंबुकेश्वर हें दोन्हीं ठाणीं घेंतलीं, व तेथे मुकाम केला. याप्रमाणें छ २२ जमादिलाखरीं लढाई जाहली. व छ २४ माहे म॥रीं खानम॥रनें बालाजीपंत व हरीपंत व कृष्टणराव व माहदाजी सिंदे यांचे नांवें पत्रें लिहून जासूद मुजरद पाठविले. ते छ ११ माहें रजबीं पुण्यास बालाजीपंतासमीप आले. व पंत म॥रनुलेनीं हरकाऱ्यांस इनाम दिधला. सेवेसी श्रुत होय, हे विनती.

पैा छ १९ माहे रजेब गुरवार सन ११९५ हिजरी. च्यार घटका दिवस बाकी राहता, मै डांक सरकार.

श्रीनिवास

पुरवणी, श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, विनतीजे. राजश्री माधवराव रामचंद्र यांचें इनामी गांवची सनद स्वामीनीं करून दिधली, याची शुक्रगुजारी राजश्री फार करीत होते. चालीसगांव परगण्यांत दोन हजार रुपयाची जागीर राजश्रीस आहे. बशर्त नजर तनख्याप्रमाणें बहालीची सनद करून द्यावी. येविषईं स्वामीस विनती लिहिणें म्हणून मजला सांगितलें, व रो गणेशपंत वकील त्यांजकडील स्वामीचे सेवेसी आहेत, त्यांचें नांवचा लिफाफा राजश्रीनी लिहून पत्र पाठविलें आहे. गणेशपंत स्वामीसमीप असलियां त्यास पत्र द्यावें, ते नसलियां चिरंजीव राजश्री रघोत्तमराव यानी लिफाफा फोडून पत्र वाचून, म॥र स्वामीस विनती करावी, म्हणोन मजला माधवरावजीनीं सांगितलें आहे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणं, हे विनती.

पैा छ १९ माहे रजेब सन ११९५ हिजरी, गुरुवार. च्यार घटका दिवस बाकी राहता, मै डांक सरकार.

के. ज. स. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

श्रीनिवास

पैा छ १९ माहे रजेब गुरवार सन ११९५ हिजरी. च्यार घटका दिवस राहता, डाक सरकार.

अखबार पुणें, अज इ।। छ ७ माहे रजब लगायत छ १२ माहे म।।र सन ११९५ हिजरी गुरुवासर, बाजीपंत व माधवराव रामचंद्र छ ५ माहे म।।रीं पुण्यास आले. गाडराची पलटणें कल्याणीस पांच पर्यंत जमा जाहलें आहेंत. बिरेवाडीस हबसियांनी मोरचे लाविले आहेत. माहदाजी सिंद्याची छावणी सिपरीकोलारसासमीप जाहली. हैदर अलीखान चंदावर प्रांतीहून पुन्हां चिदांबरास करनल कूट इंगरेजांचे रुखावर जाणार. मानाजी फांकडे व भांबूराव दोन हजार स्वारानसी पंढरपुरासमीप जमा जाहला होता. त्याची व प्रतिनिधीकडील फौज माारनुलेचे तंबीकरिता पंतप्रधानाकडून रवाना जाहली होती, त्यांसी लढाई जाहली. फांकडयाचा मोड होऊन पळाला. या वितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ ७ माहे म।।रीं पत्रें पाठविलीं तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरि, प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

प्रतिनिधीची फौज मानाजी फांकडयाचे तंबीकरितां रवाना जाहली होती. त्यांची व फांकडयाची लढाई पंढरपुरासमीप जाहल्याचें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. सांप्रत कलमी खबर आली कीं, भांबूराव दस्तगीर जाहला व तीन च्यारसें घोडीं लुटीत आली. मानाजी फांकडया पळून सुरापुरचे रुखें गेला. येशवंतराव नाईक निंबाळकर दहीगांवी परशरामपंत मिरजकराचे विचारानें राहिला आहे. येथील कारभाऱ्यांनी भांबूराव यास पुण्यास आणविलें आहे. बिरेवाडीस हबसियानी मोरचे लाविले होते. याकरितां पंतप्रधानांनी पुण्याहून हजार बारासे गाडदी रवाना केले. ते अद्यापि घांटतोंडी पुण्याहून दाहाबारा कोसीं आहेत. गिर्दनवाह किल्याचे प्यादे दोन तीन हजारपर्यंत बिरेवाडीचे कुमकेस आले. त्यांनी हबसियांचे

मोरचे किल्याजवळील उठविले व किल्यांत मजबूतीनें आहेत. या दिवसांत कोकणांत पर्जन्य येंकरूप दिवारात्र वृष्टी, याकरितां हबसियांची जमीयत पुन्हा माघारा जजिऱ्यास गेंली. खारीज वर्तमान यैकिलें कीं, बिरेवाडीहून तीनच्यार कोसी हबसियांचें मकान आहे, त्या स्थळीं हबसियांची जमीयत राहिली आहे. पर्जन्य उघडल्यानंतर काबू पाहून पुन्हां येणार.

करनल गाडर व जनराल मुंबईकर यांची पलटणें कल्याणीत व पनवेलीस आहेंत, तेथोन हरकत करून पुढें येंत नांहींत. याकरितां येथील कारपरदाजानी तळेगांवासमीप व घांटावर बतरीक चौकी दोन तीनसें लोक ठेविलें आहेत. इंगरेजांचे हरकतीप्रमाणें मातबर फौज रवाना करतील.

करनल गाडर मुंबईहून वसईस गेला. व जंगी सरजामाची तयारी होत आहे. मोमज्याम्याच्या खांद्या हजार बारासेपर्यंत तयार करविल्या आहेत म्हणोन येथील कारपरदाजासमीप खबर आली आहे. मोमज्यामे करवावयाचें प्रयोजन ध्यानास येत नांहीं.

२

पुरवणी अखबार छ १२ रजब सन ११९५ हिजरी. खंडोजी भोसले मुधोजीचें पुत्र यानीं इंगरेजापासून रुपये घेऊन माघारा फिरले. याकरितां बालाजीपंत कारपरदाज बहुत नाखुश होऊन दिवाकरपंतास ताऱ्याचें पत्र लिहून पाठविलें होतें. त्याचें उतर पंतम।।रनुलेनीं पाठविलें कीं, श्रीमंत पंतप्रधानांचे सेवेंत मुधोजी भोंसले व आपल्यास दुसरा भाव सर्वथैव नांहीं. खंडोजी भोंसले व त्याजसमागमें जे कारभारी होते त्यानीं छावणीची ताबीसेची बरदास्त न करितां, घोडीं बेशुमार मेलीं, म्हणोन घाबरे होऊन माघारा फिरावयाचा निश्चय केला. रिकामें फिरोन येण्यापक्षीं, कांहीं येक आपला नफा व शत्रूचें नुकसान करांवें, म्हणोन बतरीक जियाफत कांहीं रुपये घ्यावे, म्हणोन घेतले असतील. श्रीकृपेनें दसऱ्यानंतर मातबर व ताजें दमाचे फौजेनसीं पुन्हां इंगरेजांचे तंबीस बंगाल्याचे रुखें रवाना होतील. याप्रमाणें उजरख्वाही करून पत्र पाठविलें आहे म्हणोन यैकिलें.

हैदरअलीखानाकडील वर्तमान नरसिंगराव वकीलाचें जुबानीं यैकिलें कीं, खांनम।।र आखर जमादिलाखर चंदावरापासून च्यार कोसावर होता. चिदांबरास जावयाची तजवीज होती. कूच करून गेल्याचें वर्तमान आलें नांहीं. चंदावर प्रांती कितेक मातबर स्थळीं ठाणीं बसविलीं व तमाम प्रांत ताख्तताराज केला याप्रमाणें वर्तमान यैकिलें. खारीज यैकिलें कीं, पंतप्रधानांचे कारपरदाजानीं हैदरअलीखानास लिहून पाठविलें होतें कीं, हजरत बंदगानआलीचा कस्द इंगरेजांचे तंबीचा दिसत नांहीं. व मुधोजी भोंसल्यानीं इंगरेजापासून रुपये घेऊन आपली फौज माघारा आणविली. याउपरि आम्हीं व तुम्हीं उभयतां राहिलों. याउपरि इंगरेजांचे विषईंची काय तजवीज याचें प्रत्योतर खानम।।रानें कारपरदाजास पाठविलें कीं, उभयतानीं नेमाप्रमाणें इंगरेजांचे तंबीस सरगरम असावें हेंच उतम. कदाचित ते शरीक मसलहत न होतील तरी काय चिंता आहे. आम्हीं व तुम्हीं उभयतां एकचितेंकरून जे काम चितावर घेऊन, च्याहूं त्याचा बंदोबस्त करूं. मुंबई व सुरतकर इंगरेजांचे रुखावर तुम्हीं मजबूत राहणें. व माहदाजी सिंद्यानीं सिपरीकोलारसेसमीप इंगरेजांची जमीयत आली. त्यांची तंबी करारवाकई करावी. सांप्रत आमचे रुखावर इंगरेजांची जमीयत मातबर आहे, व पुन्हां जमा होत आहे. त्याची तंबी करारवाकई होईल याप्रमाणें पत्रें खानम।।राची आली म्हणोन खारीज यैकिल्याप्रमाणें लिहिलें असे.

छ ११ माहे माारीं हैदरअलीखानाकडील पत्रें मुजरद जासूदाबरोबर आलीं. पत्री म।।र लिहिला होता कीं, इंगरेजांची कांहीं पलटणें त्रिचनापलीसमीप आली होतीं खानम।।र चंदावरापासून स्वार होऊन गेला. परस्परें लढाई जाहली. इंगरेजांची सिकस्त जाहली येक दोन सरदार दस्तगीर जाहले व तोफा वगैरे लूट आली म्हणोन यैकिलें. पंतप्रधानांचे काभाऱ्यानी जासूद जोडीस वीस रुपये व दोन सेले व मुंडामे इनाम दिधला. पुन्हा शोध करून वर्तमान लिहून पाठऊं, हे विनती.

पै॥ छ १९ माहे रजेब गुरवार सन ११९५ हिजरी. च्यार घटका दिवस बाकी राहता, मै डांक सरकार.

A. R. No. 60. १३ रजब ११९५ हिजरी
५ जुलै १७८१

पै॥ छ १९ माहे रजेब गुरवार सन ११९५ हिजरी, च्यार घटका दिवस राहता मै डांक सरकार.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल त॥ छ १३ माहे रजब. मु॥ क॥ पुणे स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन, स्वानद लेखन आज्ञा करीत असिले प॥ विशष. यथील वर्तमान छ ७ माहे म॥र, रोज शनवारी प्राथःकाली सरकारचे डाकेसमागमे दुसरे तिसरे प्रहरी राजश्री हैबतराव याचे तैनाती जोडीसमागमे यैसी दोन विनंतीपत्रे सेवेसी रवाना केली. ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनतर यथील वर्तमान दरबार वगैरे जाला होता. उपरातिक राजश्री नाना व हरीपंत व बाजीप(त) आना या त्रिवर्गाचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की, राजश्री बाजीपतासमागमे फौज होती. त्या लोकाचे देन्याचा गवगवा. त्याचा काही थोडा बहुत देन्या(चा) फडच्या करून द्यावा, व पुढे लोकाची समजावीस करून लोकानी दसऱ्याचे हगामास जमा सत्वर व्हावे याअर्थी खलवत जाला. शृत होये. राजश्री भादूराव प्रतिनिदी व मानाजी फाकडे वगैरे यानी हजार दोन हजार स्वार मेलऊन खूल केले होते. त्याचे पारपत्यास भवानराव प्रतिनिदी याची फौज गेली होती. त्याची लडाई होऊन र॥ भादूराव प्रतिनिदी धरला, व मानाजी फाकडा पलून गेला. पाच सातसे घोडी पाडाऊ

करून आनिली. हे वर्तमान पूर्वीच विनंतीपत्री सविस्तर लेखन केले आहे. त्याजवरून शृत जाले असेल. रा।। भादूराव व मानाजी फाकडे यासी व भवानराव प्रतिनिदी याचे फौजेसी लडाई जाली. भादूराव व मानाजी फाकडे वगैरे सिकस्त जाले. भादूराव प्रतिनिदी धरले व मानाजी फाकडे वगैरे पलून गेले. भादूराव व फाकडे वगैर याजकडील पाच सातसे घोडी वगैरे येक हाती पाडाऊ करून, भवानराव याचे फौजेनी अनीक भादूराव धरला. मानाजी फाकडे वगैरे पलून सुरा-पुराकडे गेले. शृत होये. छ ८ माहे म।।र रोज रविवार आशाडी येकादसी म्हणौन श्रीमंत व नाना व हरीपत व बाजीपंत वगैरे सर्व मडली वगैरे परवतीस दशर्णास गेले होते. च्यार घटका बसले होते. वाघ व हाती आणून दोन घटका तमाशा केला. उपरातिक श्रीमंत वगैरे आपल्या वाडचास आले. शृत होये. हैदर नायेकाची पत्रे आली. पत्रे घेऊन वकील दरबारास आले होते. पत्रे वकीलानी नानास दिल्ही. उपरातिक नाना व हरीपंत व कृष्ण-रावजी व बाजीपंत व हैदर नायेकाकडील वकील यासी खिलवत जाला. नाईक म।।र याचे पत्राचा व खिलवताचा भाव यैकिल्यात आला की हैदर नायेकासी व इग्रजासी सलूकाचा पैगाम लागला आहे. सलूक त्याचा होनार. या सलेची पत्रे नाईक म।।र यानी यास लिहिली आहेत की आपले मर्जीचा भाव ल्याहावा. या अनवये पत्राचा भाव यैकिल्यात आला आहे. परतु हे वर्तमान अद्याप कोठे कलू देत नाहीत. परतु वदंता पत्राची सलूकाची आहे. मागती शोध करून लेखन केले जाईल. हैदर नायेकासी व इग्रजासी याचे सूत्राने सलूक जाल्यास उतम आहे. याचे सूत्राने न जाल्यास याचे मसलतीस पेच भारी पडल, यैसे आहे. हैदरसी व इग्रजासी सलूक होतो, यैसी वदता आहे. मागती तहकीक वर्तमान यैकिल्यास लेखन केले जाईल. शृत होये. राजश्री हरीपत व नाना याचा खिलवत नित्य होत असतो. कितीक राज्यकारनाविशई व आपले दौलतीचे बदोबस्ताविशई होत असतो. परतु यास इग्रजासी मसलत दरपेश फार आहे. शृत होये. छ ९ रोज सोमवार इग्रजाची पलटने कल्यानीस आहेत.

जगी सरजाम कल्यानीस व ममईस भारी होतो. करनेल गाडर ममईस व कल्या(नी)स येत जात असतो. या समई इग्रजानी भारी सरजाम करने माडला आहे. पुढे ते भाद्र(पद) मासीच इकडे उद्वोग करणार यैसे वर्तमान आहे. या अर्थी कारभारीही श्रावन मासी सरकारचे डेरे बाहेर करनार यैसी वदता आहे. सरदारास व फौजेचे लोकास ताकीद करितात की दसऱ्यास सत्वर जमा व्हावे. लोकास दोन दोन रोजमुरे वगैरे कापड देऊन रुखसत घरास केले आहेत. त्यास ताकीद केली आहे की दोन महिने घरास राहून दसऱ्यास यावे. पुढे तुम्हास नालबदी वगैरे देऊ. परतु सागितल्याप्रमाणे सत्वर यावे. यैसी ताकीद केली आहे. शृत होये. कमावीसदार वगैरे मिळाले आहेत. माहाली वगैरे कामकाज ज्यारी आहे. शृत होये. राजश्री गनेशपंत बेहेरे व दुर्गोजी भापकर कोडाईबारीकडे होते. त्यास दुर्गोजी भापकर दोन हजार फौजेनसी कोडाईबारीवर पिपलनेरास छावनी करून राहिले. गनेशपंत पुन्यास येतात, कारन की त्याचे फौजेचा गवगवा, याकरिता येतात. हे पूर्वी लेखन केले होते. त्यास भापकर म।।र कोडाईबारीकडे राहिले. गनेशपंत पुन्यास येतात. दोन तीन कूचे गनेशपंताची जाली. सत्वर येथे येणार यैसे वर्तमान आहे. आलियावर लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे काम जाले. शृत होये. छ १० रोज मगलवार, हपशानी कोकनप्राती तल्याघोसाल्याकडे उपद्रव माडला आहे. त्याचे पारपत्यास येथून गारदी वगैरे गेले आहेत. प्रस्तुत वर्तमान आहे की हपशानी येक स्थल लहानसे तल्याचे किल्याजवल होते, ते घेतले. मागती वर्तमान आलिया लेखन केले जाईल. परतु हपशानी इग्रजास मेलऊन उपद्रव माडला आहे. शृत होयें. सिदे कोल्हारसिप्रीवरी आहेत. इग्रज तेथून नवा दाहा कोसावर आहेत. इंग्रजासी व सिंद्यासी लढाई आहे. इग्रजाजवल दाहा पधरा पलटण जमली आहेत. इंग्रज गालिब आहेत यैसे वर्तमान आहे. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. विदित होयें. छ ११ रोज बुधवार, राजश्री कृष्णरावजी दरबारास गेले होते. नाना व हरीपंत व

कृष्णरावजी या त्रिवर्गाचा खलवत जाला. खलवताचा भाव कितीक आपले दौलतीचे बंदोबस्ताविशयी जाला. दुसरे इंग्रजाचें पारपत्या-विशई जाला की दसऱ्याचे सनास फौज जमा करून इंग्रजाची मोहीम करावी. येंविशई येंज्यमानसाहेबास पत्रे ल्याहावी म्हणौन रावजीस सागितले. या अनवयें खलवत जाला म्हणून यैकिल्यात आले. शृत होये. हैदर नाइकाची पत्रे आली. त्यांचा अनवये यैकिल्यात आला, तो बजिनस पत्री लेखण केला आहे. त्याजवरून ध्याणास येईल. पत्राची उतरे नाईक मजकुरास लिहिणार. काये उतरे लिहितील ते ध्याणास आलिया सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होयें. छ १२ रोज गुरुवार, रा।। भगवंतराव निबालकर येथे चाकरीचे उद्वोगे व येज्यमानसाहेबाकडून जागीर मोकली करावी या उद्वोगे आले आहेत. हे येक दोन विनंतीपंत्री सविस्तर लेखण केले आहे. त्याजवरून ध्याणास आले असेल. निबालकर मजकूर याचें कारकूण कृष्णरावजीचे घरी येतस्तात. रोजगाराविशई व जागीर मोकली करवावयाविशई रावजीसी बोलने बोलतात. रावजीही त्यासी समाधानपूर्वक गोष्टी सागतात की तुमचा सर्व बंदोबस्त करून देऊ. हाजूरातून बंदोबस्त करून देऊ अथवा येथील रोजगाराची सोये करून देऊ. यैसी भाशने करितात. श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. उपरातिक नाना व हरीपंत यासी खिलवत जाला. शृत होयें. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. सर्व प्रकारे दासाणुदास स्वामीचा असे. बहुत काये लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 61.

१७ रजब ११९५ हिजरी
९ जुलै १७८१

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार, विनती उपरि. येथील

वर्तमान ताा छ १७ रजब आषाढ वद्य पंचमी मंगळवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ १३ माहें म।।रीं डांकेवर हुजूर अर्जी व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें. तें दारोग्यांचे विद्यमानें सेवेसी पावलें असेल. सांप्रत छ १७ माहे म।।र पर्यंत येथील वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्रें पाठविलीं आहेंत. पृथकपत्रावरून सविस्तारें वर्तमान सेवेसी व हुजूर श्रुत होईल. खांसगत तैनाती जोडी छ १९ माहे म।।रीं रवाना करितों, तेहीं अर्जी व विनतीपत्रासहित सेवेसी पावतील. चिरंजीव राजश्री रघोतमराव सेवेसी पाऊन येथील कचें वर्तमान व खानगी सर्व विनती केली असेल. मुलकी कामाचा बंदोबस्त खांवद जबरदस्त वालीमुलक आहेत, त्यापक्षीं होईल. व सर्वत्र इलतिजा व मिनतवार इरशादेप्रमाणें अमल करतील. सेवकाकडील खानगी काम स्वल्प. स्वामी हुजूर अर्ज करतील. परंतु अर्ज हुजूर-पिजीरा होऊन काम मनोदयानुरूप व विनतीरूप होण्याची आशा व उमेद स्वामीचे कृपेची आहे. कृपापत्र छ २९ ज।।लाखरचे हणमता व कृष्टणा जासूदासमागमे पाठविलें तें छ १३ माहे रजबीं पाऊन संतोष जाहला. विशेष काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचें सेवेसी. विनती उपरि. चौथाईचा तह कारपरदाज करून देत नांहींत. व मोरो गिरमाजीस बोलांऊ पाठविलें आहे. व अजीमुदौला बाहादरांस किस्त दुयमच्या चिठ्या देत नांहींत. व खिसाऱ्याची बाबत कबूल न करितां इंगरेजांची तंबीस मुतवजे होणें म्हणून कारपरदाज म्हणतात. यावरून हुजूरची मिजाज मुबारक बरहम होऊन येथील कारपरदाजांचे कोतेअंदेसीचा अंज्याम ठीक नांहीं. व अमार्गानें चालल्यास तदारूक होईल. या अन्वयानें मजला इनायतनामा हुजूरचा आला. त्याचा म।।र राजश्री कृष्टणरावजीस सांगितला. राव म।।रनिलेनीं त्याचे उतर केलें कीं, अजीमुदौला बाहादरांकडील

किस्त दुयमच्या चिठ्या पाठऊन दिधल्या. जुजवी कामाकरितां बहादर मा।।र दिकत करितात, ते न करावी. या करितां दोन दिवस बालाजीपंतानीं चिठ्या आटकाविल्या होत्या. खिसाऱ्याचा मा।।र बहुतवार बोलण्यांत व लिहिण्यांत आला. परंतु इंगरेजांची मसलत कोणे प्रकारें करावी, हे सलाह इरशाद हुजूरीहून जाहल्याप्रमाणें येथील कारपरदाजानीं अमल केला आहे. सांप्रत खिसाऱ्याची बाबत कबूल जाहल्यावितरिक्त इंगरेजांचे तंबीचा अज्म हुजूरीहून होत नांहीं, म्हणोन इरशाद होत आहे. त्यास ज्याप्रमाणें मर्जी मुबारकेचा खुलासा असेल त्याप्रमाणेंच येथील कारभारी वर्तणूक करतील. परंतु हुजूरचे मर्जीमुबारकेचा खुलासा व येथील कारपरदाजांचा येतकाद हुजूरांत कोणे प्रकारचा, याचा विस्तार परस्परें कागदपत्रीं कोठवर ल्याहावा, व लिहिल्यांत येणार नांहीं. याचप्रमाणें चौथाईचे तहाचा मा।।र, चौथाईचा तह सनदीपत्रीं करून देणें. काम लहान नांहीं. पूर्वी शंकराजी मल्हार या कामाकरितां साताऱ्यास आले होते. व बालाजीपंत अमीरुलउमराव याजकडें गेले तेव्हां तह ठरला. या अर्थीं कृष्टणरावजीनीं स्वामीस व हुजूर व मोईनुदौला बाहादरांस आपले तरफेणे लिहिणें म्हणोन मजला सांगितलें नांहीं. परंतु रावजीचे बोलण्याचा खुलासा जो सेवकाचे ध्यानास आला तो हुजूर व मोईनुदौला बहादर व स्वामीचे सवसी लिहितों. इंगरेजानीं अरकाट व सिकाकोल राजंबदरी वगैरे सरकारआलीचा प्रांत घेतला. बंगाला वगैरे बादशाही सुबा व सुजायदौलाचा मुलक घेऊन ते दौलत पायमाल केली. सांप्रत पंतप्रधानांचे रियासतींत खलेल पाहून हगामा करितात. या अर्थी इंगरेज बदमामली व हिंदुस्तान व दक्षणेचे रियासतीचा दाईया त्यांचा आहे. याचप्रमाणें हैदरअलीखान बदकौली. दोघांचे कराराचा भरवसा नांहीं. सांप्रत समयोचित हुजूरचे इरशादेप्रमाणें हैदरअलीखानांसीं व पंतप्रधानासीं दारमदार जाहला आहे. त्यास हुजूरीहून पंतप्रधानांची दस्तगिरी जाहली आहे. त्याची परवरश मंजूर आहे व व्हावी. व दौलतचे उपयोगी हरवक्त जे सलाह खातरमुबारकेस येत जाईल त्याचा इरशाद व्हावा. व येथील

कारपरदाजांची व या दौलतेचा अहवाल कोणे प्रकारचा याची पुरसीस सदैव होत जावी. बालाजीपंताकडून फिदवियतींत हरगिज कसूर होणार नांहीं. व कृष्टणराव तर प्रतिक्षणीं हुजूरचे इनायतीचा दम मारतात व शरीरेंकडून नौकर व ताबेदार पंतप्रधानांचे परंतु अंतःकरणापासून फिदवी व ताबेहुकम हुजूरचे म्हणवितात. जाहिरा नौकर पंतप्रधानांचे, याकरितां मुख्तार नांहींत. दुसऱ्याचे ताबेदार त्यांचे सांगितल्याप्रों वर्तणूक करावी लागती. राव म।।रनुलेचे चितापासून हुजूर येऊन सादत मुलाजमत हासल करावी. व हुजूरची व पंतप्रधानांची दौलतख्वाहीचा यत्न आपले मकदुराप्रमाणें करावा हे चितापासून आरजु. याकरितां साल गुजस्तां सेवकाकडून अर्जी हुजूर लिहविली. जे इनायतनामा

२

पुरवणी पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी

मुतजमनतलब राव म।।रचे नांवें व कृष्टणराव यांस हुजूर पाठवणें, म्हणोन बालाजीपंतास पाठऊन द्यावा म्हणोन लिहविल त्यास हुजूर व अर्ज मंजूरपिजीरा न जाहला. याकरितां सांप्रत चिरजीव राजश्री रघोतमराव यांचे मुखोदगत किते म।।र अर्ज करावयाचा सांगोन चिरंजीवास हुजूर रवाना केलें. त्यानीं स्वामीचे विचारें हुजूर अर्ज केला असेल. प्रस्तुत पुन्हा रावजीचे बोलण्याचा खुलासा हाच कीं, इतर नौकराप्रमाणें मीं नौकर परंतु ताबेदार पंतप्रधानाचा. याकरितां आपले यख्तियारीनें हुजूर येतां येत नांहीं. येथील कारभाऱ्यांनी आपले तरफेनें पाठवांवें. तरीं पूर्वी औरंगाबादचे छावणींत हुजूरीहून इनायतनामा सादर जाहला. त्यावरून कारपरदाजानीं येथोन राव म।।रनुलेस रवाना केलें. श्रीकृपेनें हुजूरचे मर्जीमुबारकेप्रमाणें सर्व कामाचा फैसला जाहला. वैकुंठवासीं माधवराव जातीनें पोख्तकार होते. व त्यास कर्नाटकची मोहीम करणें, ते समईं आपले तरफेनें हुजूर अर्ज मारूज करीत होते. सांप्रत बालाजीपंत पंतप्रधानासहित हुजूरचे ताबेदार. व यांची परवरश व अहवालपुरसीस

सदैव हुजूरीहून होत जावी. याकरितां राव म।।रनुलेस इनायतनामा हुजूर येण्याविषईं व पाठवण्याकरितां बालाजीपंतास बहुत सत्वर यावा. पत्रदर्शनीं रावजी हुजूर येतील. चौथाईचा बंदोबस्त व इंगरेजांकडील मोहिमेचा निश्चय, व ज्यांत हुजूरची मर्जीमुबारक खुश, व पंतप्रधानांचे अहवालावर मुतवजे, व पंतप्रधानांची बेहबूदी, व कृष्टणरावजीस व हुजूरचें मुकरब व मुसाहबांस येश व रावजीचे अहवालावर हुजूरची इनायत व सरफराजी व हमजीनसांत सुरखरुई इतकीं कामें होत आहेंत. या अर्थीं इनायतनामा सादर व्हावा हा रावजीचा खुलासा. सेवकाचा वोहदा यैकिलें वर्तमान हुजूर ल्याहावें त्याप्रमाणें लिहिलें आहे. परंतु येथील प्रकार पाहतां कयासास जो निश्चय जाहला त्याची इतिला स्वामीस लिहण्यांत कांहीं संशय नांहीं. परंतु धैर्य व जुरत करून हुजूर व मोईनुदौला बहादरासही लिहिलें आहे. जे कृष्टणरावजीची अरजू हुजूर येण्यांची व येथील कारभारी कां पाठवीत नांहींत म्हणोन आपण म्हणतील. तरी हे नवीन कारभारी. यांस हुजूरचे मर्जीचा प्रकार पुरतेप्रमाणें ध्यानास आला नांहीं. व अरण्यचराप्रमाणें संवशई. व रावजींनी हजूरचा पक्ष धरून कांहीं सलाह सांगावी तर हुजूरची ज्यानबदार. याप्रमाणें संशय करून निवड करतील. याकरितां रावजीस हुजूरचे तरफेंचा ज्वाबसाल स्पष्ट करता येत नांहीं. याकरितां यांस हुजूर बोलाऊन न्यांवें. व हुजूर आल्यानंतर येथील कारपरदाजास माकुल करून लिहतील. व ज्यांत मर्जी मुबारकेचा खुलासा त्या डौलावर रसायणें करून कारभार उतरतील. चौथाईचा तह ज्यांत हुजूरची किफायत त्याप्रमाणें होईल. परंतु इंगरेंजासी बिगाड किंवा सलाह करणें याचाही निश्चय मर्जीमुबारकेचे इरशादेप्रमाणें होईल. या प्रकारचें काम होत आहे त्यापक्षीं रावजीस हुजूर बोलाऊन नेण्यांत सरकार किफायत सेवकाचे ध्यानास आली. यास्तव विनती लिहिली आहे. याउपरि जे सलाहदौलत असेल त्याप्रमाणें हुजूरीहून अमल होईल, हे विनंती. स्वामीनी सेवकाचे लिहिल्याप्रमाणें व ज्यांत मर्जीमुबारक मुतवजें होऊन कृष्टणरावजीस येण्याविषईं

इनायतनामा सादर होईल त्याप्र।। विनती करून प्रत्योतर डांकेवर सत्वर पाठवावें, हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ।। छ १३ रजब लगायत छ १७ माहे म।।र सन ११९५ हिजरी. पंचमी मंगळवार आषाढ वद्य. मुंबईहून करनल गाडराची पलटणें च्यार कल्याणीस येंऊन जमा जाहलीं. व खांसा गाडर वसईस गेला म्हणोन खारिज यैकिलें. व वसई व मुंबईत जंगी सरंजामाची तयारी होत आहे. व बिरेवाडीस हबस्यानीं मोरचे लाविले होते. तें उठऊन माघारा तीन च्यार कोस जाऊन आपले तालुकियाचे मकानांत राहिले आहेत. पंतप्रधानाचे तरफेनें बिरेवाडीचें कुमकेस गाडदी रवाना जाहले ते घांटावर आहेत. हैदरअली खानांची व इंगरेजांची लढाई त्रिचनापलीसमीप जाहली. इंगरेजांची सिकस्त होऊन कितेक मारले गेले. व कांहीं फरारी व दस्तगीर जाहले म्हणोन व आवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व स्वामीचे सवसी पत्रें डांकेवर पाठविलीं. ते दारोग्याचे विद्यमानें सेवेसी पावलीं असतील. त्याउपरि प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान सविस्तारें लिहून हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्रें पाठविलीं आहेंत.

बिरेवाडीहून च्यार कोसाचें फासल्यानें हबसियांकडील जमीयत आहे. पुन्हां काबू पाहून बिरेवाडी अथवा दुसरे मकानास येऊन माहसरा करतील. याकरितां पंतप्रधानाचें तरफेनें गाडदी कुमकेस रवाना जाहले होते ते घांटावर मुकामात करून राहिले होते. त्यास येथील कारपरदाजानी ताकीद पाठविली कीं, बिरेवाडीस जलदीनें जाणें व तेथेंच राहणें.

करनल गाडर मुंबईहून वसईस गेला म्हणोन खारिज वर्तमान यैकिल्याप्रमाणें पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत येथील कारपरदाजाचे

जुबानीं यैकिलें कीं, गाडर म।।राकडील च्यार पलटणें वसईत आहेंत व तीन च्यार कल्याणीसमीप. व खांसा गाडर व च्यार पलटणें मुंबईत आहेंत. महिना पंधरा दिवसानंतर पलटणाची तबदिल होत आहे.

हैदरअलीखानांची पत्रें छ ११ माहे म।।रीं आलीं. त्रिचनापलीचे लढाईंत खान म।।राची फते होऊन जंबुकेश्वरासमीप मुकाम करून राहिला आहे. छ म।।रचे पत्री खान म।।रानें येथील कारपरदाजास पत्री म।।र लिहिला आहे कीं, भोंसल्याची फौज बंगाल्याचे रुखावरून माघारा फिरली, व भोंसल्यानीं इंगरेजासीं साख्त केली. याकरितां बंगाल्याचे मोहिमेस तुम्हांकडील सरदार मातबर फौजेनसीं गेला तर भोंसलें त्या फौजेस शरीक होतील. व इंगरेजांस पायबंद होऊन कसीस पडेल. याकरितां बंगाल्याचे रुखें फौज रवाना करणें सलाह आहे. याप्रमाणें पत्र आलें. याचें उतर पाठवावयाकरितां पांच साहा दिवस कारपरदाजांची परस्परें बहस व सला व मसलत होत होती. त्यानंतर प्रत्योतर खान म।।रनुलेस लिहून पाठविलें कीं, बंगाल्यास फौज पाठवावी म्हणोन तजवीज बहुता दिवसापासून आमची आहे. परंतु चालीस हजार पर्यंत स्वार पाठविल्याविरिक्त तिकडील मोहिमेची सरबराई होत नांहीं. चालीस हजार फौजेचे रवानगीस तीस लाख रुपये नख्त पाहिजेत. पंतप्रधानांचे सरकारांत रुपया नांहीं. लोक तीन पिढचाचे नौकर. सांगितल्याप्रमाणें चाकरी करतील परंतु त्यांचे रफीकास रुपये दिधल्याविरिक्त रिफाकत करणार नांहींत. याकरितां रुपयाची मदद तुम्हाकडून बतरीक कर्ज हसना किंवा पेशकसी

२

पुरवणी अखबार छ १७ रजब सन ११९५ हिजरी.

चे यैवजी जाहलियां, येके महिन्याचे फुरसतींत फौज जमा करून बंगाल्यास रवाना करितों. या प्रमाणें पत्र लिहून खान म।।रास पाठविलें, म्हणोन कारपरदाज व कृष्टणराव बलाळ यांचे जुबानीं यैकिलें. खारिज यैकिलें कीं, बंगाल्यास फौज पाठविलियां इंगरेजास पायबंद

होऊन त्यांची पलटणें दक्षणेस येत आहेंत तें मवकूफ होतील. व हे सलाह पोख्त आहे म्हणोन येथील कारपरदाजानी तजवीज करून हैदरआलीखानास आपले तरफेनें लिहून पाठविलें. व वीस लाख किवा पंधरा लाख पर्यंत रुपये पेशकसीचे यैवजीं पेशगी तुम्हीं द्याल तर हे मसलहत सेवटास जाईल व फौजेची रवानगी बंगाल्यास होईल म्हणून पंतप्रधानांचे कारपरदाजानीं आपले तरफेनें नूरम।।खान व नरसिंगराव वकीलास सांगोन त्यांजकडून पत्रें लिहविलीं व आपण लिहून पाठविलीं.

माहादाजी सिंदे सिपरीकोलारसेसमीप इंगरेजांचें रुखावर पांच साहा कोसाचे फासल्यानें सडे फौजेनसी आहेत. बाहिर बुनगा जाजती सरंजाम उजनसी माघारा पाठविला. सिंदे म।।रानीं येथील कारपरदाजांस लिहिलें आहे कीं, सांप्रत पंचेवीस हजार स्वारानसीं इंगरेजाचे रुखावर आम्हीं आहोंत. परंतु इंगरेजांची जमीयत भारी. सोळा सतरा पलटणें सांप्रत मुकाबिल आहेंत. व च्यार पलटणें ग्वालेरींत व पांच साहा पलटणें कालपीसमीप राहिलीं तेंही येणार. याकरितां पुन्हां दाहा हजार स्वार अम्हास जरूर पाहिजेत. स्वाराचे निगाहदास्तीकरितां येथोन मुतसदी रवाना करितों. मदद खर्चाची कांहीं कुमक तुम्हांकडून जाहलियां यांसमईं बहुत उपयोगी आहे. त्यास येथील कारपरदाजांनीं अबाजी नाईक वानवळे वगैरे सावकारांस पत्रें पाठविलीं आहेंत कीं, माहदाजी सिंदे कर्ज मागतील त्याप्रमाणें देणें. रुपये आम्हीं उगऊन देऊं.

मानाजी फांकडा फरारी होऊन तुळजापूरचे मार्गानें सुरापुराकडें गेला म्हणोन येथें चर्चा आहे. भांबूराव लढाईंत प्रतिनिधीचे सरदारानी दस्तगीर केला. त्यास वासुदेवबावा प्रतिनिधीचे मुतालिक कारभारी यांचा पुतन्या भांबूराव, याकरितां वासुदेवबावानीं पंढरपुरींच म।।रनुलेस ठेविलें आहे. घोडीं वगैरे लूट सांपडली. त्यापैकीं निमे हिसा पंतप्रधानास द्यावा म्हणोन येथील कारपरदाजानीं वासुदेवबावास तकाजा लाविला आहे. अमलात येईल त्या

प्र।। सेवेसी सूचना होईल. गणेशपंत बहिरे यांचे समागमेचे लोकास तीन वर्षेपर्यंत सालझाडा पावला नांही. याकरितां लोक बेदिल. यास्तव म।।रनुलेनी पय दरपय कारभाऱ्यांस पत्रें पाठविली कीं येकदां पुण्यास येऊन स्वारांची समजावीस करून पुन्हां आज्ञेप्रमाणें मोहिमेस जाऊं. त्यावरून दुर्गोजी भापकरास पंधरा हजार रुपये खर्चास देवऊन कोंडाईबारीस छावणीस ठेविलें व गणेशपंतास पुण्यास येण्याविषईं आज्ञापत्र लिहून पाठविलें. त्या प्र।। गणेशपंत पुण्यास येणार. पुण्यात जुना कसब्याचे दरवाज्यासमीप कांही द्रव्य सांपडले म्हणून सुभानशाह मस्तान आहेत, त्यानीं सांगितलें त्यावरून पंतप्रधानांचे कारपरदांजानीं खाणती लाविली आहे. दाहा हातपर्यंत खाणलें. येक देवालय लागलें आहे. तीन तोफेचे गोळे निघाले. याउपरि जें प्रत्यक्ष वर्तमान होईल तें सेवेसी श्रुत होईल.

A. R. No. 62.

१८ रजब ११९५ हिजरी
१० जुलै १७८१

छ ३ माहे शाबान संन ११९५ हिजरी रोज बुधवार दोन प्रहरा

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल त।। छ १८ माहे रजब मु।। पुणे स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष. येथील वर्तमान छ म।।री प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले. ते पावोन सविस्तर वर्तमान श्रुत होईल. या नतर येथील वर्तमान हैदर नायेकाचे वकीलाचे येथे पत्रे आली. वर्तमान होते की, हैदर नाईक यासी व इग्रजासी त्रिर्चनापलीजवल लडाई जाली. हैदर नायेकानी इग्रजाची दोनतीन पलटने गारद केली, व हजार बारासे मणुश व

सेपनास गोरे धरून आनिले. इग्रज लडाईत सिकस्त होऊन माघारा पाचसात कोस गेले. यैसे पत्र नाईक मजकुराचे वकीलास आलें. वकीलानी बजिनस पत्र येथे कारभाऱ्यास दाखविले. इग्रज सिकस्त जाले व दोन तीन पलटना बुडविल्या व मणुशे वगैरे गोरे धरले, यैसे लिहिले होते. त्याजवरून कारभारी बहुत संतोश जाले. दोन घटका हैदर नाईकाचे मरदानगीची तारीफ करीत होते. लडाईची बातनी जासूदाने आनिली म्हणौन त्यास दाहा रुपये नगद व दोन दोन वस्त्रे इनाम दिल्हा. नाईक म।।र यास यानी पत्रे पाठविले की, इग्रजाचे पारपत्य येथास्थितच करावे. कदाचित त्यानी सलूकाचा पैगाम पाठविला तर हरगिज न यैकावे. यैसे पत्रे लिहिली. शृत होये. ज्याफरःदौला बहादुर मरहूम याचे पुत्राची सरकारातून सरफराजी जाली म्हणौन येथून श्रीमताची व कारभाऱ्याची वस्त्रे त्यास निर्मले(स) जाणार. येका दो दिवसा वस्त्रे रवाना होनार. शृत होये. कल्यानीस व ममईस इग्रजाचा सरजाम जंगी मातबर तयार होतो. भाद्रपद मासीच ते इकडे उद्योग करणार, यैसे वर्तमान आहे. त्याजवरून कारभारीही श्रावनमासी डेरे वगैरे बाहेर करनार यैसी वदंता आहे. शृत होये. हपशानी तल्याघोसल्याकडे कोकन प्राती उपद्रव माडला आहे. तल्याचे किल्याजवल बिरवाडी होती ते हपशानी घेतली. पुढे तल्याचे किल्यास उपद्रव करनार यैसे वर्तमान आहे. त्याचे पारपत्यास गारदी वगैरे पाठविले आहेत तें अद्याप बोर-घाटावरच आहेत. पुढे ते तल्याचे किल्याकडे हपशाचे पारपत्यास जानार. शृत होये. राजश्री नाना व हरीपंत व कृष्णराव वगैरे याचा खलवत होत असतो. खिलवताचा भाव हाच की, पुढे इग्रजाचे पारपत्याविशई व पुढे आपले दौलतीचे बदोबस्ताविशई होत असतो. व येज्यमानसाहेबाकडेही रावजीचे विद्यमाने अर्ज्या वगैरे पाठवीत असतात. याअर्थी खिलवत होत असतो. शृत हाये. हे सविस्तर वर्तमान छ म।।री प्राथःकाली डाकेसमागमे विनंतीपत्र सेवेसी रवाना केले आहे त्याजवरून ध्यानास येईल. येथील प्रसगाचे वर्तमान वरचेवर डाकेसमागमे सेवेसी व हजुरात रवाना होते त्याजवरून

ध्यानात येत असेल. विदित होये. छ २९ माहे जमादिलाखरचे आज्ञापत्र पाठविले ते छ १३ माहे म।।री सेवकास पावले. त्याचे उतर डाकेसमागमे विनंतीपत्र पाठविले आहे. त्यात अक्षरशा लिहिलें आहे. त्याजवरून ध्यानास येईल. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काये लिहिणे कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ति.

A. R. No. 63.

१८ रजब ११९५ हिजरी
१० जुलै १७८१

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल त।। छ १८ माहे रजब मु।। का।। पुणे स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिलें प।।. विशेष येथील वर्तमान छ १३ माहे म।।र रोज शुक्रवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते दारोग्ये हरकारे याचे विद्यमाने पावोन सविस्तर बर्तमान शृत जालें असेल. तदनंतर यथील वर्तमान. हैदर नायेकाकडील वर्तमान, हैदर नाईक त्रिचनापलीजवल फौजेसहवर्तमान होते. इग्रजाचे पलटनें तेंथे होती. नाईक म।।र यासी व त्या पलटनासी लडाई जाली. दोन पलटने नाईक म।।र यानी गारद केली व हजार बारासे मणुश धरले, सेपनास गोरें धरले, बाकी पलटने सिकस्त होऊन माघारा गेले, दोनतीन पलटने गारद केली. या प्रमाणे वर्तमान नाईक म।।र याचे वकील येथे आहेत त्याचे येथे आले. वकीलानी बजिनस पत्रें कारभाऱ्यास दाखविली. दोन तीन पलटने गारद केली, हा म।।र पत्री होता, त्याजवरून कारभारी बहुत संतोश जालें. जासुदास दहा रुपये व दोन दोन वस्त्रें इनाम दिल्हा. नाईक म।।र याचे मरदानगीची दोन घटका तारीफ होत होती. याप्रमाणे

हैदर नायेकाकडील लडाईचे वर्तमान आले. पुढे नाईक म।।र इग्रजावर गालिब आहेत, यैसे वर्तमान आहे. शृत होये. पूर्वी वर्तमान होते की इग्रजानी हैदर नाइकासी सलूकाचा पैगाम लावला आहे यैसी वदता होती. वर्तमान आहे की नाईक म।।र सलूकाचा जाबसाल इग्रजाचा यैकत नाही. प्रस्तुत नाईक म।।र यानी इग्रजाची दोन तीन पलटनें बुडविली. पुढे पारपत्य येथास्थित करावे हाच नाईक म।।र याचा निश्चयें आहे, यैसे वर्तमान आहे. नाईक म।।र याजवल फौजेचा भरना मातबर आहे. चालीस पनास हजार स्वार व साठ सतर हजार गारदी वगैरे प्यादे, सिवाये तिकडील सवस्थानिकाचे प्यादे पचवीस तीस हजार व दोनसे तोफा, याप्रमाणे ज्यमाव आहे यैसे वर्तमान आहे. प्रस्तुत हैदर नायेकाचे लडाईचे वर्तमान आले. इग्रजाची दोन तीन पलटने गारद करून सिकस्त केले यैसे वर्तमान आले आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैरें जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. विदित होये. छ १४ रोज शनवार ज्यफरःदौला बाहादुर याचे पुत्राची हजुरातून सर्फराजी झाली म्हणोन त्यास येथून श्रीमताची वस्त्रे व येक रकम ज्यवाहेर व नानाची व हरीपताची व कृष्णरावजीची व भवानी सिवराम याची वस्त्रे त्यास निरमलेंस जातात. येका दो दिवसा त्याजकडे वस्त्रे वगैरे रवाना होनार. शृत होये. कल्यानीस व ममईस इग्रज सरजाम करितात. करनेल गाडर ममईस राहातो व कल्यानीसही येतो. सरजाम वगैरें तयार करून श्रावन गेलियानतर सत्वरच इकडे उद्वोग करनार यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री नाना व हरीपंत वगैरें याचा नित्य खलवत होत असतो. खलवतीचा भाव हाच यैकिल्यात येतो की पुढे फौज वगैरे सत्वर दसऱ्याचे हगामास जमा करून इग्रजाचे पारपत्य करावे या अर्थी खिलवत होत असतो. शृत होये. होलकर वाफगावी आहेत. फौजेस नरोप प्रस्तुत दिल्हा आहे. दसऱ्याचे हगामास होलकराचीही फौज जमा होनार. शृत होये. तिसरे प्रहरी कृष्णरावजी नानाचे घरास गेले होते. नाना व हरीपंत व रावजी या त्रिवर्गाचा खिलवत जाला.

भाव यैकिल्यात आला की हैदर नायेकाकडे पत्रे लिहिणार व येज्यमान-साहेबासही अर्जी वगैरे पत्रे लिहिणार. दुसरे कितीक आपले दौलतीचे बदोबस्ताविशई खलवत जाला. शृत होये. छ १५ रोज रविवार हपशानी कोकन प्राती तल्याघोसाल्याकडे उपद्रव माडला आहे. तल्याघोसाल्याकडे बिरवाडी येक लाहानसे स्थल आहे ते हपशाने घेतले. तल्याघोसाल्यासही उपद्रव करणार. हपशाचे पारपत्यास येथून गारदी वगैरे रवाना केले ते अद्याप बोरघाटावरच आहेत. पुढे ते गारदी घाट उतरून तल्याघोसाल्याचे किल्याकडे जाणार, शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. शृत होये. भोसल्याची पत्रे नागपुराहून आली. वर्तमान यैकिले की पत्रे श्रीमतास व कारभाऱ्यास बहुत ममतापूर्वक लिहिली होती. पुढे दसरा जालियानतर भोसलेही इग्रजाकडे स्वारीचा उद्वोग करणार यैसे वर्तमान आहें. शृत होये. भोसल्यानी निर्मलेस बाहादर मरहूम याचे पुत्रास सर्फराजी जाल्याची वस्त्रे पाठविली, यैसे वर्तमान आहे. शृत होये. छ १६ रोज सोमवार सिद्यासी व इग्रजासी लडाई आहे. सिद्याजवल तीस चालीस हजार फौज आहे. इग्रजाजवल चवदा पधरा पलटने आहेत. लडाई होत असती. इग्रज मुस्तौद आहेत यैसे वर्तमान आहे. शृत होये. हैदर नायेकानी दोनतीन पलटने डुडविली व लडाई मातबर जाली. इग्रज सिकस्त केले म्हणौन कारभाऱ्यानी बहुत ममतापूर्वक नाईक म।।रास पत्रें लिहिली व याचे वकील तेथे आहेत त्यास पत्रे लिहिली. पत्रे कासद जोडीसमागमे नाईक म।।र याचे लश्करात रवाना केली. नाईक म।।र यास कार-भाऱ्यानी लिहिले आहे की इग्रजानी कदाचित सलूकाचा पैगाम पाठविला तर न यैकावे, त्याचे पारपत्यच करावे, यैसे लिहिले आहे म्हणौन यैकिले. शृत होयें. राजश्री हरीपतास येक दोन दिवस ज्वर येत होता, आता आराम आहे. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. शृत होयें. छ १७ रोज मगलवार श्रीमत वाडयात घोडी वगैरे फिरवीत असतात व तीरदाजी वगैरे करितात. शृत होये. इग्रज कल्यानी वगैरेस सरजाम जंगी करितात. पुढे उद्वोग

सत्वरच करनार याअर्थी कारभारीही श्रावन मासी डेरे बाहेर करनार, अन उद्वोगही डेरे वगैरे जालिया लवकरच करतील, यैसाही विच्यार करितात. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ २९ माहे जमादिलाखरचे आज्ञापत्र राजश्री हैबतराव याचे तैनाती जोडीसमागमे सादर केले ते छ १३ माहे म।।री सेवकास पावले. पावोन बहुत संतोश जाला. सेवकाचे जागीरीस याजकडील सुभ्याकडील उपद्रव होऊन सुभेपटी व दहकपटी वगैरे यैवज घेतला. येविशई विनंती लिहिली होती की येथील कारभाऱ्यास इनायेतनामे पाठवावे की सुभ्याकडून यैवज माघारे देवावा. पुढे सुभे व कमाविसदार वगैरे उपद्रव न करीत व कोन्ही सरदार येतात जातात ते उपद्रव घास-दान्या वगैरेचा न करीत या अनवये इनायेतनामे सादर जाले पाहिजेत. आज्ञापत्री उतर सादर जाले की लिहिल्या-अनवये इनायेतनामे सादर करून पाठऊ. त्याजवरून संतोश जाला. सर्वस्वे माझी गनना चिरजीवात आहे, सर्व माझी लज्या स्वामीस आहे. विनंती लिहिल्याप्रमाणे इनायेतनामे सादर करनार स्वामी समर्थ. मौजे भालगाव प्र।। राताजन येथील पाटलाचे नावे कौल व रफअतःदौला बहादुर याचे नावे इनायेतनामा सादर करून र।। कोनेर बाबूराव याचे स्वाधीन केला. ते तुम्हाकडे पाठवितील म्हणोन आज्ञापत्री सादर केले, त्याजवरून संतोश जाला. आज्ञापिले गाव कोन्हाकडून आहे, त्यास सरकारातून आमचे आतेचे चिरजीव माहापुरुश आहेत, त्याचे नावे आहे. त्याचे देवस्थानाचा वगैरे सर्व खर्च माहाराजाकडूनच चालतो. सर्व पुन्यप्रताप स्वामीचा आहे. त्याचे नावे मात्र करून घेतले आहे. परतु सर्व देवाचा वगैरे खर्च स्वामीसच चालवावा लागतो यैसे आहे. येविशई इनायेतनामा व कौल सादर करून दिल्हा, हे सर्व पुन्यायेश स्वामीस आहे. तेथील पाटलाने मारा केला व खूल केले. त्याचे पारपत्यास येथून पागा गेली होती. खूल त्या प्रातातच जाले होते. त्यासह पाटीलही मिलाला होता. फौज गेली होती त्यानी गाव

मारून ताराज केला. गाव खाणून टाकला यैसी त्या गावची अवस्ता जाली. या अर्थी कौल वगैरे इनायेतनामा मागविला होता. विदित होये. सदैव आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काय लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 64.

१९ रजब ११९५ हिजरी
११ जुलै १७८१

पै।। छ ३ माहे शाबान संन ११९५ हिजरी रोज बुधवार दोन प्रहरा जोडीबरोबर.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार, विनंती उपरि. येथील वर्तमान त।। छ १९ रजब, आषाढ वद्य सप्तमी गुरुवासरपर्यंत, मो। पुणें स्वामीचे कृपेकरून, क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष छ १७ माहे म।।रीं डांकेवर हुजूर अर्जी व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें. तें पाऊन राजकी वर्तमान व राजश्री कृष्टणरावजीचे बोलण्याचा खुलासा सर्व ध्यानास आला असेल. हुजूरचे अर्जीत व मकारनामकास संक्षेप रीतीनें मुख्तसर म।।र लिहिला आहे. याकरितां स्वामीचे सेवेसी जे विनती लिहिली तो म।।र हुजूर अर्ज करावया योग्य व करावा म्हणून पत्रीं विनती लिहिली होती. अर्ज करण मुनासिब असल्यापक्षी केला असेल. सारांश चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचें मुखोदगत कृष्टणरावजीनीं जो म।।र हुजूर अर्ज करावयाचा सांगितला व चिरंजीवानीं स्वामीचे विचारें हुजूर रावजीचे विनतीचा भाव अर्ज केला असेल. त्यांत कांहीं बाकी मरातिब राहिला नांहीं. छ १७ रजबीं डांकेवर जें पत्र व अर्जी मी पाठविली यांत कांहीं गुंता ठेऊन लिहिलें नांहीं. यांत जे सलाह दौलत असेल ते

तदबीर हुजूरीहून होईल. सांप्रत पंतप्रधानांचे राजद्वारीं वकील मुतलक व मुख्तार बज्याय श्रीमंत राजश्री बालाजी जनार्दन फडनीस व यांचे किळदकार किंवा गुरू हरी बलाळ, उभयतां वितरिक्त तिसरा कोण्हीं नांहीं. फडनसीचें कामाची नियाबत लक्ष्मणपंत देशमुख करितात. व मुलकी व फौजेचे कामाचे बानीकार हरीपंत, यांचे हस्तक विसाजी अपाजी अठवलें व बाजी गोविंद सलाह मसलत मुलकी कामाची जे होणें ते कृटष्णराव बलाळ यांचें इतिल्यावितरिक्त व यांस जे पसंद पडेल ते मंजूर, व बहुत करून मुलकी कामाची तजवीज राव म।।राचे सांगितल्याप्रमाणें होत आहे. अखबारेपैकीं विशेष वर्तमान, येथील स्नेहिताचे मुखें यैकिलें कीं, हैदरअलीखानानीं आपले वकीलास स्पष्ट लिहिलें आहे. व वकीलानीं तेंच पत्र बजिनस येथील कारपरदाजास दाखविलें, त्यांत म।।र लिहिला आहे कीं, देशची फौज दाहा पंधरा हजारपर्यंत आपल्यास नोकर ठेवणें आहे, त्यांस नालबंदी देऊन रजावंदीनें दरमाहे वगैरे मोकर करून फौज जमा करून घेऊन येण्याकरितां येथोन मुतसदी व मातबर सरदारास पुणे प्रांती रवाना करितों. स्वारांची बोली करून नालबंदी मुतसदी देईल. परंतु कोण्हीं बदमामली केलियां व चाकरीस न येईल त्यास सिक्षा करून रुपये गुन्हेगारीसहित माघारा देववावे. किंवा त्यापासी जामीन घेऊन चाकरीस पाठऊन द्यावयाचा बंदोबस्त पंतप्रधानांचे कारपरदाजानीं करावा. व सदर कौल पंतप्रधानांचे मोहरेनसीं लिहून द्यावा कीं, पंतप्रधानासी व हैदरअलीखानासीं अकृत्रिम स्नेह आहे. खुषरजावंदीनें ज्याचे चितास येईल त्यानें चाकरीस जांवें. ये विषईचा म।।र व बजिनस पत्र वकीलानें कारपरदाजांस दाखविलें. याचें उतर काय द्यावें याची तजवीजींत कारभारी आहेत. नौकरीस जाणें म्हणोन सिपाह लोकांस परवानगी

२

पुरवणी पत्र श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी

दिधलियां खान म।।रासमीप रुपये देण्यास कांही गुंता नांहीं.

लोक रुपयाचे लालुचीनें समग्र उठोन जातील. कौल लिहून द्यावा तरी खान म।।रनुलेचे चितांत संशय उत्पन्न होईल. याकरितां प्रत्योतर सांगावयाचा सिधांत अद्यापि जाहला नांहीं. खारिज यैकिल्या-प्रमाणें हुजूर व स्वामीचे सवसी विनती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें. चिरंजीव राजश्री रघोतमराव समग्र श्रावणमास सेवेसी राहतील. उपरांतिक चिरंजीवास सत्वर आज्ञा देऊन मार्गस्त करावें. येथील बातनीचे कामास त्यांजवितरिक्त सेवकास बहुत साहस करणें प्राप्त होतें. हे विनती.

छ ३ शाबान संन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

विनतीजे. बिरेवाडीचे बंदोबस्तास व कुमकेस पुण्याहून गाडदी रवाना केले होते. ते घाटाखाले गेलें. हें वर्तमान छ १७ रजबचे अखबारेंत लिहिलें आहे. आनि छ १९ रजबी खारिज वर्तमान यैकिलें कीं, गाडद्यांसी व हबसी यांचे जमियतीसीं तळेंघोंसाळयासमीप लढाई जाहली. पंतप्रधानांकडील गाडद्यांचा मातबर सरदार ठार पडला व गाडद्यांची सिकस्तं जाहली व माघारां पांच कोस येऊन राहिले. वर्तमान तहकीक करून डाकेवर अखबारांते लिहिलें जाईल. हे विनतीं.

A. R. No. 65.

२३ रजब ११९५ हिजरी
१५ जुलै १७८१

पै।। छ २ साबान सन ११९५ हिजरी बुधवारी अस्तमानी सर-कारच्या डाकेबराबर म।। दारोगे.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान त।। छ २४ (किंवा २३) रजब आषाढ वद्य दशमी इंदुवासरपर्यंत मो। पुणें स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ १८ माहे म।।रीं विनती-पत्र डांकेवर पाठविलें. तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान सेवेसी श्रुत जाहलें असेल. त्या उपरि कृपापत्र हुजूरचें इनायतनामे दोन किते छ १४ माहे म।।रीं चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचे लिफाफियासहित रवाना केलें. तें छ २१ रजबीं पाऊन सविस्तारे वर्तमान कळलें व संतोष जाहला. येशवंतराव नाईक व मानाजी फांकडे मुतफिक होणार. व परशरामपंतभाऊचे विद्यमानें फांकडा व नाईकाची सफाई जाहली. व येकत्र होऊन हंगामा करणार हें सत्य वर्तमान. त्यांस वासुदेवबावा गमाजीबावाचे भाऊ, प्रतिनिधीचे कदीम मुतालिक, व सांप्रत पुण्यांत बाळाजीपंतासमीप प्रतिनिधीकडून मुख्तारीनें वासुदेवबावा आहेत. यांचा पुतन्या भांबूराव त्यासीं व वासुदेवबावासीं द्वेष. व प्रतिनिधीचे जागिरींत कितेक गांव भांबूराव यानें मारले, व कितेक गांवापासून खंडणी रुपये घेतले. याकरितां वासुदेवबावानीं त्याचे पारपत्यास्तव फौज पाठविली होती. येशवंतराव नाईक व बाजीराव बरवे व सटवाजी भोंसले वगैरे समग्र येकत्र होणार. यापूर्वी प्रतिनिधीची फौज गेली व लढाईंत भांबूराव यास धरले व मानाजी सिद्या पळाला. याकरितां येशवंतराव नाईक वगैरेचा मनसुबा सेवटास गेला नांही. परंतु नाईक म।।र दंहींगांवांत आहे. याकरितां हुजूरचा इनायतनामा रो कृष्टणरावजीस देऊन रावजीचे विचारें बालाजीपंतनानास मींच नेऊन दिधला. चिरजीव रघोतमराव हुजूर पावले. व तुम्हीं सांगितला म।।र हुजूर अर्ज केला. व हुजूरीहून पंतप्रधानावर कृपा चितापासून व इंगरेजांची तंबी मंजूर, परंतु कितेक कामें तुम्हाकडून हुजूरची होणें, तें होत नांहींत. याकरितां मर्जी मुबारक नाखूष. हुजूरची

कामें कोणतीं व तुमचा खुलासा काय, याची दरयाफ्त व्हावयाकरितां कांही येक तजवीज ठराऊन त्याची इतिला तुम्हास होणार. याप्रमाणे सांगोन येशवंतराव नाईक व मानाजी सिंद्याची तंबी तुम्हीं करावी. ये विषईं इनायतनामा सादर जाहला आहे. याप्रमाणें सांगोन इनायतनामा दिधला. बालाजीपंत नानानीं उतर केलें कीं, येशवंतराव नायकास पूर्वीं ताकीद प्रखर केली आहे, पुन्हा करितों. व मानाजी लढाईंत पळोन गेला, व भांबूराव दस्तगीर केला. बाजीराव बरवे वगैरे येणार होते, ते मानाजीचें सिकस्त जाहल्याचें वर्तमान यैकोन सुरतेकडें गेले. आम्ही सर्व प्रकारें स्थापित व फिदवी हुजूरचे आहोंत. व जो इरशाद जाहला त्या कामावर कमरबस्ता सरगरम व लाखों रुपयाचें पेंचात आलो. हजरतेचे इनायतीनें व मदतीनें इंगरेजांस अजीज आणनें अगाध नांहीं. याप्रमाणें बोलिले. समयोचित श्रीमंत पंतप्रधानांचे कामास, राजश्री राजे दियानतरामजी धोंडोपंत व राजें आमानतरामजी नानाजीपंत बहुत उपयोगी व अर्ज-मारूज युक्तीनें करीत आहेत. व सांप्रत दुसरे ग्रहस्त बानीकार. याकरितां उभयतां हुजूरचे इरशादेप्रमाणें आपले कामावर सरगरम. परंतु श्रीमंताकडील लक्ष ठेवितात. याप्रमाणें नानास सांगितलें. त्यावरून उभयतां स्वामीचा स्तव बहुत केंला कीं, तें फार प्रमाणिक. सांप्रत कामाचा बखेडा पाहून अलाहिदा (अपूर्ण)

श्रीनवास

पै।। छ २ साबान

अखबार पुणें अज इ।। छ १८ रजब लगायत छ २३ माहे मा।र सन ११९५ हिजरी आषाढवद्य दशमी सोमवार.

पंतप्रधानांचे कारपरदाजानीं बंगाल्यांत फौज पाठवावयाची तजवीज करून, रुपयांची मदद पेंशकसीचे यैवजीं किंवा करज द्यावें,

याकरितां हैदरअलीखानास पत्रें लिहून पाठविलीं. व माहदाजी सिंद इंगरेजांचें मुकाबिल्यास सिपरीकोलारसेसमीप आहे. इंगरेजाकडील जमाव पंधरा सोळा पलटणें सध्या अहेंत व पुन्हां सात आठ येणार. याकरितां सिंदे म।।रानीं येथील कारपरदाजास पत्रें पाठविलीं होतीं कीं, फौजेचे निगाहदास्तेकरितां आपले तरफेचा मुतसदी पुणे प्रांती पाठऊन देतों. रुपयाची कांही मदत करावी. त्यावरून कारपरदाजानीं आबाजी नाईक वानवळे वगैरेस सूचना लिहून पाठविली कीं, बतरी (क)कर्ज दोन च्यार लाख रुपयें सिद्यास देणें. रुपयाचा निकाल करऊन देऊं. गणेशपंत बहिरे कोडाईबरीपासून निघाले. पुण्यास येणार. करनल गाडर मुंबईस आहे. जंगी सरजामाची तयारी करितो. या वितरिक्त वर्तमानासहित हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्रें पाठविलीं ते पावलीं असतील. त्यानंतर यैकिले व प्रत्यक्ष जाहलें वर्तमान दफेवार लिहिलें आहे.

बिरेवाडीस हबसियांकडील जमीयत आली होती, ते पांच कोस माघारा जाऊन, काबू पाहून कोण्ही मकान घ्यावें व धामधूम करावी, या तजवीजींत आहेत. व पंतप्रधानाचे तरफेनें गाडदी रवाना जाहले ते घांटाखालें गेले. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें होतें. सांप्रत छ २० माहे म।।रीं वर्तमान यैकिलें कीं, पंतप्रधानाकडील गाडद्यांसी व हबसियांसी तळेंघोसाळयाचेसमीप लढाई जाहली. दुतर्फा लोक ठार व जखमी जाहले. त्याउपरि गाडदी वगैरे पंतप्रधानाकडील तळेघोंसाळयाचे गडचे आश्रयास येऊन राहिलें व हबसी माघारा आपले मकानास गेले. टिकाराम नामे जमादार मातबर गाडद्याचा ठार जाहला. गाडदी माघारा हटले म्हणोन जनवेदंता. दरबारी यैकिलें कीं गोळा गोली परस्परें होऊन हबसी माघारा गेले व गाडदी मजबूतीनें तळयाचे किल्यासमीप आहेत.

जुनें पुण्यांत खजाना आहें म्हणोन कोण्ही मस्तानानें किंवा इतरानें सांगितलें त्यावरून खाणती लाविली. व देंवळाचा पाया

लागला. हें वर्तमान पूर्वी लिहिलें होतें. त्यानंतर खाणतींत तळघराप्रमाणें संगी भोयारें लागलें. त्यांतील माती काढली. आंत कांही निघालें नांहीं. दगड ढासळून पडूं लागलें. व सेवटपर्यंत शोधं घेतला. कांही नफा व लाभ नांहीं. याकरितां चौकी उठविली व शोध घेण्याचा उद्योग मवकूफ केला.

गणेंशपंत बहिरें खानदेंशांत गिरना नदीपर्यंत आले. पागा जमा दोनतीनसे स्वार पुढें रवाना केलें. ते पुण्यास आलें. गणेशपंत सत्वरच येणार.

माहदाजी सिंदे इंगरेजांचे मुकाबिल लढाईस सिपरीकोलारसासमीप आहेत. उमरावगिरी वगैरे गोसावी आठ हजार प्यादे व स्वार सिंद्यासमीप नौकर राहिले आहेत. ते इंगरेजासीं बहुत मजबूतीने लढत आहेत, म्हणोन बालाजीपंत आपलें मुखं सागतात. देशची फौज नवी निगाहदास्त करविली आहे. पांचसात हजार स्वार सिंद्याकडें जातील. हेही पंत म।।रनुलेचे जुबानीं यैकिलें. खंडोजी भोसलें संबलपुरासमीप मोहसरा करून आहेत. ते जागा हस्तगत जाहल्यानंतर, तेथील बंदोबस्त करून नागपुरास येणार म्हणोन भोंसल्याकडील वकीलाचे जुबानीं यैकिलें.

मानाजी फांकडे व भांबूराव दोघांस प्रतिनिधीकडील फौजेंने लुटल्यानंतर भांबूराव दस्तगीर जाहला व मानाजी पळोन गेला. हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. येशवंतराव नाईकाचा बानीकार भांबूराव होता, तो दस्तगीर जाहला. याकरितां नाईक म।।र दंही-गांवी दम खाऊन बसला आहे. बाजीराव बरवे व सटवाजी भोंसलें यानीं मानाजी व भांबूराव यांचें सिकस्तीचें वर्तमान यैकोन, मुलाजिम जमा करून, सुरतेस रघुनाथराव याजकडें गेले म्हणोन बालाजीपंताचे मुखं यैकिलें.

पै॥ छ २ साबान

श्रीनिवास

पु॥ अखबार पुणें. छ २३ रजब सन ११९५ हिजरी. हैदरअली-खानाने त्रिचनापलीस जाऊन इंगरेजासी लढाई केली, व कितेक इंगरेज लढाईंत मेले, व कितेक खंदकांत पडलें. व येकदोन मातबर सरदारा-सहित दोनतीनसे लोक दस्तगीर केले. हें वर्तमान पूर्वील अखबारेत लिहिलहोतें. त्याउपरि छ २२ रजबी हैदरअलीखानाची पत्रें बाळाजीपंत व रास्त्यांस आली, ते नूर म॥ खान व नरसिंग वकील बाळाजीपंतासमीप घेऊन आले. दोन घटका बसलें होते. पत्रें देऊन खान मजकुराकडील वर्तमान सांगून रुखसत होऊन गेले. त्या उपरि हुजूरचा इनायतनामा येशवंतराव नाईकाचे तंबीकरिता आला होता. तो सेवकांनें बाळाजीपंतास द्यावयाकरिता दरबारास गेलो. पंत म॥रनिलेची भेट घेऊन हुजूरचा इनायतनामा दिल्हा व उतर प्रत्योतर जाहलें. ते वर्तमान पृथकपत्री लिहिलें आहे. हैदरअलीखानानें पत्रीं म॥र लिहिला व तो वकीलानी निवेदन केला. तो बाळाजीपंतानी सेवकास सांगितला कीं, त्रिचनापलीची लढाई जाहल्यानंतर खान म॥र जंबुकेश्वरासमीप मुकामात करून राहिला. करनल कूट इंगरेजाचे रुखावर. चिंदबरासमीप मीर रजाअलीखान वगैरे फौज होती. ते, खान म॥रचें सूचनेप्रमाणें, चिंदबरचें देऊळ किल्याप्र॥ मजबूत, तेथील बंदोबस्त करून त्रिचनापलीचे तालुकियांत आली. खाली मकान पाहून करनल कूटनें आपलें जमीयतीसुधा तयार होऊन चिदंबरास आला व देवळावर हला केली. देवळाहून हैदरअली खानाचे लोकानीं व खालून इंगरेजाकडील लोकानी दुतर्फा तोफा व बदुखाची सिलक होत होती. इगरेंजानीं बहुत अंगेज व निकड करून बातेरी व येक दरवाजा देवळाचा घेतला, व तेथून दोन तोफा देवळास लागू केल्या. त्यास हैदरअलीखानाकडील लोक देवळांत होते. ते समग्र येकत्र होऊन शत्रूस मारावें किंवा आपण मरावें, हा निश्चय करून दरवाजा उघडोन बाहेर आलें. व बंदुखाची सिलक करीत इंगरेजानी

तोफा लागू केल्या होत्या, व जमाव जमून मोरचे लावावयाचें तजविजीत होते, त्याजवर चालून आले. दुतर्फा फार निकडीची लढाई जाहली. इंगरेजाकडील लोक फार मारले गेले, व बाकीचे बेइस्तकलाल होऊन तोफा टाकून, मोरचा सोडून माघारा हटून गेले. हैदरअलीखानाचे लोकानीं तोफा त्याच स्थली ठेऊन, इंगरेजावर लागू केल्या, व मजबूतीने देवळाची बंदोबस्ती करून राहिले. हें वर्तमान दुसरे दिवसी हैदरअलीखानास कळलें. तेच समई जंबुकेश्वरापासून बमयफौज कूच करून चिदंबराचें रुखें रवाना जाहला. खान म।।र आल्याचें वर्तमान इंगरेजास कळतांच, चिदंबरापासून कूच केले. प्रहर साहा घटकाचे फुरसतीनें हैदरअलीखान फौजेसहित चिदंबरास आला. इंगरेज कूच करून माघारा गेले हे वर्तमान यैकोन ताकुब केला. इंगरेज महमदमही बंदराचे पनाहास जाऊन राहिले. हैदरअलीखान तीन कोसाचे फासल्याने माहासरा करून मुस्तैदजंग आहे. याप्रमाणे आपले पत्री मजकूर लिहिला. व वर्तमान वकीलानी सांगितलें म्हणोन बाळाजीपंतानी आपलें मुखें सेवकास सांगितलें. त्याप्रमाणे हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिले आहे, हें विनती.

A. R. No. 66.

२४ रजब ११९५ हिजरी
१६ जुलै १७८१

पै।। छ २ साबान सन ११९५ हिजरी बुधवारी अस्तमानी सरकारच्या डाकेबराबर म।। दारोग्याच्या.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल त।। छ २४ माहें रजब मु।। क।। पुणें, स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले प।।. विशेष येथील वर्तमान

छ १८ माहे म।।र रोज बुधवारी प्रातःकाली, सरकारचें डाकेसमागमे, दुसरे दो प्रहरा राजश्री हैबतराव याचे तैनाती जोडीसमागमे, अर्जी-सहित, यैसे दोन विनंतीपत्रे सेवेसी रवाना केली. तें पावोन सविस्तर वर्तमान विदित जालें असेल. तदनतर येथील वर्तमान राजश्री भगवतराव निबालकर येथे से पनास स्वारानसी आले आहें. कारन की याचे पदरी राहून चाकरी करावी अथवा कृष्णरावजीचे विद्यमाने येज्यमानसाहेबाकडून जागीरचा बदोबस्त करून घ्यावा, या अर्थी येथें आले. भेटी वगैर सर्व जाल्या. हें वर्तमान पहिले पाचच्यार विनंतीपत्री तपसीलवार लेखन केले होतें, त्याजवरून ध्यानास आलें असैल. निबालकर म।। येथें तो मोठी उमेद धरून आले. प्रस्तुत त्याची खर्चाची बहुत विपत्य. याचे सरकारचे लोकास रोजमुरें वगैर मिलत नाहीत. मग याचे खर्चाची सोयें कसी पडतें. असो. निबालकर म।।र याचे कारकून रावजीचे घरी येतात की आमचे खर्चाची सोयें करून द्यावी. त्याजवरून रावजीनी उतर केले की प्रस्तुत हजार रुपये दरमाहा देत जाऊ, मग पुढे काय करणें तें करू. त्याजवरून निबालकार म।।र याचे वकील रदबदली करीत होतें की, हजार रुपये दरमाहां कैसा पुरल. मागती रावजीनी उतर केले की या वेगलें काही अधित होत नाही यैसे आहे. मग पुढे ये विशईचें जे वर्तमान ध्यानास येईल ते लेखन केले जाईल, शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. उपरातिक नाना व बाजीपंत व कृष्णरावजी वगैर याचा खिलवत जाला, शृत होयें. १९ माहे म।।र रोज गुरुवार हैदर नायकासीं व इग्रजांसी चिरचनापलीस लडाई जाली. नाईक म।।र यानी इग्रजाची दोन तीन पलटनें गारद केंली. हजार पाचसे मणुश धरून आनिले. हे वर्तमान येथें आलिया-वर कारभारी बहुत संतोश जाले. नाईक म।।रास पत्रें लिहिली की त्याचे पारपत्यच करावें. कदाचित त्यानी सलूकाचा डौल लावला तर हरगीज न यैकावें. हें वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री अक्षरशाह लेखन केले होते, त्याजवरून ध्यानास आले असेल. नाईक म।।र यानी इग्रजाची दोन तीन पलटने दुडविली म्हणौन कारभारी

के. म. ब. इ. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

बहुतच संतोश आहेत. मागतीही नाईक म।।र यास पत्रे पाठविली की, इग्रजाचे पारपत्यच करावे. कदाचित त्यानी सामदामाचा डौल लावला तर हरगिज न यैकावे यैसी पत्रे लिहून पाठविली, शृत होयें. हपशानी तल्याघोसल्याकडें कोकनप्राती उपद्रव माडला आहे. त्याचे पारपत्यास येथून दोन हजार गारदी पाठविले आहेंत. त्यास व हपशासी लढाई जाली. उभयेपक्षी से दोनसे मणुश जाया जाले. इकडील येक जमादार होता तो ठार जाला, यैसे वर्तमान आले. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल, शृत होये. नित्य नाना व हरीपंत वगैर याचा खिलवत होत असतो. भाव यैकिल्यात येतो की, पुढें इग्रजाची मसलतं प्राप्त आहें, त्याचे पारपत्य करावे. त्यास श्रावन मासी डेरे वगैर बाहेर करून दसऱ्याचे हगामास फौज वगैरे जमा करून इग्रजाचे पारपत्याचा उद्वोग करावा. दुसरे कितिक आपलें दौलतीचे बदोबस्ताविशई नित्य खलवत होत असतो. शृत होयें. छ २० माहे म।।र. रोज शुकरवार इग्रज कल्यानीस व ममईस जगी वगैरे सरजामा करितात. पुढे ते सत्वरच इकडे उद्वोग करणार यैसे वर्तमान आहे, शृत होये. राजश्री गनेशपंत बेहेरे कोडाईबरीकडें होते. त्यास कोडाईबरीकडे दुर्गोजी भापकर यास हजार दोन हजार फौजेनसी ठेऊन गनेशपंत पुन्यास येतात. हें वर्तमान पूर्वी लेखन केले होतेच. त्यास गनेशपंत खानदेंशाहून कासारबारी चहडून वरते आले. पुन्यास येतात. सत्वरच येऊन दाखल होनार. गनेशपतानी माहलोमाहाल खानदेंशात बहुत उपद्रव करून खडत्या घेतल्या. फारच उपद्रव केला. सरकारचे माहाल चालीसगाव व देहार या उभयता माहालापासून खडनी घेतली, शृत होये. दरबार वगैर जाला होता, शृत होयें. छ २१ रोज शनवार राजश्री जिवाजीपताकडील पत्रे आली होती. पत्रे घेऊन कृष्णरावजी दरबारास गेले होते. पत्रें नानानी वाचली. उपरातिक नाना व कृष्णरावजी वगैरे याचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की, येज्यमानसाहेबास पत्रें व अर्ज्या लिहिनार, शृत होये. राजश्री भादूराव प्रतिनिधी व मानाजी फाकडे यानी खूल

केले होते. भवानराव प्रतिनिधी याची फौज जाऊन त्याचे पारपत्य जाले. भादूराव धरला. मानाजी फाकडा पळून गेला. हे वर्तमान पूर्वी लेखन केले होत त्याजवरून शृत जाले असेल. राजश्री भादूराव धरला आहें, त्यास येथे पुन्यास घेऊन येणार. मानाजी फाकडा सुरापुराकडे गेला. मागती तो व सटोजी भोसले खूल करून म्हसवडाकडे येणार यैसे वर्तमान आहे, शृत होये. राजश्री हरीपतास येक दोन दिवस जाले ज्वर येत होता. आता आराम आहे, शृत होये. पुन्यात जुन्या कोटात लाहानसे टेकूड मातीचे होतें. कारभाऱ्यास कोन्ही सांगितले की येथे माल आहे. त्याजवरून त्या मातीचे टेकडावर चौकी बसऊन खनावयास लावले. पुरुश दो परसे खणले. सेवटी तेथे काही सापडले नाही. उगेच कोन्ही बहकाऊन सागितले म्हणून खणले. सेवटी काही सापडलें नाही, शृत होय. छ २२ रोज रविवार राजश्री कृष्णराव दरबारास गेले होते. रावजीसी व नानासी वगैर खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की, आनिक हैदर नायेकाकडें काही पत्रे वगैर लिहिणार. काये मजकुराची पत्रे लिहितील हे कळल्यावर लेखन केले जाईल, शृत होये. श्रीमत वाडयात घोडी वगैर फिरवीत असतात व तीरदाजी वगैरे करीत असतात, शृत होयें. सध्याकाली नाना राजश्री त्रिबकराव दीक्षित याचें घरी गेले होतें. ते मातबर सावकारी करीत असतात. त्याजपासी काही यैवज कर्जाऊ मागनार म्हणौन गेले होते, शृत होये. छ २३ रोज सोमवार मामलतदार वगैर मिलाले आहेत. खानदेशचें दोन तीन माहालची रसद घेऊन माहाल मामलतदारास सागितलें. मामलेदाराचे काम ज्यारी आहे. शृत होये. हैदरनाईक याचे वकील दरबारास आले होतें. त्यासी व कारभाऱ्यासी खिलवत जाला. भाव यैकिल्यास आला की नाईक म।।र यास पत्रे लिहिणार. शृत होयें. दरबार वगैर जाला होता. विदित होये. श्रावन सुद ५ चा धर्म पनास हजार रुपये करावा यैसा निश्चयें जाला आहे. यैवज सावकारापासून घेऊन दक्षना पचमीची करनार. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ ६ माहे

म।।र व छ १२ माहे म।।र यैसी दोन आज्ञापत्रे व छ १२ माहे जमादिलाखरचा इनायतनामा सादर करून पाठविला. इनायतनामा ज्यवाबी व आज्ञापत्रे छ १९ माहे म।।री सरकारचे डाकेसमागमे पावले. पाऊन बहुत संतोश जाला. आज्ञापत्री सादर केले की बारीक मोठे वर्तमान शोधून वरचेवर लिहित जाणे, यैसी आज्ञा सरकारची आहे. त्यास आज्ञाप्रमाणे डाकेसमागमे हजूरात अर्ज्या व विनंतीपत्रे तपसीलवार रवाना होतात. शृत होये. छ १४ माहे म।।रचे आज्ञापत्र व छ २६ व छ २७ माहे जमादिलाखरचे दोन इनायेतनामे सादर करून पाठविले ते छ २१ माहे म।।री सरकारचे डाकेसमागमे सेवकास पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव इनायेतनामे व आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ आहेत. सर्व उमेद स्वामीचे चरनाची आहे. सेवकाचे जागिरीचे खेड्यास गनेशपंत वगैरे व खानदेशचे सुभेदार यानी उपद्रव देऊन मनमाने तैसा यैवज घेतला. ये विशईचे वर्तमान अहवालाचे छ १८ माहे म।।री डाकेसमागमे व हैबतराव याचे जोडीसमागमे विनंतीपत्र पाठविले आहे त्यात सविस्तर खेडयाचा म।।र लिहिला आहे त्याजवरून ध्यानास येईल. विनंती लिहिल्याप्रमाणे सेवकाचे खेडयाचे बदोबस्ताविशई सरकारचे इनायेतनामे व स्वामीचे पत्रे येथील कारभाऱ्यास व कृष्णरावजीस सादर जाले पाहिजेत. सर्वस्वे माझी लज्या स्वामीस आहे. माझे सर्वस्वे पालिग्रहन करनार स्वामी आहेत. बहुत काये लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 67. (पो.ता.) २ शाबान ११९५ हिजरी
२४ जुलै १७८१

पै।। छ २ शाबान सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी.

आहेत. परंतु, समयोचित हुजूर अर्ज करणें व लक्ष ठेवणें हेंच फार व प्रामाणिकास उपयोगी. चिरजीव राजश्री रघोतमराव यानीं प्रथमतां स्वामीची भेट जाहल्यापासून, हुजूरची मुलाजमत व इतरांच्या भेटी, व श्रीमंत राजश्री राजे भाऊसाहब व स्वामीसहित कृष्टणरावजीचा मनोदय जे होता, व यानी जे मतलब सांगितले ते हुजूर अर्ज केले. व उभयता स्वामीनीं रावजीची फिदवियत व एकनिष्ठता हुजूर याची पुष्टता करून, अर्ज मारूज करून, रावजीचे येण्याविषयी रावजीस व बालाजीपंतास इनायतनामे सादर होणार, हा समग्र कचा म॥र कृष्णरावजीस सांगितला. त्यावरून रावजी बहुत संतोष जाहले. व स्वामीचा स्नेह प्राचीन व पूर्वापार येक पद्धत. व श्रीमंताचे शुभचिंतक, व हुजूरचे येकनिष्ठ सेवक, याचा स्तव फार केला. श्रीकृपे करून इनायतनामे मुतजमनतलब आल्यानंतर कृष्टणरावजी हुजूर येतील. परस्परें रसायन होऊन यैक्यता व चौथाईचे तहाचा बंदोबस्त तो प्रकार करतील. इनायतनामे येण्याची इंतजारी आहे.

चिरंजीव रघोतमरायानीं स्वामीचे कृपेचा व ममता, तीर्थरूप राजश्री नानास्वामीप्रमाणें व सत्कार व सन्मान हुजूर व इतर स्थळीं विशेष करविला. याचा विस्तार चार बंद लिहिला होता. त्यास दुसऱ्याकडून जितकी सेवा घडली तितकी प्रीती करावी, हें उतम. पुरुषार (था)ची रीती व चितापासून विशेष प्रीती करणें, व दुसऱ्याकडून कांहीं उपयोग असो किंवा नसो, कृपा व ममता करीतच जावी हा रूणानुबंध. यास निमित सापेक्षित नांहीं. चिरजीवाची गणना चिरंजीवांत पूर्वीच केली. त्या अर्थीं पोटांतील उत्साहानुरूप जें योग्य तें आपण कृपा करीत आहेत. मीं विशेष विनती काय ल्याहावी. हुजूर ज्या कामास येथोन मीं पाठविलें व स्वामींनी कृपा करून समीप ठेविलें, त्याप्रमाणें कितेक कामाची मी विनंती करावयाचा म॥र चिरजीवास सांगितला. त्याप्रमाणें सरफराजी करून सत्वर इकडें मार्गस्त करावें. बहुत काय लिहिणें, हे विनती.

विनतीजे. राजश्री बालाजीपंत नानास व रो कृष्टणरावजीस

हुजूरचें इनायतनामे आले. याचीं उतरें अर्जिया माघाऊन उभयतां-कडून घेऊ. हुजूर रवाना करितों, हे विनती.

A. R. No. 68. (पो.ता.) ३ शाबान ११९५ हिजरी
२५ जुलै १७८१

पै॥ छ ३ माहे शाबान संन ११९५ हिजरी

पुरवणी २

सेवकाची जागिरीची खेडी प्र॥ चालीसगाव व प्र॥ बेदर प्रात खानदेश येथे आहेत. गतवर्शी र॥ गनेशपंत बेहेरे गेले. त्यानी अकरासे रुपये खड घेतला. सिवाये खर्चवेच. त्यामुलें गांव खराब जालें. र॥ बापूजी होलकर यानी पाच साहासे रुपये घेतले. दुसरे खानदेशचे सुभेदार नारो कृष्ण, त्याचे फडनीस सिवरामपंत, त्यानी सुभेपटी व दहक वगैर मिळून पाच सातसे रुपये घेतले. नानाप्रकारचें उपद्रव. त्यामधे कमाविसदाराचे उपद्रव ते काये ल्याहावे. यामुले गावची वसाहत होत नाही. प्रस्तुत गनेशपंत बेहेरे इकडे येतात. त्यानी आमचे गावाजवल मुकाम केला. गाव गाव स्वार पाठऊन सात आठसे रुपये घेतले. सिवाये खर्च. दुसरे पिपरखेड म्हणौन गाव जागिरीत आहे. तेथील पाटलाचा कर्जदार गनेशपताजवल फिर्याद जाला. ते कर्ज बहुता दिवसाचे देऊन घेऊन काही राहिले न राहिले यैसे होते. कर्जदार फिर्याद जाला. म्हणौन गनेशपताने त्या पाट-लावर मसाला मारून स्वार पाठविले. तो पाटील गरीब त्याची अबरु घेतली. तुफानाची गोष्ट. त्यात देयास नाही हे जाणौन त्या पाटलाने पोट कटयारी करून प्रान दिल्हा. या प्रमाणे याजकडील उपद्रवाच्या गोष्टी आहेत. कोन्ही पुसता नाही. यैसे जाले. हे सविस्तर वर्तमान कारभाऱ्यास व कृष्णरावजीस सागितले. समा-धानपूर्वक मात्र गोष्टी सागतात, परतु येकही गोष्ट अमलात येत

नाही. ज्याचे चितास येईल तो लुटितो. नानाप्रकारे तुफाने उभे करून खून होतात. यैसा अतिशये आहे. सुभेपटी वगैर सरकारचे तालुक्यात घ्यावयास प्रयौजन नाही. यैसे असून पटी वगैर घेतात. हा बोभाट सागितला. त्याजवरून सरकारची पत्रे दिल्ही की सुभेपटी वगैरे न घेणे. सुभ्यानी पत्रे अमान्य करून यैवज घेतला. ते सुभेदार येथे आलेत. त्यास समक्ष ताकीद होऊन यैवज माघारा देवीत नाहीत. पत्रे खरी देतात किवा खोटी देतात याचा अर्थ ध्यानास आनावा. सेवकाचा खर्चवेच व संसार भारी. त्यामधे खेड्याची अवस्ता या प्रकारची. याजकडील उपद्रव या प्रकारचा आहे. स्वामीस कळावे म्हणौन लेखन केले असे. ये विशई इनायेतनामे कारभाऱ्यास व रावजीस निक्षून आले पाहिजेत की, इतका उपद्रव करावयास प्रयौज्यन काये. गनेशपंत वगैर यानी यैवज घेतला असेल तो माघारे देवणे, व पुढे हरकोन्हाचा उपद्रव न होये ते करणे. सुभेदार खानदेशाचे सुभेपटी वगैरेचा यैवज घेतात याचे कारन काये. सुभेपटी वगैरेचा यैवज घेतला आहे तो माघारा दवणे. पुढे पटी वगैरेचा यैवज न घेत ते करावे. हरयेक विशई याचे साहित्य होत असावे. या अनवये इनायेतनामे सादर करनार स्वामी समर्थ आहेत. माझी सर्व लज्या स्वामीस आहे स्वामी वेगला कोन त्राता आहे की त्यास आपले सुख दुख सागावे. ती।। देवाजीपताचे आमरन स्वामीनी चालविले. पुढे माझी लज्या सर्व स्वामीस आहे, हे विज्ञाप्ती.

A. R. No. 69.

२५ रजब ११९५ हिजरी
१७ जुलै १७८१

पै।। छ ४ शाबान गुरुवार त्रितीये प्रहरी सरकारच्या डांके-बराबर पावले. सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां। नमस्कार विनती उपरि.

येथील वर्तमान ता।। छ २५ रजब बुधवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष कृपापत्र छ १७ माहे म।।रचें, हुजूरचा इनायतनामा व नवाब मोइनुदौलाचें पत्र, व चिरजीव राजश्री रघोतमराव यांचा लिफाफा, सेवकास व राजश्री कृष्टणरावजीस हुजूरचा इनायतनामा मुतजमनतलब हुजूर, व मोइनुदौलाचें पत्र, व स्वामीचें पत्र येणेंप्रमाणें डांकेवर पाठविलीं. तें छ २४ माहे म।।रीं दोन घटका दिवस आल्यानंतर पावलीं. व त्रितीय प्रहरीं राजश्री कृष्टणरावजीस इनायतनामा व पत्रें समग्र पावतीं केलीं. रावजीची आरजू येक वर्षापासून जे होती ते सांप्रत स्वामीचे सईवर यजमानसाहबानीं बार आणली. या उपरि स्वार होऊन हुजूर जावें. याचें मोहूर्त पाहून निघावयाचा निश्चय करावा. या प्रमाणें सेवकानें रावजीस सांगितलें. त्यानीं उतर केलें कीं, इनायतनामा सादर जाहला त्यापक्षीं मुहूर्त पाहून निघांवें, हाच निश्चय. परंतु राजश्री जिवाजीपंतांचीं पत्रें हुजूरचे इनायतनाम्यासहित याच समईं आलीं. आजी येकादसी यास्तव दरबारास जात नांहीं. उदईक द्वादसी. बुधवारीं दरबारास जाऊन नानास सर्व वर्तमान सांगतों. व नानाचे व हरीपंताचे व आमचें मसलहतीनंतर जो निश्चय होईल, त्याप्रमाणें तुम्हास उतर सांगून, हुजूरचे इनायतनाम्याचें उतर लिहून देवितों. व या उपरि मुहूर्त पाहून निघावें हाच निश्चय. याप्रमाणें बोलिले. रो गोविंदरावजीस स्वामीचें पत्रें पावतें केलें. तें स्वामीचे भेटीचे बहुत आरजूमंद आहेत. माघाहून सत्वरच रावजीचे निघावयाचे सिधांतांचें वर्तमान लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें, हे विनती.

पै।। छ ४ शाबान

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे .

छ १७ रजबचे रवानगीपत्रीं आज्ञा होती जे रो कृष्टणराव व गोविंदराव यांचे नांवें पत्र लिफाफे खुले पाठविले आहेत. मुनासिब पाहून देणें. त्यास हें लिहिणें मजला योग्य. स्वामीचे चालीची प्रवृती व सलाह श्रीहरीची कृपा ज्याजवर त्यासच प्राप्त होईल. बहुमानपूर्वक आपण आज्ञा करितात हे थोरांची पध्दत. आज्ञेनुरुप पत्रें वाचून गोंद लाऊन रावजीस व गोविंदरावजीस पावती केलीं. चौथाईचा तह हुजूरचे मर्जीप्रमाणें जाहला पाहिजे. म्हणून हुजूरचे आज्ञेप्रमाणें स्वामीनीं व चिरंजीवानीं व नवाब मोइनुदौला बहादरानीं लिहिलें. याविषईं रावजीनीं संशय घेऊन बहस फार केली. व त्याचें उतर सेवकानें समर्पक केलें व इंगरेजांचे नकशाचा करारा कोणे प्रकारचा जाहला याचाही तपसील फारच आहे व येथें बोलिले. मी उतर केलें कीं हुजूरचे तरफेनें पुरतेपणें वाकिफकारी नांहीं याकरितां येथें काय बोलावें. सांप्रत तुम्हीं हुजूर गेल्यानंतर हुजूरचे मुकरब व उमेद बानीकार तुम्हास लाजवाब करतील याचा विशेष नांहीं. चिरजीव रघोतमराव सर्व वर्तमानास वाकिफ जाहले आहेत, तेच तुम्हास लाजवाब करतील. सारांश, रावजीचे तरफेनें हुजूर येण्याचा निश्चय जाहला. कारभाऱ्यांसी सलाहमसलत करून त्यांचे समतें करून निश्चय जाण्याचा हुजूरचे अर्जीत लिहून पाठवणें बाकी आहे. श्रीकृपेनें सत्वरच अर्जी येईल. जिवाजीपंताचा प्रकार व प्रभाकरपंताचा म।।र चिरजीवानीं तपसील-वार लिहिला तो समग्र गोविंदराव यांस सागितला. स्वामीचे दर्शनानंतर परस्परें सर्व वर्तमान ध्यानारूढ होईल. मींहीं किसा सेवेसी लिहीन. दुनयवी लोक सर्व काबूचे यार यांत संशय नांहीं, हें माझें मत. चिरजीव राजश्री रघोतमराव योग्य व जवाबसाल व अर्जमारूज व लिहिण्यांत चांगले उगवले. खातरजमा जाहली म्हणोन पत्रीं आज्ञा. स्वामीचे कृपेंचा पूर्ण आधार व चिरजीवानी योग्य व्हावें हे इछा तीर्थरूपजीची व माझी. सांप्रत स्वामीनी त्यांची योग्यता पसंद केली त्या अर्थीं त्यांची सरफराजी व मजला व तीर्थरूपजीस स्वस्थता जाहली. व चिरंजीव स्वामीची कृपा संपांदतील याकरितांच मी सेवेसी पाठविलें. व तेहीं बहुत आरजूमंद होते यास्तव सेवेसी आले. त्यांचे सरफराजींत सेवकाची सर्व प्रकारें

सरफराजी यास्तव विनतीजें. सांप्रत यजमानाचे सेवेंत सेवकास प्रतिबाधकता फार आहे. चिरजीवाचे सरफराजींत मुक्तता आहे. या राजद्वारीं दरबारी काम सर्व चिरंजीवाचे स्वाधीन करून मुख्तार त्यांस मी केलें. हुजूरीहून कांहीं राजकारणसंमधी इरशाद जाहल्यापक्षीं चिरजीव सलाह पुसतेत त्याप्रमाणें सांगणें व दरबारास जाणें लागतें. सांप्रत चिरजीव हुजूर आले आहेत याकरितां त्यांची हस्तकता करणें प्राप्त. स्वामी कृपा करून त्यास सरफराजीपूर्वक रुखसत करतील व ते येतील तो सुदिवस, हे विनती.

पै।। छ ४ शाबान

श्रीनिवास

पुरवणी अखबार पुणें छ २५ रजब सन ११९५ हिजरी.

मानाजी फांकडा सिंदा पंढरपुरावर प्रतिनिधीकडील लढाईंत पळोन गेला. व सटवाजी भोंसला व बाजीराव बरवे सुरतेस रघुनाथराव यांजकडें गेले. हें वर्तमान छ २४ माहे म।।री अखबार रवाना केली त्यांत लिहिलें होतें. त्यानंतर छ म।।रीं दुर्गोजी भापकराकडील कलमी खबर येथील कारपरदाजास आली की मानाजी सिंदा व सटवाजी भोंसला व आनंदराव जाधव व बाजीराव बरवा हजार स्वारानसीं कूच दरकूच सुरतेस जात होते. गणेशपंत बरवे यानी भापकरास लिहून पाठविलें कीं मानाजी सिंदा वगैरे पंढरपूरचे लढाईंत सिकस्त खाऊन पळोन जात आहेत. तुमचे काबूंत आलियां यांस लुटणें. त्यावरून भापकर वर्तमानाचे शोधांत होतें. कोल्हेरसमीप मानाजी सिंदे वगैरे आले ते समईं भापकरास खबर कळली कीं जमीयत थोडकी आहे व कबीलेसुधां जात आहेत. दुर्गोजी भापकराकडील च्यारपांचसे स्वार कांही लमाणाची भरताड सुरतेकडें जात होती ते लुटून आणाव-

याकरितां गेले होते. व च्यार पांचसे लोक भापकरासमीप होते. त्या संधीत हें वर्तमान आलें. व तयार होऊन मानाजी व सटवाजी भोसले वगैरे वर चालून गेले. कोल्हेरीपासून पांच कोस पुढें केळखामळया-समीप गांठ पडली. व परस्परें हमजातीची लढाई जाहलीं. दोन घटका लढाई जमली. मानाजी सिंदा वगैरे हजार अकरासे स्वार होते याकरितां गालिब पडले व भापकर पसपा होऊन सांभाळून माघारा फिरले. मानाजी वगैरेनीं तीन कोस ताकूब केला. व मानाजी व सटवाजी व आनंदराव जाधव यानीं भापकरांस बहुत शरमिंदे केलें कीं तुम्हीं व व आम्हीं येकजात व शरीरसंमधी व सिपाहगिरीचा बाना बाळगितों. आम्हांपुढें तुम्हीं पळतां हा जंग तुम्हावर आहे. याप्रमाणें बहुत लाजविलें त्यावरून दुर्गोजी व परवतराव व अमृतराव वगैरे भापकर माघारा फिरले. पावसाकरितां चिखल जाहला व घोडयांस धावणीस फार किलत जाहली. याकरितां भापकरांचे सरदार व कितेक लोक प्यादें जाहले व घोडीं सोडलीं. त्यासमईं मानाजी व सटवाजी भोंसले वगैरे प्यादे जाहले. परस्परें तलवार व भाल्याची लढाई जाहली. सटवाजी भोंसल्याचे तोंडावर परवतराव भापकराचे तलवारीची जखम लागली. व सटवाजीनें तलवार चालविली ते परवतराव भापकरास लागून दोन बोटें हाताचीं तुटलीं. मानाजी सिंदा व सटवाजी भोंसला याची व अमृतराव भापकराचे लढाईत परस्परें जखमी जाहलें व अमृतराव भापकर ठार पडला. त्यानंतर भापकरानी लढाई मवकूफ करून जमून उभे राहिले. मानाजी सिंदे वगैरेही माघारा फिरोन गेले. दाहावीस घोडीं मानाजी वगैरे कडील भापकराकडें आली व भापकराकडील वीस पंचेवीस घोडें सटवाजी व मानाजी वगैरेनीं नेली. या प्र॥ छ २४ माहे म॥रीं वर्तमान आलें. येथील कारपरदाजांचे जुबानीं भापकराचीं फते जाहली व मानाजी वगैरे पळोन गेले. व अमृतराव जखमी फार आहे. सदरहू खारिज व कारपरदाजांचे सांगितल्याप्रमाणें लिहिलं असे. श्रुत होय, हे विनती.

२

पै।। छ ४ शाबान

पुरवणी अखबार पुणें छ २५ रजब सन ११९५ हिजरी. गणेशपंत बहिरे खानदेशांत गिरना नदीवर आले हें वर्तमान पूर्वील पत्री लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं गाडदी वगैरे सिबंदीचे लोकानीं अडविलें, याकरितां लोकांचे समाजाविसीकरितां मुकामात करून राहिले आहेत.

प्रतिनिधीची फौज सदासिवपंत खाडेलकर दि।। वासुदेवबावा यासहित मानाजी फांकडे वगैरेचे तंबीस गेले होते. ते छ २४ माहें म।।रीं पुण्यास आले व वानवडीसमीप मुकाम करून राहिले. छ २५ रोजी बालाजी जनार्दन इस्तकबाल जाऊन भेटले. सदासिवपंत बालाजीपंताचे हमराह म।।रनुलेचे हवेलीस आला. व फौज सात आठसे स्वार वानवडीसमीप आहे.

छ २४ माहे म।।रीं पंतप्रधानांची स्वारी पर्वतीस गेली होती. वाघावर हाती घालून सेर केले. येके हातीनें वाघावर चोट चालवून जांया केले.

A. R. No. 70.

२६ रजब ११९५ हिजरी
१८ जुलै १७८१

पै।। छ ४ शाबान संन ११९५ हिजरी, रोज बुधवार डांकेबरोबर.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल त।। छ २६ माहे रजब, मु।। पुणे, स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन, स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पा।. विशेष येथील वर्तमान

छ २४ माहे म।।र रोज मगळवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले. ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर येथील वर्तमान, येकादसी म्हणौन तिसरे प्रहरी श्रीमत व नाना वगैरे कारभारी स्वारी तयार करून परवतीचे दरशनास गेले होते. दर्शन वगैरे करून दोन तीन घटका तेथें बसल होते. वाघ आणून त्याजवर हाती घातला. त्या हातीनी वाघास जाया केले. याप्रमाणे च्यार घटका तमाशा करून श्रीमत व नाना वगैरे कारभारी वाडयात आले. श्रीमताची स्वारी हातीवर होती. खवासीत नाना व अपा बळवत यैसे उभयेता होते, शृत होये. रो हरीपतास पाच च्यार दिवस जाले ज्वर येत असतो. काही येक आराम आहे. परतु पाच सात दिवस जाले दरबारास येत नाहीत. त्याचे परामृशास नाना आले होते. च्यार घटका बसले होते. दोन घटका नाना व हरीपत याचा खिलवत जाला. उपरातिक नाना आपले वाडयात गेले, शृत होये. छ २५ माहे म।।र रोज बुधवार, मानाजी फाकडे व भादूराव प्रतिनिधी यासी व भवानराव प्रति याचे फौजेसी पढरपुरावर लडाई जाली. भादूराव धरला व मानाजी फाकडा पलून गेला. हे वर्तमान पूर्वी तीन च्यार विनंतीपत्री तपसील-वार लेखन केले होते त्याजवरून शृ(त) जाले असेल. प्रस्तुत वर्तमान आले आहे की राजश्री सटोजी भोसले सुरापूरचे लत्याकडे होते. त्यास सटोजी भोसले व मानाजी फाकडे व बाजीराव बरवे व भादूराव प्रतिनिधी याचा पुत्र यैसे येकत्र होऊन, चार हजार फौजेनसी खानदेश प्राताकडून कोडाईबारीकडे कूच दरकूच गेंले. र।। गने(श)पंत बेहेरे कासारबारीखाले होते. र।। दुर्गोजी भापकर कोडाईबारीवर दोन हजार फौजेनसी होते, त्यास सटोजी व मानाजी फ़ाकडे वगैरे हे दुर्गोजी भापकर याजवर चालून गेले. यासी व त्यासी लडाई जाली. उभयेपक्षी पाचच्यारसे मणुश जाया जालें. से दोनसे घोडी भापकर म।।र याची फाकडें म।।र यानी आनिली. दुर्गोजी भापकर सिकस्त होऊन निघाले. याप्रमाणे लडाई होऊन सटोजी भोसले व मानाजी फाकडे व बाजीराव बरवे वगैरे च्यार हजार फौजेनसी कोडाईबारी

उतरून सोनगडास गेले. पुढे ते सुरतेकडे जाणार यैसे वर्तमान आले. त्याजवरून कारभारी शेशाकित जालें. प्रस्तुत याप्रमाणें वर्तमान आले. मागती काये त्याजकडील वर्तमान तहकीक येईल हे लेखन केले जाईल परतु हे वर्तमान तहकीकच बोलतात, शृत होये. तमाम सिलेदार वगैरें लोकास पत्रे लिहितात की श्रावनमासी डेरे वगैरे बाहेर होनार. दसऱ्याचें हगामास सत्वर जमा व्हावे, शृत होये. हैदर नाईक याची पत्रे आली. पत्राचा भावार्थ हाच की दोन तीन पटलनें (पलटने) त्यानी दुडविली. दुसरे कितीक स्नेह भावाच्या गोष्टी लिहिल्या होत्या. याप्रमाने पत्राचा भावार्थ यैकिल्यात आला. कारभारीही नाईक म।।र याचे ठिकानी बहुतच संतोश आहेत. वरचेवर नाईक म।।र यास बहुत ममतेंची पत्रे लिहितात, शृत होय सिद्यासी व इग्रजासी लडाई आहे. इग्रजाचा ज्यमाव विशेष आहे, यैसे वर्तमान आहे, शृत होये. दुर्गोजी भापकर च्यार पाचसे स्वारानसी कोडाईबरीकडे अंतापुरावर होतें. सटोजी भोसलें व बाजीराव बरवे वगैरे सातसे स्वारानसी होते. भापकर म।।र यासी व सटोजी भोसले वगैरे यासी छ १५ माहे म।।री लडाई जाली. परस्परें से पनास मणुश जाया जाले. दुर्गोजी भापकर याचा तरवारेच्या जखमेने हात उडाला. अमृतराव भापकर ठार पडला. याप्रमाणे लडाई होऊन सटोजी भोसलें वगैरे सोनगडास गेले. पुढें ते सुरतेस दादासाहेबाकडे जाणार यैसे वर्तमान सरकारात लिहिले आले, शृत होये. भवानराव प्रतिनिधीकडील वासदेवबावा पढरपुराकडें गेले होते ते तीन च्यारसे स्वारानसी आलें. नाना त्याचें भेटीस सात कोस गेले होते, शृत होये. किती बोलतात की सटोजी भासले यासमागमे मानाजी फाकडे गेले नाहीत. कितीक बोलतात की गेले. परतु सटोजी भोसले तर लडाई करून गेले. यैसे वर्तमान तहकीक आलें. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 71 २९ रजब ११९५ हिजरी
२१ जुलै १७८१

पै।। छ ८ माहे शाबान सन ११९५ हिजरी, सोमवार अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार. विनती उपरि. छ १६ व छ १८ रजबीं स्वामीनीं पत्रें व इनायेतनामे रो॥ कृष्टणराव बलाळ यांस हुजूर येण्याविषईं इनायतनामा सादर जाहल्यासहित पत्रें पाठविलीं. तें छ २४ माहे म।।रीं पावलीं. व रावजीस पत्रें पावती केलीं म्हणोन छ २६ माहे म।।रीं हुजूर अर्जी व स्वामीचे सेवेसी पत्रें डांकेवर रवाना केलीं. तें सेवसी व हुजूर पावली असतील. छ २४ माहे म।।रीं सेवकानें हुजूरचा इनायतनामा व नवाब मोईनुदौला बहादरांचें पत्र व स्वामीचें पत्र व चिरजीव रघोत्तमराव यांचें पत्र कृष्टणरावजीस पावतें केले. तेच समईं कृष्टणरावजीनीं निश्चय केला कीं, मोहूर्त उतम पाहून हुजूर जावयाचा निश्चय करितां श्रावणी पौर्णिमास छ १३ शाबानपर्यंत येथोन स्वार होऊं जाण्याविषईं बालाजीपंताचें अनुमोदन पाहिजे व यांचे विचारानें सित्धांत व निश्चय करावा लागतो. याकरितां बालाजीपंतांसी बोलून निश्चय करूं. त्यानंतर हुजूरचे इनायतनाम्याचें उतर अर्जी देऊं. छ २५ रजबीं कृष्टणरावजी दरबारास गेले नांहींत. छ २६ रोजी बालाजी-पंताचे घरीं हरीपंत व कृष्टणराव व उभयतां गोविंदराव व बालाजी-पंत पांचाची खिलवत जाहली. दाहा घटकापर्यंत खिलवत जाहली. त्या उपरि मजलस बरखास्त जाहली. छ २७ व छ २८ दोन रोज हरीपंत व बालाजीपंतांची खिलवत जाहली. सेवकानें कृष्टणरावजीस विचारिलें कीं, बालाजीपंत स्वमुखें तुम्हांस जा म्हणतील, ते समईं जिवाजीपंताचे विद्यमानें जो इनायतनामा तुम्हांस आला आहे, त्याचा जवाब अर्जी लिहून देणें. हुजूर जांण्याचा सित्धांत मजला सांगतां त्या अर्थी रघोतमराव यांचे विद्यमानें हुजूरचा इनायतनामा

व मोईनुदौला बहादर यांचें पत्र, व राजे अमानतरामजीचें पत्र, व रघोत्तमराव यांचें पत्र तुम्हास जें आलें, त्याचे ज्वाब लिहून देणें. म्हणजे हुजूर निश्चय होईल कीं कृष्टणराव येतात. दोन दिवस आधिक उणें तुम्हीं जाल, ये विषईंचा संशय हुजूर होणार नांहीं. त्यावरून आजी छ २९ रजब रविवारीं रावजीनीं उभयतां गोविंदराव यांस सागितले कीं, रघोतमराव यांचे विद्यमानें हुजूरचा इनायतनामा व इतर जें पत्रें आली आहेंत, त्याच दरजवाब लिहून देणे. गोविंदराव यानीं निश्चय केला कीं, उदईक छ १ शाबान सोमवारीं पत्रें लिहून सिध करितों. छ २ माहे म।।रीं रवाना करणें. श्री कृपेने रावजी-कडील पत्रें सत्वरच हुजूर व स्वामीचें सेवेसी डांकेवर रवाना करितों. या उपरि कृष्टणराव यांचे येण्याविषईंचा संशय किमपि राहिला नांहीं. यैसा निश्चय यांचे भाषणावरून जाहला. सेवेसी श्रुत होयें. अखबार छ २६ रजबीं रवाना केली होती. त्या उपरि छ म।।रपर्यंत पृथक लिहून सेवेसी पत्रें पाठविलीं आहेंत. बहुत काय लिहिणें, हे विनती.

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी विनतीजे. कृष्णरावजीस हुजूरीहून मुतजमीनतलब इनायतनामा आला आहे. त्यास रावजीनीं गोविंदराव यांचें इतिफाकानें सेवकास सांगीतलें कीं या उपरि हुजूर जाण्याविषईं कांहीं उजूर नांहीं. आम्हीं आपलें तरफेनें जे इछित होतो, त्याप्रमाणें हुजूरचा इनायतनामा सादर जाहला. श्रावणी पौर्णिमेपर्यंत निश्चयरूप स्वार होतों. परंतु राजकारणी काम राजश्री नानो व हरीपंत यांस वर्तमान सांगितलें. व आमचें व त्यांचें परस्परें उतर प्रत्योतर जाहलें. पुन्हां येकदोन बैठकी होऊन नानाकडून सित्धांत करऊं, तें समईं अर्जी हुजूर लिहून पाठऊं,

सांप्रत जिवाजीपंतास आम्हीं लिहिलें आहे कीं, बमोजिब इरशाद येतों. तुम्हींही याच प्रमाणें लिहिणें. याप्रमाणें रावजीनीं सांगितलें. सारांश, रावजीचे येण्याचा अनमान व संशय किमपि दिसत नांहीं. वर्षपर्यंत इनायतनामा यावयाचा प्रयत्न करीत आहेत. व सांप्रत बहुत प्रयत्नें करून इनायतनामा सादर जाहला याउपरि, कृष्टणरावजी-कडून कांही दिकत निघाल्यास, पंतप्रधानाचे व हुजूरचे बिगाडांत बाकी कोणती राहिली? कृष्णराव हुजूर न आल्यापक्षीं, येथील कारभाऱ्यांचें चितांत कृत्रिमता व परस्परें सावध राहांवें हाच सिधांत. हैदरअलीखांनाची व पंतप्रधानांची ऐक्यता जाहली आहे. व खान म।।र इंगरेजांवर गालिब आहे. इंगरेजांसी इतिफाक हैदर नायकाचे अनुमताविंतरिक्त येथील कारभाऱ्यांस सर्वथैव करणें नांहीं. कृष्टणरावजी हुजूर आल्यानंतर इंगरेजांसी बिगाड करावा म्हणोन पूर्वी हुजूरचा इरशाद जाहला आहे. व नकशाप्रमाणें हुजूरची फौज सिकाकोल वगैरें मुलकात गेली नाही. याकरितां कृष्टणरावजीचे चितांत ज्वाबसाल करावयाची अरजू फार आहे. ज्वाबसालांत हुजूरीहून हे कायल जाहल्यास, हुजूरचें इरशादेप्रमाणें यैकतील. हे कायल न जाहले व हुजूरचें मर्जीप्रमाणें चौथाईचा फैसला व इंगरेजांची तंबी हुजूर मंजूर नांहीं, हाच निश्चय जाहल्या-पक्षीं, कृष्टणरावजीस येथील कारभाऱ्यानीं बहुत दिवस सांगितलें आहे कीं, इंगरेजांचा मजहला तुटजोपर्यंत हजरत बंदगानआलीचे सरदार चौथ वगैरेचा अमल देत नांहीत, व सांप्रत हुजूरीहूनही चौथाईचा अमल बंद करविला आहे. याकरितां स्नेहाविंतिरिक्त दुसरी गोष्ट आम्ही उचार करीत नांहीं. जे दिवसी इंगरेजाचा दारमदार होईल, ते समईं आम्ही स्वस्थ बसूं. हैदरआलीखानाकडून बेअदाई जाहलियां, त्याची तंबीं जे मुनासिब असेल तो हुजूरीहून होईल. या अर्थीं कृष्टणरावजी हुजूर गेल्यानंतर जे गोष्ट कौल करारांत आली ते ठरऊन, जे मर्जीमुबारकेस आलें त्याप्रमाणें हुजूरीहून इरषाद होईल. तरी समयावर द्रिष्टी देंऊन कृष्टणरावजीनीं हुजूरचे इरषादें-प्रमाणें कबूल करांवें व रुखसत घेंऊन यांवं. या समईं मर्जी

तोडू नय. पुढें आपली काबू पडेल ते समईं समजोन घेऊं. व इंगरेजांसीं स्नेह हैदर नायकाचे इस्तसवाबेवितरिक्त सर्वथैव होणार नांहीं हा येथील कारभाऱ्यांचां सित्धांत आहे. सेवेसी श्रुत होय, हें विनती.

पै।। छ ८ माहे शाबान सन ११९५ हिजरी, सोमवार अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, विनतीजे. छ १६ रजबीं पत्रें पाठविलीं. त्याचें उतर छ २४ व छ २६ माहे म।।रीं डांकेवर सेवेसी पाठविलें, तें दारोग्याचे विद्यमानें सेवेसी पावलें असेल. छ १८ रजबचें पत्र व रवानगी छ २० पाठविलें, तें छ २६ माहे म।।रीं पावलें. राजश्री कृष्टणरावजीचे येण्याचा निश्चय लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास पौर्णिमेपर्यंत रावजी येथोन स्वार होतील. याचा विस्तार पृथकपत्रीं लिहिला आहे. येथील मंडली धनलोभी व कार्यकारण स्नेहित, याचा अनुभव मजला फार आहे. स्वामीसही आहे. राजश्री कृष्टणरावजीचा व स्वामीचा प्राचीन स्नेह. व गोविंद-राव भगवंत बहुत रसिक आहेत. श्रीकृपेनें स्वामीं हुजूरचे दौलतख्वाह व येकनिष्ठ व दियानतदार. द्रव्याचे लोलुप नांहींत. व हुजूरची इनायत व समयोचित श्रीमंत पंतप्रधानाचे साहित्यास व सेवेसी तत्पर. त्या अर्थी, रावजी हुजूर आल्यानंतर ज्वाबसालांत शरीक मसलहत विषईं हुजूरीहून इरशाद आहे. व स्वामी चित घालतील. कृष्टणराव व गोविंदराव स्वामीचे स्नेहित. हुजूरचे तरफेनें कितेक ज्वाबसाल करावयाचे आपण करतील व करावे. व हुजूरचे इरषादचे बरखिलाफ उतर प्रत्योतर करणें कोणाचा मकदूर? परंतु श्रीमंत पंतप्रधानांचे स्नेहाचें लक्ष चितांत ठेवावें हा यांचा अशय आहे. बहुत काय लिहिणें, हे विनती.

पै।। छ ८ माहे शाबान सोमवार सन ११९५ हिजरी. अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

पै।। छ ८ माहे शाबान सन ११९५ हिजरी. सोमवार अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ।। छ २६ रजब लगायत छ २९ सन ११९५ हिजरी, रविवार श्रावण शुध १.
कोल्हेरसमीप केलखामल्याजवळ सटवाजी भोंसले वगैरेसी व दुर्गोजी भापकरासीं लढाई जाहली. अमृतराव भापकर ठार पडला व परवतराव भापकराचे हाताचीं बोटें तुटलीं व परस्परें लोक जखमी जाहले. त्या उपरि सटवाजी भोंसलें वगैरे सांभाळून गेले. ते सुरतेस रघुनाथरायाकडें जाणार. गणेशपंत बहिरे याचकडील पागा वगैरे लोक आले व म।।र नुलेहीं सत्वर येणार. व प्रतिनिधीची फौज व सदासिवपंत खाडेलकर छ २५ माहे म।।रीं पुण्यास आले. या वितरिक्त कितेक वर्तमान लिहून अखबार हुजूर रवाना केली. ते दारोग्याचे विद्यमानें गुजरानली असेल. त्याउपरि यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान तफसिलवार लिहिलें असे.

सटवाजी भोंसले व आनंदराव जाधव व बाजीराव बरवें यांसी व मानाजी फांकडयासीं इतिफाक जाहला. व बइतिफाक सुरतेकडे गेले. हें वर्तमान छ २५ माहे म।।रचे पत्रीं यैकिल्याप्रमाणें लिहिलें होते. त्यानंतर येथील कारपरदाजांनी तहकीक बातनी आणविली. त्यांत निश्चय जाहला कीं, सटवाजी भोंसले व आनंदराव जाधव व

बाजीराव बरवे व नरसिंगराव वगैरे बइतिफाक सुरतेस गेले. मानाजी फांकडे पंढरपुरचे लढाईंत सिकस्त खाऊन गेला. तो तुळजापूर प्रांती आहे. याप्रमाणें तहकीक खबर कळल्यानंतर, फांकडे मा।रास दस्तगीर करांवें किवा पळ काहडल्यास ताकूब करावा, हे तजवीज येथील कारपरदाजानीं करून, पांडुरंग बाबूराव बारामतीवाले वगैरेस पत्रें पाठवावयाची तजवीज केली आहे की, तुम्हीं फौजेसुधां जाऊन मानाजीस दस्तगीर करणें.

गणेशपंत बहिरे खानदेशांत गिरनानदीचे समीप आहेत. सिबंदीचे लोकाचा हंगामा. याकरितां तेथेंच मुकामांत करून राहिले आहेत म्हणोन पूर्वील पत्री मा।र लिहिला आहे. सांप्रत येथील कारपरदाजानीं तजवीज केली आहे कीं, खानदेशचें रसदेपैकीं नख्त रुपये गणेंशपंतास देवऊन, लोकांची समजावीश करावी. व गणेशपंतानी तेथेच राहांवें. ये विषईची पत्रें गणेशपंतास जाणार.

हैदरअलीखान चिदंबरासमीप, व इंगरेज महमदीबंदरासमीप व चिदंबरासमीप लढाई इंगरेजासीं जाहल्याचें वर्तमान पूर्वी लिहिलें होते. सांप्रत येथील कारपरदाजाचे जुबानीं यैकिलें कीं, कुंभकोणावर इंगरेजांची तीन पलटणें गेलीं होतीं. हें वर्तमान खान मा।रास कळल्यानंतर, बारचे जवान व तोफा दाहा व पांच हजार स्वार रवाना केले. त्यांसी व इंगरेजांचे पलटणासीं लढाई जाहली. परस्परें लोक जखमी व ठार जाहले. परंतु इंगरेजांची सिकस्त जाहली. इंगरेज व काळें प्यादे फार मारलें व दस्तगीर केले. राहिले इंगरेज झाडीचे आश्रयानें महमदीबंदरास गेले.

माहदाजी सिंद्यांची व इंगरेंजांची सिपरीकोलारसेसमीप लढाई रजबचे महिन्यांत जाहली. दुतरफा लोक जखमी व ठार जाहले. इंगरेजानी निकड केली. ते समईं मन्हाटी फौज निघोन गेली. सांप्रत माहादाजी सिंदे गनिमी कायद्यानें घेरा घालून आहेत. केवळ मुकाबिल लढाई देंत नांहींत.

पै॥ छ ७ शाबान सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी, विनतीजे. कृपा पत्रें दोन, यक छ २६ रजबचें जासुदांबरोबर व दुसरें छ २९ रजबचें डांकेवर रवाना केलें. ते छ ९ व छ १० रजबीं पाऊन बहुत संतोष जाहला. मौजे रेले व सांगवीस जाधवांचा उपद्रव लागतो. व पत्रास मालुमाती म्हणोन मानीत नांहींत. हा म॥र रो कृष्टणरावजी व गोविंदराव यांस सांगितला. जाधवाचे वकीलास ताकीद प्रखर केली. व पुन्हां नानाकडून ताकीद करवितों, व बंदोबस्त पका करून देवितों, या प्रमाणें नेम केला आहे. कितेक वर्तमान पृथक पत्रावरून व चिरजीव राजश्री रघोतमराव विनती करतील त्यावरून सेवसी श्रुत होईल. हे विनती.

पै॥ छ ८ माहे शाबान सन ११९५ हिजरी, शनवार अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

२

श्रीनिवास

पुरवणी अखबार. छ २९ रजब सन ११९५ हिजरी.

हैदरअली खानानीं येथील कारपरदाजांस पत्रें पाठविलीं आहेंत कीं, फौजेची निगाहदास्त करावयाकरितां आपल्याकडील मातबर मुतसदी पुणें प्रांतीं पाठवितों. पंतप्रधानानीं कौल व लोकांस परवानगी द्यावी. हा म॥र खासगत तैनाती जोडी छ १९ रजबीं रवाना केलीं, त्यांजबरोबर पत्रें पाठविलीं, त्यांत लिहिला होता. सांप्रत राजश्री कृष्टणरा-

वजीनीं आपले मुखें वर्तमान सांगितलें कीं, खान म।।रानें स्पष्ट पत्रीं लिहिलें आहे कीं, मातबर मुतसद्यास विज्यापुरास पाठवितों. स्वाराची निगाहदास्त करील. पंतप्रधानानीं सदर कौल लिहून द्यावा कीं, खुषरजावंदीनें ज्याचे चितास येईल, त्यानें हैदरअली खानांचे नौकरीस जावें. याचें उतर अद्यापि वकीलास सांगितलें नांहीं. व खान म।।रासही लिहिलें नांहीं व याचें उतर कोणे प्रकारें ल्याहांवें व वकीलास सांगांवें याची सलाह हुजूरीहून इरशाद व्हावी म्हणोन जिवाजीपंतास लिहिलें आहें. पंत म।।र हुजूर अर्ज करतील. तुम्हींही लिहिणें म्हणोन रावजीनीं सांगितलें. मन्हाटे स्वार बहुत करून मिरासदार या प्रांतीचे. सांप्रत पंतप्रधानाकडून कराराप्रमाणें रुपये पावत नांहींत. परंतु लोकांवर दाब आहे. इकडील परवानगी वितरिक्त दुसऱ्याचे नौकरीस खसूस हैदरअलीखानाकडें जात नांहींत. येकदां परवानगी दिधली म्हणजे लोकांची रुजवात तिकडें पडेल. हैदरअलीखान जरदार खजानेपुर स्वारांस नालबंदी पेशगी तलब देईल. ते समईं बहुत करून लोक खान म।।राकडे रुजू राहातील. लोकांस परवानगी न दिधलियां सांप्रत हैदरअलीखानासी यैक्यता जाहली आहे. यांत क्रत्रिम व संशय उत्पन्न होतो.

कृष्टणराव जोसी व रास्त्याकडील फौज पंतप्रधानाकडून हैदरअली खानाकडें रवाना जाहली होती. ते गुरमकोंडयापर्यंत गेल्याची खबर आजी छ म।।रीं आली. कर्नाटक प्रांतात मरीची हवा उत्पन्न जाहली. हैदरअलीखानाचे लष्करांत व रास्त्याकडील फौज येथोन गेली. तेथें मनुष्यें बहुत मरत आहेंत या प्र।। वर्तमान आलें. छ २९ माहे म।।रीं कृष्टणराव बलाळ व गोविंदराव भगवंतांस बालाजीपंतानी भोजनास बोलाविलें होतें. उभयतांस पैठणी सेलें व मुडांसीं असामीस दोन वस्त्रें प्रमाणें दिधलीं. श्रुत होय. हे विनती.

A. R. No. 72.

१ शाबान ११९५ हिजरी
२३ जुलै १७८१

पै॥ छ ८ माहे शाबान सोमवार सन ११९५ हिजरी, अडीच प्रहर दिवस, मै डांक सरकार.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल. त॥ छ १ माहे शाबान मु॥ पुणे स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित जाणौन, स्वानद लेखन आज्ञा करीत असिले प॥. विशष, येथील वर्तमान छ २६ माहे रजब रोज गुरुवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले. ते पावान सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर, येथील वर्तमान राजश्री सटोजी भोसले व बाजीराव बरवे व मानाजी फाकडे वगैरे सातसे आठसे स्वारानसी इकडून कोडाईबारीकडें गेले. बारीजवल दुर्गोजी भापकर पाचच्यारसे स्वारानसी होते. त्यासी लडाई करून, भापकर म॥र यास सिकस्त करून, सटोजी भोसले वगैरे आपल्या बेलबारी उतरून, सोनगडास गेले. पुढे सुरतेस जाणार. हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री लेखन केले होते. त्यावरून अक्षरशा ध्यानास आले असेल. त्यास सटोजी भोसलें व मानाजी फाकडे व बाजीराव बरवें दादासाहेबाचे मेहोने व भादूराव प्रतिनिधी याचा पुत्र यैसे हजार बारासे स्वारानसी पढरपुराजवल जमून, सिद्याची व होलकराची निशाने केली. अवाई घातली की, आम्ही भापकराचे मदतीस जातो. यैसा कावा करून निघाले. ते लाब लाब मजला करून कासारबारी उतरून खानदेशात गेलें. कासारबारीखाले नव दाहा कोसावर र॥ गनेशपंत बेहेरे पाच साहा हजार फौजेनसी होते. परतु त्यास हे वर्तमान नाही. वर्तमान कलल्यावर फौज वगैरे पाठवयाची तजवीज केली. तो सटोजी भोसले वगैरे निघून कोडाईबारीकडे गेले. तेथे पाचच्यारसे स्वारानसी दुर्गोजी भापकर होतें. त्यासी व सटोजी भोसले वगैरे याची लडाई जाली. उभये-

पक्षी से दोनसे मणुश जाया जाले. अमृ(त) राव भापकर ठार जाले. दुर्गोजी भापकर यास जखम लागली. से पनास घोडी भापकर म।।र याची नेली. याप्रमाणे लडाई करून, भापकर म।।र यास सिकस्त करून, सटोजी भोसले व मानाजी फाकडे व बाजीराव बरवे वगैरे हजार स्वारानसी सोनगडास गेले. पुढे ते सुरतेस जाणार. मानाजी फाकडे याचा मात्र सदेई करितात की तो यात नवता. परतु फाकडे म।।रही सटोजी भोसल्यासमागमे गेला, यैसे वर्तमान आहे. शृत होयें. सटोजी भोसले वगैरें हे सुरतेकडे गेले. हें खुल मातबरच गेले. येणेकडून तिकडें मन्हाटी फौज जमा. याअर्थी कारभारी वगैरें यास बहुत अदेशा प्राप्त जाला आहे. शृत होये. छ २७ माहे रजब रोज शुक्रवार. राजश्री गनेशपंत बेहेरे खानदेशात कासारबारी-खाले तीनच्यार कोस नसरतपुरावर मुकाम करून आहेत. इकडे येणार होते. प्रस्तुत त्यास लिहून पाठविले की, सटोजी भोसले वगैरें कोडाइंबारीकडे गेले. आता तिकडे ते उपद्रव करतील. त्यास उटी फौजेसहित कोडाईबारीकडे जाणें म्हणौन त्यास लिहिले आहे. त्यास गनेशपत फौज वगैरे तिकडे रवाना करून, अपन सडे मात्र येथे येऊन, कारभाऱ्याची भेट घेऊन, आपला खर्चाचा वगैरेचा बदोबस्त करून, मागी जाणार. यैसे वर्तमान आहे. शृत होयें. र।। कृष्णराव दरबारास गेले होते. नाना व हरीपंत व कृष्णराव याचा खिलवत जाला. भाव यैकिन्यात आला की, र।। कृष्णरावजीस येज्यमान-साहेबाकडे रवाना करावे यैसा निश्चये होतो. कारन की, मोरो गिरमाजी तहाचे कामास आले आहेंत. त्यास इकडून तिकडून अद्याप निर्गमात येत नाही. म्हणौन येज्यमानसाहेंबी बेदर वगैरे कडील याचे कमाविसदार उठविले. त्यास येंज्यमानसाहेबाचे मर्जीप्रमाणे कार्य करावे. दुसरे येज्यमानसाहेबाची णूतन काही मर्जी रक्षून, काही फौज तामील करून, इग्रजाचे पारपत्य करावे. यैसे यकदोन वगैरें राजकारनाचा डौल करून, रावजीची रवानगी श्रावन सुद ५ वगैरे जालिया होनार, यैसे यैकिन्यात आले. मग निश्चये होऊन रावजीची रवानगी जालिया लेखन केले जाईल. शृत होये. बेदर वगैरेकडील

कमाविसदार उठविले म्हणौन यथील लोक विपरियास भाव बहुत बोलतात. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. शृत होये. छ २८ माहे रजब रोज शनवार. विष्णुपंत गजरे याचे पुत्राजवल कारकून होता. त्याजपासून काही अतर जाले म्हणौन तो मेला. त्यास ब्राम्हनाचा दोश येंऊन, विष्णुपताचे पुत्रापासून दुऊन लक्ष रुपये घेतले. शृत होये. इग्रज कल्यानीस व ममईस सरजाम करितात. सत्वरच ते इकडे उद्वोग करणार. या अर्थी श्रावन सुद पचमीस हेही डेरे बाहेर करनार. तमाम लोकास पत्रे पाठवितात की, सत्वर जमा व्हावे. शृत होये. हैदर नाईक याची पत्रे आली. भाव यैकिन्यात आला की, मागती नाईक म।।र यासी व इग्रजासी लडाई जाली. इग्रजाकडील येक दोन पलटने सिकस्त केली. यैसे वर्तमान आहे. शृत होये. सध्याकाली नाना कृष्णरावजीचे घरी आले होते. साहा घटकापरियेत नाना व रावजी याचा खि(ल)वत जाला . भाव यैकिन्यात आला की, रावजीची रवानगी येज्यमानसाहेबाकडे सत्वरच होनार. मग निश्चये होऊन रावजीची रवानगी जालिया, लेखन केले जाईल. शृत होये. रा।। दुर्गोजी भापकर लडाईत सिकस्त जाले, व लोक जखमी वगैरे जाले, व खर्चयास नाही म्हणौन त्यास दाहा हजार रुपये पाठवितात. शृत होये. छ २९ माहे रजब रोज रविवार. रा।। सटोजी भोसले वगैरे हे सोनगडाकडे गेले. ते व गुलज्यारखान वगैरे येकत्र होऊन, व च्यार पाच पलटने यैसा ज्यमाव करून, कोडाईबारीकडे येणार यैसे वर्तमान आहे. शृत होये. कोकन प्राती तल्याचे किल्याकडे हपशानी मातबर उपद्रव माडला आहे. शृत होये. श्रावन सुद पचमीचे दक्षनेस आजपासून प्रारभ जाला आहे. वाडयात दक्षना होती. पचमीस दक्षना परवतीस होईल. शृत होये. राजश्री कृष्णरावजी नानाचे घरी भोज्यनास गेले होते. भोज्यन करून च्यार घटका खिलवत जाला. उपरातिक रावजी आपले घरास आले. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. कामे काजे जाली. विदित होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल, ते सेवेसी लेखन केले

जाईल . छ १५ व छ १८ माहे रजबची आज्ञापत्रे व छ १ माहे रजबाचा इनायेतनामा सादर केला. इनायेतनामा व आज्ञापत्रे सादर करून सरकारचे डाकेसमागमे पाठविली. ते छ २६ माहे रजबी सेवकास पावली. इनायेतनामा व आज्ञापत्रे पावोन बहुत संतोश जाला. सदैव याच प्रकारे इनायैतनामे व आज्ञापत्रे सादर करणार स्वामी समर्थ. आज्ञापत्री सादर केले की, छ १४ माहे रजब इनायतनामे दोन ज्यवाबी डाकेसमागमे रवाना केले, ते पावल्याचे उतर पाठवणे. त्यास ते इनायतनामे पावले. त्याचे उतर पूर्वी विनंतीपत्र सेवेसी रवाना केले त्यात लेखन केले आहे. शृत होये. सेवकाचे गावखेडयास गनेशपंत वगैरे याचा उपद्रव फार जाला. यैवज नेला. गाव खराब जाले. येविशईचे वर्तमान पूर्वी येक दोन विनंतीपत्री तपसीलवार लेखन केले आहे. त्याजवरून ध्यानास येईल. गावखेडे वगैरेचे वर्तमान कृष्णरावजीस बहुत वेला सागितले. यैकून मात्र घेतात. परतु त्याजकडून निगर्म करून देवावा, पुढे ताकीद करावी, हे अमलात येत नाही. येविशई यथील कारभाऱ्यास व रावजीस सरकारातून ताकीद करनार व इनायेतनामे वगैरे पाठविणार स्वामी समर्थ आहेत. सर्वस्वे माझा अभिमान व लज्या स्वामीस आहे. सर्व प्रकारे मजला त्राते स्वामीचे चरन आहेत, माझी सर्व निष्ठा (स्वा)मीचे चरनासी आहे. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हें विज्ञाप्ती.

A. R. No. 73.

४ शाबान ११९५ हिजरी
२६ जुलै १७८१

पै॥ छ ११ माहे शाबान संन ११९५ हिजरी, रोज गुरुवार, डांकेवर.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां। नमस्कार. विनती उपरि. येथील

वर्तमान त।। छ ४ शाबान, श्रावण शुध षष्ठी, गुरुवासरपर्यंत मो।। पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वी छ १ माहे म।।री हुजूरी अर्जी व अखबार स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें ते दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीस पावलें असेल. त्यानंतर छ १ लगायत छ ४ शाबानपर्यंत अखबार पृथकपत्रीं लिहिली आहे, त्यावरून इकडील वर्तमान सेवेसी श्रुत होईल. रो कृष्टणरावजीस हुजूरचा इनायतनामा व नवाब मोईनुदौला बहादरांचें पत्र स्वामीचे व चिरजीव रघोतमराव यांचे पत्रासहित हुजूर येण्याविषईं आलें. त्याचीं उतरें राव म।।रनुलेनीं देतों म्हणोन निश्चय केला व येका दोन दिवसांत हुजूर पाठवितों म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें होतें. त्यास छ २ माहे म।।रीं कृष्टणरावजीनीं सेवकास सांगितलें कीं, छ २६ (२८) रजबीं बाळाजीपंतासी खिलवत जाहला. त्या उपरि पुन्हां आम्हीं दरबारास गेलों नांहीं व बालाजीपंतानीं बोलाविलें नांहीं याकरितां पुन्हां दोन दिवस अर्जी हुजूर न पाठवावी व बाळाजीपंतासी बोलून जो सित्धांत होईल त्याप्रमाणें अर्जी लिहून पाठवणें. सलाह उतम आहे. आम्हीं आपले तर्फेनें हुजूर जावयाचे अरजुमंद व शरीर येथें व जीव हुजूर आहे. परंतु पराधीनता याकरितां बाळाजीपंताकडून आमचे जावयाचे सित्धांत जाहला म्हणजे हुजूर अर्जी व इतर साहबांस पत्रें लिहून देतों याप्रमाणें रावजीनी सांगितलें. त्यावरून म।।रनुलेकडील पत्रें राहिलीं. छ ३ माहे म।।र बुधवारी बमोजिब तलब कृष्टणरावजी, बालाजीपंताचेथें दरबारास गेले होते. परस्परें येकांत जाहला. हरीपंत व उभयतां गोविदराव शरीक मसलहत होते. कृष्टणरावजीनीं आपले मुखें सेवकास सांगितलें कीं, हुजूर सत्वर जाणें म्हणोन बालाजीपंतानीं परवानगी दिधली. याउपरि प्रयाण मुहूर्ताचा निश्चय करून येथोन स्वार होतों. या उपरि बालाजीपंताकडील गुंता राहिला नांहीं. छ ३ नागपंचमीपासून दक्षणा द्यावयाची गडबड, सप्तमी शुक्रवारीं दक्षणा समाप्त होईल. छ ६ शनिवारीं अर्जी व पत्रे लिहून देतों, याप्रमाणें निश्चय केला. सारांश, रावजीचे येण्याविषईं गुता नांहीं व आपले तरफेनें अरजुमंद येण्याचे

वी. स. म. द वा. पोतदार,

व बालाजीपंताचे चितांत कृष्टणरावजीस हुजूर पाठवांवें म्हणोन होतें या अर्थीं निश्चयरूप येतात. ईश्वरइछेचा संकल्प मात्र कोणे प्रकारचा याचा नेम होत नांहीं. बहुत काय लिहिणें, हे विनती.

———

पै।। छ ११ माहे शाबान सन ११९५ हिजरी, रोज गुरुवार डांकेवर.

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इ।। छ १ शाबान लगायत छ ४ माहे म।।र, सन ११९५ हिजरी, श्रावण शुध ६ गुरुवासर. गणेशपंत बहिरे खानदेशांत आले व पुण्यास येणार होते. त्यांस कारपरदाजानी लिहून पाठविलें की, सटवाजी भोंसले वगैरे सुरत प्रांतास गेले. हगामा करतील. याकरितां तुम्ही पुण्यास न येणें. रसदेचे यैवजीं वीस हजारपर्यंत रुपये देवितों. ते लोकास देऊन समाजाविश करून पुन्हां कोडाईबारीस जाणें. व मानाजी फांकडा सटवाजी भोंसले वगैरे समागमें गेला नांहीं. तुलजापूर प्रांती घांटावर आहे. त्याचे तंबीकरितां पांडुरंग बाबूराव बारामतीकराची रवानगी होणार. हैदरअली-खानांसी व इंगरेजांकडील पलटणासीं कुंभकोणासमीप लढाई जाहली. यांवितरिक्त वर्तमानासहित छ १ माहे म।।रीं अखबार पाठविली ते पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरि प्रत्यक्ष जाहलें व यैकिलें वर्तमान हुजूर व स्वामीस दफेवार लिहून पाठविलें आहे.

छ ३ माहे म।।रीं हैदरअलीखानाचीं पत्रें वकीलास व कारपरदा-जांस आलीं. वर्तमान लिहिलें होतें कीं, करनल कूट इंगरेज महमूदी-बंदरासमीप मुकाम करून राहिला व खान म।।राचे फौजेचा माहासरा होता. बंदर म।।रीं लश्कर उतरावयाची जागा फराख नांहीं व रसद येण्याचा पेंच इंगरेजास फार पडला. देवनामपटणचें बंदर महमूद-बंदराहून तीन कोस. पेशजी इंगरेजांचे मुकामात बंदर म।।रीं जाहले

होते व जागा लायक फौज राहावयाची याकरितां करनल कुटानें महमूदीबंदरीहून कूच करून देवनामपटणचा रुख धरला. येके तरफेस दरया, येक रुख खुष्की व हैदरअलीखानांची फौज. त्यांसी लढाई करीत देवनामपटणास गेला. इंगरेजाकडील दोन हजार मुडदा तीन कोसांत सुमारास आला. खान मा।।राकडीलहीं हजार बारासें लोक व दोन तीनसें घोडी ठार जाहलीं. सांप्रत करनल कूट देवनामपटणीं व हैदर-अलीखान खाडीचे अलीकडें दोन कोसाचे फासल्यानें उतरला आहे.

कलकतेवाला इमादुदौला यास सवदा जाहला आहे म्हणोन लखनाऊची बातनी येथील कारपरदाजास आलीं आहे.

इंगरेजांकडील येक जाहाज मातबर दीडसें तोफा वगैरे सरंजामाचें विलायतीहून येत होतें. ते फरासीसानीं लढाईंत पाडाऊ केलें व लढाक लोक तमाम जाहाजावरून उतरविले व सें सवासें लोक बतरीक कैद जाहाजांत ठेऊन आपले बंदरासमीप जाहाज लाविलें. रात्रीचे समईं जाहाजांतील लोकानीं रसे कापून जाहाज दरयांत चालविलें. मलाह कसबी नव्हते व तुफानाकरितां जाहाज बहकून गेलें तें येके महिन्यास कोंकणांत सुवर्णदुर्गबंदर किनारेदरया तालुका पंतप्रधान येथील सरहदेंत आले. ते समईं सुवर्णदुर्गवाल्यानीं जाहाज धरलें. गला वगैरे व भोजनाचा सरंजाम व दारू जाहाजावरील फरासीसानीं काढली होती. याकरितां जाहाजांतील लोक हलाक जाहलें व सुवर्णदुर्ग-समीप अकस्मात जाहाज लागलें. सखलादेचे ताके वगैरे सरजाम व पाणे दोनसें तोफा जाहाजावर आहेत म्हणोन सुवर्णदुर्गचे कमाविस-दारानीं पंतप्रधानांचे कारपरदाजास वर्तमान लिहून पाठविलें आहे. माघाहून मालाची तादाद लिहून पाठवणार. येथील कारपरदाजानीं कमावीसदारास लिहून पाठविलें आहें कीं, जाहाजावर इंगरेजांचे लोक दस्तगीर जाहले आहेत. त्यापैकी च्यार पांच माणसें हुशयार जें असतील त्यांस पुण्यास पाठऊन देणें म्हणजे यांचे जुबानीं विलायतचें वर्तमान काय याचा शोध घेऊं.

२

पुरवणी अखबार छ ४ शाबान सन ११९५ हिजरी.

माहदाजी सिंद्याकडील पत्रें छ २ माहे म।।रीं कारपरदाजास आलीं. म।।र लिहिला होता कीं, सिपरीकोल्हारसेसमीप जमीन काली व पर्जन्याकरितां चिखल फार जाहला आहे. रसद लौकर येत नांहीं, याकरितां गिरानी फार व घोडीं वगैरे जनावरास चारा बिलकुल मिळत नांही. सबब, काळाबाग सरायेसमीप छावणीस जातों. इंगरेजांची पलटणें सिपरीकोलारसचे सरहदेंत आहेत.

खंडोजी भोंसले आखर रजब नागपुरास येणार होते, आले असतील. दिवाकरपंत व मुधोजी भोंसले काबूची व जाहीरा दोस्त व बातनचे दुष्मन आहेत. याप्रमाणें कारपरदाजांचे चितांत संशय आला आहे.

गणेंशपंत बहिरे नसरतपुरासमीप तीनसे स्वारानसीं आहेत. भापकरासमीप हजारपर्यंत स्वार आहेत. उभयतां येकत्र होणार म्हणोन भापकराचे वकीलाचे जुबानीं यैकिलें. पुरुषोतमराव हिंगणें पंतप्रधानांचे तरफेनें दिलींत वकील आहेत. पंत म।।र यमुनेस स्नानास गेले होते. तेथें गाडद्यांसी खानाजंगी जाहली. तलवारीच्या च्यार जखमा पुरुषोतमराव वकीलास लागल्या आहेत म्हणोन वर्तमान आलें.

शाहज्याहनाबादेंत गुंडे वगैरे शरीर लोकांचा हंगामा फार जाहला आहे. हरयेक बाजार व पुऱ्यांत लोकास लुटितात व मारितात. शंभर पनास माणुस मुतफिक होऊन हर कोठें जातात. दाहा पांच माणसास निःसंशय जाण्याविषईं प्रवृती होत नांहीं. शहरचे बंदोबस्ताविषईं बादशाहानीं नजफअलीखानास ताकीद फार केली आहे म्हणोन येथें अखबार दिलीची आली.

प्रतिवार्षिक श्रावणाचे दक्षणेस छ १ शाबानापासून आरंभ जाहला आहे. लाख रुपये दक्षणेचा संकल्प केला आहे. हे विनती.

पै।। छ ११ माहे शाबान संन ११९५ हिजरी, रोज गुरुवार डांकेवर.

A. R No. 74.

५ शाबान ११९५ हिजरी
२७ जुलै १७८१

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल ता।। छ ५ माहे शाबान मु।। पुणे. स्वामीचें कृपावलोकणें करून येथास्थित जाणोन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले प।।. विशेष. यथील वर्तमान छ १ माहें म।।र रोज सोमवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाना केलें. ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर, येथील वर्तमान हिदुस्तानप्राती सिद्यासी व इग्रजासी लडाई जाली. सिद्याकडील तीन च्यारसे मणुश जाया जाले यैसे वर्तमान आलें. शृत होयें. सटोजी भोसले वगैरे यानी दुर्गोजी भापकरासी लडाई करून सोनगडाकडें गेले. हे वर्तमान पूर्वीचे येक दोन विनंतीपत्री लेखन केले होतें. त्याजवरून ध्यानास आलें असेल. रा। सटोजी भोसले वगैरे व गुलज्यारखान व तीन च्यार पलटने येकत्र होऊन कोडाईबारीकडे येणार यैसे वर्तमान आहें. त्यास र।। गनेशपंत बेहेरें येथें येंणार होतें. त्यास पत्रें गेली की, तुम्ही इकडें न येणे. कोडाईबारीकडें जाणें. कारन की, तिकडे सटोजी भोसले व गुलज्यारखान वगैरें येंकत्र होऊन उपद्रव करनार. याअर्थी तिकडें जाणे. त्याजवरून गनेशपंत कोडाईबारीकडे जाणार. प्रस्तुत गनेशपंत बेहेरे खानदेंशात कासारबारीजवल आहेत. तेथून कोडाईबारी पनास साठ कोस आहें. शृत होयें. दरबार वगैरें जाला होता. उपरातिक नाना व हरीपंत व कृष्णरावजी याचा खिलवत जाला. खिलवताचा भाव यैकिल्यात आला की, कृष्णरावजीची रवानगी येज्यमानसाहेबाकडे होतें. शृत होये. छ २ माहे मा।र रोज मगलवार राजश्री चितो विठल कैदेत आहेत. त्यानी आपले

हातें सेडी उपडून फकीरीचें रूप घेतलें आहें. त्यास कारभाऱ्याचें मानस आहे की, त्याजपासून लाख रुपये घेऊन जामीन घेऊन पुन्यात ठेवावे. यैसा जाबसाल लागला आहे. येक दोन ग्रहस्तही त्याचे मध्यस्तीस पडले आहेत की, त्याजपासू(न) लक्ष रुपयें घेऊन त्याची वतने वगैरे सोडावी. ते पुन्यात स्वस्त राहतील. यैसी रदबदली आहे. मग निश्चयें होऊन जमल्यास लेखन केले जाईल. शृत होयें. राजश्री मानाजी फाकडें सटोजी भोसले यासमागमे गेले नाहीत. फाकडें म।।र यानी दोनसे स्वार मेलवून तुलजापुराकडे दहा वीस कोसी खूल केले यैसे वर्तमान आहें. त्याचें पारपत्यास मुढे वगैरे याची पागा पाचसातसे स्वाराची पाठविणार. शृत होये. हैदर नायेकासी व इग्रजासी लडाई आहे. नाईक म।।र यास पत्रे पाठविली की, इग्रजाचे पारपत्य येथास्थित करावें. बहुत ममतापूर्वक नायेकास पत्रे लिहितात. पत्रे वरचेवर त्यास पाठवितात. शृत होये. छ ३ रोज बुधवार बेदर वगैरे येथील सरकारचे आमिलानी याचें कमाविसदार उठून दिल्हे. कारन की, तहाचा फडच्या होत नाही. कमाविसदार वगैरें उठून आले, म्हणोन कारभारी वगैरें आपले ठिकानी बहुत विशमता वाटून आहेत. नानाप्रकारे तर्क करितात. प्रस्तुत कृष्णरावजीची रवानगी येज्यमानसाहेबाकडे होनार, यैसा निश्चये आहें. दुसरे येज्यमानसाहेबाचाही इनायेतनामा रावजीस येण्यावशई आला यैसे वर्तमान यैकतो. त्याजवरून रावजीची रवानगी येज्यमानसाहेबाकडे सत्वरच होनार. रवाना जालियावर लेखन केले जाईल. शृत होये. येथे बहुमुखी वर्तमान आहें की, येज्यमानसाहेंबाचा व याचा स्नेहे असता, याजकडील कमाविसदार वगैरे सरकारचें तालुक्यातून उठून आले. तस्मात काही येक स्नेहात अतर पडलें. पुढे विपरीत आहे. यैसी वदंता. विशेष यैकिले वर्तमान सेवेसी लिहिले असे. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. उपरातिक नाना व हरीपंत व कृष्णरावजी याचा खिलवत जाला. खिलवताचा भाव यैकिल्यात आला की, रावजीचें रवानगीचा व दुसरे आपलें कितीक दौलतीचे

बदोबस्ताविशई जाला. शृत होये. छ ४ माहे मा।र रोज गुरूवार. इग्रज कल्यानीस व ममईस सरजाम वगैर भारी करितात. रमजानचें महिन्यात ते इकडे येणार यैसी वदता विशेष, त्याजवरून कार-भारी श्रावन वद्य ५ पचमीस डेरे बाहेर करनार. फौजेचे लोकास तमाम पत्रे पाठवितात की, सत्वर जमा व्हावे. डेरे वगैरे बाहेर करून पुढे इग्रजाचे पारपत्याची मसलत सत्वरच करणार. शृत होये. नजीबखान यासी व इग्रजासी लडाई होती. नजीबखान यानी काहीयेक इग्रज सिकस्त केले. प्रस्तुत नजीबखान वगैरे दिलीस आले यैसे वर्तमान आहे. येथून श्रीमताची व कारभाऱ्याची पत्रे नजीबखानास बहुत ममतापूर्वक जातात. दुसरे इग्रजाचें पारपत्य येथास्थित करावे, या अनवये स्नेहाची पत्रे लिहिली आहेत. येंका दो दिवसा पत्रे नजीबखानाकडे रवाना होणार. शृत होयें. ब्राह्म-नाचा समारंभ परवतीस जाला आहें. दो प्रहरानतर राजेश्री नाना व हरीपंत वगैरे दक्षना वाटावयास परवतीस गेले. आज रात्रौ दक्षना होऊन उदईक सध्याकालपावेंतो दक्षना होऊन ब्राह्मन सुटतील. पचवीस तीस हजार ब्राह्मन मिलाला आहे. चागला वैदिक ब्राह्मन त्यास पाच च्यार रुपये देतात. मग सरासरे येंक दोन तीन या धाऱ्या-प्रमाणे दक्षना देंतात. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. सदैव अज्ञापत्री सेवकाचा साभाल होत असावा. सर्वस्वे दासाणुदास स्वामीचा असे. बहुत कायें लिहिणे. कृपालोभ कीजे, हें विज्ञाप्ती.

A. R. No. 75 ७ शाबान ११९५ हिजरी
२९ जुलै १७८१

पै।। छ १५ माहे शाबान सोमवार सन ११९५ हिजरी पावले. दोन प्रहर दिवस मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हयपतराव गोपाळ सां। नमस्कार विनती उपरि. येथील

वर्तमान ता।। छ ७ शाबान श्रावण शुद्ध नवमी रविवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वी छ ४ पर्यंत अखबार लिहून छ ५ माहे म।।रीं डांकेवर रवाना केली, ते सेवेसी पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. राजश्री कृष्टणरावजीनी बमोजिब व रूप इनायतनामा हुजूर येण्याविषईं राजश्री बाळाजीपंत नाना यांचे सलाह व इस्तसवाबेनें निश्चय केला. व माघाहून हुजूरचे इनायतनाम्याचा दरजवाब अर्जी व पत्रें, राव मशारनुलेकडील हुजूर व नवाब मोइनुदौला बहादरांस व स्वामीस हस्तगत करून, सेवेसी रवाना करितों म्हणोन पूर्वी पत्र पाठविलें त्यांत विनती लिहिली होती. सांप्रत राव म।।रनुलेकडील अर्जी हुजूर व नवाब मोइनुदौला बहादर यांस फारसी पत्र व स्वामीस हिंदवी पत्र व रो गोविंदराव भगवंत याचे पत्राचें उतर प्राप्त जाहलें, तें चिरंजीव राजेश्री रघोतमराव यांचे नांवचा लिफाफा सेवसी पाठविला आहे, त्यांत मलफूफ करून समग्र पत्रें सेवेसी पाठविलीं आहेंत. चिरंजीव सेवेसी पावतीं करतील. यत्किंचित अखबार पृथकपत्रीं लिहिली आहे त्यावरून सेवेसी श्रुत होईल. रो कृष्टणरावजीचे प्रयाण मुहूर्ताचा अद्यापि निश्चय जाहला नांहीं. निश्चयानंतर सेवेसी सूचना करीन. साल म।।रीं चौथाईचा अमल मामलतदारांस न द्यावा. व तह जाहल्यानंतर अमल ज्यारी होईल. व येविषयीं हुजूरीहून हरयेक माहलाचे जागिरदार व आमिलास ताकीद जाहली आहे. या प्रकरणीं कृष्टणराव बलाळ यानीं सेवकास सांगितलें कीं, पंतप्रधानाचें तरफेनें हुजूरचे ज्वाबसालाची मध्यस्ती आम्हांकडें असतां चौथाईची मामलत हुजूरीहून बंद जाहली. याची इतिला आम्हांस न होतां बंदी जाहली हा सांप्रदाय पूर्वीपासून नांहीं. सांप्रत आम्हीं हुजूर जातों. श्रीकृपेकरून सर्व बंदोबस्त होईल. चौथाईचे अमलाची मोकलीक पेशज आमचे गेल्याचे जाहलियां, येथील कारपरदाजांस खुशनुमा दिसलें. मीं उतर केले कीं साहा वर्षापासून मामलतीचा फैसला होत नांहीं व हुजूरीहून तऱ्हेच दिधली, साल म।।रीं बंदी करविली आहे.

याची मोकलीक तुंम्हीं हुजूर गेल्यावितरिक्त होणार नांहीं. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें, हे विनती.

श्रीनिवास

पुरवणी पत्र. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनती उपरि. कृपा पत्र छ २४ रजबचें डांकेवर पाठविलें तें छ ५ शाबानीं पावलें व लेखनार्थ मनन केला. चिरंजीव राजश्री रघोतमराव सेवेसी येऊन राजश्री कृष्टणरावजी हुजूर येण्याची आरजू चितापासून ठेवितात व इनायतनामा सादर जाहलियां येतील, या अन्वयें हुजूर अर्ज केला. व मीं सदैव रावजीचे सूचनेनुरूप हुजूर अर्जीत लिहीत होतों त्याप्रमाणें अज राहनवाजिश हुजूरीहून सरफराजी होऊन इनायतनामा सादर जाहला. याउपरि राव मा।।रनुलेनीं कांहीं संशय न करितां सत्वर यांवें. याप्रमाणें हुजूरचे इरशादेप्रमाणें स्वामीनी व चिरजीव रघोतमराव यानीं लिहिलें होतें. त्याची पूर्ती रावजी हुजूर येतील ते समईं होईल. परंतु रावजीनीं बालाजीपंताचे विचारानें हुजूर जावयाचा निश्चय करून अर्जी लिहून दिधली. त्याअर्थीं मध्यस्ताकडील गुंता राहिला नांहीं. सारांश, हुजूर आल्यावितरिक्त याजला उपाय नांहीं. चौथाईची मामलत न द्यावी येविषईं हुजूरीहून आमिल व जागीरदारास ताकीद जाहली आहे. याजवरून समग्र पुण्यांतील लोकानीं निश्चय केला आहे कीं, हुजूरचा व पंतप्रधानाचा बिगाड जाहला. याची चर्चा फार जाहली आहे. याचा परिहार होऊन पंतप्रधानांची परवरश हुजूर मंजूर आहे. त्याचीच शोहरत सर्वत्र असावी व इंगरेजांची तंबी करण्यांतच दौलतेची कायमी आहे. व हुजूरीहून तंबीचाच अज्म व्हावा येविषईची सलाह हुजूर अर्ज करावी, याकरितां रावजीचे चितांत बहुत इच्छा आहे. श्रीकृपेनें हे हुजूर आल्यानंतर यांचा खुलासा सर्व सेवेसी श्रुत होईल हे विनती.

पै।। छ १५ माहे शांबान सोमवार सन ११९५ हिजरी पावले. दोन प्रहर दिवस मै डांक सरकार.

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. नागपुरीहून पंतप्रधानाची जासूद जोडी अजी छ ७ शाबानीं अस्तमानीं आली. रो॥ दिवाकर पुरुषोतम यांस ज्वर येत होता. छ २३ रजब आषाढ वद्य दशमीस काळ जाहला म्हणोन वर्तमान आलें. श्रुत होय हे विनती. चिरजीवास व नवाब मुइनुदौलास चिठी लिहिली आहे ते चिरजीवास द्यावी हे विनती.

पै।। छ १५ माहे शाबान सोमवार सन ११९५ हिजरी पावले. दोन प्रहर दिवस, मै डांक सरकार.

पै।। छ १५ माहे शाबान सोमवार सन ११९५ हिजरी पावले. दोन प्रहर दिवस मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ॥ छ ५ शाबान लगायत छ ७ माहे मा॥र सन ११९५ हिजरी रोज रविवार श्रावण शुध ९. करनल कूट महमुदी बंदराहून देवनामपटणास गेला. ते दिवसीं हैदरअलीखानांसीं व इंगरेजांसीं लढाई मातबर जाहली व तरफैन लोक जांया जाहले. माहादाजी सिंदे छावणीकरितां काळेबागासमीप येणार व खंडोजी भोंसले नागपुरास दाखल होणार होते. समीप आल्याचें वर्तमान वकीलाचे जुबानीं यैकिलें. सुवर्णदुर्गासमीप इंगरेजाकडील जहाज

सरजामसुधां तुफानांत आलें. तें सुवर्णदुर्गवाल्यानीं धरलें. तोफा वगैरे सरंजाम जाहाजांतील उतरवणार. या वितरिक्त अवांतर वर्तमानासहित पत्र पाठविलें तें डांकेवर दारोग्याचे विद्यमानें सेवेसी पावलें असेल. त्याउपरि यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान हुजूर व सेवेसी लिहिलें असे. हैदरअलीखानांची पत्रें कारपरदाजांस आलीं. त्यांचा म।।र इंगरेजांची पलटणें महमूद बंदराहून देवनामपटणास गेलीं व लढाई जाहली. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत येथील कारपरदाजानीं प्रत्योतरें लिहून खान म।।राकडें रवाना केलीं. त्यांत म।।र लिहिला तो कृष्टणराव व इतर कारपरदाजांचे मुखें यैकिला नांहीं. कोण्हीं स्नेहितानीं सागितला. त्याप्रमाणें सेवेसी सूचनार्थ लिहिला असे कीं, नवाब बंदगानआलीनीं कृष्टणराव बलाळ यांस हुजूर पाठवून देणे म्हणोन इनायतनामा पाठविला आहे. त्यास इंगरेजांचा नकशा बंदगानआलीनीच ठराविला. व नकशाप्रमाणें मोहीमेचा अज्म होत नांहीं. सांप्रत दोन महिने पर्जन्यकाळाचे बाकी राहिले. पुढें दसऱ्यानंतर मोहीम रुबकार, बंदगानआलीची मसलहत कोणे प्रकारची, मोहीमेचा अज्म करीत आहेत किंवा नांहीं, याचा निश्चय कळला पाहिजे. कृष्टणराव बलाळ हुजूरचे जवाबसालाचे बानीकार. त्यांस पाठविल्यावितरिक्त हुजूरचे मर्जीमुबारकेचा खुलासा दरयाफ्त होणार नांहीं. याकरतां कृष्टणराव बलाळ यांस हुजूर रवाना करावयाचा सिधांत केला आहे. सत्वरच जातील. जंगी सरजामाची तयारी येथें होत आहे. व माहदाजी सिंद्याचे मदतीस पुन्हां फौज पाठवावयाची तजवीज केली आहे. व सिंदे म।।राकडील मुतसदी स्वारांचे निगाहदास्तीकरितां आला आहे. निगाहदास्त करीत आहे. याप्रमाणें वर्तमान लिहून खान म।।राकडें पत्रें पाठविली म्हणोन यैकिलें.

माहदाजी सिंदे काळेंबागावर छावणीकरितां आले म्हणोन सिद्याचे वकिलाचे जुबानीं यैकिलें. खंडोजी भोंसले नागपुरास पावले म्हणोन भोंसले म।।राचे वकीलानी सांगितलें.

बिरेवाडीस पंतप्रधानाकडील गाडदी गेले आहेत. ते त्याच जिल्यांत राहावे म्हणोन येथील कारपरदाजानीं तजवीज केली आहे. हबसियांची

२

पुरवणी अखबार. छ ७ शाबान सन ११९५ हिजरी. जमीयत आली होती. ते पांचसात कोसाचे फासल्यानें आपले तालुकियांत आहे. बिरेवाडी व तळेंघोसांळयाहून जंजीरा बारा तेरा कोसाचे फासल्यानें आहे.

इंगरेजांकडील जहाज सुवर्णदुर्गासमीप धरलें आहे. याचा मा॥र पूर्वील पत्रीं तपसीलवार लिहिला असे. जहाजावर जिनस पारचे व किराना वगैरे बहुत आहे. याचे चौकसीकरितां येथील कारपरदाजांचे तरफेनें हरीपंताचा पुतन्या मोरोपंत सुवर्णदुर्गास छ ६ माहे मा॥रीं गेला आहे.

श्रावणमासची दक्षणा लाख रुपयेपर्यंत छ ५ माहे मा॥रीं समाप्त जाहली. पंतप्रधानांची स्वारी सालगुदस्तां पर्वतीस गेली होती. सांप्रतही जावयाचा निश्चय होता. परंतु पंतप्रधानास किंचित हरारत येऊन प्रकृती अस्वस्थ जाहली व ज्वराचा बुखार. बारीक फुटकल्या कानन्याप्रमाणें अंगावर आल्या. या करितां स्वारी मवकूफ जाहली. श्रुत होय हे विनती.

पै॥ छ १५ माहे शाबान सोमवार सन ११९५ हिजरी पावले. दोन प्रहर दिवस, मै डांक सरकार.

A. R. No. 76.

८ शाबान ११९५ हिजरी
३० जुलै १७८१

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे यथील कुशल. ता॥ छ ८ माहें शाबान मु॥ क॥ पुणे. स्वामीचे कृपावलोकणें करून येथास्थित जाणोन

स्वानंद लेखन आज्ञा करीत असिले पाहिजे. विशष, यथील वर्तमान छ ६ माहे म।।र रोज शुकरवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले, ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर यथील वर्तमान परवतीस ब्राम्हनास दक्ष(णा) जाली. वीस हजार ब्राम्हन मिळाला होता. उतम ब्राम्हनास पाच सात रुपये परियेत दक्षना जाली. मध्यमास दोन तीन येक रुपये या परियेत जाली. च्यार घटका रात्र परियेत दक्षना जाली. उपरातिक ब्राम्हन सुटले. दक्षना द्यावयास नाना व हरीपंत वगैरे बसले होते. शृत होये. ब्राम्हनाचे प्रदक्षेनेस श्रीमत आले नवते. कारन की श्रीमतास कांज्या निघाल्या आहेत. तीन च्यार दिवस जाले. आता श्रीमताचे कांज्यास उतार आहे. शृत होये. छ ६ रोज शनवार इग्रजाचे येक ज्याहज मातबर बदरातून माल भरून ममईस येत होते, त्या ज्याह(जा)सी व फरासीसाचे ज्याहजासी कोटे गाठ पडली. लडाई जाली. फरासीसाने ते इग्रजाचे ज्याहज हस्तगत केले, ते आपले बंदरास घेऊन आले. ते ज्याहज अकस्मात तेथून निघाले ते विजेदुर्गास श्रीमताचे तालुक्यात आले. ते विजेदुर्गवाल्यानी धरले. त्या जाहजात माल पउनेतीन लक्ष रुपये परितये आहे. पुतल्या वगैरे आहेत. यैसी वंदता आहे. कोन्ही म्हनतात की लाख पनास हजार रुपयाचा माल आहे. यैसे वर्तमान येथे आले आहे. तहकीक वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होयें. बेदर वगैरे सरकारचे तालुक्यातून याजकडील कमाविसदार उठून आले. त्याजवरून येथील लहान मोठे ग्रहस्त अफवाई वर्तमान विरूधाचे बोलतात. शृत होये. राजश्री कृष्णरावजीचा येज्यमानसाहेबाकडे यावयाचा निश्चये जाला आहे. माहे म।।री श्रावनी पूर्णिमा जालिया अलीकडे पलीकडे मोहर्त करून निघनार, यैसे वर्तमान आहे. निश्चये होऊन मोहर्त करून रावजी निघाल्यास लेखन केले जाईल. शृत होये. राजश्री नाना व हरीपंत व कृष्णरावजी याचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की रावजीची रवानगी येज्यमानसाहेबाकडे सत्वरच करावी. दुसरे इग्रजाचे पारपत्याविशई मसलत करून सत्वर

स्वारीचा उद्वोग करावा, आनीक कितिक आपले दौलतीचा बदोबस्त करावा या अनवये खिलवत जाला. यैसे यैकिल्यात आले. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. शृत होये. छ ७ रोज रविवार इग्रज ममईस व कल्यानीस सरजाम करून तयार जाले आहेत. रमजानचे महिन्यात इकडे उद्वोग करनार, यैसे वर्तमान आले आहे. शृत होये. राज(श्री) कृष्णरावजी दरबारास गेले होते. नानासी व रावजीसी च्यार घटका खिलवत जाला. उपरातिक रावजी आपले घरास आले. शृत होये. विजेदुर्गाकडे इग्रजाचे ज्याहज सापडले. त्याजवर माल साहा पाच लक्षाचा आहे. यैसे वर्तमान आहे. त्याजवरून तेथे पाच च्यारसे गारदी व काही कामाठी वगैरे पाठविणार, यैसे वर्तमान आहे. गारदी वगैरे पाठविल्यास लेखन केले जाईल. शृत हाये. श्रावन वद्य पक्षी पचमीस याचे डेरे बाहेर होणार. पुढे इग्रजाचे स्वारीचा उद्वोग करणार शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास आलिया लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती. छ २४ माहे रजबचे आज्ञापत्र डाकेसमागमे सादर केले ते छ ५ माहे मा।री सेवकास पावले. पावोन संतोश जाला. सदैव आज्ञापत्रे सादर होत असावी हे विज्ञाप्ती.

A. R. No. 77.

९ शाबान ११९५ हिजरी
३१ जुलै १७८१

पै।। छ २३ माहे शाबान मंगळवार सन ११९५ हिजरी पावले. दोन प्रहर मै जोडी तैनाती राये हैबतराव.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल त।। छ माहे शाबान मु।। क।। पुणे स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष . येथील वर्तमान छ ८ माहे

म।।र रोज सोमवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचेडाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर, यथील वर्तमान. राजश्री देवाजीपंत दिवान भोसल्याचे, त्यास तीन च्यार दिवस ज्वर येऊन शात जाले, यैसे वर्तमान नागपुराहून येथे आले. चागला व शाहाना मणुश होता म्हणोन दोन घटका कारभारी त्याचा स्तव करीत होते. शृत होये. सरदेशमुखी वगैरेचे तहास व कितीक राजकारनाचे कामाचे बदोबस्तास राजश्री कृष्णराव-जीस येज्यमानसाहेबाकडे पाठवावे यैसी यौज्यना जा।ली आहे. हे वर्तमान एक दोन विनंतीपत्री लेखन केले आहे. त्याजवरून ध्यानास आले असेल. त्यास राव म।।र दो चौ दिवसा मोहोर्त करून निघनार. हे मोहर्त टलले तर आखर श्रावनमासी माहे म।।री निघनार यैसे वर्तमान आहे. मग कोनत्या मोहर्ते राव म।।र निघतील हे वर्तमान सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. पंचमाहाल वगैरे निर्मल प्राताचा सरदेशमुखी वगैरेचा पैका राहिला आहे. व सुरलीत पैका येत नाही म्हणौन त्या प्रातात फौज रवाना करावी. चागला मातबर सरदार यौजून पाठवावा यैसी यौज्यना करितात. त्यास र।। विसाजी कृष्ण यासी पैगाम केला की, तुम्ही हिदुस्तान प्राती पनास साठ हजार फौज नेऊन तिकडील बदोब(स्त) केला. सर्वास जरबेत आनिले. प्रस्तुत तुम्ही फौज ठेऊन पचमाहाल वगैरे निर्मल प्रात इकडे जाऊन बदोबस्त करावा यैसा पैगाम केला. व नानाही समक्ष विसाजीपंतास सागितले. त्याजवरून विसाजीपतानी उतर केले की, हिदुस्तान प्राती जाऊन सर्व बदोबस्त केला, सिदे होलकर यास जरब देऊन पैका घेतला, सरकार काम येथास्थित केले. यैसे असता आम्हाकडे नानाप्रकारे दोश लाऊन पैका घेतला, योग्य ते सहन केली, असो. जे जाले ते उतमच जाले. प्रस्तुत फौज ठेऊन पंचमाहाल वगैरेकडे जा म्हनता. त्यास आमचे म्हातारपन जाले. चाकरी होत नाही. स्नानसध्या करून श्रीमताचे कल्यान इछितो. हे कामास अनीक कोन्हास सागावे. यैसे उतर प्रस्तुत त्यानी केले. त्याजवरून राजश्री नागोराम पागे यासमागमे पाच च्यार हजार

फौजेची नेमणूक करून पंचमाल वगैरे या प्रातात पाठवावे यैसी यौज्यना करितात. निश्चये होऊन नागोराम याची रवानगी जालिया लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. विदित होये. छ ९ रोज मगलवार इग्रजाचे ज्याहाज येक ममईस जात होते. ते ज्याज फरासीसानी धरले. ते ज्याहाज तुफानामुले तेथून निघाले. ते याचे तालुक्यात विजेदुर्गास लागले. त्याजवर माल फार होता. हे वर्तमान पूर्वी लेखन केले होते. त्यावजरून शृत जाले असेल. त्यास ते ज्याहाज सवदागिरी होते. सवदागिरानी इग्रजाचा कौल घेऊन त्याचे निशान ज्याहाजावर लाऊन येत होते. ते ज्याहाज फरासीसानी अटकाविले. ज्याहाजासी ज्याहाज बाधले होते. सवदागीराचे लोकानी ज्याहाजाचे रसे कापले. ते ज्याहाज तुफानामुले चालले. ते ज्याहाज सुवर्णदुर्गास श्रीमताचे तालुक्यास लागले. ते ज्याहाज यानी धरले. त्यात आठ नव लक्षा रुपयाचा माल सापडला. यैसे वर्तमान आले. शृत होये. इग्रज ममईस व कल्यानीस आहेत. सरजाम वगैरे भारी केला आहे. पुढे ते इकडे उद्वोग सत्वरच करनार. शृत होये. डाकेसमागमे दौ चौ दिवसाआड वरचेवर विनंतीपत्रे सेवेसी रवाना होतात. त्याजवरून सविस्तर वर्तमान शृत होत असेल. विदित होये. सेवकाचे जागीरीस गनेशपंत व खानदेशचे सुभेदार यानी उपद्रव देऊन गाव खराब केले. मन माने तैसा यैवज घेतला. येविषयीचे वर्तमान पूर्वी दोन तीन विनंतीपत्रीं अक्षरशाहा लेखन केले आहे. त्याजवरून ध्यानास आले असेल. येविशई सरकारचे इनायेतनामे कारभाऱ्यास व रावजीस व आपली पत्रे माझे साहित्याविशई आले पाहिजेत की याचे गाव खेडयापासून गनेशपंत व खानदेशचे सुभेदार वगैरे यानी यैवज घेतला आहे तो माघारा देविला पाहिजे. व गावखेडयास कोन्हाचा उपद्रव न होये. या अनवये इनायेतनामे व आपली पत्रे सादर जाली पाहिजेत. सर्व प्रकारे मजला त्राते आपले चरन आहेत. सर्व माझी लज्या स्वामीस आहे. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 78.

१० शाबान ११९५ हिजरी
१ आगस्ट १७८१

पै।। छ २३ माहे शाबांन मंगळवार पावले. दोन प्रहर दिवस सन ११९५ हिजरी, मै जोडी तैनाती सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां। नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान ता।। छ १० शाबान श्रावण शुध द्वादसी सौम्यवासर प्रथम प्रहरपर्यंत मो पुणें, क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. इकडील अखबारी वर्तमान छ ८ माहे मा।।रपर्यंत डांकेवर रवाना केलें. तें पत्रें दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीस पावलीं असतील. राजश्री कृष्टणरावजीस इनायतनामा मुतेजमनतलब हुजूर चिरंजीव राजश्री रघोतमराव स्वामीचे सेवेसी पावल्यानंतर चिरंजीवाचा अर्ज हुजूरप्रिजीरा होऊन सादर जाहला. त्यावरून रावजीनीं राजश्री बाळाजीपंत नानाचे आज्ञेनुरूप हुजूर जावयाचा निश्चय करून, इनायतनाम्याचा जवाब हुजूर येतों म्हणोन, व नवाब मोईनुदौला बहादर व स्वामीचे पत्राचें उतर सेवकाचे स्वाधीन केलें तें चिरजीव राजश्री रघोतमराव यांचे लिफाफियांत मलफूफ करून स्वामीचे नांवचे लिफाफ्यांत चिरजीवाचा लखोटा घालून छ ८ शाबांनी डांकेवर पत्रें रवाना केलीं. तें दारोग्यानीं पावतीं केलीं असतील. या उपरि सुमुहूर्तें करून रावजी स्वार होऊन बारामतीचे मार्गें हुजूर येणार. चौथाईचा तह किंवा अमल ज्यारी होणें. जमीदाराचें लिहून दिधल्याप्रमाणें करार करून घ्यावा हें इकडील कारपरदाजाचें मानस नांहीं. हरयेक माहालांत खानावसुलाची रुजवात हजरत मगफरतमाब यांचे समईची पाऊन, त्याउपरि तह करार करावा हें यांचें मानस. चौथाई व सरदेशमुखीचे मामलतींत घासदाण्याची बाबत जमेस धरितात येविषईं येथें सेवकानें यांसी उतर प्रत्योतर बहुतवार केलें. परंतु घांसदाण्यासुधां समग्र बाबती

जमेस धराव्या लागतील यैसें म्हणता (त). सेवटील प्रकार माधवराव व नारायणराव यांजपर्यंत जो अमल ज्या माहालांत चालला, त्याची रूजवात पाऊन, त्यापैकीं कमी करून, ज्यांत हुजूरचा नफा होय त्याप्रमाणें फैसला करावा येंविषईं नवाब मोईनुदौला बहादरानीं रावजीस पत्र पाठविलें. त्यांत दोन शकली लिहिल्या होत्या. त्या पैकीं, शकल दुयमीप्रमाणे, हुजूरचे पास मर्जीकरितां करार करावा लागेल म्हणोन कृष्टणरावजी बोलिले. व चौथाईचा तह मार्गानि हुजूरची किफायत होय. त्याप्रमाणे करण्यांत येईल म्हणोन रावजीचें बोलणें आहे. इंगरेजांचे मसलहतीचा निश्चय हुजूरीहून नकशा जाहला त्याप्रमाणेंच आमलांत यावा. व येविषईं हुजूरचे तरफेनें ज्वाबसाल करणारास आपण लाजवाब करूं. खामखा आग्रह धरल्यास खावंद मुख्तार आहेत. दस्तायेवजी बोलण्यांत आम्हीं कायल होणार नांहीं. या प्र।। कृष्टणरावजी व गोविंदराव बोलत आहेत. इंगरेजांचे मसलहतींत जो करार हुजूरीहून जाहला, त्याचा इरशाद सांप्रत चिरजीव रघोतमराव यास जाहला. व साल गुदस्ता. (अपूर्ण)

A. R. No. 79. ११ शाबान ११९५ हिजरी
२ आगस्ट १७८१

पै।। छ १७ शाबान सन ११९५ हिजरी, सरकारच्या डाकेबराबर आले ते दारोगियाचे विद्यमाने पावले. गुरुवार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां। नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान त।। छ ११ शाबान श्रावण शुध त्रयोदसी गुरूवासरपर्यंत मो। पुणें, स्वामीचे कृपे करून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. पूर्वीं छ ८ माहे म।।री हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र चिरजीव राजश्री रघोतमराव यांचे नांवचे लिफाफ्यासहित डांकेवर रवाना केलीं. तें दारोग्याचे विद्यमानें

पावलीं असतील. राजश्री कृष्टणराव बलाळ यांस इनायतनामा मुतजमनतलब हुजूरीहून आला होता. त्याचें प्रत्योतर अर्जी व नवाब मोइनुदौला बहादर व स्वामीचे पत्राचीं उतरें राव म।।रनुलेकडील चिरंजीवाचे लिफाफ्यांत पाठविलीं. तें चिरंजीवानीं सेवेसी पावती केली असतील. उतम मुहूर्त पाहून रावजी हुजूर यावयाचे उदेशें स्वार होणार. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिले होतें. त्यास श्रावण शुध व वद्य पक्षीं प्रमाण मुहूर्त चांगलें नांहीं. याकरितां भाद्रपदा शुध त्रितीया बुधवार छ २ रमजानीं प्रयाण मुहूर्त निश्चय केला आहे. सांप्रत कुटुंबासहित पुण्यांत आहेत. याकरितां दोन प्रकारची योजन आहे. कुटुंबासहित बारामतीस गेले तरी श्रावण वद्य पक्षीं श्रीमंत पंतप्रधान व कारभाऱ्यांपासून रूखसत घेऊन बारामतीस जांवें. व छ २ रमजानीं बारामतीहून स्वार व्हांवें. किंवा, छ म।।रीं पुण्याहून स्वार होऊन बारामतीचे मार्गें हवेलीस न जातां परस्परें जांवें. या प्रकारची योजना आहे. कितेक मामलतदारानी बालाजीपंतास सुचविलें कीं, बेदर वगैरे माहालांत चौथ व सरदेशमुखीची मामलत उगवत नांहीं व सांप्रत हुजूरीहून मामलतची बंदी जाहली, हेंही वर्तमान आहे. याकरितां आम्हांस परवानगी देणें. ज्याप्रमाणें कळेल त्या रीतीनें मामलत उगऊन घेऊ. बाळाजीपंतानीं सर्वत्रांस सांगितलें आहे कीं, हुजूरीहून मामलत बंद जाहल्यास चिंता नांहीं. मामलतीचे रुपये तुम्हास न आले तरी आम्हीं देऊं. व सांप्रत राजश्री कृष्टणराव बलाळ हुजूर जात आहेत. समग्र कामाचा गुता उरकतील. राव म।।र हुजूरीहून परतोन आल्यानंतर तुमचा बंदोबस्त करून देऊं. पुण्यांत लोकाचें जुबानीं बहुत करून चर्चा आहे कीं, हुजूरीहून चौथाईची मामलत बंद जाहली. त्या अर्थीं पंतप्रधानाचा व हुजूरचा स्नेह राहणार नांहीं. व मामलत उगवावयाकरितां फौज जाईल. दरबारी या प्रकारची चर्चा. हा काळ किमपि नांहीं. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें, हे विनती.

———

पै।। छ १७ शाबान सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ।। छ ८ शाबान लगायत छ ११ माहे म।।र, श्रावण शुध सन ११९५ हिजरी.

कृष्टणराव बलाळ यांस बमोजिब व रूप इनायतनामा हुजूर पाठवावयाची तजवीज केली आहे. हें वर्तमान पंतप्रधानांचे कारपरदाजानीं हैदरअलीखान यांस लिहून पाठविलें, व राव म।।र यानीं हुजूर जावयाचा निश्चय केला आहे. माहादाजी सिंदे काळेबागासमीप छावणीस आलें. व खंडोजी भोंसले दोन तीन मजली नागपूरीहून आलें होते. नागपूरास दाखल जाहलें असतील. दिवाकर पुरुषोत्तम समाप्त जाहल्याचें वर्तमान नागपुरीहून आलें. या वितरिक्त अवांतर वर्तमान लिहून छ ८ माहे म।।रीं डांकेवर अखबार रवाना केली. ते हुजूर व सेवेसी पावली असेल, त्या उपरि जाहलें व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

करनल गाडर व जनराल मुंबईकर, जंगी सरजाम दारू व गोळे वगैरे पनवेल व कल्याणीस, मुंबईहून पाठवीत आहेत म्हणोन येथील कारपरदाजास बातनी आली आहे.

पूर्वी माहदाजी सिंद्यांसी व इंगरेजांसीं लढाई जाहली. हे खबर पेशजी लिहिली आहे. त्याच लढाइचें पुन्हां वर्तमान यैकिलें कीं उमरावगीर गोसांवी व आणखीं येक दोघें सरदार सिंद्याकडील लढाईंत कामास आले. सांप्रत इंगरेजांवर सिंदे गालिब नांहीत. परंतु गनिमाईचे युक्तीनें व कजाखी करून इंगरेजांचे रुखावर कायम व पशकदमी करून देत नांहींत.

दिवाकरपंत मेल्याचें वर्तमान यैकिल्यानंतर, येथील कारपरदाजानीं भवानी सिवरामाचे विद्यमानें, भवानी काळो व रघोजी भोंसले व

मुधोजी भोंसले यांस पत्रें पाठविलीं आहेंत. त्याचा म।।र तपसीलवार कळला नांहीं. खुलासा यैकिला कीं, दिवाकरपंत दुरंगी होते. सांप्रत तुम्हीं दूरअंदेश व साताऱ्याचे राज्याचे इष्टचिंतक आहांत. याकरितां, बगाल्याचे माहिमेस फौज मातबर पाठवावी. व पंतप्रधानांनासी अकृत्रिम स्नेहानें वर्तत जावें. यांत परस्परें स्नेहांची वृधी व राज्याची कायमी आहे.

हैदर नायकाचे लष्करांत इंगरेजांकडील हरकारे खुफिया आले होते. ते धरले गेले. त्याउपरि हरकाऱ्यानीं इंगरेजांकडील पत्रें सरसरी कोण्हीं येक सरदाराचे नांवचीं आणली होतीं तें दिधलीं. खोटीं पत्रें पाहून जासूदास बासाचा मार देऊन, नासिकच्छेद करून, लष्करबाहर करून दिधले म्हणोन कृष्टणरावजीचे मुखें वर्तमान यैकिलें.

मोतरम नामे फरासीस अदवनींत शुजाउलमुलक बहादरांसमीप होता. तेथें नोकरीचा बेबनाव जाहला. व पंतप्रधानांचे वकीलाचे मारफातीनें पंतप्रधानांचा कौल आणविला होता. सांप्रत छ १० माहे म।।रीं पुण्यास आला. समागमें जमीयत

फरासीसनफर	बारचेजवान	शागीर्दपेशा	वगैरे	घोडीं	उंट	याबू
१५	७५	५०	६०	६	१०	

सदरहूप्रमाणें सरजाम सध्या आहे. माघाहून गोरे पंचेवीस व बारचे लोक दोनसें येणार म्हणोन यैकिलें.

पै।। छ १७ शाबान सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

२

पुरवणी अखबार. छ ११ शाबान सन ११९५ हिजरी. मानाजी

फांकड्या उटनूर मांडव्यास आहे म्हणोन येथील कारभाऱ्यांस बातनी आली. त्यावरून पांडुरंग बाबूराव बारामतीकरास म।।रनुलेंचे तंबीस पाठवावयाची तजवीज आहे. हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. सांप्रत पांडुरंगराव याची पागा व गोविंदराव अनगळ व बळवंतराव मुंढें यास ताकीदपत्रें गेलीं आहेंत की मानाजीस दस्तगीर करून घेऊन येणें. म।।रनुले गेले म्हणोन यैकिलें.

इंगरेजांचें जाहाज तुफानांत वाहवलें तें सुवर्णदुर्गासमीप लागलें. व त्यांतील सरजाम काय याचे चौकसीस हरीपंताचे पुतने गेले हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत सुवर्णदुर्गीहून वर्तमान आलें कीं, जाहाजावर तोफा सुमार पांसष्ट व सरजाम बानात वगैरे दोन लाखाचे किमतीचा जाहला.

खंडेराव भोंसले नागपुरीहून दोन तीन मजली आल्याचें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं, बिंबाजी भोंसले याची समजावीस करून खंडेराव भोंसल्यानी म।।रनुलेस आपले समागमें आणिलें आहे.

पंतप्रधानांची प्रकृती स्वस्थ जाहली. हरीपंत फडक्यास सुळां-करितां कांही येक स्वस्थता नांहीं.

A. R. No. 80.

१२ शाबान ११९५ हिजरी
३ आगस्ट १७८१

पै।। छ २० माहे शाबान शनवार सन ११९५ हिजरी, दोन घटका रात्र, मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान त।। छ शाबान श्रावण शुध पौर्णिमेपर्यंत क्षेम जाणून,

स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. छ म।।रीं येथील अखबारेसहित पत्रें डाकवर रवाना केलीं. तें पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें असेल. येशवंतराव नाईक निंबाळकर व मानाजी फांकडे वगैरेची तंबी पंतप्रधानांचे कारभाऱ्यानीं करावी. येविषईं, इकडील सूचनेनुरूप, हुजूरीहून इनायतनामे राजश्री बालाजीपंत व कृष्टणरावजीचे नांवें सादर जाहले होते. त्याचे जवाब उभयतानीं हुजूर अर्जी लिहून सेवकाचे स्वाधीन केली, ते सेवेसी पाठविली आहे. सेवकाचे अर्जीसहित हुंजूर गुजरेल. राजश्री कृष्टणरावजी भाद्रपद शुध त्रितिया छ २ रमजानीं सुमुहूर्तें करून हुजूर यावयाकरितां रवाना होणार. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिले आहे. सरंजामी जावयाची करीत आहेत, व हुजूर सत्वर जांवें हे उत्कंठा रावजीस बहुत आहे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें, हे विनती.

A. R. No. 81. १२ शाबान ११९५ हिजरी
३ आगस्ट १७८१

पै।। छ १८ माहे शाबान सन ११९५ हिजरी रोज गुरुवार. मै डाक हजूर, संध्याकाळी.

श्रीशंकर

विनंती विज्ञापणा यैसीजे. येथील कुशल त।। छ १२ माहे शाबान मु।। क।। पुनें, स्वामीचे कृपावलोकनें करून येथास्थित जाणोन, स्वानद लखनआज्ञा करीत असिले पाहिजे. विशष. येथील वर्तमान छ १० माहें म।। रोज बुधवारीं प्राथःकाली विनंतीपत्र व हजुरात अर्जी व अखबार र।। हयेबतरावं याचे तैनाती जोडीसमागमें सेवेसी रवाणा केले. ते पाऊन सविस्तर ध्याणास येईल. तदनंतर येथील वर्तमानं. राजेश्री देवाजीपंत दिवान भोसल्याचें यांस देव आज्ञा जालीं यैसे

वर्तमान नागपुराहून आले. देवाजीपंताचे मृत्यं पावल्याचे वर्तमान आले म्हणोन कारभारीं बहुत श्रमी जालें. दोन घटकां त्याची स्तवं करीत होते कीं, मणुश चांगला शाहाणां होता. याप्रमाणे स्तव करीत होते. श्रुत होये. राजेश्री विसाजी कृष्णं बिनिवालें यास कारभारी यानीं पैगांम केला. व समक्षंही बोलने जाले की, तुम्ही हिदुस्थानंप्रांती पणास हजार फौज घेऊन कामकाज केले, व सरदारास वगैरे जरबां देऊन सरकारकात केले हे ज्यहनसीनं आहें. प्रस्तुत तुम्ही फौज ठेऊन पंचमाहलं व निर्मळ वगैरे या प्रांतांस जावें. कारन कीं, तिकडील आपलें मामलतीचा पैका मागील येणे व पुढील पैक्याचा निर्गम होये ते करावें. व बदोबस्त येथास्थित राहे ते करावें. याप्रमाने विसाजीपंतासी पैगाम केला व समक्ष सांगितलें. त्याजवरून विसाजीपंतानी उतर केंले कीं, आम्ही हिदुस्थानंप्रांती पन्नास हजांर फौज घेऊन गेलो. सरकार चाकरी येथानशंत्या जाली, सिंदे व होंलकर यास जरब देऊन पैका घेतला, व तिकडे राजकारनें बहुत केलीं. सरकार काम बज्यावलें. यैसे असता आम्हांस पेचात आणोन पैका घेतला. यौग्ये ते सहन केलीं. सर्व गोष्टी जांल्या. प्रस्तुत आपनं म्हणता कीं, फौज वगैरे ठेऊन पंचमाहल वगैरे या तालुक्यात जावें, पैका घ्यावां, त्यास सरकार चाकरी करावी हे उचितच होयें. परंतु आमचे वृधोंपकाल, चाकरीची शक्त राहिली नाही. आतां श्नान सध्या करून श्रीमंतास कल्यान इछून असावे, यांतच आमचे स्वरूप आहें. फौज वगैरें ठेऊन पंचमाहाल वगैरेंकडे जावयाचे काम दुसऱ्यास सांगावें. आमचे चाकरीचे दिवस नाहीत यैसे प्रस्तुत उतर साफ विसाजीपंतानी केले. विसाजीपंताकडील यैसे उतर जाल्यांवर, राजश्री नागोराम दि।। पागा याची योजणा केली आहे कीं त्यासमागमें प्रस्तुत पांच च्यार हजार फौज देऊन पंचमाहालें व निर्मळ वगैरे या प्रांतास पैका वसूल करावयांस पाठवावें. यैसी नेमणूक करितांत. निश्चये होऊन नागोराम रवाणा जाल्यांस लखन केले जाईल. श्रुत होयें. राजश्री कृष्णरावजी याची रवाणंगी येजमानसाहेबाकडें करावयाचा निश्चये जाला. हें तीन च्यार विनंती-

पत्री लखन केले आहें. त्याजवरून ध्याणासं आले असेल. त्यास राव म।।र छ १८ माहे म।।रीं रवाणां होंणार यैसे वर्तमान आहें. रवाणा जालियांस लखन केले जाईल. राव म।।र हजुरात येतात. जाबसालास बलं पडावें म्हणोन, नागोराम वगैरे याची रवाणगी फौजेसहित पंचमाहाल वगैरेकडे करणांर यैसे वर्तमान आहें. श्रुत होये. इंगरेजाचे ज्याहज ममईस येत होते. त्यासी व फरासीं-साचें ज्याहजासी गांठ पडोन लडाई जाली. ते ज्याहज त्याजपासोन सुटून सुवर्णदुर्गास श्रीमंताचे तालुक्यात आलें यानी धरलें. त्याजवरं मालं बहुत सापडला. हे वर्तमान पूवीचे विनंतीपत्री लखन होते. त्याजवरून ध्याणांस आले असेंल. त्यास ते ज्याहज संवदागिरी होते. संवदागिरानें इगरेजाचे निशान लाऊन ममईस जात होते. त्यासी व फरासीसाचें ज्याहजासी गांठ पडली. परसपरे लडाई जाली. संवदागिराचें ज्याहज तुफानामुले बहकले. ते सुवर्णदुर्गास श्रीमंताचे तालुक्यांत लागलें. सुवर्णदुर्गास हरीपंताचे ठाणे होते, त्यानी ते ज्याहज धरले. ज्याहाजात दाहा लक्ष रुपयेची मता सापडलीं. वींस पचवीस तोफा होत्या. वंदता आहे कीं, ज्याहाजात माल बहुतच होता. परंतु दाहा लक्ष रुपयेचे वित सापडले यैसी वंदता आहें. त्यापैकी पांच च्यार लक्ष रुपयेच्या पुतल्या वगैरे होत्या. त्या येथे आणिल्यां. यैसे वर्तमान आहें. श्रत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकीं वगैरे कामाकाज जालें. श्रुत होयें. छ ११ माहे म।।र रोज गुरुवांर इगरेजानी ममईस व कल्यानींस भारी सरजाम केला आहे यैसी वदंता आहें. रमजानंचे महि-नियात इकडे उद्योग करणांर यैसे वर्तमान आहें. कारभारियाचेही मानसं आहे की, माहे म।।रीं वद्यपक्षी डेरे बाहेर करावें. फौजा वगैरे जमा कराव्यां. तमाम लोकांस पत्रे वगैरे पाठवितात. श्रुत होयें. नवांब बसालतजंग बहादर याजपांसी अदोनीस फरासीस चाकार होता. तो फरासीसं वीसं पंचवीसं गोऱ्यानसीं, व पऊनसे आसी गांडदी, व सात उंट व चालीस पणासं मणुश शागीर्दपेशा, या सरंजामानसीं अदोनीहून येथे येऊन दाखल जालां. तोफखान्यात उतरला आहें, त्यास चाकर ठेवणांर. श्रुत होये. हेदर नाइकाचे पत्रे आली.

पत्रे वकीलानी कारभारियांस दिल्हीं. पत्राचे वर्तमान यैसे ऐकल्यात आले आहे कीं, इंगरेजानी सलुकाचा पैंगाम नाइक मं।।र यासी लाविला आहें. मागतीं येविसीचा शोध करूनं सेवसी लेखन केले जाईल. परंतु नाईकं मं।।र याचें समत घेतल्यावाचोन संलुकाचा डौल करणांर नाही यैसेही येथे बोलतात. श्रुत होये. राजेश्री नाना व हरीपंत व कृष्णरावजी या त्रिवर्गाचा खलबत जाला. खलबताचा भाव यैकल्यात आला कीं, रावजीची रवाणंगी हजुरात करावी. दुसरे कितेक आपले दंवलतीचे बदोबस्ताविशईं जाला. श्रुत होयें. श्रीमंतांस कांज्या निधाल्या होत्या. हे वर्तमान पूर्वी लखन केले होते. त्यास श्रीमंतास कांज्या निघोन आराम जालां. येथास्थित आहेत. श्रुत होयें. आंगंऱ्याचे विद्यमानें, इग्रेजानी काही सूत्रं पैगामाचे याजकडे आले आहें यैसी वदंता आहे. परतु येंथील लोक तर्क करितात कीं, इग्रेज दगाबाजी करून सळूकाचे सूत्रं आंगऱ्याचे विद्यमाने याजकडे लावितो. ठीक नाही. यैसे वर्तमान आहें. यैकिले वर्तमान सेवेसी लेखन केले असें. तहकीक शोध लागल्यास खनल (लेखन) केले जाईलं. श्रुत होयें. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल, ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

A. R. No. 82.

१५ शाबान ११९५ हिजरी
६ आगस्ट १७८१

पै।।छ २३ माहे शाबान मंगळवार सन ११९५ हिजरी साइंकाळ म जोडी डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सं।। नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान त।। छ १५ शाबान श्रावण वद्य त्रितिया इंदुवासरपर्यंत, म।। पुणें, क्षेम जाणून स्वकीय स्वानंद लेखनाज्ञा कली पाहिजे. विशेष

पूर्वी छ १२ माहे म।।र पर्यंत येथील अखबार हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहून डांकेवर पत्रें पाठविलीं तें दारोग्याचे विद्यमानें पावलीं असतील. सांप्रत यैकिलें वर्तमान तपसीलवार पृथकपत्रीं सविस्तारें लिहिलें आहे. त्यावरून सेवेसी श्रुत होईल. राजश्री कृष्टणराव बलाळ यानीं आपले डेरे वगैरे सरंजाम पुण्याहून बारामतीस आजी छ म।।रीं प्रातःकाळीं रवाना केले. छ २ रमजानीं राव म।।र निश्चय-रूप पुण्याहून स्वार होऊन बारामतीचे मार्गें हुजूर येणार. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें, हे विनती.

A. R. No. 83. (पो. ता.) २३ शाबान ११९५ हिजरी
१४ आगस्ट १७८१

पै।। छ २३ माहे शाबान मंगळवार सन ११९५ हिजरी साइंकाळ. मै डांक सरकार.

श्रीनिवास

पुरवणी पत्र. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी. विनती उपरि. सखाराम भगवंत यांसीं व फडनिसांसीं प्राचीन द्वेष व परस्परें चित्तशुद्धता नव्हती. वैकुंठवासी माधवराव यांनीं आपले उत्क्रमण-समई, पंत म।।र शहाणे व अजमुदेकार, याकरितां, मदारुलमाहामी सांगून नारायणराव यांस सखारामपंताचे स्वाधीन केलें. सखाराम-पंतानीं नव महिन्यांत पनास साठ लाख रुपये खजाना करून, यैसीं लाख रुपये कर्ज, बाजीराव यांजपासून सावकारी देणें होतें, ते फैसल केलें. रघुनाथराव यांसहीं वैकुंठवासी माधवराव यानीं मुक्त केलें होतें. व इतिफाकानें वर्तणूक करावी हे वसीयत होती. याकरितां रघुनाथराव यांचें मनोधारण रक्षून पंत म।।र कारभार करीत होते. याची असाध्यता दुसरे कारभारी हरीपंत व फडनीस मंडलीस जाहली. व नारायणराव यांचे बुधींत विपर्यास घालून रघुनाथरायांस पुन्हा

कैद करविलें. त्याजमुळें नारायणराव मारले गेलें. व पंतप्रधानाचे दौलतीचा पाया खचला. त्याउपरि, रघुनाथराव सरदार मुख्तार जाहले. याची असाध्यता सखारामपंत व फडनीस व हरीपंत वगैरे समग्रास जाहली. याकरितां समदु:खी होऊन परस्परें यैक्यता केली. व हुजूरचा आश्रय करून, पंतप्रधानांची दौलत कायम करून, श्रीमंत माधवराव पंतप्रधान याची सरदारी स्थापली. परंतु, कारभाराचे ईर्षेकरितां परस्परें हरयेकांत चितशुद्धी राहिली नांहीं. हरीपंतानीं फौजेचे कामाची सरबराई करून लोकांस इजाफे करून सिपाही लोक आपले ममतेत आणिले. व माली कामाची यख्त्यारी राजश्री बालाजीपंतनानाकडें. यास्तव सखारामपंतांस असाध्यता जाहली. व हरीपंताची व सखारामपंतांची ज्यानीं दुषमनी प्रमाणें द्वेष वाहडला. परस्परें काबू पाहूं लागले. सखारामपंतानी मोरो बाबूराव व तुकोजी होलकरास यैक्यतेंत घेऊन, बालाजीपंत व हरीपंतास राजी करावयाचा उपाय करून, बालाजीपंतांस आपले जरबेंत आणिलें. हरीपंताची व फौजेची यैक्यता. याकरितां जाहीरा सिपाही लोकांनी सखारामपंतासी स्नेह दाखविला. परंतु, अंतरंगी वचनप्रमाण हरीपंतासी करून यैक्यतेनें होते. सखारामपंताचा सांप्रदाय दुषमनास आपले अंकित करून थोडीसी जरब दाखवावी, सर्वस्वें त्याचा नाश न करावा. याकरितां, बालाजीपंतास राखिलें. व फक्त फडनीसीचें काम बालाजीपंतानी करांवें, व फौजेचें काम मोरोपंतानीं, व सरदारी सखारामपंताकडें, हरीपंतानीं सर्वत्रांची ताबेदारी करावी, याप्रमाणें निश्चय जाहला. माली कामाचा यख्त्यार बालाजीपंताकडें पूर्वीपासून. याकरिता गड व किले समग्र बालाजीपंताचे यख्त्यारींत. व महादाजी सिंद्यांसी व सखारामपंतांसी पूर्वीपासून

२

पै।। छ २३ शाबान सन ११९५ हिजरी मंगळवार साइंकाळ. मै डांक सरकार.

पुरवणी पत्र. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी.

चितशुधता नांहीं. यास्तव बालाजीपंतानी सिंदे म।।रास पांच लाख रुपये नख्त व असेरचा किला व जागीर देऊन आपले ऐक्यतेंत आणिलें. व काबू पाहून मोरो बाबूराव व बज्याबा पुरंदरे यांस कैद करून, पुढें पर्यायें करून सखारामपंतास कैद केलें. व घरची चीजबस्त व ठेव वगैरे माल मवेसी जे होती, ते जप्त करून सरका(र) दाखल केली. तेच दिवसीं जे शहाणे व दूर अंदेस लोक होते, त्यानीं निश्चय केला कीं, सखारामपंताचा मनसुबा कचा. याकरितां दुषमनास दुखऊन पुन्हां संरक्षण केलें. सखारामपंताचे सहस्त्रगुणेकरून हरीपंत व बालाजीपंत शाहाणे. सांप्रत सखारामपंतास कैद केलें. परंतु, आजीच समाप्त जाहले हा निश्चय करून कैदेंत ठेविलें आहे. सर्पास दुखऊन जिवंत सोडणें बुधिमंतांचें काम नांहीं. याकरितां बालाजीपंतानी व हरीपंतानीं जें केलें तें फार चांगलें. व पकी मसलहत आपले उपयोगाची जाणून केलें. सारांश, कांहीं दिवस सिंहगडावर पंत म।।र कैदेंत होते. त्याउपरि, कोंकणांत प्रतापगडावर एक वर्षपर्यंत ठेविलें. तेथील आबहवा सखारामपंतास मानली. व कारपरदाजांनीं कैद केलें, परंतु जिवंत सखारामपंत आहे, कदाचित, कांही उपाये करून सुटला तरी अनर्थ करील. याविषईं चिंता व हृद्रोग रात्रंदिवस होता. याकरितां, कोंकणांत रायगड म्हणून किला रघुनाथराव गजरे बालाजीपंताचे शालक प्रथम संमधी त्यांचे स्वाधीन आहे. व त्या गडावर वासुदेवभट कर्वे व बाला दीक्षित कोण्ही शिष्ट ब्राम्हण यांस कैदेंत ठेविलें होतें. त्यांनी परलोकास प्रयाण केलें. व रायगडांत कैद केल्यास, सत्वरच स्वर्गास मनुष्य जातें. स्वर्गाचा मार्ग तें स्थळ जाणून, व सखारामपंतानी कैदेंत श्रम किती दिवस अनभवावे, याकरितां रायगडावर कैदेंत ठेविलें. पायांत बेडी अहोरात्र व कोठिडीस कुलफ व दरीचकार सेवेंत दोघें माणसें. येक शूद्र आंधळा व बहिरा, व येक ब्राम्हण मुका. सीतळोदकें करून स्नान व भक्षायास जखीऱ्याचे मोठे तांदूळ. याप्रमाणें सरजाम नेमून दिधला होता. दिवसेंदिवस क्षीण प्रकृती होती. श्रावण शुद्ध त्रयोदशी छ ११ शाबान गुरुवारीं सखाराम-

पंतानीं परलोकास प्रस्थान करून, शरीर त्याग रायगडचे किल्यावर केला म्हणून येथील कारपरदाजांस वर्तमान आलें, म्हणून खारिज यैकिलें. व कृष्टणराव बलाळ यानी सांगितलें त्याप्रमाणें हुजूर व स्वामीस लिहिलें असे. कृष्टणराव बलाळ यांनी जिवाजीपंतास वर्तमान लिहून डांकेवर आजीच छ मजकुरी प्राथःकालीं पत्रें रवाना केलीं. हैदरअलीखानाचे व इंगरेज कर्नल कूट याची लढाई महमूदबंदराहून देवनामपटणास जातां जाहली. त्या लढाईंत मीर रजाअलीखान हैदरखानाचा शालक ठार जाहला म्हणोन खारिज यैकिलें. वकीलांचे सांगण्यांत किंवा दरबारी तहकीक नांही. हे विनती.

श्रीनिवास

विनतीजे. गणेशपंत बहिरे चालीसगांव परगण्यांत फौजेसुधा येऊन घांस दाणा घेतो. याजविषई आजिमुद्दौला बहादरानीं नाना व रावजीस पत्र लिहिलें आहे कीं, ताकीद मा॥रनुलेस पाठवावी. यांस ताकीद मागतों. माळुमाती पत्र देतील. श्रुत होय, हे विनती.

पै॥ छ २३ माहे शाबान सन ११९५ हिजरी मंगळवार साइंकाळ. मै जोडी डांक सरकार.

A. R. No. 84.

१७ शाबान ११९५ हिजरी
८ आगस्ट १७८१

पै॥ छ २६ माहे शाबांन सन ११९५ रो शुक्रवार दोन प्रहर, मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ॥ छ १६ शाबान लगायत छ १७ माहे मा॥र सन ११९५ हिजरी रोज बुधवार.

सुवर्णदुर्गासमीप जाहाज सांपडलें. त्यांत पांसष्ट तोफा व दोन लाख रुपयाचे जिनसाना पंतप्रधानाकडील कारकुनानीं तादाद करून घेतला. व दिवाकरपंत समाप्त जाहल्यानंतर पंतप्रधानांचे कारपरदाजानीं मुधोजी व रघोजी भोंसले यांस पत्रें पाठविलीं. मोतरम फरासीस अदवानीहून पुण्यास नौकरीचे इराद्यानें आला आहे. व रायगडावर कोंकणांत सखारामपंतास कैदेंत ठेविलें होतें. छ ११ माहे म।।रीं पंत म।।रनुलेचा काळ जाहला. या वितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ १२ व छ १५ माहे म।।रीं डांकेवर हुजूर अर्जी अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें. तें पाऊन, वर्तमान विदित जाहलें असेल. त्याउपरि प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान सेवेसी व हुजूर लिहिलें असे.

मुंबईकर जनराल व करनल गाडर यानीं कल्याणी व पनवेलींत आपली ठाणीं कायम करून चौकी ठेविली आहे. जंगी सरजाम दारुगोली वगैरे कल्याणी व पनवेलींस मुंबईहून आणीत आहेत. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. पंतप्रधानांचे कारपरदाजांनी खुफिया बातनी करितां नवी सिंदा व हरकारे मुंबई व कल्याणीस पाठविले आहेत. मुंबईस बेपारी व सवदागर पुण्याहून गेल्यास इंगरेजांकडील मनाई येणार व जाणारास नांहीं. पंतप्रधानाचे कारपरदाजानी मनाई व तकयुद फार केली आहे. परंतु कांही जरूरी सरंजाम लागल्यास, बालाजीपंत आपले तरफेनें बोहरीयास माल खरीदी करून आणावयाकरितां मुंबईस पाठवीत आहेत. व माल खरीदी होऊन येतो. बोहरी वगैरे बेपारी यांचे जुबानीं कांहीं कांही वर्तमान मुंबईकडील कळत आहे.

हैदरअलीखानांसी व करनल कूट इंगरेजासीं महमूदीबंदरासमीप लढाई जाहली. त्या लढाईत मीर रजाअलीखान नाईक म।।रचा मेहुणा ठार जाहला. हें वर्तमान खारीज यैकिल्याप्रमाणें छ १६ शाबानचे अखबारेंत लिहिलें होतें. त्याउपरि रो कृष्टणराव बलाळ यांस विचारिलें. राव म।।रनुलेनीं सांगितलें कीं, हैदरअली

खानानी पत्रांत लिहिलें आहे कीं, लढाईंत मातबर बखशी कामास आला. व वकीलांचे जुबानीं याचप्रमाणें खबर. कडप्याहून पंत-प्रधानाकडील वकीलानें बातनी खबर लिहून पाठविली. त्यांत मीर रजाअलीखान पडला म्हणोन लिहिलें होतें. माणसें दुतरफा मेलीं व जखमी जाहलीं. व हैदरअलीखानाची जिनसी पुलानी कूचाकरितां माघें राहिली होती. व इंगरेज तोफाची मार करीत होते. व खान म।।र करोल व बारचे जवानसीं लढला. याकरितां लोक फा(र) जांया जाहले, व तीन कोस माघारा येऊन मुकाम केला त्या संधीत इंगरेज देवनामपटणास गेले. हैदरअलीखानाची जिनसी आल्यानंतर कूच करून, देवनामपटणापासून दोन कोसाचे फासल्यानें राहिला आहे. व खान म।।र इंगरेजांवर गालिब आहे. याप्रमाणें राव म।।र यांचे जुबानीं यैकिलें.

२

पुरवणी अखबार. छ १७ शाबान सन ११९५ हिजरी बुधवार. माहदाजी सिंद्यांची व इंगरेजांची सिपरीकोलारसासमीप लढाई जाहली व उमरावगिरी गोसांवी सरदार फौज सिंद्याकडील पडला व एक दोघें सरदार मातबर पडले. हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. त्याउपरि, सिंदे म।।र काळेबागासमीप येऊन राहिले. छ १८ रजबची पत्रें सिंद्याचे लष्करीहून पंतप्रधानाचे वकीलाचीं आलीं. त्यांत म।।र होता कीं, सिंदे सरजामासुधां काळेबागासमीप आहेत. राणेखान वगैरे दाहा पंधरा हजार फौजेनसीं शाहदौरा कसबा, काळे-बागापासून सातआठ कोसीं आहे, तेथें आहेत. याप्रमाणें कलमी खबर आली. खारीज यैकतों कीं, शाहदौऱ्यासमीप इंगरेजांची पलटणें येऊन कायम जाहलीं आहेंत. व सिंद्यांचे फौजेवर इंगरेज गालिब आहेत. माहदाजी सिंदे यानीं येथील कारपरदाजास लिहिलें आहे कीं, इंगरेजांची पंधरा पलटणें जमीयत आहे. कासद वगैरेची जुबानीं दाहा पलटणें इंगरेजांचीं आहेंत. व कालपीसमीप च्यार पलटणें याहून विशेष जमीयत नांहीं. गोहदकर जाट दाहा हजार जमियते-नसीं इंगरेजास शरीक जाहला आहे. माहदाजी सिंद्यानीं येथील

कारपरदाजांस लिहिलें आहेजे. पंचेवीस हजार फौज आपले हमराह आहे. पुन्हां दाहा हजार नवनिगाहदास्ती जरूर पाहिजे. व निगाहदास्त करविली आहे. ते फौज शामील जाहल्यानंतर इंगरेजांची तंबी वाकई होईल.

रो कृष्टगराव बलाळ यानीं छ २ रमजानीं प्रयाग मुहूर्त नेमिला आहे. छ म।।रीं श्रीमंत पंतप्रधान व बालाजीपंतनानाचा निरोप घेऊन अंगप्रस्थान करणार. छ ३ तारखेस स्वार होऊन बारामतींत घरास न जातां बागांत येक मुकाम करणार. व तेथून दर कूच हुजूर जाण्याचा उद्योग करावयाप्रमाणें रावजीचें मुखें वर्तमान यैकिलें.

पंतप्रधान यांस राघोजी अंगरे यानीं जाहाजनुमा लहान किस्ती तयार करून पाठविली आहे. ते मुठा नदींत घालून नदीचे किनारा उभे राहून पंतप्रधान तमाशा पाहत असतेत. मानाजी फांकडे याचे तंबीकरितां पांडुरंग बाबूराव बारामतीवाले याची फौज व पागा पांचसे लोक गेले होते. फांकडे म।।र जोगाईचे अंब्यास-मीप दोन तीनसे लोकानसी होता. पांडुरंगराव वगैरेची बातनी मानाजीस कळतांच बाहीरबुनगासुधां तयार होऊन लढाईस मुस्तैद जाहला. दुतरफा लोक ठार व घोडीं मेली. त्याउपरि,फांकडे म।।र पाठ देऊन पळोन गेला. बुनग्यापैकीं कांहीं उंट वगैरे सरजाम लूट सापडली. व वीस पंचवीस घोडी पाडाऊ आली. पांडुरंग बाबूराव वगैरेचे फौजेस तीस कोसाची दौड पडली. याकरितां ताकूब केला नांहीं. या प्र।। वर्तमान आलें. सदरहू लढाई छ १२ माहे म।।री आटली म्हणून यैकील. वासुदेवबावा मुतालिक प्रतिनिधीस कांही ज्वराची बाध होती. याकरितां आपले गांवाखाले होत. त्याचा काळ जाहला म्हणून वर्तमान आलें.

पै।। छ २६ शाबान सन ११९५ हिजरी शुक्रवार दोन प्रहर मै डांक सरकार.

पै।। छ २६ शाबान सन ११९५ हिजरी शुक्रवार. दोन प्रहर, मै डांक सरकार.

श्रीनिवास

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी. विनतीजे. चिरंजीव राजेश्री रघोतमराव यांजसमागमें विनतीपत्र सेवेसी पाठविलें. त्यांत खाजगी काम सेवकाचे उपयोगी, व सरकारची नुकसानीं, व कदीम ज्यागीरीपैकीं मौजे मदनूर इनाम अलतगमा बाफरजंदा व अखबारनवीसीची खिदमत चिरंजीवावर बहाल बरकरार करावी, येविषईं सेवकानें हुजूरअर्जी लिहून दिधली व स्वामीनीं अर्ज करावा म्हणोन विनती लिहिली आहे. कृपा करून युक्तीनें आपण अर्ज करतील. मंजूर व कबूल करून सरफराजी करणें यखतियार खावंदाचा आहे. व हे विनती त्याहावयाचें कारण हेंच. जे चिरंजीव सेवा करावयांस अधिकारी जाहले व पांच वर्षें जाहली. येथील अखबारीचें काम व सदैव राजद्वारास जाणें व उतर प्रत्योतर करणें या कामाची यखतियारी मजकडून चिरंजीवास आहें. माझी गुमास्तगिरी मुख्तारीनें त्यांजकडें आहे. यास्तव, हुजूरीहून सरफराजी व्हावी. यांत मीं फिदवी नोकर मवरूसीं आहें. चिरंजीवांची सरफराजी जाहलियां तेही खानजादींत दाखल होतील. खिदमत त्यांचे नांवें जाहलीच पाहिजें. याविषईंची विनती करावयाचें कारण, माझी शरीरप्रकृती फार अशक्त जाहली. व या खिदमतेस सदैव कमर बांधून दरबारी राहिले पाहिज. हे श्रम माझें चितापासून करावे यांत सादत परंतु शरीर स्वाधीन नांहीं. कदाचित, हुजूर अर्ज मंजूर नच होय त्यापक्षीं इस्ताफा लिहून देणें प्राप्त होईल. स्वामी प्राचीन मुरबी व कृपावंत आहेत. युक्तीनें अर्ज करतील. श्री स्वामी सहाय जाहलियां मनोदयानुरूप कार्य होईल. बहुत काय लिहिणें. कदाचित मर्जीत येईल कीं, कृष्टणराव बलाळ हुजूर येणार. ते आल्यानंतर त्या संधीत अर्ज करूं. त्यास हुजूरीहून सरफराजी होण्याविषईं कृष्टणराव यांजकडून सिफारस

करवणें. फार लघुत्व व यांचा उपकार घेण्याचें प्रयोजन सर्वथैव नांहीं. सेवक लोकानीं आपलें सरफराजीविषईं मुरब्याकडून अर्ज मारूज करावा. धण्यानी कृपा करून सरफराजी करावी. दुसऱ्याची सिफारश व साहित्य नसांवें. हाच मार्ग चांगला. व सांप्रतचे प्रसंगीची कृष्टणरावजी हुजूर येतात. यांत परस्परें स्नेहाची वृद्धी व्हावी व सर्व मजहले पुसावे किंवा काळहरणावर दृष्टी देऊन हुजूरचे मर्जीप्रमाणें यैकांवें व जे समईं काबूची संधी ध्यानास येईल ते समईं बिगाड करावा, यैसा यांचा मनसुबा आहे. मार्गानें चौथाईचा तह जाहलियां हे करितील. इंगरेजांसीं दारमदार. हैदर नायकाचे इतिल्याविरिक्त सर्वथैव हे करीत नांहींत. नाईक म।।राचे कबज्यात वतसरुफांत लाखों रुपयाचा मुलुक आला आहे. व इंगरेजांवर गालिब. त्या पक्षीं हैदरअलीखान सर्वथैव दारमदार करीत नांही. पंतप्रधानांचे कारभाऱ्यांस स्पष्ट उमजलें आहे कीं, इगरेज बदकवली व बदमामली. यांचे कौल कराराचा विश्वास नांहीं व सांप्रत हैदरअलीखान शरीक मसलहत जाहला आहे. व यासी कौल करार जाहला. त्यांत तफावत सवथैव न व्हावा. या अर्थीं, रावजी हुजूर आल्यानंतर हुजूरचे मर्जीमुबारकेप्रमाणें कार्यभाग होणें बहुत दुस्तर दिसतें. हे विनती.

A. R. No. 85. १८ शाबान ११९५ हिजरी
९ आगस्ट १७८१

पै।। छ २६ शाबान सन ११९५ हिजरी, शुक्रवार दोन प्रहर मै डांक सरकार.

श्री

विनंती विज्ञापणा यैसीजें. येथील कुशळ त।। छ १८ माहे शाबान, मु।। पुनें स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित जाणोन

स्वानंद लखनआज्ञा करीत असिले पाहिजें. विशष .येथील वर्तमान छ १५ माहे म।।र रोज सोमवारी प्रहर रात्रं पूर्व जाता विनंतीपत्र सरकारचे डाकीसमागमें सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान श्रुत जालें असेंल. तदंनतर येथील वर्तमान इग्रेजाचें जाहज सवदागिरी सुवर्णदुर्गास धरले म्हणोन इग्रेजाचे जाहजे लडाईस सुवर्णदुर्गास येणांर म्हणोन येथून दोन हजार गारदी किले म।।र याचें मदतीस जाणार. हें विनंतीपत्री पूर्वी लखन केले होतें त्याजवरून श्रुत जालें असेल. त्यास येथून दोन हाजार गार्दी सुवर्णदुर्गास जातात. इग्रेंजाचें सवंदागिरी जाहाज यानी धरलें. त्यात दोन अडचा लक्षाची मता यांस सापडलीं.श्रुत होये. राजश्री सखारामपंतबापू छ ११ माहे म।।री कैदेंत मृत्य पावलें. हे वर्तमान सविस्तार विनंतीपत्री लेखन केले होतें त्याजवरून श्रुत जाले असेल. त्यांस सखारामपंत-बापू छ ११ माहे म।।री मृंत्य पावले यैसे वर्तमान येथे आलें, श्रुत होयें. राजश्री कृष्णराव याचा व नानाचा दोन तीन दिवस जालें नित्य खलवत होतो. खलवतीचा भाव यैकिल्यांत आला की, राव म।।र हजुरात येतात. हजूरचेही इनायेतनामें राव मं।।र यास आले की सत्वर यावें. त्याजवरून सत्वरच निघावे यैसे होते. प्रस्तुत यैकिल्यात आलें कीं आठपधरा दिवस राहून आखर माहे मं।।री निघणांर. कारन कीं राव म।।रास हजुरांत पाठवावें यैसा निश्चयें जालां. तें समई या सलेंचे पत्रें कारभारी यानी हैदर नाइकास लिहिलें कीं, राव मं।।र यास हजुरात तहाचे कामाविसी वगैरे आणिख कितेक जाबसालाविसीं पाठवावे लागते यैसी पत्रें नाईक म।।रास लिहिले आहेंत. त्याचें उतराची मार्गप्रतिक्षा करितात. पत्रें जाऊन येक महिणा होत आला. रावजीचे निघावयाचें संधीसं नाईक म।।राचेही उतरे येतीलं यैसे आहे. राव मं।।र निघाल्यासं लेखन केले जाईल. श्रुत होयें. राजश्री हरीपंतासं दोन तीन दिवसं जाले समाधान नाही म्हणोन नाना हरीपंताचे येथे आले होते.श्रुत होये. छ १६ माहे म।।र रोज मग-लवार.रो मानाजी फाकडे बालेघाटाकडे तुळजापूर प्रांताकडे तीन चारसे राऊत मेलवून खुल केले आहे. त्याचे पारपत्यास रो पाडुरंग

बाबूराव बारामतीकर याची पागा व आनीख मुढें वगैरे याची पागा यैसे हजार पाचसे राऊत रवाणा केलें यैसे वर्तमान आहें. दुसरें फाकडे म।।र यास कौलही पाठविला आहे की येणे. श्रुत होयें. वैजापूर व गांडापूर व पैठंण वगैरे माहलं सरकारचे आहेत. तेथे होलकराकडील फौज जाऊन उपद्रव करावां यैसे वर्तमान होते. हे पूर्वीही लेखन केले होते. प्रस्तुत वाफगांवाहून वर्तमान आले कीं, राजश्री पाराजीपंत होलकराकडील दोन हजांर फौजनसी वाफगावाहून निघोन वैजापूर वगैरे माहलाकडे जातात. कारन कीं माहलात उपद्रव करूंन यैवज घ्यावा. माहांलास रखना करावा याअर्थी पाराजीपत जातात यैसे वर्तमान आलें. होलकराचा आग्रह कार-भाऱ्यापासीं फार होता कीं, पाराजीपंतास वैजापूर वगैरे या माहलात पाठवावें. प्रस्तुत पाराजीपंत दोन हजार फौजेनसी वैजापूर वगैरे माहलाकडे जातात यैसे वर्तमान आले. पाराजीपंत वगैरे सरकारचे माहलात जातात म्हणोन शहराहून नवाब अजमतदौला बाहदर डेरे देऊन बाहेर निघालें. फौज वगैरे ठेवितात यैसे वर्तमान आहे. मागती पाराजीपंत वगैरेकडील वर्तमान आल्यांस लखन केले जाईल. श्रुत होये. चतुर्थी म्हणोन नाना फडनीस थेऊरासं गनपंतीचे दर्शनास गेलें होते. दंर्शन करून सध्याकांळी घरास आलें. श्रीमंतही गन-पतीचें दर्शनासं वाडयाबाहेर आले होते. दर्शन करून मागती वाडचात गेले. श्रुत होये. दरबार वगैरे जाला होता. उपंरांतिक कृष्णरावजी व नाना याचा खलबत जाला. विदित होये. छ १७ रोज बुधवार इग्रेज कल्यानीसं व ममईस आहेत. सरजाम वगैरें त्यानी फांर केला आहे. प्रस्तुत वर्तमान आहे कीं इग्रेज कल्यानीहून च्यार कोंस पुढे आले. घाटाकडे येतात किंवा आणीख कोन्हीकडे जातात हे वर्तमान आलिया सेवेसी लखन केले जाईल. श्रुत होये. रो सटवाजी भोसले वगैरे कोडांईबारी उतरोन घाटाखाले गेले. त्यानी काही जमाव करून कोंडाईबारीकडे येणांर. त्याजवरूंन राजेश्री गनेशपंत बेहरे यास आज्ञा केली की, तुम्ही कोडांईबारीकडे जाणे. त्यास गनेशपंत बेहरे कासारबारीखालें नसरथपुरांवर दोन

तीन हजार फौजेनसी होते. वर्तमान आले कीं, गनेशपंत नसरथपुराहून कूचं करुन कोंडाइंबारीकडे जातात. श्रुत होये. राजश्री नागोराम यासमागमें दोन तीन हाजार फौज देंऊन पंचमाहाल वगैरेकडे पाठवावे यैसी यौजणा आहें. श्रुत होये. राजश्री विसोजी कृष्णा बिनिवालें याचीही उभारनी करून त्यास फौज सांगावी यैसी यौजणा करितात परतु विसाजीपंत कबूल करीत नाहीत यैसे आहे. मग येविसी काय जे होईल ते सेवेसी लखन केले जाईल. विदित होये. पुढे जे प्रसंगाचें वर्तमान ध्याणास येईल तें सेवेसी लेखन केले जाईल. विदित होयें. छ ९ माहे मं।।रचे आज्ञापत्र व छ २३ व छ २६ माहे रजबचे जवाबी इनायेतनामे दोन इनायतनामे व आज्ञापत्र सादर केलें ते छ १६ माहे म।।री पावले. पाऊन बहुत संतोश जाला. संदैव याचप्रकारे इनायेतनामे व आज्ञापत्रे सादर करणार स्वामी समर्थ आहेत. सेवकाचे जागीरीचे खेडयास श्रीमंताकडील सरदारानी व खांनदेशाचे सुभेदारानी उपद्रव करून येवज घेतला. येविसी सरकारचे इनायेतनामे कारभारी यांस व रावजीस पाठवावें म्हणोन विनंतीपत्री लखन केले होतें. त्याजवरून कृपावंत होऊन आज्ञापत्री सादर केले कीं, लि।। प्रो इनायेतनामें कारभारी यांस व रावजीस सादर करून पाठऊ म्हणोन आज्ञापिलें. त्याजवरून बहुत संतोश जाला. सर्व प्रकारे माझा अभिमानं स्वामीस आहें. विदित होये. खांनदेशचे सुभेदारांस श्रीमंताचे पत्र होते कीं मोगलाईचे खेडयापासून सुभेपटी व दहकपटी न घेणे. यैसे असता धटाई करून सुभेपटीचा व दहकपटीचा यैवज घेतला. गनेशपंत बेहरे यानी दोन वेला गावची खंडनी करून यैवज घेतला. हे वर्तमान पूर्वी येक दोन विनंतीपत्री सेवसी लेखन केले आहे त्याजवरून श्रुत जाले असेंल. कारभारी यांस व रावजीस इनायेतनामे आले पाहिजेत कीं, खानदेशचे सुभेदारानी व गनेंशपंतानी यैवज घेतला असेल तो माघारे देवणे. याचे गावखेडयास कोन्ही उपद्रव न करी ते करावे. या अनवयें इनायेतनामे व स्वामीचे पत्रे आली पाहिजेंत. विदित होये. बहुत कायें लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

———————

A. R. No. 86.

२२ शाबान ११९५ हिजरी
१३ आगस्ट १७८१

श्रीनिवास

अखबार पंतप्रधान अज इ।। छ १८ गुरुवासर लगायत छ २२ माहे शाबान सन ११९५ हिजरी. पांडुरंग बाबूराव बारामतीवाले यांची फौज वगैरे मानाजी फांकडे याचे ताकुबास गेले होते. त्याची लढाई जोगाईचे अंब्यासमीप जाहली. परस्परें घोडीं व लोक जखमी व ठार जाहले व मानाजी जरीदा फरारी होऊन गेला. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें सेवेसी व हुजूर पाऊन वर्तमान कळलें असेल. त्यानंतर प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

रघुनाथराव सुरतेहून च्यार कोसी तीन च्यारसे लोकानसीं उतरले आहेत. अमृतराव व बाजीरा(व) बरवे व सटवाजी भोंसले सुरतेहून आठ कोसाचे फासल्यानें हजार बारासें स्वारानसीं आहेत. स्वारांची निगाहदास्त करितात म्हणोन खारीज वर्तमान यैकिलें. पंतप्रधानांचे कारपरदाजांचे जुबानीं रघुनाथराव यांस कानांत कांहीं रोग जाहला आहे. त्यास्तव बहुत श्रमी. सुरतेहून तीन कोस नर्मदातीर अश्विनीकुमार तीर्थापासीं इंगरेजांचे परवानगीप्रमाणें आहेत. बाजीराव व सटवाजी भोंसले यांस इगरेजानीं सुरतेस यावयाची परवानगी दिधली नांहीं. याकरितां आठ दाहा कोसाचे फासल्यानें आहेत.

पांडुरंग बाबूराव यांचे तरफेचे त्र्यंबकराव व गोविदराव कृष्टण वगैरे मानाजी फांकडयाचे ताकुबास जे फौज गेली त्यां सरदारास माघारा फिरोन येणें म्हणोन पंतप्रधानाची आज्ञापत्रें छ म।।री रवाना जाहलीं. पागेचे सरदार व जागीरदार व हुजरातीचे कितेक सरदार रुखसत घेऊन घरास गेले आहेत. त्यांस ताकीदपत्रें रवाना जाहली कीं, सरंजामसुधां दसऱ्याकरितां पुण्यास येणें.

माहदाजी सिंदे व हैदरअलीखानाकडील ताजी खबर आली नांहीं.

पंतप्रधान छ।म।।रीं पर्वतीस गेले होते. वासुदेवबावा नि।। प्रतिनिधी आजारी आहे याकरितां पुण्याहून कऱ्हाडास गेला आहे. प्रतिनिधीचे पागेचे सरदारापैकीं वासुदेवबावा म्हणोन होता तो मृत्यु पावला. हे खबर प्रतिनिधीचे लश्करांत आली व गोटगस्तीचे जासुदानी कारपरदाजास वासुदेवबावा मुतालिक मृत्यु पावला म्हणोन खबर सांगितली. ते प्रसिद्ध जाहल्याप्रमाणें हुजूर अखबार लिहिली. त्यानंतर बालाजीपंतानी तहकीक खबर आणविली व निश्चय जाहला की, वासुदेवबावा मुतालिक प्रतिनिधी बहुत काहला परंतु जिवंत आहे. दुसरा कोण्हीं वासुदेवबावा पागेचा सरदार होता तो शांत जाहला.

हरीपंत फडक्यांची प्रकृती पोटदुखीकरितां स्वस्थ नव्हती. सांप्रत स्वस्थ आहे. बालाजीपंताचे घरास येत असतात.

बातनीकरितां खुफिया जासूद पुण्यांत होते ते छ १७ माहे म।।री येंक जोडी धरली. तहकीकात करतां रघुनाथराव यांचे तरफेचे म्हणतात. श्रुत होय, हे विनती.

पै।। छ २ माहे रमजाण सुमार्सन ११९५ हिजरी बुधवार दोन प्रहर मै डांक सरकार.

A. R. No. 87.

२३ शाबान ११९५ हिजरी
१४ आगस्ट १७८१

पै।। छ २ रमजान सन ११९५ हिजरी बुधवार दोन प्रहर मै डांक सरकार.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल त।। छ २३ माहे शाबान, मु।। पुणे स्वामीचे कृपावलो(कर्ने) करून येथास्थित जाणौन स्वानद लेखनआज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष. येथील

वर्तमान छ १८ माहे मा।र, रोज गुरुवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर यथील वर्तमान राजश्री सखारामपंत बापू शात जाले, हे वर्तमान पूवी दोन विनंतीपत्रे सेवेसी रवाना केली त्यात सविस्तर लेखन होते, त्याजवरून ध्यानास आले असेल. सखारामपंतबापूचे क्रियेस पाचहजार रुो देऊन सरकारचा कारकून सासवडास पाठविला. सासवडास त्याचे उतरकार्य होते, शृत होये. सिदे कोल्हारसिप्रीवर छावनी करून राहिले. तेथून इग्रजही दाहा बारा कोसावर आहेत. त्या इग्रजासी व सिद्यासी लडाई आहे, शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे काम-काज जाले. उपरातिक रावजीचा व नानाचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की, रावजीस येज्यमानसाहेबाकडे रवाना करावयाचा. त्यास राव मा।र भाद्रपद सुद ३ तृतीयेस मोहर्त करून निघना (र) यैसे वर्तमान आहे. निघाल्यास लेखन केले जाईल शृत होये. छ १९ माहे मा।र रोज शुकरवार, राजश्री मानाजी फाकडे यानी दोनतीनसे स्वार मेलऊन खूल केले होते. त्याचे पार-पत्यास राजेश्री पाडुरंग बाबूराव बारामतीकर वगैरे याच्या पागा पाठविल्या होत्या. हे वर्तमान पूर्वी लेखन केले होते. त्यास मानाजी फाकडे पळून गेले. त्याजकडील दाहा पाच घोडी वगैरे याजकडील लोकानी पाडाऊ करून आनिली यैसे वर्तमान आले. फाकडे मा।र जोगाईच्या आब्याकडे पळून गेला. त्याचे पाठीमागे याजकडील लोक आहेत यैसे वर्तमान आहे, शृत होये. राजेश्री कृष्णरावजी दरबारास गेले होते. नानासी व रावजीसी खलवत जाला. राजश्री जिवाजीपताकडील पत्रे आली होती. पत्रे नानास रावजीने वाचून दाखविली. पत्राचा भाव यैकिल्यात आला की, जिवाजीपतानी रावजीस लिहिले आहे की, इकडे यावयाचा उद्वोग सत्वर करावा. त्याजवरून रावजीही श्रावनमास जाल्यानतर सत्वरच निघनार, शृत होये. छ २० माहे मा।र रोज शनवार इग्रज कल्यानीस व ममई (स) आहेत. सरजाम वगैरे फार केला आहे. पुढे ते सत्वरच उद्वोग

करनार. दुसरे वर्तमान आहे की, कोकनप्रातीचे काही किले राहिले आहेत ते घेऊन उपरातिक घाटाकडे यावे, यैसा विच्यार इग्रजाचा आहे म्हणोन वर्तमान आहे. मग जे इग्रजाकडील वर्तमान यैकिल्यात येईल ते लेखन केले जाईल, शृत होये. राजश्री वासदेवबावा प्रतिनिधीकडील यास समाधान वाटत नाही. त्यास देवआज्ञा जाली यैसे वर्तमान आहे. तहकीक वर्तमान आलिया लेखन केले जाईल, शृत होये. राजश्री त्रिबकराव दीक्षित मातबर सावकार होते ते मृत्य पावले. त्याचे पोटी पुत्र नाही. पधरा वीस लक्षा रुपयाची जागा त्याचे पदरी आहे. मरतेसमई त्याने दोन तीन लक्ष रुपय वाटले, धर्म केला. प्रस्तुत त्याचे द्रव्याची चौकशी सरकारात केली. त्याचे स्त्रीस धर्मपुत्र देऊन त्यास लाख रुपय द्यावे. बाकीचे द्रव्य सरकारात घ्यावे. कारन की बैतल माल, यैसा निश्चये जाला, शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले, शृत होये. छ २१ रोज रविवार होलकराकडून रा॥ पाराजीपंत दोन हजार फौजेनसी वाफगावाहून वैजापूर वगैर माहलात जाऊन उपद्रव करनार यैसे वर्तमान आहे. होलकराचे मानस फार आहे की, सरकारचे तालुक्यास उपद्रव करावा यैसी वदंता आहे की, सरकारचे होलकराकडील येक दोन पागा वैजापूर वगैरेकडे गेल्या, यैसे वर्तमान आहे. मागती वर्तमान तहकीक यैकिल्यास लेखन केले जाईल. पाराजीपंत वगैरेही जाणार. गेल्याचे वर्तमान यैकिल्यास लेखन केले जाईल, शृत होये. रावजीस हजुरात पाठवावे म्हणौन कारभाऱ्यानी हैदर नायेकास लिहिले होते. त्यास नाईक म॥र याजकडून साडनीस्वारासमागमे पत्रे आली. पत्राचा भाव यैकिल्यात आला की, नाईक म॥र यानीही लिहिले आहे की रावजीस हजुरात पाठविता हे उतम आहे. आनिकही त्यानी कितिक राजकारनी म॥र लिहिला होता. पत्रे कारभाऱ्यानी वाचली, शृत होये. राजश्री हरीपतास समाधान वाटत नाही म्हणौन नाना व कृष्णरावजी हरीपताचे येथे आले होते. नाना व हरीपत व कृष्णरावजी याचा खल(व)त येक प्रहर पावेतो जाला. भाव यैकिल्यात आला की, कितीक राजकारनी

वगैरे दैलतीचे बदोबस्ताविशई बोलनी जाली. दुसरे हैदर नायेकाक पत्रें आली ते जिवाजीपताकडील पत्रे आली ते हरीपतास दाखविली. खलवत वगैरे होऊन नाना व रावजी आपले घरास गेले. रावजीस हजूरात रवाना करावे यैसा निश्चये जाला. भाद्रपद सुद ३ येस अथवा सुद पचमीस रावजी मोहर्त करून निघनार यैसे वर्तमान अहे. शृत होये. छ २२ रोज सोमवार. होलकरासी व अहिल्याबाई होलकरीन यासी शुधता नाही म्हणोन उभयेताचे सफाईस येथून कारभाऱ्यानी रा॥ बाबूराव वैद्य पाठविले होते. त्यास सिष्टाई करून बाबूराव येथून दो तीन मजलीवर आले. येका दो दिवसा येथे दाखल होनार. अहिल्याबाईने कारभाऱ्यास सागून पाठविले की, ज्यात तुमची मर्जी तेच आमची मर्जी आहे. होलकराविशई आमचा काही फार दुराग्रह नाही मग बाबूराव येथे आलियावर सर्व ध्यानास येईल. अहिल्याबाईने श्रीमतास वस्त्रे वगैरे बाबूराव यासमागमे पाठविली आहेत म्हणोन वर्तमान आहे, शृत होये. सुरापूरवाल्याचा येक भला मणुश आला आहे. जाबसाल कृष्णरावजीचे विद्यमाने करितो. सुरापूरकराचा पैगाम आहे की, स्नेह विशेष असावा. पुढे भेटीचा योग जाला तर करावा यैसे आहे. मागती त्याजकडील जे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल, शृत होये. राजेश्री कृष्णरावजी भाद्रपद सुद ३ त्रितीयेस निघतात. रावजीसमागमे दोनसे स्वार व पचवीस गारदी, पाच जासूदाच्या जोड्या वगैरे शागिर्द पेशा व येक अबारीचा हाती याप्रमाणे सरजाम रावजीसमागमे नेमला आहे. रावजीसमागमे गोविदराव भगवतही येतात, शृत होये. सध्याकाली नाना व हरीपत व कृष्णरावजी याचा खिलवत जाला. उपरातिक हैदर नायेकाकडील णूरखान वगैरे वकील आले होते त्यासीही दोन घटका खिलवत जाला. भाव यैकिला की नाईक म॥र यास पत्रे लिहिणार, शृत होये. वासदेवबावा प्रतिनिधीकडील याचे मृत्य पावल्याचे वर्तमान होते, परतु वर्तमान मृत्य पावल्याचे नाही. त्यास फार समाधान वाटत नाही यैसे आहे, विदित होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल.

सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 88. (पो.ता.) २ रमजान ११९५ हिजरी
२२ आगस्ट १७८१

पै॥ छ २ रमजाण सन ११९५ हिजरी, बुधवार दोन प्रहर मै डांक सरकार.

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनती उपरि. चौथाईचा तह हजरत मगफरतमाब यांचे समई अमल होता त्याप्रमाणें करार करून देतों म्हणोन पंतप्रधानांचे कारपरदाजानीं कबूल केलें असतां, तह करून देत नांहींत व सुबे खुजस्ते बुनयाद येथील कितेक माहलांत निमेनिम रुपये आजीपर्यंत घेत आहेत. याचप्रमाणें हैदराबाद सुब्याचे माहालापासून स्वराज्याचा अमल घेतात. याकरितां तह होजोपर्यंत मामलतीची बंदी करवावी व येविषईं हुजूर अर्ज करावा म्हणोन चिरंजीव रघोतमराव सदैव सेवकास सांगत होते. परंतु हुजूरचे मुसाहिब व मुकरब साहब तदबीर त्यां मजलसींत आपले अकलनाकसेनें कांही सलाह ल्याहावी हें अयोग्य. व बाजाचे उडाणापुढें बटेर व चिमण्यानीं काय उडावें. तथापि बुधीलक्षण परवाजाचे मकदुराप्रमाणें असल्यास बुधीप्रमाणें तजवीज करून हुजूर अर्ज केलियां खांवंद कदरदान शंभर गोष्टीहून येक गोष्ट पसंद करून सरफराजी करीत आहेत. यास्तव हुजूर अर्ज करावयाकरितां स्वामीचे सेवेसी व हुजूरहीं संक्षेपेत करून अर्जी लिहिली आहे व च्याहारमची जप्ती व्हावी हे सलाह दौलत होती ते जाहली. पेस्तर करण्याचा प्रकार कृष्टणराव बलाळ हुजूर येत आहेत. याचें मुख्य कारण सखारामपंतास कैद केल्यानंतर बालाजीपंताचे चितांत

बहुतकरून होतें कीं कृष्टणराव बलाळ यानीं हुजूर जाऊन मिजाज मुबारक मुतवजे अहवाल आपल्यावर करवावी. त्यासमईं राव म।।रनुलेचे चितांत हुजूर जांवें हे आरजू असतां पुन्हां बालाजीपंतानीं बमोजिब सलाह दुसरे कारपरदाज तजवीज मवकूफ केली व माहदाजी सिंदे व होळकर यासी इतिफाक व रियायत याजवर करणें फार उपयोगी हे सलाह पसंद जाहली. माहदाजी सिंद्याची पासखातर बालाजीपंत करीत आहेत व बइस्तसवाब बालाजीपंत होळकरांचे ज्वाबसालाचे बानीकार हरीपंत जाहले आहेत. हुजूरीहून इनायत व मिजाज मुबारक मुतवजे अहवाल आहेत. त्याप्रमाणें आपले तरफेनें फिदवीयंतीत कसूर न करावा याप्रमाणें बालाजीपंताचा निश्चय. गो कृष्टणराव बलाळ याचा येतमाद व इतबार पूर्वी वैकुंठवासी माधवराव यांच समइ होता. सांप्रत बाळाजीपंत व हरीपंतासमीपहीं चांगला आहे. परंतु हुजूरचे तरफेनें ज्वाबसालाचा मध्यस्तीचा सिलसिला राव म।।राकडें. याकरितां अकसर कामांत सिवाय खानगी, बालाजीपंत रावजीस शरीक मसलहत करितात व सलाह पुसत आहेत. हेहीं आपला भ्रम रक्षून समयोचित वर्तणूक करितात. हुजूरचे सिलसिल्याकरितां आपल्यास उमदगी व हुजूर जाऊन पुन्हां सादत मुलाजमत व इनायत ताजी संपादिलियां अफजायश आबरू आहे. याकरितां हुजूर येण्यांची आरजू दिली होती, ते हजरतेचे तफजुलानें बार आली. व हुजूर जाऊन चौथाई वगैरे मालीकाम व इंगरेजांकडील मोहीम वगैरे मुलकी कामाची सलाहदौलत आपण अर्जमारूज करूं त्याप्रमाणें हुजूर पसंद व कबूल होईल, हा भरवसा रावजीस फार आहे. कदाचित अर्ज कबूल न जाहला व पंतप्रधानांचे कारपरदाजांचे मसलहतीस बरखिलाफ इरशाद जाहलियां उभयपक्षीं ज्वाबसाल व उतर प्रत्योतर होत जाईल. त्यांत आपलें बोलणें जवाब ब सवाब पडेल व हजरत आपण अर्ज केली सलाह मंजूर करतील. ज्याबसालाची कुन्हा समजोन पुन्हां आपली तजवीज सलाहदौलत म्हणोन इरशाद करतील.

पै॥ छ २ रमजान सन ११९५ हिजरी.

२

श्रीनिवास

पुरवणी. श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी. गरज व काबूचा दारमदार व स्नेह जाहला. सांप्रत पंतप्रधान वयेंकडून धाकटे. परंतु सरदार व फौज बइतिफाक. रघुनाथराव इंगरेजाचे रिफाकतीनें बहुत वर्षें लढाई व लोंकांसी भेद करीत आहेत. परंतु हमराही लोकांची फूट जाहली नांहीं. इंगरेजांचे लढाईस हरसाल कमरबस्ता व सरगरम आहेत. बंदगानआलीनीं वाजबीचें रुईनें कायल करून आपले मतालबा प्र॥ फैसला करणें व सलाहप्रमाणें अमल करावयाचा इरशाद केलियां कबूल आहे. करूं कायल न करितां मर्जीप्रमाणें वर्तणूक करणें, म्हणोन इरशाद जाहलियां, इंगरेजांकडील मोहिमेचा आंज्याम जाहला नांहीं. म्हणोन बमोजिब इरशाद कबूल करणें जरूर न केलियां, दुतरफा निफाकाची व लढाईची सरबराई होणार नांहीं. दाहापांच दिवस ज्वाबसालांत कसीस व वोढ धरावी. उपरांतिक हजरतीचे मर्जीप्रमाणें चौथाईचा तह करितों व इंगरेजांकडील दारमदार हैदरआलीखानाचे इस्तसवाब व इतल्याविरिक्त होणार नांहीं. हजरत व इंगरेज बइंतिफाक हैदर नाईकाचे तंबीस मुतवजे होतील तर उतम आहे. आम्ही माने व तालुकियांत खललअंदाज होणार नांहीं. हैदरखानाची तंबी मंजूर न होतां फरखुंदे बुन्यादेंत राहणें. सलाह असलियां तेथेंच राहांवें. इंगरेजांचा व पंतप्रधानाचा दारमदार आपले मारफतीनें करितों म्हणोन इरशाद जाहलियां करावा. पंतप्रधानाचे खातरख्वाह जाहलियां बमोजिब सलाह हैदर-आलीखान करूं. पंतप्रधानांसीं बिगाड करावा हेच मर्जी असलियां प्रधानाचे तरफेनें कसूर नांहीं. हजरत मुख्तार आहेंत. याप्रमाणें उतरप्रत्योतर करून चौथाईचा तह मर्जीप्रमाणें करून द्यावा व कृष्टणरावजीनीं रूखसत हासल करून यांवें. ज्यासमईं फरागत हासल होईल तें समईं सलाह वक्त जें ध्यानास येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं.

याप्रमाणें हुजूर जाऊन ज्वाबसाल करावा. राजश्री हरीपंतास पोट-दुखीची व्यथा नवीन जाहली आहे. महिन्यांत येकदोन वेळा फार श्रमी होतात. सांप्रतहीं प्रकृती स्वस्थ नांहीं याकरितां राजश्री बालाजीपंत व कृष्टणराव पंत मा।।राचे घरास छ १९ माहे मा।।रीं गेले होते. तीन घटका दिवसापासून प्रहर रात्रपर्यंत मसलहत जाहली. खिलवतेचा राज प्रसित्ध जाहला नांहीं. परंतु हुजूरचे तरफेचीच मसलहत होती म्हणोन यैकिलें. पंतप्रधानांचे फौजेची तादाद व फौज जमा केल्यास किती जमा होईल? हजरत बंदगानआलीनीं बिगाड केलियां गालिब मगलूब पक्ष कोणाचा, व हुजूरांत फौज गाडद व स्वार व पागा किती, याची तादाद करीत आहेत म्हणोन यैकिलें. जें वर्तमान यैकिलें व ध्यानास आलें तें लिहिलें असे. हुजूरीहून इंगरेजासीं इतिफाक किंवा बिगाड व हैदर नाईकासी तंबी मंजूर किवा उपेक्षा, व पंतप्रधानासी इतिफाक किंवा निफाक, यापैकीं कोणताहीं येक विचार सित्धांतांत येईल. हजरत बंदगानआलीसमीप फौज मातबर मवजूद आहे. परंतु दाहापांच हजार चांगली चुनंदी फौज नवनिगाहदास्त करावी. कांहीच काम मोकदम नसलियां खालस्यांतील मुफसदां

(अपूर्ण)

A. R. No. 89. २५ शाबान ११९५ हिजरी
१६ आगस्ट १७८१

पै।। छ ४ रमजान सन ११९५ हिजरी, रोज शुक्रवार, दोन घटका दिवस राहता दारोग्याचे विद्यमाने पावले.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार, विनंती उपरि. येथील वर्तमान ता।। छ २५ शाबान, श्रावण वध त्रयोदसीपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे.

विशेष पूर्वी छ २३ माहे म।।रीं डांकेवर पत्रें रवाना केलीं ते दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवेसी लिफाफा पावला असेल. त्या उपरि सांप्रत छ म।।रपर्यंत अखबार व अर्जी हुजूर व पृथक पुरवणींत अखबार स्वामीचे सेवेसी लिहून पत्रें डांकेवर रवाना केली आहेंत दारोग्याचे विद्यमानें लिफाफा सेवेसी प्रविश्ठ होईल. चिरजीव राजेश्री रघोतमराव यांचें पत्र सेवेसी पाठविलें तें चिरजीवांस पावलें. मानूरीहून र।। धोंडो काळो नि।। त्र्यंबकराव यानीं भाळगांव नि।। पंतप्रधान व दहीगांव खालसा सरकार येथील सिवेचे कजीयाचा म।।र लिहिला होता जे. दोन्ही गांवचे पाटलानी पंचाइतीस जांवें. पंचाइतींत जो ठराव होईल त्याप्रमाणें यैकांवें. या रीतीचा निश्चय सौलतजंग बहादराचे विद्यमानें भालगांवकरानी केला. त्यानंतर पंचाइतीस जात नांहींत व कजीयाचे जमीनींत भालगांवकर राघो बापूजी पागेनी कुरण राखिलें आहे. येविषई राघो बापूजीस पंत-प्रधानाकडून ताकीद होऊन भालगांवकरास पंचाइतीस पाठवांवें म्हणोन लिहिलें आहे. त्यावरून राजश्री कृष्टणराव व गोविंदराव यांस बहुतवार सांगितलें व या उभयतानी राघो बापूजी पागे दि।। पंतप्रधान यांस सांगोन पाठविलें जे पचाइतीस पाटलास पाठवणें. न पाठवाल तर हुजूरीहून फौज येऊन भालगांवकरास तंबी करील. राघो बापूजीचे ध्यानास येत नांहीं व पंचाइतीस जाऊन सिवेचा कजिया फैसल करीत नांहीं याप्रमाणें साफ उतर केलें. कारभाऱ्यांची व कृष्टणराव यांची वरचेवर ताकीद मानीत नांहीं. याचा बंदोबस्त जो मुनासिब असेल तो हुजूरीहून होईल. बहुत काय लिहिणें हे विनती.

पै।। छ ४ रमज़ान.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ।। छ २३ शाबान लगायत छ २५ माहे

म।।र सन ११९५ हिजरी, रोज गुरुवार. रघुनाथराव सुरतेंहूत तीन कोस अश्विनीकुमार तीर्थावर आहेत व सटवाजी भोंसले वगैरे आठ दहा कोसाचे फासल्याने सुरतेपासोन. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान हुजूर व सेवेसी श्रुत जाहलें असेल. त्या उपरि प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें आहे.

रघुनाथराव सुरतेंत असतां तेथील इंगरेजाकडील जवानासीं व राव म।।र यांचे देंवढीचे चौकीदारासीं कजिया जाहला. चौकीदारानें इंगरेजाचे जवानास तरवारीनें जखमी केलें. तो जवान आपले सरदारासमीप गेला. त्यानंतर रघुनाथरायाकडील जमादार देवढीचा, त्याप इंगरेजानीं धरून नेऊन जींवें मारले यावरून रघनाथराव बहुत अजुर्दा जाहले व पांच सातसें स्वार व यक पलटण बार व दाहा तोफा राव म।।रनुलेचे हमराह आहेंत. त्यासहित बमय कबीले कूच करून सटवाजी भोंसले व बाजीराव बर(वे) वगैरेसीं मुतफिक जाहले. तेथोन दोन कूचें करून डांगरी म्हणोन मकान सुरतेहून वीस पंचेवीस कोस तेथें आलें. समागमें दोन हजार स्वार व पलटणें येक व तोफा दाहा पर्यंत आहेत. सुरतेंत इंगरेजांचे तरफेनें तेथील काम मामलतदार जो आहे त्यानें राव म।।रनुलेचे समजांविसीकरितां आपले तरफेचे दुभासी पाठविले आहेत व आपणहीं येणार. याप्रमाणें वर्तमान रघुनाथरायांचे लष्करीहून कासदांची जोडी सावकारी आली. त्यांचे जुबानीं व नंदुरबार खानदेशाचे कमावीसदारानें येंथील कारपरदाजास कलमी लिहून पाठविलें तें छ २४ माहे म।।रीं पत्र आलें व जासूदहीं छ म।।रीं आले.

मानाजी फांकड्याचे समजाविसीचा सिलसिला परशरामपंताचे विद्यमानें बालाजीपंतानी लाविला. हें वर्तमान पेशजी लिहिलें होतें. त्याउपरि प्रतिनिधीकडील सरदारानी निकड करून भांबूराव यास दस्तगीर केलें व मानाजी फरारी जाहला. त्याचे तंबीस पांडुरंगराव वगैरेची फौज गेली होती. त्यांसी लढाई जोगाईचे आब्यासमीप जाहली व मानाजी तेथोनही निघोन गेला. हें वर्तमान

पूर्वील अखबारेंत लिहिलें आहे. सांप्रत येथील मातबर व शरीक-मसलहत त्याचे जुबानीं यैकिलें कीं मानाजी फांकड्याची समजावीस करून त्यास आणांवें. येविषईं परशरामपंताचे विद्यमानें हरीपंत फडके बानीकार व धोंडो आपा पुरंदरे याचे विद्यमानें सफाई व करार-मदाराचा ज्वाबसाल जाहला आहे. जोगाईचें आंब्यासमीप लढाई होऊन मानाजी फरारी होऊन गेंला. हें वर्तमान आल्यानंतर बालाजी पंतानीं आपले हातें तसलीचें पत्र व धोडो आपाकडील खातरजमेची पत्रे सुतरस्वारासमागमें मानाजीकडें रवाना केलीं. ज्या स्थळीं मानाजी फांकड्याचा पता लागेल ते स्थळीं पत्रें पावतीं करावीं.

२

पै।। छ ४ रमजान.

पुरवणी अखबार छ २५ शाबान सन ११९५ हिजरी. याप्रमाणें सांगोन सुतरस्वाराची रवानगी केली म्हणोन वर्तमान यैकिले. पंढरपूरचे लढाईचे समई मानाजीनें आपली स्त्री गुरसाळेंनजिक पंढरपूर येथे महिपतराव कवड्याचा लेंक आवजी कवडया याचे आश्रयानें छपाऊन ठेविली. लढाईंत मानाजीची सिकस्त होऊन फरारी होऊन गेल्यानंतर आवजी कवड्यानें पंतप्रधानांचे कारपर-दाजास इतिला केली. यानीं लिहून पाठविलें कीं तुम्हासमीपच ठेवणें. मानाजी फांकड्या शरीर आहे. त्याची फहमायश करून आपले इजनांत ठिवावा व मानाजी माहदाजी सिद्याचे बिरादरांत येकसूईनें राहिल्यास सरफराजी करावी, हाही मनसुबा कारपर-दाजांचा आहे.

हदरअलीखानाकडील पत्रें वकीलास आलीं. त्यांनी कारपर-जांस सागितला म।।र सेवकानें यैकिलाजे. करनल कूट इंगरेजानें देवनामपटणीहून कूच करून चिनापटणास जाणार किंवा चिनापट-णास दाखल झाला असेल. हैदरअलीखान गनिमी कायद्याप्रमाण लढाई करीत ताकूबावर आहे. पंतप्रधानाचे वकीलानें खबर लिहिली त्यांत म।।र आहे कीं, करनल कूट चिनापटणास दाखल जाहला व हैदर

अलीखान वन्हेश्वर चिनापटणाहून साहा कोसाचे फासल्यानें बारीचे तोंडी मकान तेथे आहे. यैकिल्याप्रमाणें वर्तमान लिहिलें आहे.

येथील कारपरदाजानीं सुरब बारूत व बान वगैरें सरजामाचे तयारीकरितां तीस हजार रुपये तोफखान्याचें दारोग्यास दिधले. हें वर्तमान पूर्वी लिहिलें होतें. बानाचा कारखाना ज्यारी आहे. छ २३ माहे म।।री बालाजीपंत व कृष्टणराव बलाळ गुलटेकडीसमीप जाऊन बाण सोडून पला किती होतो याचा अंदाजा पाहिला. श्रुत होय, हे विनती.

A. R. No. 90. २६ शाबान ११९५ हिजरी
१७ आगस्ट १७८१

पै।। छ ४ रमजान शुक्रवार दोन घटका दिवस राहाता पावली दारोग्याचे विद्यमाने, सन ११९५ हिजरी.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल. त।। छ २६ माहे शाबान मु।। क।। पुणें. स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखनआज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. यथील वर्तमान छ २३ माहे म।।र रोज मगलवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाके-समागमे सेवेसी रवाना केले, ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर येथील वर्तमान राजश्री नाना व कृष्णरावजी वगैरे गारद्याची हजरी घ्यावयास गावाबाहेर गुलटेकडीजवल गेलें होते. हजरी वगैरे घेऊन तोफाचे बार करून तोफेच्या गोल्याचें पले पाहिले. बार वगैरे करून सध्याकाली नाना वगैरे आपले वाडयात आले. शृत होये. हैदर नायेकासी व इग्रजासी लडाई जाली. हैदर नायेकाकडील येक दोन कोन्ही मातबर मणुश जाया जाला. हे वर्तमान पूर्वी विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून शृत जाले असेल. प्रस्तुत वर्तमान आहे की हैदर नायेकासी व इग्रजासी लडाई जाली. नाईक म।।र याचा मेहोना मीर होता तो लडाईत कामास आला.

इतर लोकही फार जाया जाले. व इग्रजाकडीलही लोक बहुत जाया जाले. याप्रमाणे परस्परे लडाई होऊन उभयेपक्षी कायेम राहिले. यैसे वर्तमान आले आहे. इग्रजाजवल पचवीस पलटने जमली आहेत, त्याचे शहावर हैदर नाईक आहे. परस्परे लडाई आहे यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. शृत होये. छ २४ रोज बुधवार साताऱ्यास राज्याकडील मंत्री वगैरे कारभारी आहेत त्यास नानानी पत्रे लिहिली आहेत. व कृष्णरावजीनीही पत्रे लिहिली आहेत की, पहिले नवाबाच्या वेलेस चौथाई व सरदेशमुखी वगैरेचा तह कोन्या प्रकारचा जाला, कागदपत्र तहाचे कैसे जाले. त्या कागदपत्राचे प्रस्तुत प्रयोज्यन पडले आहे, ते तहाचे कागदपत्र कारकुनासमागमे पाठऊन द्यावे. यैसे येथील कारभाऱ्यानी साताऱ्यास मंत्री वगैरे यास पत्रे लिहिली. तेथून तह वगैरेचे कागदपत्र येथे कारभाऱ्याजवल देणार. शृत होये. नाना व हरीपत व कृष्णरावजी याचा खिलवत येक प्रहरपावेतो जाला. भाव यैकिल्यात आला की, पुढे. इग्रजाचे मसलतीविशई जाला. दुसरे कृष्णरावजीस हजुरात रवाना करावे यैसा निश्चये जालाच आहे. त्यास राव म।।र भाद्रपद शुद ३ त्रितीयेस मोहर्त करून निघनार यैसा निश्चये जाला. शृत होये. करनल गाडर इग्रज कल्यानीस व ममईस राहतो. सरजाम वगैरे जंगी त्याने फार केला आहे. भाद्रपद मासी तो इकडे उद्वोग करनार यैसी वदता आहे. दुसरे वर्तमान आहे की, कल्यानीहून दोनतीन पलटने तीन च्यार कोस पुढे आली आहेत. मग काये उद्वोगावर आली आहेत हे तहकीक वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. शृत होये. छ २५ रोज गुरुवार. श्रीमत राजश्री दादासाहेब सुरतेस बाहेर आहेत. त्याजवर चौकी पाहारा इग्रजाचा आहे. प्रस्तुत येथे वदंता आहे की, सटोजी भोसले व बाजीराव बरवे वगैरे गेले. हे दादासाहेबास भेटले. त्याजवरून इग्रजासी व दादा-साहेबासी नाखुसी जाली. सटोजी भोसले वगैरे यानी पाच च्यार

हजार फौज मेलऊन दादासाहेबास तेथून दोन तीन मजला काहाडले. यैसे वर्तमान येथे कोन्हाचे घरी आले, त्याजवरून हे वदता आहे. परतु सरकारात कलमी हे वर्तमान नाही. अफवा हे आहे. मग तहकीक सरकारात वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. राजश्री मानाजी फाकडे यानी जोगाईचे आब्यांकडे खुल केले आहे. त्याचे पारपत्यास पागा वगैरे गेल्या आहेत. काही येक लडाईही जाली. हे वर्तमान पूर्वी येक दोन विनंतीपत्री लेखन केले आहे. शृत जाले असेल. पूर्वी मानाजी फाकडे यास कारभाऱ्यानी कौलही पाठविला होता की येणे. प्रस्तुत वर्तमान आहे की मानाजी फाकडे त्या कौलावरून येणार. मग येतात किवा न येतात हे मागाहून लेखन केले जाईल. शृत होये. भाद्रपद शद त्रितीयेंस राजश्री कृष्णरावजी मोहर्त करून निघनार यैसा निश्चये जाला. निघाल्यावर कूच दर कूच येज्यमानसाहेबाकडे येणार. शृत होये. हैदर-नायेकाकडून पत्रे आली. पत्रे घेऊन नाईक म।।र याचे वकील दरबारास आले होते. पत्रे नानास दिल्ही. दोन घटका वकीलाचा व नाना व रावजीचा खलवत जाला. पत्राचा भाव कलला की नाईक म।।र यासी व इग्रजासी लडाई जाली. नाईक म।।र मागे दोन तीन कोस सरले. इग्रज काही येक त्याजवर गालिब आहेत यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान कलल्यास लेखन केले जाईल. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 91. २६ शाबान ११९५ हिजरी
१७ आगस्ट १७८१

पै।। छ १० रमजान सन ११९५ हिजरी रोज गुरुवार, अस्तमानी जोडीबराबर पावले.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. यथील कुशल. ता।। छ २६ माहे

शाबान मु।। पुणें. स्वामीचे कृपावलोकणे करून येथास्थित जाणौन स्वानद लेखनआज्ञा करीत असिले पा।। विशेष. येथील वर्तमान छ म।।री प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास येईल. यानतर यथील वर्तमान राजश्री कृष्णरावजी भाद्रपद सुद ३ त्रितीयेस स्वार होऊन येज्यमानसाहेबाकडे येतात. शृत होये. हैदर नाईक यासी व इग्रजासी लडाई मातबर जाली. उभयेपक्षी मणुश बहुत जाया जाली. नाईक म।।र काही येक सिकस्त होऊन मागे दोन तीन कोस गेले. यैसे वर्तमान आहे. नाईक म।।र याचे वकील दरबारास आले होते. कारभाऱ्यासी दोन तीन घटका खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की, नाईक म।।र यास पत्रे लिहिणार. शृत होये. राजश्री कृष्णराव तहाचे कामाकरिता हजूरात येतात. पहिले नवाबसाहेबाचे वेलेस शाहू राज्याचे कारकिर्दीत सरदेशमुखी वगैरे याचा तह होऊन कागदपत्र जाहले आहेत, ते कागदपत्र साताऱ्यास राज्याचे जामदर-खान्यात आहेत म्हणोन मंत्री वगैरे यास येथून कारभाऱ्यानी पत्रे लिहिली आहेत की, ते तहाचे कागदपत्र पाठऊन द्यावे. ते कागदपत्र आल्यानतर त्याच्या नकला रावजीसमागमे देनार. शृत होये. मानाजी फाकडे जोगाईचे अब्याकडे खूल करून आहेत. त्याचे पारपत्यास र।। पाडुरगराव वगैरे याच्या पागा पाठविल्या आहेत. दुसरे फाकडे म।।र याजला कौलाही पहिले पाठविला होता की, येणे. त्याजवरून वर्तमान आहे की, फाकडे येणार. मग येतो किवा न येतो हे पाहावे. शृत होये. नाना व हरीपंत व कृष्णरावजी याचा नित्य खलवत होत असतो. भाव आपले दौलतीचे बदोबस्ताविशई व राव म।।र हजूरात येतात येविशई खलवत होत असतो. शृत होये. इग्रज कल्यानीवर आहेत. वर्तमान आहे की, दोन तीन पलटने तीन च्यार कोस पुढे आली. यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. प्राथःकाली

विनंतीपत्र रवाना केले त्याजवरून ध्यानास येईल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे. हे विज्ञाप्ती.

A. R. No. 92.

२७ शाबान ११९५ हिजरी
१८ आगस्ट १७८१

पै।। छ १० रमजान सन ११९५ हिजरी गुरुवारी आस्तमानी तेनाती जोडीबराबर आली ते पावली.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान त।।छ २७ शाबान श्रावण वद्य चतोर्दसी शनिवार-पर्यंत वास्तव्य पुणें, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान छ २५ माहे म।।र डांकेवर पत्रें हुजूर व स्वामीचे सेवेसी पाठविलीं तें पावलीं असतील. व पुन्हां वरचेवर डांकेवर पत्रें रवाना होत आहेंत. रघुनाथराव यांचे चौकीदारासीं व इंगरेजाकडील इंगरेजासीं कजिया जाहला. व इंगरज (ज)खमी जाहला तो मेला. त्याचे खुनाचे बदल्यास इंगरेजानीं रघुनाथराव याचे चौकीदारास मारलें. याजकरितां राव म।।र अजुरदा होऊन वीस कोस सुरतेहून डिंगरीपर्यंत आले. बाजीराव बरवे व सटवाजी भोंसले वगैरे दोन हजारपर्यंत स्वार व येक पलटण व दहा तोफा समागमें आहेत म्हणोन छ २५ माहे म।।रीं वर्तमान लिहून पाठविलें. त्यानंतर छ २६ तारखेस पुन्हा येथील कारपरदाजास बातनीं आली कीं, सोनगडपर्यंत रघुनाथराव आले. येथील कारभाऱ्यांस सशय उत्पन्न जाहला आहे कीं, रघुनाथराव यांस इंगरेजांवितरिक्त दुसऱ्यांचा आश्रय नांहीं. व सांप्रत इंगरेजासीं नाखुसी व कजिया करून सोनगडपर्यंत आले. त्या अर्थीं काय मनसुबा केला असेल याचा

तर्क अनेक प्रकारचा करितात. परंतु निश्चय होत नांहीं. राजश्री कृष्टणराव बल्लाळ नेमाप्रमा ें छ २ रमजानीं पुण्याहून प्रस्थान करून हुजूर येणार. राव मा।र हुजूर आल्यानंतर जे सलाहदौलत असेल त्याप्रमाणें रावजीस इरशाद होईल. सेवकाचे तैनाती जासूद जोडचा दहा त्यांची हाजरीची इस्मनवीसी व बरावर्द आखर जमादिसानी सन ११९५ हिजरीपर्यंत सेवेसी पाठविली आहे. सांप्रदायाप्रमाणें दाखल दफ्तर सरकारआली व्हावी. मुरलीदाससंमधी प्रकरण पूर्वी डांकेवर विनतीपत्रीं लिहिले आहे. चिरंजीव रघुतमराव विनती करतील, ते मान्य होऊन हुजूरचें दस्तक देविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनती.

A. R. No. 93.

१ रमजान ११९५ हिजरी
२१ आगस्ट १७८१

पै।। छ ९ रमजान सन ११९५ हिजरी बुधवार अस्तमान डांकेवर मा।। दारोग्याचे पावली.

श्रीनिवास

पोष्य हबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान भाद्रपद शुध द्वितीया भौमवासर त।। छ १ रमजानपर्यंत मा।ो पुणें, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे, विशेष. छ २६ शाबानीं डांकेवर पत्राचा लिफा(फा) सेवेसी पाठविला तो दारोग्याचे विद्यमानें सेवेसी पावला असेल. सांप्रतचें वर्तमान पृथक पुरवणीवरून सेवेसी श्रुत होईल. राजश्री कृष्टणराव बलाळ उदईक त्रितीया बुधवार छ २ रमजानीं श्रीमंत पंतप्रधान व राजश्री नाना व हरीपंताचा निरोप व रुखसत घेऊन रात्रौ अंगप्रस्थान करणार. व छ ३ गुरुवारीं भोजन करून स्वार होऊन

पुण्याहून सहा कोसी लोणीचा मुकाम करूं, याप्रमाणें रावजीचें मुखें निश्चय येकिल्याप्रमाणें हुजूर व सेवेसी लिहिले आहे. श्रीकृपेनें सत्वर हुजूर येतील. बहुत काय लिहिणें, हें विनती.

पै॥ छ ९ रमजान

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनतीजे. कृपापत्र चिरजीवाचे पत्रासहित छ ८ शाबानचे रवानगीचें छ १६ माहे शाबानीं येथें पावलें. त्याउपरि पत्र येत नांहीं व आजीपर्यंत न आलें. हुजूरचा इनायतनामा दारोग्याचे पत्रासहित छ २१ शाबानचे आजी छ १ रमजानीं पावलें. स्वामीचे पत्राचे आगमनीं संतोषास कारण. परंतु पत्र पाठवावें हे लिहिणें अमर्यादा. तथापि अखबार पावली याची रसीद अवश्यरूप येत जावी. येविषईं हजूरहीं लिहितों व आपले सेवेसीहीं विनती पूर्वीपासून लिहिण्याचा सांप्रदाय, यास्तव निःसंशय लिहितों. निर्मलकरानें वली महमद नामी कारभारी व त्याचे रफीकास मारलें. व तो बागी जाहला आहे. याप्रमाणें पंतप्रधानाचे वकीलाचीं किंवा इतराचीं पत्रें येथें आली. यावरून येथील कारभारी बहुत आश्चीर्य करितात कीं वीस पंचेवीस लक्षाचा तालुका ज्याचे स्वाधीन व जातीनें मूल व तारुण्याचा आरंभ म्हणजे ज्याहल व अविवेकी याप्रमाणें असतां हजूरीहून त्याची उपेक्षा होत आहें. याप्रकारचा सरदार हुजूरचे कांहीच उपयोगी नांहीं. दैवयोगें याचप्रमाणें बळावला तरी खानगी फितूर व मुफसद जबरदस्त होईल. व या विषवृक्षाची मुळी खोल गेल्यानंतर वृक्षास उपटोन टाकणें बहुत श्रम लागतील. हुजूरचे सरदाराचे वर्तमान लिहिण्याचें प्रयोजन नांहीं. परंतु परकीय दरबारी चर्चा जाहली ते हुजूर इतिला करावी यांत दोष नांहीं. याप्रमाणें समजण्यांत आलें. परंतु हुजूर ल्याहावयाची शक्ती न

जाहली. व अनेक प्रकारचे संशय उत्पन्न जाहले यास्तव हुजूर हें वर्तमान लिहिलें नांहीं. स्वामीचें सेवसी व चिरजीवास, आहे हे विनती.

पै।। छ ९ रमजान

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इ।। छ २६ शाबान लगायत छ १ रमजान भाद्रपद शुध २ मंगळवार.

रघुनाथराव सुरतकर इंगरेजासीं कजीया करून बमय कबीले सुरतेहून निघोन डांगरीस आले. मानाजी फांकडयाचे खातरजमेविषई धोंडो आपा पुरंदरे यांचे विद्यमानें बालाजीपंतानीं शुतरस्वारासमागमें पत्रें रवाना केलीं. करनल कूट देवनामपटणीहून चिनापटणास गेला. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अखबारेचा लिफाफा व अर्जी व स्वामीचे सेवेसी पत्र छ म।।र डांकेवर रवाना केलीं. तें हुजूर व सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरि प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें आहे.

रघुनाथराव बमय कबिले व जमीयत हमराही डांगरी व गढेंकामळें-नजीक मुकामात करून राहिले आहेत, व राव म।।रनुलेचे समजावीसीकरितां करनल गाडर मुंबईहून सुरतेस आला. याप्रमाणें पंतप्रधानांचे कारपरदाजास खबर आली, म्हणोन कृष्टणराव बलाळानीं सांगितलें. बाजारी सर्वतोमुखी चर्चा आहे कीं रघुनाथराव सोनगडापर्यंत आले. समागमें दोन हजार स्वार व दोन पलटणें व दाहा तोफा मवजूद. पुन्हां स्वार जमा होत आहेत. गणेशपंत बहिरे यांचे मारफतीनें बालाजीपंताचें इस्तसवाबेनें कागदपत्राचा सिलसिला रघुनाथराव यांसी आहे. त्या सिलसिल्यावर रघुनाथराव इंगरेजासीं अजुर्दा होऊन

निघाले किंवा दुसरे कोण्हीं सरदारांचा सिलसिला असेल त्या भरवसियावर इंगरेजासीं बेबनाव करून निघाले असतील. याप्रमाणें कयास कितेंक लोकांचे व कारपरदाजांसहीं संशय प्राप्त जाहला आहे.

हैदरअलीखानानें येथील कारपरदाजांस व आपलें वकीलास पत्र पाठविलें. त्यांत म।।र लिहिला आहेजे. चिनापटणीहून करनल कूटानें खान म।।रास बहुत मिनतवार लिहून पाठविले आहे कीं कलकत्याहून गोरंदोज मुख्तार होऊन आला आहे त्याचे विद्यमानें हैदरखानांसीं व इंगरेजासी स्नेह व दारमदार पका व्हावा. याचें उतर हैदरखानानीं चिनापटणकर कुटास लिहिलेजें. तुमचा व कलकतेवाले दोघांचे कराराचा विश्वास आम्हांस येत नांहीं. त्याअर्थीं दारमदार किमर्थ करावा? लढाईंत ज्याची फते होईल तो रियासत करील. याची इतिला कारपरदाजांस करणें व गाडराकडील किंवा कलकतेवाल्यांचा पैगाम आलियां कारपरदाजानीं सर्वथैव स्नेहाचे प्रकरणीं गोष्ट न यैकावी व साष्टी व वसईसुधां घेतला मुलुक माघारा देतो म्हणतील तर त्यांचे बोलण्याचा विश्वास व लालुचेवर द्रिष्टी न द्यावी. या प्र।। लिहिलें होतें. वकीलानीं येथील कारपरदाजास पत्रार्थ सांगितला. यानीं उतर केलें कीं खान म।।राचे इस्तसवाबेवितरिक्त इंगरेजासीं कांही ज्वाबसाल अथवा सिलसिला आम्हाकडून होणार नांहीं.

पै।। छ ९ रमजान २

पुरवणी अखबार पुणें. छ १ रमजान सन ११९५ हिजरी.

चिंतो विठल सुमारगडावर कैदेंत होता. सन्यास घेतला म्हणोन चर्चा यैकिली होती. परंतु नमकहराम व खावंदासी कृत्रिम येकवार ज्यानीं केलें त्याचा भरवसा नाही. याकरितां देहसंमध सोडून तो जीव यमलोकास जावा हेंच प्रायश्चित कारभाऱ्यांनी नेमिलें होतें. आजी छ म।।रीं वर्तमान आलें कीं चिंतो विठल समाप्त जाहला.

वासुदेवबावा मुतालिक प्रतिनिधी मुमूर्ष होता. याकरितां प्रथमतां समाप्त जाहल्याचें वर्तमान आलें. परंतु ते समईं नांवकरी कोण्हीं पाग्या मेला, हे वर्तमान पूर्वी लिहिले आहे. सांप्रत तहकीक येकिलें की वासुदेवबावा कऱ्हाडांत होता मृत्यू पावला. कृष्टणराव बलाळ छ २ माहे रमजानीं प्रस्थान करून छ ३ गुरुवारीं स्वार होणार. समागमे दीडसे स्वार व येक हाती व पंचेवीस गाडदी पंतप्रधानांनी आपले सरकारचे तरफेने नेमून दिधले आहेत. हरीपंत फडके यांस शुलाची व्यथा उत्पन जाहली आहें. दोन दिवस स्वस्थ व दोन दिवस अस्वस्थ प्रकृती असती. छ १ माहे म।।रीं रो बालाजीपंत नाना व कृष्टणराव बलाळ रो हरीपंताचे घरास गेलें होते. च्यार पांच घटकापर्यंत येकांत जाहला. त्याउपरि स्वस्थळास गेलें. श्रुत होय हें विनती.

A. R. No. 94. २ रमजान ११९५ हिजरी
२२ आगस्ट १७८१

छ ९ माहे रमजान संन ११९५ हिजरी बुधवार अस्तमान डांकेंवर म।। दारोगा हरकारा.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजें. यथील कुशल त।। छ २ माहें रमजान मु।। क।। पुणे स्वामीचें कृपावलोकणें करून येथास्थित जाणौन स्वानद लेखनआज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष. यथील वर्तमान छ २६ माहे शाबान. विनंतीपत्रें दोन, येंक प्राथःकाली सरकारचें डाकेंसमागमे, दुसरें दो प्रहरा राजश्री हैबतराव याचे तैनाती जोडी-समागमे मै अर्जीसहित यैसे सेवेसी विनंतीपत्रें रवाना जाली त्याज-वरून सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर येंथील वर्तमान. श्रीमत राजश्री दादासाहेबासी व इग्रजासी नाखुसी काही येंक जाली म्हणौन दादासाहेंब सटोजी भोसलें वगैरे मिळालें. हें सुरतेहून निघोन

सोनगडाकडे आले यैसी वदता आहे. हें वर्तमान पूर्वीचें विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून शृत जालें असेल. त्यास खानदेश प्रातीहून रा।। गनेशपंत बेहरें वगैरे याची पत्रें आली की दादासाहेब च्यार हजार मणुश व येक पलटन व सटोजी भोसलें वगैरे याचें दोन अडीच हजार स्वार या सरजामानसी सुरतेंहून निघून सोनगडास आलें. पुढे फौज वगैरे मेलऊन कोडाईबारी चहडून खानदेश प्राती येणार. इग्रजाचें पलटन वगैरे दादासाहेबासमागमें नाही. त्याचेच येंक पलटन वगैरे मणुश व सटोजी भोंसले वगैरे आहेंत. सोनगडास आले. इग्रजासी व त्यासी काही नाखुसी जाली. इकडे येतात म्हणौन गनेशपंत वगैरे यानी लिहिले होते. येथे तर्क बहुतानी केले की इग्रजासी नाखुसी करून पुढें परिनाम काये. सटोजी भोसलें वगैरे प्रस्तुत त्यास मिळालें आहेत. यानी इग्रजासी काही येक मुसलत करून दादासाहेबास सोनगडास आनिले की फौज जमा व्हावी याअर्थी आनिलें असेल यैसे बोलतात. त्यास श्रीमत दादासाहेब यानी कुटुब व मूल सुरतेस ठेऊ(न) आपन खासा पाच च्यार हजार मणुश व येक पलटन व दोन अडीच हजार स्वार, सटोजी भोसले व बाजीराव बरवे वगैरे याचे व दाहा पाच तोफा या सरजामानसी सोनगडास आले. सटोजी भोसले वगैरें दादासाहेबासमागमेच आहेत. सुटोजी भोसले व बाजीराव बरवे वगैरे यानी इग्रजास मसलत दिल्ही की देशात वर्तमान आहे की दादासाहेब इग्रजाचें कैदेत आहे. या अर्थी फौज वगैरे जमा होत नाही. दादासाहेबास आमचे स्वाधीन करावें. सोनगडास राहून फौज वगैरे जमा करून खानदेश प्राती उपद्रव करितो. तुम्ही बोरघाट वगैरेकडे उपद्रव करावा. यैसी मसलत करून दादासाहेबास घेऊन सटोजी भोसले वगैरे सोनगडास आलें यैसे वर्तमान आहे. दादासाहेब वगैरे सोनगडास आले हें वर्तमान येथें तहकीक आले. शृत होये. दुसरे वर्तमान येथे आहे की दादासाहेब इग्रजासी नाखुसी करून निघाले. इकडे येतात म्हणौन करनैल गाडर ममईहून दादासाहेबाचे समजूतीस गेला यैसेही वर्तमान आहे. परतु दादासाहेब इग्रजासी नाखुसी करून

निघतील यैसी त्याची जरब नाही. इग्रजाच मसलतीने फौज वगैरे जमा करावी या अनवये दादासाहेब सोनगडास आले यैसे वर्तमान आहे. पुढे तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. छ २७ माहे शाबान रोज शनवार. श्रीमत दादासाहेब सोनगडास आले. फौज वगैरे जमा करून पुढे उपद्रव करनार म्हणौन कारभारी वगैरे माहे मा।।री सुद दशमीस डेरे बाहेर करनार. तमाम लोकास व सरदारास पत्रे पाठवितात की दसऱ्यास जमा व्हावें. शृत होये. सटोजी भोसले व बाजीराव बरवे हे दादासाहेबास सोनगडास घेऊन आले. फौज इकडील जमा करनार. इकडील सरदारास ते फितुर करतील म्हणौन कारभारी अदेशात आहेत. चौकसी करितात व सरदार वगैरे यास ताकीद करितात. शृत होये. रा।। नाना व हरीपत व कृष्णरावजी याचा खिलवत जाला. राव मा।।र छ २ माहे मा।।री मोहर्त करून निघनार. शृत होयें. दादासाहेब सोनगडाकडे आले म्हणोन राजश्री गणेशपंत बहरें यास पत्रे पाठविली की तुम्ही जेमयेतसुधा त्याचे शाहास जाणे. पंत मजकुरापासी हाजार स्वार आहेत. गणेशपंत तिकडे जानार. शृत होयें. दरबार वगैरें जाला होता. माली व मुलकी वगैरें कामकाज जाली. शृत होये. छ २८ माहे शाबान रोज रविवार. वलीमहमद बक्षी नवाब जफरुदौला बहादुर मरहूम यांजकडील व निर्मलचा किलेदार व कोतवाल वगैरे जमादार यानी सिबंदीत फितुर करून पांच्यार हाजार माणूस आपणाकडे केले की नवाब मरहूम याचें पुत्रास दगा करावा. हे वर्तमान जफरुदौला बहादुर यांचे पुत्रास कलल्यावर त्यांचेंही मायेची दोन च्यार हजार माणूस होते, हें बक्षी मजकूर यांजवर चाल करून गेले. यांसी व त्यासी लडाई जाली. वलीमहमद बक्षी वगैरे धरले गेले. जे जमादार वगैरे फितुरात होते ते सपूर्ण बादूर मजकूर यांचे पुत्राणे जीव मारले, यैसे वर्तमान येथे आले. शृत होयें. इंगरेज कल्याणीस व ममईस जमाव करून आहेत. प्रस्तुत दादासाहेब सोनगडास जमाव वगैरें करावयासी आले. त्यानी पुढे कोंडाईबारीस चाल केल्यास कल्याणीवाले इंगरेज बोरघाटाकडे चाल करनार यैसे वर्तमान आहे. शृत

होयें. नित्य खलबत हरीपंत व नाना व कृष्णरावजी यांचा होत असतो. भाव यैकिलियांत आलां की पुढे दौलतीचा बंदोबस्त करावा. फौज वगैरे जमा करावी. स्वारीचा उद्योग करून इंगरेजाचे पारपत्य करावे. शृत होयें. दुसरे हैदर नाईक यांजकडील वकील दरबारास आले होते. कारभारी यांचा व त्यांचा खलबत जाला. नायेंकाकडे पत्र लिहिनार. शृत होयें. हरीपंतास येक दोन दिवस समाधाण वाटत नाही, परंतु आराम आहे. शृत होयें. छ २९ माहें शाबान रोज सोमवार. चिंचोडचें देव चतुर्थीस मोरेश्वरास गेले. त्यांचे दर्शणास पुण्याबाहिर श्रीमंत व नाना वगैरे गेलें होते. दर्शण करून पुन्हा गावात आलें. शृत होयें. राजश्री भगवंतराव निंबालकर कृष्णरावजीचें घरी आले होतें. त्यांसी व रावजीस दोन तीन घटका खलबत जाला. खलबतीचा भाव यैकिल्यात आलां की राव मजकूर हजुरात येंतात त्यांस निंबालकर मजकूर यानी आपले साहित्याविसी सांगितले. त्यांजवरून राव मजकूर हाजुरात अर्ज करनार. शृत होयें. राजश्री माणाजी फाकडे जोगाईच्या आंब्याकडे होते, त्यांचे पाठीमागे याची फौज होती. प्रस्तुत वर्तमान यैकिल्यांत आलें की राक्षसभुवनावर गंगा उतरून दादासाहेबाकडें जानार. समागमे जमाव दोनसे स्वार आहेंत याप्रो वर्तमान यैकिलें. तहकीक वर्तमान आल्यावर लेखण केलें जाईल. शृत हायें. छ १ माहे मजकूर रोज मंगलवार. नाना व कृष्णरावजी हरीपंताचें येथे आले होते. गणपतीचा उत्छाहा आहे म्हणून नाच होत होता तो पाहून उपरांतिक खलबत जाला. शृत होयें. श्रीमंताचे येंथें वाडयांत गणपतीची स्तापणा होऊन उत्छाहा आहें. कारभारी वगैरे उत्छाहाचें नाचास व कथेंस जात असतात. शृत होयें. राजश्री चिंतो विठल गडास कैदेत होतें तें मृत्य पावले यैसे वर्तमान आलें आहें. मागतीही शोध करून लेखण केलें जाईल. शृत होयें. दादासाहेंब सोनगडाकडे गेलें म्हणून करनेल गाडर इंगरेंज पांच सातसे मानसानसी झाहाजात बसून ममईहून सुर्तेस गेला यैसे वर्तमान आलें. मग श्रीमंत दादासो इंगरेजाची नाखुसी करून निघालें किवा त्याचें सळुखाने निघाले हे वर्तमान

तहकीक करून लेंखण केंलें जाईल. शृत होये. छ २ माहे मजकुरी रो कृष्णरावजी दीड प्रहर रात्रपूर्व गेल्यानंतर मुहूर्त करून बाहिर निघनार. कूच दर कूच हजुरात येतात. शृत होये. बहुत काय लिहिणे. कृपालोभ कीजें. हे विज्ञाप्ती.

A. R. No. 95. ३ रमजान ११९५ हिजरी
२३ आगस्ट १७८१

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरि. येथील वर्तमान ताा छ ३ माहे रमजान भाद्रपद शुध चतुर्थी गुरुवासरपर्यंत वास्तव्य पुणें, स्वामीचें कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केंली पाहिजे. विशेष. कृपापत्र छ २१ शाबानचें रवानगीचें डांकेवर रवाना केंलें तें छ २ माहे रमजान बुधवारीं दोन प्रहर दिवसां पाऊन संतोष जाहला. व चौथाईचे अमलाचे मोकलीकेविषईं राजश्री कृष्णरावजीचे खुलास्याप्रमाणे स्वामीनी हुजूर अर्ज केला व त्याचें उतर हुजूरीहून इरशाद जाहला. परंतु नवाब मोइनुदौला बहादर याचे फर्मावण्यांत आपण सांगू त्याबमोजिब उतर सेवकास ल्याहांवें म्हणोन आज्ञा. त्यास सांप्रत रावजी हुजूर सत्वरच पावतील व समक्ष अर्ज करतील. व इरशादही समक्षच होईल. छ १ माहे रमजानपर्यंत वर्तमानासहित छ २ माहे मा।रीं पत्रें डांकेवर रवाना केलीं, ते सेवेंसी पाऊन वर्तमान हुजूर व सेवेंसी श्रुत जाहलें असेल. छ ३ माहें मा।र गुरुवारीं प्राथःकालीं प्रहर दिवसपर्यंत राजश्री कृष्टणरावजी उभयतां गोविंदरावजीसहित बालाजीपंत नानाचे हवेलीस जाऊन, येकांती परस्परें संभाषण जाहलें. त्याउपरि नाना फडनीसनी विडे देऊन रुखसत केलें. छ २ माहे मा।रीं श्रीमंत पंतप्रधान गणेशाचे उछाहाचे मजलसींत बसले होते. राजश्री बालाजीपंत नानासहित

कृष्टणराव रुखसतीकरितां गेले. श्रीमंतानीं विडे देऊन राव म।।रनुलेस रुखसत केलें. आजी छ ३ माहे म।।रीं रावजी अडीच प्रहर दिवसानंतर पुण्याहून स्वार जाहले. लोणीचेसमीप मुकाम नेमिला आहे. तेथें जातील. छ ५ रमजानीं बारामतीस जाणार. तेथें येक मुकाम करून छ ७ रोजीं स्वार होतील. इंदापुरीं येक मुकाम होईल. त्याउपरि दरमजल हैदरबादेस जावयाचा नेम केला आहे. भगवंतराव निंबाळकर माढेकर कृष्णरावजीचे आश्रयानें पुण्यास आला आहे. सांप्रत रावजी हुजूर गेले याकरितां निंबाळकर म।।रहीं हुजूर जाणार. हरी उमाजीस रावजीनीं समागमें घेतलें आहे. रो हरीपंत फडके यांस उदरशूलव्यथा उत्पन्न जाहली. याकरितां बहुत अस्वस्थ. हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. त्यास पंत म।।र यांची प्रकृती स्वस्थ नांहीं. पोटांत शूल व वांती होती ते समईं रक्त पडतें. उपचार औषधाचे बहुत करितात. परंतु साध्य होत नांहींत. येथील समग्र मंडली कोंकणस्थ आदिकरून लोकानीं व अनुष्ठानास ब्राह्मण घातले आहेत. त्यानीं निश्चय केला आहें कीं कोण्हीं प्रयोग केला त्याची बाधा जादूसंमधी आहे. व कितेकाचें कयासांत वासुदेवभट करवे व इतर येक दोवें ब्राह्मण कैदेंत समाप्त जाहलें ते लागले. यैकिल्याप्रमाणें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. चिरजीवास पत्र लिहिलें ते पावले हे विनती.

A. R. No. 96. ३ रमजान ११९५ हिजरी
२३ आगस्ट १७८१

पै।। छ १० रमजान सन ११९५ हिजरी, रोज गुरुवारी अस्तमानी दारोग्याचें विद्यमाने डाकेबराबर पावलें.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजें. यथील कुशल ता।। छ ३ माहे रमजान

मु।। पुणे स्वामीचें कृपावलोकणें करून येथास्थित जाणौन स्वानंद लेखनआज्ञां करीत असिले पाहिजे. विशेष. यथील वर्तमान छ २ माहे म।।र रोज बुधवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले. ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास येईल. तदनंतर येथील वर्तमान श्रीमंताचे वाडयात गनपतीचे उछवाचे नाचास नाना व कृष्णरावजी गेले होते. नाच वगैरे पाहून सध्याकाली आपले घरास गेले. हरीपतास समाधान वाटत नाही म्हणोन ते वाडयात आले नवते. शृत होये. राजश्री कृष्णरावजी रोज म।।री तेरा घटका रात्रपूर्व गेल्यानंतर मोहर्त करून प्रस्थानास गेले. उदईक गुरुवारी चतोर्थीस भोज्यन करून साहा कोस लोनीस मुकामास जानार. तेथून दो दिवसा बारामतीस जानार. बारामतीस बागात दोन तीन दिवस राहून, पुढे कूच दर कूच येज्यमानसाहेबाकडे येतात. रावजीसमागमे दोनसे स्वार व येक हाती, चालीस पनास मणुश शागिर्दपेशाचे दिल्हे आहें. शृत होये. राजश्री भगवतराव निबाळकर यासी व रावजीसी खलवत जाला. भाव यैकिल्यात आला की निबालकर म।।र यानी रावजीस सागितले आहे की हजूरात अर्ज करून नजरमाफी करून जागीरीचा बदोबस्त जाल्यास करावा. न जाल्यास श्रीमंताचे पदरी पडलेच आहे. याप्रमाणे भाशणे जाली. रावजीनीही कबूल केले आहे की तुम्हाविशई अर्ज करून बदोबस्त करून याप्रमाणे रावजी निबालकर म।।र यासी बोलले. शृत होये. प्रस्तुत भगवतरावजी निबालकर यास दोन हजार रुपये दरमाहाप्रमाणे आठ हजार रुपये खर्चास दिल्हे. शृत होये. छ म।।री गुरुवारी राजश्री कृष्णरावजी रुखसत होऊन स्वार होऊन साहा कोस लोनीस मुकामास गेले. येक दोन दिवस बारामतीस राहनार. उपरातिक कूच दर कूच येज्यमानसाहेबाकडे येतील . राव माार तिसरे प्रहरी स्वार होऊन गेले. शृत होये छ २१ माहे शाबानचे आज्ञापत्र डाकेसमागमे सादर केले ते छ २ माहे म।।री सेवकास पावले. पावोन संतोश जाला. पत्री आज्ञा की वरचेवर बारीक मोठे वर्तमान शोद करून लिहित जाणे, म्हणौन आज्ञा आहे. त्यास

आज्ञाप्रमाणें वरचेवर विनंतीपत्रे सेवेसी रवाना होतात. व अर्ज्याही हजूरात रवाना होतात. शृत होये. बहुत काय लिहिणे? कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 97. ७ रमजान ११९५ हिजरी
२७ आगस्ट १७८१

पै॥ छ १४ रो। सोमवार माहे रमजान संन ११९५ हिजरी डांकेवर दोन प्रहरास पावली.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां॥ नमस्कार विनती उपरि. येथील वर्तमान ता। छ ७ रमजान भाद्रपद शुध नवमी इंदुवासर पर्यंत मो। पुणें क्षेम जाणून स्वकीय स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. पूर्वी छ ३ माहे म॥री हुजूरचे अर्जीसहित विनतीपत्र डांकेवर पाठविलें. ते सेवेसी व हुजूर पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान पृथक पुरवणी पत्रावरून विदित होईल. चौथाईचे मामलतीची मोकलीक व्हावी ये विषईं कृष्टणरावजीची विनती हुजूर होती. याचें उत्तर हुजूरीहून इरशाद जाहला तो म॥र स्वामीनी कृपापत्रीं मुख्तसर लिहिला होता की नवाब मोइनुदौला बहादरांचे इतिल्यानें माघाहून लिहून पाठऊं. चिरजीव रघोत्तमराव यानींहीं संकळित व स्वामीचे व नवाबसाहबांचे आज्ञेप्रमाणें लिहून पाठऊं म्हणोन लिहिलें होतें. सांप्रत राजश्री गोविंदराव कृष्टण यानीं वर्तमान सागितलें कीं जिवाजीपंतास हुजूरचा इरशाद जाहला व त्यानी पत्री म॥र लिहिला आहे. जे सन ११८५ सालापासून मामलतीचा तह करून द्यावा याप्रमाणें करार असतां तह होत नांही. यास्तव पांच वर्षे अधिक रुपये वसूल नेला. याचा जिमा कोण्ही केल्यास मोकलीक करून

देऊं. याप्रमाणें इरशाद जाहला. याचें उतर कृष्टणरावजीनीं लिहिलें कीं हुजूर आल्यानंतर समक्ष रूबरू समग्र कामाचा फैसल होईल. चिरजीव राजश्री रघोतमराव यांची सरफराजी सेवकाचे अर्जीनुरूप व्हावी. ये विषईं पूर्वी विनतीपत्र अर्जी लिहून चिरंजीवाचे स्वाधीन केली आहे. सांप्रत येक लिहून पाठविली आहे. चिरंजीव स्वामीस दाखवितील. मर्जीस आलियां गुजराणावी. बहुत काय लिहिणें हे विनती.

पै।। छ १४ माहे रमजान संन ११९५ हिजरी रोज सोमवार डांकेवर.

श्रीनिवास

अखबार पुणें. अज इ।। छ ३ रमजान लगायत छ ७ माहे म।।र सन ११९५ हिजरी. इंदुवासर भाद्रपद. कृष्टणराव बलाळ यानीं छ २ माहे म।।रीं पंतप्रधानांची रुखसत घेऊन छ ३ रोजी बालाजीपंत व हरीपंताचा निरोप घेतला व हुजूर जावयाकरितां स्वार होऊन लोणीचे मुकामास गेले व यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ ३ माहे म।।रीं हुजूर अर्जी व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरि प्रत्यक्ष व जाहलें वर्तमान दफेवार लिहिलें असे. रघुनाथराव डांगरी व गढेंकामळे-समीप सुरतेहून पंधरा सोळा कोसी आहेत व करनल गाडर राव म।।रनुलेचे समजाविसीकरितां मुंबईहून स्वार होऊन सुरतेस गेला म्हणोन पूर्वील पत्री म।।र लिहिला होता. साप्रत पंतप्रधानांचे सरकारची बातनी आली नांहीं. परंतु खारिज सर्वतोमुखी चर्चा आहे की गाडर रघुनाथराव यांचे लश्करास येऊन बहुताप्रकारें दिलदारी व खातरजमा करून माघारा घेऊन गेला. सुरतेसमीप

तीन कोसी जाऊन उतरले आहेत, म्हणोन यैकिलें. गणेशपंत बहिरे व आणखीं खानगीं शागिर्द यांचे विद्यमानें बालाजी-पंत व हरीपंत रघुनाथराव यांसी यैक्यतेचा पैगाम करीत आहेत. परंतु रघुनाथरायांस यांचे वचनाचा व बोलण्याचा भरवसा कोणेही प्रकारें येत नाही. दसऱ्यानंतर मोहिमेचा निश्चय इंगरेजांचा आहे. माहदाजी सिंदे काळाबाग शाहदवऱ्यासमीप व इंगरेजांची फौज दाहा कोसाचे फासल्यानें हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिले होतें. सांप्रत यैकिलें की इंगरेजानीं सिंद्यावर शबखून घातला व सरजाम-बहिर-बुनगा टाकून पळाले. लश्कर लुटलें गेले. याप्रकारें बाजारी सर्वतोमुखी चर्चा आहे. पंतप्रधानांस कलमी किंवा अवातर बातमी आली नांहीं. पंतप्रधानांचेथें खबर आल्यानंतर जे तहकीक खबर येईल ते लिहून पाठऊं.

हैदर नाईक चिनापटणापासून च्यार कोसाचे फासल्यानें व इंगरेजांची पलटणें चिनापटणांत आहेत. पूर्वील लढाईंत हैदर-खानाकडील सरदार पडले व खराबी फार जाहली त्या दिवसापासून ज्याहालत करून इंगरेजांवर चालून जात नांहीं व इंगरेजहीं खान मा।।रावर चालून येत नांहींत .

मानाजी फांकड्याकडील बातेनी येथील कारपरदाजास आली कीं परली परगण्यांत वेंका माहार याचे आश्रयास जाऊन राहिला आहे. धोंडो अपा पुरंदरे यांचे विद्यमानें पत्रें गेलीं आहेंत त्याचे दरजवाब आले नांहींत.

गणपतीचा उत्साह वर्षाप्रमाणें होत आहे. पंतप्रधान व वरकड सरदार वगैरे मजलसींत बमोजिब तलब येतात. छ ६ माहे मा।।रीं गाजुदीखानाचा पुत्र गेला होता. कृष्टणरावजीचे पुत्र गोविंदराव बोलावयाकरितां गेले होते. इतर मुतसदी व सरदार व वकील बमोजिब तलब जातेत.

———

२

श्रीनिवास

पुरवणी अखबार छ ७ रमजान सन ११९५ हिजरी.

रो। हरीपंत फडके यांची प्रकृती अद्यापि स्वस्थ नांही, दरबारास येत नांहींत.

मालोजी व शंकराजी धोरपडे शरीर व त्यांजकडें कांहीं संशय फितुराचा दोन वर्षापासून आहे. परंतु जबरदस्त व माहदाजी सिंद्याचे सिफारसी. याकरितां कारभारी आजोपर्यंत भ्रमांत चलते आहेत. परस्परे संशयाकरितां उभयतां घोरपडे दरबारास येतच नांहीत. आले तरी जमाव सुधां येतात. श्रुत होय. हे विनती.

रो। कृष्टणराव बलाळ बारामतीस येक मुकाम करून तेथोन स्वार होणार. हां नेम रावजीचे मुखं यैकिला होता. साप्रत गोविदरावजीनी सांगितलें जे तीन दिवस राहतील. सारांश दोन दिवस अधिक उणे सत्वरच हुजूर येतील. हे विनती.

पै॥ छ १४ माहे रमजान सन ११९५ हिजरी रोज सोमवार दोन प्रहरास डांकेवर पावली.

A. R. No. 98. ८ रमजान ११९५ हिजरी
२८ आगस्ट १७८१

पै॥ छ १४ रोज सोमवार माहे रमजान संन ११९५ हिजरी दोन प्रहरास डांकेवर पावली.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ता। छ ८ माहे

रमजान मु।। पुणे स्वामीचे कृपावलोकणें करून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष. यथील वर्तमान छ ३ माहे म।।र रोज गुरुवारी तिसरे प्रहरी राजश्री कृष्णरावजी स्वार जाल्याचे वर्तमान सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर येथील वर्तमान राजश्री कृष्णरावजी स्वार होऊन बारामतीस गेले. तेथे दोनतीन दिवस राहून उपरातिक कूच दरकूच हजुरात येणार. रावजीसमागमे राजश्री गोविदराव भगवतही आले आहेत. रावजी सत्वरच तेथे येऊन पोहचनार. शृत होये. राजश्री कडोजी भापकर व दुर्गोजी भापकर खानदेशात कोडाईबारीजवल होते. त्यास दुर्गोजी भापकर पाचच्यारसे स्वारानसी कोडाईबारी-जवल आहेत. कडोजी भापकर दाहावीस स्वारानसी येथे आले. कारन की लोकास खायास खर्चास नाही. म्हणौन पैका मागावयास आले आहेत. भापकर म।।र याची व कारभारी म।।र याची भेट एका दो दिवसा होनार. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. शृत होये. छ ४ रोज शुकरवार श्रीमत राजश्री दादासाहेब सुरतेहून सोनगडास आले होते. तेथे सटोजी भोसले वगैर याच्या भेटी जाल्या. पुढे ते फौज वगैर ठेऊन कोडाईबारीकडे येऊन उपद्रव करनार. हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री सविस्तर लेखन केले होते त्याजवरून शृत जाले असेल. प्रस्तुत वर्तमान आले की कर्नेल गाडर ममईहून सुरतेस गेला होता. त्यास गाडर म।।र दादासाहेबाकडे जाऊन, दादासाहेब सोनगडाजवल पाच साहा कोसावर होते त्याची समजूती करून, मागती दादासाहेबास सुरतेस घेऊन गेले यैसे वर्तमान आले. त्यास दादासाहेब सोनगडाजवल आले होते. मागती दादासाहेब सटोजी भोसले वगैर सहित सुरतेस गेले यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. गनपतीचा उछव श्रीमताचे वाडयात आहे. कारभारी वगैर नित्य नाच पाहावयास वाडयात जात असतात. शृत होये. छ ५ रोज

शनवार हैदरनायकासी व इग्रजासी लडाई जाली. नाईक म।।र सिकस्त होऊन माघारे पाच सात कोस गेले. हे वर्तमान पूर्वी लेखन केले होते त्याजवरून शृत जाले असेल. प्रस्तुत वर्तमन आहे की नाईक म।।र यासी व इग्रजासी लडाई जाली. नाईक म।।र कायेम होऊन पाचसात कोस पुढे गेले. पुढे चिनापटनाकडे जाणार यैसे वर्तमान नाईक म।।र याचे वकीलाकडे आले. हे वर्तमान वकील म।।र यानी कारभाऱ्यास सागितले. दोन घटका कारभाऱ्यासी व वकील म।।र यासी खिलवत जाला. नाईक म।।र यास पत्रे लिहिणार. शृत होये. हिदुस्थानप्राती सिद्यासी व इग्रेजासी लडाई जाली. उभयेपक्षी मणुशे फार जाया जाली. इग्रजाजवल सरजाम विशेष आहे. गालिब आहेत यैसे वर्तमान आहे. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. उपरातिक नाना हरीपताचे येथे गेले होते. कारन की हरीपतास समाधान वाटत नाही. हरीपतास पाहून उपरातिक नानाचा व हरीपताचा च्यार घटका खिलवत जाला. खिलवत होऊन नाना आपले घरास गेले. शृत होये. छ ६ रोज रविवार श्रीमताचे येथे गनपतीचे उछवाचा नाच होत असतो. नाच पाहावयास नवाब गाजुदीखानाचे पुत्रास अनावयास गोविदराव रावजीचे चिरजीव यास पाठविले होते. त्यास घेऊन आले. गाजुदीखानाचे पुत्र नाच पाहवयास वाड्यात आले. वाड्याबाहेर त्यास पेशवा नाना गेले होते. त्यास वाड्यात आनिल होते. नाच पाहवयास श्रीमत व गाजुदीखानाचे पुत्र वगैर सर्व बसले होते. दोन तीन घटका नाच वगैर पाहून उपरातिक गाजुदीखान याचे पुत्र आपले बिन्हाडास गेले. शृत होये. र।। सखारामबापूचे क्रियेस पाच हजार रुपये पाठविले होते हे पूर्वी लेखन केले होते. प्रस्तुत त्याचे दानास येक पालखी व येक घोडे सासवडास पाठविले. शृत होये. र।। चितो विठल मृत्य पावले. हे पहिले लेखन केले होते. त्यास चितोपंत मृत्य पावले. शृत होये. र।। हरीपताचे येथे गनपतीचा उछव होता म्हणौन नाना कथेस हरीपताचे येथे आले होते.

ललित वगैर करून उपरातिक नाना आपले घरी गेले. शृत होये. छ ७ रोज सोमवार इग्रजाचा ज्यमाव कल्यानी व ममईस फार जाला आहे. करनेल गाडर सुरतेस गेला आहे, तो

पुरवणी २

ममईस आलियावर इकडे उद्वोग करनार यैसे वर्तमान आहे. शृत होये. कोकनप्राती तलेघोसाल्याकडे हबशाने उपद्रव माडला आहे. कारन की हबशाची त्या प्रातात चौथ वगैर आहे, ते येथास्थित चालत नाही म्हणौन त्यानी उपद्रव माडला आहे. त्यास पहिलेप्रमाणे हबशाचा बदोबस्त करून देनार. शृत होये. हरीपत व नाना याचा नित्य खिलवत होत असता. भाव हाच की पुढे इग्रजाचे मसलतीचा व दौलतीचे बदोबस्ताचा. अस्वीन मासी कारभारी वगैर बाहेर निघनार यैसी वदता आहे. शृत होये. राजश्री कृष्णरावजी छ ३ माहे मा।।री स्वार होऊन बारामतीस गेले. तेथे येक दोन दिवस राहून कूच दरकूच हजुरात येज्यमानसाहेबाकडे येतात. तेथे राव मा।।र आलिया सर्व स्वामीचे ध्यानास येईल. शृत होये. राजश्री कृष्णरावजी चिरजीवास हजूरचे मुलाजमतेस समागमे घेऊन येत होते. राव मा।।र चिरजीवासही समागमे नेतात. येथोन कारभाऱ्यास काही येक संशये पडला. त्याजवरून कारभाऱ्यानी रावजीस म्हटले चिरजीवास समागमे न न्यावे आम्हापासी असू द्यावे. यैसा जाबसाल जाल्यानतर रावजीनी चिरजीवास येथे ठेविले. समागमे गोविदराव भगवत यास घेऊन गेले. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

पुणें अखबारांतील कठिण शब्दांचे अर्थ

(अ.)–अरबी; (फा.)–फारशी; (तु.)–तुर्की; (हिं.)–हिंदुस्थानी;
(सं.)–संस्कृत; (म.)–मराठी; (रा. व्य. को.)–राजव्यवहारकोश.

अ

अकलनाकस (अ.), अल्पबुद्धी.
अकसर (अ.), बहुशः, सर्वसाधारणपणें.
अखबारनवीसी (फा.), वार्तालेखन, बातम्या कळवणें.
अखरश (फा.), सरतेशेवटीं.
अंगूर (अ.), द्राक्ष.
अज्म (अ.), निश्चय, बेत.
अज् (फा.), पासून, मुळें.
अजमाश (फा.), चांचणी, परीक्षा.
अंजाम (फा.), परिणाम, शेवट.
अजीज (अ.), प्रियव्यक्ति. अजीजस्तुभवेदिष्टम्-नात्यांतली व्यक्ति.
अदा करणें (फा.), प्रगट करणें, फेड करणें.
अंदेशा (फा.), संशय, विचार.
अफजायश (फा.), वाढ, आधिक्य.
अफलातून (अ.), प्लॅटो, बुद्धिमान मनुष्य.
अमलनलास, अमलनालिस (अ. फा.), गाऱ्हाणें चव्हाट्यावर टांगणें; कोर्टांत फिर्याद करणें.
अयश, ऐश (अ.), चैन, सुख, विलास.
अर्जमारूज (अ.), विनंत्या, प्रार्थना.
अरस्तु (फा.), ॲरिस्टॉटल.
अलकाब (अ.), पदव्या, मायने.
अलतगमा, अलतमगा (तु.), राजमुद्रा. कायमची देणगी.
अलाहिदा (अ.), पृथक, विभक्त, निराळें.
असल (अ.), अकृत्रिम, खरें.
असामी (अ.), (इस्म शब्दाचें अनेकवचन), व्यक्ति नेमणूक, वार्षिक वेतन. असामीनाम वृत्तिदानपत्रम्. (रा. व्य. को.)
अहद (फा.), करार.
अहदपैमान (फा.), वचनप्रमाणानें करार करणें.

आ

आईना (फा.), आरसा, प्रतिबिंब.
आखरिश (फा.), सरतेशेवटीं.
आजमोदाकार (फा.), अनुभवी, प्रौढ विचाराचा.
आजुर्दगी (फा.), दुःख, असंतोष, कष्टीपणा.
आजुर्दा (फा.), असंतुष्ट.
आबखोरा (फा.), पाणी पिण्याचें भांडे.
आमिल (अ.), अधिकार गाजविणारा, सरकारनियुक्त अधिकारी.
आरजू (फा.), इच्छा.
आरजूमंद (फा.), इच्छा बाळगणारा, इच्छुक.
आलम (अ.), विश्व.
आलमियात (अ.), विश्वनिवासी.
आवारा (फा.), अनिर्बंध संचार करणारा, उच्छृंखल.

इ

इजनात, अजनाद (अ.), सैनिक (अनेकवचन).
इजहार (अ.), प्रसिद्धीकरण.
इजाफा (अ.), आधिक्य, वाढ.
इजारदार (फा.), मक्तेदार.
इतफाक, इतिफाक (अ.), सहविचार, एकविचार.
इतबार (अ.), विश्वास, पत.
इतराजी (अ.), अप्रसन्नता, गैरमर्जी.
इतलाखी (अ.), मुक्त करणारी.
इतल्ला (अ.), वार्ता, खबर, लक्ष.
इनायत (अ.), बक्षीस, कृपा.
इनायात (अ.), (वरील शब्दाचें अनेकवचन.)
इनायेतनामा (अ.), कृपापत्र.
इप्तदाय, इबतेदा (अ.), प्रारंभ.
इमदाद (अ.), साहाय्य, मदत.
इरशाद (अ.), उपदेश, आज्ञा, इच्छा.
इलजाम (अ.), आळ, दोष.
इलतिजा (अ.), विनंती.
इलाका (अ.), प्रांत, ताबा, परिवार.
इले (अ.), पर्यंत.
इस्तकबाल (अ.), सामोरे, भावी.
इस्तकलाल (अ.), जोर, धर, निश्चिती.
इस्तसवाब (अ.), सल्ला, पसंती.
इस्ताफा, इस्तेफा (अ.), नौकरीची सोडचिठ्ठी, राजीनामा.
इस्मनवीसी (फा.), नांवनिशी, नामावली.
इहदे (अ.), एक.
इंतेजार (अ.), मार्गप्रतीक्षा.

उ

उजर, उजूर (अ.), तक्रार, आक्षेप.
उजरख्वाह (अ.फा.), विरोध करण्याची इच्छा करणारा.
उदुलहुकुम (अ.), आज्ञा भंग करणारा.
उमदगी (फा.), थोरवी, मातब्बरी, चांगुलपण.

क

कजाकी (तु.), गनिमी काव्याची लढाई. कजागः साहसी स्मृतः (रा. व्य. को.)
कजिया (अ.), तंटा, वाद, प्रकरण.
कदरदान (फा.), गुणग्राहक, पारखी.
कदीम (अ.), जुना, पुरातन. पुरातनं कदीम स्यात् (रा. व्य. को).
कबज (अ.), पावती, पोच. कबज देयपत्रं स्यात् (रा. व्य. को.)
कबीला (अ.), कुटुंब, बायकामुलें, परिवार, कुटुंबं कबीला भवेत् (रा. व्य. को.)
करीबी (अ.), सामीप्य.
कलमी (फा.), लेखी, लिखित.
कस्द (अ.), हेतु, निश्चय, विचार.
कसीस, कशिश (अ.), ओढ.
कसूर (अ.), अपराध, चूक, हयगय.
कळसपाकी (अ.), पांढऱ्या रंगाच्या कापडावरील एकप्रकारची रंगीत वेलपत्ती असलेलें काम.
काबू (फा.), संधी, कबजा.
काबू (फा.), कक्षा, अटोका.
कायममुकीम (फा.), स्थिर आसन असलेला, दुसऱ्याच्या जागी येणारा.
कायल (अ.), जित, कुंठित, निरुत्तर.
कारचोबी (फा.), जरीचे वेलबुट्टीदार.
कारपरदाज (फा.), कार्यकर्ता, मुत्सद्दी.
कारवाई (फा.), प्रकरण.
कासद (अ.), वार्तावाहक.
काहला (अ.), आजारी.
किता (अ.), चिठ्ठी, विभाग.
किफायत (अ.), नफा, फायदा, लाभ.
कियाफा (अ.), साम्य, मुद्रा, पद्धत, रीत.

किलत (अ.), उणीव, कमीपणा.

किस्त (अ.), कर्जफेडीचा हप्ता.

किस्ती (फा.), होडी, नौका.

किसा (अ.), गोष्ट, तंटा.

किलदकार, क्लीदकार (फा.), सूत्रचालक, मुख्य किल्लचा हातीं असलेला.

कुन्हा (अ.), मर्म, खोच, दोष.

कुमक (तु.), मदत, उपराळा करणारी सैन्याची तुकडी.

कुमनदान (कमांडरचा अपभ्रंश), फौजेचा मुख्य.

कुसंबी (म.), कुसुंब्याच्या रंगाचें (पागोटें, पदर इ.).

कुरसीनिसीन (फा.), खुर्चीवर, आसनावर बसणारा अधिकारी.

कूच (फा.), प्रयाण, निघणें, मजल, कांहीं, क्षुल्लक.

कोतेअंदेसी (फा.), अदूरदृष्टी.

ख.

खजानेपुर (फा.), ज्याची गंगाजळी अखंड भरलेली आहे असा.

खत (अ.), पत्र, रोखा, प्रमाण.

खबर रसाई (अ. फा.), बातम्या पोंहोचवणें.

खलअत (अ.), मानाचा पोषाख.

खललअंदाज (अ. फा.), व्यत्यय, बिघाड करणारा.

खलामला (अ.), स्नेह, खरें प्रेम.

खलेल, खलल (अ.), व्यत्यय.

खवासी (अ.), हत्तीवरील अंबारींत खाश्याच्या मागें बसण्याची मानाची जागा.

खसूस (अ.), विशिष्टपणें, खास प्रकारें.

खादम (अ.), सेवक, भक्त.

खानजाद (फा.), घरीं वाढलेला, जन्मलेला.

खानजादी (फा.), मुलासारखें मानणें.

खानाजंगी (फा.), गृहकलह.

खानेनसीन (फा.), घरींच बसलेले, निवृत्त.

खामखा (फा.), कांहीं झालें तरी, निश्चयें, विनाकारण.

खारिज (अ.), बाहेर, हद्दपार, उडतउडत.

खालसा (अ.), जागीर किंवा इनाम नसलेली, जप्त केलेली.

खावंद (फा.), स्वामी. खावन्दस्त्वधिपोभवेत् (रा. व्य. को.)

खासगत (अ.), स्वतः करिता राखलेली.

खिजमतगार (फा.), सेवक, परिचारक.

खिताब (अ.), पदवी.

खिदमत (अ.), सेवा.

खियाल (अ.), विचार.

खिलअत (अ.), सन्मानाचा पोषाख. खिलाताः स्याद्देयवस्त्रम् (रा. व्य. को.).

खिलबत (अ.), एकान्तांत केलेलें भाषण.

खिसारा (अ.), नुकसान, कारवाई, फसवणूक.

खुजस्ते बुन्याद (फा.), मुसलमानी राजवटींतलें औरंगाबाद शहराचें नांव, भाग्यशाली गोष्टींचा पाया असलेलें ठिकाण.

खुदपसंद (फा.), स्वच्छंदी.

खुदबदौलत (फा.), राजाचे संबोधन

खुदावंद (फा.), प्रभु, स्वामी.

खुफिया (अ.), गुप्तपणें, अंतस्थ.

खुर्दसाल (फा.), अल्पवयी, लहान.

खुषनुमा (फा.), सुंदर, उचित.

खोन (फा.), झाकण्याचें टोपलें, शिप्तर, झाकलेलें ताट.

खोनखासा (फा.), झांकून पाठवलेला विशेष खाद्यपदार्थ.

खौफ (अ.), भीती.

ग

गरूर (अ.), प्रौढी, घमेंड, गर्व.
गलबा (अ.), धामधूम, बहुसंख्य.
गालब, गालिब (अ.), वरचढ.
गिर्दनवाह (अ. फा.), भोंवतालचा प्रदेश.
गिन्हे घालणें (फा.), गांठ घालणें, तेढ उत्पन्न करणें, तीन अंगुलाची लांबी.
गिरफ्तार (फा.), बद्ध, बंदी, निमग्न.
गिरानी (फा.), महागाई, जेरी.
गुजरणें (फा.), जाणें, लोटणें, ओढवणें.
गुजराणणें (फा.), प्रविष्ट करणें.
गुजास्त (फा.), सोपवणूक.
गुल (फा.), वातीच्या टोकाला जमलेली काजळाची गोळी, फूल.
गोटगस्ती (फा.), शिबिराभोवतीं पाहरा करणें.
गोसेनिसीन (फा.), एकांतवासी.

घ

घासदाणा (सं.), सैन्याला गवत व दाणा पुरविण्यासाठीं लावलेला कर. राजाराम-काळीं हा उत्पन्न केला. नागपूरकर भोंसल्याकडे हा वसूल करण्याचें काम असे. हा साधारणपणें वीस टक्के असे.

च

च्याहारूम (फा.), चवथाई.
चुनंदी, चुनंदा (फा.), निवडलेले, चांचणी केलेले.
चोटपेट (म.), चटापट, झटापट.

ज

ज्याफत (अ.), मेजवानी.
ज्यारी (अ.), चालू, सुरूं.
जखीरा (अ.), कोठार, सांठा, संचय.
जंगजदल (फा.), लढाई, युद्ध, धुमश्चक्री.
जंगी (फा.), युद्धविषयक, भयंकर.
जनाब (अ.), (सन्मानार्थी संबोधन.)
जमानसाज (फा.), प्रसंग पाहून कार्य साधाणारा, कालदर्शी.
जमियत (अ.), सैन्य, लष्कर.
जमीर (अ.), सदसद्विवेकबुद्धि.
जमीर मुबारक (अ.), शुद्ध विवेकबुद्धि.
जरदार (फा.), श्रीमंत, धनाढ्य.
जरबेत (अ.), धाकांत ठेवणें.
जरीदा (अ.), माहितीपत्र (सरकारी); सडा, एकटा. एकाकीतु जरीदास्यात् (रा. व्य. को.).
जरुरियात (अ.), आवश्यक वस्तु.
जवान (फा.), तरुण मनुष्य, शिपाई.
जवाब (अ.), उत्तर, प्रत्युत्तर.
जवाब बा सवाब (अ.), प्रश्नोत्तर.
जहनसीन (फा.), मेंदूत अथवा स्मृतिपटावर आरूढ.
केले जाईल. शृत होये. हैदर नायेकाकडून पाचच्यार हाती व दाहापाच लक्ष रुपये खडनीचा यैवज येणार यैसी वदता आहे. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते लेखन केले जाईल. शृत होये. छ २९ माहे शाबानचे आज्ञापत्र व छ १७ माहे शाबानचा ज्यवाबी इनायेतनामा सादर केला. इनायेतनामा व आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे रवाना केले ते छ ९ माहे मा।री पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे इनायेतनामे व आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. सेवकाचे जागिरीस श्रीमताकडील खानदेशचे सुभेदार व गनेशपंत बेहेरे वगैर उपद्रव देऊन मनमानेतो यैवज घेतला. येविशई येथील कारभाऱ्यास इनायेतनामे सादर जाले पाहिजेत की यैवज घेतला असेल तो माघारा देवणे, म्हणौन विनंतीपत्र पहिले लिहिले होते. त्याचे उतर आज्ञापत्री सादर जाले की रा।। कृष्णरावजी येथे येतील, त्यास निक्षून सागू. मग तेथे इनायेतनामे कोन्हाचे नावे पाठवावे म्हणौन लिहिणे. त्यास रावजी तेथे पावलियावर माझे साहित्यास निक्षून सागावे की ज्यानी यैवज घेतला असेल त्याजकडून देवणे. हरयेकविशई साहित्य करीत जाणे म्हणौन त्यास निक्षून ताकीद व्हावी. दुसरे, येथे नानास व हरीपतास इनायेतनामे सादर जाले पाहिजेत की याचे गावापासून खानदेशचे सुभेदारानी सुभेपटी व दहकपटी वगैर मिलून यैवज घेतला आहे व गनेशपंत बेहेरे वगैर यानी घासदाना म्हणौन यैवज घेतला आहे. नाना प्रकारे उपद्रव करितात व हर को

पुरवनी २

न्ही सरदार जातात येतात, ते उपद्रव देऊन यैवज घेतात. त्यास खानदेशचे सुभेदार व गनेशपंत वगैर यानी यैवज घेतला आहे तो माघारा देवणे. व हरयेकविशई याचे साहित्य करीत जाणे. या अनवये उभयेता कारभाऱ्यास दोन इनायेतनामे व स्वामीचे पत्रे सादर होऊन आली पाहिजेत. सर्व प्रकारे माझा अभिमान व लज्या

स्वामीस आहे. सर्वस्वे त्राते स्वामी आहेत. विनंती लिहिल्याप्रमाणे मान्य करून उभता कारभाऱ्यास इनायेतनामे सादर करून पाठविनार स्वामी समर्थ आहेत. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

पै॥ छ २० माहे रमजान सन ११९५ हिजरी रोज रविवार अस्तमान विद्यमान दोरोगे डांकेवर.

A. R. No. 103 १७ रमजान ११९५ हिजरी

६ सप्टेंबर १७८१

पै॥ छ २४ रमजान गुरुवार अस्तमानी दारोग्याचे विद्यमाने डाकेबराबर आलें ते पावले सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरी. येथील वर्तमान तां छ १७ रमजान भाद्रपद वद्य चतुर्थी गुरुवासरपर्यंत मो॥ पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष पूर्वी छ १३ माहे म॥रीं डांकेवर हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र पाठविलें तें सेवेसी पाऊन इकडील वर्तमान हुजूर व आपल्यास श्रुत जाहलें असेल. सांप्रत प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान हुजूर व स्वामीचे सेवेसी पृथक पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून सेवेसी श्रुत होईल. सुरापूरकर बेरडानीं वकीलाचे विद्यमानें पंतप्रधानांचे कारभाऱ्यांसीं स्नेहाचा सिलसिला लाऊन पंतप्रधानाचा आश्रय संपादावा हे योजना केली आहे. याचा तपसील चिरजीव राजश्री रघोतमराव यांस लिहिला आहे. ते स्वामीचे सेवेसी विनती करतील व आपले आज्ञेप्रमाणें हुजूर अर्ज करतील. राजश्री कृष्टणरावजी माढेंपर्यंत गेल्याचें वर्तमान येथें आलें. सत्वरच शहरास पावतील. बहुत काय लिहिणें, हे विनती.

पै।। छ २४ रमजान सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इ।। छ १३ रमजान लगायत छ १७ माहे म।।र सन ११९५ हिजरी गुरुवार भाद्रपद वद्य.

कलकत्याहून सेवकराम वकीलाचीं पत्रें आलीं. त्याचा म।।र कासीस कलकत्याहून चोवीस जाहाजें तोहफजात व पारचे व नख्त व जवाहीर व जंगी सरजामसुधा रवाना जाहली व बाद बरसात कलकत्याहून मातबर सरदार व कांहीं पलटणें कासीस येणार. याप्रमाणें व हैदर नाईक व माहदाजी सिंदे याजकडील वर्तमान व गणेशपंत बहिरे व कोंकणांतील खबर, याविंतरिक्त अवांतर वर्तमानासहित पूर्वी हुजूर अखबार व पत्रें पाठविलीं. तें हुजूर व सेवेसी पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्यानंतर प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलें आहे.

करनल गाडर सुरतेहून मुंबईस आला म्हणोन लोकांचे जुबानी चर्चा. परंतु पंतप्रधानांचे मुतसद्यांचे जुबानीं यैकिलें कीं गाडर अद्यापि सुरतेंत आहे. व पूर्वी पलटणें होतीं त्यापैकीं दोनतीन पलटणें चिनापटणवाले इंगरेजांचे मदतीस गेलीं आहेंत. दोनतीन पलटणें कल्याणींत व पनवेलीस आहेंत. या वर्षीं मुंबईकडून इंगरेजांचा हंगामा होणार नांहीं. याप्रमाणें येथील कारभाऱ्यांचे कयासाचें यैकिलें वर्तमान लिहिलें असे. बाजारी लोकांचे जुबानीं चर्चा गाडर मुंबईस येऊन तेथोन कल्याणीस आला आहे. कलमी खबर नांहीं.

करनल कूट जमियतसुधां चिनापटणीं व हैदरअलीखान च्यार कोस्याचे फासल्यानें आहे. इंगरेजांची चौकी दोन कोसावर आहे. खान म।।राचे लोक तलाव्यास जात आहेत. परंतु जुरअत करून इंगरेजांचे चौकीवर जात नांहींत. याप्रमाणें खारिज यैकिलें वर्तमान लिहिलें असे.

माहदाजी सिंदे काळाबाग कालीसिंद नदीसमीप आहेत व इंगरेजांचीं पलटणें दाहाबारा कोस्याचे फासल्यानें सिपरीकोलारसा-समीप आहेंत. सिंद्यांची फौज आठ हजारपर्यंत सिपरीकोलारसा-हून आठ कोसी इंगरेजांचें गिर्दनवाह आहे याप्रमाणें सिद्याकडील वकीलांचे जुबानी यैकिलें.

हरीपंत फडके यांची प्रकृती सांप्रत कांहीं स्वस्थ आहे. परंतु दरबारास येत नांहींत. व च्यार दिवस स्वस्थता व च्यार दिवस काहली प्रकृती असती. औषधी उपाय व दैवी प्रयत्न करीत आहेत.

अमृतराव पेंठे, त्र्यंबकराव मामाचे नातू, श्रीदेवी दर्शनाकरितां जोगाईचे आंब्यास जाणार. प्रस्थान केलें. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. प्रस्तुत अमृतराव छ १५ माहे म।।रीं स्वार होऊन श्रीदेवी दर्शनाकरितां जोगाईचे आंब्यास गेले. समागमें दीडसेदोनसे-पर्यंत स्व(ार) आहेत.

———

पै।। छ २४ रमजान सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

२

पुरवणी अखबार छ १७ रमजान सन ११९५ हिजरी.

पुण्यांत पंतप्रधानांचे कारभारी हरयेक पुरा व पेंठेंत खानसुमारी करीत आहेत. याचें प्रयोजन मातबर सराफ व व्यवसाई लोकापासीं कांहीं रुपये पटी करून घ्यावी म्हणोन यैकिलें. रो। गोविंदराव कृष्टण यांनीं नवरात्राचै उत्साहास बारामतीस जावयाकरितां छ म।।रीं राजश्री नाना व हरीपंत व श्रीमंत पंतप्रधान स्वामीचा निरोप घेतला. छ १८ शुक्रवारीं स्वार होऊन जाणार. परंतु राजश्री रावजीचे स्त्रीस यत्किंचित ज्वरांस उत्पन्न जाहला आहे. यास्तव उदईक जातील किंवा न जातील याचा संशय आहे. सेवेसी श्रुत होय, हे विनती.

———

A. R. No. 104 (पो.ता.) २४ रमजान ११९५ हिजरी
१३ सप्टेंबर १७८१

पै।। छ २४ रोा गुरुवार सांइकाल माहे रमजान सन ११९५.

श्रीशंकर

विज्ञापना यैसी जे मौजे भालगाव प्रोा राताजने हा गाव सेवकाचे नि।। आहे. तेथील पाटील वणजारे मवासा करून पैका देत नवते. गतवर्सी तेथील पाटलाणे नरसिगराव आणून खूल केले म्हणौन येथून श्रीमंताच्या फौजा गेल्या. त्याजवरून खूल व गावातील पाटील पलून गेला. श्रीमंताच्या फौजेने गाव पाडून मिसमार केला. गांव उज्याड जाला म्हणौन बलवंतरावजीस गावची उस्तवारी करावयासी पाठविले. हे तेथे गेले. गाव उज्याड पाडून टाकला होता. दोनच्यारसे रुपये लाऊन पुन्हा गाव बाधला. रयेतीस व पाटलास कौल देऊन गावास आणिले. ज्या पाटलाणी खूल आणिले व भाऊबंदाचा मारा केला ते बाहेरच आहेत. वेडोजी पाटील वगैर बलवंतरायाजवल होते. त्याजकडे बाकीचा पैका येणे होता. येविशई बलवंतरावजीणे त्या पाटलास तगादा केला की तुम्हाकडे गावचा पैका लागला आहे. तो देणे. त्याजवरून त्या पाटलाणे शे पणास रुपये दिल्हे. बाकी त्याजकडे येणे. यैसे आसता तो पाटील पलून गेला. बाहीर जाऊन से पणास मणुश मेलऊन रात्रौ गावात आला. बलवंतराव जेथे उतरले होते तेथे चालोण आले. मागेपुढे न पाहाता बलवंतरावजीस गोल्या मारून ठार केले. घोडी व वस्तभाव वगैर सर्व लुटली. ठाणे गावचे बलाऊन बसले. ब्राम्हणास मारून यैसा अनर्थ वेडोजी प।। व दशरथ प।। वगैर याणी केला. यैसा घात पाटलाणे केला. त्यास सर्व प्रकारे ब्राम्हणाचा अभिमान धरून पाटलाचे पारपत्याविशई व गावचे पारपत्याविशई इनायेतनामे नवाब तहिवरज्यंग बहादर व जोरावरजग बहादर व कल्याणराव व नलदुरुगवाल्यास व जिवाजी खतालकाटी मारडीकर यास सादर जाले पाहिजे की मौजे मजकूरचे

पाटील जेथे सापडतील तेथे मारावे व गावावर श्वारी करून पाटील धरून मारून टाकावे. व गावचे पारपत्य करून मिसमार करावे याप्रो इनायेतनामे सत्वर सादर जाले पाहिजेत की सत्वर पाटलाचे पारपत्य होये. सत्वर इनायेतनामे आल्याणे पाटलाचे पारपत्य होईल व गावचेही ठाणे सेवकाचे हास्तगत होईल, यैसे आहे. या अर्थी विनंती मान्य करून लिहिल्याप्रो इनायेतनामे सादर करणार श्वामी समर्थ आहेत. पाटील मवास त्याचे पारपत्य आगत्य जाले पाहिजे. सर्व प्रकारे आपण ब्राम्हणाची कासी आहेत. अभिमान धरून साहित्याविशई सरदारास इनायेतनामे आले पाहिजेत हे विज्ञाप्ती.

A. R. No. 105 १८ रमजान ११९५ हिजरी

७ सप्टेंबर १७८१

पै।। छ २४ रो गुरुवार साइंकाल माहे रमजान संन ११९५ हिजरी डांकेवर मै दारोगे.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे. येथील कुशल त।। छ १८ माहे रमजान मु।। पुणे श्वामीचे कृपावलोकणकरून येथास्तित जाणौन श्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ १३ माहे मजकूर रोज रविवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पावोण सविस्तर वर्तमान ध्याणास आले असेल. तदणंतर येथील वर्तमान हैदर नाइकाकडून वर्तमान आले की, नाईक म।।र यासी व इंग्रजासी लढाई जाली. इंग्रज काहीयक सिकस्त होऊन चिनापटणाकडे गेले. त्याचे पाठीमागे हैदर नाईकही चिनापटणाकडे गेले. यैसे वर्तमान आले आहे. त्याजवरून

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

नाइक म।।र याजकडील वकीलासी व कारभाऱ्यासी खिलवत जाला. नाईक मजकूर यास पत्रे लिहिणार. प्रस्तुत नाईक मजकूर चिनापटणाकडे गेले. यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होये. राजश्री मुधोजी भोसले याजकडील पत्रे कारभाऱ्यास आली. पत्रे बहुत स्नेहेवादाची होती. याणीही त्याची उतरे बहुत स्नेहाची कारभाऱ्याणी लिहिली. प्रस्तुत भोसल्यासी व इंग्रजासी सलूकाचा प्रकार आहे. त्याजवरून भोसल्याचा संशये कारभाऱ्यास आहे. बाहचातकारे उभये पक्षी बहुतच स्नहाची पत्रे लिहितात. श्रुत होये. दरबार वगैर जाल होता. श्रुत होये. छ १४ रोज सोमवार करनेल गाडर इंग्रज ममईस आहे व पलटणे वगैर कल्याणीस आहेत. प्रस्तुत वर्तमान आहे की, संपूर्ण इंग्रजाचा ज्यमाव कल्याणीस जाला आहे. येकदोन पलटण कल्याणीहून दोनतीन कोस पुढे आले. सत्वरच उद्वोग इकडे करणार. यैसी वदंता आहे. श्रुत होये. श्रीमंत राजेश्री दादासाहेब याची समजूती इंग्रजाणी करून सुरतेस आणिले. हे वर्तमान येकदोन विनंतीपत्री लेखण केले होते. त्याजवरून ध्याणास आले असेल. प्रस्तुत वर्तमान आहे की दाहा हाजार फौज दादासाहेबाणी ठेवावी. पैका इंग्रजाणी द्यावा. त्यास दादासाहेब फौज धरितात. कोणी कोन्ही लोक सिलेदार वगैर येकट दुकट चोरीन जातात. यैसे वर्तमान आहे. दादासाहेब याणी दाहा हाजार फौज ठेऊन व फतेसिंग गायेकवाड दाहापधरा हाजार फौजेनसी ददा साहेबाकडे येऊन उभयेता येकत्र होऊन कोडाईबारीकडे उद्वोग करनार यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. सिंद्यासी व इंग्रजासी लढाई आहे. प्रस्तुत वर्तमान आहे की सिंदे दाहावीस कोस माघारा आले. यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास लेखण केले जाईल. श्रुत होये. छ १५ रोज मंगलवार ममईची बातमी यास येत नाही. म्हणौन काहीयेक येत्न करून ममईस कारकूण बातमीस पाठवावा, त्यास चिंतामण दीक्षित सावकार याची दुकान ममईस आहे त्याचा कारकूण म्हणौन यैसा बहाणा करून

कारकून बातमी ल्याहावयास पाठवावा. यैसी यौज्यणा केली आह परंतु कारकून कोन्ही जावयास नेटत नाही. कोन्ही गेल्यास लेखण केले जाईल. श्रुत होये. निर्मलेस वलीमहमद बक्षी वगैर याणी पहिले फितूर केला होता. त्याचे पारपत्य बहादुर मरहूम याचे पुत्राणी केले. प्रस्तुत वर्तमान आहे की वली म।। बक्षी वगैर याच भाऊबंदाणी सिबंदीत फितूर करून बहादुर मजकूर याचे पुत्रावर चालून गेले. लढाई जाली. बहादुर मरहूम याचे पुत्रास दगा जाला यैसी वदंता विशेष आहे. मागती तहकीक वर्तमान आलियास लेखण केले जाईल श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलुकी कामकाज जाले. श्रुत होये. छ १६ रोज बुधवार दिल्ली-हून वकीलाणी आखबार पाठविली. वर्तमान यैकिल्यात आले की नजीबखान याणी फौजेचा ज्यमाव विशेष केला आहे. इंग्रजाचे काही त्याणे पारपत्य केले. याजकडील कोणी सरदार मातःबर फौजेनसी यावा. यैसी इछा नजीबखानाची आहे की येकत्र होऊन इंग्रज वगैरचे पारपत्य करावे. याजकडील सिंद्याणी जावे. तो ते शहयास गुतले आहे. मग याजकडील कोन जातो. प्रस्तुत नजीबखानाजवल व पातशाजवल फौजेचा ज्यमाव विशेष आहे. यैसी आखबारचे वर्तमान यैकिल्यात आले. श्रुत होये. राजेश्री हरीपंताचे पोटात शुळाची वेथा जाली आहे. म्हणौन दरबारात फारसे जात नाहीत. म्हणौन राजश्री नाना हरीपंताचे घरी आले होते. उभयेताचा खिलवत जाला. खिलवताचा भाव पुढे श्वारीचा उद्वौग व दौलतीचा बंदोबस्त या अनवये खिलवतीचा भाव यैकिल्यात आला. श्रुत होये. छ १७ रोज गुरुवार तमाम सरदारास व सिले-दारास वगैर लोकास पत्रे पाठविली की दसऱ्यास फौजेसहित जमा होणे. यैसी पत्रे गेली आहेत. दसऱ्यास लोकही जमा होतील. दसऱ्याचे मोहूर्त डेरेही बाहिर करनार. यैसी वदंता आहे. श्रुत होये. राजश्री बाबूराव वैद्य होलकराचे सिष्टाईस अहिल्याबाई-कडे गेले होते ते आले. हे वर्तमान पूर्वी विनंतीपत्री लेखण केले होते, त्याजवरून ध्याणास आले असेल. बाबूरावजीचा व

कारभाऱ्याचा खिलवत जाला. खिलवताचा भाव होलकरासी व अहिल्याबाईसी सफाई वकील मजकूर करून आले. या अनवये जाला यैसे अैकिल्यात आले श्रुत होये. राजश्री नाना फडनीस बहुत करून येकांतास फार असतात. कितीक दरबारचे ग्रहस्ताचे आठआठ दिवस दर्शण होत नाही. पाचच्यार आसाम्या खिलवतीच्या आहेत त्याचेंच मात्र दर्शन व भाशण होत आसते. श्रुत होये. राजश्री कृष्णरावजी तुलज्यापुरापावतो गेले. यैसे वर्तमान आहे. सत्वरच हुजूरात पोहचणार. श्रुत होये. श्रीमंत वाडचात घोडी वगैर फिरवीत असतात व तीरंदाजी करीत असतात. विदित होये. पुढे जे प्रसगाचें वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ किजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 106

२२ रमजान ११९५ हिजरी
११ सप्टेंबर १७८१

प।। छ १ माहे शवाल सन ११९५ हिजरी गुरवार त्रितीये प्रहर मै जोडी सरकार बंा डांक.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सं।। नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान त।। छ २२ रमजान भाद्रपद वद्य नवमी भौमवासरपर्यंत मो। पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष कृपापत्र छ १२ रमजानचें डांकेवर पाठविलें तें छ १९ माहे म।।रीं पाऊन लेखनार्थ मननें करून अपार संतोष जाहला. पूर्वी छ १८ रमजानीं हुजूर अर्जी व आखबारेचा लिफाफा व स्वामीचे

सेवेसी पत्र पाठविलें तों पाऊन इकडील सविस्तारें वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी यैकिलें वर्तमान पृथक पत्रीं लिहिलें आहे अवलोकनोतर विदित होईल. राजश्री कृष्टणरावजीनी शहरास पाऊन हुजूरची मुलाजमत हासल केली असेल. सारांश, हुजूरीहून रावजीवर इनायत व हे फिदवी येकसूं त्या अर्थीं हुजूरीहून पंतप्रधानाची दस्तगिरी व इंगरेजांचे मोहिमेस इमदाद निश्चयरूप होईल याप्रमाणे येथील कारभाऱ्याचा कयास आहे. व कृष्टणरावजी हुजूर पाऊन त्यांजकडील पत्र येण्याची इंतजारी कारभाऱ्यांस फार आहे सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें, हे विनती.

२

पुरवणी अखबार. छ २२ रमजान सन ११९५ हिजरी.

मानाजी फांकडे यांजकडें धोंडोअपा पुरंदरे यांचे विद्यमानें कारपरदाजाचीं पत्रें गेली होती. हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. त्यास मानाजी वेंकार हजन्याजसमीप आहे व प्रत्योतर आलें कीं हरीपंतानी आपले तरफेचा कोण्हीं मातबर ग्रहस्त व कौल करार करून पत्रें पाठवावीं म्हणजे आपण येऊं.

तळेंघोसांळे प्रांती तुगांव म्हणोन कोण्हीं मौजा आहे. तो गांव हबसी यानीं ताख्ततराज केला म्हणोन यैकिलें.

हरीपंताची प्रकृती पूर्ववत कांही अस्वस्थ व स्वस्थ येणेप्रमाणें आहे. दरबारास येत नांहीत.

रो॥ गोविंदराव कृष्टण यानीं बारामतीस जावयाकरितां पंतप्रधान व कारभाऱ्यांची रुखसत घेतली म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. छ १८ माहे माारीं सहकुटुंब बारामतीस गेले. दसऱ्यानंतर पुन्हां पुण्यास येणार. सेवेसी श्रुत होय हे विनती.

पैा॥ छ १ माहे शवाल सन ११९५ हिजरी गुरवार त्रितीये प्रहर मै जोडी डांक सरकार.

———

A. R. No. 107

२३ रमजान ११९५ हिजरी

१२ सप्टेंबर १७८१

पैाा छ १ माहे शवाल सन ११९५ हिजरी रोा गुरवार त्रितीये प्रहर मै जोडी सरकार बाा डांक.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २३ माहे रमजान मुाा पुणे, स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाा. विशष यथील वर्तमान छ १८ माहे माार रोज शुकरवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर यथील वर्तमान हैदर नायेकाकडून पत्रे आली. पत्रे वकील माार यानी कारभाऱ्यास दिल्ही. पत्राचा भावार्थ यैकिल्यात आला की, नाईक माार यासी व इग्रजासी लडाई जाली. परस्परे मणुश फार जाया जाली. नाईक माार अरकाटेकडे जाऊन चिनापटनाकडे गेले. यैसे वर्तमान आहे. इग्रजास कलकत्याहून मदत पहिले आली आहे. त्याजवरून इग्रज काहीयेक बाकून आहेत. यैसे वर्तमान आहे. शृत होये. हरीपतास समाधान वाटत नाही. पोट दुखत असते. दरबारास फारसे येत नाहीत. नानाच हरीपताचे घरी जात असतात. खलवत वगैर करीत असतात. शृत होये. राजश्री कृष्णराव तुलजापुरापावेतो पोचले. यैसे वर्तमान आहे. सत्वरच हजुरात दाखल होनार. राव माार यास पराड्यात निबालकराचे येथे मेजमानी जाली. मेजमानी होऊन तुलजापुरापावेतो पोहचले. तुलजापुरास येक दुसरा मुकाम करून कूच करनार. यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री गोविदराव, रावजीचे चिरजीव, बारामतीस कुटुबासहित गेले. कारन आस्विन मासी नवरात्राचा उछव आहे. उछव करून दसरा जालियावर

येनार, शृत होये. करनेल गाडर इग्रज ममईस आहे. पलटने वगैर कल्यानीस आहेत. सरजाम वगैर तयार होतो. लवकरच इकडे उद्वोग करनार. यैसे वर्तमान आहे. ममईस इग्रजानें येक ज्याहाज मातबर जंगी तयार केले आहे. त्याजवर सरजाम वगैर फार घातला आहे. मग त्या ज्याहजासी रवानगी कोन्हीकडे करितात हे वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. सिदे यासी व इग्रजासी लडाई आहे. सिदे कोन्हारसिपरीजवल आहेत. सिद्याची काही-येक फौज छावनीस गेली होती. मागती ते फौज सिद्याकडे गेली यैसे वर्तमान आहे. सिद्यासी व इग्रजासी लडाई सुरू आहे यैसे वर्तमान आहे. शृत होये. होलकर वाफगावास आहेत. फौज वगैर दसऱ्यास जमा करावी म्हणौन होलकरानी तमाम आपले फौजेचे लोकास बोलाऊ पाठविले यैसे वर्तमान आले. शृत होये. कारभाऱ्यानी तमाम सरदारास व सिलेदारास वगैर फौजेचे लोकास पत्रे पाठविली आहेत की दसऱ्यास डेरे वगैर बाहेर होनार, त्यास तुम्ही असावे. फौजेचे लोकानसी तयार होऊन दसऱ्यास येणे. याप्रमाणे सर्वास पत्रे पाठविली. शृत होये. हरीपताचा व नानाचा छ १९ माहे माार रोज शनवारी खिलवत जाला. खिलवत हरी-पताचेच घरी जाला. भाव यैकिल्यात आला की, दसरा जालिया डेरे दाखल होऊन स्वारीचा उद्वोग करावा. कारन की, इग्रजही ममईहून सत्वरच उद्वोग करनार. या अर्थी याचाही विच्यार आहे की, दसऱ्यास डेरे वगैर बाहेर करून मोहर्त करनार. यैसे आहे. निश्चयात आलिया लेखन केले जाईल. शृत होये. हैदर नायेकाची व इग्रजाची लडाई जाली आहे. पत्रेही नाईक माार याची आली आहेत. परंतु, लडाईत नाईक माार याचा नाश फार जाला आहे यैसी पत्राची वदंता आहे. मागती पत्राचा शोध करून लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैर नानाचे वाड्यात होत असतो. माली व मुलकी वगैर काम होत असते. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल, ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ १२ माहे माारचे आज्ञापत्र सादर जाले ते छ १९ माहे माारी

डाकेसमागमे पावले. पावोन संतोश जाला, सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. मौजे भालगाव प्राा राताजन हा गाव सेवकाकडे आहे. तेथील बदोबस्तास राजश्री बलवंतराव यास पाठविले होते. तेथील पाटील वंजारे मोवास त्या पाटलानी से पनास मणुश मेलऊन बलवतराव याचा मारा केला. जिवेच मारले. हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री तपसीलवार लेखन केले आहे. त्याजवरून शृत जाले असेल. ब्राह्मनाचा मारा जाला. येविशई पाटलाचे व गावचे पारपत्य जाले पाहिजे. तर नवाब तहवरज्यग बहादुर व नवाब जोरावरजंग बाहदुर व कल्यानराव तुलजापूरकर व नलदुरगवाले व खताल वगैर यास इनायेतनामे सादर जाले पाहिजेत की, भालगावचे पाटील यानी जागिरदाराचे ठानेदार ब्राह्मन याचा मारा केला आहे. तर पाटील माार गावात असतील अथवा जेथे आसपास असतील तेथे स्वार पाठऊन धरून आणून मारून टाकावे. व गावचे पारपत्य करावे या अनवये इनायेतनामे सादर करनार स्वामी समर्थ आहेत. सर्व प्रकारे ब्राह्मनाचे अभिमानी स्वामी आहेत. साहेता जाली पाहिजे. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

A. R. No. 108

२६ रमजान ११९५ हिजरी

१५ सप्टेंबर १७८१

पौा छ १० शवाल शनवार अस्तमान तैनाती जोडीबराबर पत्र आले सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ २६ रमजान भाद्रपद वद्य त्रयोदसीपर्यंत मो पुणं स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. सेवकाचे तैनाती जासुदांसमागमें छ १२ रमजानचे कृपापत्र पाठविलें, तें छ २५ माहे माारीं पाऊन संतोष जाहला. इकडील

राजकी वर्तमान छ २२ रमजानपर्यंत डांकेवर हुजूर व सेवेसी लिहून पाठविलें. व वरचेवर पत्रें हुजूर व सेवेसी रवाना करितों, त्यावरून श्रुत होईल. राजश्री कृष्टणरावजी शहरास पाऊन हुजूरची मुलाजमत हासल केली आसेल व कांहीं बोलण्याचा सिलसिला लागला आसावा. दोन्ही संस्थानें थोर. हजरत बंदगानआली खुदावंदन्यामत व श्रीमंत पंतप्रधान सत्प्रभू देव ब्राह्मण पोषक. उभयतांची यैक्यता होऊन मध्यस्तांस येश प्राप्त होये तो उपाय स्वामीसमान दूरआंदेसी करतील. राजश्री कृष्टणरावजीस रुखसतेचे समईं येथील कारभाऱ्यानीं सूचना केली कीं हजरत बंदगानआली श्रीमंताचे आहवालावर मुतवजे आहेत. त्या आर्थीं श्रीमंत पंतप्रधानास आनकूळ होऊन इंगरेजांचे व इतर श्रीमंताचे शत्रू त्यांची तंबी मंजूर करून उद्योग करतील. चौथाईचा बंदोबस्त हुजूरचें मर्जीप्रमाणें मार्गानि फैसला करणें कदाचित इंगरेजांची तंबी मंजूर न होय. व चौथाईचा बंदोबस्त मर्जीमुबारकेप्रमाणें करून देणें म्हणोन इरशाद जाहल्यास या समईं खिलाफ मर्जी वर्तणूक करावी इसला नांहीं. यास्तव समयावर दृष्टी देऊन दस्तायैवजी न गुंतता मर्जीप्रमाणें कारभारी वर्तणूक करतील म्हणोन आंगिकार करणें. याप्रमाणें परस्परें भाषण होऊन राव माारनुलेस कारभाऱ्यानी मार्गस्त केलें म्हणोन कोण्हीं मातबर इनेहिताचे मुख यैकिलें वर्तमान हुजूर सेवेसी लिहिलें आसे बहुत काय लिहिणें, हे विनंती.

———

A. R. No. 109

२७ रमजान ११९५ हिजरी
१६ सप्टेंबर १७८१

पैा छ १० माहे शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगे.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान ता छ २७ रमजान भाद्रपद वद्य चतुर्दसी रविवारपर्यंत

मोा पुणें. स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष खांसगत तैनाती जासुदांसमागमें कृपापत्रें दोन, छ १२ रमजानपर्यंत व डांकेवर छ माारचें कृपापत्र पाठविलें. याचें उतर डांकेवर छ २३ रमजानीं पत्रें रवाना केलीं, त्या पत्री व छ २६ माहे माारी खांसगत तैनाती जोडी रवाना केली त्याजसमागमें विनतीपत्र पाठविलें, त्या पत्रीं लिहिलें आहे. छ २३ रमजानची पत्रें डांकेवर रवाना केलीं. तें सेवेसी पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल . सांप्रत येथील आखबार पृथक पत्रावरून सेवेसी श्रुत होईल. हुजूर अर्जी व अखबारेचा लिफा(फा) डांकेवर पाठविला. तो दारोग्याचे विद्यमानें हुजूर गुजरेल. अजीपर्यंत राजश्री कृष्टण-रावजी हुजूर पाऊन मुलाजमत हासल केली असेल. श्रीमंत पंत-प्रधान स्वामीचे संस्थान प्राचीन व थोर व धर्मराज्य हुजूरचे इमदा-दीनें व इनायतेंकरून या राज्याची कायमी व हुजूरचा व यांचा अकृत्रिम स्नेह होऊन ऐक्यतेनें इतर शत्रूचा पराभव करून विशेष दौलत व कीर्ती संपादन होय, याविषईंचा प्रयत्न स्वामीसमान हुजूरचे फिदवी येकनिष्ट व श्रीमंतांचे शुभचिंतक करतील. बहुत काय लिहिणं हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ २३ रमजान लगायत छ २७ माहे माार सन ११९५ हिजरी रविवार.

हैदरअलीखान फौजेसुधां चिनापटणचा शह सोडून कंची आरकाटचे जिल्यांत आला व टिपू नेलूर सरवापलीकडें गेला होता. त्याजवर इंगरेजांचा शबखून पडला व खराबी बहुत जाहली. खान माारानें टिपूस माघारा बोलावून नेलें. करनल गाडर मसलहतीकरितां बडोद्यास फतेसिंग गाइकवाडाकडें गेला व रघुनाथराव सुरतेस आहेत. याविंतरिक्त अवांतर वर्तमानासहित पूर्वी पत्र व अर्जी व अखबार हुजूर पाठविली, त्यावरून वर्तमान कळलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलें वतमान दफेवार लिहिलें आहे.

गाडर इंगरेज बडोद्यास फतेसिंग गाइकवाडासमीप आहे. दसऱ्यानंतर गाइकवाड माारानें दाहा हजार फौजेची निगाहदास्त करून रघुनाथराव यांचे हमराही बाजीराव व सटवाजी भोंसले वगैरेसुधां मोहिमेस निघोन कोंडाईबारीसमीप पंतप्रधानाकडील सरदार गणेशपंत व भापकर वगैरे आहेत, त्यांस सिकस्त व फरारी करून खानदेश प्रांतात मुल्क काबीज करावा याप्रमाणें तजवीज जाहली आहे, म्हणोन खारिज यैकिलें. पंतप्रधानांचे कारपरदाजांचे जुबानीं फतेसिंग गाइकवाडाचे तमानियतेकरितां गाडर बडोद्यास गेला आहे.

सुरतेहून दोन कोसाचे फासल्यानें रघुनाथराव बागेंत उतरले आहेत. येक पलटण जमीयत व दोनतीनसे स्वार राव माारासमीप. सटवाजी भोंसले व बाजीराव बरवे वगैरे सोनगडचे जिल्यांत आहेत. फौजेची निगाहदास्त करितात म्हणोन खारिज यैकिलें. गाडरानें तजवीज केली आहे कीं दसऱ्यानंतर च्यारपांच पलटणें व दाहा हजार स्वार फतेसिंग गाइकवाड वगैरेस सिपरी कोलारसचे इंगरेजांस कुमक पाठऊन माहदाजी सिंद्यास फरारी करावें म्हणोन खारिज यैकिलें.

माहदाजी सिंदे काळाबाग काळीसिंद नदीसमीप आहेत. गोसावी वगैरे फौज सिंदे माराची नरवर प्रांती आहे. सिंदे माारानीं आपल्याकडील मुतसद्यास पुणें प्रांती पाठविलें आहे. व फौजेची निगाहदास्त करीत आहेत म्हणोन येथील कारपरदाजांचे सांगितल्याप्रमाणें पूर्वी लिहिलें होतें, सांप्रत खारिज शोध घेतला. सिंद्याकडील मुतसदी फौजेचे निगाहदास्तीस आला नांहीं व निगाहदास्तीची चर्चा इतर कोण्हांचे मुखं यैकिल्यांत येत नांही. कदीम सिंद्यांकडील लोक दसऱ्यानंतर नालबंदीकरितां सिंद्यासमीप जाणार. नालबंदीचे रुपये नख्त दिधल्यांनंतर सरजाम करून जातील.

पैाा छ १० माहे शवाल संन ११९५ रोज शेनिवार डांकेवर मै दारोगे.

———

२

पुरवणी अखबार पुणें छ २७ रमजान सन ११९५ हिजरी.

कलकत्याहून इंगरेजांचीं जाहाजें कासीस रवाना जाहलीं व कोण्ही सरदार पलटण्यासुधां माघोन येणार म्हणोन पूर्वील पत्रीं माार लिहिला होता. सांप्रत सर्वत्र जनचर्चा व सावकारी वर्तमान कासीहून आलें कीं इष्टैन नामे इंगरेज सातआठ पलटणासुधां कासीस आला. ग्वालेर प्रांती येणार म्हणोन जनवदंता आहे. पंतप्रधानांचे कारपरदाजानीं तजवीज केली आहे कीं बंगाल्यांत गनीमी फौज पाठऊन तो मुलुक ताख्ततराज करावा. पेशज रवानगी फौज कलकतेवाल्यानीं कासीस पलटणें पाठविलीं आहेत. याउपरी पंतप्रधानाकडील फौज कदाचित रवाना होईल. तर ज्या रुखं फौज जाईल त्या रुखावर इंगरेजांची जमीयत सदराह होईल. याप्रमाणें येथील कितेक मातबरानीं कयास केला आहे.

हरीपंत फडक्यांची प्रकृतीं सांप्रत स्वस्थ आहे. दरबारास अद्यापि येत नांहींत.

पंतप्रधानानी तमाम हुजराती वगैरे स्वार व सरदारांस पुण्यांस येणें म्हणोन पत्रें पाठविलीं आहेंत. अद्यापि कोण्हीं लोक आले नांहीत. व मालोजी घोरपडे व पाटणकर वगैरे पुण्यांत छावणीस जे राहिले त्यांस सालझाडचा बाा बाकी तलब पाऊन त्यांची समजावीस अद्यापि जाहली नांही. कोंकणांत तळेघोसांळे प्रांती हबसी यांचा हंगाम पूर्ववत आहे. त्याच बंदोबस्त होता दिसत नांही.

या उपरी जे नवल विशेष वर्तमान होईल तें सेवेसी विनती लिहीन हे विनती.

पै।। छ १० माहे शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगे.

श्रीनिवास

पुा श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी विनती जे मौजे मुधळवाडी पाा पैठण येथील शाकभाजी पूर्वापार पैठणास विकावयास येत आहे. सांप्रत पैठणकर कितेक दुष्ट लबाड जमीदार

यांचे सांगितल्यावरून तेथील आमिल मुधोळवाडीकरास म्हणतो कीं कांहीं नजर देणें. म्हणजे पटी देणें. न द्याल तरी पैठणास शाकभाजीचे विकरीस न येणें. त्यास पूर्वापार मामूल नसतां नवीन बाबत काढून गांवकरास उपद्रव देतात. याचप्रमाणें फर्मायेसी वगैरेचाही उपद्रव फार लागतो. येविषईं औरंगाबादचे सुब्यास प्रखर ताकीद व पैठणकर खंडेराव केशव वगैरेस स्वामीचें पत्र प्रखर आलियां उपयोगी पडेल हे विनंती.

पाा छ १० माहे शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगा.

A. R. No. 110

२८ रमजान ११९५ हिजरी
१७ सप्टेंबर १७८१

पाा छ ५ शवाल सन ११९५ हिजरी सरकारच्या डाकेबराबर आले ते दारोग्याचे विद्यमाने पावले.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ २८ माहे रमजान मुाा पुणे. स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाा विशष. यथील वर्तमान छ २३ माहे माार रोज बुधवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनतर यथील वर्तमान राा चितो विठ (ल) याचे कारकून मावळात पळून जाऊन लपून होते. त्याजकडे लाख दोन लक्ष रुपयाची ठेवी आहे म्हणौन चितोपताचा पुतन्या फिरयाद जाला. म्हणौन नानानी त्या कारकुनास धरावयास कारकून व गारदी पाठविले होते. त्या कारकुनाचा शोध लागला. त्यास आणून चितोपताचे द्रव्य लक्ष दोन लक्ष

रुपये त्याजपासी आहे, ते घेणार. शृत होये. दिलीहून वकीलाची अखबार आली. वर्तमान लिहिले होते की पातशाहा व नजीबखान येकत्र होऊन फौज्यसहित बाहेर निघनार, कारण की, इग्रजाचे पारपत्य व्हावे. प्रस्तुत नजीबखान वगैर याजपासी फौजेचा ज्यमाव विशेष आहे. दुसरे लिहिले होते की, नजीबखानाचे मानस आहे की सिंद्याणी इकडे यावे. आणिक कितीयेक आखबारी वर्तमान लिहिले होते. श्रुत हाये. छ २४ रोज गुरुवार सुवर्णदुर्गास पहिले इग्रजाचे ज्याहाज सवदागरी सापडले होते. त्याजवर चौ लक्षाचा किरानबाब वगैर माल सापडला. त्यास येथील सावकारापासून बलेच रुपये घेऊन त्या ज्याहाजावर माल जो सापडला तो सावकारास द्या म्हणतात. येविशई सावकार रदबदली करितात. परंतु बलेच त्याचे पदरी माल घालणार. श्रुत होये. पुण्यात सर्वत्रावर घरपटी केली आहे. घराची किमत करून पाच व साहावा हिसा घ्यावा, यैसी वदंता आहे. मग काये निश्चये होऊन घेतील ते सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होये. मामलतदार व कमाविसदार वगैर मिलाले आहेत. मागील फडचे होऊन पुढील मामलतीच्या रसदा घेऊन मांमलती सागणार श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. श्रुत होये छ २५ रोज शुक्रवार. राजश्री हरीपंतास पोटदुखीची वेथा निर्मान जाली आहे म्हणून ते घरातच बसतात. दरबारास येत नाहीत व बाहेर निघत नाहीत. नानाचे हारीपंताचे घरी येका दो दिवसा येतस्तात व खलवत करितात. मागती नाना आपले घरी जातात नानाही फारसा दरबार करीत नाहीत. येकांतासच आसतात. दरबारचे लोक मुतसदी वगैर बाहेर बसतात. च्यारच्यार पाचपाच रोज नानाचे दर्शण होत नाही. पाचच्यार आसाम्या खलवतीच्या मात्र आहेत, त्या जातस्त्यात. वरकडाचे दर्शण होत नाही सिलेदार वगैर लोकाचाही देण्याचा गौगवा विशेष. तमाम लोकास पत्रे सिलेदार वगैर यास लिहिले आहे की दसऱ्यास डेरे बाहेर होणार. सत्वर जमा व्हावे. परंतु लोक देण्याघेण्यामुळे आजुर्दा आहेत. त्यामधे नानाचे दर्शणही कोन्हास होत नाही यैसे आहे. श्रुत होये.

हरीपंतास महिना पधरा दिवस पोटदुखीची वेथा लागली आहे. औशधी उपाये करितात. परंतु गुनास येत नाही. वदंता आहे की सकारपूर्वक वृधाची बाधा जाली आहे. च्यईण पडू देत नाही. यामुळे पचवीसतीस ब्राम्हण आणुष्टाणास घातले आहेत यैसी वंदंता यैकिल्यात आली आहे. श्रुत होये. प्रज्यन्न्याची दोनतीन महिने आखाडी पडली होती. प्रस्तुत तीनच्यार रोज प्रज्यन्याचा वर्शाव चागला जाला. श्रुत होये. छ २६ रोज शनवार करनेल गाडर ममईस आहे व पलटणे वगैर कल्याणीस आहेत. वदंता आहे की गाडर मजकूर कल्याणीस आल्यानंतर इकडे बोरघाटाकडे कूच करणार यैसी वदंता आहे. परतु श्रीमंत राजश्री दादासाहेब वगैर हे ज्यमाव करून कोडाईबारीकडे गडबड करणार यैसे वर्तमान विशेष आहे. श्रुत होये. विज्ययादशमीस नाना डेऱ्यादाखलं होणार यैसी वदंता आहे. निश्चये जाल्यास लेखण केले जाईल. श्रुत होये. हैदर नाईक आरकाटेस बंदोबस्त करून आहे. पुढे चिनापटणाकडे जाणार. इग्रजाचाही चिनापटणाजवल ज्यमाव विशेष आहे यैसे वर्तमान आहे. तिकडील लढाईचे वर्तमान आलियास सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होये. छ २७ रोज रविवार हिंदुस्तानप्रांती सिद्यासी व इंग्रजासी लढाई आहे. परंतु इंग्रजाचा ज्यमाव विशेष यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. सुरापूरकर सवस्थाणिक येथे येणार हे पूर्वी आक्षरशाहा लेखण केले होते. त्याजवरून ध्याणास आले आसेल. त्यास सुरापूरकर सवस्थाणिक येथून येकादा मजलीवर आले आहेत. येथे दाखल होणार. दाखल जाल्यास लेखण केले जाईल श्रुत होये. ममईची बातमी यास येत नाही. तेथे कारकून पाठवावयाची यौज्यणा केली होती. कारकून कोन्ही इंग्रजाचे दहशदीमुळे जाईना हे पूर्वी लेखण केले होते. चितामण दीक्षित सावकार याची दुकाण ममईस आहे. त्याचा कारकून यैसा बाहाणा करून याणी आपला कारकून बातमी ल्याहावयास पाठविला आहे. तेथील बातमी येणे कठीणच यैसे आहे. श्रुत होये. राजश्री कृष्णरावजी येकादो दिवसात हजुरात दाखल होणार, पोहोचले असतील अथवा

पोहोचतील. श्रुत होये. प्रस्तुत येथे प्रसंग आहे की दसऱ्यास डेरे वगैर बाहेर करून, दाखल होऊन फौज वगैर जमा करावी. इंग्रजाचे पारपत्यास कोकण प्रांती व कोडाईबारीकडे फौजा रवाणा कराव्या. नानाणी वगैर डेऱ्यादाखल आसावे यैसी काही यौज्यणा करितात. मग काये निश्चयात येऊन ठैरल हे लेखण केले जाईल. श्रुत होये. होलकर वाफगावी आहेत. तेही दसऱ्यास आपली फौज वगैर जमा करणार यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 111

१ शवाल ११९५ हिजरी

२० सप्टेंबर १७८१

पैा छ ५ शवाल सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

अखबार* पुणं अज इा छ २८ रमजान लगायत छ १ शवाल सन ११९५ हिजरी आश्विनं गुरुवार.

करनल गाडर सुरतेहून बडोद्यास फतेसिंग गाइकवाडासमीप सलाहमसलतीकरितां गेला आहे व रघुनाथराव सुरतेसमीप बागांत उतरले. व सटवाजी भोंसले व बाजीराव बरवे वगैरे सोनगड प्रांती फौजेचे निगाहदास्तीकरितां आले आहेत. मिस्तर हिस्तैन गोरनर कलकतेवाला पांचसाहा पलटणासुधां कलकत्याहून कासीस आला. व माहदाजी सिंदे काळाबाग कालीसिंद नदीसमीप आहेत. हैदरअलीखान आरकाट कंचीचे माबैन व जनराल कूट चिनापटणाहून पांचसात कोसावर जमीयतसुधां खान माराचे मुकाबिल्याचे दाइयानें मुस्तैद जंग आहे. या-

* प्रस्तुत अखबारच्या पुरवण्या २ व ३ क्र. नं. ११२ खालीं पहावयास सांपडतील. हा प्रमाद अखबारनवीसानें अखबारचीं वेगवेगळीं पानें मागेंपुढें पाठविल्यामुळे घडलेला आहे.

वितरिक्त आवांतर वर्तमानासहित पूर्वी अखबार हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी कारपरदाजांचे जुबानीं व खारिज यैकिलें व प्रत्यक्ष पाहिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

गोरनर जनरल इमादुदौला मिस्तर हिस्तैन बहादर जलादतजंग कलकत्याहून कासीस आला म्हणोन पूर्वी वर्तमान लिहिलें आहे. सांप्रत बाळाजीपंत बुंदेले निाा पंतप्रधान सांगरांत आहेत. त्यांची पत्रें सतावीस दिवसाचीं सागरीहून पंतप्रधानास आलीं. त्यांत माार लिहिला आहे कीं मिस्तर हिस्तैन कासीहून तीन मजली आला ते समईं राजा चेतसिंग, बळवंतसिंगाचा पुत्र, बमोजिब तलब मिस्तर. माार भेटीस गेला व भेट घेतली. मिस्तर माारानें राजे चेतसिंग यांस फर्माविलें कीं आम्हास खर्चाची जरूरी आहे, वीस लाख रुपये नख्त सध्या देणं. राजे माारानें उतर केले कीं आम्ही तालुकियाचा इजारा केला आहे त्याप्रमाणें रुपये वसूल होत नांहींत. व हकीक म्हणजे तुम्हास कराराप्रमाणें रुपये देतों याकरितां कर्जाचे पेंचात आलों. इजाऱ्यांत कांहीं तखफीफ करावी म्हणोन तुम्हांसी बोलावयाचा निश्चय केला आहे. वीस लाख तो फार, परंतु लाख दोन लाखाची सरबराई आम्हाकडून होणार नांहीं, याप्रमाणं साफ उतर केलें. ते समईं मिस्तर हिस्तैनानें राजे चेतसिंग यास पाहऱ्यांत कैदेंत ठैविलं व कासीस आला. राजे चेतसिंग याचे बूदबासीचें स्थळ गंगापार रामगड म्हणोन मकान. तेथें बिरादर व हमराही लोक होते. त्यांस सूचना लिहून पाठविलीं कीं, या समईं जलदी करून तीनच्यार हजार जमीयतीसुधां याल तरीं माझी मुक्तता या कैद फिरंगापासून होईल. मिस्तरासमीप जमीयत कुल हजारबारासे लोक आहेत. त्यावरून राजे चेतसिंग याचे बिरादर व रुफकानीं तीनच्यार हजार जमीयत जमीदारी मिळऊन रातोरात कासीस आले. व ज्या पाहऱ्याचे कैदेंत राजे चेतसिंग होता त्या लोकास मारून चेतसिंगास सोडविलें. व बमय सरंजाम रामगडास जावयाकरितां निघाले. मार्गांत चिरनारगड इंगरेजाचे ठाण्याचे मकान. तेथील इंगरेजांचे लोक सदराह

जाहले. त्यांस सिकस्त करून रामगडास गेला व कासी वगैरे तमाम गिर्दनवाहचे जमीदारास ताकीद केली कीं इंगरेजांचे निसबतीचे लोक जे सांपडतील त्यांस कतल करणें. दाहावीस हजार प्याद्यांचा जमाव जाहला.

A. R. No. 112

१ शवाल ११९५ हिजरी
२० सप्टेंबर १७८१

पैा छ ११ शवाल सन ११९५ हिजरी रोज रविवार डाकेबराबर आली ते दारोग्याचे विद्यमाने पावली.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ १ शवाल आश्विन शुध त्रितीया गुरुवार दिवारात्रपर्यंत स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष कृपापत्र छ २० रमजानचें डांकेवर पाठविलें तें छ ३० रमजानीं पाऊन बहुत समाधान जाहलें. चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचें पत्र पावलें. त्याचें उतर येथोन लिफाफा सेवेसी पाठविला आहे तो पावेल. कलकत्याहून मिस्तर हिस्तैन गोरनर इमादुदौला जलादतजंग बहादर कासीस आला. व तेथील जमीदार राजे चेतसिंग, बलवंतसिंगाचा पुत्र, यास नजरेबाा रुपयाकरितां दस्तगीर करून कैदेंत ठेविलें होतें. जमीदार माारानें तीनच्यार हजार लोक आणऊन चौकीहून निघोन गेला व मिस्तर हिस्तैन माारास दस्तगीर केलें म्हणोन बालाजीपंत बुंदेले यानी सांगरीहून श्रीमंत पंतप्रधानांस व कारभाऱ्यास पत्रें पाठविलीं. त्यांत माार लिहिला आहे तो हरीपंतानीं सेवकास सांगितला. व खारिजहीं यैकिला त्यावरून तपसीलवार अलाहिदा पत्रीं माार लिहिला आहे. हुजूरहीं याच अन्वयें वर्तमान लिहिलें असे. राजश्री हरीपंताची व सेवकाची जे समई भेट होत

आहे ते समईं हजरत खुदावंदन्यामत यांचे कृपेची व यहसानांची ममनूनमिनत व जनाब मुकदसेंत आपण येकनिष्ट याचा इजहार बहुत करितात. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पौा छ ११ शवाल.

२

पुरवणी अखबार पुणं. छ १ शवाल सन ११९५ हिजरी. याप्रकारचा बलवा व समग्र जमीदारांचा येका जाहला. हें वर्तमान मिस्तर हिस्तैन यास कळलें व बेइस्तकलाल होऊन कासींत राहावयाची हिमत न राहिली. पुन्हां कलकत्यास जांवें हा निश्चय करून कासीहून कूच करून येकदोन म्जली गेला. राजे चेतसिंग यानें दाहा हजारपर्यंत प्यादे मिळऊन मिस्तर माारास माहासरा केला. मिस्तरासमीप जंगी सरजाम नव्हता याकरितां मगलूब जाहला. कितेक इंगरेज व पलटणचे लोक मारले गेले व बाकीचे अजीज जाहले. ते समईं राजे चेतसिंग यानें मिस्तर हिस्तैनास दस्तगीर केलें. व कलकत्याहून जो सरंजाम मिस्तरानें आणिला होता तो जप्त केला. व कासी वगैरे गिर्दनवाहचे माहालातील रयतीस आज्ञा केली कीं, येक सालाचा महसूल तुम्हास माफ केला. सिबंदी ठेऊन इंगरेजांचे निसबती लोकास मारणं व इंगरेजांकडील तालुकियांत ताख्ताराज करणं. शुजायदौला मरहूम यांचा पुत्र जंगली सादतअलीखान राजे चेतसिंगासी मुतफिक जाहला. बालाजीपंत बुदले वगैरे पंतप्रधानाचे निसबती सरदार व राजेरजवाडे यांस चेतसिगानें आपले कुमकेस बोलाविलें आहे. व राजा माार जातीनें वीस हजारपर्यंत जमीयत जमीदारी प्यादे वगैरे मिळऊन मुस्तैद जंग आहे. याप्रमाणें बाळाजीपंत बुंदले यानीं कारभारी व पंतप्रधानास वर्तमान लिहून पाठविलें व माहदाजी सिंद्याची पत्रें छ माारीं आलीं. त्यांत हाच माार व नागपुरीहून याचप्रकारें लिहिलें आले. व सावकारी पत्रें आलीं म्हणोन

हरीपंत फडके यांचे जुबानीं यैकिलें व खारिज सर्वतोमुखी याच वर्तमानाची चर्चा यैकिली.

गाडर बडोद्यास फतेसिंग गाइकवाडाकडें गेला होता. परस्परें सलाहमसलत व करार जाहले. दसऱ्यानंतर फतेसिग गाइकवाड यानीं मातबर जमीयेतनसीं व गाडराची तीनच्यार पलटणें येणेप्रमाणें सिपरीकोलारसचे इगरेजांस कुम(क) जांवें हा येक विचार. दुसरा प्रकार खानदेशांत यावें. याप्रमाणे करार करून गाडर माार भडोचेस गेला म्हणोन खारिज यैकिलें. कारपरदाजांचे जुबानीं तहकीक नांहीं.

सुरतेंत वलंदेज किवा कोण्हीं कुलाहपोषांची कोठी होती. ते करनल गाडरानें जप्त केली म्हणोन खारिज यैकिलें.

माहदाजी सिंदे काळाबाग कालीसिद नदीसमीप आहेत व इंगरेजांची पलटणें सिपरीकोलारसाचे मुतसल गोहदकर जाट इंगरेजासमीप आहे. येथील कारपरदाजांचे सांगण्यांत गोहदकरासी व माहदाजी सिंद्यांसी आहदपैमान जाहला. गोहदकर सिंद्यास येऊन भेटतो. दुसरा प्रकार गोहदकराचे मारफातीनें इंगरेजानीं सिद्यास पैगाम स्नेहाचा व दारमदाराचा केला आहे. तोफा वगैरे सिद्याकडील नेल्या आहेत त्या माघारा देत आहेत. परंतु सिंदे माार सलाह करीत नांहींत व आखर शवाल हरकत करून इंगरेजांचे मुकाबिल्यास जाणार.

३

पौा छ ११ शवाल.

अखबार पुणें छ १ शवाल सन ११९५ हिजरी.

हैदरअलीखान कंची आरकाटचे सरहदेंत व जनराल कूट चिनापटणापासून पांचसाहा कोस खान माराचे मुकाबिल उतरला आहे. सांप्रत हैदरअलीखानापेक्षां जनराल कूट गालिब आहे. परंतु खान माारासी

दारमदार करावा म्हणोन आपले तरफेनें हैदरअलीखानासमीप कोण्हीं ग्रहस्तास पाठविले आहे. परंतु खान माार दारमदार व सलाहचा पैगाम कबूल करीत नांही म्हणोन खारिज यैकिलें. येथील कारपरदाज व वकीलांचे/जुबानीं तहकीक करून माघाहून लिहीन.

राजश्री हरी बलाळ यांची प्रकृती प्रस्तुत स्वस्थ आहे. छ १ माहे माारीं राजश्री बालाजीपंताचे घरी दरबारास व प्राथःकालीं श्रीमंत पंतप्रधानांचे पंक्तीस भोजनास गेले होते. कळावें हे विनंती.

A. R. No. 113

३ शवाल ११९५ हिजरी
२२ सप्टेंबर १७८१

पैाा छ ११ शवाल सन ११९५ हिजरी रोज रविवार सरकारचे डांकेबराबर आले ते दारोग्याचे विद्यमाने पावले.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ ३ माहे शवाल माा पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाा. विशेष यथील वर्तमान छ २८ माहे रमजान रोज सोमवारी विनंतीपत्र प्राथःकाली सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनतर येथील वर्तमान राजश्री मुरारजी जाधव गाडापूरकर मोकासी तीनच्यारसे स्वाराचे सरदार होते त्याजवर पेच येऊन ते बागी होऊन होते. त्याजकडील लोक वगैर उठून गेले होते. जाधव माार विदेही होऊन पढरपुरास होते, त्याजवरून येथील च्यार मन्हाटे वगैर दरम्यान प(ड)ले की, जाधव माार मातबराचा पुत्र आहे. दुसरे, पुरातन सरदार पदरचे. त्यास आणून समजूती

करावी. त्याजवरून जाधव माार यास पढरपुराहून समजूती करून आनिले आहे. पुढे त्याचा काय बदोबस्त करून देतील हे ध्यानास आलिया लेखन केले जाईल, शृत होये. मारवाडाहून काही इग्रजाकडे मदतेस फौज येणार, यैसे वर्तमान आहे. शृत होये. दरबार वगैर जाला होता. शृत होये. छ २९ माहे रमजान रोज मगलवार हैदर नाईक अरकाटेस होता. चिनापटनाकडे जाणार यैसी वदता होती. प्रस्तुत वर्तमान आहे की नाईक माार चिनापटनाकडे गेले. इग्रजासी व हैदर नायेकासी लडाई मातबर जाली. नाईक माार याजकडील लोक फार पडले. काही तोफा गेल्या. सिकस्त काहीयेक होऊन माघारा आले. यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. श्रीमत राजश्री दादा-साहेब व सटोजी भोसले वगैर सुरतेजवल आहेत. त्यास दादासाहेब व फतेसिग गायेकवाड वगैर येकत्र होऊन कोडाईबारीकडे येणार यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. दसऱ्यास डेरे वगैर कारभारी बाहेर करनार फौज वगैर जमा करनार. कारभाऱ्यानी यौज्यना केली आहे की, आपन पुन्याबाहेर डेरे वगैर देऊन राहावे. कोंकनप्राती इग्रजाचे शहास होलकरास फौजेसुधा पाठवावे यैसी घटवटना करितात. निश्चयेरूप जाल्यास लेखन केले जाईल. शृत होये. नाना हरीपताचे येथे येकादो दिवसाआड येतात. कारन की हरीपतास समाधान वाटत नाही. या अर्थी नाना हरीपताचे येथे येऊन खल(व)त वगैर करितात. खलवतीचा भाव यैकिल्यात आला की फौज वगैरचा बदो-बस्त करून पुढे स्वारीचा उद्वोग करून इग्रजाचे पारपत्य करावे. दुसरे कितीक आपले दौलतीचे बदोबस्ताविशई खलव(त) होत असतो, शृत होये. छ ३० माहे रमजान रोज बुधवार. बादली व कार-चोबी वगैर वस्त्रे व काही ज्यवाहेर येज्यमानसाहेबास द्यावयास येथून कृष्णरावजीकडे साडनीस्वारासमागमे रवाना केली, शृत होये. कलकत्याचा सुभा इग्रज वारानसीजवल दाहापाच कोसी आला होता. कारन की, बगाल्याचा व प्रयाग वगैर प्राताचा बदोबस्त करावा.

दुसरे, ममई व चिनापटनाकडे ज्यमीयेत पाठवावी, याकरिता कलकत्याहून दाहाबारा पलटनानसी सुभा वारानसीजवल आला. तिकडील राजेरजवाडे वगैर यास खडनीविशई त्या इग्रजानी पत्रे पाठविली. वारानसीचा राजा बलवतसिग याचे पुत्रास इग्रजानी पत्र पाठविले की, वीस लक्ष रुपये खडनीचे घेऊन भेटीस येणे. त्याजवरून वारानसीचे राज्यास संकट प्राप्त जाले. वारानसीचा राजा याने आपले भाऊबदास मेलऊन पाचच्यार हजाराचा ज्यमाव केला. आनिक आसपासचे राजे यास सागून दाहावीस हजार मणुशाचा ज्यमाव करविला होता. परतु ते काही समयास येऊन पोचले नाहीत. वारानजीकर राजाच पाचच्यार हजार मणुशानसी कलकत्याचा सुभा इग्र(ज)आला होता, त्याचे भेटीस गेले. भेटी होऊन इग्रजानी त्यासी सख्तीच्या गोष्टी सागितल्या. याप्रमाणे भाशणे होऊन राज्यानी उतरायास जातो म्हणौन इग्रजाचा निरोप घेतला. निरोप घेऊन इग्रजाचे गोष्टाबाहेर निघाला. उपरातिक वारानसीचे राज्यानी विचार केला की उदईक इग्रज दंगा करील, याचे कैदेत पडावे हे ठीक नाही, तर आपनच इग्रजास दगा करावा. यैसा मनसुभा करून मागती तो राजा माघारे फिरून इग्रजाचे डेऱ्यास आला तो तीनच्यार हजार लोकानी तरवारा काहाडून इग्रजाचे डेऱ्यावर दंगा केला, कलकतेकर सुभा इग्रज त्यास मारून टाकले. लोकही इग्रजाचे फार मारले, लूट करून लश्कर इग्रजाचे लुटले. याप्रमाणे दगा करून वारानसीचे राज्याने कलकतेकर सुभा इग्रज त्यास मारले, मारून तो राजा वारानसीस गेला. दुसरे वर्तमान आहे, लडाई करून तो इग्रज मारला. परतु द(गा)करून मारला हे प्रमान यैसे सावकारी वर्तमान येथे आले. वर्तमान नानास कलले की वारानसीचे राज्यानी कलकतेकर सुभा मारला, बहुत संतोश जाले. बातनीचे पत्र आले होते ते सरे दरबारात वाचले. कलकत्याचा सुभा वारानसीचे राज्यानी मारला, यैसे वर्तमान आले. शृत होये. दरबार वगैर जाला होता. शृत हाये. छ १ माहे माार रोज गुरुवार कलकतेकर सुभां वारानसीचे राज्यानी मारला म्हणौन करनेल गाडर ममईहून सुरतेस गेला. तेथून

फतेसिग गायेकवाड यासी सूत्र लाऊन पलिकडे हिदुस्तान प्राती जावे, कारन की प्रस्तुत कलकतेकर सुभा मारला, तिकडील बदोबस्त करावा या अर्थी जावे, यैसा विच्यार करून गाडर सुरतेकडे गेला. यैसे वर्तमान आहे, शृत होये. कल्यानीस पलटने वगैर आहेत, सरजाम करितात यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री कृष्टणरावजी माहे माारी सुद प्रतिपदेस हजुरात पोहोचोन मुलाजमत करनार यैसे वर्तमान आहे. शृत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले शृत होये. छ २ माहे माार रोज शुकरवार नानाचे दरवाज्यापुढे से दोनसे गारदी राहातात त्यामधे जमादार दोनतीन जमादार होते. त्यामधे कलागत होऊन पाचच्यार मानसे जखमी जाली शृत होये. रा नाना हरीपताचे घरी आले होते, च्यार घटका खिलवत जाला. उपरातिक नाना रा विसाजी कृष्ण बिनीवाले याचे घरी गेले होते. विसाजीपतासी व नानासी च्यार घटका खिलवत जाला. उपरातिक नाना आपले घरास गेले. विसाजीपताचे खिलवतीचा भाव मागाहून ध्यानास आणून लेखन केले जाईल शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ २० माहे रमजानचे आज्ञापत्र पाठविले ते छ ३० माहे रमजानी डाकेसमागमे पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रमाने आज्ञापत्रे सादर होत असावी, बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

म | ५७३

A. R. No. 114

४ शवाल ११९५ हिजरी

२३ सप्टेंबर १७८१

पौा छ १४ शवाल सन ११९५ हिजरी, रोज बुधवार, सरकारच्या डांकेबराबर आले, विद्यमान दारोगे हरकारे.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार. विनती उपरी. येथील वर्तमान तागा छ ४ शवाल आश्विन शुध षष्ठी रविवारपर्यंत मोा पुणं

स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वकीय क्षेम लेखनाज्ञा केली पाहिज़े विशेष. पूर्वी छ २ माहे शवालीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें तें हुजूर व आपल्या सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रत हैदरआलीखान व जनराल कूट यांची लढाई छ १२ रमजानीं कंचीसमीप जाहली. हें वर्तमान खान माारानें आपले वकीलास लिहिलें. व सेवकानें वकीलांचे जुबांनीं यैकिलें. त्याप्रमाणें हुजूर व स्वामीचे सेवेसी अलाहिदा पुरवणी पत्रांत लिहिलं आहे. राजश्री कृष्टणराव बलाळ यांची मुलाजमत हुजूर होऊन परस्परें मध्यस्तासीं व रावजीसीं बोलण्याचा ज्वाबसाल दरपेश असेल. चौथाईचा तह हुजूरचे मर्जीप्रमाणें मार्गानें फैसल करावा हें लक्ष येथील कारभाऱ्याचे आहे. व सेवटीं रावजी मर्जीमुबारकेप्रमाणें कबूल करतील. परंतु इंगरेजाचे तंबीस हजरत बंदगानआलीनीं अज्म करावा हें बोलणं यांचे मुख्य आहे. याचा तोड हुजूरीहून होण्याचा प्रकार खिसारा कबूल करावा. त्यास सांप्रत इंगरेजांची सिकस्त कासी व कंचीसमीप जाहली. व हैदरआलीखान इंगरेजावर गालिब आहे. याकरिता खिसाऱ्याची बाबत किंवा आणखीं कांही तवाजा हुजूरचा कबूल करावयाचें मानस येथील कारपरदाजांचे नांहीं. सारांश, देशकाळ काबूनुरूप हुजूरची मर्जी पाहून येथील कारभारी वर्तणूक करीत आहेत व करतील, बहुत काय लिहिणं हे विनती.

———

पौा छ १४ शवाल सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ २ शवाल लगायत छ ४ माहे माार सन ११९५ हिजरी. आश्विन शुध षष्ठी रविवार.

मिस्तर हिस्तैन गोरनर कलकत्याहून कासीस आला व बळवंतसिंगाचा पुत्र चेतसिंग यास वीस लाख रुपये नजर मागितली व पाहऱ्यांत ठेविलें. यास्तव चेतसिगानें रामगडीहून आपले बिरादर व रफीक यांस

इशारा करून तीन हजारपर्यंत जमीयत आणविली. व मिस्तर हिस्तैनाचे चौकीचे लोकांस मारून चेतसिंगास घेऊन गेले. त्यानंतर मिस्तर हिस्तैन कासीहून कूच करून कलकत्याचे रुखं येक मजल गेला. इंगरेजासीं निफाक जाहला. याकरितां चेतसिगानें वीस हजारपर्यंत जमीयत गिर्दनवाही जमा करून मिस्तर माारास दस्तगीर केलें व इंगरेज मिस्तरचे हमराही समग्र मारले व ज्या स्थली टोपीवाला सांपडेल तेथें मारणं म्हणोन समग्र कासी प्रांतीं जमीदार व रयतीस ताकीद केली. व येक साला जिरायतीचा महसूल माफ केला. सुज्यायदौला मरहूम याचा पुत्र सादतअलीखान चेतसिंगास शरीक जाहला म्हणोन यावितरिक्त आवांतर वर्तमानासहित छ २ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें. तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्या उपरी यैकिलें व प्रत्यक्ष जाहलें वर्तमान हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलं आहे. छ २ माहे माारीं बालाजी-पंतानी हैदरअलीखानाकडील वकील नूरमहमदखान व नरसिंगराव यांस बोलाऊन मिस्तर हिस्तैन कलकतेवाल्यास चेतसिंगानें दस्तगीर केलें हें वर्तमान तपसीलवार सांगितलें. व खान माारास पत्रें वकी-लानीं व कृष्टणराव जोसी वकील निाा पंतप्रधान हैदरअलीखानासमीप आहे, त्यास कारपरदाजानीं पत्र लिहून पाठविलें.

छ २ माहे माारीं हैदरअलीखानाचीं पत्रें वकीलास आलीं तो माार व बजिनस पत्रें वकीलानीं राजश्री बालाजीपंत नाना व हरी-पंतास दाखविलीं. त्यां पत्राचा माार सेवकानें नरसिंगराव वकील यांचे मुखोदगत यैकिल्याप्रमाणं लिहिला आहे. जनराल कूट चिना-पटणापुढें पांच कोसावर होता. व हैदरअलीखान आरकाट व कंचीचे माबैन इंगरेजासीं व खान माारासीं पंधरासतरा कोसाचा फासला होता. जनराल कूटास प्याज वगैरे कुमकी पलटणें च्यारपांच आलीं. व जमीयत मातबर व सरंजाम जिनसीचा पोख्त करून जनराल माारानें चिनापटणासमीप उतरला होता. तेथोन कूच करून छ ११ रमजानीं कंचीचेसमीप आला. हैदरअलीखानासी

व जनरालासीं पांचसाहा कोसी फासला राहिला. हैदरअलीखानानें फौजेची मिसलबंदी व जगी सरंजाम तोफा व जजायल व बान वगैरे सिध करून, मुस्तयद जंग होऊन पंचावन तोफा लागू करून, लढाईस इंगरेजासीं मुकाबिल जाहला. प्रथम प्रहरापासून घटका दिवस बाकी राहजोपर्यंत दुतर्फा लढाई तोफा व जजायल व बाण व बंदुखाची जाहली. इंगरेजांकडील पनास तोफा सुटत होत्या. आकरा हजार गोळा खान माारा

२

पैाा छ १४ शवाल सन ११९५.

पुरवणी अखबार पुणें. छ ४ शवाल सन ११९५ हिजरी. कडील, याचप्रमाणें इंगरेजांकडील गोळे बेसुमार सुटले. हैदरअलीखान व जनराल कूट उभयतां लढाईंत कायम व मजबूत मकान धरून उभे राहिले. दुतरफा सरदार व लोक जखमी व ठार जाहले. छ १२ रमजानीं घटका दिवस राहिला तें समईं लढाई मवकूफ होऊन जनराल माघारा चिनापटण व कंचीचें माबैन पहिलील मुकामास गेला. हैदरअलीखानानं कंचीसमीप येऊन मुकाम केला.

हैदरअलीखानाचे निसबती	जनराल कूटाचें हमराही
लोक जखमी व ठार	१ मिस्तर मंडोर माजी जनराल
प्यादे व स्वार वगैरे	१ मिस्तर बुरन कुमकीपैकी
७०० जखमी	१ मिस्तर हिस्तैन सानी
८०० ठार	२००० हजार बारासे लोक
१५००	जखमी व हजार बाराचे
१००० घोडीं लाहान मोठी	जवान ठार जाहले
२ सरदार नामी जमादार असामी	

छ १३ रमजानीं जनरालानें कंचीचे मुकामीहून कूच करून चिनापटणाचे मुतसेल पहिलील मुकामास गेला. ते समईं हैदरअलीखानानें ताकुबास फौज पाठविली होती व आपण कंचीसमीप येऊन

मुकाम केला. जनरल कूटाचे हमराह वीस पलटणेंपर्यंत जमीयत व हैदरअलीखानासमीप पंचेवीस हजार स्वार व तीस हजार बार व प्यादे तीसचालीस हजार येणेप्रमाणं जमीयत आहे. याप्रमाणं वकीलाचे जुबानीं व खारिज यैकिल्याप्रमाणें लिहिलं आहे.

कासीकडील वर्तमान चेतसिंगानें मिस्तर हिस्तैन गोरनरास दस्तगीर केलें म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत दुबारा सावकाऱ्यांत वर्तमान आलें आहे कीं मिस्तर हिस्तैन गोरनर चेतसिंगाचे लढाईत मारला गेला, व मिस्तर माराचा खजाना नख्त रुपये सतर लाखपर्यंत कासीचे सावकारांचे दुकानी आमानत होते. व गोरनर माारासमागमें जाहाजें जवाहर व पारचे व तोहफजात वगैरेचीं आली होतीं ते चेतसिगानें जप्त केलीं. सागरांत बालाजी गोविंद बुंदेले पंतप्रधानाचे तरफेनं आहेत. ते च्यार हजार स्वारानसीं चेतसिंगाचे कुमकेस जाणार.

कासीकडें व आरकाट प्रांती इंगरेजांचें सिकस्तेचें वर्तमान यैकिल्यानंतर पंतप्रधानांचे कारभाऱ्यानीं खिलवत करून बालाजी गोविंद बुंदेले वगैरे झांसी व इतर स्थलींचे कमाविसदार यांस व समग्र हिंदुस्तानचे राजेरजवाडे यांस पत्रें लिहून पाठविलीं कीं बमय फौज चेतसिंगाचे कुमकेस जाणं. व यासमईं सर्वत्रांचें राज्याचें कायमीस चेतसिंगाची कुमक करावी हे सलाह चांगली आहे.

दुर्गोजी भापेकर व गणेशपंत बहिरे यांस कारप(र)दाजानी पत्रें पाठविलीं कीं फौजेची निगाहदास्त करून सुरत प्रांतात समग्र देश ताख्तताराज करणं.

करनल गाडर बडोद्याहून भडोंचेस गेला म्हणोन पूर्वीं यैकिल्या-प्रमाणं लिहिलं होतें. सांप्रत खारिज यैकिलें कीं गाडर सुरतेस आला व मुंबई व कल्याणीस पलटणं वगैरे सरंजाम जंगी आहे. तो सुरतेस आणविला. कल्याणी वगैरे मकानें जें इंगरेजांचे तसरूफांत आहेत तेथील ठाण्याची मजबूती करून पलटणें सुरतेस गाडरासमीप जाणार.

मुधोजी भोंसल्यानीं यासमई पंचेवीसतीस हजार फौजेनसीं बगाल्यात जाऊन तो मुलुक ताख्ताराज करावा यांत पंतप्रधानासी स्नेह व यैक्यता विशेष व सालगुजस्ता इंगरेजापासून रुपये घेऊन खंडेराव भोसले

(अपूर्ण)

A. R. No. 115

४ शवाल ११९५ हिजरी

२३ सप्टेंबर १७८१

पैा छ १४ शवाल सन ११९५ हिजरी, रोज बुधवार दोन प्रहर दिवस आल्यावर सरकारच्या डांकेबराबर आले.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ ४ माहे शवाल मुा पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पा विशेष. यथील वर्तमान छ ३ माहे माार रोज शनवारी प्रात:काली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास येईल. तदनतर येथील वर्तमान हैदर नायेकाकडून पत्रे आली. वर्तमान लिहिन्याचे यैकिल्यात आले की हैदर नायेकासी व चिनापटनकर इग्रजासी लडाई मातबर जाली, उभयेपक्षी मणुशे फार जाया जाली. इग्रज सिकस्त होऊन माघारा तीनच्यार कोस चिनापटनाकडे गेले. नाईक माार अरकाटेहून कूच करून चिनापटनाकडे जाणार. इग्रजावर नाईक माार गालिब आहे. यैसे वर्तमान पत्राचे लिहिन्याचे यैकिल्यात आले शृत होये. श्रीमत पंतप्रधान राजश्री नानाचे घरी भोज्यनास आले होते. भोज्यने होऊन श्रीमतास नानानी वस्त्रे वगैर ज्यवाहेर दिल्ही भोज्यन वगैर समारंभ होऊन श्रीमत आपले वाडचात गेले. शृत होये.

छ ४ माहे माार रोज रविवार कलकतेकर सुभा इग्र(ज) वारानसी-कडे आला होता. वारानसीचे राज्यास इग्रजानी खंडनीविशई तगादा केला. त्याजवरून वारानसीचे राज्यानी दगा करून कलकतेकर सुभा यास जिवे मारले. हे वर्तमान काल तिसरे तारखेस डाकेसमागमे विनंतीपत्र रवाना केले त्यात सविस्तर लेखन केले आहे. त्याजवरून शृत जाले असेल. त्यास कलकतेकर सुभा इग्रज दोनतीन पलटनानसी वारानसीजवल उतरला होता. वारानसीचे राज्यानी पूर्वतप्रमाणे खडनीचा यैवज दिल्हा होता, यैसे असता आनिक त्या राज्यासी वीस लक्ष रुपये मागत होता म्हणौन त्या राज्यास इग्रजानी बसविले होते. पाचच्यारसे मणुश राज्यावर चौकीस इग्रजाचे होते हे वर्तमान राज्याचे भाऊबंद गंगापार होते त्यास कलले. त्यानी ज्यमाव करून आले. वारानसीचे राज्यावर चौकीचे मानसे होती, ते मारून राज्यास सोडऊन घेतले. इग्रजाचे येक मोठे ठाने होते ते राज्याचे लोकानी घेतले. वारानसीचे राज्याचा ज्यमाव विशेष जाला म्हणौन इग्रज कूच करून जाऊ लागला. तो राज्यानी त्या इग्रजास वेढा घातला. लडाई करून कलकतेकर सुभा इग्र(ज) वारानसीचे राज्यानी मारला यैसे वर्तमान येथे सावकारी वगैर आले. कलकतेकर सुभा मारला म्हणौन येथील कारभारी बहुत संतोश जाले शृत होये. सिद्यासी व इग्रजासी लडाई आहे. वर्तमान आहे की ते इग्रज सिद्यानी जेर केले आहेत. त्या इग्रजाचे लश्करात रुपयाचे दोन सेर धान्य जाले आहे. बहुत ते इग्रज जेर झाले आहेत. सिदे आसपास फौजेचा वेढा घालून आहेत यैसे वर्तमान आहे. शृत होये. अदोनीहून नवाब बसालतजग बहादूर याची पत्रे कारभाऱ्यास साडनीस्वार घेऊन आले आहेत. पत्राचा भावार्थ कलल्यावर लेखन केले जाईल. शृत होये. कलकतेकर सुभा मारला म्हणौन करनेल गाडर ममईहून सुरतेस गेला. पुढे बडोद्यास जाऊन फतेसिग गायेकवाडाच्या विद्यमाणे हिदुस्तान प्राती जाऊन कलकतेकर बुडविला आहे त्याचा बदोबस्त करनार यैसे वर्तमान आहे. प्रस्तुत करनल सुरतेस आहे व पलटने वगैर कल्यानीस आहेत. शृत होये. करनेल

सुरतेकडे गेला. प्रस्तुत निर्वेद जाले म्हणौन कारभारी बहुत संतोश आहेत. म्हणतात की चिनापटनकर इग्रजास हैदरने सिकस्त केले. मुख्य सुभा कलकतेकर मारला व करनेल गाडर ममईहून सुरतेकडे गेला. तिकडे सिद्यानेही इग्रज सिकस्त केले आहेत, इग्रजाचे चहूकडून पारपत्य जाले आहे. चिता नाही म्हणौन बहुत संतोश होऊ(न) बोलत असतात. शृत होये. राा हरीपत येकदोन दिवस जाले दरबारात जात असतात, शृत होये. दसऱ्याचे मोहर्ते डेरे बाहेर करून हरीपत निघनार, यैसे वर्तमान आहे. निश्चये जाल्यास लेखन केले जाईल, शृत होये. नानाचे घरी श्रीमत भोज्यनास गेले होते. श्रीमतास नानानी वस्त्रे च्यार, येक सिरपेच व येक माल पाचाची दिल्ही, शृत होये. येकादो दिवसा श्रीमत हरीपताचे येथे मेजमानीस जाणार, शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

A. R. No. 116

८ शवाल ११९५ हिजरी
२७ सप्टेंबर १७८१

पैाा छ १५ माहे शवाल सन ११९५ हिजरी. गुरवार प्रहर रात्र मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साा नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ ८ शवाल आश्विन शुध दशमी गुरुवासरपर्यंत मोा पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. छ २६ रमजानचें कृपापत्र चिरजीवांच लिफाफ्यासहित डांकेवर रवाना केलें तें छ ५ शवालीं पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें व संतोष जाहला. पूर्वी छ ५ माहे माारीं विनतीपत्रें हुजूर व स्वामीचे

सेवेसी डांकेवर रवाना केलीं तें दारोग्याचे विद्यमान हुजूर व स्वामीस पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचे वर्तमान पृथक पत्रीं लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल. कलकतेवाला इंगरेज मिस्तर हिस्तैनास चेतसिंगानें कैद केलें. व हैदरअलीखानानें इंगरेजांचा तसरूफी मुल्क घेऊन दोन वरसें लढाई करितो. व हरयेक लढाईंत इंगरेजांवर गालिब आहे. यावरून पंतप्रधानांचे कारभाऱ्यांस इंग्रेजांचे तंबीविषईं द्विगुणित इछा जाहली आहे. हजरत बंदगान-आलीनीं यासमईं इग्रेजाचे तंबीचा अज्म करावा हेच सलाहदौलत आहे. याप्रमाणें कारपरदाजांचे बोलण्याचा खुलासा सेवकाचे ध्यानास आला. व हुजूर अर्जमारूज स्पष्ट करावयाविषईं कृष्टणराव बलाळ यांस लिहिणार म्हणोन यैकिलें. सेवेसी श्रुत होय, बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पैा छ १५ शवाल सन ११९५ हिजरी. गुरवार प्रहर रात्र मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ ५ शवाल लगायत छ ८ माहे माार सन ११९५ हिजरी गुरुवासर.

छ १२ रमजानीं हैदरअलीखानासीं व जनराल कूट यासीं कंचीसमीप लढाई जाहली. दुतरफा माणसें व घोडीं ठार व जखमी जाहलीं व मातबर सरदार पडले. इंगरेज माार पसपा होऊन चिनापटणास गेला व हैदरअलीखान कंचीसमीप येऊन उतरला. पंतप्रधानांचे कारभाऱ्यानीं दुर्गोजी भापकर व गणेशपंतास ताकीद लिहिली कीं, फौजेची निगाहदास्त करून सुरत व गुजरात प्रांतात जाणें. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित पत्रें हुजूर व स्वामीचे सेवेसी पाठविलीं. तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान दफेवार लिहिलें असे.

करनल गाडर बडोद्याहून सुरतेस आला म्हणोन पूर्वी खारिज यैकिल्याप्रमाणें लिहिलें होतें. सांप्रत येथील कारभाऱ्याचें जुबानीं तहकीक यैकिलें जे करनल गाडर डबईस आहे व फतेसिंग गाइकवाडानें दाहा हजारपर्यंत फौज ठेऊन माहदाजी सिंद्याचे मुकाबिल इंगरेजांचीं पलटणें आहेंत त्यांचे मुकाबिल्यास जावें किंवा खानदेश तसखीर करावा, या दोन्हीपैकीं येक मोहीम कबूल करावी म्हणोन बहुत सख्त रदबदली करीत आहे. परंतु गाइकवाड माार कबूल करीत नांहीं. व सांप्रत मिस्तर हिस्तैन यास चेतसिंगानें दस्तगीर केलें हें वर्तमान यैकिल्यानंतर करनल गाडर वगैरे समग्र इंग्रेजांचे सरदार बेदिल व घाबरे जाहले आहेत म्हणोन वर्तमान यैकिलें.

माहदाजी सिंदे कालीसिंद कालाबागासमीप आहेत. व इंग्रेजांची पलटणें सिपरीकोलारसाचे मैदानांत व सिंद्याची फौज आठदाहा हजार इंग्रेजांचे गिर्दनवाह म्हणोन पूर्वील पत्रीं वर्तमान लिहिलें होतें. सांप्रत येथील कारभाऱ्यांचे व सिंद्याकडील वकीलाचे मुखं यैकिलें की सिंदे माारानीं पुन्हा पांचसात हजार फौज इंग्रेजांची कही व रसद बंद करावयाकरितां गिर्दनवाह तंई केली व सांप्रत इंग्रेजाचे लश्करांत गिरानीं गवताची फार जाहली आहे. गोहदवाला जाट मखफी सिंद्यांचे यैक्यतेंत व सिंदे माारांचा वकील जाटासमीप आहे. इंग्रेजांची पलटणें नाबूद करावीं हे तजवीज माहदाजी सिंद्याची आहे म्हणोन यैकिलें.

छ ५ माहे माारीं पंतप्रधानांस हरीपंतानी ज्याफत केली. बालाजीपंत व कृष्टणराव बळवंत व विसाजी बिनीवाले समागमे होतें. श्रीमंतास बऱ्हानपूरचे रंगांचा पोषाक व किमखाबी तुमान व बालाजीपंत व विसाजीपंत व कृष्टणराव बळवंत व इतर दाहा असामीस हर येकास पैठणी सेला व मुडासें मरातिबाप्रमाणें कमबेश किमतीचीं दिधलीं. श्रीमंत पंतप्रधानास सरपेंच अलमासी बमय लोलक मोत्याचा दाणा दिधला.

———

श्रीनिवास

२

पुरवणी अखबार छ ८ शवाल सन ११९५ हिजरी.

छ ७ माहे माार बुधवार दसऱ्याचे दिवसीं त्रितीय प्रहरी पंतप्रधानाची स्वारी सीमा उलंघनास गेली होती. खवासींत हरीपंत बसले होते. बालाजी जनार्दन वगैरे समग्र मुतसदी व सरदार हमराह होते. नूरमाखान व नरसिंगराव वकील हैदरअलीखान, यांस येक हाती स्वारीस दिधला होता. व पंतप्रधानांचे स्वारीसमागमे वकील माार होते. तोफाचे सिलक जाहली ते समईं पांचसात हाती बुजून पळाले. त्यापैकीं येके हातीवर पुरोहित वगैरे बसले होते. तो हाती बेशक पळाला. झाडास लागून अंबारीचें छत मोडलें. घटका रात्रीं हवेलीस आले. मामूल कायद्याप्रमाणें सर्वत्रानीं नजरा केल्या. हरीपंत फडके यांचे पुत्रास दाजीबा यास मोत्याचा चौकडा व पालखी दिधली. दाजीबा माार बालाजीपंतासमीप पेश व ज्वाबसालास योग्य, याकरितां पालखी देऊन प्रतिष्ठा वाढविली. छ ७ माहे माारी पंतप्रधान स्वारीस निघाले ते समईं फरासखान्याचे दारोग्यास बालाजीपंतानीं सागितलें कीं गारपीरासमीप पूर्वाभिमुख डेरे उभे करणें. त्याप्रमाणें झंडे व डेरे दिधले व उभे केले.

बाजी गोविंद जोसीं यांजसमागमें पांचसात हजार फौज देऊन माहदाजी सिद्यांचे कुमकेस पाठवावें म्हणोन कारपरदाजांची तजवीज आहे.

बालाजीपंत व हरीपंत यानी डेरे दाखल होण्याचा निश्चय ठरला नांहीं. काम रूबकार होईल ते समईं मोहिमेस जावयाचा निश्चय होईल.

पैाा छ १५ माहे शवाल सन ११९५ हिजरी गुरवार प्रहर रात्र मै डांक सरकार.

———

A. R. No. 117

९ शवाल ११९५ हिजरी

२८ सप्टेंबर १७८१

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ ९ माहे शवाल मुा पुणे, स्वामीचें कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानद लेखन आज्ञा करीत असिले पाा. विशेष येथील वर्तमान छ ४ माहे माार रोज रविवारी सध्याः काली विनंतीपत्र सरकारचे डाके-समागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर यथील वर्तमान राजश्री हरीपताचे येथे श्रीमत भोज्यनास गेले होते. राजश्री नाना व लक्षुमनराव रास्ते व अपा बलवत वगैरही श्रीमताचे पगतीस भोज्यनास होते. भोज्यने वगैर होऊन श्रीमतास वस्त्रे व सिरपेच वगैर हरीपतानी दिल्हा. नानास व रास्ते वगैर मडलीस वस्त्रे दिल्ही. याप्रमाने भोज्यन वगैर समारंभ होऊन श्रीमत आपले वाडचात गेले. नाना वगैरही आपले घरोघर गेले. शृत होये. हरीपतास समाधान वाटत नवते. आता आरोग्य आहे. दरबारास वगैर जात असतात. शृत होये. छ ५ रोज सोमवार. कलकतेकर सुभा इग्रज वारानसीचे राज्यानी मारला हे वर्तमान येकदोन विनंतीपत्री अक्षरशा लेखन केले होते त्याजवरून शृत जाले असेल. कलकतेकर सुभा मारला गेला त्याजवरून ममईकर वगैर इग्र(ज) दहशत खाऊन आहेत यैसे वर्तमान आहे. त्याज-वरून येथील कारभारी बहुत संतोश आहेत. शृत होये. करनल गाडर सुरतेस आहे. पलटने वगैर कल्यानीस आहेत. ते पलटने काही गरबड करून पुढे बोरघाटाकडे येणार यैसी वदंता आहे. त्याजवरून त्या इग्रजाचे शहास बोरघाटाकडे राजश्री बाजीपताची रवानगी करावी यैसी यौज्यना करितात. निश्चये होऊन बाजी-पताची रवानगी जाल्यास लेखन केले जाईल. शृत होये. हिदुस्तान प्राती सिद्यासी व इग्रजासी लडाई आहे. सिद्यानी ते इग्रज जेर केले आहेत. दुसरे इग्रजाचे लश्करात महर्गता आहे. व कलकतेकर

सुभा मारला गेला म्हणौन त्या इग्रजानी सिद्यासी सलूकाचा पैगाम केला यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. शृत होये. छ ६ रोज मगलवार हैदर नायेकाची पत्रे आली होती. वर्तमान यैकिले की, नाईक माार यानी लडाईत इग्रज सिकस्त केले. नाईक माार चिनापटनाकडे जाणार. हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्रात लेखन केले होते. त्याजवरून शृत जाले असेल. प्रस्तुत नाईक माार याची आनिक पत्रे आली वर्तमान यैकिले की, इग्रज सिकस्त होऊन चिनापटनाकडे गेले. नाईक माारही इग्रजाचे पाठीमागे कूच करून चिनापटनाकडे गेले. प्रस्तुत नाईक माार इग्रजावर गालिब आहेत यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. राजश्री हरीपंत नानाचे घरास गेले होते. नानाचा व हरीपताचा खि(ल)वत जाला. भाव यैकिल्यात आला की उदईक दसऱ्यास डेरे बाहेर करनार कारन की फौज वगैर जमा जाली पाहिजे. दुसरे, राजश्री बाजीपताची तलेगावाकडे बोरघाटाकडे रवानगी करावी या अर्थी खिलवत जाला उदईक दसऱ्यास डेरे बाहेर करनार. शृत होये. होलकराकडील पाराजीपत येथे आले होते. त्यांसमागमे होलकरास वाफगावी सागून पाठविले की तुम्ही आपली फौज वगैर जमा करून दसऱ्यास बाहेर निघावे. त्याजवरून होलकर फौज वगैर जमा करून दसऱ्यास डेरे बाहेर करून निघनार. बाहेर निघाल्याचे वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. छ ७ रोज बुधवार दसरा म्हणौन मोहर्ते करून अस्तमानी श्रीमताचे डेरे पुन्याबाहेर गारपीराजवल केले. डेरे बाहेर केले कारन की फौज वगैर जमा जाली पाहिजे. याकरिता सरकारचे डेरे बाहेर जाले. प्रस्तुत डेरे बाहेर दिल्हे. पुढे कारभारी काये निश्चये करून बाहेर निघतील. निघाल्यास लेखन केले जाईल. शृत होये. दसऱ्याचे सिलगनास श्रीमत व नाना वगैर मुतसदी वगैर बाहेर निघाले होते. सिलगन समारंभे करून श्रीमत वगैर मुतसदीसहित वाडयात आले. श्रीमतास नजर नानानी वगैर

मुतसदी मडलीने केली. तमाम लोकानी दसऱ्याच्या नजरा केल्या. प्रहररात्रपरियेत लोकाच्या नजरा वगैर जाल्या. उपरातिक श्रीमत संधेस घरात गेले. नाना वगैरही आपले घरास गेले. शृत होये. छ ८ रोज गुरुवार राजश्री गनेशपंत बेहरे खानदेशात आहेत. त्यास आज्ञा पाठविली की तुम्ही कोडाईबारीकडे जाणे. त्यानी लिहून पाठविले की फौज वगैर पाठऊन द्यावी. आज्ञाप्रमाणे कोडाईबारी-कडे जाऊ. त्याजवरून गनेशपताकडे फौजेची नेमणूक करून पाठ-विनार. फौजेची नेमणूक करून पाठविल्यास लेखन केले जाईल शृत होये. राजश्री कृष्णरावजीचे चिरजीव नवरात्राचे उछवास बारामतीस गेले आहेत. दसरा जालिया रावजीचें चिरजीव येथे येणार शृत होये. काल दसऱ्याचे मोहर्ते डेरे बाहेर गारपीराजवल जाले. पुढे कारभारी वगैर डेरे दाखल जाल्यास लेखन केले जाईल डेरे मात्र बाहेर मोहर्तेकरू दिल्हे, शृत होये. तमाम सरदारास व सिले-दारास पत्रे पाठविली की सरकारचें डेरे बा

पुरवनी २.

हेर जाले. सत्वर जमा व्हावे. याअन(व)ये तमाम लोकास पत्रे पाठवितात. शृत होये. दसऱ्यास डेरे बाहेर करून हरीपतानी डेरे दाखल व्हावे यैसा निश्चये जाला होता. ते रहित होऊन डेरेच मात्र बाहेर दिल्हे, हरीपंत गावातच आहेत. डेरे दाखल जाले नाहीत. दाखल जाल्यास लेखन केले जाईल. शृत होये. नानाचा व हरीपताचा नित्य ख(ल)वत होत असतो. भाव यैकिल्यात आला की फौज वगैर जमा जालिया बाहेर निघावे, इग्रजाचे पारपत्य करावे, पुढे दौलतीचा बदोबस्त करावा, याअनवये खिलवत होत असतो. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्याना(स) येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ २६ माहे रमजानचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर जाले ते छ ५ माहे माारी सेवकास पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ आहेत. शृत होये. मौजे भालगाव प्राा राताजन येथे बलवतराव सेव(का)कडून होते, त्याचा मारा पाटलानी केला, त्याचे पारपत्या-

विशई सरकारचे इनायेतनामे नवाब तहवरजग व जोरावरजग बाहादूर वगैर यास सादर जाले पाहिजेत म्हणौन पूर्वी येकदोन विनंतीपत्री लेखन केले होते. त्याचे उतर सादर जाले की, येज्यमानसाहेबास ज्यहाननसी केल्यावाचून कैसे इनायेतनामे सत्वर होतील. ज्यहान(न) सी करून इनायेतनाम्याविशई उतर लिहून पाठऊ म्हणौन आज्ञापिले. त्यास ब्राह्मनाया अभिमान धरून येज्यमानसाहेबास अर्ज करून सरदारास इनायेतनामे पाटलाचे वगैर पारपत्याविशई सादर करनार स्वामी समर्थ आहेत. सर्वस्वे वसीले व मुरबी व मायेबाप स्वामी आहेत. सेवकाचा अभिमान धरून, ब्राह्मन मारला गेला आहे, त्याचे साहित्याविशई इनायेतनामे विनंती पूर्वी केल्याप्रमाणे सादर करून पाठविणार स्वामी समर्थ. खानदेशप्राती सेवकाची जागीरीची खेडी आहेत. त्यास गनेशपंत व सरसुभे यानी गावापासून यैवज घेतला येविशई पहिले विनंतीपत्री लिहिले होते. यैवज माघारा ये याकरिता कारभाऱ्यास इनायेतनामे पाठवावे. त्याचे उतर सादर जाले की, राा कृष्णरावजी येथे येणार. त्यास समक्षच सागू. मग इनायेतनामे कोन्हास पाठवावे. त्यास राव माार तेथे आले आहेत. त्यास समक्ष ताकी(द) जाली पाहिजे की, नानास लिहून यैवज माघा(रा) देवणे. याप्रमाणे त्यास सागितले पाहिजे अन नानास व हरीपतासही इनायेतनामे सादर जाले पाहिजे. ध्यानास आणून इनायेतनामे सादर करनार स्वामी समर्थ आहेत. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा बहुत काये लिहिणे, कृपालोभ किजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 118

१० शवाल ११९५ हिजरी

२९ सप्टेंबर १७८१

पैाा छ १७ माहे शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार साइंकाल डांकेवर माा दारोगा हरकारा.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी. येथील

वर्तमान छ १० शवाल आश्विन शुध द्वादसी शनिवार दोन प्रहर दिवस-पर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष पूर्वी छ ९ माहे माारीं प्रातःकालीं हुजूर अर्जी व अखबार डांकेवर पाठविली. ते दारोग्याचे विद्यमानें हुजूर गुजरून पत्रें स्वामीस पावलीं असतील. त्या उपरी यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान पृथक पत्रीं लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल. हरीपंत फडके डेरे दाखल जाहल्यावितरिक्त फौजेचा जमाव व सर्वत्रांवर दाब पडणार नांहीं याकरितां बालाजीपंताचे सलाहानुरूप छ ९ शवाल शुक्रवारीं प्रथम प्रहर रात्रीस राजश्री बालाजीपंतापासून हरीपंतानी रुखसत घेतली. त्या उपरी उभयतां बइतिफाक पंतप्रधानांसमीप गेले. व प्राथःकाळची साहा घटका रात्र शेष राहिले ते समईं निरोपास येऊं म्हणोन विनती केली की श्रीमंतानीं मान्य करून आज्ञा केली कीं साहा घटका रात्र राहील ते समईं आम्ही जाग्रत होऊं किंवा करणें व हरीपंतानी रुखसतीकरितां यांवें. त्या प्राा साहा घटका रात्र बाकी राहिली ते समईं श्रीमंत आपण जाग्रत जाहले व हरीपंतास बोलाऊन आणून रुखसत केलें. पंत माार डेरे दाखल जाहले या उपरी दिपावली-पर्यंत फौज जमा होईल. त्यानंतर बाजी गोविंद व विसाजी आपाजी उभयतांसमागमें फौज देऊन गुजरात प्रांतास रवाना करणार किंवा जातीनें हरीपंत जाणार निश्चय अद्यापि जाहला नांहीं. सेवेसी श्रुत होय, बहुत काय लिहिणं, हे विनती.

———

पैाा छ १७ शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार साइकाली डांकेवर माा दारोगा.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ ९ माहे शवाल लगायत छ १० माहे माार सन ११९५ हिजरी शनिवार.

करनल गाडर डबईस राहून बडोद्यास फतेसिंग गाइकवाडाकडें ज्वाबसालास वकीलास पाठविलें आहे. व मिस्तर हिस्तैनास चेत-

सिंगानें दस्तगीर केलें. व हैदर नायकाची व जनराल कूटची लढाई कंचीसमीप छ १२ रमजानीं जाहलीं. त्या लढाईंत जनराल माार पसपा होऊन चिनापटणास गेला. व खान मस्तूर कंचीसमीप येऊन उतरला. याकरितां करनल गाडर वगैरे समग्र इंगरेजांचे सरदार घाबरे व बेदिल जाहले आहेत म्हणोन येथील कारपरदाजांचे जुबानीं चर्चा व छ ७ माहें माार दसऱ्याचे दिवसीं श्रीमंत पंतप्रधानांचे डेरे गारपीरासमीप जाहले. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ ९ माहे माारीं डांकेवर हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी नवल विशेष प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान सेवेसी लिहिलें असे.

करनल गाडराचे चितांत फतेसिंग गाइकवाडानें दाहा हजार-पर्यंत फौज ठेऊन माहदाजी सिंद्याचे तंबीकरितां जांवें किंवा खानदेशांत मुलक काबीज करावा याकरितां रदबदली बहुत मुबालग्यानें करितो. परंतु गाइकवाड माार कबूल करीत नांहीं म्हणोन पूर्वील अखबारेंत वर्तमान लिहिलें आहे. येथील कारपरदाजानीं गोविंदराव गाइकवाड याची सरदारी उभी करावयाची तजवीज करून फतेसिंगाची जागीर तगीर करून गोविंदराव गाइकवाडास सनदा देणार व फतेसिगाचा सिलसिला कागदपत्राचा कारभाऱ्यासीं आहे. व गाइकवाड माार याचे बोलण्याचा खुलासा यैसा जे आपण चितापासून श्रीमंताचे लक्षांत आहोंत. बडोदें वगैरे दरोबस्त आमची जागीर इंगरेजांचे कबज्यांत सांपडली आहे. याकरितां समयोचित यांसी यैक्यता करून आपले जागीरीचा बचाव करून राहिलों आहोंत जे दिवसीं पंतप्रधानांची फौज सुरतेसमीप येऊन इंगरेजांकडील तसरूफी मुल्क सोडवील ते दवसीं आम्हीं श्रीमंताकडील सरदाराचे शरीक व रफीक होऊं. याप्रमाणें उजरख्वाहीनें वकीलासीं गाइकवाड माार बोलत आहे. सारांश, येथील कारपरदाजाचे मतें या समईं कलकतेवाला मिस्तर दस्तगीर जाहला व हैदर नाईक इंगरेजांवर गालिब. याकरितां गुजरातेंत मातबर फौजा पाठऊन मुलुक सोडवावा. या मोहिमेस मातबर सरदार गेल्यावितरिक्त मोहीम

सर होणार नांहीं. म्हणून बालाजीपंत व हरीपंत डेरे दाखल होणार हें खबर छ ४ माहे माारचे अखबारेंत लिहिलें होतें. त्या उपरी कार-परदाजानीं तजवीज केली कीं बाजी गोविंद यांसमागमें फौज देऊन रवाना करावें. पुन्हां बालाजीपंताचें व हरीपंताचे विचारानें ठराव जाहला कीं, हरीपंत डेरे दाखल जाहल्यावांचून लोक व फौज जमा होणार नांहीं. याकरितां पंत माारनुलेनीं डेरे दाखल व्हांवें हा निश्चय जाहला.

२

पुरवणी अखबार. छ १० माहे शवाल सन ११९५ हिजरी. छ ९ शवाल आश्विन शुध येकादसी शुक्रवारची तीन प्रहर रात्र जाहल्यानंतर साहा घटका रात्र शेष राहिली ते समईं राजश्री हरीपंतानीं श्रीमंत पंतप्रधानांचा निरोप घेऊन डेरे दाखल जाहले. कांही दिवस मुकामात करून फौज जमा जाहल्यानंतर हरकत करावी व मोहीम रूबकार होईल त्याप्रमाणें अज्म करावा म्हणोन कार-भाऱ्यांचे तजवीजीचा निश्चय जाहला आहे.

छ १० माहे माारीं हरीपंताचे डेऱ्यांचे गिर्दनवाह खासे स्वारांची दाहा घोडीं व पागा व सिलेदार पंचेवीस येणेप्रमाणें लाहान मोठीं पनासपर्यंत घोडीं जमा आहेंत. प्रतिदिवसीं सें पनास लोक येतात. या उपरी जें वर्तमान होईल तें सेवेसी सूचना लिहीन हें विनती.

पैा छ १७ शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार साइंकाली डांकेवर माा दारोगा हरकारा.

A. R. No. 119 १० शवाल ११९५ हिजरी

२९ सप्टेंबर १७८१

पैा छ १७ माहे शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार साइंकाली डांकेवर माा दारोगा हरकारा.

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ १० माहे शवाल मुा पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन

स्वानद लेखनाज्ञा करीत असिले पाा विशेष येथील वर्तमान छ ९ माहे माार रोज शुकरवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर यथील वर्तमान दसऱ्यास बुधवारी श्रीमताचे सरकारचे डेरे बाहेर गारपीराजवल जाले. हरीपतानी त्याच दिवसी डेरे दाखल व्हावे यैसा निश्चये पूर्वी होता. ते रहित होऊन डेरेच मात्र बाहेर दिल्हे. अन हरीपतही डेरे दाखल होनार. हे वर्तमान विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. राजश्री नाना व हरीपंत याचा खिलवत जाला. निश्चये ठैरला की मागील साहा घटका रात्री हरीपतानी डेरे दाखल व्हावे. सरकारचे डेरे बाहेर जाले. ते हरीपतानी डेरे दाखल व्हावे म्हणौन जाले. तिसरे प्रहरी हरीपताचा पेशखाना बाहेर डेऱ्यास गेला. मागील साहा घटका रात्र राहता छ ९ रोज शुक(रवा)री माहे माारी राा हरीपत डेरे दाखल जाले. कारन की फौज वगैर जमा जाली पाहिजे म्हणौन हरीपंत डेरे दाखल जाले. तमाम सरदारास व सिलेदार वगैर यास पूर्वी पत्रे लिहिली होती की सत्वर यावे. आताही सर्वास पत्रे लिहितात की हरीपत डेरे दाखल जाले, सत्वर जमा व्हावे. शृत होये. वदता होती की, नानाही डेरे दाखल होनार. त्यास नाना काही डेरे दाखल जाले नाहीत. निश्चये जाल्यास लेखन केले जाईल. हरीपत मात्र डेरे दाखल जाले. येथून खडकीचा पूल कोसभर आहे तेथे हरीपत मुकाम करून राहानार. फौजही जमा व्हावयास महिना दीड महिना पाहिजे. याकरिता हरीपंत खडकीवर मुकाम करून राहानार. प्रस्तुत हरीपत पुन्याबाहेर गारपीराजवल डेरे दाखल होऊन आहेत. येका दो दिवसा येका कोसाचे कूच करून खडकीचे पुलावर मुकामास जाणार. शृत होये. राजश्री विसाजी कृष्ण बिनीवाले यासही डेरे दाखल करावे यैसी यौज्यना जाली आहे. कारन की विसाजीपत नावाचा सरदार आहे. विसाजीपताची उभारनी करून फौज वगैर देऊन गुजरात प्राती विसाजीपतास पाठवावे, प्रसग पडल्यास आनिक कोन्हीकडे पाठवावे यैसी यौज्यना जाली आहे. निश्चये होऊन

विसाजीपंत बाहेर निघाल्यास लेखन केले जाईल शृत होये. राजश्री बाजीपताची रवानगी कोकन प्राताकडे बोरघाटाचे सु

२

पुरवनी

मारे करनार. कारन की इग्रजाची पलटने कल्यानीस आहेत. त्याजवर शह पडावा व कोकन प्राती उपद्रव करावा या अर्थी बाजीपताची रवानगी बोरघाटाकडे कोकन प्राती करनार. निश्चये होऊन बाजीपताची रवानगी केल्यास लेखन केले जाईल. शृत होये. इग्रजावर शह पडावा म्हणौन राजश्री हरीपंत डेरे दाखल जाले. पुढे फौजा वगैर जमा जाल्यावर काये मसलत करून स्वारीचा उद्वोग करतील हे पाहावे. प्रस्तुत हरीपत डेरे दाखल जाले. फौजा वगैरही जमा होनार शृत होये. वाफगावास होलकरही फौज जमा करितात. तेही डेरे दाखल होनार. होलकर डेरे दाखल जाल्याचे वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. हरीपंताजवल फौज जमा जालियावर प्रसगोपात इग्रज वगैरकडे स्वारीचा उद्वोग करनार. प्रसगानसानसार नानाही डेरे दाखल होऊन राहानार यैसे आहे. मग नानाचा निश्चये होऊन डेरे दाखल जाल्यास लेखन केले जाईल शृत होये. कल्यानीस तीनच्यार पलटने होती त्यापैकी कल्यानी व बेलापूर वगैर ठानी आहेत. तेथे ठान्या परत दोनदोन च्यारच्यारसे मणुश राहून बाकी पलटने ममई व वसईकडे गेली यैसी वदता आहे. दुसरे, करनेल गाडर सुरतेस आहे. तो सिद्याकडील इग्रजास मदत जाणार यैसे वर्तमान आहे. मग पलटने वगैर कल्या(णी)हून गेली हे वर्तमान तहकीक यैकिल्यास लेखन केले जाईल. शृत होये. इग्रज यासी काही सलूकाचेही सूत्र लावणार यैसेही वर्तमान आहे निश्चयेरूप यैकिल्यास लेखन केले जाईल शृत होये. प्रस्तुत हरीपंत जलदी करून निघाले म्हणौन लोक बहुत तर्क करितात कारन की करनल गाडर सुरतेस तो काही उज्म करून आला नाही. हरीपत सत्वर निघाले याकरिता लोक तर्क विशेष करितात. शृत होये. पुढे

जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

पैा छ १७ माहे शवाल संन ११९५ हिजरी रोज शेनिवार साइंकाली डांकेवर माा दारोगा.

A. R. No. 120

४ शव्वाल ११९५ हिजरी

३ अक्टोबर १७८१

(पैवस्त)छ २३ शवाल सन ११९५ हिजरी शुक्रवार साइंकाली माा दारोगे हरकारा.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टाग नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ताा छ १४ शवाल अश्विन वद्य प्रतिपदा बुधवारपर्यंत मोा पुणं स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वकीय कुशलार्थ लेखनाज्ञा करावी विशेष. पूर्वी छ १० माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन इकडील वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी छ १४ माहे माारपर्यंत पृथक पत्रीं वर्तमान लिहून डांकेवर पत्रें हुजूर व स्वामीचे सेवेसी पाठविलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें पावतील व लेखनार्थ श्रुत होईल. बहुत काय लिहिणें हे विनती.

(पैवस्त)छ २३ माहे शवाल सन ११९५ हिजरी शुक्रवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १० शवाल लगायत छ १४ माहे माार सन ११९५ हिजरी अश्विन वद्य १ बुधवार.

हरी बलाळ फडके छ ९ माहे माार शुक्रवारची तीन प्रहर रात्र गेल्यानंतर श्रीमंत पंतप्रधानांचा निरोप घेऊन डेरे दाखल जाहले, व फतेसिंग गाइकवाडाचे सिलसिल्यावर कोंडाईबारी व सोनगडचे रुखं फौज पाठवावयाची तजवीज येथील कारपरदाजांची आहे. व करनल गाडर डबईत राहून फतेसिंग गाइकवाडाचे इतिफाकाकरितां मध्यस्ताचे विद्यमानें ज्वाबसाल निकडीनें लाविला आहे कीं गाइकवाड माारानें दाहा हजार फौजेनसीं सिपरीकोलारसासमीप इंगरेजांची पलटणें माहदाजी सिंद्यांचे रुखांवर आहेत त्यांचे मदतीस व सिंदे माराचे तंबीस जांवें किंवा खानदेशांत येऊन मुल्क तसखीर करावा. या-वितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्याउपरी वर्तमान यैकिलें व प्रत्यक्ष दफेवार हुजूर व स्वामीचें सेवेसी लिहिलें आहे.

कृष्टणराव बलाळ यांस बमोजिब व रूप इनायतनामा हुजूर रवाना केलें म्हणोन येथील कारपरदाजानीं हैदरअलीखानास पत्रें लिहिली व नूरमाा खान व नरसिंगराव याजकडून लिहविलीं हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. सांप्रत खान माारनुलेचीं उतरें बालाजी-पंत व हरीपंतास व उभयतां वकीलास आलीं. पत्राचा माार कार-परदाजानीं सेवकास सांगितला नांहीं. खारिज यैकिला जे बालाजी-पंतास सरसरी माार लिहिला आहे कीं, कृष्टणराव बलाळ हुजूर बंदगानआलीकडें गेले आहेत. तरी बमोजिब नकशा व करार बंदगानआली इंगरेजांचे तंबीकरितां मुतवजे मोहीम होतील व राव माार याचेविषईं अर्जमारूज करतील व हुजूर मंजूर होईल. कृष्टण-राव बलाळ हुजूर जाऊन ज्वाबसाल परस्परें होऊन निश्चय काय जाहला याची इतिला देणे, याप्रकारे लिहिलं आहे, व नूरमाा खान व नरसिंगराव यास खान माारानें लिहिलें आहे कीं बंदगानआलीचे जनाबेंत इंगरेजांचे तरफेनें वकील आहे व हुजुरांत इंगरेजांची ज्यानबदारी मंजूर. सांप्रत कृष्टणराव बलाळ हुजूर गेले आहेत. हे बहुता दिवसापासून मध्यस्त व ज्वाबसालाचे बानीकार, हुजूरीहून

जो इरशाद होईल त्याचा रदजवा(ब) राव माारनुलेकडून होणार नांहीं व मर्जी मुबारकेप्रमाणें कबूल करून पंतप्रधानांचे कारपरदाजास लिहतील. कारभाऱ्यास रावजीची खातरदारी जरूर व मुख्तार होऊन गेले असतील यास्तव तुम्हीं बालाजीपंत व हरीपंतास स्पष्ट सांगणं कीं इंगरेजासीं दारमदार सर्वथैव न करावा.

२

(पैवस्त) छ २३ माहे शवाल सन ११९५ हिजरी शुक्रवार.

पुरवणी अखबार पुणें छ १४ शवाल सन ११९५ हिजरी.

इंगरेजांचे कौल कराराचा विश्वास व निश्चय सर्वथैव नांहीं. सांप्रत आम्हांकडील जरब इंगरेजास फार लागली. याकरितां बमय साष्टी वगैरे मकानें घेतलीं तें देऊं म्हणतील तर हीं यैक्यता न करावी कदाचित दारमदार करण्यांतच क्षेम व सलाह दौलत व समयोचित जाणून कारभाऱ्यांचे चितांत स्नेह करावयाचा असलियां आम्हास पूर्वसूचना करणें. आम्हाकडें इंगरेजांचा सिलसिला फार आहे. मिनतवार व आमचे खातरख्वाह व पंतप्रधानांचे मनोदयानुरूप दारमदार केला जाईल. बंदगानआलीचे विद्यमानें इंगरेजांसी दारमदार व स्नेह पंतप्रधानांचे कारभाऱ्यानीं न करावा. हजरत बंदगानआली इंगरेजांचे तंबीकरितां मुतवजे जाहलियां थोडक्या तरद्दूदींत इंगरेजांची तंबी करारवाकई होईल. सदरहू लिहिल्याप्रमाणें नूरमाा खान व नरसिंगराव यानीं बालाजीपंत व हरीपंतास वर्तमान सांगितलें. उभयतानीं उतर केलें कीं इंगरेजांसी दारमदार केल्यापक्षीं हैदरआलीखानाचे इस्तसवाबेनं होईल. व सलूकाविषईं इंगरेजांचा पैगाम आलियां परस्परें शरीक मसलहतांस इतिला करून त्यांचे सलाहानुरूप स्नेह करावा म्हणोन पूर्वीच करार जाहला आहे. याप्रमाणं उभयतां वकीलास सांगितलें व हैदरआलीखानास प्रत्योतर लिहून पाठविलं म्हणोन यैकिलें.

पंतप्रधानांचे कारपरदाजानीं वकीलाकडून हैदरआलीखानास सूचना लिहविली होती कीं बंगाल्यांत फौज पाठवावयाची तजवीज आहे. पंतप्रधानांचे सरकारांत रुपयाची आमदनी थोडकी. वीसपंचवीस लाख रुपयेपर्यंत हैदरआलीखानाकडून मदद जाहलियां फौज रवाना होईल. सदरहू आन्वयानें वकीलांनी खान-माारास लिहिलें होतें हा माार पेशजी आखबारेंत लिहिला आहे. सांप्रत हैदरआलीखानानें वकीलास प्रत्योतर लिहून पाठविलें कीं, बंगाल्यास फौज पाठवावी हे तजवीज बहुत चांगली आहे. खामखा पाठवणें म्हणोन बालाजीपंतास सांगणं व बमोजिब करार साल माारचे पेशकसीबाा रुपये बारा लाख आखर फसल रबी द्यावयाचा करार आहे. बशर्त फौजेची रवानगी बंगाल्यास जाहली तर जे समईं कार-परदाजांस रुपये सापेक्ष होतील ते समईं पाठऊन देऊं. हें वर्तमान नूरमाखान व नरसिंगराव यानीं बालाजीपंत व हरीपंतास सांगितलें उभयतांनी प्रत्योतर केलें कीं दुसाला पेशकसीबाा रुपये चोवीस लाख द्यावे म्हणजे पंचेवीसतीस हजार फौजेची रवानगी बंगाल्यास होईल व इंगरेजांचा मूळ छेद होईल. येविषईं पुन्हां हैदरआलीखानास लिहून उतर सत्वर आणवणं.

अरकाट वगैरे इंगरजांचा तसरूफी मुलक हैदरआलीखानानीं सोडविला आहे. व पूर्वीं पंतप्रधानांचा व हैदरआलीखानांचा करार जाहला आहे कीं जो मुलुक तसखीर होईल

३

(पैवस्त) छ २३ शवाल सन ११९५ हिजरी शुक्रवार.

पुरवणी अखबार पुणें छ १४ शवाल सन ११९५ हिजरी. त्यापैकी निमे पंतप्रधानानीं घ्यावा व निमे खान माराचे तसरूफांत राहावा व पंतप्रधानांचे तरफेनें मातबर सरदार फौजेसुधां हैदरआली खानास शरीक लढाईत असावा. याप्रमाणं करार जाहला आहे. यास्तव पंतप्रधानांचे कारभाऱ्यानीं साल माारीं लक्ष्मणराव रास्ते यांचे बिरादरास दोन हजार स्वारानसीं रवाना केलें. ते फौज व सरदार

खान माारनुलेस शरीक जाहले. इंगरेजांकडील तसरूफी मुलुक घेतला त्यापैकीं निमे कराराप्रमाणं पंतप्रधानास द्यावा. यासबब हैदरआली-खानानें वकीलास लिहून पाठविलें. व वकीलानी बालाजीपंतास सांगितलें कीं इंगरेजाकडून जो प्रांत सोडविला आहे त्यापैकीं निमे प्रांतात तुम्ही आपल्या तरफेचे आमील पाठऊन अमल दखल करणं. बालाजीपंतानीं उतर केलें कीं कर्नाटक प्रांती जो मुलुक सोडविला त्याचे यैवजीं धारवाड प्रांती माहाल द्यावे म्हणोन पूर्वी कराराचे समईं आम्ही सूचना केली आहे. सांप्रत आम्हास रुपयाची जरूरी आहे. याकरितां निमे मुल्काचे तसखीसीचा यैवज नख्त रुपये साल माारीं हैदरआलीखानानी आम्हांस द्यावे. पेस्तर सालापासून धार-वाड प्रांतीं यैवजी महाल नेमून द्यावे. याप्राा तुम्हीं खान माारनुलेस लिहिणं. आम्हीं कृष्टणराव जोसी यास लिहितों तेही खान माारास सूचना करतील. याप्राा सांगितलें व पत्रें रवाना जाहलीं.

करनल गाडराकडून चिनापटणवाले जनरालास कुमक येणार याकरितां मुंबई व सुरत प्रांतीं फौज पाठऊन इंगरेजास वोढा बसवणं म्हणोन हैदरआलीखानानं येथील कारपरदाजास लिहिलं आहे.

छ १२ रमजानीं जनराल कूटासीं व हैदरआलीखानासीं लढाई जाहली. तें वर्तमान नरसिंगराव वकीलाचे जुबानीं यैकिल्याप्रमाणं पूर्वील पत्रीं लिहिलं आहे. सांप्रत शाहनुरीहून कोण्ही सेवकाचे स्नेहितानीं पत्र पाठविलं त्यांत लढाईचा माार सुचविला तो सेवसी लिहिला असे. बंगाल्याहून हजार तुरक स्वार व हजार गोरे व आठ हजार बारचे जवान, व राजाराम नामे जमीदार पांच हजार काळे प्यादेसहित व शंभर तोफा येणेंप्रमाणं जनरालास कुमक आली. त्या-उपरी जनराल कूटासीं व हैदरआलीखानासीं प्रथमतां लढाई जाहली. त्यांत मीर वगैरे सरदार व पांच हजार स्वार व पायंचे मिळोन माणसें ठार जाहलीं. त्याउपरी दुसरी लढाईं रमजानची ७ सातवी किंवा बारावे तारीखेस जाहली. त्या लढाईंत दोन हजार स्वार व तीन हजार प्यादे व येकदोघें सरदार कामास आले. मातबर लढाईं जाहली.

४

(पैवस्त) छ २३ शवाल सन ११९५ हिजरी शुक्रवार.

पुरवणी अखवार पुणं. छ १४ शवाल सन ११९५.

व इंगरेज व हैदरआलीखान दोघेंही मातबर सरदार व हिमतीचे याकरितां कायम राहिलें. इंगरेजासमीप तीस हजार बारचे जवान व काले प्यादे व दोन हजार तुरक स्वार व दोनसें तोफा येणेंप्रमाणें जमीयत व चिनापटणाहून च्यार कोस हैदरआलीखानाचे रुखावर मौजे पुनवलीसमीप मुकामात करून राहिला आहे. हैदरआलीखान कंचीसमीप आहे. लढाई दरपेश, यश आपेश ईश्वराचे स्वाधीन. सदरहू शाहनुरीहून वर्तमान आल्याप्रमाणं लिहिलं असे.

राजे चेतसिंग यानें दग्यानें मिस्तर हिस्तैनास दस्तगीर केलें हे वर्तमान येथील कारपरदाजांचे सांगितल्याप्रमाणं व माहदाजी सिंदे व नागपुरीहून वकीलानीं कारपरदाजास पत्रें पाठविलीं त्यांत मार व सावकारी पत्रं आलीं म्हणोन पूर्वी पयदरपय वर्तमान लिहिलं असे. सांप्रत कासीहून मुजरद कासदाची जोडी आली. व त्याचे जुबानीचं वर्तमान कासदांचे मिरध्यानें बालाजीपंत व हरीपंतास सांगितलें व सेवकानें यैकिलें जे दोनसें प्यादे व च्यार इंगरजांचे सरदार यांस मारून चेतसिंग गंगा पार होऊन रामगडास गेला. त्याउपरी मिस्तर हिस्तैनानं कासीहून कूच करून चिन्हारचे किल्यास कासीहून दक्षणेस आठ कोसी गंगेचे तीरीं इंगरेजांचे तसरूफांत आहे तेथें गेला. चेतसिंगानें दाहा हजारपर्यंत स्वार प्यादे चिन्हारास पाठऊन किल्यास माहासरा केला. व जंगी सरजाम वगैरे मिस्तर मारानं कलकत्याहून आपले समागमं आणिला होता तो चेतसिंगाचे तसरूफांत आला आहे. मिस्तर मारासमीप जंगी सरजाम नांहीं याकरितां अजीज जाहला होता. याप्रा वर्तमान कासदांचे जुबानीं यैकिलं.

बंगाल्यास फौज पाठवावी म्हणोन येथील कारभारी मुखेंकडून बोलत आहेत. परंतु तरदूद व उद्योग किमपि दिसत नांहीं.

सुरापूरकर बेडरांचे वकीलानीं बाकी बाा दुसाला पेशकसीचे रुपयाची निशा करून पुन्हा दाहा हजार रुपये नजर देतों म्हणोन करार केला आहे. परंतु पंतप्रधानांचे तरफेचा वकील व पत्रें बेडर माारास पुण्यास येण्याविषईंची आद्यापि गेलीं नांहीत.

हरीपंत छ ९ शवालीं डेरे दाखल जाहले. त्यानंतर छ ११ माहे माारी डेऱ्याची हरकत करून गारपीरासमीपच आहेत. संभर सवासे स्वार व शागिर्दपेशा वगैरे दोनसें पायचे लोक जमीयत डेऱ्यासमीप आहे.

बालाजीपंत मेनवलीस जाणार म्हणोन वदंता. फरूख मिरजा येहतशामजंग निरमलकर यानीं खुषबोईचे पेटारे यथील कारपरदाजास ७ सात पाठविले आहेत.

बालाजीपंत	हरीपंत	कृष्टणराव	भवानी सिवराम
३	२	१	१

७

येणेंप्रमाणं पाठविले आहेत. खान माारनुलेचे वकीलानं आद्यापि कारपरदाजास पावते केले नांहीत.

A. R. No. 121

१५ शवाल ११९५ हिजरी

४ अक्टोबर १७८१

(पैवस्त) छ २३ माहे शवाल सन ११९५ हिजरी शुक्रवार साइंकाली मारफत दारोगे हरकारे.

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ १५ माहे सवाले मुाा पुणे श्वामीचे कृपावलोकणकरून येथास्तित जाणौन श्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. येथील वर्तमान

छ १० माहे मजकूर रोज शणवारी दोन प्रहरा सरकारचे डाकेसमागमे विनंतीपत्र सेवेसी रवाणा केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्याणास येईल. तदनंतर येथील वर्तमान राा हरीपंत डेरे दाखल जाले. हे सविस्तर वर्तमान विनंतीपत्री लेखण केले होते. त्याजवरून श्रुत जाले असेल. हरीपंत पुण्याबाहेर पूर्वेस गारपीराजवल डेरे देऊन मुकाम करून आहेत. पाचच्यारसे श्वारही डेऱ्याजवल आहेत. पूर्वी लोकास पत्रे लिहिली होती की सत्वर येणे. काही काही लोक फौजेचे जमा होतात. महिन्या पंधरा दिवसा (त) फौजही जमा होईल श्रुत होये. संध्याकाली नानाचे वाडयात दरबार वगैर जाला होता माली व मुलकी कामकाज ज्यारी आहे. श्रुत होये. छ ११ रोज रविवार कल्याणीस दोनतीन पलटणे होती ते वसईस व ममईस गेली यैसे वर्तमान होते. प्रस्तुत वर्तमान आहे की, मागती ते पलटणे कल्याणीस येणार यैसे वर्तमान आहे. करनेल गाडर सुर्तेस आहे तो फतेसिंग गायेकवाडाकडे जाऊन सिंद्याचे शेहचास पलटणे आहेत त्याचे मदतीस जाणार. यैसे वर्तमान होते. त्यास तिकडे मार्ग न चाले म्हणौन करनेल मागती ममईस येणार. यैसी वदंता आहे मागती तिकडील वर्तमान आलियास सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होये. कलकतेकर सुभा तो वाराणसीचे राज्याणे मारला. आणिक मोठे मोठे ठाणी त्या प्रांती आसपासी होती. तेथे इंग्रज होते. तेही इंग्रज मारले यैसी वदंता आहे. वारानसीकर राज्याजवल आसपासचे राजे रजवाडे वगैरे मिलून पंचवीस हजार जमा जाले आहेत. याजकडील बुंधेलेही राज्यास मिलाले आहेत. राजे वगैर मातबर ज्यमाव करून प्रयागास वगैर इंग्रजाचे ठाणी आहेत तेथे उपद्रव करणार यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. छ १२ रोज सोमवार नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. नानाचा व हरीपंताचा च्यार घटका खलवत जाला. उप्रातिक नाना आपले घरास आले. खलवतीचा भाव अैकिल्यात आला की फौजा वगैर जमा कराव्या. जमा जाल्यानंतर काही फौज व आपा बलवंत वगैर बालाघाट व पंचमाहाल वगैर इकडे रवाणा करावे कारण की तिकडील कादार वगैर याजकडील

उठले आहेत. पैकाही सुरक्षित येत नाही. या अर्थी आपा बलवंत वगैर याची रवाणगी त्या प्रांती करावी यैसी यौज्यना करितात. दुसरे कारण आहे की राव मजकूर तेथे आले आहेत त्याच्याही बोलन्यात बल पडावे या अर्थी आपा बलवंत वगैर याची रवाणगी पंचमाहाल वगैरकडे करावी यैसी तजवीज करितात. निश्चये जाल्यास लेखण केले जाईल श्रुत होये. प्रस्तुत इंग्रजाचा शह कोकण प्रांती विशष नसता, हरीपंत त्वरा करून बाहेर निघाले. म्हणौन येथील लाहान थोर लोक बहुमुखी वर्तमान बोलतात की येज्यमानसाहेबाचे स्नेहयात काहीयेक संशय आहे. दरबारी व कारभाऱ्याचे मुखी तो यैकिल्यात नाही परंतु येथें बहुमुखी वर्तमान आहे. यैकिलें वर्तमान लिहिले असे श्रुत होये.

छ १३ रोज मंगलवार होलकर वाफगावास आहेत तेही डेरे दाखल होणार. फौज वगैर जमा करितात यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. कोकण प्रांती बाजीपंत आणा याची रवाणगी करावी यैसी यौज्यणा करितात कारण की कल्याणी वगैरस शहे द्यावा यैसे आहे. श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. विदित होये.

छ १४ रोज बुधवार हैदर नाइकासी व इंग्रजासी चिनापटनाकडे लढाई जाली. काहीयेक हैदर नाईक सिकस्त होऊन माघारी सरले यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास लेखण केले जाईल. श्रुत होये. फौज वगैर सत्वर जमा जाली पाहिजे म्हणौन नाना फडनीसही दिपवालीचे संधीस डेरे बाहेर होऊन राहाणार यैसी वदंता आहे. निश्चये जाल्यास लेखण केले जाईल. श्रुत होये. पुढे जे प्रसगाचें वर्तमान ध्यानास येईल, ते लेखन केले जाईल. सदैव आज्ञापत्री परामृश करीत जावा. बहुत काये लिहिणे कृपा लोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 122

१६ शवाल ११९५ हिजरी

५ आक्टोबर १७८१

पैा छ २५ शवाल रविवार सन ११९५ हिजरी, दोन प्रहर मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरी, यथील वर्तमान ताा छ १६ शवाल आश्विन वद्य ३ त्रितीया शुक्रवारपर्यंत मो पुणें क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, कृपा-पत्र मरकूम छ ४ शवाल व रवानगी छ ५ माहे माारचें चिरजीव राजश्री रघोतमराव यांचे पत्रासहित डांकेवर पाठविलें तें छ १६ माहे माारीं सूर्योदईं पाऊन सविस्तारें वर्तमान श्रवणीं संतोष जाहला. राजश्री कृष्टणरावजी हुजूर पावले व शरफ मुलाजमत हासल केली. उभयतां स्वामीं व नवाब मोमुनुदौला बहादरांची व रावजीची भेट जाहली. याचा विस्तार चिरजीवानी लिहिला त्याप्रमाणें कळला व सेवकास जो आनभव आहे त्याची इतिला सर्व स्वामीस. व या राजद्वारीचे ग्रहस्तांचा सांप्रदाय स्वामीस लोपला नांहीं. तत्रापी पंतप्रधानांवर हजरत खुदावंदन्यामतीची कृपा व हुजूरचा नफा व थोरांची परस्परें यैक्यता विशेष व्हावी याची योजना स्वामी-समान सदयहृदय करीत आहेत. सविस्तारें वर्तमान चिरजीव विनती करतील व आखबारेचें वर्तमान पृथक पत्रावरून सेवेसी श्रुत होईल. हुजूर खारिज. वर्तमान मंजूर, याकरितां खारिज शोध करून लिहितों. परंतु कारपरदाजांचा खुलासा विन्हां त्यांची भेट व परस्परे भाषण कळत नांही. याकरितां राजश्री बाळाजीपंताचे दर्शनोतर त्यानीं सांगितल्याप्रमाणें व अवांतर वर्तमान लिहिलं आहे. बहुत काय लिहिणं हे विनती.

पैा छ २५ शवाल रविवार सन ११९५ हिजरी, द्रोन प्रहर मैं डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १५ शवाल लगायत छ १६ माहे माार सन ११९५ हिजरी. आश्विन वद्य त्रितीया शुक्रवार.

हैदरअलीखानानें बालाजीपंत व हरीपंतास नूरमाखान व नरसिंगराव वकीलास पत्र पाठविलीं. त्याचा खुलासा कृष्टणराव बलाळ हुजूर गेले आहेत तरी हजरत बंदगानआलीनीं इंगरेजांचे तंबीस मुतवजे व्हांवें. हे सलाहदौलत सर्वत्रांचे उपयोगी. कदाचित इंगरेजांचीं तबी करावी हें मंजूर न जाहलियां दारमदार करा म्हणतील. व पंतप्रधानांचे कारपरदाजास इंगरेजांसी दारमदार करणं प्राप्त होईल तरी अम्हाकडें म्हणजे खान माारनुलेसी जनराल कूट याचा सिलसिला मिनतवार आहे. यास्तव आमचे विद्यमानें करणें. व बंगाल्याचे मोहिमेस पंतप्रधानांची फौज रवाना होईल तरी पेशकसी बाा रुपये आखर फसल रबी द्यावयाचे जे समईं सापेक्ष ते समईं देऊं व बमोजिब करार इंगरेजांकडील तसरूफी प्रांत सोडविला आहे. त्याचे निमेचे माहालांत पंतप्रधानानी आपले तरफेचे आमिल पाठऊन अमल करावा. व खान माारासी व जनरालासीं लढाईं छ ७ रमजानी जाहली. त्याचा माार व कासीहून कासदजोडी पुणेकर ग्रहस्तांची आली. त्याचे जुबानीचें वर्तमान मेस्तर हिस्तैन चिन्हारगडास गेला आहे व चेतसिंगानें माहासरा केला. व इंगरेजांसमीप जगी सरजाम नांहीं. याकरितां अजीज जाहला आहे. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ १५ माहे माारीं अखबार पाठविली तें पाऊन वर्तमान हुजूर व स्वामीस कळलें असेल. त्या उपरी यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान दफेवार हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलं आसे.

कासदाचे जुबानीं कासीचे वर्तमान यैकिल्याप्रमाणें छ १५ माहे माारीं अखबार रवाना केली त्यांत लिहिलें आहे. याहून पूर्वी

अखबारेंत वर्तमान लिहिलें होतें कीं चेतसिगानें मिस्तर हिस्तैनास दस्तगीर केलें. या वर्तमानास व कासदाचे जुबानी यैकिल्यास अंतर बहुत, याकरितां बळवंतराव वांकडे नामे सावकार कासींत दुकान मातबर व माारनुलेचे भाऊ आहेत, याकरितां वांकडयासमीप सेवकानें आपले गुमास्त्यास पाठऊन वर्तमानाचा शोध घेतला. त्यानीं सांगितलें कीं सागर व मिरजापूर कासीहून वीस व चालीस कोसाचे तफावतीनं आहे. दोन्ही स्थलीं आमची दुकानें व गुमास्ते आहेत. त्यानीं पत्रें पाठविलीं. त्यात माार दोन प्रकारचा. मेस्तर हिस्तैन कासीहून सातआठ कोसी गेला. तेथें चेतसिंग मातबर जमीयतेनसीं जाऊन हिस्तैन माारास दस्तगीर केलें व लढाईंत मारला गेला. याप्रमाणें कलमी खबर आली. माहदाजी सिद्याचीं पत्रें व नागपुरीहून पत्रें आलीं त्यांत माार हिस्तैनास चेतसिंगानें दस्तगीर केलें. याप्रमाणें सर्वत्रांचे जुबानी खबर. कासदांचे जुबानीचे वर्तमान बालाजीपंत फडनवीस यास विचारावयाकरितां छ १६

२

पुरवणी अखबार छ १६ माहे शवाल सन ११९५ हिजरी. माहे माारीं दरबारास गेलों. खिलवतेंत राजश्री बालाजीपंताची भेट जाहली. मिस्तर हिस्तैनास चेतसिगानें दस्तगीर केलें. हें वर्तमान माहदाजी सिंद्यानीं व सागराहून बाळाजी गोविंद बुंदेल्यानीं लिहिलें व सावकारांचे गुमास्त्यांची लिहिलीं आलीं. परंतु कासीहून कासद मुजरद आमचे सरकारचे आले. त्याचे जुबानीं व पत्रीं माार आहे कीं मिस्तर हिस्तैन कासीहून पांचसाहा कोसी गेला व चिन्हारगडास जाणार. या संधींत चेतसिंगाची दाहाबारा हजार फौज येऊन माहासरा केला. इंगरेज मााराची व चेतसिंगाची लढाई होत होती. दस्तगीर केला किंवा लढाईंत मारला गेला, हें वर्तमान कासीहून पत्रें आलीं त्यांत नांहीं. परंतु लढाई शुरू होती. व आम्हाकडील कासद पत्रें घेऊन रवाना जाहल्यानंतर मेस्तर हिस्तैन याची सिकस्त होऊन दस्तगीर जाहला असेल, याकरितां सागरीहून, मिरजापुरीहून पत्रें आलीं, त्यांत दस्तगीर जाहल्याचें वर्तमान लिहिलं आलें.

याप्रमाणें कासीकडील वर्तमान बालाजीपंताचे जुबानीं यैकिलें. सारांश, मेस्तर हिस्तैन दस्तगीर जाहला किंवा निघोन गेला, या दोन्हीचा निश्चय अद्यापि नांहीं. छ ७ रमजानीं जनराल कूटासीं व हैदरआली-खानासीं लढाई जाहली. त्या लढाईंत इंगरेज पसपा होऊन माघारा गेला व खराबी फार जाहली. डेरे दांडे वगैरे लूट जाहली म्हणोन कलमी वर्तमान आलें यैसें बालाजीपंतानीं स्वमुखं सांगितलें.

सिपरीकोलारसेसमीप करनल मरेल माहदाजी सिद्याचे लढाईस मोकाबिल पंधरासोळा पलटणासुधा आहे. हें वर्तमान पूर्वी लिहिलं आहे. सांप्रत बालाजीपंताचे जुबानी यैकिलें कीं गोहदकर जाटाचे मध्यस्तीकरितां इंगरेजानीं यमुनापार जांवें व त्यास माने-मुजाहिम कोण्हीं न व्हांवें याप्रमाणें करार ठरला. व गोहदकर जाट इंगरेजांसी शामील होता, तो अलाहिदा होऊन गोहदेस गेला. अठरा दिवसाचे फुरसतींत करनल मरेलानें यमुनापार निघोन जांवें. करारा-प्रमाणें यमुनापार न गेल्यास माहदाजी सिंदे व जांट वगैरेनी मुतफिक होऊन इंगरेजांस गारत करावें, याप्रमाणें करारमदार गोहदकर जाटासीं व माहदाजी सिंद्यांसी जाहला. व सिंदे माराचा सरजाम व तोफा शबखुनाचे लढाईंत करनल मरेलानें घेतल्या आहेत, त्या तोफा व सरजाम गोहदकराचें विद्यमानें सिंद्यास माघारा देत होता, तो सिंद्यानीं घेतला नांहीं. याचें कारण यमुनापार पलटणें गेल्यानंतर ताकुब करून इंगरेजांची पलटणें गारत करावीं हे तजवीज माहदाजी सिंद्यांची आहे. सदरहू वर्तमान बालाजीपंताचे जुबानीं व खारिज यैकिल्याप्रमाणें लिहिलं असे.

पैा छ २५ शवाल रविवार सन ११९५ हिजरी, दोन प्रहर मै डांक सरकार.

३

पुरवणी अखबार पुणें छ १६ शवाल सन ११९५ हिजरी.

करनल गाडर डबईस आहे म्हणोन पूर्वील पत्रीं वर्तमान लिहिलं आहे. सांप्रत छ माारीं बालाजीपंताचे मुखं यैकिलें कीं करनल गाडर

डबईहून वसई व मुंबईस आला. कासींत मेस्तर हिस्तैन दस्तगीर जाहलां व हैदरआलीखान इंगरेजावर गालिब, हें वर्तमान यैकोन करनल गाडर बेइस्तकलाल होऊन, वसईचा बंदोबस्त पोख्त करावा म्हणोन डबई-हून वसईस आला असेल, याप्रमाणें बालाजीपंतानीं कयास केला आहे. गाडर वसईस आला म्हणोन खारिजहीं चर्चा यैकिली.

कृष्टणराव बलाळ यांचे पुत्र नवरात्राचें उत्साहकरितां बारा-मतीस गेले होते ते छ माारीं रात्रौ पुण्यास आपले हवेलीस आले. या उपरी नवल विशेष जे वर्तमान यैकिल्यांत येईल ते विनती लिहीन हे विनती.

पैा छ २५ शवाल रविवार सन ११९५ हिजरी, दोन प्रहर मै डांक सरकार.

A. R. No. 123

२१ शवाल ११९५ हिजरी
१० आक्टोबर १७८१

पैा छ १ माहे जिलकाद संन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगे.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान ता छ २१ माहे शवाल, आश्विन वद्य अष्टमीपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ १७ माहे माारीं डांकेवर लिफाफा रवाना केला तो दारो-ग्याचे विद्यमानें सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रतचें वर्तमान पृथक पत्री लिहिलं आहे त्यावरून श्रुत होईल. इंगरेज बदमामली व त्यांची तंबी वाकई करावी हे सलाहदौलत व हा समय इंगरेजांचे

पारपत्याविषईं बहुत नादर प्राप्त जाहला आहे. या वेळेस उपेक्ष्या केलियां, करोडो रुपये खर्च केल्यानेंहीं या प्रकारची काबू व समय साधणार नांही. या अर्थीं हजरत बंदगानआली इंगरेजांचे तंबी-विषईं मुतवजे होण्याचा अर्ज कृष्टणराव बलाळ करतील तो मान्य करतील, या प्रकारें कल्पना व कयास येथील कारपरदाज करीत आहेत. सेवसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें, हे विनती.

पैा छ १ माह जिलकाद सन ११९५ हिजरी रोज शेनिवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १७ शवाल लगायत छ २१ माहे माार सन ११९५ हिजरी, बुधवार.

मेस्तर हिस्तैन कासीहून निघोन चिन्हारगडचे सुमारें जात असतां, चेतसिंग जमीदार यानें कासीहून सात कोसी गांठ घालून माहासरा घातला व छ ७ रमजानीं हैदरअलीखानासी व जनराल कूटांसी लढाई जाहली त्यांत मुकसानी दुतरफा जाहली. परंतु जनराल मजकूर पसपा होऊन चिनापटणास गेला व सिपरीकोलारसेसमीप करनल मरेल इंगरेज सिंद्याचे रुखास होता तो अजीज होऊन माघारा जातों म्हणोन गोहदकर जाटाचे मारफातीनें करारमदार सिंद्यासी केला व जाट मजकूर इंगरेजापासून अलाहिदा होऊन गोहदेस गेला व करनल गाडर सुरतेहून वसईस आला. याप्रमाणें बालाजीपंत फडनवीसांचे जुबानीं वर्तमान यैकिलें तें छ १७ माहे माारीं डांकेवर पत्रें पाठविलीं. तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन हुजूर स्वामीचे सेवेसी श्रुत जाहलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान सांप्रत दफेवार लिहून पाठविलं आहे.

करनल गाडर डबईस राहून तेथोन फतेसिंग गाइकवाडाचे साज-सेकरितां बडोद्यास गेला होता. माहदाजी सिंद्याचे मुकाबिल्यास जाणें किंवा खानदेशांत प्रांत सोडवणें हे दोन्ही पैगाम फतेसिंगानें कबूल

केले नांहीत. नख्त रुपये पांचसात लाख रुपयेपर्यंत मागत होता. येवि-षई रदबदली फार जाहली. सेवटीं दोन लाख रुपये कबूल केले. त्या उपरी गाडर नाखुसीनें बडोद्याहून पुन्हा डबईस गेला. त्या संधीत कासीकडे हंगामा जाहल्याचें वर्तमान आलें त्यावरून गाडर बहुत बेइस्तिकलाल होऊन सुरतेस गेला. तेथोन मुंबईस जाणार. याप्रमाणें वर्तमान, बडोद्यांत पंतप्रधानांचे तरफेनें फतेसिंग गाइकवाडासमीप अप्रसिध ग्रहस्त आहे, त्यानीं येथील कारभाऱ्यास लिहून पाठविलें म्हणोन यैकिलें. पंतप्रधानाकडील स्नेहाचा सिलसिला फतेसिगानें अंतस्थ बहुत ठेविला आहे.

करनल गाडर सुरतेहून वसईस आला व तेथोन मुंबईस आला म्हणोन येथील मुतसद्याचे जुबानीं व खारिज यैकिलें.

सिपरीकोलारसेसमीप करनल मरेल जमीयतेसुधां होता तो माघारा गेला म्हणोन खारिज यैकिलें.

करनल गाडरानें अहमदाबाद शहरचें ठाणें फतेसिग गाइकवाडाचे स्वाधीन केलें व तेथील लोक आपलेसमीप आणविले व गाइकवाड माारानें पांच लाख रुपये गाडरास दिल्हे हेहीं वर्तमान खारिज यैकिलें.

श्रीनिवास

२

पुरवणी अखबार पुणें छ २१ शवाल सन ११९५.

करनल गाडर वसईस आहे व दोन कासाचे फासल्यानें डेरे दिधले व तोफा व दारू वगैरे जंगी सरजाम कल्याणीस पाठविला व तयारी होत आहे म्हणोन खारिज यैकिलें.

हैदरअलीखानाकडील ताजें वर्तमान आलें नांहीं. इंगरेजांचे तंबीस हजरत बंदगानआलीनी मुतवजे व्हांवें हा माार खान माारनुलेनें नूरमाा खान व नरसिंगराव वकील व येथील कारपरदाजास लिहिला होता, याचा तपसील पूर्वील पत्रीं लिहून पाठविला आहे. कृष्टणराव बलाळ यांचे पुत्र गोविंदराव कृष्टण बारामतीहून पुण्यास आल्यानंतर

बालाजी जनार्दन यानीं नूरमाा खान व नरसिंगराव यांस दरबारास बोलाऊन आणिलें व गोविंदराव कृष्टण यांचे रूबरू वकीलाकडून वर्तमान पुन्हां बयान करविला.

राजश्री गोविदराव कृष्टण दसऱ्यास बारामतीस होते. माार-नुलेस पालखी द्यावयाचा निश्चय जाहला होता. परंतु हाजर नव्हते याकरितां बारामतीहून येण्याची मार्गप्रतीक्षा होती. छ माारीं पंत-प्रधानानीं गोविंदराव कृष्टण यांस पैठणी मुंडासें व सेला दोन सनगें देऊन पालखी दिधली. सेवेसी श्रुत होय·बहुत काय लिहिणें हे विनती.

पैाा छ १ माहे जिलकाद संन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर माा दारोगे.

A. R. No. 124

२२ शवाल ११९५ हिजरी
११ आक्टोबर १७८१

पैाा छ १ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगे.

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २२ माहे शवाल माा पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानद लेखनआज्ञा करीत असिले पाा. विशेष, येथील वर्तमान छ १७ माहे माार रोज शनवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर येथील वर्तमान राजश्री हरीपत डेरे दाखल होऊन आहेत. हजारपाचसे स्वार डेऱ्याजवल जमा होऊन आहेत. लोकास ताकीद करून पाठवितात की सत्वर जमा व्हावे. नित्यशा लोकही से दोनसे जमा होऊन येत असतात. महिन्या दीडा महिन्या फौज जमा होईल.

शृत होये. राजश्री नाना हरीपताचे डेऱ्यास गेले होते. नानाचा व हरीपताचा खिलवत जाला. उपरातिक नाना आपले घरास आले. खलवताचा भाव की, फौज वगैर जमा करून पुढे स्वारीचा उद्वोग सत्वर करावा. याअनवये जाला. शृत होये. दरबार वगैर जाला होता. लोकाची देन्याघेन्याची कामे वगैर जाली. शृत होये. छ १८ माहे माार रोज रविवार. करनेल गाडर इग्रज सुरतेकडे होता. प्रस्तुत वर्तमान आले आहे की गाडर माार ममईस आला. कल्यानीस पलटने होती ते वसईस व ममईस गेली होती. मागती ते पलटने कल्यानीस गाडरानी ममईहून पाठविली. पलटने कल्यानीस आली व गाडरही कल्यानीस येणार. सत्वरच हगामा करणार यैसे वर्तमान आहे. दुसरे वर्तमान आहे की कल्यानीस पलटने याव (या) चे कारन की बेलापूर व कल्यान प्रातात साली तयार जाल्या आहेत, त्या कापून साली तयार करून ममईस नेनार. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. कल्यानीस पलटने आली म्हणौन येथून कोकनप्राती रा। बाजीपताची रवानगी करावी यैसी यौज्यना आहे. शृत होये. राजश्री कृष्टणरावजीनी कारभाऱ्यास लिहिले होते की रा। हरीपत वगैर यास डेरे दाखल करावे. फौज वगैर जमा करावी. कारन की, येथील जाबसालास बल पडल याअनवये लिहिले होते. म्हणौन यैकिले. त्याजवरून हरीपत सत्वर डेरे दाखल जाले. फौज वगैर जमा जालियावर काही फौज व येखादा सरदार नेमून पंचमाहाल अथवा बेदर प्राताकडे रवाना करनार यैसी यौज्यना करितात. निश्चये होऊन रवाना केल्यास लेखन केले जाईल शृत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. शृत होये. छ १९ रोज सोमवार. श्रीमत परवतीस देवदर्शनास गेले होते. दर्शन करून सध्याकाली श्रीमत आपले वाडयास आले. शृत होये. राजश्री नाना हरीपताचे डेऱ्यास गेले होते. नानाचा व हरीपताचा येक प्रहरपावेतो खिलवत जाला. उपरातिक नाना आपले घरास आले. खिलवताचा भाव यैकिल्यात आला की गाडर ममईस आला. पलटने वगैर कल्यानीस आली. कदाचित त्याने पुढे बोरघाटाकडे चाल केली तर त्याचे

शहास मातबर फौज पाठविली पाहिजे, याकरिता होलकरास व बाजी-पतास इग्रजाचे शहास कोकनप्राती रवाना करावे. याअनवये खिलवत जाला. आनिक कितीक आपले दौलतीचे बदोबस्ताविषई खिलवत जाला· शृत होये. होलकरही वाफगावास डेरे दाखल होऊन हरीपताजवल येणार. फौज वगैर जमा करनार. होलकर फौजेकरिता काही यैवज मागनार. याकरिता होलकराकडील नारो गनेश दिवान व पाराजीपंत येथे कारभाऱ्याजवल येनार. शृत होये. श्रीमत राजश्री दादासाहेब व फतेसिग गायेकवाडाची फौज व काही पलटने वगैर यैसा ज्यमाव करून कोडाईबारीकडे खानदेशप्राताकडे येणार यैसे व(र्त) मान आहे. दुसरे वर्तमान आहे की गाडर माार यानी कल्यानीस येऊन पुढे चाल केल्यास, तिकडे श्रीमत राा दादासाहेबानी कोडाईबारीकडे चाल करावी यैसा निश्चये जाला आहे म्हणौन वदंता आहे. मागती कल्यानी वगैरकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. छ २० रोज मगलवार· हैदर नायेकासी व चिनापटनकर इग्रजासी लडाई मातबर जाली. नाईक माार याज-कडील मणुशे फार जाया जाली. इग्रज त्यावर काहीयेक गालिब आहेत. यैसे वर्तमान आहे शृत होये. नाईक माार याजकडील वकील कारभाऱ्याकडे आले होते. कारभाऱ्यासी व वकील माार यासी खिलवत जाला. हैदर नायेकास पत्रे लिहिली· शृत होये. राजश्री गोविदराव गायेकवाड दावडीस आहेत. त्याची काही उभा-रनी करावी यैसी यौज्यना करितात. गायेकवाड माार याचे दिवान-गिरीवर राा गनपतराव कोलटकर उभे केले. त्यानी काही साव-कारापासून यैवज घ्यावा, काही यैवज सरकारातून घ्यावा अन गायेक-वाड माार याची उभारनी करून, गुजरातप्राती पाठवांवे यैसी यौज्यना करितात· निश्चये जाल्यास लेखन केले जाईल शृत होये. छ २१ माहे माार रोज बुधवार. सिद्यासी व इग्रजासी लडाई हिदुस्तान प्राती आहे. सिद्यानी काही

पुरवनी २

येक इग्रज जेर केले यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल· शृत होये. राजश्री गोविदराव,

कृष्णरावजीचे चिरजीव, बारामतीस गेले होते ते येथे आले. शृत होये. याचे मसलतीचा विच्यार यैकिल्यात आला की हरीपतानी व होलकर वगैर यानी फौज जमा करून असावे. कोकनप्राती व कोडाईबारीकडे पंचमहाल वगैरकडे फौजा रवाना कराव्या. जिकडे मातबर शह पडल्यास तिकडे हरीपतानी शह द्यावा. नानानी पुन्यात राहावे अथवा बाहेर डेरे दाखल होऊन राहावे, यैसा विच्यार यैकिल्यात आहे. कोकनप्राती मातबर इग्रजाची गडबड न जाल्यास हरीपतानी सिधटेकापावेतो जावे यैसीही वदता आहे. शृत होये. पुढे अमवाशास ग्रहन आले आहे म्हणौन नाना दो ती दिवसानी मेणोलीस क्रिष्णातीरास जाणार. ग्रहन करून मागती सत्वरच येनार. हरीपंतही ग्रहनाकरिता तुळापुरास भीमातीरास जाणार यैसी वदता आहे. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल, ते सेवेसी लेखन केल जाईल. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

पैा छ १ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगा.

A. R. No. 125

२४ शवाल ११९५ हिजरी
१३ आक्टोबर १७८१

पैा छ ३ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी, रोज सोमवार चार घटका दिवस राहता मै डाकेवर मै दारोगा.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सा नमस्कार. विनती उपरी, येथील वर्तमान ता छ २४ शवाल, आश्विन वद्य येकादसी शनिवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे.

विशेष. कृपापत्र छ १४ माहे माारचें चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचे लिफाफ्यासहित डांकेवर रवाना केलें तें छ २३ शवाली पाऊन बहुत संतोष जाहला. पूर्वी छ २२ माहे माारीं विनतीपत्र डांकेवर रवाना केलें तें दारोग्याचे विद्यमानें पावलें आसेल. सांप्रत इकडील वर्तमान पृथकपत्रीं लिहून सेवेसी पत्रें रवाना केली आहेंत व चिरजीवासही पत्र पाठविलें आहे. विजयादशमीचे दिवसी यजमानसाहबानीं कृपावंत होऊन, चिरजीवास खिताब राय व पांच सदी मनसब इनायत केली म्हणोन कृपापत्रीं लेखनाज्ञा होती. हा सर्व प्रताप स्वामीचा. याचें उतर पृथक विनतीपत्रीं लिहिलें आहे. तें पत्र चिरजीव सेवेसी प्रविष्ट करतील. श्रीमंत पंतप्रधान स्वामीवर यजमानसाहबांची कृपा व मुतवजे आहवाल होणें या उपयोगाचें साहित्य होईल म्हणोन पत्रीं लेखनाज्ञा होती हें वर्तमान बोलण्याचे प्रकरणी राजश्री बालाजीपंत नानासी मीं बोलिलों व हुजूरीहून श्रीमंत राजश्री राजेबाहादर भाऊ-साहबांस खिताब बाहादरीचा व नौबत इनायत जाहली व स्वामीस नौबत इनायत जाहली हें वर्तमान सुचविलें. यावरून नानास संतोष जाहला व स्वामीचा स्तव येकनिष्ट व प्रमाणिक व श्रीमंताचे राज्याचे शुभचिंतक म्हणोन फार लोक इंगरेजांचे तबीस हुजूरीचा अज्म व्हावा व यांतच सलाहदौलत. याप्रकारें यथील कारभाऱ्यांचा खुलासा आहे. इंगरेजांसी मुकाबल्यांत इंगरेज अजीज होण्याची सलाह बालाजीपंत नानानी सागितली. त्याचा विस्तार चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचे पत्रीं लिहिला आहे. सेवेसी विनती करतील व हुजूर अर्ज करावया योग्य असलियां, स्वामीचे आज्ञेनुरूप करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैा छ ३ जिलकाद सन ११९५ हिजरी रोज सोमवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २२ शवाल लगायत छ २४ माहे माार सन ११९५ हिजरी, आश्विन वद्य ११ शनिवार.

फतेसिंग गाइकवाडानें करनल गाडराचे मनोदयानुरूप सिपरीकोलारसचे इंगरेजांची कुमक करून माहदाजी सिंद्याची तंबी करावी किंवा खानदेशांत जाऊन मुलुक काबीज करावा, हे दोन्हीं मतलब कबूल केले नांहीत याकरितां गाडर नाखुष होऊन बडोद्याहून डबईस गेला. गाडराची खातरदारी जरूर जाणून, फतेसिंगानें पांच लाख रुपयेपर्यंत देऊन गाडराची फहमायश केली व गाडर माार सुरतेस आला. व तेथोन वसईस आला व डेरे वसईहून दोन कोसावर उभे केले व तोफा वगैरे जंगी सरजाम कल्याणीस पाठविला, हे तहकीक खबर व माहदाजी सिंद्याचे रुखावर इंगरेजांचीं पलटणें होतीं, तें बमोजिब करार यमुनेचे रुखें माघारा गेलीं हे खारिज यैकिल्याप्रमाणें व यावितरिक्त अवांतर वर्तमान लिहून छ २२ माहे माारीं डांकेवर हुजूरअर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें आसेल. त्याउपरी यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान दफेवार हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलं आहे.

सिपरी व कोलारसेसमीप माहदाजी सिंद्यांचे मुकाबिल इंगरेजांचीं पलटणें आहेंत. तें बमोजिब करार यमुनेचे रुखें माघारा गेलीं म्हणोन खारिज यैकिल्याप्रमाणें लिहिलें होते. छ २३ रोजी बालाजी जनार्दन यांचे जुबानी व सिंद्याकडील वकीलाचे जुबानीं यैकिलें कीं इंगरेज मरेल वगैरेनी करार आठरा दिवसाचा म्हणजे छ १० शवालीं कूच करून माघारा यमुनातीर कालपीस जांवें म्हणोन केला आहे. त्याप्रमाणें छ १० शवालीं कूच करून जातील म्हणोन माहदाजी सिंद्याची बजिनस पत्रें आलीं. त्यापक्षीं इंगरेजांचीं पलटणें कूच करून माघारा गेलीं हें खारिज वर्तमान गलत आहे.

छ २३ रोजी बालाजीपंतानीं सेवकास तकरार सांगितलें की कासीहून राजे चेतसिंग जमीदाराचें पत्र पंतप्रधानांचे नावचें आलें. त्यांत लिहिलें आहे की मेस्तर हिस्तैनानें आपल्यासी बदमामली केली. याकरितां आम्हीं आपले जबरदस्तीनें त्याचे हमराही लोकांस सजा वाकई पोंहचाऊन रामगडास आलों. हिस्तैन माार बेइस्तकलाल होऊन कासीहून निघोन जात होता. हें वर्तमान कळल्यानंतर फौज पाठऊन

चिन्हारगडासमीप गांठ घातली व हिस्तैन माारास माहासरा केला आहे. याप्रमाणें चेतसिगानें माहदाजी सिंद्यासही लिहिलें होतें. कुमकी फौज पाठवणें म्हणून लिहिलें, त्यांवरून सिद्याकडील दोन हजार स्वार व बाळाजी गोविद बुदेले वगैरे च्यार हजार, येकोन साहा हजार स्वार व प्यादे मिळोन कुमकेस गेले. सिंदे माारानीं कारपरदाजास लिहिलं आहे कीं चेतसिगाचें पत्र आल्यानंतर सागर व मिरजापुरीहून वर्तमान आलें कीं मेस्तर हिस्तैनास चेतसिंगानें दस्तगीर केलें. थेट कासींचें पत्र येऊन वर्तमान कळावयाची इंतजारी आहे. याप्राा बालाजीपंताचे जुबानीं यैकिलें.

२

पुरवणी आखबार छ २४ शवाल सन ११९५ हिजरी, शनिवार.

येथील कारपरदाजाचे चितांत आहे कीं माहदाजी सिद्याचे कुमकेस किवा सुरतप्रांती फौजेची रवानगी करावी. त्यास सांप्रत करनल गाडर वसईस आला व तोफा वगैर जगी सरजामाची तयारी कल्याणीस होत आहे. यावरून येथील कारपरदाजास संशय उत्पन्न जाहला आहे कीं गाडर कोणते रुखें जातो. बोरघांटाचा रुख केल्यास, तेळेगांवीहून त्याचे रुखावर घांटाखालें फौज पाठवणें जरूर. सुरतेकडें गाडरास जावयाचें प्रयोजन नांहीं. तत्रापी गेला तरी सुरतेचे रुखें फौजा पाठवणें लागतील. सिपरीकोलारस किंवा कासीकडील रुख आथवा चिनापटणवाल्याचे कुमकेस गाडर गेला तरी पंतप्रधानांचे तरफेनें मातबर सरदार व दाहापंधरा हजार फौज माहदाजी सिंद्यासमीप पाठऊन देऊन, सिंदे व पंतप्रधानाकडील सरदार मुतफिक होऊन, ज्या ज्या स्थलीं इंगरेजांचे लोक असतील त्यांस खारिज करून, मकानें घेऊन कासीपर्यंत जातील. सदरहू आन्वय कारपरदाजाचे जुबानीं यैकिल्याप्रमाणें लिहिला आहे.

अहिल्याबाईकडें बाबूराव वैद्य गेला होता तो आला व बाई माारकडील कांहीं पैगाम आणिला आहे म्हणोन पूर्वी लिहिलें होतें. या कामाचे उतर प्रत्योतराकरितां तुकोजी होळकराचे कारपरदाज

नारो गणेश व पाराजीपंत छ २२ शवालीं पुण्यास येऊन रो। बालाजीपंत व हरीपंतास भेटले व हरीपंतासमीप लश्करांत उतरले आहेत.

शाहजी भोंसले आकोलकोटवाले याचे तरफेचा सरदार उमदा दोनतीनसे स्वारानसीं छ २२ माहे माारीं पुण्यास आला. बालाजीपंत इस्तकबालाकरितां गेले होते.

मालोजी घोरपडे यांसी व कारपरदाजासीं जाहिरा नोकर व खावंदीचा सिलसिला चितांतून परस्परें निफाक आहे. घोरपडे माार यांची खातरदारी व तलबतनखाचे रुपये प्रतिवर्षाप्रमाणें साल माारी देऊन त्याची समजाविश कारपरदाज करीत नांहींत.

पैा छ ३ जिलकाद संन ११९५ हिजरी रोज सोमवार चार घटका दिवस राहता डांकेवर मै दारोगा.

A. R. No. 126

२५ शवाल ११९५ हिजरी

१४ आक्टोबर १७८१

पैा छ ३ जिलकाद संन ११९५ हिजरी रोज सोमवार चार घटका दिवस राहता मै दारोगा डांकेवर.

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ २५ माहे शवाल मुा पुणे, स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पा. विशेष येथील वर्तमान छ २२ माहे माार रोज गुरुवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर यथील वर्तमान राजश्री माधवराव नीलकंठ पुरधरे यास बोलाऊ पाठविले आहे की त्यानी श्रीमताजवल असावे. दुसरे, हरीपंत बाहेर निघाले आहेत, याजवल सरदार म्हणौन राहावे. फौजेचा सलाम मुजरा घेत जावा. म्हणौन माधवराव नीलकठ यास अनावयास पाठविले आहे. मग ते येतात न येतात हे पाहावे. परतु

येणार नाहीत यैसे दिसते. कारन की रा॥ बज्याबा अरगलेत आहेत याकरिता येणार नाहीत यैसे आहे. मग आलियावर लेखन केले जाईल. शृत होये. राजश्री नाना हरीपताचे डेऱ्यास गेले होते. नानाचा व हरीपताचा च्यार घटका खिलवत जाला. उपरातिक नाना आपले घरास आले. खिलवताचा भाव यैकिल्यात आला की इग्रज वगैर कल्यानीवर आले. पुढे ते चाल करनार म्हणौन त्याचे पारपत्यास फौजा वगैर रवाना कराव्या. दुसरे, राजश्री कृष्टणरावजीकडे पत्रे वगैर लिहिणार. याअनवये खिलवत जाला. शृत होये. छ २३ रोज शुकरवार इग्रजाची पलटने कल्यानीस आली. वर्तमान आहे की, दोन तीन पलटने कल्यानीहून दोन कोस पुढे विठलवाडीवर आली. करनल गाडर खासा वसईस आहे. तोही वसईहून निघून कल्यानीस येणार. कल्यानीस आलियावर पुढे बोरघाटाकडे उद्वोग करनार यैसी वदंता आहे. शृत होये. करनल गाडर वसईस आहे. तीनच्यार पलटने कल्यानी वगैरेस आहेत. आनिक ज्यमाव करून करनल वसईहून कल्यानीस येणार. आलियावर पुढे चाल करनार. त्याजवरून राजश्री बाजीपंत वगैर याची रवानगी करनलचे शहावर करनार. रवानगी केलियावर लेखन केले जाईल. दिपवाली जालिया हरीपतही येक कोसाचे कूच करून खडकीवर मुकाम करनार. कारन की इग्रजावर शह पडावा यैसे आहे. शृत होये. कोल्हारसिपरीवर इग्रज होते त्यासी व सिद्यासी लडाई होती. प्रस्तुत वर्तमान आहे की ते इग्रज जेर जाले. त्यानी काही सिद्यासी दारमदार करून माघारा गेले. परतु त्याचे पाठीमागे सिद्याच्या फौजा लागल्या आहेत यैसे वर्तमान आले आहे. शृत होये. शाहाजी भोसले अकलकोटकर याचे पुत्र येथे आले. कारभाऱ्याच्या व त्याच्या भेटी जाल्या. व श्रीमताची व त्याची भेट होनार शृत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. शृत होये. छ २४ माहे माार रोज शनवार. होलकराचे दिवान रा॥ नारो गनेश येथे आले आहेत. कारन की फौजेचे खर्चाकरिता काही यैवज मागावा येविशई कारभाऱ्यासी रदबदली करितात. लक्ष दोन लक्ष रुपये होलकरास प्रस्तुत खर्चास देनार. नारो गनेश येथून

वाफगावास गेलियावर होलकर डेरे दाखल होऊन हरीपताकडे येणार यैसे वर्तमान आहे· शृत होये. राजश्री कृष्णरावजीनी येज्यमान-साहेबाची मुलाजमत केली व दोनतीनदा खिलवत जाला. बहुतच रहशाचे भाशने जाली यैसे वर्तमान येथे आले. त्याजवरून कृष्ण-रावजीस पत्रे लिहिनार व येज्यमानसाहेबासही कारभारी अर्ज्या लिहिणार· शृत होये. कृष्णरावजीचे चिरजीवास कारभाऱ्यानी श्रीमताकडून पालखी देविली· शृत होये. नाना ग्रहनाकरिता मेणो-लीस जाणार होते. प्रस्तुत जात नाहीत यैसे वर्तमान आहे. गेलिया-वर लेखन केले जाईल· शृत होये. नाना हरीपताचे डेऱ्यास गेले होते नानाचा व हरीपता(चा) खिलवत जाला· उपरातिक नाना आपले घरास आले. वर्तमान आहे की दिपवाली जाल्यावर नानाही डेरे दाखल होनार. जालियावर लेखन केले जाईल शृत होये. इग्रजाची लाहान पचवीस तीन गलबते वसईस येत होती. वाऱ्याचे तुफान सुटले यामुले त्या गलबतातील पाचच्यार गलबते पान्यात बुडाली यैसे वर्तमान आले आहे. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल शृत होये· छ १४ माहे माारचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर केले ते छ २३ माहे माारी पावले· पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञा-पत्रे सादर करनार स्वामी समर्थ· बहुत काय लिहिणे· कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 127

२७ शवाल ११९५ हिजरी

१६ आक्टोबर १७८१

पैाा छ ६ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी, गुरवार दोन घडी दिवस राहता मै डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार· विनती उपरी येथील वर्तमान तााा छ २७ शवाल, आश्विन वद्य चतुर्दसीपर्यंत मोा पुणें,

स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ २६ माहे माारीं हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र डांकेवर रवाना केलें, तें दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीस पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्यानंतर यैकिलें वर्तमान पृथक पत्रीं लिहून सेवेसी व हुजूर सांप्रदायाप्रमाणें पत्रें पाठविलीं आहेंत. सुरापूरकर बेडराचे वकील आले आहेत व श्रीमंत पंत-प्रधानांचीं पत्रें व कारकून समागमें नेऊन सुरापूरकरास श्रीमंत पंत-प्रधानांचे भेटीस आणनार हें वर्तमान पूर्वी दोनतीन वार हुजूर व सेवेसी लिहिलं आहे. सांप्रत यैकिलें कीं पत्रें सिध होऊन वकीलाचे स्वाधीन जाहलीं व छ १ किवा दुसरे जिलकादीं पुण्यांहून स्वार होऊन जाणार. वकील स्वार होऊन गेल्यानंतर हुजूरचे अखबारेंत लिहीन. प्रस्तुतचे अखबारेंत वर्तमान लिहिलं नांहीं. रियासती कामाचा बंदोबस्त प्रथम जबरदस्ती. दुसरा मार्ग, काबू पाहून बंदोबस्त करावा. सांप्रत कृष्टणरावजी हुजूर आले आहेत. रावजीचे बोलण्यांत हुजूर-चे दौलतख्वाह व दूरअंदेश सलाहकार यकता आपण आहोंत व याच-प्रमाणें अर्जमारूज केला असेल व करतील. परंतु दुनवी मकार हिला रावजीस बहुत हिफज आहे. गोविंदराव तरी निवड उभयतां सांप्रतचे प्रसगी आले आहेत. ज्यांत हुजूरचे कामाचा बंदोबस्त व रफा होय, त्याप्रमाणें समयोचित सलाहवक्त जाणून हुजूरचे मसीर व बानीकार करारमदार करतील व करावा, यैसें सेवकाचे कयासांत येत आहे. बहुत काय लिहिणे हे विनती.

———

पैाा छ ६ जिलकाद सन ११९५ हिजरी, गुरवार दोन घटका दिवस बाकी मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ २५ शवाल लगायत छ २७ माहे माार सन ११९५ हिजरी, आश्विन कृष्टण मंगळवार.

सिपरीकोलारसेसमीप इंगरेजांची पलटणें माहदाजी सिंद्यांचे मुका-

बिल्यास आहेंत. त्यानीं गोहदकर जाटाचे मारफतीनें करार केला आहे कीं अठरा दिवसांत छ १० शवालपर्यंत कूच करून माघारा यमुनातीरास जाऊं म्हणोन बाळाजीपंताचे जुबानीं यैकिलें व करनल गाडर सुरतेस येऊन तोफा वगैरे जगी सरंजाम कल्याणीस पाठविला आहे. गाडर माार कोणते रुखं हरकत करितो याचा निश्चय कळल्याप्रमाणें पंतप्रधानांचे कारभारी फौजेची रवानगी करनल गाडराचे रुखावर किंवा माहदाजी सिंद्याचे कुमकेस पाठवणार. याजवितरिक्त अवांतर वर्तमाना-सहित छ २५ माहे माारीं अखबार व अर्जी हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान लिहिलं असे.

सिपरीकोलारसेसमीप करनल मरेल इंगरेजांचा सरदार पल-टनासुधां आहे. त्याचा व माहदाजी सिंद्याचा करार अठरा दिवसा-नंतर माघारा यमुनातीरास इंगरेजानीं जांवें म्हणोन गोहदकर जाटाचे विद्यमानें करार जाहला होता. सांप्रत माहदाजी सिंद्याची पत्रें येथील कारपरदाजास आलीं. त्याचा खुलासा हरीपंताचे जुबानीं व खारिज यैकिला कीं इंगरेजानीं माघारा जातों म्हणोन करार सिंद्यासी केला होता तो दगाबाजीचा केला. प्रस्तुत माघारा जात नांहींत. अठरा दिवसाचे फुरसतींत रसद वगैरे सरजाम पोख्त केला व सांप्रत लढाईस मुस्तैद जाहला आहे. सिंदे माारानी बुनगें अलाहिदा करून जरीदा जाहले व दसऱ्यानंतर कूच करून इंगरेजांचे मुकाबिल्यास जाणार.

कासीकडील खबर पूर्वीं लिहिल्याप्रमाणें गोरनर मेस्तर हिस्तैन यास चिन्हारगडासमीप चेतसिगानें माहासरा केला आहे म्हणोन कलमी खबर कासीहून आली. व सागर मिरजापुरीहून वर्तमान आले की गोरनर मिस्तरास चेतसिगानें दस्तगीर केलें. कासीहून दुसरी पत्रें तहकीक बातनींची अजीपर्यंत आली नांहींत.

हैदरअलीखानाकडून ताजी खबर आली नांहीं.

बालाराव, सिंद्याचे दिवाण, काहले व आजारी होते. सबब लष्क-रीहून उजनीस आले. तेथें शात जाहले म्हणोन तहकीक खबर आली,

कै. म. म. द बा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

छ २६ माहे माारी पंतप्रधानांची स्वारी पर्वतीस गेली होती. हरीपंत व कृष्टणराव बळवंत हमराह होती. दरवेशानी वाघ धरून आणिले. त्यापैकीं येके वाघास खांबास जंजीर बंद करून त्याजवर हाती घातले. दाहाबारा हाती हमला करून पळाले. दोन हाती शेर होते. यानीं वाघाचे पोटावर पाय देऊन वाघास मारले. पंतप्रधानांची स्वारी हवेलीस आली. हरीपंत डेऱ्यास गेले.

(अपूर्ण)

A. R. No. 128

२८ शवाल ११९५ हिजरी

१७ आक्टोबर १७८१

पैाा छ ६ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी रोा गुरवार, वख्त दोन घडी दिवस बाकी मै जोडी डांक सरकार.

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ २८ माहे शवाल मुा पुणे, स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखनआज्ञा करीत असिले पाा. विशेष, येथील वर्तमान छ २५ माहे माार रोज रविवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाना केले, ते पावोन सविस्तर वर्तमान शृत जाले असेल. तदनतर यथील वर्तमान राजश्री नाना हरीपताचे डेऱ्यास गेले होते. नानाचा व हरीपताचा खिलवत जाला. उपरातिक नाना आपले घरास आले. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की, कल्यानीस पलटने आली. गाडर वसईस आहे. तोही कल्यानीस येणार. त्याचे शहावर फौज पाठवावी. दुसरे कितीक आपले दौलतीचे बदोबस्ताविशई खिलवत जाला. शृत होये. होलकर वाफगावाहून डेरे दाखल होऊन हरीपताकडे येणार. परतु होलकराचे दिवान

नारो गनेश येथे कारभाऱ्याजवल यैवज मागावयास आले आहेत. यास यैवज दिल्यानतर होलकर डेरे दाखल होऊन हरीपताकडे येणार यैसे वर्तमान आहे. शृत होये. छ २६ रोज सोमवार. राजश्री हरीपंत डेरे दाख(ल) जाले म्हणौन करनेल गाडर इग्रज सुरतेहून वसईस आला. वसईस आलियानतर गाडर माार याने वसईचे बाहेर डेरा दिल्हा. तीनच्यार पलटने कल्यानीस पाठविली. पुढे तो डेरे दाखल होऊन कल्यानीस येणार. कल्यानीस आलियानतर ज्यमाव करून बोरघाटाकडे यणार. यैसे वर्तमान आले आहे. पलटने वगैर कल्यानीस आली. गाडरही वसईहून कल्यानीस येणार. म्हणौन त्याचे शहावर येथून रा बाजीपंत वगैर यासमागमे फौज देऊन रवाना करावे यैसी यौज्यना आहे. शृत होये. येका दो दिवसानी हरीपंत येका कोसाचे कूच करून खडकीचे पुलावर मुकाम करनार. तलेगावचे रुखावर यैसे आहे. कूच केलिया लेखन केले जाईल. शृत होये. राजश्री बाजीराव बरवे व सटोजी भोसले वगैर हे श्रीमत राजश्री दादासाहेबाजवल आहेत. त्यास वर्तमान येथे आले आहे की रा बाजीराव बरवे व सटोजी भोसले वगैर दोनतीन हजार फौज व तीन च्यार पलटने या सरजामानसी सुरतेहून निघून कोडाईबारीकडे येतात. कोडाईबारी चहडून खानदेशात येणार यैसे वर्तमान आले आहे. त्याजवरून कारभाऱ्यानी यौज्यना केली आहे की रा गनेशपंत बेहेरे खानदेशप्राती आहेत, त्याजकडे फौज पाठऊन कोडाईबारीकडे रवाना करनार. फौज वगैर जमा जालियानतर रवाना करतील यैसे आहे. शृत होये. राजश्री गोविदराव गायेकवाड याची उभारनी करून फौज वगैर देऊन गुजरात प्राती रवाना करणार हे पूर्वी लेखन केले होते, त्याजवरून शृत जाले असेल. गायेकवाड माार याचे दिवानगिरीवर रा गनपंतराव कोलटकर उभे राहिले. त्यानी काही लक्ष दोन लक्ष रुपये सावकारापासून घेऊ(न), काही लाख पनास हजार रुपये सरकारातून देऊन गायेकवाड माार याची उभारनी करून, फौज वगैर देऊन, गुजरात प्राती रवाना करावे यैसी यौज्यना आहे. उभारनी करून रवाना केल्यास लेखन केले जाईल. शृत होये. दरबार वगैर

जाला होता· माली व मुलकी वगैर कामकाज जाले. शृत होये. छ २७ रोज मगलवार· भडोचकर इग्रज दोनतीन पलटनानसी वसईस गाडराकडे मदतीस येणार यैसे वर्तमान आहे. शृत होये. कोल्हार-सिपरीस हिदुस्तान प्राती इग्रज आहेत. त्यासी व सिद्यासी लडाई आहे. काहीयेक ते इग्रज जेर जाले. जेर होऊन माघारा गेले· त्याज (स) मागमे सिद्याची फौज लागली आहे यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. शृत होये. पुन्यातील सावकार गुजरातीच आहेत· त्याच्या दुकाना ममईस व सुरतेस आहेत· इग्रजाचे बिघाडामुले ममईचा व सुरतेचा माल येथे येत नाही व येथील माल तिकडे जात नाही व हुडचा वगैर होत नाही. यैसे पाचच्यार वर्शे जाले आहे. कारभाऱ्यानी चौक्या वगैर ठेऊन हुडी वगैर होऊ देत नाहीत. चोरून हुडी केली त्यास सिक्षा करितात· यामुले गुजराती सावकार आज अवघे बाहेर निघून गेले. मग त्याची काये समजुती करून आनतील हे पाहावे. शृत होये. दसऱ्याचे दिवसी येज्यमानसाहेबानी कृष्णरावजीचा बहुत सन्मान केला· मोत्याची कठी वगैर इनायेत केली यैसे वर्तमान आले आहे. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. बहुत काये लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 129

३ जिलकाद ११९५ हिजरी

२१ आक्टोबर १७८१

पैाा छ ११ माहे जिलकाद संन ११९५ हिजरी रोज आदित्यवार डाकेवर मै दारोगा.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान तााा छ ३ जिलकाद, कार्तिक शुध रविवारपर्यंत मोा पुणें

स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष कृपापत्र छ १८ शवालचें पाठविलें तें छ २९ माहे माारीं पाऊन संतोष जाहला. विनतीपत्र पूर्वी छ २८ शवालीं पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान हुजूर व सेवेसी श्रुत जाहलें असेल. सांप्रत छ ३ जिलकादपर्यंत पत्रें लिहून सांप्रदायाप्रमाणें हुजूरअर्जी व अखबार व पृथक पत्रीं हिदवींत राजकी वर्तमान लिहून डांकेवर सेवेसी पाठविलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवसी पत्रें पावतील. चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांचे नांवचा लिफाफा सेवेसी पाठविला, तो चिरजीवास पावेल. सृष्टीचा कारभार सर्व काबूची आहे. इंगरेज बदमामली व सांप्रत माहदाजी सिंद्यांसीं इंगरेजानीं करार केला होता कीं अठरा दिवसांत माघारा जातों. व त्या संधीत गला व जगी सरजाम जमा करून, पुन्हा बदकौलीची गोष्ट सांगतात कीं सुरतेस जातों, मार्ग देणें. त्यास यथील मंडली बेइमान व काबूची. यांस इंगरेज गुरू भेटले आहेत. पूर्वी रुकनदौला मरहुमानी स्वामीस पुरंदरास पाठविलें ते समईं आपणासीं काय सलूक जाहला व त्या उपरी कृष्टणरावजी शहरास येऊन मिनतवार सतरा लाखाची जागीर दिधली. येथील मंडलीची रीती सर्व स्वामीस विदित आहे. प्रसगोचित चिरजीव विनती करतील व कांहीं माार हुजूर विनती करावयाचा असलियां स्वामीस श्रुत करून आज्ञेप्रमाणें यजमानसाहेबांचे सेवेसी विनती लिहिल्यांत येईल. हरकारे मुलाजम सरकार सेवकाचे तैनाती दाहा जोड्या. यांचा सालझाडयाचा हिशोब पूर्वी सेवेसी पाठविला आहे. त्याचे पावतीचें उतर प्राप्त जाहलें नांहीं. यास्तव विनती जे कृपा करून हिशोब पावल्याचें प्रत्योतर पाठविलें पाहिजे. सविस्तारें वर्तमान चिरजीव सेवेसी विनती करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इ॥ छ २८ शवाल लगायत छ ३ जिलकाद, रविवार कार्तिक शुध ५.

सिपरीकोलारसेसमीप इंगरेजांची पलटणें आहेत. त्यानीं गोहदवाल्याचे मारफातीनें करार केला होता कीं छ १० शवालपर्यंत माघारा यमुनातीरास जातों, तोपर्यंत परस्परें मुजाहिम न व्हावें. सिंद्यानी कबूल केला. इंगरेजानीं अठरा दिवसाचे अवकाशांत गला वगैरे सरजाम करून पुन्हा लढाईस सित्ध जाहले. व सुरतेस जावयाकरितां मार्ग देणें म्हणोन पैगाम केला म्हणोन व अवांतर वर्तमानासहित हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलं असे.

सिपरीकोलारसासमीप इंगरेजांची पलटणें आहेंत. त्यानीं सिवाजी विठल यांचे विद्यमानें माहदाजी सिंद्यास सांगोन पाठविलें कीं माघारा यमुनातीरास जातों म्हणोन तुम्हासीं करारमदार करून आम्हीं आपले सरदारास लिहून पाठविलें. त्याचा ज्वाब आला कीं सिंदे यासीं लढाई हरगिज न करणें. व पंतप्रधानांचे तालुकियास घांसलकडीचाही उपसर्ग लागू न देतां बतरीक सवदागर सुरतेस जाणें. खावंदाचा उदुलहुकुम करावयाचा सांप्रदाय नाहीं. यास्तव आम्हीं सुरतेस जातों, तुम्हीं मुजाहिम न होणें. याप्रमाणें बदमामली व बदकौलीची गोष्ट यैकोन, माहदाजी सिंदे पुन्हा लढाईस मुस्तैद जाहले आहेत म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें.

करनल गाडर वसईस आहे व जंगी सरजाम कल्याणीस पाठविला आहे. हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं जंगी जाहाजांची तयारी गाडर माार करीत आहे. तळेघोसांळेसमीप पंतप्रधानांकडील लोकासीं व हबसियासीं कांहीं करारांत तफावत आला. यास्तव लढाई सुरू आहे म्हणोन वर्तमान यैकिलें.

हैदरअलीखान कंचीसमीप चिनापटणवाले इंगरेजांचे मुकाबिल्यास मुस्तैद जंग आहे. व हजरत बंदगानआलीनीं इंगरेजांचे तंबीस मुतवजे मोहीम व्हांवें म्हणोन बालाजीपंत वगैरे कारपरदाजास लिहिलं आहे. मुधोजी भोंसल्यानीं कायद्याप्रमाणें पंतप्रधान व येथील कारपरदाजांस दसऱ्याबाा वस्त्रें सुतरस्वारासमागमें पाठविलीं आहेंत.

छ २८ शवालीं सूर्यग्रहणाचा नेम जोस्यानी सांगितला. त्यावरून सर्व जन व बालाजीपंत व हरीपंत मुठा नदीचे तीरीं डेरे होऊन स्नान व दानार्थ बसले होते. वीस घटका दिवसानंतर स्पर्श व चोवीस घटकानंतर मुक्त म्हणोन संकेत होता. चोवीस पंचेवीस घटकापर्यंत स्पर्शाची मार्गप्रतीक्षा केली. त्यानंतर स्नान व दान न करीतां भोजन करून शहरांत आले.

श्रीनिवास

२

पुरवणी अखबार पुणें छ ३ जिलकाद सन ११९५ हिजरी

करनल गाडरानें कल्याणीस जगी सरंजाम पाठविला वजिी जाहाजांची तयारी करितो. याकरितां येथील कारपरदाजानीं तजवीज केली आहे कीं तळेगांवास दोनतीन हजार गाडदी व पांच तोफा व सखाराम येशवंत पानसे निाा तोफखाना यांस पाठऊन द्यांवें.

सुरापूरकरांचे वकील पंतप्रधानांचे पत्रासहित येकादोन दिवसां पुण्याहून सुरापुरास जाणार. पंतप्रधानांचे तरफेनें माधवराव सदासिवाकडील कारकून जाणार आहे. सेवेसी श्रुत होय. हे विनती.

पैाा छ ११ माहे जिलकाद संन ११९५ हिजरी रोज आदित्यवार.

A. R. No. 130

७ जिलकाद ११९५ हिजरी

२५ आक्टोबर १७८१

पैाा छ १५ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर मै दारोगा.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार. विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ ७ माहे जिलकाद, कार्तिक शुध नवमी गुरुवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली

पाहिजे विशेष. पूर्वी छ ४ माहे माारीं हुजूरीअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी नवल विशेष यैकिलें वर्तमान पृथक पत्रीं सविस्तारें लिहिलें आहे. व हुजूरअर्जी व अखबार लिहून डांकेवर पत्र व अर्जी व अखबारेचा लिफा(फा) रवाना केला. दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्रें पावतील. इंगरेजांचे मोहिमेंत हैदर-अलीखानांस सफर व लढाई तूल पडली. परंतु नफा व साहबहिमत याची प्रसित्ध जाहली व इंगरेजानीं खुष्कींत प्रवेश केला आहे त्यांची तंबी व्हावी हा यैन खुलासा खान माराचा होता. परंतु पंतप्रधाना-कडील प्रतिवर्षी वेध, याकरितां लाइलाज होता. पंतप्रधानाचा दारमदार जाहल्यानंतर खान माारानें अज्म केला व अद्याप मोहीम सरीर व लढाई करीत आहे व प्रांत बहुत संपादिला. पंतप्रधानांची इप्तदायपासून नुकसानीं. साष्टीचा किला घेतला. त्या उपरी जंबूसर वगैरे माहाल व बारा लाख रुपये करनल इपटैनचे विद्यमानें कारपरदाजानीं दिल्हे. त्या उपरी अहमदाबाद व गुजरात प्रांत गेला व सिबंदीचे तह हरखर्चांत आले. यास्तव येथील कितेक दूरअंदशा करणाऱ्यानी केला आहे कीं जातीनें मातबर व पोख्त जंगी सरजाम ज्याजपासीं आहे तो इंगरेजांसी बार येईल. दुसऱ्याचे कुमकेची आशा करून इंगरेजांसीं बिगाड केल्यास परिणाम ठीक नांहीं. यैकिली चर्चा सेवेसी लिहिली आहे. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैा छ १५ माहे जिलकाद सन ११९५ हिजरी रोज शेनिवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ ४ जिलकाद लगायत छ ७ माहे माार सन ११९५ हिजरी, गुरुवासर.

करनल गाडर वसईस जंगी जाहाजांची तयारी करितो व तळेगांवास पंतप्रधानांचे तरफेनें सखाराम पानसे व गाडदी व कांहीं तोफा जाणार. तळेघोंसांळ्यासमीप हबसी यांची व पंतप्रधानाचे जमीयतेसीं लढाई

जाहली. हबसी गालिब जाहले व सिपरीकोलारसेसमीप इंगरेजांचीं पलटणें आहेंत त्यानीं माहदाजी सिंद्यांसीं पैगाम केला आहे कीं आम्हास सुरतेस जावयाचें प्रयोजन आहे. मार्गांत सदराह व मुजाहिम न होणें. परस्परें लढाई करावयाचें कारण नांहीं. पंतप्रधानांचे तालुकियास किमपि उपसर्ग न देतां बतरीक सवदागर आम्ही जातों. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी डांकेवर छ ४ माहे माारीं पत्रें रवाना केलीं तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलं असे.

सुरतेंत वलंदेजांची कोठी होती, ते इंगरेजानीं जप्त केली. हें वर्तमान पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत येथील कारभाऱ्यांसमीप सुरत व वसईची बातनी आली आहे कीं वलंदेजानीं फरासीसांसी साख्त करून उभयतां इतिफाकानें जंगी जाहाजांची तयारी करून, आपले विलायतीहून चवदा जाहाजें निघालीं त्यापैकीं साहा जाहाजें सुरतेसमीपचे दरयात नमूद जाहलीं आहेंत. व कांहीं जाहाजें गोव्यास आलीं व कांहीं वसईसमीप नमूद जाहलीं आहेंत. अद्यापि लढाईस मुकाबिल नांहींत किंवा कोणते इराद्यानें आले आहेत याचाही निश्चय नांहीं.

कल्याणींत इंगरेजांचीं पलटणें आहेंत त्या सरदारापैकीं कल्याणीहून कोसावर विठलवाडीसमीप कांहीं जमीयत व येके सरदार आला आहे म्हणोन खारिज यैकिलें. या दिवसांत साली सिध जाहल्या आहेत. गला जमा करावयाची तजवीज आहे. बिरेवाडीनजिक तळेघोसांळें येथें हबसीयासीं व पंतप्रधानांचे लोकासीं लढाई जाहली म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं पंतप्रधानाकडील गाडद्यांचा जमादार नथेखान नामे ठार जाहला. व तीन निशानें गाडद्यांची हबसीयानीं नेलीं म्हणून खारिज यैकिलें. सुरापूरकर बेरडाचे दरखास्तीनुरूप पुण्यांस येण्याविषईं पंतप्रधान व कारभाऱ्यांचीं पत्रें बेरड माार याचे वकीलांचे स्वाधीन केलीं व माधवराव सदासिव या कामाचे बानीकार आहेत. याकरितां पंतप्रधानांचे तरफेनें माधवराव यानीं आपले तरफेचे ग्रहस्तांस समागमें दिधलें,

वकील पुण्याहून स्वार होऊन गेले. माधवरायांचे तरफेचा ग्रहस्त येकादोन दिवसानंतर जाणार.

२

पुरवणी अखबार छ ७ जिलकाद सन ११९५ हिजरी.

करनल गाडर वसईस आला आहे म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत हरीपंताचे मुखें चर्चा यैकिली कीं गाडर माार सुरतेंत आहे म्हणोन कोण्हीं ग्रहस्तानी सांगितलें. त्यास वसईस येऊन तेथील बंदोबस्त करून पुन्हां सुरतेस गेला असेल व सांप्रत सुरतेंत आहे म्हणोन यैकिलें हैदरअलीखानाकडील या दिवसांत नवल विशेष वर्तमान आलें नांहीं व सिद्याकडीलहीं कांही बातनी कळली नांही. सेवेसी श्रुत होय हे विनती.

पैा छ १५ माहे जिलकाद संन ११९५ हिजरी रोज शेनिवार डांकेवर.

A. R. No. 131

८ जिल्काद ११९५ हिजरी

२६ आक्टोबर १७८१

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ८ माहे जिलकाद मुा पुणे, श्वामीचे कृपावलोकणकरून येथास्तित जाणौन श्वानंद लेखणआज्ञा करीत आंसिले पाहिजे. विशेष, येथील वर्तमान छ ४ माहे मजकूर रोज सोमवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डाके-समागमे सेवेसी रवाणा केले ते पावोन सविस्तर वर्तमान ध्याणास येईल. तदणंतर येथील वर्तमान कोकणप्रांती कल्याणीस इग्रजाची दोन पलटणे आहेत. येक पलटण कल्याणीपुढे दीढा कोसावर आहे व पंचवीस तीस तोफाही तेथे आहे. करनैल गाडर वसईस आहे. प्रस्तुत इंग्रज कोकणप्रांतीच्या साली ज्याहाजात भरून ममईस नेतात. श्रीमंता-कडील फौज वगैर येईल म्हणौन इंग्रजाणी येक पलटण कल्याणीपुढे ठेवले आहे. सालीचा हांगाम जाल्यानंतर गाडर मजकूर पलटणा-सहित कल्याणीस येणार. आलियानंतर पुढे बोरघाटाकडे चाल

करणार यैसे वर्तमान आहे. त्याजवरून येथून कारभाऱ्याणी दोन आडीच हाजार गारदी बोरघाटाकडे रवाणा केले. राजश्री भवाणी सिवराम व पानशाकडील लोक व काही तोफा रवाणा करनार, श्रुत होये. राजश्री सखाराम पानसे मोहोर्त करून डेरे दाखल जाले. हरीपंताजवल उतरले आहेत, श्रुत होये. हैदर नाइकाकडील वकील नानाकडे आले होते. नानासी व नाईक मजकुराकडील वकीलासी च्यार घटका खलवत जाला. नाईक मजकुराकडील श्रीमंतास व कारभाऱ्यास वस्त्रे आली आहेत. वस्त्रे येकादो दिवसा गुजरानार, श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलुकी कामकाज ज्यारी आहे, विदित होये. छ ५ रोज मंगलवार. नवाब ज्याबितजंग बाहादूर मरहूम याचे पुत्राची वस्त्रे पूर्वी श्रीमंतास व कारभाऱ्यास आली होती त्याची मुबादल्याची वस्त्रे येथून श्रीमंताची व कारभाऱ्याची निर्मळेस पाठविली, श्रुत होये. सिंद्यासी व इंग्रजासी हिंदुस्थानप्रांती लढाई आहे. प्रस्तुत वर्तमान आहे की ते इंग्रज महर्गतीमुले जेर जाले. जेर होऊन माघारा गेले. त्याचे पाठीमागे सिंदे लागले आहेत. यैसे वर्तमान आले आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखण केले जाईल, श्रुत होये. हैदर नाइकासी वं इंग्रजासी चिणापटणाकडे लढाई मातबर जाली. वर्तमान आहे की उभयेपक्षी कायेम राहिले. परंतु आंतस्ते वर्तमान आहे की काहीयेक नाईक मजकूर सिकस्त होऊन माघारा कोस दोन कोस आले, यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखण केले जाईल, श्रुत होये. छ ६ रोज बुधवार. रा गोविंदराव गायेकवाड याची उभारनी करितात. त्यास सरकारातून लाख पणास हाजार रुपये द्यावे. व लाख दोन लाख रुपये त्याणी नवे दिवाण गणपतराव कोलटकर उभे केले आहेत, त्याणी द्यावे. आणि फौज ठेऊन गुजराथप्रांती जावे. हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री लेखण केले होते, त्याजवरून श्रुत जाले आसेल. प्रस्तुत गाइकवाड मजकूर दावडीस आहेत. दोनेक हाजार फौज त्याणी ठेवली. आणि कही फौज ठेवितात यैसे वर्तमान आले आहे, श्रुत होये. नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. नाना व हरीपंत व कृष्णरावजीचे चिरंजीव

या त्रिवर्गाचा खलवत जाला. कृष्णरावजीकडील पत्रे आली होती ते नानाणी व हरीपंताणी वाचली. त्याची उतरे रावजीकडे लिहिणार व येज्यमाणसाहेबास पत्रे व अर्ज्या लिहिणार, या आनवये खलवत जाला, यैसे यैकिले. दुसरे कितेक आपले दौलतीविशई खलवत जाला. उप्रांतिक नाना आपले घरास आले. येकादो दिवसा नाना हरीपंताचे डेऱ्यास जात आसतात. खलवत होत आसतो. प्रस्तुत हरीपंताचे डेऱ्याजवल दोनेक हाजारपावेतो फौज जमा जाली आहे. पुढे लोकही वरचेवर जमा होतात, श्रुत होये. छ ७ रोज गुरुवार. हैदर नाइकासी व फरासीस फिरंग्यासी पहिले राजकारन जाले होते की वीस लक्ष रुपये तुम्हास देतो. तुम्ही आमची मदत करून इंग्रजाचे पारपत्य करावे व इंग्रजाची सवस्थाणे व बंदरे घ्यावी. येविशई येथून कारभाऱ्याचेही संमत हैदर नाइकासी होते. त्याजवरून हैदर नाइकाणी फरासिसास करारापत्रो यैवज दिल्हा, यैसे वर्तमान यैकिल्यात आले. प्रस्तुत वर्तमान आले आहे की, फरासिसाची दाहापाच ज्याहाजे जंगी मातबर, त्याचे बंदराकडून सुर्तेस आली. मार्गी जाताणी ममईस त्याणी पाचच्यार गोले डागले आणि सुर्तेकडे गेले. पुढे सुर्तेस मोर्चे लावनार. ज्याहाजे सुर्तेजवल उभी आहेत, यैसे वर्तमान येथे आले आहे. त्याजवरून कारभाऱ्याणी खानदेशप्रांती गणेशपंतास पत्रे लिहिली आहेत की, सुर्तेकडे फरासिसाची ज्याहाजे आली, यैसे वर्तमान यैकिले आहे. त्यास सुर्तेकडे मणुशे पाठऊन बातमी आनवणे. बातमी गणेशपंताकडील आलियावर लेखण केले जाईल. प्रस्तुत तो वर्तमान आहे की फरासिसाची ज्याहाजे सुर्तेस आली. सुर्तेस उपद्रव करनार यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास लेखण केले जाईल श्रुत होये. कृष्णरावजीकडील पत्रे वरचेवर येत्यात. बहुत रहशाची भाषणे होत्यात. याआनवये पत्रे येत्यात, यैसे ऐकिल्यात आले, श्रुत होये. वर्तमान आहे की, दो चौ दिवसानी हरीपंत येका कोसाचे कूच करून खडकीचे पुलावर मुकाम करणार. कूच केल्यावर लेखण केले जाईल, श्रुत होये. माहे मजकुरी शुध त्रयोदसीस नानाही डेरे देऊन बाहेर राहानार

पुरवणी दुसरी २

यैसी वदंता आहे. निश्चये होऊन निघाल्यास लेखण केले जाईल श्रुत होये. श्रीमंत वाडचात घोडे वगैर फिरवीत आसतात, श्रुत होये. होलकराचे दिवाण नारो गणेश येथे आले आहेत. कारण की, फौजेच्या खर्चाकरिता काही यैवज मागतात. त्याजवरून त्यास कारभारी लाख दीड लाख रुपये देणार. यैवज दिल्ह्यावर नारो गणेश वाफगावी होलकराकडे जाणार. उप्रांतिक होलकर डेरे दाखल होऊन हरी-पंताकडे येणार यैसी वंदता आहे, श्रुत होये. प्रस्तुत इंग्रजाचा शह कोकणप्रांती विशष दिसत नाही, यैसी वदंता आहे. त्यामधे फरासि-साची ज्याहाजे सुर्तेकडे आली. सुर्तेस उपद्रव करणार, यैसे वर्तमान आहे. त्याजवरून कारभारी आपले ठिकाणी बहुत संतोष आहेत. मागती इंग्रजाकडील वर्तमान येईल ते लेखण केले जाईल, श्रुत होये. मुतसदी मंडली व पागेचे कारकून वगैर याजवर च्यार लक्ष रुपयाची पटी केली आहे. मग निश्चये होऊन पटी केल्यास लेखण केले जाईल श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलुकी कामकाज ज्यारी आहे. पुढे जे प्रंसगाचे वर्तमान ध्याणास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल, विदित होये. परस्परे वर्तमान यैकिले की उभयेता श्वामीस येज्यमाणसाहेबाणी साहेबनौबत दसऱ्यास देऊन सर्फराज केले. हे वर्तमान यैकोण बहुत संतोष जाला, तो पत्री कोठवर ल्याहावा. ईश्वर आपल्यास मुबारक करो. सेवकलोकाची इछा हेच की दिवसानदिवस श्वामीचे उर्जीत व्हावे. बहुत काल सलामती करावी हेच मागने रात्रदिवस ईस्वरापासी आहे. सदैव स्वामीचे शुभचिंतन करितो. स्वामीही माझे चिरजीवाप्रमाणे चालवितात. सर्व प्रकारे दिवसानदिवस माझे उर्जीत करणे स्वामीचे चरन आहेत. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काये लिहिणे. कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 132 ११ जिल्काद ११९५ हिजरी

२९ आक्टोबर १७८१

पैा छ १९ जिलकाद सरकारच्या डांकेबराबर अली, विद्यमान दारोगे हरकारे, सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान ता छ ११ जिलकाद, कार्तिक शु त्रयोदसी इंदुवासरपर्यंत मो पुणें, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंदवैभव लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष कृपापत्र छ २८ शवालचें पाठविलें तें छ ८ माहे मारीं प्रातःकाळीं पाऊन संतोष जाहला व चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांचा लिफाफा पावला. पूर्वी छ ८ माहे मारीं हुजूरअर्जी व आखबार व स्वामीचे नांवचें पत्र डांकेवर रवाना केलें तें दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीस पाऊन वर्तमान कळलें आसेल. सांप्रतचें वर्तमान पृथक पुरवण्यापत्रीं लिहिलं आहे, त्यावरून सेवेसी श्रुत होईल. इकडील ग्रहस्तांची चाल व वचनाची प्रामाणिकता व निस्पृहता दाखवणें व स्वकार्याचें काबूची हे रीत सर्व स्वामीस विदित. संमध पडल्यास उपाय नांहीं. ज्यासमई ज्यासीं जैसी गांठ पडेल त्याप्रमाणें निर्वाह करावा लागतो. सविस्तारें वर्तमान उदईक छ १२ मगलवारीं लिफाफा डांकेवर रवाना करितों. तो डांकेवर स्वामीस पावेल. त्यांत चिरजीवाचे नांवचे पत्राचा लिफाफा आहेत. स्वामी चिरजीवास देतील. पत्रांतील मार सविस्तारें चिरजीव हुजूर समयोचित व स्वामीचे सेवेसी विनती करतील. बहुत काय लिहिणें, हे विनती.

पैा छ १९ जिलकाद.

श्रीनिवास.

अखबार पुणें अज ता छ ८ शुशवार जिलकाद, लगायत छ ११ माहे मार इंदुवासर सन ११९५ हिजरी.

सुरत व वसई व मुंबईचें बंदराचे सुमारानें समुद्रांत फरासिसांची

जाहाजे हरयेक बंदरास तीनच्यारप्रमाणें दुरोन दिसतेंत म्हणोन येथील कारपरदाजांसमीप खारिज बातनी आली आहे. जाहाजें जंगी किंवा सवदागरी याचा निश्चय नांहीं. वलंदेजांची कोठी सुरतेंत होती, ते इंगरेजानी जप्त केली. याकरितां वलंदेजानी फरासिसांस कुमकेस आणिलें, म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें, तें व याविंतिरिक्त अवांतर वर्तमान सुरापूरकर बेडरांचे वकील पंतप्रधानांची पत्रें सुरापूरकरानें पंतप्रधान व येथील कारपरदाजांचे भेटीस येण्याविषईं घेऊन गेले. म्हणोन पूर्वी हुजूरअर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें, तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष वर्तलें व यैकिलें वर्तमान हुजूर व सेवेसी दफेवार लिहिलं आसे.

गोरनर मेस्तर हिस्तैन चिन्हारगडांत आहे व चेतसिग जमीदारांचा माहासरा मजबूत आहे, म्हणोन कासीची कलमी खबर व माहदाजी सिंद्यांचे लिहिण्यांत गोरनरास चेतसिगानें दस्तगीर केलें, म्हणोन छ ११ माहे माारीं बालाजीपंत व हरीपंताचे जुबानी यैकिलें.

माहदाजी सिंद्यांची पत्रें छ ९ जिलकादीं बालाजीपंतास आलीं. पंत माारनुलेचे जुबानीं यैकिलें कीं करनल मेवर इंगरेज जमीयतेसुधां सिपरीकोलारसेसमीप आहे. व सिवाजी विठल यांचे विद्यमानें सिंदे मजकुरांसीं पैगाम केला आहे कीं कासीकडें गडबड जाहली. याकरितां करारप्रमाणें माघारा कूच केलें नांहीं व आपले सरदारास पत्र लिहिलें आहे. त्याचें उतर आल्यानंतर कूच करून यमुनापार जातों. माहदाजी सिंदे कालीसिंदेसमीप फौजेसुधां मुकाबिल लढाईस आहेत. याप्रकारें कारभाऱ्यांचे जुबानीं व खारिज यैकिलें. मेवर इंगरेजाने माहदाजी सिंद्यास पैगाम केला आहे कीं विलायतवाल्यांचे हुकमाप्रमाणें आम्हीं सुरतेस जातों. तुम्हीं मुजाहिम न होणें. व परस्परें लढाईचें प्रयोजन नांहीं. बतरीक सवदागर आम्हीं जातो, यावरून इंगरेज हरामजादे व बदकौली बेइमान म्हणोन सिंदे माार जरीदे होऊन लढाईस मुस्तैद आहे.

हैदरआलीखान चिनापटणाहून दाहा कोसी करनल कूटाचे मुकाबिल आहे. इंगरेजांची जुरत लढाईची होत नांहीं. व बेइस्तकलाल

जाहले आहेत व नाईक माारासीं स्नेहाचा पैगाम पुरबाजिदीनें करितात. परंतु हैदर नाईक कबूल करीत नांहीं म्हणोन बालाजीपंत व हरीपंत व हैदरखानाचे वकीलांचे जुबानीं यैकिलें.

पैा छ १९ जिलकाद.

२

पुरवणीं आखबार छ ११ जिलकाद सन ११९५ हिजरी.

फरासीसांचे विलायतीहून मुसा मूती फरासीस गोव्यास आला आहे. व घोडीं वगैरे सरजाम व राहदारीचें दस्तक पाठऊन देणें म्हणोन पंतप्रधानांचे कारपरदाजांस लिहून पाठविलें. त्यावरून राहदारीचें दस्तक व स्वारीस दोन घोडीं व बदर कयास माणसें देणें म्हणोन कोकणचे कमाविसदारास लिहून पाठविलें व दस्तक व जासूद मुजरद पुण्याहून पाठऊन दिधले. फरासीस माार सत्वरच येईल म्हणोन बालाजीपंतानी सांगितलें.

सुरापूरकराचे वकील पंतप्रधानांचीं पत्रें घेऊन गेले व पंतप्रधानांचे तरफेनें वकील माघाहून जाणार म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें होतें. छ ९ माहे माारी राघोपंत नामे वकील पंतप्रधानांचा गेला.

फरासीसाकडील जाहाजें वसई, मुंबई व सुरतेस समुद्रांत नमूद जाहलीं आहेत म्हणोन पूर्वीं लिहिलं आहे. सांप्रत बालाजीपंताचे जुबानीं यैकिलें कीं जाहाजें जंगी आहेत. आद्यापि इंग्रजाचे बंदरावर चालून येत नांहीत. आपले सरदाराचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करतील. खारिज यैकिलें कीं फरासीसांची चोर जाहाजें आहेत. इंगरेजांची च्यार जाहाजें सवदागरीपैकीं तीन किरान्याचीं, नारेळ वगैरे जिनस व येक नख्त रुपयाचें, येणेंप्रमाणें च्यार जळमार्गें जात होतीं. फरासीसांकडील जाहाजें मुंबई व वसईसमीप नमूद जाहलीं होतीं. त्या जाहाजवाल्यानीं इंगरेजांचे जाहाजास सदराह जाहले त्यापैकीं येक जाहाज नख्त रुपयाचें होतें. तें काबू पाहून माघारा मुंबईस आलें व तीन जाहाजें किरान्याचीं फरासीसानीं धरलीं व इंगरेजाकडील लोकास कैद केलें. व

गोवे बंदराचे रुखं गेले. गोवेवाल्यानीं आश्रय दिधला नांहीं. याकरितां तेथोन हैदरअलीखानाचे तालुकियांत जाणार म्हणोन खारिज यैकिलं.

छ ९ माहे माारीं पंतप्रधान व बालाजीपंत व हरीपंत पर्वतीस गेले होते.

अमृतराव पेंठें जोगाईचे आंब्यास यात्रेस गेले होते ते यात्रा करून पुण्यास आले. सेवेसी श्रुत होय हे विनती.

A. R. No. 133

१२ जिल्काद ११९५ हिजरी

३० आक्टोबर १७८१

पैाा छ २० जिलकाद सरकारच्या डांकेबराबर आली, विद्यमान दारोगे हरकारे सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ १२ जिलकाद, कार्तिक शुध चतुर्दसी भौमवासरपर्यंत मोा पुणें स्वामीचें कृपेकरून क्षेम जाणून स्वानंदवैभव लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. छ ११ माहे माारीं डांकेवर विनतीपत्र पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें सेवेसी पावलें असेल. चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यानीं छ २८ शवालीं पत्र पाठविलें त्याचें उतर सरसरी लिहिलें होतें, याकरितां सांप्रत तपसीलवार लिहिलें आहे व कांही पुरवण्या स्वामीचे सेवेसी पावत्या करावयाच्या त्या माराची माहितगारी चिरंजीवास आहे. यास्तव चिरंजीवाचें पत्रांत मलफूफ करून सेवेसी पाठविल्या आहेत. चिरंजीव सेवेसी प्रविश्ट करतील व पृथक माार त्यांस लिहिला आहे तो विनती करतील. त्यापैकीं हुजूर अर्ज करावया योग्य जे आज्ञा स्वामी करतील, त्याप्रमाणें हुजूर व नवाब मोइनुदौला बाहादरांस अर्ज करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैा छ २० जिलकाद.

श्रीनिवास

पुरवणी आखबार पुणें छ १२ जिलकाद सन ११९५ हिजरी.

गोरनर मेस्तर हिस्तैन कासीहून निघोन चिन्हारगडाचे आश्रयास गेला. व राजे चेतसिंग जमीदारानें माहासरा केला आहे म्हणोन तहकीक कलमी खबर आली. त्यानंतर बाळाजी गोविंद वगैरेची कुमकी फौज च्यार हजारपर्यंत चेतसिंगास गेली. त्यानंतर जमीदार माारानें दाहा हजारपर्यंत स्वार प्यादे जमा करून इंगरेजांस खारिज केलें. प्रयागांत इंगरेजांचे सरदारासमीप तीन पलटणें व च्यार तोफा आहेत तो चेतसिंगावर चालून आला. कासी व प्रयागचे माबैन जमीदार माारांसी व इंगरेजांसी लढाई मातबर जाहली. दुतरफा बहुत लोक ठार व जखमी जाहले. त्यानंतर इंगरेज पसपा होऊन माघारा प्रयागचे किल्याचे आश्रयास गेले म्हणोन सागरीहून बालाजीपंतास खबर आली. ते बालाजीपंताचे जुबानीं यैकिल्याप्रमाणें सेवेसी लिहिली असे हे विनती.

A. R. No. 134

१२ जिल्काद ११९५ हिजरी

३० आक्टोबर १७८१

पैा छ २० जिलकाद सन ११९५ हिजरी.

श्री शंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ १२ माहे जिलकाद मुा पुणे श्वामीचे कृपावलोकणकरून येथास्तित जाणौन श्वानंद लेखणआज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेष, येथील वर्तमान छ ८ माहे मजकूर रोज शुक्रवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे रवाणा केले, ते पावोण सविस्तर वर्तमान ध्याणास येईल. तदनंतर येथील वर्तमान, कार्तिकमास म्हणौन राजश्री हरीपंत येथून कोसा

दीढा कोसावर बाग आहे तेथे भोज्यनास गेले होते. भोज्यण करून उप्रांतक आपले डेऱ्यास हरीपंत आले, श्रुत होये. हरीपंताचे डेऱ्याजवल दीडदोन हाजार श्वार जमले आहेत. वरचेवर लोकास बलाऊ पाठवितात, जमा होतील. परंतु तीन वर्षे फौजेच्या लोकास नालबंदी वगैर नाही. रोजमुरे मात्र थोडेबहुत पावले. यामुळे लोकही आपले ठिकाणी आजुर्दा आहेत. त्याजवरून लोकाचीही काही वाट करणार यैसे मानस आहे. परंतु पैक्याचा तोटा आहे. थोडीबहुत लोकाची समजूती करून लोक जमा करणार यैसे आहे, श्रुत होये. दरबार वगैर जाला होता विदित होये. छ ९ रोज शनवार· फरासीसाची ज्याहाजे मातबर दाहाबारा आपले बंदराकडून येऊन सुर्तेकडे गेली. सुर्तेस उपद्रव करनार यैसे वर्तमान येथे आले होते. त्याजवरून सविस्तर वर्तमान पूर्वीचे विनंतीपंत्री लेखण केले होते. त्याजवरून श्रुत जाले असेल. प्रस्तुत वर्तमान आहे की फरासीसाची च्यारपाच मनोरे, ज्याहाजापेक्षा थोर, आपले बंदराकडौन सुरतचे बंदराकडे इंग्रजाचे तालोक्यात आली. इंग्रजाकडील सवदागरी ज्याहाजे कोणीकडून येत होती ते फरासीसानी दोनतीन ज्याहाजे लुटली. फरासीसाची मनोरे ज्याहाजे सुर्तेहून पंचवीस तीसा कोसावर येकदोन दिवस होती. सुरत वगैरस कोठे उपद्रव न करता कोणीकडे बंदरास मुलुकगिरीस गेली. फरासीसाची ज्याहाजे सुरतचा शेहे सोडून गेली, यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास लेखण केले जाईल, श्रुत होये. फरासीसाकडील वकील गोव्यांकडून येथे येणार यैसे वर्तमान आहे. आलियावर लेखण केले जाईल, श्रुत होये. येकादसी म्हणौन श्रीमंत व नाना परवतीस दर्शेनास गेले होते. दर्शेण करून संध्याकाली श्रीमंत व नाना आपले घरास आले, श्रुत होये. हैदर नाइकाकडील वर्तमान आहे की नाईक मजकुरासी व इंग्रजासी चिणापटणाकडे लढाई सुरू आहे. इंग्रजाचा ज्यमाव विशेष आहे. लढाई होऊन उभयेपक्षी कायेम राहातात यैसे वर्तमान आहे, श्रुत होये. छ १० रोज रविवार. कल्याणीस इंग्रजाची पलटणे दोनतीन आहेत. करनैल गाडर वसईस आहे· गाडर मजकूर ज्यमाव करून कल्याणीस येणार यैसी वदंता आहे.

त्याजवरून याणी घाट वगैरचे बंदोबस्तीस गारदी वगैर पाठविले आहेत. मागून भवाणी सिवराम वगैर रवाणा करणार. मागती इंग्रजाकडील वर्तमान आलिया याजकडील कोन्ही सरदार रवाणा जालिया लेखण केले जाईल, श्रुत होये. नाना कार्तिकमास म्हणौन बागांत भोज्यनास गेले होते. भोज्यण करून मागती घरास आले. पोर्णिमेपावेतो तीनच्यार दिवस लागोपाठ नाना बागात भोज्यनास जाणार, श्रुत होये. नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. दोनतीन घटका खलवत जाला. उप्रांतिक नाना आपले घरास आले. खलवतीचा भाव यैकिल्यात आला की रा कृष्णरावजीकडील पत्रे आली होती या आनवये खलवत जाला. पत्राचा भाव यैकिल्यात आला नाही. कलल्यावर लेखण केले जाईल, श्रुत होये. ज्यफरुदौला बाहादुर मरहूम याचे पुत्रास वस्त्रे मुबारकबादीचे श्रीमंताची व कारभाऱ्याची उदईक सांडणीश्वारासमागमे रवाणा होणार, श्रुत होये. छ ११ रोज सोमवार. हपशानी कोकनप्राती उपद्रव माडला आहे. म्हणौन पाचच्यारसे गारदी वगैर रवाना केले, शृत होये. भोसल्याकडून नागपुराहून श्रीमतास वगैर वस्त्रे येणार व भोसले डेरे दाखल होनार यैसे वर्तमान आहे, शृत होये. राजश्री सटोजी भोसले व बाजीराव बरवे वगैर श्रीमत रा दादासाहेबाजवल आहेत. त्यास सटोजी भोसले वगैर ज्यमाव करून कोडाईबारीकडे येणार यैसे वर्तमान आहे, शृत होये. येथून नारो गनेश वाफगावास गेलियावर होलकर डेरे दाखल होनार यैसे वर्तमान आहे, शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 135

१६ जिल्काद ११९५ हिजरी

३ नोव्हेंबर १७८१

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी, येथील वर्तमान ता छ १६ जिलकाद कार्तिक वद्य त्रितीया शनिवारपर्यंत

मु।। पुणें, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष विनतीपत्रें पूर्वी छ १२ व छ १३ जिलकादीं डांकेवर पाठविलीं ते पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें असेल. कृपापत्रें दोन येक छ ६ जिलकादचें जासुदां समागमें व दुसरें डांकेवर छ ८ माहे माारचे येणे प्रमाणें पाठविलीं, तीं छ १६ व छ १७ रोजीं पाऊन संतोष जाहला. सांप्रत छ १३ माहे माारापासून छ १६ पर्यंत येथील आखबार व राजकी वर्तमान सांप्रदायाप्रमाणें हुजूर अर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पृथकपत्रीं वर्तमान लिहून, चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यांचे नांवचे लिफाफ्यासहित डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें हुजूर अर्जी व आखबारेचा लिफाफा व स्वामीचे सेवेसी लिफाफा पावता होईल. अखबारेवितरिक्त कांहीं नवीन कल्पना ध्यानास आली तें वर्तमान चिरजीवास लिहिलें आहे. सेवेसी विनती करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इा छ १२ जिलकाद लगायत छ १६ माहे माार, शनिवार दिवारात्र सन ११९५ हिजरी.

गाडर वसईहून सुरतेस गेला व प्रयागांत इंगरेजांचीं पलटणें होती त्यांसी व राजे चेतसिंग जमीदार कासीकरासीं लढाई मातबर जाहली. उभयपक्षीं लोक ठार व जखमी बहुत जाहले. परंतु इंगरेज पसपा होऊन पुन्हा प्रयागास गेले म्हणोन येथील कारपरदाजांचे जुबानीची खबर. याविंतरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरी जाहलें व यैकिलें वर्तमान तपसील व दफेवार लिहिलें असे. प्रयागांत इंगरेजांची पलटणें होतीं. त्यांसीं व व चेतसिंगासीं लढाई जाहली. हें वर्तमान कारपरदाजांचे जुबानीं यैकिल्याप्रा पूर्वील पत्रीं वर्तमान लिहून पाठविलें आहे. त्याउपरी खारिज तहकीक यैकिलें

कीं मेस्तर गोरनर हिस्तैन चिन्हारचे गडांत मजबूतीनें आहे. प्रयागांत व अंतर्वेद प्रांतीं इंगरेजांचीं पलटणें होतीं. तें मुतिफक होऊन चेतसिंगावर चढाई करून आलीं. जमीदार माार मुकाबिल लढाईंत बहुत कायमीनें लढला. परंतु आखरश जमीदारांची सिकस्त बेतन्हा होऊन पळोन रामगडास गेला. व रामगडीं कायम न राहतां बेस्तइकलाली व बेहिमतीनें विजयगडास कोहिस्तान व मवाश्यांत गेला म्हणोन सावकारी बातनी आली. व सिंद्याकडील पत्रांतहीं खुफिया चेतसिंगांचे सिकस्तीचें वर्तमान आलें. जाहिरा इंगरेजांसी व पंतप्रधानासीं बिगाड इंगरेजांची सिकस्त प्रसिद्ध करावी म्हणोन येथील कारपरदाजानी बरखिलाफ वर्तमान प्रसिध केलें होतें. त्याप्रमाणें पूर्वील पत्री लिहिलें. सांप्रत चेतसिंगांचे सिकस्तीचें वर्तमान मातबराचे जुबानीं यैकिल्याप्रमाणें लिहिलें असे. येथें कासीकर कितेक आहेत त्यांचीं घराऊं पत्रें आली त्यांत स्पष्ट माार लिहिला आहे कीं चेतसिगाची सिकस्त जाहली. व रामगड किंवा विजयगडास गेला व कासीचे दरोबस्त प्रातांत इंगरेजांचा आमल करारवाकई जाहला. शुजाउदौला मरहूमाचा पुत्र जगलीमिरजा आमानी आसफुदौला इंगरेजासी इतिफाकानें आहे म्हणून बजिनस पत्रें आलीं.

गाडर वसईहून सुरतेस गेला. हे कलमी तहकीक वर्तमान येथील कारपरदाजांचे जुबानी यैकिल्याप्राा पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत खारिज वर्तमान यैकिलें की गाडर सुरतेहून पुन्हा मुंबईस आला व च्यार पलटणे जमीयत पनवेलीहून तीन कोस बोरघांटचे रुखं आली म्हणोन खारिज यैकिलें. येथील कारभाऱ्यांचे जुबानीं तहकीक नांहीं.

दुर्गोजी भापकरास यथील कारपरदाजानी पत्रें पाठविलीं आहेत कीं पांच हजारपर्यंत फौजेची निगाहदास्त करणें.

———

२

पुरवणी आखबार पुणें, छ १६ जिलकाद सन ११९५ हिजरी. व गणेशपंत बहिरे व तुम्ही बइतिफाक कोंडाईबारीचे रुखें सुरत प्रांती जाणें. दुर्गोजीचा पुतन्या शाहजी, भापकराचा पुत्र कडोजी, दुर्गोजीचे तरफेनें येथें च्यारपांच महिने आहे. पंचेवीस हजारपर्यंत रुपये दुर्गोजीस पाठऊन दिल्हे. याउपरी पंतप्रधानांचे सरकारातून रुपये मिळाले तरी दुर्गोजी भापकर फौज ठेवील. सुष्क गोष्टी व उमेदवारीची आशा सांप्रत येथील कारपरदाज सर्वत्रांस दाखवीत आहेत. या भुलथापेवर दुर्गोजी भापकर फौज ठेवीत नांहीं.

फतेसिंग गाइकवाडावर दाब बसावायाकरितां गोविंदराव गाइकवाडाची उभारणी करावी. हा असल खुलासा येथील कारपरदाजांचा. परंतु गोविंदराव गाइकवाडास दाहावीस लाख रुपये कर्ज लोकाचें देणें व संग्रही दाहा घोड्याहून आधिक नांहींत. कोण्हीं कारभारी मुख्तार करून द्यावा. व त्यानें दोन ती लाख रुपये गोविंदराव गाइकवाडास देऊन सरदारी उभी करावी, हे योजना आहे. त्यास गाइकवाडास कोण्ही दिवाण मिळत नांहीं व सरदारीची उभारणी होत नांहीं.

तळेगांवास कांही गाडदी व पानस्याचे बंधू सखारामपंत यांस पाठवावयाची योजना येथील कारपरदाजांची आहे. हें वर्तमान पूर्वी लिहिले आहे त्यास गाडदी व तोफा तळेगांवास पाठवितों म्हणोन शोहरत घातली आहे. परंतु रवानगी आजीपर्यंत जाहली नांही. येथील कारभाऱ्यांचा सांप्रदाय पुरती डोईस जखम लागल्यावर सावध व्हांवें, म्हणजे गाडकर किंवा अन्यत्र इंगरेजांची पलटणें घांटापर्यंत येतील ते समई फौज व गाड्याची रवानगी करतील यैसें यांचे साप्रदायावरून दिसतें.

मुसा मूती फरासीसांचे तरफेचा वकील गोव्यास आला होता. तो बमोजिब तलब येथील कारपरदाज छ माारीं पुण्याहून पांचे कोसी

वेळूस आला म्हणोन यैकिलें. छ १७ माहे माार रविवारीं उदईक पुण्यास येणार.

मुंबईहून कांही जिनस खरीद फरोख्तचा न आणावा व आणील त्यापासून गुन्हेगारी घेऊन पारपत्य करावे याप्रमाणें येथील कारपरदाजांनीं सर्वत्र बोहरी व बजाज वगैरेस ताकीद केली आहे. ताकीद केली आसतां कोण्ही बेपारी चोरून कांही जिनस मुंबईहून आणितो त्याची बातनी कारपरदाजास कळल्यापक्षीं सिक्षा करून रुपये नागवण पुष्कळ घेत आहेत. सांप्रत पंढरपुरीं कोण्हीं सावकारानें रेसीम खरीदी करून आणिलें. हें वर्तमान कारभाऱ्यास कळल्यानंतर पंचेवीस गाडदी पंढरपुरास पाठविले व घर जप्त करून सावकारास पुण्यास आणविलें आहे.

———

३

पुरवणी आखबार पुणें, छ १७ जिलकाद सन ११९५.

बाबूराव वैद्य वकील निाा पंतप्रधान कारपरदाजाचे तरफेनें महेश्वरास अहिल्याबाईकडें गेला होता तो माघारा आला. व बालाजीपंतासीं व वकील माारासीं खिलवत जाहली व नारो गणेश व पाराजीपंत दिाा तुकोजी होलकर पुण्यास आले आहेत. हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. त्यास बाबूराव महेश्वरीहून आला, व अहिल्याबाईचा पैगाम येथील कारपरदाजास व कारपरदाजांचा पैगाम बाईस जो जाहला त्याची कयफियत खारिज यैकिली, ते लिहितों. पंतप्रधानांचे कारभाऱ्यानीं बाबूराव वैद्यास अहिल्याबाईकडें पाठविलें व पैगाम केला कीं, पंतप्रधानांचे दौलतीचे खांब सिंदे व होळकर, व उभयतांचे भरवसियावर व अनकूळतेनें दक्षण हिंदुस्तान काबीज जाहली. सांप्रत सरदार मुल आम्हीं कारभारी युक्तीप्रयुक्तीनें आजी आठ वर्षे काररवाई करून दौलतेचा आब रक्षिला. परंतु घरचा फितूर व इंगरेजांसीं स्पर्धा व दरसाल लढाई व मुलुक तमाम गेला. सांप्रत या सरदारींत रुपयाची कमती बहुत आहे. या

समई मदद केल्यास फार उपयोगी पडेल. तरी पंचेवीस लाख रुपये बतरीक दस्तगर्दा किंवा कर्ज हसना देणें म्हणोन पैगाम केला. याचें उतर अहिल्याबाईनें केलें कीं सांप्रत सरदारीचे कामावर तुकोजी होळकर कायम आहे. ज्याजकडें माहाल व सरदारी दोन्ही कामें ज्याचे स्वाधीन आहेंत त्यानें रुपये द्यावे व त्यास रुपये मागावे, बशर्त सरदारी आपल्या स्वाधीन करावी व जागिरीत दखल दुसऱ्याचा नसावा. याप्रमाणें तह ठरल्यास रुपये आपण देऊं म्हणोन बाईनें उतर केलें. याचा मजहला दोन महिने पडला आहे. सेवटीं अहिल्याबाईनें माहदाजी सिंद्याचे मारफातीनें बाबूरायाचे जुबानीं बालाजीपंत व हरीपंतास सांगून पाठविलें कीं, सरदारीचें काम तुकोजी होळकराकडील काढून अहिल्याबाईस सरदारी सांगावी. व माहालाती जागीरीचा बंदोबस्त तुकोजी होळकरानीं करून सरदारीचे खर्चास जो रुपया लागेल तो द्यावा. किवा सरदारी तुकोजी होळकरानी करावी व माहाल मुलुक बाईचे स्वाधीन करावा. बाईनें सरदारीचे खर्चास जो रुपया लागेल तो द्यावा या बशर्तीनें पांचसात लाख रुपये अहिल्याबाई पंतप्रधानास देणार व नारो गणेश सांप्रत तुकोजी होळकरांपासी दिवाण आहेत, यांसी व बाईसी यैक्यता नांही याकरिता नारो गणेशांची तगीरी येशवंतरावदादाजी गंगोबातात्याचे पुत्रास दिवाणी द्यावी हे बाईचें मानस. याविषईची रदबदली व ज्वाबसाल दरपेश आहे. तुकोजी होळकर माजी होऊन सरदारीचें काम अहिल्याबाई जातीनेच अटोपील. तरी या कामाचे बंदोबस्तास बहुत दिवस प्रयत्न व खटपट करणें लागेल. या प्राा बखेडा पडला आहे.

४

पुरवणी आखबार पुणें, छ १६ जिलकाद सन ११९५ हिजरी.

माहदाजी सिंदे अहिल्याबाईचे पक्षावर व पुण्यांत सिंदे माराचे तरफेनें रामजी पाटील सिंदा आहे. तो व बाबूराव वैद्य अहिल्याबाईचे तरफेचा ज्वाबसाल करीत आहेत. हरीपंत व विसाजी अपाजी नारो

गणेशाचे इतिफाकानें तुकोजी होळकराकडून ज्वाबसालास मुकदम बालाजीपताचे विचारानें सरदारी किंवा माहाली काम, दोन्हीपैकीं येक काम अहिल्याबाईस सांगांवें व दाहा लाख रुपयें बाईपासून घ्यावे. तुकोजी होळकरास कबूल न जाहल्यास माहदाजी सिंद्याची आजुरदगी व सरकारची नजर बुडते याकरितां बहुत युक्तीप्रयुक्तीनें नारो गणेश व पाराजीपंतास समजाऊन सांगत आहेत. परंतु तुकोजी होळकरास ह्या दोन्हीं शकला मान्य पडत नांहींत. दरोबस्त सरदारी व जागीर माधवराव मुतवफीनीं आपल्यास दिधली आहे. त्याप्रमाणें बहाल व करार ठेविलियानें आपण नौकरींत हाजर आहोंत. नौकर ठेवणें नसलियां दोन्ही कामें बाईचेच स्वाधीन करणें. व नारो गणेशास माजी करून येशवंतरावदादाजीस दिवाणगिरी देणें. हेही सर्वथैव कबूल नांहीं. हरीपंत फडके जाहिरा तुकोजी होळकराचा पक्ष दाखवितात परंतु अंतस्थ बालाजीपंत व हरीपंत येक व सित्धसाधक होऊन काररवाई करीत आहेत या ज्वाबसालाचा मजहला पडला आहे. फैसला व निश्चय जाहला नांहीं. सेवेसी श्रुत होय, हे विनती.

५

पुरवणी आखबार, छ १६ जिलकाद सन ११९५ हिजरी.

पंतप्रधानांचे सरकारचा कदीम नौकर पटवेगर, बालाजीपंत मुतवफीपासून नौकर होता. सांप्रत पंतप्रधानांची मोत्याची कंठी व बालाजी जनार्दनांचे स्त्रीचे गळ्यांतील मोत्याचा कंठा पटवेगराकडून गांठविला. पटवेगरानें दाहावीस चौकडे मोत्याचे बश किमतीचे काढून कम किमती मोती कंठी व कंठ्यांत घातली त्याची चौकसी होता पटवेगराचे जिमे चोरी लागली. त्या उपरी तहकीकात करण्यांत कांही मोंती सांपडली. पटवेगरांचें घर जप्त करून मालमालीयत सरकारांत घेतली व पटवेगर कांही दिवस कैदेंत होता. छ १५ माहे माारी हातीचे पांयास बाधून सरे बाजार शहराबाहेर नेऊन टाकिला. मुलकी कामाचा जो ज्वाबसाल रूबकार होत आहे त्याचे तडजोडीकरितां बालाजी जना-

र्दन तिसरे चौथे रोजी हरीपंताचे डेऱ्यास जाऊन मसलहत करीत आहेत. या उपरी जें नवल विशेष वर्तमान होईल तें सेवेसी लिहून पाठवीन, हे विनती.

A. R. No. 136 — १९ जिल्काद ११९५ हिजरी

६ नोव्हेंबर १७८१

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार, विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ १९ जिलकाद, कार्तिक वद्य षष्ठीपर्यंत मोा पुणें, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वीं छ १७ माहे माारी डांकेवर हुजूरअर्जी व अखबार व विनतीपत्र सेवेसी पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रत राजकी वर्तमान पृथक पत्री विनती लिहिली त्यावरून श्रुत होईल. हुजूरअर्जी व आखबार सांप्रदायाप्रमाणें पाठविली आहे. राजश्री बाळाजी जनार्दन यानीं डेरे दाखल होण्याविषईं छ २१ माहे माारी मुहूर्त नेमिला होता तो राहिला, मवकूफ केला. आणखीं सुमुहूर्त पाहून सत्वरच डेरे देऊन दाखल होणार आहेत, सेवेसी श्रुत होय. इंगरेज काबूची व कोणते समईं काय करतील याची चिंता येथील कारपरदाजांस बहुत आहे. परंतु घांटाखालें फौज पाठऊन कल्याणी वगैरे ठाणीं घेण्याचा मकदूर सर्वथैव नांहीं बहुत काय लिहिणें, हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इाा छ १७ जिलकाद लगायत छ १९ माहे माार सन ११९५ हिजरी. कार्तिक वद्य ६ मंगळवार.

चेतसिंग कासीकर जमीदारासीं व इंगरेजांचे पलटणासीं लढाई जाहली. जमीदार माराची सिकस्त जाहली व पळोन विजयगडाचे

कै. ब. म. द. बा. पोतदार, ग्रंथ संग्रह

आश्रयास गेला. व तुकोजी होळकरानें फख्त सरदारी करावी किंवा माहालाती काम करांवें. दोन्ही कामापैकीं येक काम अहिल्याबाईने करांवें व येक तुकोजी होळकरानीं व याचे बंदोबस्ताचे बशर्तीवर पांचसात लाख रुपयेपर्यंत पंतप्रधानास बाई माारीने नजर द्यावे, या ज्वाबसालाचे फैसल्याकरितां नारो गणेश व पाराजीपंत निाा होळकर पुण्यास आले आहेत व रामजी पाटील व यशवंतरावदादाजी, गंगोबातात्याचा पुत्र, हे बाईचे तरफेनें उतर प्रत्योतर करीत आहेत म्हणोन यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजरअर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्यानंतर प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें आहे.

मुसा मूती फरासीसाकडील वकील पुण्याहून पांच कोसी वेळूस आला म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें होते. छ १८ माहे माारीं पुण्यास आला. मुसा बरने फरासीस नामे पंतप्रधानांचे सरकारांत नौकर आहे. तो बतरीक इस्तकबाल गेला होता. चितामण दीक्षित नामे बालाजी-पंताचे आकरब मुसा मूतीचे ज्वाबसालाचे बानीकार आहेत. माारनुले समागमें सरजाम

पालख्या दोन	घोडी	शागीर्दपेशा
२	५	व बदुखीचे बार
फरासीस गोरे	याबू थोर	मिळोन जवान
५	१ ४	५०
	५	

संदूक टिन हरयेकास	बेगारीचीं वोझी
च्यार माणसे बार घेणार	५०
बैल बारबरदारीचे	राहुटी व पाल
४	१

भवानी पेंठेंत मनसारामाचे बागांत उतरला आहे. सदरहू प्राा असबाब आहेत. फरासीस माार विलायतवाल्याचे तरफेनें पैगाम घेऊन आला आहे कीं विलायतीहून हजार गोरे घेऊन यतों. सरासरी

तीस रुपये दरमाहा प्राा तीस हजार रुपये दरमाह व सरदारीचे खर्चास दाहा हजार व तोफखान्याचे सरजामास दाहा हजार, येणेंप्रमाणें पनास हजार रुपये दरमाह देत जावा व येक मकान द्यावें. बशर्त या कराराचे फरासीसाची जमीयत विलायतीहून आणवितों. दोन लाख रुपये नख्त द्यावे. ते रुपये मुशाऱ्याचे करारान वजा करावे व बाद तंबी इंगरेजाचे जागीर वगैरे देऊन हजार गोरे व पांच हजार बार दरमाही नौकर ठेवावे. याप्रमाणें येथील कारपरदाजांसी बोलणार, म्हणोन खारिज यैकिलें. फरासीस माराची व बालाजीपंताची भेट जाहली नांहीं. छ २० माहे माारीं मुसा मूतीस भेटीस बोलावणार. पंतप्रधानांची भेट घेऊन बालाजीपंताची भेट घेईल. पूर्वी सन ११९० हिजरी सालांत पुरंदरास फरासीसाचा वकील आला होता त्याच तऱ्हेचा सांप्रतचा वकील दिसतो.

विसाजी कृष्टण बिनीवाले सरदार कदीम, मोरो बाबूराव यांचा शरीक जाहला होता. सबब नागवण घेऊन जागीर जप्त केली व खाननिसीन केला. सांप्रत विसाजीपंतावर कारपरदाजांची कृपा आहे. जागीर बहाल करून पुन्हां सरदारी सांगणार.

करनल गाडर मुंबईस आला व जंगी सरजामाची तयारी करितो. दंगा करून यक ब यक घांटावर येईल या सबब बोरघांटावर हजार गाडदी व हजार स्वार घांटाचे बंदोबस्तीस पाठवावे म्हणोन कारभाऱ्यांची तजवीज आहे. व बालाजी जनार्दन यांचे डेरे बाहेर होऊन सत्वरच डेरे दाखल होणार. दोनच्यार मुहूर्तें नेमिली आहेंत. निश्चय होईल, आमलांत येईल त्याप्रमाणें विनती लिहील.

२

पुरवणी आखबार, छ १९ जिलकाद सन ११९५ हिजरी.

येहतशामजंग फरूख मिरजा यांची जागीर हुजूरीहून बाहाल जाहली. त्याचे मुबारकबादीचा खिलअत पंतप्रधान व बालाजी जनार्दन

व हरीपंत व कृष्टणराव बलाळ यांचे पुत्रानी रावजीचे तरफेची वस्त्रें छ १७ माहे माारीं रवाना केलीं. पंतप्रधानांचे तरफेनें

४ कारचोबी पारचे
१ शालजोडी
१ किमखाब थान
१ सरपेंच मुरसा रकम

६ बालाजीपंताचे तरफेनें पारचे आदद
६ हरीपंताचे तरफेचे पारचे
६ कृष्णराव बलाळ याचे तरफेनें.

जनराल कूट चिनापटणापुढें च्यार कोस व हैदरअलीखान दाहा कोसाचे फासल्यानें आहे म्हणोन पूर्वी खबर आली होती. त्यानंतर ताजी खबर खान माराकडील आली नांहीं.

माहदाजी सिंदे कालीसिदेसमीप व इंगरेजांची पलटणें सिपरी कोलारसेसमीप आहेत इंगरेजांची फौज गालिब जाहली व चेतसिंग जमीदार कासीकर पळोन गेला हे वर्तमान आल्यानंतर करनल गाडर व करनल मेवर व जनराल कूट वगैरे इंगरेजांचे सरदार ताजा दम होऊन लढाईस मुस्तैद आहेत.

कृष्टणराव बलाळ हुजूर जाऊन शरफ मुलाजमत हासल केल्यानंतर राव माारांची तीनदां पत्रें बालाजीपंतास आलीं. पत्रें आल्यानंतर वाचून पाहून पुन्हा दर जवाब लिहून पाठवावयाचे मसलतींत बालाजीपंत व हरीपंत मुख्य, विसाजी अपाजी आठवले पेशदस्त, हरीपंत व कृष्णराव बलाळाचे पुत्र गोविंदराव शरीक मसलहत असतात.

पंतप्रधानानीं आपले तरफेची अर्जी हुजूर दिलीस व नजफखान व राजे चेतसिंग यांस पत्रें इंगरेजांचे तंबीविषई लिहून छ १८ माहे माारीं रवाना केली.

गाडर मुंबईस आला म्हणोन कारपरदाजांसमीप कलमी वर्तमान आलें नाहीं. खारिज चर्चा यैकली त्याप्रमाणें पूर्वी लिहिलें आहे व सांप्रतही चर्चा सर्वतोमुखीं आहे कीं गाडर मुंबईस आहे.

या उपरी जें नवल विशेष यैकण्यांत येईल ते लिहीन हे विनती.

———

A. R. No. 137

२३ जिल्काद ११९५ हिजरी

१० नोव्हेंबर १७८१

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान तां छ २३ जिलकाद, कार्तिक वद्य नवमी शनिवारपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद वैभव लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष पूर्वी छ २० माहे मारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान हुजूर व सेवेसी श्रुत जाहलें असेल. सांप्रतचे वर्तमान पृथक पत्रीं लिहिलं आहे त्यावरून विदित होईल. करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला व पलटणे पनवेल व बेलापुरास पाठविलीं म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें याचे प्रयोजन इंगरेजांचे तसरुफांत जो प्रांत आहे तो व त्याजवितरिक्त देशांतील साळीचा माल सित्थ जाहला आहे धान्यसंग्रह करावयाकरितां हरकत केली आहे. पंतप्रधानाचे कारपरदाज कोंकणांत फौज पाठवीत नाहींत याचें प्रयोजन अशक्तता इतकेंच ध्यानास येतें. सेवेसी श्रुत होय, बहुत काय लिहिणें, हे विनंती.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २० जिलकाद लगायत छ २३ माहे मार सन ११९५ हिजरी कार्ति (क) वद्य ९ मुसा मूती फरासीसाकडील वकील छ १८ माहे मारीं पुण्यास आला व करनल गाडर मुंबईस आला. जंगी सरंजामाची तयारी करितो व विसाजी कृष्टण बिनीवाल्यास जातीची जागीर कदीम बहाल जाहली. व यहतशामजंग बहादर फरुख मिरजा निरमलकर यांस हुजूरीहून जागीर बहाल जाहली याची मुबारकबादीचे खिलअत पंतप्रधानांचे तरफेचा व कारपरदाजानी आपले तरफेचे पाठविले यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित

हुजूर अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्या उपरी खारिज यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान दफेवार लिहिलं असे. मुसा मूती फरासीस छ २८ माहे माारीं पुण्यास आला. त्या उपरी कारपरदाजांचे सलाहानें तजवीज ठरली कीं प्रथमतां बालाजीपंताची भेट घ्यावी. त्याप्रमाणें छ २० माहे माारीं चितामण दीक्षित इस्तकबाल जाऊन मुसा मूतीस बमय हमराही व पुण्यांत मुसा वरणे नामे सवदागरीचे कसबावर आहे त्यासहित बालाजीपंताचे हवेलीस घेऊन आले गोविंदराव कृष्टण व कृष्टणराव बळवंत बालाजीपंतासमीप होते. परस्परें भेटी जाहल्या. त्यानंतर क्षेम वर्तमान परस्परें पुसोन मूती माारानें विलायतचे सरदारांचे खलीते तीन बालाजीपंतास दिधले व घडचाल दस्ती बेश किमती बालाजीपंतास दिधलें. अतर पानदान फरासीस माारास देऊन रुखसत केलें. मुसा मूतीस ज्याफत सिधा व नख्त रुपये दोनसे पाठविले.

छ २३ रोजीं मुसा मूती व हमराहीपैकीं येक फरासीस व मुसा वरने सवदागर व चिंतामण दीक्षित व बाळाजीपंत त्रितीय प्रहर दिवसापासून अस्तमानपर्यंत खिलवतेंत होते. फरासीसाचा खुलासा खारिज यैकिल्या प्रो पूर्वील पत्री लिहिला होता. कृष्टणराव बलाळ बमोजिब इतिला कारपरदाज लिहतील व सेवकासही तहकीक वर्तमान कळल्याप्रमाणें लिहीन. गोविंदराव गाइकवाडानीं दिवाण मुख्तार करून चालीस पनास हजार रुपयेपर्यंत सावकारी कर्ज घेतलें व दोनसे स्वार जमा केले व ज्याबज्या सर्वत्रांस कौल पाठविले कीं आपले जमीयतीसुधां येणें. घोडें व माणूस पाहून बोली करूं. छ २१ माहे माारीं येथील कारपरदाजांचे इतिल्याप्रमाणं गोविंदराव गाइकवाड मौजे खडकी, पुण्याहून दोन कोसी मुला नदीचे तीरीं पुलासमीप येऊन उतरला.

२

पुरवणी अखबार, छ २३ जिलकाद सन ११९५ हिजरी.

समागमें पांचसे स्वार व तीन हाती व दाहा उंट व येंक तंबू व दाहा

राहुटचा येणेप्रमाणें आहेत. छ २२ माहे माारीं राजश्री हरिपंत व कृष्टणराव बळवंत पंतप्रधानांचे तरफेनें इस्तकबाल गेले त्या उपरी भेटी जाहल्या. नंतर हरीपंत आपले डेऱ्यास गेले व कृष्टणराव बळवंत गोविंदराव यास समागमें घेऊन श्रीमंत पंतप्रधानांचे हवेलीस आले. बालाजी जनार्दन प्रधानासमीप होते. गाइकवाड माार बमोजिब कायदा पंतप्रधान व बालाजीपंतास भेटले व हमराही लोकांस भेटविलें. त्यानंतर अतर पानदान गाइकवाड माारास देऊन रुखसत केलें. गोविंदराव गाइकवाडास कोंडाईबारीचे रुखं गुजरातेंत पाठवावयाची तजवीज कारपरदाजांची आहे.

करनल गाडर मुंबईस आला म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलं आहे. सांप्रत खारिज यैकिलें कीं गाडर माार कल्याणीस आला. व बेलापुरासमीप तीनच्यार पलटणें जमीयत आली व नरनाला नामे किला कोंकणांत आहे तेथील माहासऱ्यास जमीयत पाठवणार. हें वर्तमान कारपरदाजानीं यैकिल्यानंतर कांहीं फौज व गाडदी तळेगांव व बोरघांटावर पाठवावयाची तजवीज करून सखाराम पानसे यांस छ २१ रोजीं रुखसत केले. मुठा नदीचे संगमासमीप जाऊन उतरले. समागमें दोनसे स्वार व पांच जरब तोफा व दोनसे गाडदी प्रस्तुत आहेत भवानजी भोंसले आकलकोटकर हजार स्वारानसीं पुण्यास आला आहे. कारपरदाजांचे सूचनेनुरूप भोंसले माार सखाराम पानसे याजसमीप जाऊन उतरले सत्वरच कूच करून तळेगांवास जाणार.

सुरत व वसई व मुबईच रुखं समुद्रांत फरासीसाकडील जंगी जाहाजें आलीं. म्हणोन पूर्वीं येथील कारपरदाजांचे जुबानी यैकिल्याप्रमाणें लिहिलें आहे. सांप्रत खारिज यैकिलें कीं फरासीसाकडील जाहाजें म्हणोन शोहरत जाहली हे गलत आहे. इंगरेजांची खाली जहाजें समुद्रांत आहेंत. तेच फरासीसाची म्हणोन लोकानी बादवाही शोहरत घातली व इंगरेजांची कमती व इंगरेजांचे शत्रुचा उत्कर्ष येथील कारपरदाजांस इष्ट. याकरितां अफवाई खबरेचे स्थलीं विश्वास धरीत आहेत.

सिपरीकोलारसासमीप मेवर नामे इंगरेज सिंद्याचे मुकाबिल आहे व माघारा जातों म्हणोन सिंद्यासी करार केला होता. सांप्रत येथील कारपरदाजांचे जुबानीं वर्तमान यैकिलें कीं मेवर माारानें कांही करारांत अंतर केलें होते. परंतु. माहदाजी सिंदे जबरदस्त व गालिब पाहून पूर्वील कराराप्रमाणें यमुनेचे रुखं दाहा कोस माघारा कूच करून गेला. पुन्हा तहकीक शोध कळल्याप्रमाणें सेवेसी लिहीन.

३

पुरवणी अखबार छ २३ जिलकाद सन ११९५ हिजरी.

दुर्गोजी भापकर पांचसातसे स्वारानसी कोंडाईबारीचा घांट उतरून सोनगडचे रुखं गेले. व गणेशपंत बहिरे यांजसमीप हजार बारासे स्वार जमीयत आहे व दरीसमीप होते. सोनगडचे रुखावर इंगरेजांकडील जमीयत नांही. खाली मैदान पाहून गेले. व भापकराचे लष्करांत हमराही लोकांस रोजमरे पावत नाहीत व खर्चाची अडचड फार म्हणोन यैकिलें.

विसाजी कृष्टण बिनीवाले यांस यैसीं हजाराची जागीर कदीम होती ते बहाल जाहली व सनदा देण्याची परवानगी जाहली. साल माारीं पंतप्रधानांचे सरकारांत मामलतदारांची रसद बारापंधरा लाखपर्यंत आलीं व खर्च अद्यापेक्षयां अधिक याकरितां बालाजीपंतानीं समग्र कदीम मामलतदार नरसिंगराव मांडवगणे व धोंडो महादेव यांस बोलाऊन हरयेकाचे जातीस माहालांत आमिलाना व तहरीर काय मिळती याचा शोध मामलतदारांचे जुबानीं करून हरयेकाचे मकदुराप्रमाणें नजर रुपये घेत आहेत. नरसिंगराव मांडवगणे यानीं तिरुसष्ट हजार रुपये दिधले व धोंडो महादेवास लाख रुपये मागतात. याज प्रो कितेकानी दाहाबारा हजार रुपये दिधले. चालीस आसामी निवडिली आहे.

हैदरअलीखानाकडील वर्तमान कारपरदाजांचे जुबानीं व कलमी यैकिलें नांहीं. खारिज यैकिलें कीं, जनराल कूट इंगरेज खान माारावर गालिब व लढाई रूबकार आहे.

या उपरी जें वर्तमान नवल विशेष यैकण्यांत व प्रत्यक्ष होईल ते सूचना लिहीन हे विनती.

A. R. N. 138

२४ जिल्काद ११९५ हिजरी

११ नोव्हेंबर १७८१

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ता॥ छ २४ माहे जिलकाद स्वामीचें कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे, विशेष. यथील वर्तमान छ २० माहे मजकूर रोज बुधवारी विनंतीपत्र प्रातःकाली सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान फरासीसाचा वकील येथे आला आहे हे सविस्तर वर्तमान पूर्वी विनंती-पत्री सेवेसी लेखन केले आहे, त्याजवरून विदित जाले असेल फरासी साचा वकील नानाचे येथे आला होता. नानाची व वकीलाची भेट जाली. दोन घटका गोष्टी जाहजे वगैरेच्या जाल्या. उपरांतिक वकील मजकूर आपले डेऱ्यास गेले. वकील मजकूर श्रीमंताचीही भेट घेणार. श्रीमंताची व वकील मजकूर यांची भेट जाल्यावर लेखन केले जाईल. फरासीसाची जाहज सुरतेजवळ चंव कोसावर आहेत. आणिकही दाहा पांच जाहजे गोव्याजवल आली आहेत. पुढे ते जाहजे सुरतेकडे जाणार यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखन केले जाईल, श्रुत होये दरबार वगैरे जाला होता. माहाली व मुलकी कामकाज जाले, विदित होये. छ २१ रोज गुरुवार राजश्री गोविदराव गायेकवाड दावडीहून हजार दीड हजार स्वारानसी येथे आले. खडकीचे पुलावर उतरले आहेत. उदईक गायेकवाड मजकूर यांची व श्रीमंताची भेट होणार. गायेकवाड मजकूर यांची उभारणी करून गुजरात प्रांती पाठ-विणार यैसे पूर्वी विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून श्रुत जाले

असेल. गायेकवाड मजकूर यांणी दाहा हजार फौज ठेवावी. काही पैका गायेकवाड मजकूर याणी दिवान उभा करावा. त्यानी द्यावा व कांही पैक्याची यौजना सरकारातून करून त्याची उभारणी करावी त्यांस गुजरात प्रांती पाठवावे, यैसा निश्चये केला आहे. त्यांस गायेकवाड मजकूर याणी दिवान गणपतराव कोलटकर केले आहेत. त्यानी लाख पनास हजाराचा साहुकारा केला. कारभारी याणीही सरकारातून पुरता पैका द्यावा तरी त्यानी नेमल्या प्रो फौज ठेवावी. त्यास प्रस्तुत सरकारात पैक्याची वोढ. अशा वोढीतही लाख पनास हजार रुपये त्यांस देऊन त्यांची उभारणी करून, आणिकही सरकारची फौज देऊन गुजरात प्रांती पाठवावे यैसी योजना केली आहे. प्रस्तुत गायेकवाड मजकूर याणी राऊती दररोज पाव रुपये देऊन, हजार दीड हजार राऊत मेलऊन येथे आले आहेत. पुढे त्यांची सरदारीचा काये बंदोबस्त करून त्याची रवानगी गुजरात प्रांती केल्यास हे सविस्तर ध्यानास आलिया सेवेसी लेखन केले जाईल, श्रुत होये. राजेश्री सखाराम पानसे व शहाजी भोसले यांचे पुत्र वगैरे यांचे कूच आदकोसाचे होऊन संगम उतरून नदीपार मुकाम जाला. पानसे व शाहाजी भोसले यांचे पुत्र मिळोन पांचसातसे राऊत आहेत. कोकणचे शुमारे तलेगांवास जातात. वदंता आहे कीं इंग्रजाची पलटणे कल्याणीहून पुढे चाल करणार. या अर्थी पानसे वगैरे यांची रवानगी सत्वर जाली आहे. श्रुत होये. होलकरही वाफगावाहून येथे येणार. होळकराकडील दोनतीन हजार फौज व येखादा सरदार राजश्री गणेशपंत बेहरे याजकडे पाठविणार. वर्तमान आहे की गणेशपंत बेहरे कोंडाईबारी उतरून खाले गेले. फौज वगैरे जमा जाल्यानंतर पंत मजकूर सुरतेकडे जाणार कारण कीं फरासीसाची जाहजे सुरतेकडे आली आहेत. त्याणी जाहजातून सुरतेस उपद्रव करावा व इकडून खुशकीतून गणेशपंत वगैरे याणी जाऊन उपद्रव करावा या अर्थी गणेशपंत सुरतेकडे जाणार म्हणोन वदंता आहे. श्रुत होये. होलकराचे दिवाणगिरीस राजश्री नारो गणेश आहेत. प्रस्तुत राजश्री दादाजी गंगाधर याणी सरकारांत नजर कबूल करून दिवाणगिरीचे काम करून अहिल्याबाईपासी राहावे, माली मुकदम्याचे काम करावे, नारो गणेश याणी

होलकरापासी राहून फौजेचा मात्र कारभार करावं अैसी घटवटना होते. मग काये निश्चये होऊन ठरल ते सेवेसी लेखन केले जाईल, श्रुत होये. आमृतसिध्धी योग मुहूर्त चांगला म्हणौन नाना बाहेर डेरे दाखल होणार यैसी वदंता होती. ते रहित होऊन नाना बाहेर निघोन डेरे दाखल जाले नाहीत. आपले वाडयातच आहेत. डेरे दाखल जाल्यास लेखन केले जाईल, श्रुत होये. छ २२ रोज शुक्रवार, कर्णयेल गाडर इंग्रज ममईस आहे. पुढे तो कल्याणीस येऊन पुढे चाल करणार, यैसी वदंता आहे. त्याजवरून पानसे वगैरे यांची रवानगी जाली आहे. आणि कही पथके नेमून रवाना करणार. प्रस्तुत पानसे वगैरे खडकीचे पुलावर आहेत. पुढे कूच करून तलेगावाकडे जाणार, श्रुत होये. प्रातःकाली नाना हरीपंताचे डेरियास गेले होते. उभयेता खलवत जाला. उपरांतिक नाना आपले घरास आले. खलवतीचा भाव यैकिल्यात आला कीं फौज वगैरे जमा करून येखादा सरदार व गोविदराव गायेकवाड वगैरे यासमागमे फौज देऊन गुजरात प्रांती रवाना करावे. व काही फौज व येखादा सरदार कोकण प्रांती तलेगांवकडे रवाना करावे याअन्वये खिलवत जाला, श्रुत होये. राजश्री हरीपंत गोविंदराव गायेकवाड याचे डेरियास गेले होते. त्याच्या भेटी होऊन हरीपंत आपल्या डेरियास आले. संध्याकाली रो गोविदराव गायेकवाड श्रीमंताचे भेटीस वाडयांत आले होते. नानाही श्रीमंताजवळच होते. श्रीमंताच्या व गोविंदराव गायेकवाड यांच्या भेटी जाल्या. भेटी होऊन गायेकवाड मजकूर दोन घटिका बसले होते. पाने व अतर वगैरे समारंभ होऊन उपरांतिक गायेकवाड मजकूर आपले डेरियास गेले. गायेकवाड यांस आणावयास इस्तकबाल राजश्री आपा बलवंत व माधवराव सदासिव गेले होते. प्रस्तुत गायेकवाड मजकूर हजार बारासे स्वारानसी येथे आले आहेत. पुढे त्याचा काये बंदोबस्त करितील हे लेखन केले जाईल, श्रुत होये. छ २३ रोज शनवार, हरीपंत कूच करून खडकीचे पुलावर जाणार यैसी वदंता आहे. गेल्यास लेखन केले जाईल, श्रुत होये. हैदर नाईकाकडील वर्तमान आहे कीं इंग्रजासी व त्यासी लडाई मातबर जाली. मनुष्ये बहुत जायां जाली. व येकदोन सरदारही पडले. इंग्रज त्याजवर

गालब आहेत. नाईक मजकुराचे लस्करांत महर्गता फार जाली आहे. इंग्रजानी येकदोन ठाणीही घेतली यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आलियास लेखन केले जाईल, श्रुत होये. फरासीसाचा वकील येथे आला आहे. कारभारी यासी व त्यासी भेट मात्र जाली. पुढे त्यासी व कारभारी यासी खलवत होऊन काये जे वर्तमान होईल ते सेवेसी लेखन केले जाईल, विदित होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 139

२५ जिल्काद ११९५ हिजरी
१२ नोव्हेंबर १७८१

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी, येथील वर्तमान तागा छ २५ जिलकादपर्यंत मोा पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष इकडील राजकी वर्तमान पय दरपय डांकेवर लिहून हुजूर व स्वामीचे सेवेसी पाठवितों त्यावरून श्रुत होत आहे. सांप्रत हुजूर अर्जी पाठविली ते गुजरेल. करनल गाडर मुबईस आला व पनवेलीपर्यंत तीन पलटणें जमीयत आली हे वर्तमान येथील कारपरदाजानीं यैकिल्यानंतर सखाराम पानसे यासमागमें अकलकोटकर शाहजी भोंसल्याची फौज भवानजी भोंसल्यासमागमे आली ते व पांच जरब तोफा व हजार बारासे गाड(दी) देऊन तळेगांवास पाठवायाचा उद्योग केला आहे. प्राचीन कमाविसदारापासून हरयेकाचे रोजगाराप्रमाणें व प्राप्तीनुरूप दांहावीस पना(स) हजारपर्यंत रुपये घेत आहेत. नरसिगराव मांडवगणे यानी साठ हजार रुपयेही दिले. धोडो माहादेवास लाख रुपये मागत आहेत. कमाविसदार रजावंदीनें रुपये देतात. या वर्षी पंतप्रधानाचे सरकारांत रसद बारा पधरा लाखपर्यंत आली. याकरितां रुपये मिळवावयाचा उपाय अनेक प्रकारचा कारभारी करीत आहेत. राजश्री रावजी हुजूर आले

आहेत. सर्व प्रकारे यजमानसाहबांचे दौलतख्वाह व सलाहकार व राजश्री गोविंदराव भगवंत निवळ आहेत. सहवासेंकरून रीती ध्यानास आली असेल. बरे योग्य जमानेसाज आहेत. राजश्री जिवाजीपंताचा व माझा कामाचे प्रसंगी सहवास नांहीं. परंतु सर्वत्रांचे स्नेहित स्वामीसीं तरी आकृत्रिम स्नेहितपणाची वर्तणूक करीत आहेत. आमचे यजमानसाहबांचे सग्रहीं उमदीं कामें व समग्र प्राप्ती इकडील ग्रहस्तांस जाहलियां यांचा बहुत संतोष व यजमानासमीप यांजपेक्ष्यां दुसऱ्यांचा उरूज नसावा व यजमानसाहबांसमीप पोख्त सलाहकार व हिमतीचा व हौसलेदार कोण्हीच नांहीं हा निश्चय त्रिवर्गांचा आहे बरें. श्री राजश्री रावजीस येश देवो व आमचे येजमानसाहबांस लाभ होऊन श्रीमंत पंतप्रधान स्वामीचे उपयोगी साहित्यांस मुतवजे होत तो अर्थ घडावा हे इछा आहे· बहुत काय लिहिणें हे विनती.

A. R. No. 140

२७ जिल्काद ११९५ हिजरी
१४ नोव्हेंबर १७८१

पैाा छ ५ माहे जिल्हेज सन ११९५ हिजरी, गुरुवार दोन प्रहर दिवस मये दारोगे हरकारे.

श्रीनिवास १/५

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी, येथील वर्तमान ताा छ २७ जिलकाद, कार्तिक वद्य चतूर्दसी, सौम्यवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून वास्तव्य पुणें क्षेम जाणून स्वानंद वृत लेखनाज्ञा करावी. विशेष पूर्वी छ २३ पर्यंत वर्तमान लिहून छ २४ माहे माारीं पत्रें हुजूर व स्वामीचे सेवेसी डांकेवर रवाना केलीं तें सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. त्यानंतर इकडील वर्तमान प्रत्यक्ष व यैकिलें सांप्रदायाप्रमाणें हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पृथक पत्रीं

वर्तमान लिहिलं आहे त्यावरून श्रुत होईल. येथील कारभाऱ्यांचा सांप्रदाय प्राप्तकर्माचा प्रयत्न करीत आहेत. दूरअंदेशा करून भांवीं होणाराची तडजोड होत नांहीं याचें कारण भांवी होणार निश्चयरूप होईल म्हणोन कयास किमर्थ करावा. अकस्मात परिहार कां न व्हांवें याकरितां पेशबंदीची तरतूद करीत नांहींत· सिपाही लोंक हुजराती यांस व नालबंदी व समजाविसीपैकीं यैक रुपया दिल्हा नांहीं. समय प्राप्त होईल ते समईं देऊं. याकरितां चालढकल करीत आहेत. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैा छ ५ जिल्हेज सन ११९५ हिजरी, गुरुवार.

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इा २४ जिलकाद लगायत छ २७ बुधवार सन ११९५ हिजरी, कार्तिक वद्य चतुर्दसी·

छ २० माहे माारीं मुसा मूती वकील फरासीस यानें बाळाजीपंताची भेट घेतली व छ २३ रोजी खिलवत पंत माारनुलेसी व फरासीसाचे वकीलासीं जाहली. छ २२ रोजी गोविंदराव गाइकवाड यानी पंतप्रधानाची भेट घेतली व करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला व करनलचे गडास माहासरा करणार. पंतप्रधान यानीं सखाराम पानसे दारोगे तोफखाना यांस तळेगांव बोरघांटास जावयाकरितां रवाना केलें. मुळा मुठाचे संगमासमीप जाऊन उतरला व करनल मेवर बमोजिब करार माहदाजी सिंदे यांचे रुखाहून माघारा यमुनातीरास दोन मजली गेला· यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ २४ माहे माारीं हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

करनल मेवर सिपरीकोलारसासमीप माहदाजी सिंद्याचें मुकाबिल्यास होता तो बमोजिब करार तोफा व हाती वगैरे सरंजाम शबखुनांत सिंदे माराकडील मेवराकडें सरजाम आला होता तो गोहदकर

जाट व सिवाजी विठल यांचे मारफातीनें माहदाजी सिंद्यास माघारा देऊन, मेवर माार कालपी यमुनातीराचे रुखं दोन मजली माघारा गेला. याप्रमाणें सिंदे माारानी वर्तमान लिहून पाठविलें आहे म्हणोन येथील कारपरदाजाचे जुबानीचें वर्तमान यैकिलें. सिंद्याचे वकील याचे जुबानीं याचप्राा यैकिलें. खारिज चर्चा यैकिली कीं मेवर इंगरेज कांहीं दिवस यमुनातीरीं राहून पुन्हां सुरतेस येणार. काबू पाहून च्यार दिवस दफयुलवक्ती केली आहे.

करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला व करनालचे गडास माहासरा करावयाची तजवीज आहे म्हणोन पूर्वील पत्रीं खारिज वर्तमान यैकिल्याप्रमाणें लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं गाडर माारानें कल्याणीस येऊन बदलापूरपर्यंत पलटणें पाठविलीं व सालीचें पीक तयार जाहलें आहे. साली समग्र कोंकण प्रांतीच्या जमा करून वसई व मुंबईस व कल्याणीस नेऊन जमा करीत आहे व करनालचा किला व पेम बंदर पनवेलीहून तीन कोसाचे फासल्यानें आहे व मकान मजबूत व ठाणें पंतप्रधानांकडील कल्याण व पनवेलीसमीप याकरितां माहासरा करून करनाल व पेम दोन्हीं मकानें घ्यांवीं याप्रकारें करनल गाडराची तजवीज आहे म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें. गाडर माार कल्याणीहून पुन्हां मुंबईस गेला व वसई व पनवेलीस आमदरफ्त करीत आहे म्हणोन यैकिलें.

पैाा छ ५ जिल्हेज सन ११९५ हिजरी, गुरुवार.

२

पुरवणी अखबार, छ २७ जिलकाद सन ११९५ हिजरी.

सखाराम पानसे दारोगा तोफखाना यांस बोरघांटाचे रुखें जावयाकरितां रवाना केलें तें पुण्याहून पाव कोस मुला मुठाचे संगमासमीप उतरले आहेत म्हणोन पूर्वी लिहिलें आहे. त्यास भवानजी भोंसले निाा शाहजी अंकलकोटवाले यांचे पांचसे स्वार व पानस्यांचे दोनतीनसे स्वार व पांच जरब तोफा छ माारपर्यंत मुकाम माारीं आहेत. गाडराचे हरकतीप्रमाणें

पानसे माार कूच करून जातील. रघुनाथराव सुरतेसमीप आहेत म्हणोन पूर्वी खारिज वर्तमान यैकिल्याप्राा लिहिल आहे. सांप्रत खारिज यैकिलें कीं राव माार व सटवाजी भोंसले व बाजीराव बरवे वगैरे पांच हजार स्वार व येक पलटण व दाहा जरब तोफासहित सुरतेहून कूच करून वसईस यावयाकरितां नवसरघनदेवी म्हणोन मकान खडकें बोरें सुरतेहून दाहाबारा कास तेथें आले. वसईस जाणार. येथील कारपरदाजांचे जुबानीं तहकीक नांहीं.

कृष्टणराव बलाळ यांचीं पत्रें छ १९ माहे माारचीं छ २६ माहे मिनहूस गोविंदराव कृष्टण यासमीप आलीं. माारनुलेनीं बालाजीपंतास दाखविलीं व छ २७ माहे माार बुधवारी बालाजीपंत हरीपंताचे डेऱ्यास तिसरा प्रहरास गेले. दोन घटका रात्रपर्यंत खिलवत करीत होते. कोण्हीं स्नेहिताचे द्वारें वर्तमान यैकिलें कीं हैदरअलीखान हुजूरचे ताबेदारींत रूजू जाहल्यावितरिक्त इंगरेजांचे तंबीचा अज्म हुजूरीहून होत नांहीं म्हणोन कृष्टणराव यानीं येथील कारपरदाजास लिहिलें आहे. त्यास येथील कारपरदाज हुजूर अर्ज करावयाचा माार राव माारनुलेस लिहिणार आहेत कीं हैदरअलीखानानें मोतमद हुजूरचें होऊन रुजू राहांवें येविषईं खान माारास पत्रें लिहिलीं आहेंत व पुन्हां लिहितों, व निश्चयरूप रुजू होईल. परंतु हजरत बंदगानआलीनीं इंगरेजांकडील मिस्तर ज्यान हालन व नववारद इंगरेजाकडील वकील जो आला आहे त्यास साफ सांगावें कीं सिकाकोली मछलीबंदर तालुका बमये किले सोडणें. न सोडाल तरी तंबी वाकई होईल. व वकीलास रुखसत करून सिकाकोल राजबंदरीचे रुखं मुतवजे मोहीम व्हांवें म्हणजे हैदरअलीखानास यकीन होईल कीं हजरतेनी नकशा केला त्याप्रमाणें इंगरेजांचे तंबीस अज्म जाहले या उपरी आपण हुजूरचे ताबेदारींत कमरबस्ता होऊन रुजू व्हांवें व होईल. इंगरेजांचे वकीलास हुजूर ठेऊन सिकाकोल वगैरे प्रांत तसखीर करावयाचा अज्म न जाहल्यापक्षीं, खान माार वहमनाक अनेक प्रकारचे चिंतात संशय आणील याप्रमाणें कृष्टणराव बलाल यांस कारपरदाज प्रत्योतर लिहिणार म्हणोन यैकिलें.

छ २५ माहे माारीं हैदरअलीखानाचीं पत्रें कारपरदाजास व नूरमाखान व नरसिंगराव यास आलीं. छ माारीं त्रितीय प्रहरीं लक्ष्मणराव रास्ते व उभयतां वकील बालाजीपंतासमीप जाऊन च्यारपांच घटका खिलवतेंत होते. त्या उपरी वकील माार व रास्ते रुखसत घेऊन गेले. हैदरअलीखानाकडील ज्वाबसाली खिलवतेंत कृष्टणराव बलाळ बमोजिब तलब कारपरदाज येत होते. सांप्रत कृष्टणराव यांचे पुत्र गोविंदराव शरीक खिलवत नसतेत. गाह ब गाह बालाजीपंतानीं बोलाविल्यास जात आहेत.

पैा छ ५ जिल्हेज सन ११९५ हिजरी, गुरुवार.

३

पुरवणी अखबार, छ २७ जिलकाद सन ११९५ हिजरी.

हैदरअलीखानाकडील वर्तमान व पत्रें येथील कारपरदाजास येक महिना येत नांहींत म्हणोन पूर्वी दोनतीन अखबारेंत पय दर पय लिहिलें आहे. येथील कारपरदाजानीं खान माराकडील बातनीकरितां जासुदांच्या जोड्या मुजरद रवाना केल्या होत्या. त्या लश्करास न जातां काळहस्तीसमीपचे घांटापासून माघारा परतून पुण्यांस आल्या व छ २५ माहे माारीं नूरमाखान व नरसिंगराव याचे विद्यमानें पत्रें आलीं व खिलवत जाहली. वकीलांस रुखसत केल्यानंतर गोविंदराव कृष्टण यास बोलाऊन नेऊन बालाजीपंतानीं खान माराकडील पत्राचा माार सागितला कीं चेतसिंग जमीदार कासीकर यानें गोरनर मेस्तर हिस्तैन यास दस्तगीर केलें हें वर्तमान यैकिल्याप्रमाणें आम्हीं हैदरअलीखानास लिहिलें हातं. त्याचा दर जवाब पाठविला आहे कीं गोरनरास दस्तगीर केल्याचें पुन्हां तहकीक वर्तमान जें आलें असेल तें लिहून पाठवणें. व हिस्तैन माारास आपल्याकडे आणऊन सख्त कैदेंत ठेवणें इतकाच माार लिहिला आहे. अमुके जागा आपण आहोंत व इंगरेज कोठें आहेत हें कांहीं वर्तमान लिहिलं नांहीं. पत्रें डांकेवर आलीं याकरितां जासुदांचे जुबानीही तहकीक होत नांहीं. याप्रमाणें गोविंदराव

कृष्टण यांस बाळाजीपंतानीं सांगितलें व सेवकानें गोविंदराव यांच जुबानीं यैकिल्याप्रमाणं लिहिलं आहे. कृष्टणराव जोसी वकील यानें पत्र कां न पाठविलं म्हणोन गोविंदराव यांस पुसिलें. माारनुलेनीं उतर केलें कीं पत्रें रवाना करावयाविषईं कृष्टणराव जोसी स्वतंत्र व

———

पौा छ ५ जिल्हेज सन ११९५ हिजरी, गुरुवार.

४

पुरवणी अखबार छ २७ जिलकाद, सन ११९५ हिजरी.

मख्तार नांहींत. कागद लिहून हैदरअलीखानास वाचून दाखऊन इकडें रवाना करीत आहेत, म्हणोन उतर केलें. पंतप्रधानाकडील जासूदजोडचा हैदरअलीखानाचे लश्करास कृष्टणराव जोसी वकीलाकडें रवाना जाहल्या होत्या, त्या घाटापर्यंत गेल्या. घांटापासून चिनापटणकर इंगरेजांच्या चौक्या हरयेक जागा मुस्तकीम बसल्या आहेत व हरकारे व कागदपत्र जांऊ देत नांहीत. याकरितां हरकारे माार कनोळेस आले व कनोळेंत पंतप्रधानांचे तरफेचा वकील आहे त्याचें पत्र कारपरदाजांस घेऊन छ २४ माहे माारीं पुण्यास आले व जुबानीं वर्तमान कारपरदाजांस सागितलें व कनोळकर वकीलानेंहीं अकसर लिहिलं असेल. परंतु कारपरदाजानीं तकयुद बहुत केलीं व वर्तमान प्रसित्धींत आणिले नांहीं. परंतु जासुदांचे जुबानीचें वर्तमान प्रसित्ध जाहलें व खारिज यैकिलें कीं, हैदर नायकास कर्नाटक प्रांतीचे पाळेगर जे शरीक जाहले होते ते समग्र मुतफिक होऊन खान माारापासून अलाहिदा होऊन करनल कूट इंगरेजास शरीक जाहले व तीस पलटणें जमीयत इंगरेजांची जमा जाहली. व खान माारासीं सफेजंग मुकाबिल लढाई मातबर जाहली. हैदरअलीखानाकडील उमदे सरदार पडले व घोडीं व माणसें पसुमार कामास आलीं. ते समई मुकाबिल लढाईचा ताब न राहिला व पसपा होऊन माघारा निघाला. इंगरेजानीं ताकुब केला ते समई तोफा वगैरे जिनसीचा सरंजाम राहिला व इंगरेजांचे हस्तगत जाहला. खान माार आरकाटपर्यंत आला. हमराह वीस पंचेवीस हजार फौज जरीदा

आहे. बहिर व बुनगा पूर्वीच अलाहिदा केला होता. इंगरेजानीं पाळेगरांचे इतिफाकानें तमाम घांट बंद करून रसद बंद केली. खान माराचे लश्करांत गिरानी बहुत जाहली. रुपयास दीड सेर पीठ जाहलें व लश्करी लोक तमाम बेदिल व पर्जन्याची वृष्टी अतिशय. घोडीं फार जांया जाहलीं. या उपरी क्षेमतेनें घांट चढून जावयाचा संशय खान मारास प्राप्त जाहला आहे म्हणोन खारिज यैकिल्याप्रमाणें लिहिलें आहे. येथील कारपरदाजासमीप तहकीक नांहीं.

बादामीचे किल्यापासून हैदरअलीखानानें आपले लश्करापर्यंत डांक बसविली आहे. त्या डांकेवर पत्रें अजीपर्यंत बादामीस येतात व तेथोन पुण्यास जलदरव हरकारे पत्रें घेऊन येत आहेत. सांप्रत येथील कारपरदाज व नूरमाखान याचे सलाहानें निश्चय जाहला आहे कीं पुण्याहून बादामी येकसेवीस कोस आहे. हैदरअलीखानाकडील येक जोडी व पंतप्रधानाकडील येक जोडी च्यार कोसाचे तफावतीनें बसवावी. बहुतकरून डांक बसेल. सेवेसी श्रुत होय. या उपरी जें वर्तमान नवल विशेष होईल, तें सेवेसी विनती लिहीन हे विनती.

A. R. No. 141

२८ जिल्काद ११९५ हिजरी

१५ नोव्हेंबर १७८१

पैा छ ५ जिल्हेज सन ११९५ हिजरी, गुरुवार.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे. येथील कुशल ता छ २८ माहे जिलकाद, मुा काा पुनें, स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखन आज्ञा करीत आसिले पाहिजें. विशेष, येथील वर्तमान छ २४ माहे मार रोज रविवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेंसमागमें सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमानं विदित

जालें असेंल. तदनंतर येथील वर्तमानं फरासीसाची ज्याहजें सुरते-जवल आले आहेत. मागूनही आनिख त्याचे ज्याहजे सुरतेकडे येणांर यैसे वर्तमान येथे होते. प्रस्तुत वर्तमान आहे कीं फरासीसाची एकदोन ज्याहजे थोर सुरतचे बंदराकडे आली होती. ते ज्याहाजे मागती माघारा गेलीं यैसी वंदता आंहे· मागंती तिकडीलं वर्तमान आल्यांस लखन केले जाईल, श्रुत होये. फरासीसाचा वकील येथे आला आहें. कारभारी याची व त्याची भेट जाली हे वर्तमान पूर्वी लेखन केले होते त्याजवरून श्रुत जाले असेंल· वकील माार यानी कारभारी यांसी पैगामं केला आहे की आम्हांस दाहां पाच लक्ष रुपये खर्चास द्यावें. आम्ही ज्याहजे वगैर तयार करूनं इगरेजांचे पारपत्य करितो. त्याजवरून कारभारीही वकील मांार यासी समाधानपूर्वक गोष्टी सांगतात यैसी परसपरे भाशने होतांत. पुढे काये निश्चये होऊन अमलात येंईल हे ध्याणांस आलिया लेखन केले जाईल, श्रुत होये. छ २५ माहे मांार रोज सोमवार राजश्री संखाराम पानसें व शाहजी भोसले याचे पुत्र वंगैर याची रवानंगी कोकन प्रांती तलेगावाकडे जाली आहें. त्यास पानसें माार वंगैरे येथून दो कोसाचे कूच करून तलेगावाचे शुमारे गेले श्रुत होये. सुरापूरकरासी व रायेदुर्गकरासी काही हर्शामर्श आहें. याजकरिता सुरापूरकराचे वकील कारभारी यांसी विनंती करितात कीं सुरापूरकरास आणून आपणांस भेटवितो. त्याचे साहित्य करून रायेदुर्गवाल्याचे पारपत्य होये यैसा आर्थ जाला पाहिजे यैसी रदबदली आहें. मग काये निश्चये होऊन ठहरल तो ध्याणास आलिया लेखन केले जाईल, श्रुत होये. हैदर नाइकाकडील वर्तमान आहे की नाईक माारासी व इंगरेजांसी चिनांपटनाकडें लडांई मातबंर जाली. नाईक माार सिक-स्त होऊन माघारां निघालें. मणुशे बहुत जाया जांली· नाईक माराचे पुत्रासं जखमा आल्या. त्याचा जावई सावनूरकर वांर पडला यांप्रो लडाई होऊन नाईक माार माघारा निघालें. इगरेज त्याचा पाठलग करून आहेत. यैसी वंदता आहें. मागती त्याजकडील वर्तमान आल्यासं लेखन केले जाईल, श्रुत होये. नाईक माार याजकडील वकील नूरखान वंगैर दरबारासं आले होते. नानांसी व वकील माार यासी खलबत

जाला. खलबतेचा भांव यैकिल्यात आला कीं नाईक माारासी व इगरजासी लडाई जाली हे वर्तमान वकीलानी कारभारी यांस सांगितले. आनिख राजकारनी कितेक बोलने जाली. भाशने वगैर होऊन नाईक माारांस पत्रे ल्याहवी यैसा निश्चये ठहरला. त्यास नाईक माारांस पत्रे वंगैर लिहिणारं श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकीं वगैर कामकाज जालें विदित होये . छ २६ रोज मगलवांर, करनैल गाडर इगरज ममईस आहें. दोनतीन पलटनें कल्यानीस आहेत. गाडर माांर जमांवासहित कल्यानीस येऊन पुढे चाल करणांर. प्रस्तुत वर्तमान आहे की कल्यानीहूनं दोन पलटनें तीनच्यार कोस पुढे चवक्यांवर आलेत कारन कीं कोंकन प्रांतीच्या साली वंगैर जमा करूंन ममईस नेतात यैसी वंदता आहे· त्याजवरून पानसे वगैर याची रवानंगी जाली आहें. मागून बाजीपंत वगैर याचीही रवानगी करणांर, श्रुत होये. राजश्री विसाजीपंत बिणीवालें याची उभारनी करितात हे पूर्वी लखन केले होते त्याजवरून श्रुत जाले असेलं. त्यास विसाजीपंतांस काही नूतनं जागीरीचे माही वगैर देऊन उभारनी करूनं त्यास मोहीम सागणांर यैसे आहे, विदित होये. नाना हरीपंताचे डेरियात गेले होते. नानाचा व हरीपंताचा खलबत जालां. भाव यैकिल्यात आला कीं कृष्णरावजीकडे पत्रे लिहिणार. दुसरी वंदता आहे की सोलापूरचा किला व काही माहलं सरकारांत देऊन येजमानसाहेबाचा संतोश ठेवणांर यैसे यैकिल्यात आलें विदित होये. छ २७ रोज बुधवांर, राजश्री मानाजी फाकडें परळीकडें बालेघाटांवर कोठे आहें त्यानी दोनच्यारसे स्वार जमा करून धूंमधाम करितो. येक दुसरे गाव त्यानी मारिले यैसे वर्तमान आहें. श्रुत होये· हरीपंताजवलं आद्याप नेमिल्याप्रो फौज जमा जाली नाही. तमाम लोकांस वगैर पत्रे पाठविली आहेत लोक येणांर. पैक्याची वोढ म्हणोन लोक दरेकसी करून जमा होंणार. प्रस्तुत हरीपंताचे डेऱ्याजवलं दानेक हजार फौज जमा आहें, विदित होये · पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे कृपालोभ कीजे, हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 142 १ जिल्हेज ११९५ हिजरी

१८ नोव्हेंबर १७८१

पैा छ ९ माहे जिल्हेज सन ११९५ हिजरी, सोमवार दोन घटका रात्र, मै जोडी माार, दारोगे सरकारं

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी यथील वर्तमान ताा छ १ जिल्हेज, मार्गसीर्ष शुध त्रितीया, रविवारपर्यंत स्वामीचे कृपेकरून पुण्यांत क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, कृपापत्र छ १९ जिलकादचें डांकेवर रवाना जाहलें तें चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांचे लिफाफ्यासहित छ २८ जिलकादी पाऊन पत्रावलोकानीं संतोष जाहला. इकडील अखबारेसहित छ २८ जिलकादीं अरुणोदईं सेवेसी विनतीपत्र चिरजीवांचे नांवचे पत्रांसहित व हुजूरअर्जी व अखबार डांकेवर रवाना केली ते दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्र पावलें असेल. सांप्रत हुजूरअर्जी व अखबार व सेवेसी अखबार पृथक पुरवण्या लिहिल्या तें पत्र दारोग्याचे विद्यमानें पावेल. हुजूरीहून पूर्वी नकशा इंगरेजांचे तंबीचा जाहला व हजरत खुदावंदन्यामत यानीं सिकाकोल राजबंदर प्रांताचे तसखीर करावयाचा अज्म केला म्हणोन जिवाजीपंत सदैव येथील कारपरदाजांस लिहीत होते. परंतु हुजूरीहून दोनतीन वार सेवकास इनायतनामे सादर जाहले त्यांत इरषाद होता कीं सिकाकोल वगैरे प्रांतास हुजूरीहून मोहिमेचा अज्म करावा हा नेम जाहला नांहीं. येणप्रा बालाजीपंतास सागणें. सांप्रत मध्यस्तानी येथील कारपरदाजास सूचना लिहिली आहे कीं इंगरेजाची तंबी करावी व सिकाकोल वगैरे इंगरेजांचे तसरुफी प्रांत तसखीर करावयाविषईं हुजूरीहून निश्चय व करार जाहला होता. येणेंप्रमाणें हजरतेचे जुबान मुबारकेनें साबत केलें. परंतु मर्जी पूर्वील करारावर कायम नांहीं व हैदरअलीखानानें पशकसीबाा रुपये देऊन हुजूर रुजू व्हांवें हे शर्त नवीन उत्पन्न केली

आहे. याप्रमाणें मध्यस्तानीं येथील कारपरदाजास लिहिलं आहे म्हणोन यैकिलें. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे हे विनती.

———

पैा छ ९ जिल्हेज सन ११९५ हिजरी, सोमवार दोन घटका रात्र मै जोडी सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २८ जिलकाद लगायत छ १ जिल्हेज सन ११९५ हिजरी, मार्गसीर्ष.

करनल गाडर मुंबईंत राहून बदलपूरपर्यंत पलटणें पाठविलीं व करनाल पेम येथें माहासरा करावयाची तजवीज केली व माहदाजी सिंद्याचे रुखावर मुकाबिल्यास करनल मेवर पलटणासुधां होता तों दोन मजली माघारा यमुनातीर कालपीचें रुखं गेला व हैदरअली-खानासी व इंगरेजांसीं मुकाबिल लढाईंत खान माराची सिकस्त होऊन पसपा जाहला व हाती व तोफा इंगरेजांचे हस्तगत जाहल्या म्हणोन व याविंतरिक्त अंवातर वर्तमानासहित हुजूरअर्जी व अख-बार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान लिहिलं असे.

हैदरअलीखान व करनल कूट चिनापटणवाला या उभयतांचे लढा-ईंत खान माराची सिकस्ता बेतन्हा होऊन खराबी बंहुत जाहली म्हणोन पूर्वील अखबारेंत वर्तमान लिहिलं आहे. सांप्रतहीं खान मा-राची सिकस्त व खराबी बहुत जाहली हेच चर्चा सर्वतोमुखी प्रसित्ध आहे. पंतप्रधानाचे कारपरदाजांचे सांगण्यांत खान मारासमीप वकील आहे त्याचें व अन्यत्र कलमी खबर आली नांहीं. बादवाही शोहरतेचा निश्चय होत नांहीं.

रघुनाथराव च्यारपांच हजार फौंज व येकदोन पलटणासुधां नवसरघनदेवीस आले म्हणोन पूर्वीं लिहिलं आहे. सांप्रत खारिज यै-किलें कीं चिंचणी तारापूर वसईहून सोळा कोसाचें फासल्यानें आहे,

तेथें आले व वसईस येणार म्हणोन यैकिलें. कारपरदाजांचे जुबानी तहकीक नांहीं.

वासदें म्हणोन त्र्यबकीहून वीस कोस घांटाखालें कोळ्याचें मकान मवासा आहे तेथें तीन पलटणें जमीयत गाडराची आली व कोळ्याचे इतिफाकानें काबू पाहून घांटावरील कोण्हीयेक गड दग्यानें घेणार म्हणोन खारिज यैकिलें. परंतु धोंडो माहादेव त्र्यंबकचा किलेदार यास नजर मागत होते ते मवकूफ करून गडाचे खबरदारीकरितां सत्वर रवाना करणार आहेत.

करनल गाडराची पलटणें बदलापूर व कल्याणी व पनवेलीस पूर्ववत आहेंत. सालीचा धान्यसंग्रह समग्र आपले मुतसरफी तालुकियांतील केला.

पैा छ ९ जिल्हेज सन ११९५ हिजरी, सोमवार दोन घटका रात्र माा दारोगे हरकारे सरकार.

२

पुरवणी अखबार, छ १ जिल्हेज सन ११९५ हिजरी.

रघुनाथराव वसईस येणार म्हणोन इस्तहार व करनल गाडर जगी सरजामाची तयारी करितो व मुंबई व कल्याणी व वसईस आमदरफ्त करीत आहे. येकायेकीं घांटावर येईल या अंदेशाकरिता येथील कारपरदाज फौज जमा करितात व समग्र लाहान मोठे सरदारास सत्वर येण्याविषई ताकीदपत्रें पाठविलीं आहेंत.

छ २९ माहे जिलकादीं आनंदराव व लक्ष्मणराव रास्ते याची फौज व गंगाधरराव रास्ते आपले तालुकियांत होते ते दोन हजार स्वारानसीं पुण्यास येऊन मुठा नदीचे तीरीं उतरले व बालाजीपंत व पंतप्रधानांची भेट सांप्रदायाप्रमाणें घेतली.

सखाराम पानसे दारोगा तोफखाना, पुण्याहून पाव कासी उतरले होते ते बमोजिब ताकीद कारपरदाज छ १ माहे माारीं कूच

करून तीन कोस पुण्याहून मौजे खडकीसमीप जाऊन उतरले. तेथो-नहीं कूच करून तळेगांवास जाणार. पानसे माारासमागमें भवानजी भोंसले अंकलकोटवाले हजार स्वार व प्रतिनिधीची फौज दीड हजार व पानस्यांचे जातीची तीनच्यारसे, येणेप्रमाणें व पांच तोफा व हजार बारासे गाडदी तैनात जाहले आहेत. प्रतिनिधीची फाज अद्यापि पानसे माारासमीप गेली नांही.

इंगरेजांचे तंबीचा अज्म हुजूरीहून होत नांहीं व हैदर नाइकानें पेशकसीबाा रुपये देऊन हुजूरचे ताबेदारींत हाजर राहावें हे शर्त नवी दरमियान उत्पन्न जाहली म्हणोन अकसर बालाजीपंत व हरीपंतास मध्यस्तानीं हुजूरचे जमीर मुंबारकेचा खुलासा लिहिला आहे. त्यावरून येथील कारपरदाज बहुत फिकरवंद व छ ३० जिलकादीं हरीपंताचे डेऱ्यास बालाजीपंत तिसरा प्रहरा गेले होते ते प्रहर रात्रीस हवेलीस आले. याचप्राा छ १ माहे माारीं बालाजी-पंत आपले बागांत गेले होते. तेथें हरीपंतही आले व खिलवत जाहली.

तुकोजी होळकर व अहिल्याबाईचा ज्वाबसाल रूबकार याचा तपसील पूर्वी लिहिला आहे. त्यास सरदारी तुकोजी होळकरानी करावी व दरोबस्त माहालांत आमिलाची तगीरी बहाली व जमा-बंदीची तशखीस याचा यख्तियार अहिल्याबाईचा असावा. नारो गणेश दिवाणीवर बहाल व येशवतराव गंगाधर यानी फडनीसी करावी, याप्राा करार जाहला. परंतु साल माारी देशांत व खान-देशापैकीं जागीरीचे माहालांत तुकोजी होळकरांचे मारफातीचे आमिल जाहले आहेत ते बहाल व बरकरार ठेवावे म्हणोन कारपरदाजानीं निश्चय केला आहे. हे तजवीज अहिल्याबाई व माहिदाजी सिंदे यांस पसंद व कबूल जाहली पाहिजे याकरितां पत्रें लिहून पाठविलीं आहेत. तिकडील उत्तराप्राा निश्चय होईल. सेवेसी श्रुत होय हे विनती.

पैा छ ९ जिल्हेज.

श्रीनिवास

पुरवणी

रजाअलीखान, चंद्रसाहबांचा पुत्र, पुण्यात येऊन राहिला होता तो सांप्रत च्यारपांच महिन्यापासून आजारी होता. छ २९ जिलकादीं समाप्त जाहला. कळावे हे विनती.

A. R. No. 143

२ जिल्हेज ११९५ हिजरी

१९ नोंव्हेंबर १७८१

पैा छ ९ जिल्हेज सन ११९५ हिजरी सोमवार दोन घटका रात्र मै जोडी सरकार माा दारोगे.

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २ माहे जिल्हेज मुा पुणे श्वामीचे कृपावलोकणकरून येथास्तित जाणौन श्वानंद लेखण आज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २८ माहे जिलकादे रोज गुरूवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे रवाणा केले ते पावोण सविस्तर वर्तमान ध्याणास येईल. तदणंतर येथील वर्तमान करनैल गाडर इंग्रज ममईस आहे. कल्याणीस आला यैसी वदंता आहे. परंतु तहकीक वर्तमान नाही. ममईस आहे हे वर्तमान तहकीक बोलतात. पुढे गाडर मजकूर कल्याणीस ज्यमावाणसी येणार. येऊन पुढे बोरघाटाकडे चाल करनार यैसे वर्तमान आहे. कल्याणीस तीनच्यार पलटणें आहेत त्यापैकी दोन पलटणे पुढे च्यार कोस बोरघाटाचे सुमारे चौक्यावर आली यैसे वर्तमान आहे. वदंता आहे की पुढे पलटणे यावयाचे कारण की इंग्रज कोकण प्रांाच्या साली वगैर जमा करितात. कदाचित श्रीमंताची फौज आली तर या अर्थी दोन पलटणे पुढे चौक्यावर पाठविली यैसे वर्तमाने आहे. दुसरे वर्तमान

आहे की साली वगैर जमा न करता कल्याणीहून दोन पलटणे पुढे रवाणा केली ते चौक्यावर आली. मागून गाडर मजकूरही ममईहून कल्याणीस येऊन पुढे चाल करनार यैसी वंदता आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखण केले जाईल, श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलुकी कामकाज ज्यारी आहे, श्रुत होये. छ २९ माहे जिलकाद, रोज शुक्रवार, राजश्री गंगाधरराव रास्ते दोनअडीच हाजार फौजेनसी पुण्यास आले. संगमावर येऊन उतरले आहेत. श्रीमंताच्या व कारभाऱ्याच्या व गंगाधरराव रास्ते याच्या भेटी जाल्या. भीटी वगैर होऊन रास्ते आपले डेऱ्यास गेले. रास्त्याची रवाणगी कोकण प्रांती तलेगावाकडे करनार. कारण की इंग्रजाची दोन पलटणे चौक्यावर आली या अर्थी याची रवाणगी करनार. रवाणा कल्यास लेखण केले जाईल, श्रुत होये. वदंता आहे की श्रीमंत राजश्री दादासाहेब सुर्तेहून ममईस आले. ममईहून वसईस येणार व वसईचे ठाणे दादासाहेबास इंग्रज देणार यैसा करार जाला आहे. या अर्थी दादासाहेब वसईस येणार यैसी वंदता आहे. तहकीक वर्तमान आल्यास लेखण केले जाईल, श्रुत होये. रा॥ सटोजी भोसले व बाजीराव बरवे हे दादासाहेबाजवल आहेत. वर्तमान आहे की सटोजी भोसले वगैर दोनतीन हाजार फौजेनसी व त्याच्या मदतीस फतेसिग गायेकवाड याची फौज दोनतीन हाजार आली. येकूण पाचसाहा हाजार फौजेनसी सटोजी भोसले वगैर कोडाईबारीकडे येतात यैसी वंदता आहे. त्याजवरून येथून रा॥ गोविंदराव गायेकवाड याची रवाणगी करनार. प्रस्तुत गोविंदराव गायेकवाड याजवल दोनेक हाजार फौज जमली आहे. दाहा हाजार फौज त्यास सागितली आहे. परंतु खर्चायाची बेगमी नाही. मग त्याची खर्चावयाची बेगमी होऊन काये फौज जमून गोविंदराव गायेकवाडाची रवाणगी जाल्यास लेखण केले जाईल श्रुत होये. राजश्री परशराम रामचेंद्र मिरजकर याजला पत्रे गेली आहेत की फौजेसहित तुम्ही येणे. त्याजवरून परशरामपंत फौजेसहित येथे येणार. आलियास लेखण केले जाईल, श्रुत होये. रा॥ माणाजी फाकडे याणी पाचच्यारसे रावताचा जमाव करून परलीकडे बालेघाटावर धूमधाम करितात यैसे वर्तमान

आहे श्रुत होये. छ ३० माहे जिलकादे रोज शनवार, हैदर नाइकाकडील वर्तमान आहे की नाईक मजकुरासी व इंग्रजासी लढाई मातंबर जाली. नाईक मजकूर सिकस्त जाले. फौजेची खराबी फार जाली. सिकस्त होऊन बेगरुलाकडे गेले. इंग्रज त्याचा पाठलग करून आहेत. आरकाटचे व गिरीचे ठाणे मागती इंग्रजाणी घेतले यैसे वर्तमान आहे. विदित होये. रा॥ नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयेताचा खिलवत जाला. भाव यैकिल्यात आला की येज्यमानसाहेबाकडे व कृष्णरावजीकडे पत्रे रवाणा करनार. दुसरे कोकण प्रांती तलेगावाकडे फौजा रवाणा कराव्या या अर्थी खलवत जाला, विदित होये. छ १ माहे मजकूर रोज रविवार, सखाराम पानसे वगैर येका कोसाचे कूच करून खडकीवर गेले. समागमे तीनच्यार तोफा आहेत. पाचसाहासे श्वार पानसे मजकूर याजसमागमे आहेत. पुढे तलेगावाकडे जातात. कारण की इग्रजाची पलटणे चौक्यावर आली या अ

पुरवणी दुसरी

र्थी पानसे वगैर याची रवाणगी जाली व रास्त्याचीही रवाणगी करनार, श्रुत होये. रा॥ हरीपंत येका कोसाचे कूच करून खडकीवर जाणार यैसी वदंता आहे. गेल्यावर लेखण केले जाईल श्रुत होये. रा॥ बज्याबा पुरंधरे वंदणचे किल्यावर आहेत. त्याजला कोकण प्रांतीचे किल्यावर पाठवावे यैसी यौजणा केली होती. त्याजवरून बज्याबाची आजी आबई येथे कारभाऱ्याजवल आली की बज्याबास आणिक कोठे किल्यास न पाठविता ज्या किल्यावर आहेत तेथे असो द्यावे. त्यावरून बज्याबा वंदनच्या किल्यावर आहेत तेथेच आहेत. दुसरे किल्यावर पाठवणे रहित जाले श्रुत होये. फरासीसाचा वकील येथे आला आहे. कारभाऱ्याची मात्र भेट जाली. अद्याप काही बोलणे वगैर जाले नाही, शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल शृत होये. छ १९ माहे जिलकादचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर केले ते सेवकास पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याप्रकारे आज्ञापत्रे सादर होत अत असावी. बहुत काये लिहिणे कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

पैा छ ९ जिल्हेज सन ११९५ हिजरी सोमवार दोन घटका रात्र मै जोडी माा दारोगे सरकार.

A. R. No. 144

५ जिल्हेज ११९५ हिजरी
२२ नोव्हेंबर १७८१

पैा छ १४ जिल्हेज शुक्रवार, सरकारच्या डांकेबराबर विद्यमान दारोग्याचे पत्रे पावली. सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टाग नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ताा छ ५ जिल्हेज मार्गसीर्ष शुध सप्तमी, गुरुवासरपर्यंत मोा पुणे, स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ २ माहे माारीं हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत डांकेवर हुजूरअर्जी व अखबार व सेवेसी पत्र पाठविलें आहें तें दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान विदित होईल. चिनापटणवाले इंगरेजानें हैदरअली खानास फरारी केलें हें वर्तमान सर्वत्र प्रसिध व काळहस्तीपर्यंत इंगरेजांचा आमल पूर्ववत कायम जांहला हें वर्तमान पंतप्रधानाकडील जासूद मुजरद आले त्यानीं जुबानीं सागितलें. यावरून येथील कारभारी बहुत चिंताग्रस्त आहेत. व या दिवसांत कृष्टणराव बलाळ यांची पत्रें डांकेवर पयहम आलीं. त्या पत्राचा लेखनाभिप्राय मनन केल्यानंतर राजश्री बालाजीपंत प्रथमतां हरीपंताचे डेऱ्यास व बागांत हरीपंतासह खिलवतेकरितां गेले होते. पुन्हां छ २ व छ ३ रोजीं हरीपंताचे डेऱ्यास व बागांत बमय हरीपंत उभयतांच विचार करीत होते. येकांताचा भाव अद्यापि प्रसित्धींत आला नांहीं. कळल्यास लिहीन. बहुत काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इा छ २ जिल्हेज लगायत छ ५ माहे माार सन ११९५ हिजरी मार्गसीर्ष शुध गुरुवार.

गंगाधरराव रास्ते दोन हजार स्वारानसीं पुण्यास येऊन पंतप्रधान व कारभाऱ्यांची भेट घेतली. वं सखाराम पानसे छ १ जिल्हेजीं कूच करून पुण्याहून दोन कोसी खडकीसमीप जाऊन मुकाम केला. रघुनाथराव चिंचणी तारापुरासमीप आले म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें. त्र्यंबकाचे घांटाखाले वासदेवें मकान आहे तेथें कोळ्याची जमीयत व इंगरेजाकडील जमीयत जमा जाहली आहे म्हणोन खारिज यैकिलें. हैदरअलीखानाचे सिकस्तीची खबर पै दर पय यैकिल्याप्रमाणें लिहून पाठविली. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अखबार पाठविली ते पाऊन वर्तमान कळलें असेल. त्या उपरी प्रत्यक्ष व यैकिलं वर्तमान दफेवार लिहिलं आहे.

करनल गाडर मुंबईहून कल्याणी व पनवेलीस आमदरफ्त करितो. व जंगी सरजामाची तयारी मुंबई व कल्याणीस होत आहे. याकरितां पंतप्रधानाचे कारपरदाजानीं बोरघांटासमीप फौजा पाठवावयाची तजवीज करून तमाम सरदारास ताकीदपत्रें पाठविलीं कीं बमय सरजाम सत्वर येणें व सखाराम पानसे यांची रवानगी केली हें वर्तमान पूर्वी लिहिलें आहे. सांप्रत वर्तमान खारिज यैकिलें कीं करनल गाडर कल्याणीस येऊन राहिला व तीन पलटणें बदलापुरास कल्याणीहून दोनतीन कोस पुढें रवाना केलीं. गाडर कल्याणीस आल्याची खबर गोविंदराव कृष्टण याचे जुबानी यैकिली. पंतप्रधानांचे कारपरदाजाचे लिहिल्याप्रमाणें तुकोजी होळकरानी छ ३ माहे माारीं वाफगावीहून हरकत करून डेरे दाखल जाहले. त्र्यंबकचें घांटाखालें कोळ्यांचा हगामा वारद आहे व बोरघांटाकडें गाडराचे येण्याचा कयास. याकरितां दुतरफा जमीयत किती, याची तादाद व हरकत कोणेप्रकारें करितात हें कळल्याप्रमाणें तुकोजी होळकराची रवानगी करावी, हे कारपरदा-

जांची तजवीज आहे. खारिज यैकिलें कीं तळेगांवाचे सुमारें येण्याविषइं तुकोजी होळकरांस कारपरदाजांची सूचना जाहली आहे.

रघुनाथराव चिंचणी तारापुरापर्यंत आले व वसईस येणार म्हणोन खारिज वर्तमान यैकिल्याप्रमाणें पूर्वी लिहिलें आहे. सांप्रत खारिज यैकिलें कीं राव माार वसईस आले. व येथील कारपरदाजाचे जुबानीं यैकिलें कीं पूर्वी फरासीसाकडील जाहाजें नमूद जाहलीं होती. याकरितां कासीकडें चेतसिंगाचा बलवा जाहला होता म्हणोन रघुनाथराव यांचे राहणें सुरतेस सलाहनेक न पाहिली. वसई किवा मुंबईस राव माारनुलेनीं राहांवें याकरितां सुरतेहून रवाना जाहले होते. फरासीसाची जाहजें पुन्हां गेली व चेतसिंग जमीदार कमजोर जाहला. हे वर्तमान हैदर नाइकावर करनल कूट गालब जाहल्याचें वर्तमान यैकिल्यानंतर रघुनाथराव यांस पुन्हां सुरतेस गाडरानें पाठविलें. आश्विनीकुमार तीर्थासमीप जाऊन उतरले म्हणोन कारपरदाजांचे जुबानी यैकिलें.

२

पुरवणी अखबार पुणें, छ ५ जिल्हेज सन ११९५ हिजरी.

जंजिरेकर हबसी यांचा व पंतप्रधानाकडील कमाविसदार तळेंघोसांळें व बिरेवाडीकरासी दारमदार अद्यापि जाहला नांहीं. हजार गाडदी व कोंकणी प्यादे हजारबारासे पंतप्रधानाकडील बिरेवाडीसमीप आहेत. सांप्रत वर्तमान यैकिलें कीं हबसी यानीं साळीचे पिकाचा माल घेऊन आपले तालुकियांतील तमाम रयतीस फरारी होणें म्हणोन सांगितलें. व मातबर जमीयतीसुधां पंतप्रधानांचे फौजेचे मुकाबिल्यास व मुलकाचे ताख्ताराजकरितां येणार म्हणोन खारिज यैकिलें. हैदरअली खानाची सिकस्त होऊन खान माार फरारी जांहला व पाळेगर समग्र खान माारासमीप होते ते इंगरेजांस शरीक जाहले म्हणोन पुण्यांत सावकारी खबर आली. खान माारांचें पत्र येथील कारपरदाजास व आपलें वकीलास अद्यापि आलें नांहीं. व पंतप्रधानाकडील वकीलाचेंही पत्र

येत नांहीं. नूरमहमदखानाचा लेंक बागलकोटीं होता तो खान माारा-समीप आला आहे व ही खबर यैकिली कीं हैदरअलीखानाकडील कांहीं नवीन पैगाम घेऊन आला. परंतु तहकीक करीतां नूरमाा खानांचे भेटीस बागलकोटींहून आला आहे.

गोविंदराव गाइकवाड पांचसातसे स्वार व सखाराम पानसे हजारबारासे स्वार व गंगाधरराव रास्ते दोन हजार स्वारानसीं पुण्या-समीप मुकामात करूत आहेत. सखाराम पानसे याचे हमराही गाडदी व स्वारांस रोज (म) च्याबाा रुपये अद्यापि पावले नाहींत. पंतप्रधा-नांचे मुतसद्याकडून रुपये पावल्यानंतर कूच करून तळेगांवास जाणार. गोविंदराव गाइकवाडासमीप कारपरदाज गणपतराव कोलटकर नामे जाहला आहे. तो स्वारास पाव रुपयाप्रमाणें रोजमरा देतो. सातआठसें स्वार जमा जाहले आहेत व उमेदवारी पांचसातसे स्वार आले आहेत. परंतु फतेसिंग गाइकवाडास सिकस्त करून गुजरात प्रांत घ्यावा, ते समईं तलबतनखा मिळेल हे उमेद याकरितां लोक तनखेत नांहीत. पोटभरू व कांहीं गोविंदराव गाइकवाडाचे कदीम रफीक आहेत ते लोक माारनुलेसमीप आहेत.

गंगाधरराव रास्ते फौजेसुधां हाजर आहेत. पंतप्रधानांचे कार-परदाज जे समईं जिकडें रवाना करतील तिकडें बिला उजर जातील.

या उपरी नवल विशेष जें वर्तमान होईल तें सेवेसी विनती लिहीन हे विनती.

मानाजी फांकडा सरगरांचे लेंकासी मुतिफक जाहला व सुपे गांवी राहून पालीम वगैरे माहालांत धामधूम करितो म्हणोन येथील कारपरदाजांसमीप वर्तमान आलें आहे.

A. R. No. 145

६ जिल्हेज ११९५ हिजरी
२३ नोव्हेंबर १७८१

पैा छ १३ जिल्हेज शुक्रवारी सरकारच्या डांकेबराबर पाठविली ते विद्यमान दारोगे पावली, सन ११९५ हिजरी.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ६ माहे जिल्हेज मुा काा पुण स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणून स्वानंद लेखानार्थ आज्ञा केली पाहिजे. विशेषे, येथील वर्तमान छ २ माहे मजकूर रोज सोमवारी प्राथःकाळी विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेब सुर(ते)हून ममईस येऊन वसईस येणार यैसी वदंता आहे. हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री सविस्तर लेखण केले होते त्याजवरून शृत जाले असेल. वर्तमान आहे की श्रीमंत राजेश्री दादासाहेब वसईस आले. करनेल गाडर इंग्रजही वसईस येनार. वसईस आल्यानंतर दादासाहेबास वसईस ठेऊन आपन खांसा कल्यानीस जमावासहित येनार. कल्यानीस वगैर पलटने आहेत. गाडर मजकूर कल्यानीस आल्यानंतर पुढे बोरघाटाकडे चाल करनार यैसे वर्तमान आहे. दादासाहेब वसईस तहकीक आल्याचे वर्तमान आलियां लेखण केले जाईल. परंतु वंदता विशेषे आहे कीं दादासाहेब वसईस आले. शृत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. विदित होये. छ ३ माहे मजकूर रोज मंगलवार राजेश्री नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उपरांतिक नाना व हरीपंत स्वार होऊन खलवत करावयास बागात गेले होते. दोनतीन दिवस जाले बागात खलवत करावयास जात असतात. खलवत वगैर बागात होऊन नाना घरास आले व हरीपंत आपले डेऱ्यांस गेले. खलवतीचा भाव यैकिल्यात आला की दादासाहेब वसईस आले. पुढे काये उद्योग करणार यैसी वंदता. दुसरे, हैदर नायेकास इंग्रजानी फारच सिकस्त केले यैसे वर्तमान आहे. त्याजवरून कारभारी

डॉ. स. ग. ह. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

आपले ठिकाणी बहुतच शशांकित की पुढे मसलितीचा डौल कोण्या प्रकारे पडेल. हे कितीक विच्यार ध्याणास आणून उभयेताचे खलवत बहुत निकडीचे येकांतास बागात होतेस्ते याअन्वये खलवतीचा भाव यैकिल्यात आला, शृत होये. फरासीसाचा वकील येथे आला आहे त्यासी व कारभाऱ्यासी येकदोन खलवत जाले. भाव यैकिल्यात आला की या समयात फरासीसानी साहित्य करून इंग्रजाचे पारपत्य करावे यैसे मानस कारभाऱ्याचे. परंतु वकीलाचे बोलणे की आम्हास पैकियाचे साहित्य करावे, येक दुसरे स्थळ राहावयास द्यावे, उपरांतिक आपले साहित्याचा विच्यार घडेल यैसे फंरासीसाचे वकीलाचे बोलणे आहे. प्रस्तुत कारभाऱ्यास पैकियाचे साहित्य करून फरासीसास आणावे, हे गोष्ट होते यैसा प्रकार नाही. कारण की पैकियाची वोढ. याचेच फौजेस पैक्याचे अनकूलता नाही, मग फरासीसास पैका देऊन आणितात हे कलतच आहे. मग काये निश्चये होऊन फरासीसाचे वकीलास सांगतात, हे ध्याणास आलियां लेखण केले जाईल. दुसरे वर्तमान आहे की फरासीसाचा वकील याचा आवभाव मात्र पाहवयास आला आहे. राजकारणही येथास्थित उतरनार नाही यैसीही वंदता आहे. मग काये जे वर्तमान होऊन ध्यानास येईल हे सविस्तर सेवेसी लेखण केले जाईल शृत होये. छ ४ माहे मजकूर रोज बुधवार, सटोजी भोसले व बाजीराव बर्वे वगैर पांचसात हजार फौज व दोनतीन पलटणे या सरंजामानसी कोंडाईबारीखाले नयापूर धायेटे याजवल आले. पुढे ते घाट चढून वरते खांणदेश प्रांती येणार यैसी वंदता आ आहे. त्याचे शाहावर कोंडाईबारीखाले दुरगोजीबावा भाबकर हजारबारासे रावतानसी आहे व रा गणेशपंत बेहरे दोन हजार फौजेनसी कोंडाईबारीवर साकरीजवल आहेत. गणेशपंतानी येथे कारभाऱ्यास लिहिले आहे कीं फौज वगैर पाठऊन द्यावी (मजकूर फाटला) करावा. दिवसगत कराल्यास सटोजी भोसले वगैर बारी चढून वरते आल्यास पेंच पडेल. यां अर्थी फौज सत्वर पाठवावी. त्याजवरून येथून राजश्री गोविंदराव गायेकवाड वगैर याची फौजेसहित रवानगी करणार. रवाणगी केल्यास लेखण केले जाईल, शृत होये. करनेर गाडर ममईस आहे व श्रीमंत राजेश्री दादासाहेब वसईस

आल्याची वंदता. पुढे काये मसलत करून उद्योग करतील या अर्थी येथून राजश्री बाजीपंतआन्ना व रास्तीयाची वगैर फौज कोकण प्रांती तळेगावाकडे रवाणा करनार यैसी यौजणा आहे. रवाणा केल्यास लेखण केले जाईल, शृत होये. दरबार वगैर जाला होता. माली मुलकी वगैर कामकाज जाले.

पुरवणी २

शृत होये. छ ५ रोज गुरुवार, वर्तमान आले की होलकर वाफगावा-बाहेर डेरे दाखल जाले. फौजेचे देण्याचा गवगवा आहे. आद्याप त्याची संपूर्ण फौज मिलाली नाही. दोनतीन हजार फौज जमा जाली आहे. होलकर मजकूर येथे येणार. येथे आल्यानंतर त्याची रवाणगी कोणी-कडे करितात हे पाहावे, शृत होये. कारभाऱ्यानी आपले फौजेचे लोकास पूर्वी येकदोन पत्रे पाठविली होती की सत्वर आपले सरंजामानसी यावे. त्याजवरून लोकानी आड घातली आहे की मागील आमची नाल-बंदी वगैर वारून द्यावी. पुढे आमचे नालबंदी व रोजमुरे वगैरचा यैवज दिल्हयास आम्ही येऊ यैसे फौजेचे लोकाचे बोलणे आहे. येथे सरदार वगैर आहेत ते म्हणतात की, मागील व पुढील पैका दिल्हयास लोक येतील. नाहीतर आमचा उपाये काये? लोकाचे वगैर बोलणे याप्रकारचे. हे तो कोणास सध्या पैका देत नाहीत. या आर्थी आद्याप फौज वगैर जमा नाहीं. मग लोकास पैका वगैर देऊन फौज जमा जाल्यास लेखण केले जाईल, शृत होये. हैदर नायेकासी व इंग्रजासी लडाई होऊन नाईक मज-कूर याची सिकस्त जाली. नाईक मजकूर याचे पुत्रास वगैर जखमा आल्या. फौज बहुत गव्हाळचांत आली. दुसरे नाईक मजकुरावर इंग्र-जानी छापा घातला. नाईक मजकूर सिकस्त होऊन निघाले. बेगरुला-कडे गेले. इंग्रज त्याचा पाठिलाग करून आहेत. इंग्रजानी आरकाटचे व गिरीचे ठाणे घेतले यैसे वर्तमान आले आहे. मागती वर्तमान आल्यास लेखण केले जाईल, शृत होये. हिंदुस्थान प्रांती सिंद्यासी व इंग्रजासी लडाई होती. प्रस्तुत वर्तमान आहे की सिंद्यानी इंग्रजास बारा लक्ष रुपये देऊन सलूक केला व ग्वालेरचा किला जाटास दिल्हा यैसे वर्तमान आहे.

मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल, शृत होये. रा॥ कृष्टणरावजीकडील पत्रे वरचेवर येतात. त्याचे दरजवाबही येथून वरचेवर जातात. त्यातील सविस्तर वर्तमान ध्यानास येत असेल, शृत होये. पुढे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 146

१० जिल्हेज ११९५ हिजरी
२७ नोव्हेंबर १७८१

पौा छ १८ जिल्हेज मंगलवार अस्तमान सरकारच्या डांकेबराबर आली, ते मा॥ दारोगे हरकारे पावली, सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां॥ नमस्कार, विनती उपरी, यथील वर्तमान ता॥ छ १० जिल्हेज, मार्गसीर्ष शुध द्वादसी मंगळवारपर्यंत मो॥ पुणें, स्वामीचे कृपेकरून क्षम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, कृपापत्र छ १ जिल्हेजचे रवानगीचें चिरजीवांचे पत्रासहित पाठविलें, तें छ ८ माहे मा॥रीं पाऊन लेखनार्थ मननें करून चितस्वास्थता जाहली. पूर्वी छ ६ माहे मा॥रीं हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांचे नांवचे लिफाफ्यासहित डांकेवर रवाना केलें तें दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवेसी पावलें असेल. सांप्रत छ १० पर्यंत वर्तमानासहित अर्जी हुजूर व पृथक पत्रीं स्वामीचे सेवेसी वर्तमान लिहिलं आहे, त्यावरून श्रुत होईल. इंगरेजांचे तंबीचा नकशा हुजूरीहून जाहला असतां, सांप्रत हैदरअलीखानाकडील पेशकस येण्याचा व खान मा॥रानें हुजूर रुजुवात आणावी म्हणोन इरशाद नवीन जाहला आहे. यावरून येथील कारपरदाजांनीं कयासानें निश्चय केला आहे कीं हुजूर इंगरेजांचे तंबीचा अज्म सर्वथैव मंजूर नांहीं. पुढें हैदरअलीखानांचे विद्यमानें इंगरेजासी दारमदार करावा किंवा लढाईच कायम ठेवावी येविषईंचा

मनसुबा व विचार बालाजीपंत व हरीपंत करीत आहेत म्हणोन कोण्हीं स्नेहिताचे मुखं वर्तमान यैकिल्याप्रमाणें सेवेसी व हुजूर लिहिलं आहे. बहुत काय लिहिणें, हे विनंती.

———

पैा छ १८ जिल्हेज मंगलवार.

श्रीनिवास

अखबार पुणें, अज इा छ ६ जिल्हेज लगायत छ १० माहे माार सन ११९५ हिजरी, मंगळवार.

येथील कारभाऱ्यांचे लिहिल्याप्रमाणें छ ३ माहे माारीं तुकोजी होळकर डेरे दाखल जाहले म्हणोन वाफगांवीहून वर्तमान आलें. रघुनाथराव चिचणी तारापुरापर्यंत आले होते ते करनल गाडराचे सुचनेप्रमाणें पुन्हां सुरतेस गेले. जंजिरेकर हबसियांनीं पंतप्रधानांचे तालुकियांत धामधूम करावयाची योजना केली आहे. करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला म्हणोन खारिज यैकिलें म्हणोन व यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ ६ माहे माारीं अखबार डांकेवर पाठविली ते पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरी यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान दफेवार सेवेसी लिहिलं असे.

छ ७ माहे माारीं हैदरअलीखानाकडील जासूदजोडी नरसिंगराव वकीलासमीप पत्रासहित आलीं. राजश्री बाळाजी जनार्दन यांस खान माारानें खरीता पाठविला तो छ ७ माहे माारीं नरसिंगराव व नूरमाा खान उभयतानीं बालाजीपंतास पावता केला व दोनतीन घटका खिलवतेंत होते. खान माराकडील जासुदांस बालाजीपंतानीं मुंडासें व सेला इनाम दिधला. सेवकानें नरसिंगराव वकीलांचे जुबानीं वर्तमान यैकिलें कीं छ १५ जिलकादचीं पत्रें छ ७ जिल्हेजीं पुण्यास आलीं, त्यातील माार बेमराजपाळ याचे आसऱ्यास जनराल करनल कूट इंगरेज होता. हैदरअलीखानासीं व इंगरेजासीं पंचेवीस कोसाचा फासला असतां छ ५ जिलकादीं येक रात्र व येक दिवस दौड करून इंगरेजासीं गांठ घातली. परस्परें लढाई मातबर जाहली. इंगरेजांची सिकस्त होऊन झाडीचे आसऱ्यास निघोन गेला. हाती व बंदुखा व

डेरे वगैरे सरंजाम इंगरेजांचा खानमाराकडे लुटींत आला याप्रमाणें खान माराचें वकीलाचे जुबानीं वर्तमान यैकिलें.पंतप्रधानांचे वकीलाचीं पत्रें कारपरदाजांस आलीं नांहीत.

माहदाजी सिंदे काळीसिंदीहून पांचसात कोसी कूच करून सिपरी कोलारसचे रुखं गेले व करनल मेवर इंगरज दोन मजली दाहा कोस कूच करुन येमुनातीर कालपीचे रुखं गेला म्हणोन पूर्वीं वर्तमान यैकिलें त्याप्रमाणें हुजूर लिहिलं होतें. सांप्रत सिंद्याकडील कलमी वर्तमान आलें नांहीं.

छ ८ व छ ९ माहे माारीं पर्जन्यवृष्टी विशेष जाहली. गोविंदराव गाइकवाड व सखाराम पानसे मुला नदीचे कांठीं खडकीसमीप उतरले होते. काळी जमीन होती याकरितां चिखल बहुत जाहला. सबब छ १० माहे माारीं सखाराम पानसे यानीं खडकीहून येक कोसाचें कूच करून खरब भूमीवर जाऊन उतरले. करनल गाडराचे हरकतीप्रमाणें पंतप्रधानकडील जमीयत घांटापर्यंत जाईल. गाडर माार कल्याणी व बदलापुराहून पुढें न आल्यास पानसे वगैरे तळेगांवापर्यंतही जातील किंवा न जातील येविषईंचा संशय दिसतो.

छ ८ माहे माारीं बालाजीपंत हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. येक प्रहर उभयतांचा येकांत जाहला. पुन्हां आपले हवेलीस आले.

छ ९ माहे माारीं पंतप्रधान व बाळाजीपंत व हरीपंत पाषाणास देवदर्शनार्थ गेले होते.

करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला व जंगी सरजाम करितो म्हणोन पूर्वीं लिहिलें आहे. सांप्रत विशेष वर्तमान किवा गाडराची हरकत कल्याणीहून अन्यत्र स्थळांतरास जाहल्याचें वर्तमान आलें नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विनती.

———

A. R. No. 147

११ जिल्हेज ११९५ हिजरी
२८ नोव्हेंबर १७८१

पैा छ १८ जिल्हेज मंगलवार अस्तमान सरकारच्या डांकेबराबर पत्रे पाठविली, ते दारोग्याचे विद्यमाने पावली.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ११ माहे जिल्हेज मुा का पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, येथील वर्तमान छ ६ माहे मजकूर रोज शुक्रवारी प्रातःकाली विनंती पत्रसरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान राजश्री नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयेताचा खलबत येकप्रहर पावेतो जाला. उपरांतिक हैदर नायेकाकडील नूरखान वकील यांस बोलाविले. त्यासी व नाना व हरीपंत यासी च्यार घटका खलबत जाला. खलबतीचा भाव यैकिल्यात आला कीं नाईक मजकूर इंग्रजाचे लडाईंत सिकस्त फार जाले. फौज बहुत खराबीत आली, यैसे वर्तमान आले आहे. त्याजवरून कारभारी यासी व वकीलासी भाषणे होत होती कीं नाईक मजकुराची सिकस्त जाली, हे उतम न जाले. पुढे काये तजवीज, यैसी परस्परे भाषणे होत होती. कारभारी याणी वकीलास सांगितले कीं तुम्हीं व आम्हीं नाइकास पत्रे ल्याहावी कीं मागती जमाव करून इंग्रजासी लडाई करावी व त्याचे पारपत्य करावे, हिमत न टाकावी, याअन्वये पत्रे नाइकास ल्याहावी. या आर्थी वकीलासी व कारभारी यासी खलबत जाला. खलबत होऊन नाना आपले घरास गेले व वकीलही आपले बिऱ्हाडास गेले. श्रुत होये. नाईक माराचे सिकस्तीचे वर्तमान आहे. त्याजवरून येथे कारभारी आपले ठिकाणी बहुत आंदेशा करून आहेत कीं पुढें प्रसंग कोण्याप्रकारे रूबकार होईल हे न कले. नाईक माार सिकस्त जालियास तिकडील पलटणे दाहापांच ममईकडे उतरल्यास पेंच भारी पडल, यैसे आपले

ठिकाणी विवंचना करितात, श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. विदित होये. छ ७ रोज शनवार, कर्णल गाडर इंग्रज ममईस आहे. जमाव वगैर करितात. पुढे ते इकडे उद्योग करणार यैसी वदंता आहे. दुसरी वदंता आहे कीं गाडर मजकूर यांसी कांही स्नेहाचा संदर्भ लाऊन कागदपत्र लिहिणार. यांचे उतर गेल्यावर ते वकील पाठविणार, यैसे वर्तमान आहे आणि त्याजकडील सूत्रही परस्परे येथे आले आहे. बाह्यात्कारे तो यैकिल्यात येत नांही. परंतु आंतस्ते कांही सूत्र आहे यैसे बोलतात. परंतु यांजला त्याचा विश्वास येत नाहीं. इंग्रजाचे मानस कीं स्नेहे करून श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा बंदोबस्त करून पूर्वत प्रो त्यास जागीर देऊन येखाद्या स्थली त्यानी सुखरूप असावे. दुसरे हैदरचे पारपत्य करावे. आणिक कितीक राजकारणाचे प्रकार बोलतात यैसे इंग्रजाकडील मुंदे आहेत यैसे आंतस्ते राजकारण आहे म्हणौन यैकिन्यात आले. परंतु याप्रो मुदे हे कबूल करून राजकारण करितील यैसे होणार नाही. कारण कीं त्यांचा यांस विश्वास नांही. मग संकट जाणून कबूल करितील तर न कले. मागती पुरतेपणे याचा शोध करून हे राजकारण आहे किंवा नांही हे ध्यानास आणून लेखन केले जाईल. श्रुत होये. श्रीमंत राजश्री दादासाहेब वस-ईस आले यैसी वदंता आहे. प्रस्तुत वर्तमान आहे कीं आद्याप ते वसईस आले नाहीत, परंतु येणार. त्याचे वसईस आल्याचे वर्तमान आलिया लेखन केले जाईल, श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. विदित होये. छ ८ रोज रविवार, कर्णल गाडर ममईस आहे. पुढे तो उद्योग करणार यैसे वर्तमान आहे. त्याजवरून येथून रास्त्याची फौज व बाजीपंत अणां वगैरे यांची रवानगी बोरघाटाचे सुमारे तलेगावास करणार, यैसी योजना आहे. यौजना होऊन रवाना केलियास लेखन केले जाईल, श्रुत होये. हैदरनाईक सिकस्त जाल्याचे वर्तमान आहे. प्रस्तुत वदंता आहे कीं नाईक माराने आणिक जमाव करून इंग्रजाचे शहावर गेले. परंतु हे वर्तमान येथातथ्य नांही. सिकस्त जाल्याचे वर्तमान विशेष बोलतात व कलमीही खबर आहे· मागती त्याजकडील वर्तमान आलियास लेखन केले जाईल, श्रुत होये.

हिंदुस्थानप्रांती सिंद्यानी काही यैवज देऊन इंग्रजासी सलूख केला यैसे पूर्वी वर्तमान होते. प्रस्तुत वर्तमान आहे कीं सिंद्यानी कांही यैवज न देता जाटाचे विद्येमाने इंग्रजासी सलूख केला यैसी वदंता आहे, श्रुत होये. राजश्री नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयेताचा खलबत जाला. खलबताचा भाव यैकीन्यात आला कीं इंग्रजाचे मसलती विसी जाला, दुसरे राजश्री कृष्णरावजीकडे पत्रे पाठवावी, तिसरे आपले कितीक दौलतीचे बंदोबस्ताविसी· या अन्वये खलवत जाला. खलबत होऊन नाना आपले घरास आले, श्रुत होये.

छ ९ रोज़ सोमवार येकादसी म्हणौन श्रीमंत व नाना व हरीपंत वगैरे दोन तीन हजार फौजेनसी येयून दोन कोस पाशाणास माहादेव आहे त्याचे दर्शनास गेले होते. दर्शेन वगैरे करून सायेंकाली श्रीमंत वाडचात आले व नाना आपले घरास आले. हरीपंत वगैरे परस्परे लस्करात आपले डेऱ्यास गेले, श्रुत होये. राजश्री विसाजी कृष्ण बिनीवाले यास जागीर वगैरे देऊन उभारणी करणार हे पूर्वी लेखन केले होते. त्यास विसाजीपंतास साठ हजाराचा सरंज प्रस्तुत पागा वगैरेस दिल्हा. पुढे आणिक काही खर्चास देऊन फौजेची उभारनी करणार. उभारनी केलियावर त्याची योजना कोणीकडे करितात हे ध्यानास आलिया सेवेसी लेखन केले जाईल, श्रुत होय. परशराम रामचंद्र मिरजकर यांस पत्रें पाठविली आहेत की तुम्ही आपले फौजेसह वर्तमान येणे. त्याजवरून त्यानी उतर लिहिले कीं फौजेचा देण्याचा गवगवा आहे. कांहीं यैवजाची साहिता जाल्यास उतम आहे. सरंजामी हजार दोन हजार फौजे आहे. ते पाठऊन देऊ. विशेष फ़ौज पैक्याखेरीज येत नाहीं याची नेमणूक करून पाठवावी यैसे यानी लिाा होते, श्रुत होये. दरबार वगैरे जाला होता. विदित होये. राजश्री हरीपंत डेऱ्यास आहेत. नेमल्या प्रा ो फौज अद्याप जमा नाही. कारण कीं लोकास तीन वर्षे पैका नांही. लोक म्हणतात की मागील पुढील पैका दिल्हयास येऊ. नाहीतर येणे होत नाही. हे तो आद्याप कोणास पैका देत नाहीत यैसे

आहे. प्रस्तुत हरीपंताजवल दोन हजार स्वार आहेत· रास्ते दोन हजार व गायेकवाड हजार दीड हजार, श्रीमंताजवल व नानाचे नेमणुकेचे लोक वगैर तीन हजार, येकून सा-सात हजार कसर कम फौज आहे. सिवाये दोनतीन हजार गारदी याप्रो। प्रस्तुत फौज आहे· पुढे जे फौज जमा होईल ते लेखन केले जाईल, श्रुत होये·छ १० रोज मंगलवार अहिल्याबाई होलरीन इचे सूत्र लागले आहे कीं आपले नाताचे नावे सरदारी करावीं व दादाजी गंगाधर याणी दिवाणगिरी करावी·येविसी सरकारात नजंर द्यावी. तुकोजी होलकर याणी मात्र फौज चालवावी· हे राजकारण बाईचे आहे हे पूर्वी सविस्तर लेखन केले होते, त्याजवरून ध्यानास आले असेल·कारभारी याचे मानस कीं, बाई जवलून नजर घेऊन, बाईचे नाताचे नावे सरदारी करून द्यावी·दादाजी गंगाधर याणी दिवाणगिरी करावी·त्याजवरून तुकोजी होलकर आपले ठिकाणी आजुरदा आहेत· वाफगावी बाहेर डेरे दाखल मात्र जाले आहेत·फौज दोनतीन हजार त्याजपासी जमली आहे यैसे वर्तमान आहे मग होलकर माार येथे येतात किवा न येतात हे वर्तमान कलल्यावर लेखन केले जाईल. श्रुत होये·पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शुत होये· छ ३० माहे जिलकादचे आज्ञापत्र सादर केले ते छ ८ माहे माारी पावले·पावोन बहुत संतोश जाला. सदैव आज्ञापत्री साभाल होत असावा· बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 148 १५ जिल्हेज ११९५ हिजरी
२ डिसेंबर १७८१

पैाा छ २२ जिल्हेज रविवार दोन प्रहर दिवस आल्यावर सरकारच्या डाकेंबराबर आली ते विद्यमान दारोगे हरकारे पावली, सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी. येथील वर्तमान ताा छ १५ जिल्हेज मार्गसीर्ष वद्य द्वितीया रविवारपर्यंत मो

पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष कृपापत्र छ ९ माहे माारचें डांकेवर रवाना केलें तें छ १५ माहे माारीं चिरंजीव राजश्री रघोतमराव यांचे पत्रासहित पाऊन सविस्तारें वर्तमान कळलें व संतोष जाहला. पूर्वी छ ११ तारखेस हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र डांकेवर रवाना केलें, ते दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्या उपरी छ १५ माहे माारपर्यंत येथील वर्तमान पृथक पत्रीं स्वामीचे सेवेसी व हुजूरअर्जी व अखबार लिहून डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें पत्रें हुजूर व स्वामीचे सेवेसी पावतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैा छ २२ जिल्हेज सन ११९५.

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनती जे सेवकाची प्रकृती अशक्त याकरितां पांचसाहा वर्षापासून चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यांस येथील दरबारांत रुढीस घातलें. येथील मंडलीची कृपा व स्नेह संपादून अखबारेचे कामावर सरगरम व योग्य जाहले. परंतु, चिरंजीव हुजूरचे नौकरीस योग्य आहेत याची परीक्षा स्वामीसमीप जाहली पाहिजे व येथील कची कयफियत व स्वामीस व स्वामीचे सलाह व आज्ञेप्रमाणें हुजूर अर्ज करावयाकरितां व अखबारेचे खिदमतीवर चिरंजीवाची स्थापना स्वामीचे कृपेंकरून व्हावी यास्तव, हुजूर पाठवावयाचा निश्चय होता. राजश्री कृष्टणरावजी कमाल आरजू हुजूर जाण्यांविषईं व इनायतनामा सादर व्हावा म्हणोन प्रयत्न बहुत केला. सेवटीं, चिरंजीवानी हुजूर अर्जमारूज स्वामीचे विद्यमानें करावा हा नेम करून चिरजीवास हुजूर पाठवांवें हा सित्धांत केला. रावजी हुजूर गेल्यानंतर चौथाई वगैरेचा तह होईल व कितेक अर्जमारूज अजराह दौलतख्वाहीचा रावजी करतील व सरकार किफायत होईल, यास्तव चिरंजीव राजश्रीस सेवेसी मार्गस्त केलें.

स्वामीचे कृपेकरून कृष्टणरावजीस हुजूर येण्याविषईं इनायतनामा सादर जाहला. रावजी हुजूर गेले यांत चिरंजीवाचे जाण्याचें सार्थक बाहयात्कारचें जाहलें. खांसगत काम स्वामीचें कृपेने व यजमानाचे इनायतीकरून जाहल्याचप्रमाणें. चिरंजींव येथून जेष्टमासी गेले त्यास सात महिने जाहले. या उपरी हुजूरीहून व आपलेसमीप ते पासून चिरजीवास रुखसत जाहली पाहिजे हे विनती मान्य व्हावी. चिरंजीवाची कन्येचें लग्न गतवर्षीं राहिलें. या वर्षीं माघ मासीं लग्न करावयाची योजना आहे. माघ मासीं खेडांत लग्न करून पुण्यांस येतील. दोन कामाची विनती केली ते स्वामीचे सेवेसी व हुजूर मान्य व्हावी, हे विशेष इछा. स्वामीसमान मुरब्यांचे योगेंकरून श्री स्वामी पूर्ण करील. चिरजीवांचे रुखसतीविषईं स्वामी असतां मीं अर्जी करावयाचें प्रयोजन नांहीं तत्रापी चिरजीव सेवकाचेच सिलसिल्यावर हुजूर आहेत. याकरितां अर्जी लिहून लिफाफा खुला सेवेसी पाठविला आहे. मुनासिब असल्यास हे अर्जी द्यावी. मुनासिब नसल्यास दुसरी लिहून द्यावी हे विनती.

पैा छ २२ जिल्हेज सन ११९५ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा ११ जिल्हेज लगायत छ १५ माहे माार सन ११९५ हिजरी, रविवार.

छ ७ माहे माारीं हैदरअलीखानाचीं पत्रें बाळाजी जनार्दन व नूर माा खान व नरसिंगराव वकीलास आलीं. त्याचा खुलासा छ ५ जिलकादीं खान माारासीं व करनल कोट इंगरेजासीं बेमराजपाळ यासमीप लढाई जाहली. इंगरेजांची सिकस्त जाहली व खान मााराची फते होऊन इंगरेजांकडील हाती व तोफा वगैरे लूट आली, म्हणोन नरसिंगराव वकीलाचे जुबानीची खबर व यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित पूर्वी डांकेवर पत्रें पाठविलीं, तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान दफेवार हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलं असे.

हैदरअलीखानाची पत्रें बालाजीपंत व नूरमाा खान व नरसिंगराव यांस छ १४ माहे माारीं पुन्हां आलीं. कृष्टणराव जोसी वकील याची पत्रें बाळाजीपंतास छ माारीं आलीं. लढाईची कयफियत कची लिहिली आहे. दोन हाती व पांच साहा तोफा व नाल वगैरे सरंजाम वेलुरास इंगरेज नेत होते तो समग्र खान माराकडें लुटींत आला म्हणोन लिहिलें आहे. हैदरअलीखानानें बाळाजीपंतास लिहिलें आहे कीं, माहदाजी सिंदे इंगरेजांचे मुकाबल्यावर मुस्तकीम आहेत त्यानीं इंगरेजांचीं तंबी करारवाकई करावी व हजरत बंदगानआलीचे जनाबेंत कृष्टणराव गेले आहेत त्यानीं हुजूर अर्जमारूज करून इंगरेजांचे तंबीचा अज्म हुजूरीहून होण्याचा निश्चय करावा व तुम्हीं मुंबई व वसई प्रांतीं हंगामा करून गाडराचें पारपत्य करणें. याप्रमाणें लिहिलें आहे म्हणोन येथील दरबारी श्नेहिताचे जुबानीं वर्तमान यैकिलें.

करनल गाडर कल्याणीहून पुन्हां मुंबईस गेला व तीन पलटणें कल्याणी बदलापुरासमीप आहेंत म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें.

माहदाजी सिंदे चंदेरीसमीप आहेत. करनल मेवर आपले जमीयतेसुधां यमुनातीर कालपी अलिकडें वीस कोसपर्यंत गेला म्हणोन वर्तमान यैकिलें.

चेतसिंग जमीदार कासीकर इंगरेजांचे प्रबळतेकरितां कासी प्रांत सोडून रेवामुकुंदपुरीं येऊन राहिला आहे. जमीदार माराचे तरफेनें वकील माहदाजी सिंद्यासमीप गेला आहे व खानदेश येरंडोळापर्यंत वकील आला आहे. तो पुण्यास पंतप्रधानांचे कारभाऱ्यांकडें येणार. वकील माराची प्रकृती स्वस्थ नांही. याकरितां येरंडोलीं स्वस्थता होजोपर्यंत राहिला आहे.

पैाा छ २२ जिल्हेज.

२

पुरवणी अखबार पुणें छ १५ जिल्हेज सन ११९५ हिजरी.

सखाराम पानसे व गंगाधरराव रास्ते व गोविंदराव गाइकवाड वगैरे पूर्ववतप्रमाणें पुण्यासमीप आहेत. करनल गाडराकडून हरकत

होऊन बोरघांटापर्यंत येईल, तरी येथील कारभारी पंतप्रधानांचे सरदारांची व फौजेची रवानगी करतील.

गोविंदराव गाइकवाडासमीप पांचसातसे स्वार आहेत. त्यास दर स्वारीं च्यार आणे रोजमरा द्यावयाचा करार व फतेसिंग गाइकवाडास खारिज करून गुजरातेंत अमलदखल केल्यानंतर हरयेक स्वार व सरदारांस गांवखेडीं जागीर नेमणूक करून द्यावी · येणेंप्रमाणें बोली लोकांसी केली आहे. गोविंदराव जातीनें मुफलिस. येक पैसा समीप नांहीं व सावकार रजावंद नांहीत·गणपतराव कोलटकरानीं पनास हजार रुपयें रसद देऊ करून दिवाणगिरी केली व बाजीराव मांदळे व आणखी ग्र(ह)स्तानीं फडनीसीचे कामावर तीस हजार व मुजुमुचे कामावर वीस हजार, येणेप्रमाणें लांख रुपये कबूल करून पंचेवीसतीस हजारपर्यंत रुपये दिधले·गोविंदराव गाइकवाड सरदारीवर कायम होईल याचीं चिन्हें कांहीच दिसत नांहींत · याकरितां, गणपतराव वगैरेनीं हात अखडला व रुपये देत नांहींत·सांप्रत च्यार आणे प्रमाणें स्वारांस रोजमरा मिळत नांहीं·याकरितां लोक बेदिल जाहले आहेत· गणपतराव वगैरे कारभाऱ्यांस बाळाजीपंतानीं ताकीद केली आहे कीं, करारा प्रमाणें लाख रुपये देणें व कारभार तुम्हास करणें नसलियां दुसरे कारभारी कामावर निश्चय होतील · गुजरातेंत अमलदखल जाहल्यानंतर तुमचे रुपये तुम्हास पावतील·सारांश, गोविंदराव गाइकवाडाची सरदारी वाऱ्यावरील आहे·सोंनगडासमीप सटवाजी भोंसले व बाजीराव बरवे व दोन पलटणें इंगरेजांची जमीयत आहे व दुर्गोजी भापकर व गणेशपंत बहिरे दोन हजार स्वारानसीं कोंडाईबारीचे जिल्यांत आहेत म्हणोन यैकिलें·या उपरी जें नवल विशेष वर्तमान होईल तें सेवेसी लिहीन हे विनती.

A. R. No. 149

१६ जिल्हेज ११९५ हिजरी
२ डिसेंबर १७८१

पैा छ २२ जिल्हेज रविवार दोन प्रहर दिवस आल्यावर सरकारच्या डांकेबराबर पावली. विद्यमान दारोगे हरकारे, सन ११९५हिजरी·

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ १६ माहे जिल्हेज मुा काा पुण स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ११ माहे मजकूर रोज बुधवारी प्रा:थकाळी विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान हैदर नाईक यासी व इंग्रजासी लडाई होऊन नाईक मजकूर सिकस्त जाले यैसे पूर्वी वर्तमान होते· मागती नाईक मजकूर याणी जमाव करून इंग्रजासी लडाई घेतली हे वर्तमान पूर्वीचे विनंतीपत्री लेखण केले होते, त्याजवरून ध्यानास आले असेल· प्रस्तुत वर्तमान आले आहे की नाईक मजकूर याणी जमाव करून इंग्रजासी मातबर लडाई घेतली· इंग्रज सिकस्त करून माघारा झाडीत घातले· काही बुणगे वगैर त्याचे लुटले यैसे वर्तमान आले आहे· त्याजवरून कारभारी आपले ठिकाणी बहुत संतोश जाले· हे वर्तमान सर्वत्रास सांगू लागले· परंतु येथील कितीक लोकानी तर्क केले की इंग्रज याचा जमाव तीस हजार मणुशाचा आहे· या सिवाये दोन हजार तुरुक स्वार आहेत. हैदरचाही जमाव विशेषे आहे· मध्ये हैदर सिकस्त होऊंन मागती त्याने जमाव करून इंग्रज सिकस्त केले हे आश्चिर्य आहे· कारण की, इंग्रजाचा जमाव मातबर आहे यैसेही बोलतात· प्रस्तुत कारभाऱ्याचे मुखे वर्तमान आहे की, इंग्रजासी व हैदर नायेकासी लडाई होऊन इंग्रज सिकस्त केले यैसे वर्तमान आहे· मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल· शृत होये· दरबार वगैर जाला होता· विदित होये· पूर्वी हैदर नायेकानी यास पत्रे लिहिले होती· त्याचा भाव यैकिन्यात आला की, नाईक मजकूर याणी कारभाऱ्यास येथे लिहिले की, आम्हावर इंग्रजाची मसलत असतां आम्ही तहखर्चात आलो· आमच्या मदतेस तुम्हाकडून मातबर फौज यावी ते न आली· बरे तुम्ही तऱ्ही उद्योग करून तिकडे कोंकणप्रांती इंग्रजाचे पारपत्य करावे, तेही न जाले· भोसल्यासी व तुम्हासी स्नेह अस्ता यैसे असोन बंगाल्याहून इंग्रजाचे पलटने इकडील इंग्रजास मदत आली. त्या पलटनास भोसल्यानी इकडे कैसे

येऊ दिल्हे हे आपूर्व वाटले. असो, सर्व मसलत आम्हावरच आली. आपणाकडून तो काही साहित्य होत नाही. जोकडून आमच्यानें होईल, तो पावेतो धीर धरून लडाई होईल तो करू. लाच्यार जाणून मग आम्हासही इंग्रजासी सलूक करणे प्राप्त होईल. पत्राचे उतर यास लिहिणे बहुत अवघड पडले आहे. मग काये उतर लिहून पाठवितील हे ध्याणास आलिया लेखण केले जाईल. शृत होये. छ १२ माहे मजकूर रोज गुरुवार करनेर गाडर इंग्रज ममईस आहे. वर्तमान आहे की येंदा ते पुढे चाल करीत नाहीत. कारण की, इंग्रजास हैदरची मसलत आहे म्हणून इंग्रजानी तिकडेच लडाई घातली आहे या अर्थी इकडे हे इंग्रज स्वस्थ आहेत. त्याजवरून यांचाही उद्योग दिसत नाही. फौज वगैरसही काही पैका टका देत नाहीत. या अर्थी फौजही जमा होत नाही. दुसरे लोकाचेही मागील नालबंदी वगैर देणे या मुळेही लोक येत नाहीत. त्याजमध्यें स्वारीचाही उद्योग दीर्घसूत्री आहे. प्रस्तुत यैसे वर्तमान आहे. पुढे जे मसलतीचे विचारे स्वारी वगैरचा उद्योग करतील, हे ध्यानास आलिया लेखण केले जाईल. शृत होये. छ १३ रोज शुक्रवार नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयेताचे खलवत जाला. खलवत होऊन नाना आपले घरास आले. खलवताचा भाव अैकिल्यास आला की, हैदर नायेकाचे पत्रे आली आहेत त्याचे उतर काये ल्याहावे? नाईक मजकूरचे पत्राचा भाव विनंतीपत्री लेखण केला आहेच. त्याजवरून ध्यानास येईल. पत्राचे उतरे हे काये समजून लिहितील, ध्याणास आलिया लेखणांत येतील. परंतु याजला संशये आहे की, आम्हाकडून मातबर कुमक नाईक मजकुरास न पोहचली. त्याजवरच मसलत पडली. कदाचित संकट जाणून त्याणी इंग्रजासी सलूक केला तरी मसलतीस पेंच पडल यैसे विवंचणेत आहेत. याआन्वये खलवत जाला. शृत होये. कारभाऱ्याचेही विचारांत आहे की, मसलत पाहून, कदाचित इंग्रजाचे सूत्र आले तरी दारमदार करावा. परंतु इंग्रजानी दादासाहेबाचा मुदा मातबर घातला तरी काये करावे? मातबर मुदा घातला तर न अैकावे. स्वल्पामध्ये येखादी गोष्ट जाली तर मागील पुढील मसलत पाहून येखादी गोष्ट करावी. परंतु, ही गोष्ट दीर्घसूत्रावर आहे. वदंता आहे की, ममईवाल्याकडून

काही येक सूत्र येनार यैसे आहे. मग येविशीचे काये जे वर्तमान ध्यानास येईल ते लेखण केले जाईल. शृत होये. छ १४ रोज शणवार राजश्री कृष्टणरावजीकडील पत्रे आली. पत्राचा भाव काही कलल्यात आला नाही. परंतु कृष्टणरावजीस पत्रें लिहिणार व येजमानसाहेबासही अर्जी लिहिणार. शृत होये. सिंद्यासी व इंग्रजासी सलूक जाला. सिंद्याकडील हाती वगैर इग्रजाकडे लडाईत वगैर होते. त्यास सिद्यानी दोन तीन लक्ष रुा देऊन हाती वगैर सोडून आणिले. त्याचा सलूक जाला यैसे वर्तमान आले आहे. शृत होये. इंग्रजाची पलटने दोनच्यार कल्यानी वगैरवर आहेत. कदाचित ते पुढे येतील या अर्थी रास्तियाची वगैर फौज तलेगावकडे रवाणा करणार यैसी यौजणा आहे. शृत होये. छ १५ रोज रविवार हरीपंत व रास्ते वगैर मिलून साहासात हजार फौज जमा आहे व दोनतीन हजार गारदी आहेत. पुढे जे लोक जमा होतील ते लेखण केले जाईल. परंतु लोकास पैसा देत नाहीत त्या अर्थी लोकही जमा सत्वर नेमल्याप्रमाणें होतात यैसे दिसत नाही. शृत होये. वदंता आहे की दादासाहेब वसईस येनार. आल्याचे वर्तमान येथे आलिया लेखण केले जाईल. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. विदित होये. छ ९ माहे माारचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर जाले ते छ १५ माहे माारी पावले. पावोन संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर करनार स्वामी समर्थ. सेवकाचे गावखेडचापासून खानदेशचे सुभेदारानी दहक व सुभेपटी म्हणौन यैवज घेतला व गनेशपंत बहेरे यानी घासदाना वगैरे सातसे रुपये घेतले. दुसरे मामलेदाराचे नानाप्रकारे उपद्रव ते काये ल्याहवे. राजश्री कृष्टणराव येथे होते त्यास हे वर्तमान सर्व सांगि(त)ले. त्यानी खानदेशचे सुभ्याचे फडनीस सिवरामपत आहेत त्यास सांगितले कीं, यैवज परतून देणे. परतु ते यैवज परतून देत नाही. नानाप्रकारे गोष्टी सागतात येविशई रावजीचे पत्र आले पाहिजे की, सिवरामपंतानी यैवज घेतला आहे तो परतून देवणे व गनेशपतानी यैवज घेतला आहे तो परतून दवणे. याअन्वये रावजीची पत्रे कारभाऱ्यास व त्याचे पुत्रास आली पाहिजेत. जागिरीस फार उपद्रव देतात. भलताच उपद्रव करून पैका

नेतो·येथे सागावे तर कानावेगले टाकीत, लटकी पत्रे मोठ्या संकटे देतात. येविशई रावजीस पुरती येज्यमानसाहेबाकडून, स्वामीकडून ताकीद जाली पाहिजे·बहुत काये लिहिणे कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No .150

२१ जिल्हेज ११९५ हिजरी
८ डिसेंबर १७८१

पैा छ २१ माहे जिल्हेज सन ११९५ हिजरी, शुक्रवार तीन घटका रात्र मो दारोगे हरकारे.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २१ माहे जिल्हेज मुकाम काा पुण स्वामीचे कृपावलोकनेकरुन येथास्थित जाणून स्वानंद लेखणआज्ञा करीत असिले पाहिजे. विशेषे येथील वर्तमान छ १६ माहे मजकूर रोज सोमवार प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान राजश्री आगाजी सरगर याचे पुत्र व मानाजी फाकडे येकत्र होऊन दोनआडीच हजार फौज जमा करून धामधूम करितात·गाव सिवे मारितात. त्याजवरून माणाजी फांकडे वगैरे यासी व जोरावरजंग बहादुर यासी लडाई जाली यैसे वर्तमान येथे आहे· श्रृत होये·राजश्री नाना फडनीस याचा कोन्ही गोत्रज होता तो शांत जाला म्हणून नानास सुतक आहे· दो चौव दिवसा नानाचे सुतकही मोकळे होईल श्रृत होये. राजश्री हरीपंताचे डेऱ्यास दरबार वगैर जाला होता. उपरांतिक हरीपंतासी व कृष्टणरावजीचे पुत्र गोविंदराव यासीं खिलवत जाला·कृष्टणरावजीकडून पत्रे वगैर आली होती ते हरीपंतास दाखविली. पत्राचे उतरे रावजीकडे लेहून रवाणां करणार·पत्राचा भाव कलल्यास लेखण केले जाईल·विदित होये. छ १७ रोज मंगलवार श्री गणपतीचतुर्थी म्हणून श्रीमंत व हरीपंत वगैर थेवरास गणपतीचे

दर्शणास गेले होते. दर्शण करून संध्याकाळी आले. श्रीमंत आपले वाड्यात गेले. हरीपंत वगैर आपले डेऱ्यास गेले. श्रृत होये. हैदर नायेकासी व इंग्रजासी लडाई जाली. इंग्रज काहीयेक सिकस्त जाले. दुसरे इंग्रजाची रसद वगैर येत होती. त्यात इंग्रजाच्या बायेकाही होत्या. हे बातमी हैदर नायेकास कलल्यावर त्या रसदेवर नाईक मजकुरानी फौज पाठविली. रसदेबरोबर येकदोन पलटने होती. त्यासी व नाईक मजकूर याचे लोकासी लडाई जाली. लडाई होऊन इंग्रजाचे लोक सिकस्त केले. इंग्रजाच्या बायेका तीनच्यार धरून आनिल्या. व दोनतीन हांती पाडाऊ करून धरून आणिले यैसे वर्तमान येथे आले आहे. नाईक मजकूर इंग्रजावर गालिब आहेत यैसे वर्तमान आहे. श्रृत होये. सिंद्यासी व इंग्रजासी हिंदुस्थान प्रांती लडाई होती. प्रस्तुत सिंद्यासी व इंग्रजासी दारमदार होऊन सलूक जाला. हे वर्तमान पूर्वीचे येकदोन विनंतीपत्रीं लेखण केले आहे त्याजवरून ध्यानास आले आसेल. प्रस्तुत इंग्रजासी व सिंद्यासी दारमदार होऊन सलूक जाला यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. श्रृत होये. छ १८ रोज बुधवार कनैर गाडर इंग्रज ममईस आहे. पांचच्यार पलटने कल्याणी वगैरवर आहेत. वंदता आहे की गाडर मजकूर कल्यानीस येनार. यैसी अंतस्थे बातमी आहे. बाहियात्कारे तो वर्तमान आहे की, गाडर मजकूर उद्योग करून इकडे येत नाही. कारण की, इंग्रजास हैदर नायेकाचा शह मातबर आहे. या अर्थी गाडर मजकूर स्वारीचा उद्योग करीत नाही म्हणून येथे कारभारी आपले जागा स्वस्थ आहेत. फौज वगैरही अद्याप मातबर जमा नाही. स्वारीचाच कोठे उद्योग नाही म्हणून फौजेचे लोकासही पैका देत नाहीत आन फौजही पैक्यावेगली जमा होत नाही. प्रस्तुत हरीपंत व रास्ते वगैर मिलून आठ नव हजार फौज जमा आहे. येथे तो वदंता आहे की, गाडर मजकूर स्वारी करून येत नाही त्याजवरून हेही स्वस्थ आहेत. परंतु आंतस्थे वर्तमान आहे की, गाडर मजकूर याची स्वस्थता पाहून दगा करून कल्यानीस येऊन पलटनासहित येकायेकीच बोरघाटावर येईल. आल्यानंतर याजला गरबड करवील यैसेही वर्तमान आंतस्थे आहे. प्रस्तुत तो हे कोंकणचे स्वारीविसी स्वस्थ आहेत.

बोरघाटास मात्र याचे दोनतीन हजार लोक व दोन हजार गारदी वगैर आहेत व पानसे तळेगावावर आहेत. पुढे गाडर वगैर कडील वर्तमान आलिया लेखण केले जाईल. शृत होये. राजेश्री परशराम रामचंद्र मिरजकर यास बोलाऊ पाठविले आहे की फौजेसहित येणे. तेही थोडे-बहुत लोकानसी येनार, यैसे वर्तमान आहे· शृत होये. छ १९ रोज गुरुवार, कासीकर राज्यासी व इग्रंजासी लडाई होऊन राजा सिकस्त जाला, तो सिंद्यापासी हजार दोन हजार स्वारानसी आहे यैसे वर्तमान आहे. कासीकर राज्याकडून कोन्ही मातबर मणुश येथे येतो यैसे वर्तमान येथे आले आहे. ते ग्रहस्त बऱ्हानपुरापावेतों आले यैसी वंदता आहे· त्या भल्या मणुशास आणावयास येथून सरकारचा कारकून गेला शृत होये. श्रीमंताचे लग्न माघ मासी करणार यैसी यौजणा आहे. समंध राजश्री परशराम रामचंद्र याचे कंन्येसी अथवा त्रिंबकरावमामा याचे नातू अमृतराव याचे कंन्येसी यैसी यौजणा आहे. मग कोणता संमध निश्चयात आलिया मग लग्नाचा निश्चये होतो अथवा न होतो हे ध्यानास आलियां लेखण केले जाईल· शृत होये. कोंकण प्रांती तळ्याघोसल्याकडे हफशाने काही उपद्रव मांडला आहे. त्याचे पारपत्यास काही गारदी वगैर पाठविणार· शृत होये. राजश्री हरीपंताचे डेऱ्यास दरबार वगैर जाला होता· विदित होये. छ २० रोज शुक्रवार राजश्री गणेशपंत बेहरे दोनेक हजार फौजेनसी कोंडाइबारीकडे आहेत. राजश्री दुर्गोजी भापकर वगैर पाच सातसे रावतानसी कोंडाईबरी खाले आहेत. कारण की, श्रीमंत दादासाहेबाकडील सटोजी भोसले व बाजीराव बर्वे वगैरे तीनच्यार हजार फौजेनसी सोनगडावर आहेत. कदाचित ते पुढे चाल करून आल्यास त्याचे शहावर भापकर वगैर आहेत व गणेशपंतही घाटावर आहेत यैसे वर्तमान आहे शृत होये. श्रीमंत राजेश्री दादासाहेब पुत्राची मुंज करावयास वसईस येनार यैसी वंदता आहे. वसईस आल्याचे वर्तमान यैकिल्यास लेखण केले जाईल· शृत होये. होलकर वाफगावास डेरे दाखल जाले आहेत. येथे येनार यैसी वंदता आहे. शृत होये. राजश्री गोविदराव गायेकवाड याची उभारनी केली आहे. त्याजपासी हजार दीड हजार स्वार जमले आहेत. त्यास खर्चायास सरकारातून

पावत नाही. मग ते लोक उठून जातात किवा राहातात हे पाहावे· शृत होये. प्रस्तुत येथील कारभाऱ्यास इग्रजाची मसलत गालिब आहे. येविशई खलवत विशेष होत असतो. प्रस्तुत सर्व मसलतीचा डौल हैदर नायेकाचे लडाईवर आहे. हैदर नायेकाचे वकीलासी खलवत करून वरचेवर पत्रे नाईक मजकुरास लिहितात की, इंग्रजाचे पारपत्य करावे·शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल, विदित होये. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 151

२५ जिल्हेज ११९५ हिजरी
१२ डिसेंबर १७८१

पैवस्ती छ ४ गुरुवार माहे मोहरम सन ११९६ हिजरी, दोन प्रहर दिवस आला ते समई पावले.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार. विनती उपरी, येथील वर्तमान तागा छ २५ जिल्हेज मार्गसीर्ष वद्य द्वादसी सौम्यवासरपर्यंत मोा पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष कृपापत्र छ १६ जिल्हेजचें डांकेवर पाठविलें तें छ २४ माहे मारीं चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यांचे पत्रासहित पावलें व वर्तमान श्रवणें संतोष जाहला. पूर्वी छ २० माहे मारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र डांकेवर रवाना केलें तें हुजूर व सेवेसी पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान पृथक पत्रीं लिहिलं आहे त्यावरून श्रुत होईल. चिरजीव राजश्री राव रघोतमराव यांनी हुजूर असल्यास स्वामीची कृपा उतरोतर विशेष व हुजूरीहून सरफराजी त्यांची होत आहे. परंतु येथील कामाची सरबराई अजीपर्यंत

सेवकाकडून जाहली. या उपरी चिरंजीवानीं राहावें हाच मनोदय विशेष. येविषईं पूर्वीपासून विनती सेवेसी आहे व स्वामीनीं चिरजीवाकडील अर्जी हुजूर दिधली. परंतु त्याजवर दसखत अद्यापि होत नांहीं. याकरितां मर्जीस योग्य दिसल्यास रूबरू स्वामीनी अर्ज करावा म्हणजे येजमानसाहेब कृपा करून आज्ञा करतील. विशेष काय लिहिणें हे विनती.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २१ माहे जिल्हेज लगायत छ २५ माहे माार सन ११९५ हिजरी, बुधवार.

हैदरअलीखानासीं व करनल कूटासीं छ १५ जिलकादीं बेमराजपाळ यासमीप लढाई जाहली. दुतरफा लोक जखमी व ठार जाहले म्हणोन कृष्टणराव जोसी वकील यांनी वर्तमान लिहिलें होते. व कृष्टणराव बलाळ यांची पत्रें यथील कारपरदाजांस आली. त्यावरून हरीपंत व बालाजीपंतानीं खिलवत करून राव माारनुलेस उतरें लिहून पाठविलीं. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित पूर्वी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान प्रत्यक्ष व यैकिलें दफेवार सेवेसी लिहिलें असे.

पंतप्रधानांचे कारभाऱ्याचें तरफेनें कोंकणांत कल्याणीचे समीप कारकून व हरकारे खुफिया आहेत. त्याजकडून येथील कारभाऱ्यास प्रसिध वर्तमान येत आहे. करनल गाडर मुंबईस होता. तेथून कल्याणीस आला म्हणोन येथील कारभाऱ्यांस खबर आली आहे. त्यास इंगरेजांची पलटणें दोनतीन कल्याणी व बदलापुरासमीप पूर्वीपासून आहेत तें त्याच स्थळीं कायम व गाडराची अमदरफ्त मुंबई व कल्याणीस येक दोनदां जाहलीं. याकरितां सांप्रत गाडर कल्याणीस आल्याचा विशेष येथील कारभारी मानीत नांहींत. व गाडरासमीपची जमीयत जनराल कूटाचे कुमकेस गेली आहे. यावर्षीं गाडराकडून कांहीं अज्म होत नांहीं हा निश्चय येथील कारपरदांजास जाहला आहे. याकरितां पागेचें

स्वार व सिलेदार नवनिगाहदास्तीचे सालाबाद येणार, ते आले होते. त्यांस कारपरदाजानी रुखसत केलें. पागेची घोडीं चराईस गेलीं व सिलेदार आपले घरास जातात. सरजामी जागीरीची फौज व बालाजीपंताची खांसगत व हरीपंताचे निसबतीची समग्र पांचसाहा हजार स्वार मवजूद आहेत. सखाराम पानसे पुण्याहून तीन कोसी व गंगाधरराव रास्ते पुण्यासमीप प्रतिनिधीची फौज सातआठसें व शाहजी भोसल्याकडील भवानजी भोंसले व हुजरातीपैकीं घोरपडे वगैरे मवजूद आहेत. घोरपडे व पाटणकर वगैरे मानकरी सरदारांस रोजमरा पावत आहे. वरकड लोकांस रोजमरा व नालबंदी कांहीच पावत नांहीं.

गोविंदराव गाइकवाडासमीप पांचसातसे स्वार पूर्वील सिलसिल्याकरितां राहिले आहेत. रोजमरा स्वारास च्यार आणेप्रमाणेही पावत नांहीं. सरदारीचा बखेडा आहे.

———

२

पुरवणी अखबार छ २५ जिल्हेज सन ११९५ हिजरी.

छ २३ माहे माारीं गाडराचे तरफेनें कासदजोडी आली. बालाजीपंतास गाडराचा खरीता आला तो कासदांनीं पावता केला. बालाजीपंतानीं गाडराकडील कासदजोडीस तकयुद करून ठेविलें व पुन्हां ज्वाब देऊन रवाना केलें म्हणोन खारिज यैकिलें. बालाजीपंताचे मुकरब व गोविंदराव कृष्टण यांजसमीप तहकीककरितां माारनुलेनी सांगितलें कीं गोवेकर फिरंग्याचे तरफनें कासदपत्रें घेऊन आले होते. गाडराचे तरफेनें कागदपत्र आले नांहींत. येथील दरबारी लोकांचे जुबानीं वर्तमान तहकीक होत नांहीं.

कासीकर जमीदार चेतसिंग रेवामुकुंदपुराहून माहदाजी सिंद्यासमीप येणार. नजफखान व सिंदे येकत्र होऊन इंगरेजांचे मुकाबल्यास जाणार म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें. माहदाजी सिंदे चंदेरीहून पांचसात कोसी आहेत म्हणोन पूर्वीं यैकिलें. त्याचप्रमाणें सांप्रत यैकतों. नवल विशेष कांहीं नांहीं.

हैदरअलीखांनाकडून या दिवसांत कांहीं वर्तमान आलें नांहीं.

मानाजी फांकड्याचे येण्याविषईं यथील कारपरदाज प्रयत्न करीत आहेत. व फांकडे मार करार करीत आहे कीं आपण सत्वर यतो· परंतु, येण्याची शकल व त्याची खातरजमा कारपरदाजांचे तरफेनें होणें दुस्तर दिसतें. व सांप्रत सरगरासीं मुतफिक होऊन पालीम वगैरे तालुकियांत हंगामा करितो म्हणोन खबर आहे.

बज्याबा पुरंदरे चंदनवंदनचे गडावर कैदेंत आहेत. त्यांस कैदेतून सोडवावयाकरितां बज्याबाजी आजी आबई व माहदाजी नीळकंठ पुरदरे, बज्याबाचे भाऊ, पुण्यास आले आहेत. व धोंडोबा पुरंदरे बालाजी-पंताचे यैक्यतेंत आहेत, त्याचे विद्यमानें बाळाजीपंत नाना फडनवीसांसी पैगाम बज्याबास सोडवावयाचा लाविला आहे. श्रुत होय हे विनती.

———

A. R. No. 152

२६ जिल्हेज ११९५ हिजरी
१३ डिसेंबर १७८१

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २६ माहे जिल्हेज मुा काा पुण, स्वामीचे कृपावलोकनें येथास्थित जाणोन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेषे, येथील वर्तमान छ २१ माहे मजकूर रोज शणवारी प्राथकाळी विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमें सेवेसी रवाणा केले. ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान हैदर नायेकाचे वकील राजश्री हरीपंताकडे आले होते. वकीलासी व हरीपंतासी च्यार घटका खिलवत जाला· खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की, नाईक मजकुराने पत्रे पाठविली त्याची उतरे नायेकास लिहिणार. नाईक मजकुराने पत्रे पाठविली त्याचा भाव अैकिल्यात आला की, नाईक मजकूर इंग्रजासी काही दारमदार करनार· कारण की, याजकडील काही कुमक न पोहचली.

मसलत त्याचेच अंगावर पडली म्हणून ते काही दारमदार करणार यैसी वदंता आहे, शृत होये. नानास पांचच्यार दिवस जाले सुतक आहे. म्हणून दरबार वगैर हरीपंताकडे होत असतो. कार्याकारण खिलवतीचे लोक नानाकडे मात्र येत असतात. येका दो दिवसानी नानाचेही सुतक मोकळे होईल. नानाचा कोन्ही गोत्र पुरुश मेला म्हणोन नानास सुतक आहे. नानास सुतक आलं हे पूर्वीही लेखण केले होते त्याजवरून शृत जाले असेल विदित होये. छ २२ माहे मजकूर रोज रविवार करनैल गाडर ममईस होता व पलटने पाचच्यार कल्यानीस आहेत. प्रस्तुत वदंता आहे की, करनैल गाडर इंग्रज कल्यानीस आला. जमा (व) वगैर करितो. पुढे तो बोरघाटाकडे चाल करणार, यैसे वर्तमान आहे. मागतीं तिकडील तहकीक वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. अंतस्ते तो वर्तमान आहे कीं गाडर मजकूर कल्यानीस येऊन पुढे चाल करनार. बाहियातकारे तो वर्तमान आहे की येंदा इग्रंज स्वारीचा उद्योग करीत नाहीत. कारण की, हैदर नायेकाची मसलत त्यास रूबकार आहे. या आर्थी तें इकडे येत नाहीत याकरितां येथील कारभारी आपले जागा स्वस्त आहेत. फौज वगैरेही थोडकी जमा आहे. नेमल्याप्रमाणें फौज जमा नाही. कारण की, प्रस्तुत स्वारीचा उद्योग कोठे नाही. या अर्थी नेमल्याप्रमाणे फौज जमा करीत नाहीत. प्रस्तुत याप्रकारचे वर्तमान येथील आहे. मग गाडर मजकूर कल्यानीस आला यैसी वंदता आहे. कदाचित तो कल्यानीस येऊन पुढे चाल केल्यास मग याजलाही स्वारीची मसलत करणे प्राप्त यैसे आहे. प्रस्तुत तो हे आपले जागा स्वस्त आहेत. हरीपंत व रास्ते वगैर मिळून आठ नव हजार फौज आहे शृत होये. पानसे वगैर हजार बारासे स्वारानसी येथून चव पांचा कोसावर होते ते तळेगावाकडे कूच करून गेलेयैसे वर्तमान आहे. विदित होये. छ २३ माहे मजकूर रोज सोमवार श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेहून वसईस येनार यैसी वंदता होती. प्रस्तुत वर्तमान आहे की, दादासाहेब वसईस यावयास सुरतेहून निघाले होते. वसईस न येता माघारां परतून सुरतेस गेले यैसी वंदता आहे. मागती त्याजकडील वर्तमान आलियास लेखण केले जाईल. श्रृत होये. रास्ते येथे दोनअडीच हजार फौजेनसी आहेत. त्याची रवाणगी

तळेगावाकडे करणार·कारण की, गाडर मजकूर कल्यानीस आला यैसी वंदता·या अर्थी याची रवाणगी तळेगावाकडे करावी यैसी योजणां आहे·मग रास्ते वगैर याची रवाणगी जाल्यास लेखण केले जाईल शृत होये·राजश्री कृष्टणरावजींकडील पत्रे आली·पत्रे रावजीचे चिरजींव नानाकडे घेऊन गेले·पत्रे वगैर नानानी वाचली·उपरांतिक रावजीचे चिरंजीवासी व नानासी च्यारसाहा घटका खिलवत जाला· खिलवत होऊन रावजीकडे पत्रे व येजमानसाहेबास अर्ज्या ल्याहाव्यां यैसा निश्चयें जाला·रावजीस तो पत्रे वरचेवर लिहीत अस्तात. शृत होये. हरीपंताकडे दरबार वगैर जाला होतां · कामेकाजे वगैर जाली·शृत होये. छ २४ रोज मंगलवार,हैदर नायेकाकडील पत्रे आली·पत्राचा भाव यैकिल्यात आला की, नाईक मजकूर यानी कारभाऱ्यास लिहिले होते की, सर्व मसलत इग्रंजाची आम्हावरच पडली, यामुळे आमचा नाश फार जाला·आम्ही तहखर्चात मसलतीमुळे आलो. तुम्हाकडून मातबर फौजेची कुमकं येऊन पोहचावी ते न पोहचली. सर्व मसलत आम्हासच रुबकार जाली·आपले साहित्याचा भर्वसा फार होतां. ते गोष्ट न घडली. असो, जे जाले ते उतमच जाले·आम्ही तहखर्चात कोठ-पंरियेंत यावे यां अर्थी आम्हास इग्रंजासी दारमदार करणे प्राप्त आहे· यैसे नायेकानी बहुतांप्रकारे यास लिहिले होते· याप्रमाणे नायेकाचे पत्रे आल्यानंतर कारभारी बहुत आंदेशात पडून दोन तीन दिवस खिलवत बहुत होतो. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की, कदाचित नाईक मजकूर याणी इग्रंजासी दारमदार केल्यास पेंच भारी आहे कीं, त्याचा दारमदार जाल्यास तिकडील पलटने ममई कडे उतरल्यास ते इकडे उद्योग करतील·आपणास मसलत प्राप्त होईल यैसे आंदेशे करून मस-लत करितात यैसी वंदता आहे. पुढे हैदर नायेकाकडील व इग्रंजाकडील काये वर्तमान येईल ते लेखण केले जाईल·हैदर नायेकाचे वकीलास बोलाऊन बहुत ममतापूर्वक भाशणे करून नाईक मजकुरास पत्रे लिहि-णार·शृत होये छ २५ रोज बुधवार, होलकर वाफगावास डेरे दाखल आहेत·फौज वगैर त्याजपासी दोन तीन हजार प्रस्तुत जमा आहे· लोकाचे देण्याचा गवगवा आहे· त्याजकडील दिवांण येथे आहेत

कारभाऱ्यासी काही येवज मागतात. दुसरे, होलकरासी व अहिल्याबाईसी शुध्दता नाही. यामुळे सरदारीतही फितूर आहे. प्रस्तुत होलकर वाफगावास आहेत. पुत्राचे लग्नाकरितां चादवडास जाणार यैसी वंदता आहे. परंतु, कारभाऱ्याचे मानस की होलकरानी पुत्राचे लग्न वाफगावीच करावे यैसे आहे. त्रिदित होये. सिंद्यासी व इंग्रजासी दारमदार होऊन सिंदे उज्यणीस येतात यैसी वंदता आहे. शृत होये. हैदर नायेकाच्या शहास इग्रंजाचे पलटने आहेत. त्याजपैकी पाचच्यार पलटने ममईस गाडराकडे आली. उपरांतिक गाडर मजकूर पलटनासहित कल्यानीस आला यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. राजश्री धोडोबा अपा पुरधरे मानाजी फाकडे याची रदबदली करीत होते की, त्यास कौल द्यावा. त्यास आणू. त्याजवरून फाकडे माार धोडोबा अपा पुरधरे याचे विद्यमाने येतात. जेजुरीपावेतो आले. यथे आलिया लेखकन केले जाईल. शृत होये. राजश्री माधवराव नीलकठ पुरंधरे पाचच्यार दिवस जाले सासवडाहून येथे आले आहेत. श्रीमताची भेट जाली. आपले वाडयात आहेत. राजश्री बज्याबा व मारोबा याची सोडावयाची रदबदली लागली आहे. मग काये निश्चये होते तो पाहवा. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ १६ माहे माारचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर जाले ते छ २४ माहे माारी पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे. हे विज्ञाप्ती.

A. R. No. 153

२८ जिल्हेज ११९५ हिजरी
१५ डिसेंबर १७८१

पौा छ ७ माहे मोहरम रविवार सन ११९६ हिजरी त्रितीये प्रहर मै जोडी डांक सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरी, येथील वर्तमान तागा छ २८ जिल्हेज पौष्य शुध प्रतिपदा मंदवासरपर्यंत मोा

पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, पुर्वी छ २६ माहे माारीं डांकेवर हुजूरअर्जी व स्वामीचे सेवेसी पत्र रवाना केलें तें हुजूर व सेवेसी पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रत येथील वर्तमान पृथकपत्रीं लिहून सेवेसी पाठविलं आहे व हुजूरअर्जी व अखबार लिहून दारोग्याकडें पाठविली आहे. हुजूर व स्वामीचे सेवेसी दारोग्याचे विद्यमानें पत्रें पावतील. इंगरेजासीं बिगाड करून सिकाकोल, राजबंदरी वगैरे प्रांताची जप्ती करावी येविषईं येथील कारपरदाजांचे सांगितल्याप्रमाणें कृष्टणरावजीनी हुजूर अर्जमारूज केला. परंतु, राव माारनुलेचा अर्ज हुजूरपिजीरा होत नांहीं व हैदरअलीखानांकडील रुजवातीनंतर इंगरेजांचे तंबीचा अज्म होणें किंवा न होणें, याचा निश्चय होईल म्हणोन इरशाद जाहला आहे म्हणोन बालाजीपंतानी सेवेकासमीप चर्चा केली व पुन्हां बोलिले कीं, सांप्रत इंगरेजांवर हैदरअलीखान गालिब जाहला आहे याकरितां हुजूर इलतिजा करून नम्रतेची गोष्ट सांगत आहेत व ताबेदारी व फीदवीयत यख्तियार करितात. हैदरअलीखानाचा व इंगरेजांचा दारमदार कदाचित जाहला तरी कांहीं दिवस स्वस्थ राहून उपरांतिक हुजूरचे जनाब मुकदसेंत बाद आहदीची गोष्ट सांगतील यैसें आम्हास वाटतें. याउपरी बंदगान हजरत पोख्तकार व अरस्तु फितरत आहेत. जे सलाह हुजूरचे दौलतख्वाहीची व पंतप्रधानांचीं बेहबूदी ज्यांत, त्याप्रमाणें आम्हास आज्ञा करतील व हुजूरीहूनहीं आमल होईल व इंगरेज बदमामली व बदकौली म्हणोन आम्हीं हुजूर अर्ज करितों हें सांप्रतच हुजूर यकीन असेल. कदाचित नसल्यास पर्यायेंकरून यकीन होईल यैसें आम्हास भासतें याचें कारण इंगरेजासीं व आम्हासी समंध बहुत पडला व त्यांचीं बदकौली ध्यानास आली आहे म्हणोन बाळाजीपंताचे जुबानी चर्चा यैकिली. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पैा छ ७ मोहरम सन ११९६ हिजरी, रविवार त्रितीये प्रहरं मै डांक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २६ जिल्हेज लगायत छ २८ माहे माार शनिवार सन ११९५ हिजरी पौष्य.]

गाडराचे तरफेनें कागद बालाजीपंत फडनवीसास आला म्हणोन खारिज वर्तमान यैकिलें. परंतु, येथील कारपरदाजांचे जुबानी तहकीक केलें नांहीं, व गोवेकर फिरंग्याकडील पत्र आलें असेल म्हणोन गोविंदराव कृष्टण यानी सागितलें व कासीकर जमीदार चेतसिंग माहदाजी सिंद्यासी मुलहक होणार. करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला. परंतु, हरकत पेशकदमीची दिसत नांहीं व पंतप्रधानांचे कारपरदाजानीं दोनतीन पागा चराईचे मकानास रवाना केल्या व सिलेदार लोक नौकरीचे इराद्यानें आले आहेत त्यांस नौकर न ठेवितां रुखसत करीत आहेत. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ २६ माहे माारीं हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें तें पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रतचें वर्तमान प्रत्यक्ष जाहलें व यैकिलें दफेवार लिहिलं आहे.

गाडराकडील खरीता बालाजीपंतास आला म्हणोन खारिज यैकिल्याप्रमाणें पूर्वील पत्रीं माार लिहिला आहे. त्यानंतर छ २६ माहे माारी राजश्री बालाजीपंत नाना फडनीसाचे घरास गेलों होतों. समक्ष दर्शनोतर खरीता गाडराकडील आला म्हणोन बाहेर लोकांचे जुबानी यैकिलें. हे सत्य किंवा मिथ्या म्हणोन विचारिलें. नानानीं उतर केलें कीं मुंबईहून जनराल किंवा गाडराचे तर्फेची जासूदजोडी इंगरेजी लिपीचीं पत्रें घेऊन बंदर मदरासेंस जात होती. तो पंतप्रधानाकडील तालुकदार कोंकणांत आहेत त्यांचे चौकीवर जोडी धरली ते पुण्यांस पाठविली. हरकाऱ्यांसमीपची पत्रें घेतलीं. इंगरेजी लिपीचीं आहेंत. अद्यापि वाचून पाहविलीं नांहींत. या—

प्रमाणें सांगितलें. पूर्वील पत्रीं लिहिलें आहे कीं, बालाजीपंतानीं जासुदांस प्रत्योतर देऊन रवाना केलें. त्यास खुफिया बातंनीची पत्रें कल्याण व साष्टीसमीप पंतप्रधानाकडील कारकून लिहून पाठवीत आहे. त्याची इतिला कोणास नांहीं. त्या कारकुनाचे पत्राचीं उतरें गेलीं म्हणोन अन्यत्र दरबारी ग्रहस्ताचे मुखं यैकिलें. खारिज वर्तमान यैकिलें तें पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत बालाजीपंताचे जुबानीं यैकिल्याप्रमाणे सेवेसी लिहिलें असे. गोवेकर फिरंग्याची पत्रें अकसर कारपरदाजास येत आहेत व यांची उतरें गोवेकरास जात आहेंत.

———

पैा छ ७ मोहरम रविवार सन ११९६ हिजरी, त्रितीये प्रहर मै जोडी डांक सरकार.

२

पुरवणी अखबार पुणें छ २८ जिल्हेज सन ११९५ हिजरी.

माहदाजी सिंद्याकडे कासीकर जमीदारचेतसिंग येणार म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत बालाजीपंताचे जुबानीं यैकिलें कीं माहदाजी सिंदे झांसीसमीप आहेत व चेतसिंग जमीदार बनारस च्यार कोसाचे फासल्यानें आला. येकदोन दिवसांत परस्परें भेटी होणार. चेतसिंगाचे हमराह च्यार हजार प्यादा व हजार स्वार आहेत. पत्रें छ १० जिलकादचीं आलीं म्हणोन बालाजीपंतानीं सांगितलें.

करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला आहे. च्यार पलटणें जमीयत कल्याणी व बदलापुरासमीप आहे व तोफा तख्त्यावर चढऊन तयार केल्या आहेत. परंतु, घांटावर येण्याचा उद्योग करील किंवा करीत नांहीं याचा निश्चय कळत नांहीं. मुंबईंत दोन पलटणें व साष्टींत दोन पलटणें येकोन आठ पलटणें जमीयत आहें व पूर्वी दोन पलटणें चिनापटणवाल्याचे कुमकेस गेलीं म्हणोन बालाजीपंताचे जुबानीं यैकिलें.

साल माारीं कोंकणांत कल्याणीचे रुखें इंगरेजाचे मुकाबिल्यास पंतप्रधानांची फौज न पाठवावयाचें कारण साल गुजस्तां पंतप्रधाकडील फौजा कोंकणांत गेल्या होत्या. त्यांनी बोरघांट वगैरे घांटापासून

कल्याणी व वसईचे गिर्दनवाहचा प्रांत समग्र ताख्ततराज केला. समग्र प्रांत उज्याड जाहला याकरितां गल्याची दुर्भिक्षता व वैरणहीं नांहीं. इंगरेजाकडील पलटणें घांटावर येतील ते समई फौज मुकाबिल्यास सित्ध आहे, जाईल. व इंगरेजांस घांटावर येऊं द्यावें, त्यानंतर फौज रवाना करावी, यांत काबू व सलाह पाहून फौज सांप्रत रवाना करीत नांहीं म्हणोन बालाजीपंताचे मुखोदगत चर्चा यैकिली.

छ २८ माहे माारीं बालाजीपंत हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. प्रहर येक येकांत होऊन पुन्हां हवेलीस आले.

गोविदराव गाइकवाडाचे हमराह सातआठसे स्वार आहेत. त्या लोकास रोजीना येक आण्याप्रमाणेंही रोंजमरा मिळत नांहीं. याकरितां लोक बेदिल होऊन उठोन जात आहेत. खंडो आवजी म्हणोन गाइकवाड माराचे कदीम कारभारी. त्यांस बालाजीपंतानीं बोलाऊन आणिलें व मुख्तारीनें कारभार करून, फौज ठेऊन गुजरातेंत जाऊन मुलुक काबीज करा म्हणोन सलाह सांगत आहेत. या कारभारास दोनतीन लाख रुपये नख्त निकृष्टपक्षीं पाहिजेत. याकरितां कोण्हीं कबूल करीत नांहीं. पूर्वील गणपतराव वगैरे कारपरदाजानीं हार मानून कारभार सोडला आहे. सेवेसी श्रुत होय हे विनती.

A. R. No. 154 २९ जिल्हेज ११९५ हिजरी
१६ डिसेंबर १७८१

पैा छ ७ मोहरम रविवार सन ११९६ हिजरी त्रितीये प्रहर मैं डांक सरकार.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २९ माहे जिल्हेज मुा पुण स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वांनद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेषे येथील वर्तमान छ २६ माहे मजकूर रोज गुरुवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनतर

येथील येथील वर्तमान करनैल गाडर कल्यानीस आला यैसे वर्तमान होते. प्रस्तुत वर्तमान आहे की, गाडर मजकूर ममईस आहे, कल्यानीस येनार. कल्यानीस आल्याचे वर्तमान मागती आलियां लेखण केले जाईल. प्रस्तुत करनैल मजकूर ममईसच आहे. कल्यानीस येऊन स्वारीचा उद्योग नाही यैसे वर्तमान येथे आहे. त्याजवरून येथील कारभारी कोठे उद्योग न करतां स्वस्त आहेत. उद्योग नाही म्हणोन पागा वगैर सिलेदारास निरोप देतात. कार्याकारण पागा वगैर लोकास ठेऊंन घेतात बाकी सिलेदार वगैर लोकास निरोप देतात यैसे आहे. मागती कोंकणप्रांतीची बातमी आलियास काये मसलत कारभारी करतील हे ध्यानास आलियां लेखण केले जाईल. शृत होये. छ २७ रोज शुक्रवार. मुसां नारंग फिरंग्याचे येथें फिरंगी गोरे आहेत त्यापैकी दोन गोरे फिरंगी कलवातीचे घरी गेले होते. त्या उभयेताचा कजियां रांडेवरून जाला. त्यास येका फिरंग्यानी येक फिरंगी मारून टाकिला. त्याजवरून त्याचे आपसमध्यें बलवा जाला होतां. ज्या फिरंग्यांनी फिरंगी मारला, त्यास रा नानानी धरून वाड्यात आनिले. आनून चवकसी करीत होते. चवकसी होऊन पुढे काये जे करतील ते लेखण केले जाईल. शृत होये. राजश्री गोंविदराव गायेकवाड याजवल हजारबारासे स्वार जमले आहेत. आणिक त्याची काही उस्तवारी करून गायेकवाड मजकुरास गुजरात प्रांती रवाणां करावे यैसी योजणा आहे. शृत होये. हैदर नायेकाचां व इग्रंजाचा दारमंदार होनार यैसे वर्तमान आहे. त्याजवरून कारभाऱ्यानी नाईक मजकुरास लिहिले आहे की, इग्रंजासी दारमदार प्रस्तुत करावा हे ठीक नाही. तुमचे साहित्यास काही फौजही पाठऊन देऊ. परंतु, दारमदार करावा हे कामाचे नाही. दारमदार करणे तरी तुमचे आमचे विचारे काये होणे ते होईल. यैसी पत्रे नाईक मजकुरास लिहिली यैसी वंदता आहे. परंतु, नाईक मजकूर इग्रंजासी दारमदार करनार यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. छ २८ रोज शणवार. मानाजी फाकडे यास आणांवे यैसे सूत्र राजेश्री धोडोबा आपा पुरंधरे याचे विद्यमाने लागले आहे. फांकडे मजकूर जेजुरीपावेतो आले यैसे वर्तमान होते. त्यास फाकडे मजकूर याप्र

आणावयास धोंडोबा आपा पुरंधरे याचा कारकून गेला आहे. आद्याप फाकडे मजकूर बालेघाटाकडेच आहेत. जेजुरीस आले नाहीत. आल्यावर लेखण केले जाईल. विदित होये. महमदआलीखाणाकडे याणी काही सूत्र इग्रंजाचे दारमदाराविशी लाविले आहे यैसी वंदता आहे. याचा शोध करून मागाहून लेखण केल जाईल. शृत होये. नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. हरीपंताचा व नानाचा येक प्रहरपावेतो खिलवत जाला. उपरांतिक नाना आपल्या घरास आले. खिलवतीचा भाव आपले दौलतीचे बंदोबंस्ताविशी व इग्रंजाचे मसलतीविशी जाला यैसे यैकिल्यात आले. शृत होये. राजश्री कृष्टणरावजीची पत्रे वरचेवर येत आस्तात. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. श्रुत होये. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 155

४ मोहरम ११९६ हिजरी
२० डिसेंबर १७८१

पै।। छ १३ माहे मोहरं संन ११९६ हिजरी रोज शेनिवार मै दारोगा हरकारा.

श्रीनिवास

पोष्य हयपतीराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरी, येथील वर्तमान ताा छ ४ मोहरम पौष्य शुध षष्ठी गुरुवासरपर्यंत मो। पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ २९ जिल्हेजी डांकेवर पत्रें पाठविलीं तें हुजूर व स्वामीचे सेवेसी पावलीं असतील. सांप्रत हुजूरअर्जी व अखबारेचा लिफाफा व स्वामीचे सेवेसी अखबार पृथक पुरवणीपत्री लिहून डांकेवर पत्रें पाठविलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीचे सेवेसी पावतील. चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यांचे नांवचा लिफाफा सेवेसी पाठविला आहे तो चिरजीवास पावेल. या दिवसांत येथींल कारपरदाज खिलवतेंत बहुत मशगुल आहेत. वर्तमान प्रसिधींत येत नांही. सेव-

काचे कयासास जें आलें तें व येथील स्नेहिताचे मुखं यैकिलें वर्तमान चिरजीवास लिहिलें आहे. ते सेवेसी विनती करतील. स्वामीचे प्रत्यास आलियां आपले आज्ञेप्रमाणें हुजूर विनती करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पै।। छ १३ मोहरं सन ११९६ रोज शेनिवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २९ जिल्हेज सन ११९५ लगायत छ ४ मोहरम सन ११९६ हिजरी.

माहदाजी सिंदे झासीसमीप आहेत व चेतसिंग जमीदार कासीचा, च्यार कोसाचे फासल्यानें झासीपासून होता व सिंदे माारांची भेट येका दोन दिवसानीं होणार होती व इंगरेजांकडील कासदजोडी मुंबईहून मदरासेस जाणार होती ते चौकीवर धरली व पुंण्यास आणली व करनल गाडर मुंबईहून कल्याणीस आला, व तोफा वगैरे जंगी सरजाम बाहेर काहडला आहे म्हणोन बालाजीपंताचे जुबानी व खारिज वर्तमान यैकिल्याप्रमाणें पूर्वील पत्रीं लिहून पाठविलें, त्यावरून श्रुत जाहलें असेल. त्याउपरी यैकिलें व प्रत्यक्ष वर्तमान दफेवार सेवेसी लिहिलें आहे.

करनल गाडर कल्याणीस तीन पलटण जमीयतसुधां आहे व पंधरा तोफा व गोळे व दारूचे संदुकासुधां छकडचावर चढऊन तयार केल्या आहेत व आणखीं तोफा पलेदार तयार करीत आहे, व दरयाकिनारा पंतप्रधानाकडील किले आहेत त्यापैकीं रेवदंडा किंवा आणखीं कोण्हींयेक किल्यास लागणार म्हणोन येथील कारपरदाजांस बातनी आली व राघोजी आंगरे याचे वकीलाचे जुबानीं खबर यैकिली.

दुर्गोजी भापकर कोंडाईबारीचा घांट उतरून सोनगडचे जिल्यांत गेला व सुरत प्रांतात ताख्तताराज करितो, व गणेशपंत बहिरे घांटासमीप दीड हजार फौजेनसीं आहे व इंगरेजांकडील दोन पलटणें व

सटवाजी भोंसले वगैरे भापकराचे रुखावर आले आहेत म्हणोन पूर्वील पत्रीं माार लिहिला आहे. सांप्रत वर्तमान यैकिलें कीं, इंगरेजांचीं पलटणें व फतेसिंग गाइकवाडाचीं दोन हजार फौज व सटवाजी भोंसले वगैर बइतिफाक भापकराचे फौजेवर चालून आले. पलटणें व फौज आल्याची खबर यैकोन दुर्गोजी भापकर माघारा कोंडाईबारीसमीप गणेशपंत बहिऱ्यास मुलहक जाहले. घांटाखालें दोनतीन ठाणीं भापकरानी घेतली होती. त्या ठाण्यांतील लोक ठाणीं सोडून गेले व वासदें म्हणोन मकान तथील ठाण्यांत शंभरदीडसे गाडदी राहिले होते. इंगरेजानी ठाणें घेतलें व ठाण्यांतील लोकास कतल केलें म्हणोन वर्तमान यैकिलें.

नारो गणेश व पाराजीपंत नि।। तुकोजी होळकर पुण्यांस आले आहेत म्हणोन पूर्वी वर्तमान लिहिले आहे. सांप्रत सफरचे महिन्यांत तुकोजी होळकरचे लेंकाचें लग्न वाफगांवी होणार आहे याकरितां होळकर माराचे लिहिल्याप्रमाणें उभयता माारनुलेनीं छ ३ माहे माारीं बालाजीपंतापासून रुखसत घेतली.

———

२

पुरवणी अखबार पुणें छ ४ मोहरम सन ११९६ हिजरी.

बळवंतराव नि।। मुधोजी भोंसले हुजूर आले आहेत. माारनुलेनीं श्रीमंत पंतप्रधान व येथील कारपरदाजांस पत्रें सुतरस्वारासमागमें पाठविलीं तें छ १ माहे माारीं पावलीं. हैदराबादेस येऊन हुजूरची मुलाजमत हासल केली व हुजूर जो अर्ज मारूज करणें तो कृष्टणराव बलाळ यांचे सलाहानें करूं, व जो इरशाद होईल त्याची इतिला राव माारास करूं म्हणोन पत्रीं माार लिहिला होता म्हणोन यैकिलें. हैदरअलीखानाचे तरफेनें नूरमाखान व नरसिंगराव ज्वाबसालाकरितां पंतप्रधानासमीप आहेत. खुफिया बातनीकरितां सांप्रत आनंदराव नामे पुण्यांस आला आहे.

कृष्टणराव बलाळ यांची पत्रें डांकेवर पय दर पय येत आहेंत व कारपरदाजाकडूनहीं पत्रें मुतवातर जातात, व बालाजीपंत हरीपंताचे डेऱ्यास जाऊन खिलवत अकसर बहुत करीत आहेत याचा तपसील पूर्वी

लिहिला आहे. सांप्रत छ १ व छ २ व छ ४ मोहरमीं संतत हरीपंताचे डेऱ्यास बालाजीपंत गेले. दोन प्रहर, तीन प्रहरपर्यंत बैठक होत आहे. नूरमाखान व नरसिंगराव वकील यांस छ २ व छ ४ माहे माारीं बोलाऊन नेलें होतें. बालाजीपंत व हरीपंताचे खिलवतेंत विसाजी आपाजी अठवले, पेशदस्त हरीपंत, शरीक मसलहत आसतात. छ १ माहे माारीं गोविदराव कृष्टण शरीक मसहलत होते व छ२व छ ४ माहे माारीं गोविदराव कृष्टण यांस खिलवतेंत बोलाविलें नांहीं. हैदर नायकाचे ज्वाबसालाचे बानीकार लक्ष्मणराव रास्ते, तेही मसलतींत शरीक होते.

मुसा नारंज फिरंगी याचे लेंकीची शादी पुण्यांत होत आहे. बालाजीपंत फडनवीस छ १ माहे माारीं फिरंगी माराचे घरास जाऊन आहेर केला व तेथोन हरीपंताचे डेऱ्यास गेले.

पंतप्रधानांचे पागेवर सरदार व नवी सिंदे कदीम आहेत. त्यांजवर नजर तीन लाख रुपये मोकरर करून हरयेकाचे कामाप्रमाणें पटीची तकसीम केली आहे. पटीचे रुपये जो कबूल करीत नांहीं, त्यास तगीर करून दुसऱ्यापासून नजर घेऊन काम सांगत आहेत. या उपरी जें ताजें वर्तमान होईल त्याची सूचना सेवेसी लिहीन हे विनती.

पै।। छ १३ माहे मोहरं सन ११९६ हिजरी, रोज शेनिवार.

———

A. R. No. 156

५ मोहरम ११९६ हिजरी
२१ डिसेंबर १७८१

पै।। छ १३ माहे मोहरं सन ११९६ हिजरी रोज शेनिवार मै दारोगा हरकारा.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ५ माहे मोहरम मुका (म) पुणं, स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष, येथील वर्तमान छ २९ माहे जिल्हेज रोज रविवारी प्राथकाळी विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल.

तदनंतर येथील वर्तमान, राजेश्री नाना व कृष्णरावजीचे चिरजींव व विसाजीपंत आठवले यैसे राजश्री हरीपंताचे डेऱ्यास साहा घटका दिवसपूर्व येतां गेले. नाना हरीपंत वगैर याचा संध्याकाळपावेतो खिलवत जाला. खिलवतीचा भाव यैकिल्यात आलां की, हैदर नाईक इग्रंजासी दारमदार करून सलूक करनार हे वर्तमान येथे आंहे. त्याजवरून कारभाऱ्याचे मानस की, हैदर नायेकास पत्रें ल्याहावी की, इग्रंजासी दारमदार न करावा. तुमचे साहित्यास फौजेही पाठऊ यैसे बहुत प्रकारे त्यास लिहिणार. यांप्रमाणें खिलवतीत भाशणे जाली. दुसरे, राजश्री कृष्णंरावजीकडील पत्रे आली. ते पत्रें खिलवतीत वांचली. पत्राचा भाव यैकिल्यात आला की, रावजीनी लिहिले होते की प्रस्तुत माहालाचे तहाचां जाबसालं सरदेशमुखी वगैरचां रूबकार आहे नवाबसाहेबाची मर्जी की, हैदराबाद सुभ्याप्रमाणे बेदर सुभ्याची सरदेशमुखी, चौथ वगैर न घ्यावी. बाकी माहालातची चौथ, सरदेशमुखी वगैर जे पहिलेपासून मामूल आहे त्याप्रमाणें घ्यावी, यांप्रमाणे हजूरचे बोलणे आहे. येविशी काये जाबसाल करावा ते ल्याहावे यैसे रावजीनी कारभाऱ्यास लिहिले होते. रावजीचे लिहिल्यावरून येथे येकदोन दिवस कारभाऱ्याचा खिलवत होत होतां की, याचे उतर रावजीस काये ल्याहावे? मग निश्चयात आनून उतर लिहिल्याचे वर्तमान यैकिले की चौथ वगैर मोकासे हे राजपत्री आहेत, हे पहिलेपासून चालतात, नवीन कैसे होते याप्रमाने हजुरात अर्ज करावा. मग यां उपर हजुराची मर्जी प्रस्तुत रक्षूणं कारभार करावां, याप्रमाणे रावजीस लिहिले यैसे यैकिल्यात आले. तिसरे, आणिक कितीक आपले दौलतीचा बंदोबंस्त करावा या दोती अन्वयाचा खिलवत संध्याकालपावेतो जाला. उपंरातिक नाना वगैर आपले घरास आले. शृत होये. हैदर नाईक इग्रंजासी दारमदार करनार यैसी वंदता येथे आहे. त्याजवरून कारभारी बहुत आदेशांत आहेत की, कदांचित त्यानी दारमदार केला, तरी पुढे आपनास मसलत भारी प्राप्त होईल. यांअर्थी नाईक मजकुरास लेहून दारमदार न होये ते करांवे यैसी पत्रें लेहून रवाणां करनार. शृत होये. छ १ माहे मजकूर रोज सोमवार. राजश्री गणेशपंत बेहरे दोनअडीच हजार फौजेनसी

कोंडाईबरीचे घाटावर होते. पिंपळनेरकर कमाविसदार हरीपंताकडील व दुर्गोजी भापकर वगैर हे कोडांईबारीच्या घाटाखाले होते. त्यास पिंपलनेरकर कमाविसदार दोनतीन हजार मणुश्य व पांचसातसे स्वारानसी पुढे पांचसात कोस गेले. त्यास इंग्रजाची येकदोन पलटने व सटोजी भोसले वगैर दोनतीन हजार फौजेनसी यैसे पलटनासहित सोनगडावर होते. पिपलंनेरकर कमाविसदार पुढे आला म्हणोन हे वर्तमान, सोनगडास पलटने वगैर होते त्यास कलले त्याजवरून तेही पुढे आले. कमाविसदार मजकूर यासी व त्या पलटनासी लडाई जाली. कमाविसदाराकडील पांचच्यारसे मणुश्यं जांया जाले व काही लुटले गेले. बाकी सांभालून कमाविसदार मजकूर गणेशपंताजवल आले व येकदोन ठाणेही इंग्रजाचे लोकानी घेतले, यैसे वर्तमान येथे आले. त्याजवरून गणेशपंताकडे फौज पाठवावी. त्यास गोविंदराव गायेकवाड वगैर याची खर्चावेचांची वगैर तजवीज करून रवाणा करावे यैसी यौजणां करितात. मग काये निश्चये करून रवाणा करतील हे लेखण केले जाईल. विदित होये. करनैल गाडर इंग्रज ममईस आहे. पलटने वगैर कल्यानीस आहेत. प्रस्तुत काही त्याचा उद्योग इकडे दिसत नाही. त्याजवरून कारभारीही आपल्या जागा स्वस्थ आहेत. उद्योगाचा प्रकार कोठे दिसत नाही. या अर्थी कार्याकारणं फौजेचे लोकास व पागा वगैर यास निरोप देतात यैसे आहे. प्रस्तुत फौज रास्ते वगैर मिलोन आठनव हजार आहे. साप्रंत उद्योगाचा प्रकार तो कोठे दिसत नाही. मगं मसलतीचे यौगेकरून काये होईल ते पाहावे. विदित होये. छ २ माहे माार रोज मंगलवार. राजेश्री मोरो गिरमाजी तेथे आहेत. त्याजलाही पत्रें अंतस्ते कारभारी लिहितात की, तेथील बातमी रावजी वगैरची लिहीत जावी यैसे त्यास लिहितांत. शृत होये. हैदर नायेकास याजकडील मदत न पोहचली. सर्व मसलत नाईक मजकुरावर पडली यां अर्थी नाईक मजकूर इंग्रजासी दारमदार करणार यैसी वंदता आहे. त्याजवरून याणी तो नाईक मजकुरास लिहिली आहेत की, दारमदार न करावा. तुमचे साहित्येस फौजही पाठवून देऊं. परंतु, याजला अदेशां प्राप्त जाला आहे की, कदाचित हैदर नायेकानी दारमदार केला, तरी पुढे सर्व मसलत आपनासच

रूबकार होईल. यां अर्थी याणी महमदअलीखाणासी सूत्र लाविले आहे कीं, हैदर नायेकानी दारमदार केला तरी आपणही महमदअलीखान याचे विद्येमाने इंग्रजासी सूत्र असू द्यावे यैसीही याणी आपले ठिकाणी यौजणां करून ठेविली आहे यैसे वर्तमान यैकिल्यात आले. शृत होये. मानाजी फांकडे याजला याणी कौल राजश्री धोंडोबा आपां पुरंधरे याचे विद्यमाने पाठविला होता की तुम्ही येणे. तो येनार यैसी वंदता होती. प्रस्तुत वर्तमान आले आहे की फांकडे मजकूर येत नाही. शृत होये. दरबार वगैर जाला होतां. माली व मुलकी वगैर कामकाज जाले शृत होये. छ ३ रोज बुधवार. कोंकण प्रांती तळेघोसाल्याकडे हफशासी व याचे लोकासी लडाई जाली. उभयेपक्षी सेपंनास मणुश्यं जांया जाले यैसे वर्तमान आहे. शृत होये. नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. हैदर नायेकाकडील वकील नूरखान व नरसिंगराव व आनंदराव आणिक कोन्ही नाईक मजकुराकडील ब्राम्हणं आला आहे, यैसे त्रिवर्ग हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. वकीलासी व नाना व हरीपंतासी खिलवत जाला. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की, नाईक मजकुरास पत्रे लिहिणार. दुसरे, नाईक मजकुराचे मदतेस काही फौजेची नेमनूक करावी यैसी यौजणा करितात. यां अर्थी खिलवत जाला. वंदता आहे की, रास्ते वगैर याचे फौजेची नेमनूक करावी. मग निश्चयात येऊन काये ठैरल ते लेखण केले जाईल. शृत होये. दरबार वगैर जाला होता. विदित होये. छ ४ रोज गुरुवार. हरीपंताकडे नाना येकादो दिवसा जात अस्तात. खिलवत बहुत निकडीचा होत अस्तो. प्रस्तुत यास इग्रंजाची मसलत पुढे रूबकार आहे. शृत होये. होलकर वाफगावास डेरे दाखल आहेत. त्याजकडील दिवाण नारो गणेश वगैर येथे होते तेही होलकराकडे गेले. मग होलकर येथे येतात किवां न येतात हे मागाहून लेखण केले जाईल. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

———

A.R.No. 157 ८ मोहरम ११९६ हिजरी
२४ डिसेंबर १७८१

पै।। छ १७ मोहरम सन ११९६ हिजरी, बुधवार प्रहर दिवस आल्यावर मये दारोगे हरकारे·

१।३ श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां।। नमस्कार· विनती उपरी यथील वर्तमान ता।। छ ८ मोहरम पौष्य शुध नवमीपर्यंत मो।। पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे· विशेष, पूर्वी छ ५ मोहरमी हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें हजूर व स्वामीस पाऊन लेखनार्थ श्रुत जाहला असेल· सांप्रत हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पृथक पाठविलें आहे त्यावरून सविस्तारें वर्तमान विदित होईल. मुंबई-कराकडील पत्रें आलें. त्याचा मा।। सेवकानें यैकिल्याप्रमाणें विरजीव राजश्री राय रघोतमराव यांस लिहिला आहे. ते स्वामीचे सेवेसी व स्वामीचे आज्ञेप्रमाणें हुजूर विनती करतील. बहुत काय लिहिणें हे विनंती.

———

पै।। छ १७ मोहरम सन ११९६ हिजरी, बुधवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा।। छ ५ मोहरम लगायत छ ८ माहे मा।। सन ११९६ हिजरी, पौष्य शुध ९ इंदुवार.

दुर्गोजी भापकर सोनगडचे जिल्यांत गेले होते. त्यांचे रुखावर इंगरेजांची दोन पलटणें जमीयत व फतेसिंग गाइकवाडाकडील दोन हजार फौज व सटवाजी भोंसले वगैर बइतिफाक आले. यास्तव भापकर मा।। माघारा कोंडाईबारोस येऊन गणेशपंत बहिरे यांसीं मिळोन राहिले व इंगरेजांचे पलटणानी वासदें वगैरे ठाणीं भापकराचे तसरुफांत होती तें घेतली व बालाजीपंत मुतवातर हरीपंताचे डेऱ्यास

जाऊन येकांत करीत आहेत याविंतरिक्त अवांतर वर्तमानासहित अखबार पाठविली ते दारोग्याचे विद्यमानें पावली असेल. त्या उपरी प्रत्यक्ष जाहलें व यैकिले वर्तमान दफेवार लिहिलं असे.

हैदरअलीखानाची पत्रें कारपरदाजास व नूरमहमदखान व नरसिंगराव वकीलास मरकूम छ १६ जिल्हेजचीं छ ५ मोहरमीं आलीं. त्यांत माार लिहिला होता कीं, जनराल कूट बेमराजपाळ्याचे झाडीचे आसऱ्यानें राहिला आहे. मुकाबिल लढाईस मैदानांत येत नांहीं. रसद आम्हीं बंद केली आहे. बहुतकरून माघारा चिनापटणास जाईल. व बंगाले प्रांतात फौज पाठवावी म्हणोन पंतप्रधानांचे कारपरदाजांनी तजवीज केली आहे. परंतु,अमलांत येत नांहीं हें ठीक नांहीं. बगाल्यास फौज खामखा पाठऊन द्यावी, याप्रमाणें खान माारानें लिहिलें आहे म्हणोन खारिज यैकिलें.

हैदरअलीखानानें हुजूरअर्जी लिहून येथील कारपरदाजासमीप पाठविली आहे म्हणोन गोविंदराव कृष्टण यांचे जुबानीं यैकिलें.

माहदाजी सिद्याचीं पत्रें झांसीसमीपचीं आली. त्यांत माार लिहिला होता कीं, चेतसिंग जमीदार कासीकर याची भेट जाहली स्वार व प्यादे मिळोन पांच हजार फौजेनसीं जमीदार माार शामिल जाहला आहे. इंगरेजांचे तंबी विषई अज्म करून कासीपर्यंत जावें म्हणोन चेतसिंगाची बहुत अरजू आहे म्हणोन लिहिलें आहे. करनल मेवर पलटणासुधां यमुनापार होऊन कालपीसमीप गेला हेही वर्तमान सिंद्यानी लिहिलें आहे म्हणोन येथील कारपरदाजांचे जुबानीं व खारिज यैकिलें.

करनल गाडर कल्याणीहून पुन्हां मुंबईस गेला व तीन पलटणें जमीयत कल्याणी व बदलापुरासमीप आहे म्हणोन खारिज यैकिलें.

सुवर्णदुर्ग व कुलाबा बंदर किनारा दरया येथें पंतप्रधान व राघोजी आंग्याचा आमल आहे. इंगरेजाकडील खारीक खजूराची जाहाजें तीनच्यार पाडाऊ करून आणली व कोहज बंदरास साली पनास खंडचा सापडल्या म्हणोन यैकिलें.

———

श्रीनिवास

३

पुरवणी. मुंबईकराचे पत्राचा माार छ ८ मोहरमी कृष्टणरावजीस कारपरदाजानीं इतिला दिधली असतांहीं रावजीनी अर्ज केला नसल्यास हुजूरीहून राव माारनुलेस सेवकाचे लिहिल्याची इतिला व इरशाद न व्हावा व येके तऱ्हेनें पुरसीस करावी कीं, मुंबईहून जनरालाची कासदजोडी आली व कारपरदाजास पत्रे आलीं म्हणोन खारिज यैकिल्यावरून पूर्वी फल्याने सेवकानें लिहिलें होतें. पुन्हां लिहिलें कीं, मुंबईकरांची जोडी पत्रें घेऊन मदरासेस जात होती ते चौकीवर धरली गेली. ते पुण्यांस आणिली म्हणोन बालाजीपंताचे जुबानीचा इजहार लिहिला होता. परंतु, दुसरे अखबारनविसांचे लिहिल्यावरून जाहीर जाहलें जे मुंबईकर जनरालाचे तरफेची कासदजोडी पत्रें घेऊन आली होती व त्याचा दरजवाब कारपरदाजांनी पाठविला. याप्रमाणें हुजूरीहून इरशाद जाहल्यास रावजीचा खुलासा ध्यानास येईल. सेवकास सुचल्याप्रमाणें स्वामीचे सेवेसी विनंती लिहिली आहे. या उपरी जे सलाहदौलत असेल त्याप्रमाणें हुजूरीहून अमलांत येईल हे विनंती.

A. R. No. 158

९ मोहरम ११९६ हिजरी
२५ डिसेंबर १७८१

श्री

पै।। छ १७ मोहरम सन ११९६ हिजरी, बुधवार प्रहर दिवस जाल्यास मये दारोगे हरकारे.

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ९ माहे मोहरम मुकाम काा पुण स्वामीचे कृपावलोकणे येथास्थित जाणोन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेषे, येथील वर्तमान छ ५ माहे मजकूर रोज शुक्रवारी प्राथःकाळी विनंतीपत्र सेवेसी सरकारचें डांकेसमागमे रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले

असेल. तदनंतर येथील वर्तमान रास्ते याची दोनअडीच हजार फौज येथे आहे. आणिकही किरकोल सरंजामी वगैर याची तीनच्यार हजार फौज आहे. किरकोल पतके सरंजामी आहेत. त्यास व पागा वगैर लोकास निरोप देतात. कारणं की, प्रस्तुत स्वारीचा उद्योग कोठे नाही. यां अर्थी कोणी कोन्ही फौजेचे लोकास निरोप देतात व दोनतीन पागेदारासही निरोप दिल्हा. त्या पागा चराईस पाठविल्या. शृत होये. राजश्री हरीपंत पुण्यांबाहेर डेऱ्यास आहेत. राजश्री नानां फडनीस येकादो दिवसां हरीपंताचे डेऱ्यास जात अस्तात. खिलवत वगैर होऊन उपरांतिक मग आपल्या घरास येतात. येंदा स्वारीचा उद्योग कोठे न होतां स्वस्त आहेत. कारणं की, येंदा कोंकणप्रांतीं इंग्रज गडबड करीत नाहीत. यां अर्थी हेही आपले जागां स्वस्थ आहेत. करनैल गाडर ममईस आहे. पांचच्यार पलटणे वगैर कल्यानीस आहेत. तेही येंदा इकडे उद्योग करीत नाहीत यैसे वर्तमान आहे. इंग्रजाचा उद्योग नाही म्हणोन हेंही आपले जागा स्वस्थ आहेत. फौज वगैर मातबर जमा न करीतां लोकास निरोप वगैर देतात. शृत होये. दरबार वगैर जाला होतां. विदित होये. छ ६ माहे माार रोज शणवार. राजश्री गोविंदराव गायेकवाड हजारबारासे स्वारानसी मात्र आहेत. नेमल्याप्राणे फौज त्याजपासी अद्याप जमा नाही. कारण की, लोकाचे खर्चाची सोये नाही. सरकारातून काही पैका द्यावा, त्याचीही अद्याप काही सोये नाही. गणपतराव कोल्हाटकर त्यास दिवाणं करून दिल्हे आहेत. त्याणी चालीसपंनास हजार रुपये कर्ज काढून लोकास रोजमुरे वगैर दिल्हे. त्यास गायेकवाड मजकूर यांचे सरदारी सामानपक्षी दाहा लक्ष रुपये पाहिजेत तेव्हा फौजेची संचणी होणार. यैसे अस्तां चालीसपनास हजाराने काये होते? प्रस्तुत गायेकवाड मजकूर हजारबारासे लोकानी आहेत. पुढे त्याची खर्च वगैरची सोये करून त्यास गुजरात प्रांती पाठवावे यैसी यौजणां आहे. मग काये निश्चये होऊन कोन्हीकडे रवाणां करतील ते लेखण केले जाईल. शृत होये. व सिद्यासी व इंग्रजासी प्रस्तुत दारमदार जाला यैसे वर्तमान आहे. हे पूर्वी लेखण केले आहे त्याजवरून शृत जालेच असेल. पहिले कासीचे राज्यासी व इंग्रजासी लडाई होऊन इंग्रज सिकस्त केले होते. मागती इंग्रजानी

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

जमाव करून कासीचे राज्यास सिकस्त करून, कासीचे ठाणे इंग्रजानी घेतले. कासीचा राजा पलून सिंद्याजवल आला हे वर्तमान पूर्वी विनंती-पत्री लेखण केले होते त्याजवरून शृत जाले असेल. प्रस्तुत वर्तमान आहे की, कासीचा राजा सिंद्याजवल आहे. त्याणी सिंद्यास वीस लक्ष रुपये कबूल केले आहेत की तुम्ही आमचे प्रांतात पाठऊन इंग्रजाचे पारपत्य करावे व कासीचे ठाणे आमचे घेऊन द्यावे. याप्राणे कार्ये केल्यास वीस लक्ष रुपये आम्ही तुम्हास देऊ, यैसा पैगाम कासीच्या राज्यानी सिंद्यास केला आहे यैसे वर्तमान आहे. तिकडील आणिक राजेरजवाडे वगैर याचाही पैगाम सिंद्यासी आहे कीं, तुम्हीं जमुणां उतरून पार आल्यास इकडे इंग्रजाचे पारपत्य केल्यास आम्हाकडूनही पांच रुपयाची प्राप्त आपणास होईल, यैसी सूत्रे तिकडील राजेरजवाडे वगैर याची सिंद्यासी आहेत, यैसे वर्तमान आहे. मागती सिंद्याकडील जे वर्तमान येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. शृत होये. छ ७ रोज रविवार. राजेश्री नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते व कृष्णंरावजीचे चिरंजीव गोविंदराव हेही हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. नाना व हरीपंत व गोविंदराव कृष्टं या त्रिवर्गाचा खिलवत जाला. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की, कृष्टणरावजीकडील पत्रे आली ते खिलवतीत वाचिली. पत्राचे जाबं रावजीस लिहिणार व येजमानसाहेबास अर्जियां वगैर लिहिनार. राव-जीचे पत्राचा भाव काही कलला नाही. कलल्यास लेखण केले जाईल. पत्रे वगैर दाखवून रावजीचे चिरंजीव घरास आले. उपरांतिक आणिक नाना व हरीपंताचा खिलवत प्रहर रात्रपर्येत जाला. उपरातिक नाना आपले घरास आले. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला कीं, पुढे इंग्र-जाचे मसलतीविशी जाला. दुसरे, येजमानसाहेबास पत्रे व अर्जियां ल्याहाव्यां याअन्वये जाला. आणिक कितीक आपले दौलतीचे बंदो-बस्ताविशीं खिलवत जाला. नाना येकादो दिवसाआड हरीपंताकडे जात अस्तात. खिलवत वगैर करून आपले घरास येतात. शृत होये. हैदर नायेकाकडून आणिक तिसरे ग्रहस्त आनंदराव म्हणोन येथे आले आहेत हे पूर्वी लेखण केलें आहे त्याजवरून शृत जाले असेल. नूरखान व नरसिंगराव येथे आहेतच. आणिक आनंदराव म्हणून आलेत. कारणं

की, अखबार वगैर ल्याहावी. दुसरे, याजकडून काही फौजा वगैरचे साहित्य व्हावे यैसा संदेब घेऊन आले आहेत. नाईक मजकुरासी व इग्रंजासी दारमदार होणार यैसीही बंदता होती. प्रस्तुत वर्तमान आहे की, नाईक मजकुरासी व इग्रंजासी लढाई होणार. मागती जे नाईक मजकुराकडून वर्तमान येईल ते लेखण केले जाईल. शृत होये. छ ८ रोज सोमवार. होलकर वाफगावास डेरे दाखल आहेत. त्याचे चिरजीवाचे लग्न माघ मासी होनार. लग्न वाफगावीच होनार यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री गनेशपंत बेहेरे कोडाईबरीवर दोनतीन हजार फौजेनसी आहेत. कोडाईबरीखाले भापकर वगैर आहेत, त्यासी व सटोजी भोसले वगैर यासी लडाई जाली यैसे वर्तमान होते हे पूर्वी लेखन केले होते त्याजवरून शृत जाले असेल. त्यास भापकर वगैर याचे लोकासी व सटोजी भोसले वगैर यासी काहीयेक लडाई होऊन उभयेपक्षी से दोनसे मणुशे जाया जाली यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. सटोजी भोसले वगैर तीनच्यार हजार फौजेनसी सोनगडास आहेत. श्रीमत राजश्री दादासाहेब सुरतेबाहेर बागात अस्वीनिकुमारावर आहेत यैसे वर्तमान आहे. शृत होये. प्रस्तुत रास्ते वगैरची फौज येथेच आहे. पानसे वगैर हजार दोन हजार फौजेनसी येथून पाचच्यार कोसावर आहेत. गायेकवाड येथेच आहेत. हरीपंत व रास्ते व गायेकवाड व पानसे वगैर मळून सातआठ हजार फौज येथें जमा आहे. शृत होये. श्रीमत परवतीस दर्शनास गेले होते. दर्शन करून सध्याकाली घरास आले. शृत होये. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 159

९ मोहरम ११९६ हिजरी
२५ डिसेंबर १७८१

श्रीनिवास

पुरवणीपत्र श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनती जे. मुंबईहून कासदजोडीसमागमें बाळाजीपंतास पत्र आलें तें मा।रनुलेनी

घेऊन, कासदा तकयुदींत ठेविलें व वर्तमान बहुत गौप्य ठेविलें आहे म्हणोन पूर्वील पत्री माार लिहिला. त्यानंतर राजश्री बालाजीपंतास समक्ष सेवकानें विचारिलें कीं, मुंबईहून जनराल किंवा गाडराचे तरफेनें पत्र आलें आहे म्हणोन यैकतों हें सत्य किंवा अन्यथा सांगणें. बालाजीपंतानी मंत्रभेद न करीतां गोष्ट उडऊन सांगितली कीं, मुंबईकराची जोडी इंगरेजांची पत्रें घेऊन मदरासेस जात होती ते कमाविसदारानी चौकीवर धरून पाठविली आहे. पत्रें इंगरेजी आहेंत. अद्यापि वाचलीं नांहींत. याप्रमाणें गोष्ट बनाऊन सांगितली म्हणोन छ ४ माहे मोहरमचे पत्रीं सेवेसी विनती लिहिली व चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांस सूचना लिहिली होती. त्यानी स्वामीचे सेवेसी व हुजूर विनती केली असेल. त्या उपरी स्नेहित मंडलींत शोध घेतां वर्तमान तहकीक व तपसीलवार कळलें की, जनराल मुंबईकरानें श्रीमंत पंतप्रधानाचे नांवचें पत्र हिंदवी लिपीचें पाठविलें. त्यांत माार लिहिला होता कीं, बहुत दिवस तुम्हांकडून पत्र येत नांही, तरी सदैव पत्रद्वारा परामृष करीत जावा. दरीविला मेस्तर हिस्तैन इमादुदौला बहादर यांनी बमोजिब हुक्म कुपनीचे अम्हास व करनल गाडर यांस लिहिलं आहे कीं, पंतप्रधानांचे खानदानासीं व इंगरेजासीं बहुता दिवसापासून कदीम स्नेह आहे. रघुनाथराव यांसीं व कारपरदाजासीं पेंच पडला. सबब राव माार इंगरेजांचे आश्रयास आले. त्यानंतर करनल इपटैन कलकत्याहून मुख्तार होऊन पुण्यास आले. त्यांचे विद्यमानें परस्परें दारमदार होऊन तहनामा जाहला कीं, पंतप्रधानानीं व इंगरेजानीं पूर्वीलप्रमाणें बइतिफाक यैक्यतेनें चालांवें. त्या उपरी कांहींयेक सबबकरितां पुन्हां परस्परें अजुर्दगी जाहली. यास्तव इमादुदौला मेस्तर हिस्तैन यानीं अम्हांस लिहिलं आहे कीं, पंतप्रधानासीं दारमदार व स्नेह करणें याकरितां वकीलास पाठवावयाची तजवीज केली आहे. तरी आपले खास मोहरेनसी राहदारीचें दस्तक मुंबईहून वकील पुण्यास यावयाकरितां पाठऊन देणें, म्हणजे वकील मातबरास पाठऊन देऊं. मेस्तर हिस्तैन यानीं स्नेहाचा माार कितेक लिहिला आहे तो वकीलास सांगू. त्याप्रमाणें वकील रूबरू सविस्तारें वर्तमान जाहीर करील म्हणोन जनराल मुंबईराचे पत्रीं माार लिहिला आहे.

श्रीनिवास

२

पुरवणी, मुंबईकराचे पत्राचा माार.

येथील कारपरदाज हरीपंत व बालाजीपंतानीं पांचसाहा दिवस खिलवतेंत विचार करून हैदरअलीखान यांजकडील वकील नूरमाा खान व नरसिंगराव यांस मुंबईकराकडील पत्र बजिनस दाखऊन त्या पत्राची नकल वकीलांचे मारफातीनें हैदरअलीखानास लिहून पाठविली व वकीलांचे इतल्यानें जरराल मुंबईकराचे पत्राचें उतर लिहिलें कीं, तुम्हीं पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान कळलें. मेस्तर हिस्तैन कलकतेकर यांचे सूचनेप्रमाणें लिहिल कीं, करनल इपटैन यांचे विद्यमानें जो करारमदार होऊन तह जाहला, त्याप्रमाणें परस्परें स्नेह व्हावा, याचा खुलासा समक्ष बोलण्याकरितां मातबर वकीलास पुण्यास पाठऊन देतों. राहदारीचें दस्तक पाठऊन देणें म्हणोन लिहिलें. त्यास करनल इपटैनचे विद्यमानें जो करार जाहला, त्याची अहदसिकनीं व स्नेहांत अंतर तुम्हांकडून जाहलें. सांप्रत हैदर अलीखान बाहदरांचा व आमचा अकृत्रिम स्नेह जाहला आहे. तुम्हाकडून पैगाम स्नेहाचा आम्हांसीं व हैदरअलीखानासीं असल्यास, उभयपक्षीचे बोलण्याकरितां वकीलास पाठऊन देणें असलियां लिहून पाठवणें. त्याप्रमाणें मुंबईहून पुण्यास वकील येण्याकरितां राहदारीचें दस्तक पाठऊन देऊं. याप्रमाणें पत्योतर लिहून, मुंबईकराची कासदजोडी जे आली होती, त्याजबरोबर रवाना केलें म्हणोन तहकीक यैकिलें. व हैदर अलीखानासहीं पत्र लिहून पाठविलें कीं, जनराल मुंबईकराचें पत्र आलें आहे, त्याची नकल बजिनस पाठविली आहे व येथोन पत्योतर पाठविलें ते नूरमाखान व नरसिंगराव यांस इतिला करून पाठविलें आहे. उतर मुंबईकरास पाठविलें त्याचा माार वकील माारनुले लिहतील. या प्राा वर्तमान यैकिलें, तें हुजूर व स्वामीस लिहिलें आहे. बालाजीपंतास सेवकानें विचारिलें असतां, त्यानीं अन्यथा उडाऊन सांगितलें. याचें कारण सेवकाचे मतें रो कृष्णराव बलाळ कारपरदाजाचे तरफेनें मुख्तार हुजूर आहेत. राव माारनुलेस येथोन इतिला द्यावी. ते बमोजिब

सलाहवक्त हुजूर अर्ज करतील किंवा ज्वाबसालचा सिलसिला सेवकाकडें नांहीं. त्या अर्थीं उमदे मसलहतीचे वर्तमानाची इतिला अखबारनवीसास किमर्थ करावी म्हणोन सांगितलें नसेल. सारांश, सेवकासी परद्यानें छपाऊन गोष्ट सांगितली व इनेहिताचे द्वारें सेवकास वर्तमान कळलें. बहुत करून येथील कारपरदाजानीं कृष्टणरावजीस मुंबईकराच पत्राचा माार लिहिला असेल व रावजी येके तकरिबीनें हुजूर अर्ज करतील किंवा केला असेल. सेवकानें तहकीक करितां जें वर्तमान कळलें तें सेवेसी लिहिलं आहे.

A. R. No. 160

१२ मोहरम ११९६ हिजरी
२८ डिसेंबर १७८१

पै।। छ १९ माहे मोहरम सन ११९६ हिजरी, शुक्रवार दीड प्रहर दिवस माा दारोगे सरकार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान ताा छ १२ मोहरम पौष्य शुध त्रयोदसी भृगुवासरपर्यंत वास्तव्य पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम असे. विशेष कृपापत्र हुजूरचे इनायतनाम्यासहित व चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांची पत्रें सह छ ४ मोहरमी डांकेवर पाठविलें तें छ ११ माहे माारी पाऊन वर्तमान श्रवणें संतोष जाहला. पूर्वी छ ९ माहे माारीं हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र चिरजीवांचे पत्रासहित डांकेवर रवाना केंलें, ते दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीस पाऊन वर्तमान कळलें असेल. सांप्रत हुजूरअर्जी व अखबार व स्वामीचें सेवेसी पृथक पुरवणी पत्रीं अखबार व खानगी माराची पत्रें चिरजीवांचे लिफाफ्यांत घालून पाठविलीं. तें व अर्जीहुजूर इनायतनाम्याचा दरजवाब पाठविला तो दारोग्याचे विद्यमानें लिफाफा सेवेसी पावेल, व अर्जी व अखबारेचे लिफाफे हुजूर गुजरतील. मुंबईकराचे पत्राचें उतर पुन्हा येथोन गेलें आहे. त्याचा दरजवाब जो येईल त्याचा शोध घेऊन, सेवेसी व हुजूर विनती लिहीन. बहुत काय लिहिणें हे विनती.

पै॥ छ १९ मोहरम सन ११९६ हिजरी, शुक्रवार दीड प्रहर दिवस मै जोडी डाक सरकार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ ९ मोहरम लगायत छ १२ माहे माार सन ११९६ हिजरी, पौष्य शुत्ध.

हैदरअलीखानाकडून छ १६ जिल्हेजचीं पत्रें आलीं. त्यांतील माार बंगाल्यास फौज रवाना करावी व चेतसिंग जमीदार कासीकर व सिंदे झांसीसमीप येकत्र जाहले व जमीदार माार बहुत मिनत करीत आहे कीं, इंगरेजांचे पारपत्याकरितां कासी प्रांतात मोहीम करणें. आपण तुमचे रफीक आहोंत. माहदाजी सिंदे मुख्तार आहेत. बमोजिब सलाह-वक्त वर्तणूक करतील. गोविंदराव गाइकवाडाचे सरदारीचा बखेडा जाहला व कारपरदाजासीं अजुर्दा होऊन आपली फौजेतून अलाहिदा होऊन येक कोस जाऊन उतरला. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित छ ८ माहे माारीं डांकेवर पत्रें पाठविलीं तें पाऊन वर्तमान सेवेसी व हुजूर श्रुत जाहलें असेल. त्याउपरी प्रत्यक्ष जाहलें व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलं असे.

हैदरअलीखानाकडें पत्रें पाठवावयाकरितां येथील कारपरदा-जानीं लक्ष्मणराव रास्ते व नूरमाखान व नरसिंगराव वकीलाचे स्वा-धीन केली हें वर्तमान पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. छ ९ माहे माारीं पत्रें सांडनीस्वाराबराबरी येथोन रवाना जाहलीं. साडनीस्वार बादामीस डांक खान माराकडील आहे. डांकेवर पत्रें पावती करील. तेथोन पुढें डांकेवर खान माारनुलेसमीप पत्रें जातील.

करनल गाडराकडील हरकत किमपि नांहीं. जमीयत तीन पलटणें-पर्यंत व तोफा तख्तावर चढऊन कल्याणी व बदलापुरासमीप मुस्तैद आहे.

हैदरअलीखानाकडील वर्तमान ताजें आलें नांहीं.

येथील कारपरदाजानीं जागीरदार सरजामी लोक रास्ते व आकंलकोटवाले भोंसले व प्रतिनिधी वगैरेस बमय हुजरात, बमय फौज

पांच हजारपर्यंत व बालाजीपंत व हरीपंताची जातीची फौज दोन हजारपर्यंत पुण्यासमीप ठेऊन नवनिगाहदास्ती सालाबाद फौज ठेवणें ते लोक उमेदवारीनें आले होते, त्यास रुखसत दिधली व नख्त रुपये मागणार स्वार जे आहेत, त्यांस रुखसत करीत आहेत. गाडदी व आरब वगैरे तीन हजारपर्यंत नख्तीचे बोलीचे आहेत, त्यापैकीं कांही बालाजीपंत व हरीपंत व तोफखान्याचे निसबतीस आहेत. मुसा नारंज वगैरे हजारबारासे लोकास पंतप्रधानाचे सरकारातून रोजमरा देणे लागतों.

पुण्यासमीप वैरणीची बहुत किलत जाहली व दोनतीन कोसांत पांचसाहा हजार फौज जमा जाहली आहे. समीप राहि.....

२

पुरवणी अखबार छ १२ मोहरम सन ११९६ हिजरी.

ल्यांत कांही प्रयोजन नाहीं. याकरितां च्यारपांच कोसाचे तफावतीनें वैरणीची सोय पाहून राहण्याविषई रास्ते वगैरेस कारपरदाजानीं सांगितलें. त्यावरून छ १२ माहे माारीं गंगाधरराव रास्ते कूच करून मौजे चिखली, पुण्याहून पांच कोसी, तेथें मुकामात करून राहावयास गेले. प्रतिनिधी व भोंसले वगैरेही कूच करून वैरणीची सोय पाहून पुण्याहून पांचसाहा कोसाचे फासल्यानें जाऊन राहणार.

गोविंदराव गाइकवाडाचें सरदारीचे उभारणीचा बंदोबस्त होण्याचा मार्ग कांहींच दिसत नाहीं. लोक जमा जाहले होते ते न पुसतां उठोन जात आहेत.

कोंडाईबारीसमीप गणेशपंत पूर्वीपासून आहेत व इंगरेजांची पलटणें दोन व फतेसिंग गाइकवाडाची फौज आली. याकरितां दुर्गोजी भापकर गणेशपंतासमीप आले व वासदें वगैरे ठाणीं इंगरेजांकडील पलटणानीं घेतलीं म्हणोन पूर्वील पत्रीं माार लिहिला आहे, येथील कारपरदाजानीं सुरतबाविसी व गुजरात व कोंकणांत मुंबईपासून बोरघांटपर्यंत आशा सोडली. कोंडाईबारीहून पुढें खानदेशांत व बोरघांटापुढें पुण्याचे रुख इंगरेजानी अज्म केला तरी त्यांचे तंबीस फौज पाठवावी

हें तात्पर्य कारपरदाजाचें दिसतें. येथील दरबारी लोकांचे मुखें चर्चा यैकण्यांत आली आहे कीं, अंकलकोटवाले भोंसले व प्रतिनिधीकडील दोन हजारपर्यंत स्वार गणेशपंत व भापकराचे मदतीस व गुजरात व सुरत प्रांताचे ताख्ततराजाकरितां पाठवणार आहेत.

माहदाजी सिंदे दतियाचे राज्यापासून कांही खडणी घ्यावी म्हणोन दतियास गेले म्हणोन खारिज यैकिलें.

बज्याबा पुरंदरे यांस कैदेंत सोडवावयाचा ज्वाबसाल धोंडो आपा पुरंधरे यांचे विद्यमानें दरपेश आहे म्हणोन पूर्वी लिहिलें होतें. सांप्रत खारिज यैकिलें कीं, अडीच लाख रुपये खड जाहला व बज्याबा पुरंदरे यांस कैदेतून खलास करावें, येणेप्रमाणें करार ठरला आहे म्हणोन खारिज यैकिलें. कारपरदाजांसमीप तहकीक करून माघाहून लिहून पाठवीन.

याउपरी जें ताजे वर्तमान होईल तें सेवसी लिहीन हे विनती.

पै।। छ १९ माहे मोहरम सन ११९६ हिजरी.

A. R. No. 161

१३ मोहरम ११९६ हिजरी
२९ डिसेंबर १७८१

पै।। छ १९ मोहरम सन ११९६ हिजरी, शुक्रवार दीढ प्रहर दिवस मै डांक सरकार.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ १३ माहे मोहरम मुा काा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून स्वानंद लेखनआज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेषे, छ ९ माहे मजकूर रोज मंगलवारी प्रा:थकाळी विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले आसेल. तदनंतर येथील वर्तमान राजश्री कृष्णरावजीकडील पत्रे आली होती. पत्रें कारभाऱ्यानी वाचिली. पत्राचा

भाव यैकिल्यात आला कीं, प्रस्तुत माहलातचे तहाचां जाबसाल रूबकार आहे याप्राने पत्राचा अन्वये यैकिल्यात आला. पत्राचे जवाब रावजीस लिहिनार. शृत होये. कनैर गाडर ममईस आहे. वंदता आहे की, गाडर मजकूर कल्यानीस आला आहे यैसे वर्तमान आहे, मागती गाडर मजकूर याचे वर्तमान यैकिल्यास लेखण केले जाईल. प्रस्तुत गाडर मजकूर उद्योग करून इकडे येतो यैसे वर्तमान नाही यैसी वंदता येथे आहे. त्याजवरून कारभारी वगैर आपले जागा स्वस्तं आहेत. पुढे मसलतीचे विचारे काये जे वर्तमान होईल ते लेखण केले जाईल. शृत होये. छ १० माहे मजकूर रोज बुधवार. डोल्याचा समारंभ होतां म्हणोन श्रीमंत व कारभारी वगैर श्रीमंताच्या वाड्यात बंगल्यावर तमाशा पाहात बसले होते. शृत होये. हैदर नायेकास पत्रे लिहिली. पत्राचा भाव यैकिल्यात आला की, नाईक मजकुरास लिहिले की, इग्रंजासी दारमदार न करावा. कदांचित प्रसंगोपात दारमदार करणे प्राप्त जाला तरी आम्हास लेहून पाठवणे. ज्याप्राणे आम्ही मुदे लेहून पाठऊ, त्याप्राणे करारात आणावे. यांआन्वये नाईक मजकुरास पत्रे लिहिली म्हणून यैकिल्यात आले. मागती याचा शोध करून लेखण केले जाईल. शृत होये. सोनगडास दोनतीन पलटने व फतेसिंग गायेकवाडाचे हजार दोन हजार स्वांर व सटोजी भोसले वगैर दोतीन हजार स्वारानसी यैसे सोनगडास आहेत. प्रस्तुत वर्तमान आहे कीं, सोनगडाहून दोनतीन पलटने व फतेसिंग वगैर याचे स्वार यैसे साहा कोस पुढे आले. कोंडाईबारीवर राजश्री गणेशपंत बेहरे वगैर दोनतीन हजार फौजेनसी आहेत. घाटाखाले भापकर वगैर आहेत त्यासी व ते पलटने वगैर पुढे आले आहेत त्यासी लडाई होणार यैसी वंदता आहे. राजश्री गणेशपंतानी यास लिहिले आहे की, काही फौज वगैर पाठवावी. त्याजवरून गणेशपंताकडे काही फौज पाठवावी यैसी यौजणां करितात. काही रास्तीयाची फौज व गोविंदराव गायेकवाड वगैर याची ही रवाणगी गणेशपंताकडे करावी यैसीही यौजणां करितात. शृत होये. छ ११ माहे मजकूर रोज गुरुवार ममईवाल्या इग्रंजाकडील काही सूत्राची पत्रे आली आहेत यैसे वर्तमान आहे. प्रगट तो वर्तमान नाही. परंतु आतंस्थे वर्तमान आहे की, ममईवाल्या-

कडून काही दारमदाराचे सूत्र आले आहे यैसी वंदता. त्यास याचा शोध करून मागती लेखण केले जाईल. शृत होये. दरबार वगैर जाला होतां. माली व मुलकी वगैर कामकाज ज्यारी आहे. विदित होये. छ १२ माहे मजकूर रोज शुक्रवार. नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयतांचा खिलवत जाला. उंपरातिक नाना आपले घरास आले. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की, गणेशपंत वगैर याजकडे काही फौज पाठवावी. दुसरे, कृष्टणरावजीकडे पत्रे लिहिणार व येजमानसाहेबास अर्जिया वगैर लिहिनार, याआन्वये खिलवतीचा भाव यैकिल्यात आला. शृत होये. रास्तीयाची फौज दोनअडीच हजार पुण्यास संगमावर होती, ते ती चौव कोसाचे कूच करून तलेगावाचे सुमारे गेली. वंदता आहे की कोडांईबारीकडे सटोजी भोसले वगैर यानी उपद्रव मांडला आह म्हणोन गणेशपंताचे साहित्यास जाणार. दुसरी वंदता आहे की, तळे गावाकडे डोगर वगैर आहेत. तिकडे चराईस जानार व कोंकणप्रांतीही उगाच शह पडावा या अर्थी रास्तीयाचे फौजेचे कूच दो ती कोसाचे जाले यैसी वंदता. त्यास रास्तीयाची फौज ती चौव कोसाचे कूच करून गेली. मगं गणेशपंताकडे फौज जांती किवां तलेगावाकडे जांती, हे मागाहून लेखण केले जाईल. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्या नास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ ४ माहे माारचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर केले, ते छ ११ माहे माारी पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 162 श्रीनिवास सुमारें इ. स. १७८१

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी. विनती उपरी. मजला स्वामीचे कृपेचे योगेंकरून यजमानसाहबांचे जनाबेंत राहून सतराअठरा वर्षें जाहलीं नौकरींत अंतर करोन घरास जावयाचा उद्योग सर्वथैव केलाच नांहीं. हुजूर येण्याचें प्रयोजन तीनच्यारदां

जाहलें. तें समई खेड व मदनूरचे मार्गें जाणें व येणें जाहलें. वैकुंठवासी माधवराव बलाळ पेशवे यांचा काळ होऊन नव वर्षें जाहलीं. पंतप्रधानाचे सेवें येजमानसाहबांचे आज्ञेप्रमाणें येकरूप राहणें प्राप्त व राहिलों. तीर्थरूप व सौावती मातोश्रीस इतर मंडलीसहित पुण्यांस आणिलें ते समई दर्शन व भेट जाहली. लग्नादि कर्तव्यता सर्वत्रांची तीर्थरूप जी व सौावती मातोश्रीनीं केली. प्रपंच्यांत येकवार तरीं आपलेसमीप लग्नोत्सव व्हावा म्हणोन गतवर्षीं नातीचें लग्न पुण्यांत करावयाचाच उद्योग केला. खर्च किती पडेल व कर्ज भरी होणें लागेल, याचा अंदेशा न करितां उद्योग केला होता. रो गोविंदराव भगवंत यांचा पुत्र वर आहे. सेवकाकडील शरीरसंमध व्हावा येविषईं गोविंदरावजीचाच उद्योग होता व परस्परें पदरापदरी चांभोरगोंदकराकडून शरीरसंमधी आहेत, यास्तव संमध मान्य केला. परंतु, फख्त करणी तीनसहजार रुपये व यावितरिक्त हुंडी किवा वाट खर्च द्यावा. म्हणजे च्यार हजार रुपयेपर्यंत वर संमधी खर्च. यावितरिक्त लग्नसंमधी च्यार हजार, आठ हजार रुपयाचा भरणा पाहिला. हजार दीड हजारपर्यंत करणी गोविंदराव यांचे चित्तास न आली, व कर्तव्यता नांहीं म्हणोन स्पष्ट उतर केलें. त्या उपरी भगवंतराव चिंचोरे, प्राचीन संमधी, याकरितां त्यांचे नाताची योजना केली. तेथें कांहीं प्रतिकूळता होती किंवा होणार म्हणोन चांभारगोदकर, सेवकाचे मातुळानी सागून पाठविलें याकरितां तेथील योजना राहिली. त्या उपरी ध्यानास आणितां, पुण्यांतील कर्तव्यता आम्हासमान गरीबाचे उपयोगी नांहीं. यजमानसाहबांचे सेवक, याकरितां नांव थोर व धनाची अनकूळता नांहीं म्हणोन पुण्यांत लग्न करणें अयोग्य जाणून, विचार मवकूफ केला. सांप्रत खेड, पाथरी व सेलू येथें वरविचारणा करविली आहे. तीर्थरूप व सौावती मातोश्रीची प्रकृती बहुत अशक्त व या वर्षीं दोन प्रतिकूळतेचीं कर्में जाहली. चिरजीव सदासिवराव व चिरजीव नारायणराव यांचें लग्न करणें प्राप्त. तें चिरजीव कृष्टणराव घरी आहेंत, ते तीर्थरूपजीचे सान्निध्य उरकतील. चिरंजीवांचे कन्येस चिरजीव दादानीं समीप असावें हा मुख्य पक्ष. चिरजीवांचेसमीप तेवितरिक्त लग्नसिधी होत नांहीं. चिरजीव पुण्यांत असल्यानंतर, सांप्रत

स्वामीचे कृपेकरितां, माझी अवश्यकता येथें राहावयाची नांहीं. परंतु, मजपेक्ष्यां चिरंजीवानींच लग्नोत्सवास असांवें, हा सर्वत्र कुटुंबस्थ मंडलीचा व माझा मनोदय आहे. त्यास.....

२

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

सांप्रत योजना जे जाहली, ते बहुत योग्य भासली म्हणोन विनती लिहितो. जे. चिरंजीव राय रघोतमराव यांचे स्थली ममता व कृपा स्वामीची मजपेक्षा अधिक. मरातबानें प्रतिष्ठेनें राजश्री राय रेणुराव उमदे. परंतु, ममतेचे कृपेचे मार्गानें राजश्री रायजीसमान चिरंजीवाचे स्थली स्वामीची ममता व गणना चिरंजीव मंडलींत आहे. त्यापक्षीं कोण्ही औरंगाबाद प्रांतीचे ग्रहस्त कुळशीळ व वर योग्य. स्वामीचे मर्जीस आलियां मजला आज्ञा करावी. म्हणजे चिरंजीवाचे स्त्रीस व चिरंजीव मुलीसहित चिरंजीवा-समीप शहरास पाठऊन देतो. माझे स्थली स्वामी आहेत व चिरंजीव सेवेसी आहेत. लग्नकर्तव्यता शहरीच केलिया, पुण्यांत केल्यापेक्ष्या विशेष आहे व याचा संतोष सेवकास बहुत. लग्नाकरितां कुटुंबस्थ मंडली व साहित्य शहरास येईल हा मुख्य पक्ष किंवा वरयोजना होऊन खेडीहून तीर्थरूपजी चिरंजीवास पत्र पाठवितील, त्याप्रमाणें चिरंजीव सेवेसी विनती करतील. यजमानसाहबास विनती करून वीस दिवसाची रुख-सत द्यावी. लग्नसिद्धी संपादून पुन्हा हुजूर (व) स्वामीचे सेवेसी येतील. या उपरी ज्यांत सेवेकाची स्वस्थता व चिरंजीवाची सरफराजी व उपयोगी सलाह स्वामी आज्ञा करतील, तेच मान्य. प्रपंच्याची स्वस्थता असल्यापक्षीं परमार्थविषईं कांहीं प्रवृत्ती होत आहे. त्या प्रपंचाची स्व-स्थता स्वामीचे कृपेकरितां यांत परमार्थही आला. तस्मात स्वामीचे कृपेकरितां प्रपंच व परमार्थ दोन्ही साधना घडत आहे. ग्रहकृत्याची सलाह सांगण्यांविषईं स्वामीस अधिकार आहे. व पूर्वीपासून माझा सांप्रदाय घरचें वर्तमान सेवेसी विनती करावी व आपण सलाह व

आज्ञा करतील तेच उपयोगी. दरबारी राजकारणी व ग्रहकृत्य सर्व वर्तमानाची दखलगिरी चिरंजीवास आहे व स्वामीचे कृपेकरितां चिरंजीव योग्य आहेत व होतील व सर्व वर्तमान सेवेसी विनती करतील. चिरंजीवास येथोन जाऊन आठ महिने जाहले. या उपरी मजकडील अर्ज्या हुजूर व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र देऊन जे विनती केली असेल, ते स्वामीचे कृपेकरून हुजूरपिजीरा होऊन, सेवकाची व चिरंजीवाची सरफराजी आपले कृपेकरून होईल. चिरंजीव सत्वर रुखसत होऊन येथें आले म्हणजे सेवकास बहुत विश्रांत, याचा विस्तार मीं काय ल्याहावा? स्वामी कृपावंत, त्या अर्थीं मनोदयानुरूप कार्यसिधी जाहली हा निश्चय प्रथमतांच केला आहे हे विनती.

पुणें अखबारांतील कठिण शब्दांचे अर्थ

(अ.)–अरबी ; (फा.)–फारसी ; (सं.)–संस्कृत ; (म.)–मराठी ;
(तु.)–तुर्की; (हिं.)–हिंदुस्थानी ; (रा.व्य.को.)–राज्यव्यवहारकोश.

अ

अकरब (अ.), नातलग, जवळचे.
अकसर (अ.), बहुशः, सर्वसाधारणपणें.
अज (फा.), पासून, मुळें.
अजराह (फा.), मार्गापासून, द्वारें.
अजीज (अजिज होणे) (अ.), हताश होणें, शरण येणें, दीन होणें, प्रियव्यक्ति.
'अजीजस्तु भवेदिष्टम् ।'
(रा. व्य. को.)
अज्म (अ.) निश्चय, बेत.
अंदेशा (फा.), संशय, विचार.
अफवा (अ.), कण्डी, भुमका.
अमलदखल (अ.), प्रदेशाचा ताबा.
अमला (अ.), कारकूनवर्ग.
अर्जमारूज (अ.), विनंती, प्रार्थना.
अरस्तु (फा.), ॲरिस्टॉटल.
अरस्तु फितरत (फा.), ॲरिस्टॉटलच्या स्वभावाचा.
अलाहिदा (अ.), पृथक्, विभक्त, निराळें.
अहदपैमान (अ. फा.), वचनप्रमाण.
अहदशिकनी (अ. फा.), वचनभंग.

आ

आखरश (फा.), सरतेशेवटीं.
आखाडी (म.), आषाढाच्या पावसाच्या अभावीं पडलेला दुष्काळ.
आजुर्दगी (फा.), दुःख, असंतोष, कष्टीपणा.
आजुर्दा (फा.), असंतुष्ट.
आजुर्दी (फा.), कष्टीपणा.
आब रक्षिला (फा.), प्रतिष्ठा ठेवली.
आमदरफ्त (फा.), दळणवळण, वाहतुक, ये-जा.
आमिल (अ.), अधिकार गाजविणारा, सरकारनियुक्त अधिकारी.
आलमासी (फा.), पैलू पाडलेला.
आसबाब (अ.), सामुग्री, सामान.
आसरा (सं.), आश्रयस्थान, आडोसा.

इ

इ।। (अ.), प्रारंभ, सुरुवात.
इजहार (अ.), प्रसिद्धीकरण, प्रगट करणें.
इजाऱ्यांत (अ.), खण्डाच्या पद्धतींत, मक्तेगिरींत.
इंतजारी (अ.), अपेक्षा, वाट पाहणें.
इतिफाक (अ.), सहविचार, योग घडणें.
इतिला (अ.), वार्ता, खबर, लक्ष्य, लोभ.
इनायतनामा (अ.), कृपापत्र.
इमदाद (अ.), साहाय्य, मदत.
इरशाद (अ.), उपदेश, आज्ञा, इच्छा.
इरादा (अ.), उद्देश, हेतू, बेत.
इस्तकबाल (अ.), सामोरें, स्वागत.
इस्तकलाल (अ.), जोर, धर, निश्चिती.

इस्तसवाब (अ.), पसंती, सल्ला.
इस्तहार (अ.), प्रसिद्धी, जाहिरात.

उ

उज्म (अ.), थोरवी.
उजरख्वाही (अ. फा.), विरोध करण्याची इच्छा करणारा.
उदुलहुकुम (अ.), आज्ञाभंग.
उद्वोग (सं.), उद्योग, काम.
उमदा (अ.), पराक्रमी, गुणीं, उत्कृष्ट, मोठ्या मनाचा.
उमेदवारी (फा.), आशाळूपणा, आशावाद.
उरूज (अ.), उत्कर्ष, उन्नति, बढती, महत्व.
उस्तवारी (फा.), व्यवस्था, शुश्रूषा, मजबूती, पुनर्घटना, मशागत, चौकशी.

क

कदीम (अ.), पुरातन, जुना, 'पुरातनं कदीमंस्यात्.'
कमबेश (फा.), कमीअधिक, अदमासें.
कमरबस्ता (फा.), बद्धकटी, सिद्ध.
कमालआरजू (फा.) विनंतीची पराकाष्ठा करणें, पराकाष्टेची इच्छा करणें.
कमाविसदार (फा.) वसूली कामावरील मुख्य अधिकारी.
कयफियत (अ.), वर्णन, व्यवहार, लेखी हुकुम.
कयास (अ.), तर्क, अनुमान, मत, विचार.
कर्जहसना (फा.) लोभापोटीं दिलेले ऋण, हातउसने.
करारमदार (अ.), वचन, बोली, कागद लिहून देणें.
करारवाकई (फा.), घडल्याप्रमाणें, बरोबर अचूकपणें.
कलमी (फा.), लेखी, लिखित.
कलागत (सं.), सपाट्याचे भांडण, लावालावी, रागाची शिवीगाळ.
कसब (अ.), कौशल्य, कला, धंदा.
कसरकस (फा.) थोडेसे कमी.
कहीकबाड (फा.), चारा, गवत व लाकूडफांटा.
काबू (फा.), संधी, कबजा, कक्षा, आटोका.
काबूची (फा.), लुच्चा, कपटी.
कायमी (फा.), निश्चिती, स्थैर्य, मजबुती.
कारचोबी (फा.), जरीचे वेलबुट्टीदार.
कारपरदाज (फा.), कार्यकर्ता, मुत्सद्दी.
काररवाई (फा.), प्रकरण.
कासद (अ.), वार्ताविाहक.
काहली (अ.), आजारपण, आळशीपणा.
किलत (अ.), उणीव, कमीपणा.
कुमकी (तु.), सहाय्यकारी.
कुलाहपोष (फा.), टोपीवाला, इंग्रज.
कोहिस्तान (फा.), जंगल, जंगलें किंवा डोंगराळ प्रदेश.
कौलकरार (अ.), ठराव.

ख

खरीता (अ.), पत्र, टपाल, पिशवी.
खरीदफरोख्त (फा.), विकत घेणें व विकणें.
खवासी (अ.), अंबारींत खाशाच्या मागें बसण्याची मानाची जागा.
खातरख्वा (फा.), इच्छेप्रमाणें, यथास्थित, यशस्वी, समाधान.
खातरदारी (फा.), समाधान.
खाननसीन (फा.), घरींच बसलेले, निवृत्त.
खानसुमारी (फा.), घरगणती, शिरोगणती व वर्गवारी.
खामखा (फा.), कांहीं झाले तरी, खचित, जरूर.
खारिज (अ.), हद्दपार, बाहेर, कर्णोपकर्णीं, ऐकीव.

खावंद (फा.), स्वामी.
खावंदी (फा.), स्वामित्व, प्रभुत्व.
खासा (अ.), चांगला, अभिजात, श्रेष्ठ, राजा, औरस.
खिजमतगार, खिदमतगार (फा.), सेवक, परिचारक.
खिताब (अ.), पदवी.
खिदमत (अ.), सेवा.
खिलवत (अ.), एकांतांत केलेले भाषण.
खिलाफ (अ.), विरुद्ध.
खिसारा (अ.), नुकसान, कारवाई, फसवणूक.
खुदावंद न्यामत (फा.), श्रीमंत.
खुफिया (अ.), गुप्तपणें, अंतस्थ.
खुलासा (अ.), सार, निष्कर्ष, स्पष्टीकरण, सारांश.
खुशकी (फा.), जमीन, अवर्षण, दुष्काळ.
खूल(म.), बंड, दंगल, भांडण, उपद्रव, अडथळा.

ग

गल्ला (हिं.) धान्य, पीक, उत्पन्न, मजुरांस वांटण्याचा पैका.
गल्याचा रसद, धान्यसामुग्री.
गलत (अ.), चूक, खोटा, रद्द.
गाडदी, गारदी, (पोर्तु. इं.), शिपाई, पायदळांतील शिपाई, पहारेकरी.
गारत (अ.), नष्ट, उध्वस्त, ठार, गर्दी.
गालिब (अ.), वरचढ.
गाव मारणें (म.), लुटणें, खंडणी बसवणें.
गिर्दनवाह (अ.फा.), भोंवतालचा प्रदेश.
गिरानी (फा.), महागाई, दुष्काळ ; रुष्टता.
गुजरणार (फा.), प्रविष्ट करतील.

घ

घटवटना, वाटाघाट, चर्चा, जुळवाजुळव.
घासदाणा (म.), सैन्याला गवत दाणा पुरवण्यासाठीं लावलेला कर. नागपूरकर भोसल्याकडे हा वसूल करण्याचें काम असे.
घासलकडी, गवत, कडबा, वैरण इ.

ज

जजायल (अ.), एक प्रकारची तोफ.
जनाब (अ.), सन्मानार्थी संबोधन.
जनाब मुकदसेत, पवित्र स्वारीच्या सेवेंत.
जमानेसाज (फा.), प्रसंग पाहून कार्य साधणारा.
जमीयेत (अ.), सैन्य, लष्कर.
जमीर मुबारक (अ.), शुद्ध विवेकबुद्धी.
जरब (अ.), धाक, नग (तोफेचा), तोफ, प्रहार.
जरीदा (अ.), (सरकारी) माहितीपत्र, सडा, एकटा, 'एकाकी तु जरीदा स्यात्.'
जवाबसाल (अ.), प्रश्नोत्तर, संभाषण, तह.
जाबजा (फा.) ठिकठिकाणीं.
जाहिरा (अ.), स्पष्टपणें, उघडपणें.
जिनसी, कोठार.
जुज (अ.), अंश, भाग.
जुज (फा.), शिवाय.
जुबानी (फा.), तोंडी.
जुरअत, जुरत (अ.), धैर्य, शौर्य.
जेर (फा.), पाडाव करणें, अपयश आणणें.
जंगी (फा.), युद्धविषयक, मोठा, मातबर.
ज्यहानसी, जहन-नशीन (फा.), श्रुत, माहित.
ज्यानबदारी (फा.), पक्षपात.

ड

डेरे दाखल होणें, तंबूत राहण्यास जाऊन प्रवासास प्रारंभ करणें.
डोला, मुसलमानांचा ताबूत.

त

तकयुद (अ.), दक्षता, अवधान देणें.
तकरीब (अ.), बहाणा, सबब.
तकसीम (अ.), वांटणी, हिस्सा, भाग.
तखफीफ (अ.), कमी करणें.
तगीर, तगीरी, (अ.), बडतर्फ, बदल.
तजवीज (अ.), व्यवस्था, उपाय, सल्ला.
तफावत (अ.), अंतर, फरक.
तंबी वाकई (अ.फा.), योग्य शिक्षा.
तमानियेत (फा.), संशयनिराकरण, आत्मविश्वास. स्वास्थ्य, समाधान.
तलब तनखा, पगार अथवा खर्च मागणें, 'आकर्षपत्रं तलबम्' (रा.व्य.को.).
तलावा (फा.), टेहेळणी, टेहळणी करीत. 'तलावा स्यात् पर्यटनम्' (रा. व्य. को.).
तवाजा (अ.), बक्षीस, इनाम, नेमणूक.
तशखीस, तसखीस, (अ.), चिकित्सा.
तसखीर (अ.), काबीज.
तसनस (अ.), नासाडी, हानी, धुळधाण.
तसरूफी (अ.), अम्मल, ताबा, अमलांतील, ताब्यांतील.
तहरीर (अ.), कारकुनाच्या खर्चासाठीं देशपांडे इत्यादिकांच्या स्वाधीन केलेली गोषकींतील रक्कम, अथवा हक्क. मराठी राज्यांत फडनीस व मुजुमदार यांना ही देत असत. लिखाण, वर्णन.
ताकूब (अ.), पाठलाग.
ताख्ततराज (फा.), लूटमार, विध्वंस.
तुरुक (फा.), एक प्रकारचा घोडा.
तूल (अ.), लांबवणूक.
तैनाती (अ.), नेमणूक, सेवानियुक्त.

द

दफयुलवख्ती, अशुभाचें कालहरण.
दफेवार (अ.), कलमवार, प्रकरणशः.
दरखास्ती (फा.), अर्ज्या, लेखी विनंत्या.
दरपेश (फा.), पुढ्यांत, समोर, पुढें.
दरमियान (फा.), मध्यें, मध्यस्थ, जबाबदार.
दरवेश (फा.), फकीर.
दरीविला (फा.), यावेळीं.
दस्तक (फा.), दारावर खटखटणें, एखाद्या कामाची टाळी वाजविणें, परवानगी देणारी पत्रिका.
दस्तगर्दा (फा.), बद्ध केलेला.
दस्तगीर (फा.), बद्ध.
दहकपट्टी (सं.), इनाम जमीनी सोडून इनामदाराकडून अवांतर उत्पन्नावर ध्यावयाचा कर. हा दर दहा वर्षांनीं वसूल करीत.
दाईया (अ.), इच्छा.
दाब, धमकावणी, धाक, दरारा, रुबाब.
दारमदार (फा.), ठराव, करार, भिस्त.
दिवानमुख्तार, अधिकार असलेला मंत्री.
दुतर्फा (फा.), दोन्ही बाजूंस.
दुनवी, व्यावहारिक.
दुरअंदेश (फा.), दूरदृष्टी, धूर्त, दूरवर विचार करणारा.
दुरसी, अस्पृश्य, रजस्वला.
देरकसी, दिरंगाई.
दौलत (अ.), संपत्ती, राज्य, सैन्य, ऐश्वर्य.
दौलतख्वाह (फा.), हितेच्छु.

न

नकशा (अ.), विचार, कार्यक्रम, व्यूह.
नक्त (अ.), रोकड, 'द्रव्यं नक्तमुदाहृतम्.'
नजर (अ.), भेट, उपायन.
नमूद (फा.), उघड, स्पष्ट, प्रगट.
नवनिगाहदास्त (फा.), नवीन सैन्य भरती.
नवीसिंदे, नवीसंदा, नवीशिंदा, लिहिण्याचें काम करणारा, कारकून.
नागवण (फा.), लुटालूट, लुबाडणें, सरकारी दंड.

नादर, नादिर (अ.), दुर्मिळ, अमोल, अजब.
नाबूद (फा.), नष्टप्राय, अविद्यमान, नव्हता असा.
नाळ (फा.), बंदुकीची नळी.
नाळबंदी (फा.), मोहिमेवर जातानां शिपायांस देण्यांत येणारी आगाऊखर्ची. नालठोकणीं.
नि ॥, निस्बत (अ.), तर्फ, पक्ष, संबंध.
निगाहदास्त (फा.), फौजभरती, शुश्रूषा.
निफाक (अ.), द्रोह, द्वेष.
निशा (अ.), उधारीची पत, वचन, आबंद, कैफ.
निशान (फा.), बंदूक, खूण, झेंडा.

प

पटी, पट्टी, यादी.
पतक, पथक (म.), तुकडी.
पयदरपय (फा.), लागोपाठ, पावलागणिक, एकामागून एक.
पयहम, पैहम (फा.), वारंवार.
पसपा (फा.), पिच्छेहाट.
प्याज, प्यादा (फा.), पायशिपाई, पायदळ.
पागा (फा.), अश्वशाला, रिसाला.
पायगा (फा.), फौजेचा सरंजाम.
पाळेगर, डोंगराळ प्रदेशांत राहणारा कर्नाटक-प्रांतांतील लुटारू व बंडखोर लोकांचा मुख्य, बंडखोर सरदार.
पुरबाजिंदी (फा.), अतिशय धूर्त, कपटानें भरलेला.
पुरसीस (फा.), प्रश्न, विचारपूस.
पेश (फा.), पुढें.
पेशकदमी (फा.), पुढे पाऊल टाकणें, प्रगती, युद्धाची हालचाल.
पेशकसी (पेशकस) (फा.), खंडणी, नजराणा, उपायन.
पेशखाना (फा.), प्रवासांत अगोदर पुढें पाठवावयाचे डेरे वगैरे सामान.
पेशजी (फा.), पूर्वी, मागें.
पेशबंदी (फा.), दूरदर्शीपणा.
पेस्तर (फा.), पुढें, पुढील.
पैगाम (फा.), संदेश, निरोप.
पोख्त (फा.), पक्व, प्रौढ, थोर.

फ

फडचे (हिं.), पहाणीनंतर लागलेला पूर्ण निकाल, बेबाक करणें.
फरारी (अ.), गुन्हा करून पळून गेलेला, देशत्याग केलेला.
फरासखाना (अ.), डेरे, कनाथा, बिछायती इ० सामान ठेवण्याची जागा.
फरासीस (हिं.), फरेंच.
फल्याने, फलाँ (फा.), अमुक.
फहमायश (फा.), सूचना, निवेदन.
फिदवी (अ.), सेवक.
फिदवीयत (अ.), सेवा, सेवासक्ती.
फिरंगी (फा.), युरोपियन मनुष्य, टोपीवाला, पोर्तुगीज.
फैसला (अ.), निवाडा, निर्णय, ऋणमोचन.

ब

बइतिफाक (अ.), सुसंगत, योगायोगानें.
बजिनस (फा.), वस्तुतः, हुबेहूब, सदेह.
बतरीक (अ.), या तऱ्हेनें.
बदकौल (फा.), वचनभ्रंश.
बंदगानआली (फा.), राजाचे सन्मानदर्शक संबोधन.
बदमामली (फा.), दुष्कृत्य करणारा.
बमय (अ.), बरोबर, सहित (सहितवाचक दोन्हीं शब्द एकत्र आले आहेत).
बमोजिब (फा.), प्रमाणें.

बमोजिब तलब (फा.अ.), मागणीप्रमाणें पगाराप्रमाणें.

बयान (अ.), वर्णन, तारीफ, विस्तार.

बरकरार (फा.), निश्चिती, कायमी.

बरखिलाफ (फा.), विरुद्ध.

बल पडणें, जोर येणें, महत्व येणें, वितुष्ट येणें, फरक पडणें.

बलवा, गलबला, बंड, कुप्रसिद्धी, अव्यवस्था, उपद्रव.

बश, बेश, उत्तम, चांगले.

बशर्त (फा.), अटीवर.

बहाल, बाहाल (फा.), पूर्ववत् नेमणूक, कृपा.

बागी (फा.), बंडखोर, स्वामिद्रोही.

बातनी (अ.), अंतस्थ.

बाद-अहद (फा.), करारानंतर.

बाद-तंबी (अ.), ताकिदीनंतर, धमकावणी-नंतर.

बादली (फा.), सोनें, रुपे, तांबे यांच्या तारांचे कांहीं सूत, रेशीम व कांहीं जर मिळून विणलेलें ; भरजरी.

बादवाही (**बादहवाई**), टाकाऊ, निराधार, अफवा, निरुपयोगीपणा.

बानीकार (फा.), लेखक, अभिमानी, प्रेरक, शिल्पकार.

बार (फा.), परवानगी.

बाहिरबुनगा (फा.), सैन्याच्या सामग्रीचा तळ; सैन्याबरोबरचे उदमी वगैरे गैरलढाऊ लोक.

बिरादर (फा.), भाऊ, भाऊबंद.

बिला-उजर (अ.), हरकत न घेतां.

बुनगा, सैन्याच्या सामग्रीचा तळ, ठेंगणा.

बूदबास (फा.), राहण्याचें ठिकाण, अस्तित्व.

बेइस्तकलाल, धैर्यहीन.

बेगमी (फा.), निश्चिती, पुरवठा, संग्रह. 'नैश्चित्यं बेगमी स्यात्' (रा.व्य.को.).

बेतन्हा (फा.), विलक्षण, भारी.

बेदिल (फा.), उदासीन, असंतुष्ट, श्रमी.

बेमरमत, नादुरुस्त.

बेशक (फा.), निःसंशय, निर्धास्त.

बेहिमत, भ्याड.

भ

भौमवासर (सं.), मंगळवार.

म

मा।नुले, मशारनिले, मशारनिल्हे (अ.), वर सांगितलेला, उपरिनिर्दिष्ट.

मार (मजकूर) (अ.), पूर्वी सांगितलेला, चालू, माहिती, हकीकत, पत्रांतील वर्तमान, उल्लेख, विचार.

मकदूर (अ.), सामर्थ्य, ताकद, जोर.

मकाने (अ.), ठिकाणें, टप्पे, मुक्कामाच्या जागा, रक्षणस्थान.

मकार (अ.), ठक, तत्वहीन मनुष्य, फसव्या, भोंदू.

मखफी (अ.), गुप्त.

मगलूब (अ.), जित, नियंत्रित केलेला.

मजहला (अ.), संकट, बखेडा.

मनोरे, लढाऊ जहाज, लढाऊ गलबत. (इंग्रजी man-of-war चे रूपांतर)

ममनून (अ.), उपकृत, कृतज्ञ.

मर्जीमुबारक (अ.), शुभेच्छा, श्रेष्ठांची इच्छा.

मरकूम (अ.), लिखित.

मरहूम (फा.), मेलेला, कैलासवासी, गत.

मरातिब (अ.), श्रेणी, दर्जा, मानपान.

मलफूफ (अ.), पाकिटांत बंद केलेलें.

मवकूफ (अ.), स्थगित.

मवजूद (अ.), विद्यमान, हजर.

मवाश, मवास (हिं.), आश्रय, संरक्षण.

मवासा, मोवासा (अ.), बंडखोर, लुटारू, बंड.

मसलत, मसलहत (अ.), सल्ला, योग्य विचार.
मसीर, मुशीर (अ.), मंत्री, सल्लागार.
मातबर (फा.), विश्वासू.
मानेमुजाहिम (अ.), प्रतिबंध करणारा.
माबैन (अ.), मधील, मध्यंतरी, दोघांतील.
मामलतदार (अ.), तालुक्याचा अधिकारी.
मामलती (अ.), तालुक्याच्या वसुलीचे काम. जोखीम, महत्वाचे कार्य.

मामूल (अ.), वहिवाट, चाल.
मालमवेसी (अ.), चीजवस्त, गुरेंढोरें.
माहाल, महाल (अ.), जिल्हा, खातें.
माहासरा, महासरा (अ.), वेढा, परिघ.
मिनत, मिन्नत (अ.), मनधरणी करणारा.
मिसमार (अ.), नाश, विध्वंस, चुराडा.
मिसलबंदी (अ.), कामाची वांटणी आणि व्यवस्था.

मुकद्दस (अ.), पवित्र.
मुकरब (अ.), प्रिय, लाडका.
मुकाबिल (फा.), समोर.
मुख्तार (अ.), नियोजित, अधिकृत, प्रतिनिधि.

मुजरद (अ.), प्रसंगविशेषी, नियोजित, खास.
मुजाहिम (अ.), प्रतिबंध करणारा.
मुजमू (अ.), वसूलीचे काम, वसुली.
मुतफिक, मुताफिक, (अ.), एकरूप असलेले, एकमताचे.
मुतवजे (अ.), वळलेला.
मुतवफी (अ.), मेलेला.
मुतवातर (अ.), पुनःपुनः, सतत.
मुतसरफी (अ.), ताब्यांतील.
मुतसल, मुतसिल, (अ.), जवळ.
मुनासिब (अ.), उचित, योग्य.
मुफलिस (अ.), गरीब, दुःखी.
मुबादला (अ.), ऐवजीं, बदली.
मुबारक (फा.), मंगलदायी, मंगल.
मुबारकबादी (फा.), मंगलचिंतन, अभिनंदन.
मुबालमा (अ.), पाल्हाळ, विस्तार.
मुरबी (अ.), कैवारी, अनुभविक.
मुलहक (अ.), जोडलेला, मिळवलेला.
मुलाजम (अ.), चाकर, सेवक.
मुलाजमत (अ.), चाकरी, सेवा.
मुशारा, मुशाहिरा, (अ.), मासिक पगार, दरमहा, 'वेतनं तु मुशाहिरा' (रा.व्य.को.)
मुस्तकीम (अ.), कायम, निश्चित, भक्कम.
मुस्तैद (अ.), सिद्ध, तयार, भक्कम.
मुस्तैद जंग (अ.), लढाईस सिद्ध.
मुसाहेब (अ.), सोबती, स्नेही, सहचर.
मोतमद (अ.), चिटणीस, विश्वस्त.
मंदवासर (सं.), शनिवार.

य

यकसू (फा.), स्नेह.
यकीन (अ.), निश्चित.
यख्तियार (अ.), प्रमाण, शक्ति, अधिकार, सत्ता.
येका (फा.), ऐक्य.

र

रजावंद (फा.), कबूल, खुष, स्वीकृत.
रदजवाब (अ.), प्रत्योत्तर.
रदबदली (फा.), तहचर्चा, वकिली, शिष्टाई, तरफदारी, भीड-खर्ची.
रफा (अ.), निराकरण.
रफीक (अ.), स्नेही, मित्र.
रसद (फा.), सैन्यासाठीं सांठविलेलें धान्य, दाणा, वगैरे.
रहदारी (फा.), सर्वसामान्य लोकांची वाहतूक, वर्दळ, ये-जा.
रहस (रहस्य), गुपित.
रावत (सं.), घोडेस्वार.

रुख (फा.), चेहरा, दिशा.
रुखसत (अ.), निरोप, रजा, परवानगी.
रुजुवाती (अ.), कबूली, हिशेब, यादी इ० तील कलमे ताडून पाहणे.
रुजू (अ.), सरळ, दाखल, सादर, मान्य, जप्त, पसंत, सरकारजमा.
रूबकार (फा.), सन्मुख, फलदायी.
रोजमुरे (फा.), नित्य, रोजच्यारोजचे पगार.

ल

लगायत (अ.), पासून.
लाइलाज (अ.), निरुपाय.
लाचार (फा.), क्षीणोपाय, निरुपाय, निराश्रित.

व

वलंदेज, डच लोक.
वस्तभाव (सं.), चीजवस्त.
वहमनाक (अ.), संशयखोर, संशयास्पद.
वाकई (फा.) वस्तुतः
वाट करणार (म.), व्यवस्था करणार, सोय करणार, प्रविष्ट, दाखल.
विदेही, शारीरिक व ऐहिक विषयांची आसक्ती नष्ट झालेला.
वोढा बसवणें (ओढा बसवणें) (सं.), दाब बसवणें.
वोली (म.), तारण, गहाण.

श

शकल (अ.), आकृति, योजना, व्यवस्था, प्रकार.
शबखून (फा.), रातछापा.
शरफ (अ.), बहुमान.
शरीक (अ.), वाटेकरी, दोस्त.
शशाकित (शशांकित) शंकाग्रस्त.
शह (फ.), धाक, दरारा.
शागिर्दपेशा (फा.), नोकर, चाकर.
शोहरत (अ.), प्रसिद्धी, कीर्ति.

स

सख्त (फा.), कठीण, कडक.
सजावाकई (फा.), योग्य शिक्षा.
सदरहू (फा.), उपरिनिर्दिष्ट.
सदराह होणें, सैरावैरा पळून जाणें.
सदी (फा.), शतक.
सनगे (म.), विणलेलीं वस्त्रें, वस्त्रांचे तागे, नग, उंची वस्त्रें.
सरगर (फा.), चांभार.
सरगरम (फा.), उद्युक्त, सोत्साह.
सरंजाम (फा.), साधनसामुग्री.
सरफराज (फा.), ऊर्जित, अर्पित.
सरफराजी (फा.), मानांत बढती.
सरबराई (फा.), कृती, योग्य व्यवस्था.
सरसुभे (फा.), सुभ्याचा मुख्य.
सरेदरबार (फा.), भरदरबारांत.
सलामती (अ.), सुरक्षितता.
सलाम मुजरा (अ.), वंदन.
सलाह (अ.), योग्य उपदेश, हितवाद.
सलाहकार (अ.), सल्लागार.
सलाहदौलत (अ.), राज्यास इष्ट.
सलाहनेक (अ.), इष्ट हितवाद.
सलाहवक्त (अ.), समयोचित.
सलूक (अ.), सलोखा, सख्य, शिष्टाचार.
सवदागिरी (फा.), व्यापारी.
साजस (फा.), संधान, कट, कौटिल्य, कपट.
सादर (अ.), प्रविष्ट.
सालाबाद (फा.), वर्षानंतर.
सिकस्त (फा.), पराजय.
सिबंदी (फा.), किल्यांतील फौज.

सिरपेच (फा.), पगडीवर घालण्याचा रत्न-जडित अलंकार.

सिलक, शिलक (फा.), सरबत्ती.

सिलेदार (अ.), हत्यार बाळगणारा, बहुमानाची पदवी.

सुतरस्वार, शुतरस्वार (अ.), सांडनीस्वार.

ह

हकीक (अ.), वस्तुतः, खरोखर.

हंगामा वारद होणें (फा.), दंग्यास सुरवात होणें.

हमराही (फा.), एकाच मार्गीं जाणारे, बरोबरीचे.

हरकत (अ.), हालचाल, विरोध, आक्षेप, अडथळा, विलंब.

हरकारे (फा.), जासूद, टेहळे, पडेल ते काम करणारे.

हरगिज (फा.), कधीहीं, बिलकुल.

हासल (अ.), प्राप्त, लभ्य, नफा, तात्पर्य.

हिफज, हिफाजत, पाठ, स्मरण, आश्रय, बचाव.

हिला (अ.), युक्ती.

हुजराती (अ.), जवळ असलेले.

हुजूर पिजीर (अ.), राजाने मंजूर केलेले.

हौसलेदार (अ.), कर्तृत्ववान, शक्तिवान, महत्वाकांक्षी.

सूची

व्यक्तिनिर्देश

अ

अमृतराव पेठे ८, ११, १५, १०३, १६४.
अहिल्याबाई ८, ११, १९, २०, ८२, ११०, १११, ११२,११४, १२२, १३७, १५४, १७१.

आ

आगाजी सरगर १४४, १६२, १६८.
आप्पा बळवंत ४, ५१, ६७, ६८, १२३.
आबई १४०, १६८.
आनंदराव १७९, १८३, १८८.
आनंदराव रास्ते २, १३६.

इ

इप्टैन, कर्नल ९४, १९०, १९१.
इष्टैन (इंग्रजांचा नाविक अधिकारी) २८.

क

कडोजी भापकर ७, २९, १०९.
कनोळकर वकील १३०.
कल्याणराव तुळजापूरकर १६, २४.
कूट, कर्नल (जनराल कूट, मुंबईकर) ६, १४, ३२, ३६, ४२, ४३, ४४, ४८, ५६, ६४, ७०, ७२, ७४, १०१, ११६, १२०, १३५, १४९, १५६, १६६, १८५, १९०, १९१.
कृष्णराव १९८.
कृष्णराव जोशी ४२, ६४, १३०, १५७, १६६.
कृष्णराव बल्लाळ (कृष्टणटरावजी, रावजी, कृष्णराव, कृष्टणराव) ४, ५, ११, १२, १३, १५, २०, २१, २२, २५, २६, ३१, ३८, ४०, ४१, ४८, ५३, ५४, ६१, ६२, ६६, ६९, ७०, ७३, ७४, ७५, ७७, ७९, ८४, ८५, ८६, ९०, ९१, ९७, ९८, १०६, ११६, ११८, १२४, १२५, १२८, १२९, १३३, १४०, १४१, १४८, १५३, १५५, १५६, १५७, १६१, १६२, १६६, १७०, १७२, १७७, १७९, १८१, १८२, १८६, १८८, १९१, १९२, १९५, १९६, १९७.
कृष्णराव बळवंत ४९, ८८, ११८, ११९.

ख

खंडेराव केशव पैठणकर २८, २९.
खंडेराव भोसले ४५.
खंडो आवजी १७५.

ग

गणपतराव कोल्हटकर ७८, ८९, ९७, १२२, १४४, १५८, १७५, १८७.
गणेशपंत बेहरे (बहिरे) ७, १२, १४, २७, ४४, ४८, ५३, ५४, ८९, ९८, १०९, १२०, १२२, १४६, १५८, १६१, १६४, १७८, १७९, १८१, १८२, १८४, १८९, १९४, १९५, १९६, १९७.
गणोजी कदम २.
गोडार्ड, कर्नल (गाडर) ३, ४, ५, ६, ८, १०,

११, १४, १८, २३, २६, २७, ३१, ३२, ३६, ३९, ४०, ४१, ४४, ४६, ४७, ४९, ५१, ५५, ५६, ५९, ६१, ६४, ६७, ७२, ७३, ७४, ७५, ७७, ७८, ८१, ८२, ८४, ८७, ८८, ८९, ९०, ९२, ९३, ९४, ९६, १०५, १०७, १०८, ११५, ११६, ११७, ११९, १२३, १२४, १२६, १२७, १३३, १३५, १३६, १३८, १३९, १४२, १४५, १४६, १४९, १५०, १५२, १५७, १६०, १६३, १६४, १६६, १६७, १६९, १७०, १७१, १७३, १७४, १७६, १७८, १८२, १८५, १८७, १९०, १९३, १९६.

गोपाळराव गोविंद २.
गोविंदराव कृष्ण (गोविंदरावबापू) ५, १५, २१, २२, ७५, ७६, ७८, ८६, ११६, ११८, १२८, १२९, १३०, १४२, १६२, १६७, १७३, १८०, १८५, १८८.
गोविंदराव गाइकवाड ५६, ७८, ८९, ९७, १०९, ११८, ११९, १२१, १२२, १२३, १२६, १३९, १४४, १४६, १५०, १५७, १५८, १६४, १६७, १७५, १७६, १८२, १८७, १८९, १९३, १९४, १९६.
गोविंदराव भगवंत ४, ११, १२५, १९८.
गोहदकर जाट २, ३६, ४९, ७२, ७४, ८७, ९२, १२६, १४७.
गंगाधरराव रास्ते १३६, १३९, १४२, १४४, १५७, १६७, १६९, १७०, १८२, १८३, १८९, १९४, १९६, १९७.
गंगोबातात्या १११, ११४.

घ

घोरपडे १६७.

च

चंदासाहेब १३८.
चांभोरगोंदकर १९८.
चिंतामण दीक्षित १८, ३१, ११४, ११८.
चिंतोपंत ११.
चिंतो विठ्ठल ११, २९.
चेतसिंग, राजा (कासीकर राजा, वारानसीचा राजा) ३३, ३४, ३५, ४१, ४२, ४४, ४६, ४८, ४९, ५१, ५५, ६५, ६७, ७०, ७१, ७४, ८१, ८२, ८७, १०१, १०४, १०७, १०८, ११३, ११६, १२९, १४३, १५७, १६४, १६७, १७३, १७४, १७८, १८५, १८८, १९३.

ज

जंगली मिरजा आमानी आसफुद्दौला १०८.
जफरुद्दौला ४, १०६.
जॉन हालंड १२८.
जाबितजंग बहादुर ९७.
जिवाजी खतालकाटी, मारडीकर १६.
जिवाजीपंत १२५, १३४.
जोरावरजंग बहादुर १६, २४, ५४, १६२.

ट

टिपू २६.

त

तहवरजंग १६, २४, ५४.
तुकोजी होळकर २, ११, १९, २०, २३, ३२, ३८, ५२, ५९, ६८, ७८, ७९, ८२, ८४, ८५, ८८, ८९, ९९, १०६, ११०, १११, ११२, ११४, १२२, १२३, १३७, १४२, १४३, १४७, १४९, १५४, १६४, १७०, १७१, १७९, १८३, १८९.
त्रिंबकरावमामा ११, १५, १६४.

द

दशरथ पाटील १६.
दाजीबा फडके ५०.

दादाजी गंगाधर १२२.
दुर्गोजी भापकर ७, ४४, ४८, १०८, १०९, १२०, १४६, १५८, १६४, १७८, १७९, १८२, १८४, १८९, १९४, १९५, १९६.

ध

धोंडोपंत भाऊ १.
धोंडोबा आप्पा पुरंदरे २१, १६८, १७१, १७६, १७७, १८३, १९५.
धोंडो महादेव १२०, १२४, १३६.

न

नजीबखान १९, ३०, ११६, १६७.
नथेखान ९५.
नरसिंगराव (हैदराचा वकील) १६, ४२, ५०, ६१, ६२, ६३, ६४, ७०, ७५, ७६, १२९, १४९, १५६, १५७, १७९, १८०, १८३, १८५, १८८, १९१, १९३.
नरसिंगराव मांडवगणे १२०, १२४.
नानास्वामी (स्वामी, नानाजी शंकर, नानाजीपंत) १, ३, ५, ६, ९, १२, १३, १४, १७, २०, २२, २४, २५, २६, २८, २९, ३३, ३४, ३७, ४१, ४२, ४५, ४७, ४८, ५१, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ६०, ६१, ६६, ६९, ७०, ७३, ७४, ७६, ७९, ८०, ८१, ८३, ८६, ८७, ८८, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९९, १००, १०३, १०४, १०७, ११३, ११४, ११७, ११८, १२१, १२४, १२५, १२६, १३१, १३५, १३८, १४१, १४५, १४८, १५१, १५५, १५६, १५९, १६१, १६२, १६५, १६६, १६८, १७२, १७३, १७७, १७८, १८०, १८४, १८६, १८९, १९०, १९१, १९२, १९५, १९७, १९९, २००.
नारायणराव १९८.
नारो गणेश ७८, ८३, ८४, ८९, ९९, १०६, ११०, १११, ११२, ११४, १२२, १३७, १७९, १८३.
नारो शंकर २.
निंबाळकर २२.
नूरमहंमदखान (हैदराचा वकील) ४२, ५०, ६१, ६२, ६३, ७०, ७५, ७६, १२९, १३१, १३२, १४४, १४९, १५१, १५६, १५७, १७९, १८०, १८३, १८५, १८८, १९१, १९३.

प

परशुराम रामचंद्र मिरजकर १३९, १५३. १६४.
पाटणकर २८, १६७.
पाराजीपंत ५२, ७८, ८३, ११०, ११२, ११४, १७९.
पिंपळनेरकर १८२.
प्रतिनिधी (पंतप्रतिनिधी) १९३, १९४, १९५.

फ

फतेसिंग गायकवाड १८, २६, २७, ३२, ३६, ३८, ४०, ४६, ४९, ५५, ५६, ६१, ६७, ७४, ७५, ७८, ८१, १०९, १३९, १४४, १५८, १७९, १८४, १९४, १९६.

ब

बज्याबा पुरंदरे ११, ८४, १४०, १६८, १७१, १९५.
बसालतजंग ४६.
बळवंतराव १६, २४, ५३, १७९.
बळवंतराव वाकडे ७१.
बळवंतसिंग ३३, ३४, ३९, ४१.
बाजी गोविंद जोशी ५०, ५५, ५७.
बाजी नरहर २.
बाजीपंत आण्णा ५१, ५२, ५९, ६८, ७७, ७८, ८४, ८९, १३३, १४७, १५२.

बाजीराव बर्वे २७, ३२, ८९, १०६, १२८, १३९, १४६, १५८, १६४.
बाजीराव मांदळे १५८.
बाबूराव वैद्य ८, ११, १९, ८२, ११०, १११.
बाळाजी गोविंद बुंदेले ३३, ३४, ३५, ४४, ६७, ७१, ८२, १०४,
बाळाजी जनार्दन फडनीस (बाळाजीपंत, नाना, नाना फडनवीस, मदारुलमहाम) ३, ८, १०, १२, १५, १९, २०, २२, २३, २९, ३०, ३१, ३२, ३७, ३८, ३९, ४०, ४२, ४५, ४७, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५७, ५८, ५९, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७६, ७७, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८७, ८८, ९२, ९३, ९७, ९८, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, ११०, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११६, ११८, ११९, १२०, १२१, १२३, १२६, १२८, १२९, १३०, १३२, १३४, १३६, १३७, १४०, १४१, १४५, १४९, १५०, १५१, १५३, १५४, १५६, १५७, १५८, १६०, १६२, १६६, १६७, १६८, १६९, १७०, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७, १७८, १७९, १८०, १८१, १८३, १८४, १८६, १८७, १८८, १८९, १९०, १९१, १९४, १९७.
बाळाराव दिवाण ८७.
बीबीसाहेब ७.
बुरन, मिस्तर ४३.

भ

भगवंतराव चिंचोरे १९८.
भवानजी भोसले, अक्कलकोटकर ११९, १२४, १२७, १३७, १६७.
भवानी शिवराम ६६, ९७, १०६.
भाऊसाहेब, श्रीमत राजेबहादुर ८०.
भोसले (नागपूरचे) ८.

म

मनसाराम ११४.
महंमदअलीखान ९, १७७, १८३.
माधवराव नीलकंठ पुरंदरे ८३, १६८, १७१.
माधवराव बल्लाळ पेशवे ११२, १९८.
मानाजी फाकडे २१, १३३, १३९, १४४, १६२ १६८, १७१, १७६, १७७, १८३.
माहादजी सिंदे २, ६, ९, १४, १५, १८, १९, २३, २७, ३०, ३१, ३२, ३५, ३६, ४६, ४७, ४९, ५०, ५१, ५२, ५६, ५९, ६१, ६५, ६७, ७१, ७२, ७४, ७८, ८१, ८२, ८४, ८६, ८७, ९०, ९१, ९२, ९५, ९६, ९७, १०१, १०८, ११०, १११, ११२, ११६, १२०, १२६, १२७, १३५, १३७, १४७, १५०, १५३, १५७, १६१, १६३, १६४, १६७, १७१, १७३, १७४, १७८, १८५, १८७, १८८, १९३, १९५.
माधवराव सदाशिव ९३, ९५, ९६, १२३.
माधोसिंग २.
मालोजी घोरपडे २८, ८३.
माहोलीकर ६.
मुधोजी भोसले १८, ४५, ९२, १७९.
मुरारजी जाधव ३७, ३८.
मूसा नारंग (मान्शर नोरोन्हा) १७६, १८०, १९४.
मूसा बरने ११४, ११८.
मूसा मुती (मान्शर मांटिनी) १०२, १०९, ११४, ११५, ११७, ११८, १२६.
मोइनुद्दौला बहादुर ६९, १०३.
मोरो गिरमाजी १८२.

मोरो बाबूराव फडनीस ११, ११५, १७१.
मंडोर, मिस्तर ४३.
म्यूर, कर्नल (मरेल, मेवर) ७२, ७४, ७५, ८१, ८७, १०१, ११६, १२०, १२६, १२७, १३५, १५०, १५७, १८५.

य

यशवंतराव गंगाधर (यशवंतरावदादा, गंगोबातात्याचा पुत्र, दादाजी गंगाधर) १११, ११२, ११४, १३७, १५४.
यहतशामजंग फरुखमिरजा (निर्मलकर) ६६, ११५, ११७.

र

रजाअलीखान २, १३८.
रघोत्तमराव १३, ३४, ६९, ८०, ९१, १००, १०३, १०७, १३४, १४८, १५५, १६५, १७७, १८४, १९०, १९२, १९८, १९९.
राघोजी आंग्रे १७८, १८५.
राघोपंत १०२.
राजाराम (जमीनदार) ६४.
रामजी पाटील १११, ११४.
रायदुर्गकर १३२.
रुकनुद्दौला ९१.
रेणुराव १९९.

ल

लक्ष्मणराव रास्ते ५१, ६३, १२९, १३६, १८०, १९३.

व

वलीमहंमद बक्षी १९.
वासुदेवबावा मुतालिक ११.
वॉरन हेस्टिंग्ज (गोरनर जनरल इमादुद्दौला मिस्तर हिस्तैन बहादर जलादतजंग, कलकत्याचा सुभा) ३२, ३३, ३४, ३५, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४४, ४६, ४७, ४८, ४९, ५१, ५५, ५६, ६५, ६७, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ८१, ८२, ८७, १०१, १०४, १०८, १२९, १९०, १९१.
विसाजी आप्पाजी आठवले ५५, १११, ११६, १८०, १८१.
विसाजी कृष्ण बिनीवाले (विसाजीपंत) ४०, ४९, ५८, ५९, ११५, ११७, १२०, १३३, १५३.
वेडोजी पाटील १६.

श

शहाजी भापकर (दुर्गोजीचा पुतण्या) १०९.
शहाजी भोसले अक्कलकोटकर ८३, ८४, १२२, १२४, १२७, १३२, १६७, १९३, १९४, १९५.
शुजाउद्दौला (शुजायदौला) ७, ३५, ४२, १०८.
शेरजंग १, २.
श्रीमंत दादासाहेब (रघुनाथरावदादा), २, ४, ५, ६, १०, ११, १८, २६, २७, ३१, ३२, ३८, ७८, ८९, १०६, १२८, १३५, १३६, १३९, १४२, १४३, १४५, १४६, १४९, १५२, १६०, १६१, १६९, १८८, १९०.

श्रीमंत पंतप्रधान (श्रीमंत सवाई माधवराव, माधवराव नारायण) २, ४, ६, ७, ८, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, २०, २१, २५, २६, २७, २८, ३३, ३४, ३५, ३७, ४२, ४४, ४५, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५५, ५६, ५७, ५८, ६१, ६२, ६३, ६४, ६६, ६९, ७०, ७५, ७६, ७७, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९९, १०१, १०२, १०३, १०५, १०६, १०९, ११०,

The Shinde has reached the bank of the Mula-Mutha from Koregaon. His meeting with the Srimant will come off on Wednesday, 22nd inst. He has with him a large army consisting of about five thousand *sawars* and three to four platoons. Fourteen of his heavy guns have arrived with him and the others are in the rear. Kalyan Rao Nimbalkar and Babu Rao Vakil are accompanying him.

Raghoji Bhonsle's forces, which had participated in the Karnatak campaign, are reported to have reached Nagpur. Balwant Rao Bhavani, who led the forces, has come here, with a small escort party, in the company of Haripant Phadke, and is expected to stay here for some time.

---

1. The earlier portions of the Akhbar are not extant.

A. R. No. 216 — *2nd Muharram,* 1207 *A.H.* / *20th August,* 1792.

(Akhbar) from Poona, dated 2nd Muharram (1207 A.H.)

Friday, 28th Zilhej (1206 *A.H.*).

In the afternoon the Madarulmaham attended to state business in the presence of the attending officers. Later, he held a conversation with Ramji Patil and Haripant Phadke. After some time, the Patil left and the Madarulmaham continued his talks with Haripant Phadke till a late hour in the evening.

The Srimant went to Ambe Wadgaon in the evening and witnessed the gambols of the deer in the deerpark. He returned to his palace by sunset.

Saturday, 29th Zilhej, (1206 *A.H.*).

In the afternoon the Madarulmaham visited the Belbag and from there directly proceeded to the palace of the Srimant. The Ganapati festival is on here as today is Bhadrapada Shuddha Pratipada. When *shastris* and *pundits* and other people were assembled, the Srimant ceremonially installed a golden image of Sri Ganapati in the *makhar*[1] raised in the Audience Hall of the palace and offered worship to it. The occasion was marked by the chanting of hymns, the playing of music and the booming of guns. Nana returned to his residence as soon as the ceremonies were over..... ..... (Akhbar incomplete).

A. R. No. 217 — *13th Muharram,* 1207 *A.H.* / *31st August,* 1792

Akhbar from Poona covering the events from 10th to 13th Muharram, 1207 A. H.

In the afternoon of the 11th of Muharram Mahadaji Shinde came to the palace of the Rao Pant Pradhan and conferred with him for over two *ghatikas.* Those present included Nana, Ramchandra Phadke, Krishna Rao Balwant,

1. An ornamental arched frame-work of bamboo and paper, set with paper flowers in blazing colours, used for decorating a niche in which the image of any godhead is installed for offering worship.

Daulat Rao Shinde, Abaji Raghunath, Kadoji Shitole and Ramji Patil Jadhav. The Shinde had a confidential discussion, later, with the Rao Pant Pradhan in the presence of Nana and Abaji Raghunath Chitnis.

On Friday, 12th inst. in the afternoon, Mahadaji Shinde (went to) the Rao Pant Pradhan .....

(Akhbar incomplete).

A. R. No. 218 — *25th Muharram,* 1207 *A.H.* / *12th September,* 1792

(Akhbar from Poona, dated 25th Muharram , 1207 A. H.).[1]

Wednesday, 24th Muharram.

.....Thus the Srimant spoke to the *mir shikari.*[2] He reached the river in the evening and performed his *sandhya* there. Then riding in his *amari,* with Appa Balwant at his back, he returned to his palace at a late hour in the evening. Nana Fadnavis also returned to his residence a little later.

Thursday, 25th Muharram.

In the afternoon the Madarulmaham came to the Hall of Mirrors at the Srimant's palace and discussed with Narayan Rao Yadav Bhagawat, *kamavisdar* of *pargane* Amod in Gujrat, matters relating to the revenues under his charge. The Srimant arrived there about this time and the Madarulmaham discussed miscellaneous matters with Babu Rao Keshav, Trimbak Rao Parchure and other attending officers.

Later, Nana ordered for being shown to the Srimant the robes and dresses to be sent to Satara, Kopargaon and Bhaganagar in fulfilment of an established custom. After the Srimant finished his inspection, the Madarulmaham assigned the arrangements for their dispatch to different officers. He also went down to the workshop where these dresses were tailored and left further instructions there.

---

1. The earlier portions of the Akhbar are not extant.
2. The State game-keeper.

In the evening he broke his *pradosh* fast at his country house in the company of his two wives and other members of his household. He returned to his residence at a very late hour, after witnessing a *nautch* performance.

A. R. No. 219 — *3rd Rajab*, 1207 *A.H.* / *14th February*, 1793

(A covering letter) dated Poona, 3rd Rajab (1207 A. H.) from Raghottam Haibat Rao.

Respectful compliments. The letters and Akhbars sent from here on 26th (Jamadi II) must have been delivered there by now.

News is covered till the 2nd inst. in the letter which accompanies.[1]

A. R. No. 220 — *26th Ramzan*, 1207 A.H. / *7th May*, 1793

Akhbar from Poona for 25th and 26th Ramzan, 1207 A.H.

As has been already reported, Nana went to the tent of Mahadaji Shinde on 24th inst. and the two had their conciliatory talks. It appears they have now patched up their differences once for all. What is more, they are said to have solemnly pledged themselves to keep up their concord fully determined to resist any influences that might tend to vitiate their relations.

It is learnt that the Shinde intends to spend the rainy season at Jambgaon. He is expected to start on the journey about the end of Shawwal.

It is believed here that hostilities might have started in the North by now between the forces of the Shinde and those of the Holkar.

Malet is likely to leave for Bombay shortly. On 26th inst. he attended a feast given in his honour at the palace of the Rao Pant Pradhan. There was a select party. The Pant Pradhan presented to him rich robes and a necklace of pearls.

---

1. The accompanying Akhbar mentioned here is not extant.

Gadag, Lakshmeshwar and other *mahals*, yielding a total revenue of about three lakhs of rupees, which were part of the *jagir* of Parashurampant Mirajkar but were seized by Tipu, will now be restored to the Mirajkar.

Tuesday, 25th Ramzan.

The Rao Pant Pradhan, during the day, went about his usual avocations.

Nana had talks with Ramji Patil and Haripant Phadke during the evening. Later, he also conferred with Govind Rao Bhagawant.

Wednesday, 26th Ramzan.

Malet attended a feast in the evening at the palace of the Rao Pant Pradhan. The Pant Pradhan, Nana and Haripant Phadke talked to him as he helped himself to the different courses. The feast over, Malet was entertained to a *nautch* performance. The Rao Pant Pradhan presented to him several items of robes, a pearl necklace and other jewels. Malet in return bestowed on the Pant Pradhan a few glass articles and a mechanical toy.

Malet also went on a courtesy call to the house of the Madarulmaham (before going back to the Residency).

Nana went on a brief visit to the Belbag in the evening. Haripant took his leave as soon as Nana returned to his residence.

A. R. No. 221 — *7th Zilqad*, 1207 *A.H.* / *16th June*, 1793

(A covering letter) dated Poona, 7th Zilqad (1207 A.H.) from Raghottam Haibat Rao.

Respectful compliments. It is hoped that the earlier letters dispatched from here on 5th inst. have informed the Swami of the state of affairs here. A letter is now sent covering the news till 6th inst.

Akhbar from Poona for dates 5th and 6th Zilqad, 1207 A.H.

Tukoji, Kashi Rao and Bapuji Holkar are reported to have passed Rampura and Bhanpura and are now heard of in the neighbourhood of Hinglazgad. The Shinde's *sardars* are believed to have crossed the Chambal and seem to be tracking the Holkars, who sustained a heavy loss on 21st Shawwal in a plundering attack developed by the Shinde's forces.

Report has it that Raja Dhokal Singh was routed on 10th Shawwal by Ali Bahadur at Zarna Parna. The Raja is believed to have taken refuge at Khatola, leaving his two elephants and twelve guns to be captured by his pursuer.

Saturday, 5th Zilqad.

The Rao Pant Pradhan conferred with Nana and Haripant for some time in the evening and, later, accompanied by them, went on a visit to the house of Govind Rao Nilkanth Khasgiwale to attend a marriage reception there. The host presented suitable robes to each one of them. On returning to his palace, the Rao Pant Pradhan scrutinised the accounts relating to Dharwar with the assistance of the Karbharis. Nana visited the Belbag before returning to his residence.

In the morning on even date, Nana, accompanied by his family members attended a feast given in his honour at the house of Vaijanath Bhat. He received on the occasion several items of robes.

Sunday, 6th Zilqad.

In the evening the Rao Pant Pradhan examined the accounts relating to Dharwar in the presence of Nana, Haripant and Govind Rao Bhagawant. He played *shatranj*[1] for a while in the night before retiring to bed.

Nana attended a wedding reception in the night at the house of Vishwanath Joshi. Here he was entertained to a *nautch* performance.

A. R. No. 222 — *29th Zilqad,* 1208 A. H.
28th June, 1794

(A covering letter) dated Poona, 29th Zilqad (1208 A.H.) from Anand Rao Keshav, servant of Raja Raghottam Rao.

1. The game of chess.

Respectful compliments. The earlier Akhbar, together with other letters, was dispatched from here on 22nd inst. The letter, which accompanies, covers the news till 28th inst.

Akhbar from Poona covering the events from 22nd to 28th Zilqad, 1208 A.H.

The death of Haripant Phadke was reported earlier. The Rao Pant Pradhan is expected to bestow the mourning robes on Chintaman Rao and Ramchandra Rao, the sons of the deceased, as soon as they arrive here, after performing the obsequies of their father. The Rao Pant Pradhan might also confer on them the military status which their father held during his life-time.

Krishna Rao Balwant, at the bidding of the Rao Pant Pradhan, left here for Siddhatek on 26th inst. to offer condolences to the sons of Haripant.

Shridhar Lakshman Munshi, attached to Raghoji Bhonsle's establishment, will encamp at Garpir on 30th inst. and leave for Nagpur on 3rd Zilhej.

Abaji Raghunath Chitnis had suspended his official work as a protest against the lack of co-operation among the clerks attached to the establishment of Daulat Rao Shinde. The latter, therefore, came to the Chitnis to placate him. The Chitnis presented to the Shinde a horse and several items of robes before he took leave.

Govind Rao Bhagawant is reported to have rushed from Indapur to Siddhatek on receiving the news of the death of Haripant Phadke. He is expected to arrive here from Siddhatek shortly.

Daulat Rao Shinde is believed to be summoning here a part of his forces now stationed in the north.

An urgent letter was dispatched from here on 26th inst. by Nana asking Parashurampant Mirajkar to hasten back to Poona.

The Rao Pant Pradhan has paid fifty-thousand rupees to meet the expenses of the obsequies of Haripant Phadke.

Saturday, 22nd Zilqad.

The Rao Pant Pradhan, during the day, went about his routine avocations.

Nana paid a visit to the Belbag in the earlier part of the day and spent the evening at the house of Haripant Phadke, consoling the members of his family.

Sunday, 23rd Zilqad.

The Rao Pant Pradhan passed the day in routine activities.

Nana observed the death anniversary of his mother at his house in the forenoon and invited Krishna Rao Balwant to attend the dinner held in this connection. Later, he spent the evening talking to Krishan Rao Balwant.

Monday, 24th Zilqad.

The Rao Pant Pradhan, accompanied by Krishna Rao Balwant and other *sardars,* visited the Belbag in the evening, the day being Ekadashi. From there he rode to Parwati on his state elephant and had a *darshan* of his tutelary deities. Then he proceeded to the Ramana, where a Pathan from Narwar gave a thrilling display of standing upright on two horses brought close together and making them go round at a brisk pace. The Rao Pant Pradhan, later, tried a hand at *bothati* and also witnessed a combat between a tiger and an elephant. He returned to his palace late in the evening.

Nana paid a brief visit to his garden retreat in the evening.

Tuesday, 25th Zilqad.

In the afternoon Nana came to the palace of the Rao Pant Pradhan and the two discussed for some time the contents of the letter from Govind Rao Krishna. Before leaving the palace, Nana also spent some *ghatikas* in a talk with Krishna Rao Balwant.

Earlier in the day, Nana received at his residence Raja Kalyan Rao, Shridharpant Munshi and Krishna Rao Chitnis, the accountant of Raghoji Bhonsle, and listened to their respective business.

Wednesday, 26th Zilqad.

In the morning the Rao Pant Pradhan, attended to his physical exercises at the gymnasium. In the afternoon he conferred with Nana regarding some administrative matters of the state.

In obedience to the Rao Pant Pradhan's command Krishna Rao Balwant left for Siddhatek today to console the sons of Haripant Phadke.

Thursday, 27th Zilqad.

In the afternoon the Rao Pant Pradhan signed state papers and spent some time in seeing a few paintings.

Nana paid a visit to the Belbag in the morning and attended to state business in the afternoon. He also conversed for some time with Babu Rao Vaidya.

Friday, 28th Zilqad.

The Rao Pant Pradhan spent a routine day.

Nana held talks in the afternoon at his residence with Khandopant Vartak and Babu Rao Vaidya.

A. R. No. 223 — *6th Zilhej,* 1208 *A.H.* / *5th July,* 1794

Akhbar from Poona covering the events from 29th Zilqad to 6th Zilhej, 1208 A. H.

Shridhar Lakshman Munshi and Babu Rao Vishwanath Vaidya will start for Nagpur on 7th (Zilhej).

As directed by the Rao Pant Pradhan Daulat Rao Shinde has written to Jiwaji Ballal and De Boigne[1], who are now in the north, to bring their forces to the south as expeditiously as possible.

Govind Rao Bhagawant arrived here from Indapur on 29th Zilqad. He is regularly attending the presence of the Rao Pant Pradhan and Nana.

---

1. Count Benoit de Boigne (1751-1830), the well-known Savoyard military adventurer, who saw service in the Irish Brigade of France as also in the Russo-Turkish War of 1774 and under Catherine, the Empress of Russia, came to India in 1778. He visited many courts in India and was engaged as a lieutenant by Mahadaji Shinde between the years 1784 and 1795 to train up two battalions of infantry. From 1795 onwards he led a retired life at Chambery in Savoy, where now his memorial stands.

Haripant's sons are expected to arrive here on 8th (Zilhej), when the Rao Pant Pradhan will bestow the mourning robes on them.

Krishna Rao Balwant returned here from Siddhatek on 4th Zilhej.

Saturday, 29th Zilqad.

The Rao Pant Pradhan attended to his usual avocations and visited the Ramana in the evening to exercise his horses. Raghunath Rao Mirajkar and other *sardars* accompanied him.

Govind Rao Bhagawant, who has just returned to Poona after celebrating his daughter's marriage, called on Nana in the afternoon.

In the evening Nana paid a visit to the Belbag. On returning to his residence he checked the muster-roll of the *gardis* and held talks with Ramji Patil, the *vakil* of Raghoji Bhonsle, and Govind Rao Bhagawant.

Sunday, 1st Zilhej.

In the afternoon the Rao Pant Pradhan discussed state affairs with Nana and Govind Rao Bhagawant and granted leave to Shridhar Lakshman (to proceed to Nagpur). The latter pitched his camp, about noon today, near Garpir.

Monday, 2nd Zilhej.

The Rao Pant Pradhan had talks in the morning with Nana and Govind Rao Bhagawant. These talks were continued in the afternoon. Under the direction of the Rao Pant Pradhan Gopal Bhagawant, *naib munshi*, prepared the drafts of several letters.

Nana visited the Belbag in the evening. Later, he engaged himself in a discussion at his residence with Govind Rao Bhagawant.

Earlier in the day, Shridhar Lakshman, the *vakil* of Raghoji Bhonsle, dined with Nana and was given presents of robes.

Tuesday, 3rd Zilhej.

In the afternoon the Rao Pant Pradhan discussed affairs of state with Nana and Govind Rao Bhagawant.

Daulat Rao Shinde is reported to be ill. Govind Rao Baji was sent to him by the Rao Pant Pradhan to inquire about his progress.

Wednesday, 4th Zilhej.

The Rao Pant Pradhan was engaged in conversation throughout the afternoon with Nana and Govind Rao Bhagawant. He played a game of *chausar* before retiring for the day.

Thursday, 5th Zilhej.

In the afternoon-meeting at the palace today matters of routine administration were dealt with. Nana returned to his residence at about sunset and spent some time in discussing outstanding matters with Govind Rao Bhagawant and Babu Rao Vaidya.

Earlier in the day, Nana partook of dinner at the house of Appajipant Dabholkar. He was entertained to a *nautch* performance and was presented with several costly robes. He visited the Belbag in the evening.

Friday, 6th Zilhej.

The Rao Pant Pradhan had a meeting at his palace in the afternoon with Nana and Govind Rao Bhagawant. Babu Rao Vishwanath Vaidya was given formal leave by the Pant Pradhan to start to Nagpur.

Earlier in the day, Nana discussed with Bahiropant Mehendale matters relating to the English. Later, Babu Rao Vaidya came in to seek leave of Nana before proceeding to Nagpur.



[पुढें चालू



[पुढें चालू



[पुढें चालू



पुणें अखबार

भाग ३ रा

A. R. No. 163 — १६ मोहरम ११९६ हिजरी
१ जानेवारी १७८२

पैा छ २५ मोहरम गुरुवार अस्तमान सरकारच्या डांकेबराबर आली सन ११९६ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हयपतिराव गोपाळ साष्टांग नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान ताा छ १६ मोहरम पौष्य वद्य द्वितीया भौमवासर-पर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष छ ४ मोहरमचे कृपापत्र आलें होतें. त्याचे उतरा-सहित इकडील वर्तमान लिहून हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र छ १३ माहें माारीं डांकेवर रवाना केलें तें हुजूर व सेवेसी दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत छ १६ पर्यंत इकडील वर्तमानासहित हुजूरअर्जी व अखबार व पृथक पुरवण्यांत हिंदवी अखबार लिहून चिरजीव राय रघोतमराव यांचे नांवचे पत्रासहित लिफाफा डांकेवर रवाना केला आहे. तो दारो-ग्याचे विद्यमानें हुजूर व सेवेसी पावेल. कांहीं विशेष वर्तमान चिरंजीव समजून सेवेसी विनती करतील म्हणोन चिरंजीवाचे पत्रीं लिहिलें आहे. ते विनती करतील त्या उपरी हुजूर अर्ज करावयाची सलाह स्वामीचे मर्जीस आलियां अर्ज करावा. चिरंजीवाचे क्षेमतेचें वर्तमान सदैव कळत जावें हे इछा. परंतु चिरंजीव स्वामीचे

सेवेसी आहेत. त्यांजला स्वामीचे कृपेकरितां इतर लक्ष बहुत करून ध्यानांत नसेल यास्तव पत्रें बहुत विलंब करून पाठवीत आहेत. स्वामीनीं आज्ञा केल्यास सत्वर रवाना करीत जातील. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पैा छ २५ मोहरम सन ११९६ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १३ माहे मोहरम लगायत छ १६ माहे माार सन ११९६ हिजरी. रोज मंगळवार.

करनल गाडरानें जमीयत कल्याणी बदलापुरासमीप ठेऊन आपण मुंबईस गेला व माहदाजी सि(दे) दतियासमीप आहेत. तेथील राज्यास घांसदाण्याचा तकाजा लाविला आहे. गंगाधरराव रास्ते वगैरे वैरणीचे किलतीकरितां पुण्यासमीप होते. तेथोन कूच करून पांच कासी मौजे चिखलीस गेले व बज्याबा पुरंदरे यांपासून रुपये व जामीन घेऊन कैदेतून सोडवावयाची तजवीज आहे. यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान विदित जाहलें असेल. त्यानंतर प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहिलें आहे.

हैदरअलीखानाची पत्रें नूर माखान व नरसिंगराव वकीलास छ १६ जिल्हेजचे पत्र छ ५ मोहरमीं आलें. पत्राचा माार गोविंदराव कृष्टण यांचे जुबानीं यैकिला कीं जनरल कूट आपले जमीयतीसुधां बेमराजपाळ्यापासून कूच करून चिनापटणास गेला. खान माार त्याच जिल्यांत आहे. कितेक पाळेगर इंगरेजास शरीक जाहले आहेत. त्यांचीं राहावयाची स्थळें तसखीर करावयाची तजवीज खान माार-नुलेची आहे. मकानें घेतल्यानंतर पुन्हां चिनापटणास जाणार.

पंतप्रधानांचे कारपरदाजांनी कोण्हीं मातबर सरदारासमागमें वीसपंचेवीस हजार फौज देऊन बंगाल्यास फौज रवाना करावी हे सलाह इंगरेजांचे पारपत्यास फार उपयोगी व कराराप्रमाणें बारा लाख रुपये पाठऊन देतों म्हणोन कारपरदाजास सांगणें म्हणोन हैदरअलीखानानें वकीलास लिहिलें होतें. वकीलानीं येथील कारपरदाजांस सागितलें. फौजेची व सरदाराची नेमणूक होऊन बंगाल्यास फौज रवाना केल्यानंतर बतरीक कर्ज पांचसात लाख रुपये सिवाय करार सालाबादी कारपरदाजास देऊं म्हणोन खान माराकडील पैगाम बालाजीपंत व हरिपंतास वकीलानीं सांगितला म्हणोन खारिज यैकिलें.

माहदाजी सिंदे झांसीहून दतियास गेले म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलें आहे. सांप्रत सिंद्याचे वकीलाचे जुबानीं यैकिलें कीं चेतसिग जमीदाराचे इतिफाकानें सिंदे मार कालपीस गेले. करनल मेवर कालपीहून कूच करून कासीचे रुखें अंतरवेद प्रांतात सिद्यापासून चालीसपनास कोसाचे फासल्यानें गेला म्हणोन यैकिलें.

पैा छ २५ मोहरम गुरुवार सन ११९६ हिजरी.

श्रीनिवास

२

पुरवणी अखबार छ १६ मोहरम सन ११९६ हिजरी.

जंजिरेकर हबसी यानीं पुन्हां जमीयत मातबर जमा केली आहे. पंतप्रधानांचा तालुका तळेंघोसांळें वगैरे प्रांतात धामधूम करणार म्हणोन खारिज यैकिलें.

बज्याबा पुरंदरे यानीं अडीच लाख रुपये दंड द्यावा म्हणजे सासवड किंवा पुण्याचे हवेलींत पुरंदरे मजकूर यांस आणून ठेवांवें व चौकीस बालाजीपंताकडील लोक पूर्ववत कायम असावे, याप्रमाणें

धोंडो अपां पुरंदरे यांचे विद्यमानें कारपरदाजांसीं ज्वाबसाल होऊन बालाजीपंताकडील विश्वासूक व धोंडो अपाचा कारकून चंदनचे किल्यास बज्याबाकडें जाऊन त्यास वर्तमान सदरी लिहिल्याप्रमाणें सांगितलें. बज्याबानें उतर केले कीं रुपये नख्त लाख पनास हजार आपल्यासमीप नांहींत. अडीच लाख रुपयाचा भरणा करावयास कोण्हीं सावकारांचीं मिनत करून कांही सावकारापासून कर्ज, कांही आपले घरचे जिदगानीचा सरंजाम विकून रुपयाचा भरणा करून देणें लागेल. बालाजीपंताकडील चौकी कायम राहून दुसरे ग्रहस्तानें आमचे घरास न यांवें व आम्हीं दुसऱ्याचे घरास न जांवें याप्रमाणें तकयुद जाहली तर रुपयाचा सरंजाम आपल्याकडून होणार नांहीं व चंदनचे गडावरील कैद व पुणें अथवा सासवडचे हवेलींत राहून कैदेंत राहणें समान जाहलें. याकरितां अडीच लाख रुपये वायद्यानें द्यावे व आम्ही आदा करूं व जामीन द्यावा व तकयुद किमपि नसावी. याप्रमाणें जाहल्यास रुपये देण्याचा करार व गडाहून पुणें किंवा सासवडास येणे आपल्यास कबूल आहे. सांप्रत तुम्हीं जे शकल ठराविली हे सर्वथैव कबूल नांहीं व रुपयाची सरबराई होणार नांहीं. धोडो आपाकडील कारकून व बालाजीपंताकडील मातमद पुण्यांस येऊन वर्तमान सागितलें. धोंडो आपा पुन्हा बज्याबास सोडवावयाचे प्रयत्नांत आहेत.

पंतप्रधानाकडील सरदार रास्ते वगैरे पुण्यांचे गिर्दनवाह पूर्ववत आहेत.

बालाजीपंत फडनवीस छ १५ व छ १६ माहे माारीं हरीपंताचे डेऱ्यास जाऊन दाहाबारा घटकापर्यंत येकांती विचार करीत होते. छ १६ रोजी बमोजिब तलब नूरमाखान व नरसिंगराव शरीक मसलहत होते.

नासिककर माहापुरुष पुण्यांस आले आहेत. त्यांचे दर्शनास छ १४ माहे माारी पंतप्रधान गेले होते.

———

A. R. No. 164 सुमारें जानेवारी १७८२

श्रीनिवास

पुरवणी* श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनती जे बापूजी होळकर लग्नसंमधी अक्षतेकरितां आले होते व श्रीमंत पंतप्रधान वाफगांवास गेले. त्याअर्थी अखबारनवीसीकरितां सेवकानें जावें परंतु या राजद्वारीं सेवकाची प्रतिष्ठा. यजमानसाहबांचे इनायतीकरितां हुजूरचे सरफराजीवर येथें महत्व. सांप्रत कारभारी वर्तमान यथास्थित सुचवीत नांहींत व वाफगांवास येण्यांकरितां हैदरअलीखानाकडील वकील नूरमाखान व नरसिंगराव यांस बोलाऊन समक्ष बालाजीपंतानी सूचना केली व बापूजी होळकर अक्षतेस गेला होता. सेवकास कारभाऱ्यानीं कांहीच सुचविलें नांहीं. वाफगांवी लग्नांत इतरांचा सत्कार जाहल्याप्रमाणें सेवकाचा सन्मान हुजूरचे सिलसिल्यावर जाहलियां उतम, न जाहल्यास हुजूरचे लक्षांत यांचें अंतर व सेवकास संताप बहुत होईल याकरितां लग्नास जाण्यांचा अनमान केला व अखबारेकरितां व बापूजी होळकर आक्षतेस आले होते म्हणोन चिरंजीव राजश्री केशवराव यास श्रीमंतासमागमें वाफगांवास पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विनती.

A. R. No. 165 १८ मोहरम ११९६ हिजरी
३ जानेवारी १७८२

पैा छ २५ मोहरम गुरुवार सन ११९६ हिजरी, सरकारच्या डांकेबराबर आली.

श्रीनिवास

पोष्य हयपतिराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी येथीलं वर्तमान ताा छ १८ मोहरम पौष्य वद्य चतुर्थी गुरुवासरपर्यंत मो।

*अ. नं. १६३ ची ही पुरवणी असण्याचा संभव आहे.

पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी छ १७ माहे माारीं हुजूर अर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें हुजूर व स्वामीस पावलें असेल. सांप्रत हुजूर अर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पृथक पुरवणीपत्रीं आखबार लिहून डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेत. दारोग्याचे विद्यमानें हुजूर गुजरेल व सेवेसी पत्र पावेल. चिरजीव रघोतमराव यांस पत्र लिहून पाठविलें आहे तें स्वामीं चिरजीवास देतील. कृपापत्र छ ११ मोहरमचें चिरजीवाकडील पत्रासहित पाठविलें तें छ १८ माहे माारीं पाऊन संतोष जाहला. यजमानसाहब सेवकावर व चिरंजीवावर मुतवजे अहवाल व सरफराजी विशेष करीत आहेत व स्वामी चितापासून कृपावंत, हें वर्तमान पंतप्रधानांचे राजद्वारीं सर्वत्रांस प्रसित्ध आहे. याकरितां कोण्हीं ग्रहस्त स्नेहाकरितां बहुत राजाची नाजूक गोष्ट सांगत आहे व त्याची इतिला मीं स्वामीचे सेवेसी करीत असतों. सांप्रत कोण्हीं स्नेहित ग्रहस्त शफत घेऊन वर्तमान ताजें व अपूर्व व यजमानसाहबांचे उपयोगीचें सागणार आहे त्याची किंचित सूचना प्रस्तुत चिरजीवास लिहिली आहे, ते सेवेसी विनती करतील. यजमानसाहबांचे नौकरींत सुरखरुई असावी हा हेत चितापासून, परंतु हुजूरचे इनायतीप्रमाणे सेवा सेवकाकडून घडोन येण्याचा मकदूर थोडका. आपले हौसल्याप्रमाणें नौकरींत कसूर करीत नांहीं. स्नेहित ग्रहस्ताकडून इतिला जाहल्यानंतर सेवेसी विनती करावयाकरितां चिरंजीव राय रघोतमराव यांस लिहीन. ते विनती करतील. वर्तमान चिरजीव व स्वामी व यजमानसाहबांस कळवावें, इतर कोण्हास इतिला न व्हावी म्हणून शफत घेणार व मीं शफत करितों. स्वामीचें अभय येकवार पूर्वी जाहलें आहे व मी शफत दिल्ही ते स्वामीनीच केल्याप्राा. यजमानसाहब व कोण्हीं अनकूळ असलियां त्यास वर्तमान इतिला करण्याविषईं पुरती खातरजमा जाहल्यानंतर आपण सूचना करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पैा छ २५ मोहरम सन ११९६ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १७ मोहरम लगायत छ १८ माहे माार सन ११९६ हिजरी पौष्य वद्य गुरुवार.

हैदरअलीखानांची पत्रें नूरमाखान व नरसिंगराव वकीलास आलीं. त्यांत माार लिहिला होता जे जनरल कूट जमीयतसुधां बेमराजपाळ्याहून चिनापटणास गेला व कितेक पाळेगर इंगरेजास शामिल जाहले आहेत. त्यांची मकानें ताख्तताराज करावयाचा निश्चय खान माारानें केला आहे. व माहदाजी सिंदे चेतसिग जमीदारासहित कालपीस गेले व मेवर इंगरेज अंतरवेद प्रांतीं चालीस पंनास कोसाचे फासल्यानें गेला. जंजिरेवाले हबसी यानीं जमाव मेळविला आहे. तळेंघोसाळें वगैरे पंतप्रधानाचे तालुकियांत हंगाम करणार. बजाबा पुरंदरे यांस कैदेतून सोडवावयाचा ज्वाबसाल धोंडो आपा पुरंदरे यांचे विद्यमानें दरपेश आहे व यावितरिक्त वर्तमानासहित छ १७ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार स्वामीचें सेवेसी पत्रें पाठविलीं तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरी प्रत्यक्ष वर्तलें व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

हैदरअलीखानाचीं पत्रें छ २६ जिल्हेजचीं छ १६ मोहरमीं नूरमाखान व नरसिंगराव वकीलास आलीं. छ माारीं त्रितीय प्रहरीं बाळाजीपंत फडनवीस हरीपंताचे डेऱ्यास गेले होतें व नूरमाखान व नरसिंगरा(व) शरीक मसलहत होते म्हणोन पूर्वील अखबारेंत लिहिलें आहे. खान माराचे पत्राचें वर्तमान नरसिंगराव वकीलाचे जुबानीं यैकिलें कीं जनराल कूट बेमराजपाळ्याहून कूच करून चिनापटणास गेल्यानंतर खान माार पाळे मस्तुरास गेला व ताख्ताराज केलें. याचप्रमाणें काळहस्ती व आणखीं कितेक मकानें ज्या ज्या स्थलीचे पाळेगर इंगरेजास शरीक जाहले आहेत तें मकानें

ताख्तताराज केलीं व सिकाकोल राजबंदरी प्रांतास जावयाकरितां अरकाटेहून जो रस्ता आहे त्या मार्गांत झाडी बांस वगैरे झाडांची बहुत. येकदोन स्वाऱ्या जावयाचा मार्ग कदीम आहे. ते झाडी शंभर हात रुंद जे जे स्थलीं आहे ते झाडी तोडून शाहरस्ता करावयाचा आरंभ केला आहे. रस्ता साफ जाहल्यानंतर सिकाकोल राजबंदर प्रांतास मातबर फौज रवाना करितों. बंगाले प्रांताचे ताख्तताराजे-करितां पंतप्रधानांचे कारपरदाजानीं वीस हजार फौज सत्वर रवाना करावी म्हणोन लिहिलें होतें. वकील माारानीं बालाजीपंत व हरीपंतास वर्तमान सांगितलें. सदरहू वर्तमान खारिज यैकिल्या-प्रमाणें लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होय.

पैा छ २५ मोहरम.

२

पुरवणी अखबार छ १८ मोहरम सन ११९६ हिजरी.

जंजिरेवाले हबसी यानीं जमीयत मातबर जमा करून पंतप्रधानाचे तालुकियांत हंगामा करणार म्हणोन पूर्वील पत्रीं वर्तमान लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं बिरेवाडीनजीक तळेंघोसाळें येथें पंतप्रधानाकडील तीनच्यारसे गाडदी व च्यारपांचसे प्यादे येकोन हजारपर्यंत जमीयत प्यादे आहेत. बिरेवाडीकर कमाविसदारानें येथील कारपरदाजास लिहिलें आहे कीं हबसी यानीं जमाव मातबर केला आहे. याकरितां च्यारपांचसे बारचे जवान पाठऊन द्यावे. त्यावरून येथील कारपरदाजानीं निश्चय केला आहे कीं च्यारपांचसे गाडदी बिरेवाडीकराच्या कुमकेस पाठऊन द्यावे. सत्वरच रवाना होणार म्हणोन यैकिलें.

बंगाला वगैरे इंगरेजांचा तसरुफी मुलक ताख्तताराज करावया-करितां पंतप्रधानाचे कारपरदाजानीं वीस हजार व मातबर सरदार रवाना करावा, कराराप्रमाणें बारा लाख रुपये पेशकसीचे व

पाचसात लाख रुपये बतरिक कर्ज देवितों म्हणोन हैदरअलीखानानें येथील कारपरदाजास लिहिलं आहे म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलं आहे. सांप्रत यैकिलें की खान माार नूरमाखान व नरसिंगराव वकीलास बहुत तकयुद करून लिहीत आहे की पंतप्रधानाचे कारपरदाजांचे सूचनेप्रमाणें व तुमचे लिहिल्यावरून पेशकसीबाा रुपये व कर्ज हसना पाठवावयाचा निश्चय आम्हीं केला आहे, याउपरी कारपरदाजानी फौजेची रवानगी जलदीनें करावी, याप्रोां लिहिलें आहे. त्यावरून वकील माार येथील कारपरदाजास बहुत निकडीनें सागत आहेत की तुम्हीं खान माारास लिहून पाठविलें त्याप्रमाणें तामकदूर रुपये देतों म्हणोन लिहिलें आहे. याउपरी फौजेचे रवानगीस विलंब जाहलियां तुमचे बोलण्याचा व मसलहतीचा व कायम मिजाजीचा विश्वास हैदरअलीखानास किमपि येणार नांहीं. याकरितां फौजेची रवानगी सत्वर करावी. येथील कारपरदाजानीं वकीलासीं करार केला आहे की पंधरा हजार फौज व सरदार उमदा माहदाजी सिंद्यासमीप पाठंऊन देतों. सिवाजी विठल वगैरे पांच हजार फौज पंतप्रधानांची सिद्यासमीप आहे व हे पंधरा हजार. समग्र वीस हजार फौज पंतप्रधानांची व सिंदे वीस हजार, येकून चालीस हजाराचा भरणा जाहला. साल मारीं यमुना उतरून अंतरवेद प्रांतीं छावणी करतील. दसरा जाहल्यानंतर मोहिमेस रवाना होऊन प्रथमतां कासी व अयोध्या प्रांताचा बंदोबस्त करून बंगाल्यांत जातील, याप्रमाणें कारपरदाज वकीलासीं बोलिले व खान माारास लिहून पाठविलें आहे म्हणोन मातबर स्नेहिताचे मुखं यैकिलें. बालाजीपंत व

———

पैाा छ २५ मोहरम सन ११९६.

३

पुरवणी अखबार पुणें छ १८ मोहरम सन ११९६ हिजरी. हरीपंत व गोविंदराव कृष्टण यांस पुसावें तरी हे गोष्ट छपावितात

व यथार्थ सांगत नांहींत याकरितां माारनुलेस विचारिलें नांहीं. याउपरी त्रिवर्गास वर्तमान विचारून ते ज्या तऱ्हेनें सांगतील त्याप्रमाणें सेवेसी लिहीन.

गोविंदराव गाइकवाडासमीप फौज जमा जाहली होती त्यापैकीं दोनतीनसे लोक उठोन गेले व गाइकवाड माार येथील कारपरदाजावर अजुरदा होऊन आपले लश्करातून अलाहिदा उतरला आहे म्हणोन पूर्वील पत्रीं लिहिलं आहे. गोविंदराव गाइकवाडाचे रुसवाईत कारपरदाजांचा बदलौकिक व गुजरात प्रांतात गणेशपंत बहिरे व दुर्गोजी भापकराचे कुमकेस फौज पाठवणें जरूर व गणपतराव कोलटकर, बालाजीपंताचे शरीरसंमधी, त्यानीं वीसपंचेवीस हजार रुपये गोविदराव गाइकवाडाचे उभारणीकरितां खर्च केलें. याकरितां येथील कारपरदाजानीं गणपतराव कोलटकरास पंतप्रधानांचे तरफेनें कारपरदाज निश्चय करून गाइकवाड माारासमीप मुख्तार करून ठेविलें, व पनास हजार रुपयेपर्यंत बतरीक कर्ज बाळाजीपंतानी देविलें, व स्वारांस च्यार आणे, कोण्हास आठ आणे, येणेप्रमाणें रोजमरा देऊन कोंडाईबारीपर्यंत जाऊन पुढें गुजरात व सुरत प्रांतात हंगामा करून रुपये मेळऊन फौजेची सरबराई करणें, याप्रमाणें सागून छ १८ माहे माारीं गोविंदराव गाइकवाडास पंतप्रधानाकडून रुखसत देविली व बालाजीपंतांनी आपले तरफेने रुखसत केलें. मौजे भोंसडी, पुण्याहून दोन कास, तेथें गाइकवाड माार जाऊन उतरला आहे. सध्या तीनच्यारसे स्वार कदीम रफीक लोक हमराह आहेत. पांचसात हजार स्वार निगाहदास्त करून कोंडाईबारीचे रुखं जाणार. गाइकवाड माारास रुखसतीचे समई पंतप्रधानानी व बालाजीपंतानी तवाजा केली त्याचा तपसील.

पंतप्रधानाकडील

गोविदराव गांइकवाडास

२ पैठणी सेला व मुडासें
१ जामेवार महमुदी दान थानें
१ किमखाब
१ सिरपेंच मुरसा

१ हाती

गणपतराव कोलटकरास

मुडासें व सेला पैठणी

२

हमराही लोकांस विडे दिधले.

बालाजीपंतानी वस्त्रे दिधली.

गोविंदराव गाइकवाडास

मुडासें व सेला पैठणी जामेवार किमखाब

२ १ १

गणपतराव कोलटकरास सेला व मुंडासे पैठणी

२

सदरहूप्रा वस्त्रे व जवाहर व हाती देऊन रुखसत केले.

———

पैा छ २५ मोहरम गुरुवार.

४

पुरवणी अखबार पुणें छ १८ मोहरम सन ११९६.

मुंबईकराचें पत्र येथील कारपरदाजास आलें व कारपरदाजानी प्रत्योतर लिहून पाठविलें याचा तपशील पूर्वील पत्रीं विस्तारयुक्त लिहिला आहे. येथील कारपरदाज बालाजीपंत व हरीपंतानी व मध्यस्त गोविंदराव कृष्टण यानीं सेवकास अद्यापि स्वमुखें वर्तमान सांगितलें नांहीं. परंतु दरबारी समग्र वकील मंडलींत व इतर लोकांत प्रसिद्ध जाहलें आहे कीं मुबईकराकडून दारमदाराचा पैगाम लागला आहे. सांप्रत सेवकानें कश्चित स्नेहिताचें मुखं यैकिलें कीं मुंबईकराकडील वकील पुण्यास यावयाकरितां पंतप्रधानांचे मोहरी दस्तक येथील कारपरदाजानी मुंबईस पाठविलें आहे. मुंबईहून वकील पुण्यास आल्यानंतर वर्तमान प्रसिद्ध होईल व बहुशा कारपरदाज हुजूरही लिहतील. परंतु इंगरेजासी दारमदार व स्नेह हैदरअलीखानाचे समताविरिक्त सर्वथैव न करावा म्हणोन येथील कारपरदाजानी खान माारासीं करार केला आहे व करारापमाणेंच अमल करतील.

याउपरी जे वर्तमान नवल विशेष होईल ते सवसी लिहीन हे विनती.

A. R. No. 166 २० मोहरम ११९६ हिजरी
५ जानेवारी १७८२

छ २८ माहे मोहरम संन ११९६ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १९ लगायत छ २० मोहरम सन ११९६ हिजरी. पौस्य वद्य शनिवार.

हैदरअलीखानांची पत्रें वकीलास आलीं व त्यानीं येथील कारपरदाजास वर्तमान सांगितलें की जनराल कूट चिनापटणास गेला व बेमाराजपाळें व काळहस्ती वगैरे पाळेगरांची स्थळें हैदरअलीखानानें ताख्ततराज केली व सिकाकोल राजबंदरी प्रांतात फौज पाठवावयाची तजवीज करून आरकाटेहून सिकाकोलचे रस्त्यांत झाडी ज्या स्थलीं आहे ते तोडवावयाचा उद्योग केला आहे व हैदरअलीखानांचे लिहिल्यावरून व खान माराकडून रुपये येण्याची आशा याकरितां फौज बंगाल्यास पाठवावयाची तजवीज कारपरदाजानीं केली आहे व गोविंदराव गाइकवाडास छ १८ माहे माारीं श्रीमंत पंतप्रधानानीं रुखसत केलें, कोंडाईबारीकडें जाणार, यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्याउपरी प्रत्यक्ष वर्तलें व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे.

हैदरअलीखानांकडील विशेष मुबालग्याकरितां व आपले बोलण्याचे परवरसीस्तव येथील कारपरदाजानीं बंगाल्यास फौज पाठवावयाची निश्चय केला आहे हें वर्तमान पूर्वी लिहिलं आहे.

सांप्रत गोविंदराव कृष्टण व हरीपंत यांचे जुबानीं व खारिज तहकीक यैकिलें की भवानी सिवराम याजसमागमें दाहा हजार स्वार देऊन माहदाजी सिंद्यापर्यंत पाठवीत आहेत. भवानी सिवराम व सिंदे एकत्र जाहल्यानंतर सिंदे व चेतसिंग यांचे सलाहमसलतीनुरूप इंगरेजांचे तालुकियांत ताख्ततराज करावयाची तजवीज व बंगाले प्रांतास जावयाचा उद्योग करतील. उदईक छ २१ मोहरमीं भवानी सिवरामानीं डेरे दाखल व्हांवें म्हणोन बाळाजीपंतानीं बहुत अगत्यावादेंकरून सांगितलें परंतु पंत माारनुलेचे घरीं श्रात्धतिथी याकरितां मवकूफ केलें. छ ३० मोहरम माघ शुत्ध द्वितीया व छ ५ सफर माघ शुध सप्तमीस डेरे दाखल होण्याचा निश्चय जाहला आहे म्हणून भवानी सिवराम यांचे जुबानीं यैकिलें.

गोविंदराव गाइकवाडास छ १८ माहे माारीं श्रीमंत पंतप्रधानानी रुखसत केलें व बालाजीपंतानीं बतरीक कर्ज पनास हजार रुपये देऊं केले म्हणोन पूर्वील पत्रीं माार लिहिला आहे. त्यास पनास हजार रुपये बाल्लाजीपंताकडून व आणखीं सावकारापासून चालीसपनास हजार रुपये कर्ज मेळऊन हमराही स्वारास रोजमरे जे राहिले ते दरोबस्त द्यावे व सफरचा सरंजाम

पैाा छ २८ मोहरम.

२

पुरवणी अखबार छ २० मोहरम सन ११९६ हिजरी.

पुण्यांत केल्यानंतर गाइकवाड माार कूच करून जाणार. कर्जाऊ रुपये मिळजोपर्यंत गाइकवाड माराचें कूच होत नांहीं. छ २० माहे माारीं बालाजीपंत हरिपंताचे डेऱ्यास गेले होते. सहा घटका दिवसापासून सात घटका रात्रपर्यंत खिलवत होत होती. लक्ष्मणराव रास्ते बमोजिब तलब गेले होते. सेवेसी श्रुत होय हे विनती.

———

A. R. No. 167 २१ मोहरम ११९६ हिजरी
६ जानेवारी १७८२

पैा छ २८ मोहरम सन ११९६ हिजरी सरकारच्या डांकेबराबर आले.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल छ २१ माहे मोहरम मुा काा पुणं स्वा (का.फा.) कृपावलोकने येथास्थित जाणोन लेखण आज्ञां करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ १९ माहे मजकूर रोज (शु)क्रवारी प्रा:थकाळी विनंतीपत्र सरकार(च्या) डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान राजेश्री गोविंदराव गा(यै)कवाड याची रुकसती जाली. गुजरात प्रांती जातात हे वर्तमान सविस्तर विनंतीपत्री लेखण केले होते त्याजवरून ध्यानास येअील. राजश्री गोविंदराव गायेकवाड यास श्रीमंताचा व कारभाऱ्याचा निरोप जाला. गुजरात प्रांती जातात. येकादो दिवसानी गायेकवाड मजकूर येथून कूच करून जाणार. गायेकवाड मजकूर याची नेमनूक दाहापंधरा हजार फौजेची आहे. परंतु लोकास पैकां नाही म्हणोन नेमल्याप्रमाणे फौज जमली नाही. प्रस्तुत दोनतीन हजार फौज त्याजपासी जमा आहे. प्रस्तुत त्यास निरोप जाला आहे. येथून कूच करून गेल्यास पुढे फौज जमा होणार. लाख रुपये त्यास सरकारातून देविले. लाख दोन लाख रुपयावर त्यानी कारभारी केले आहेत. त्याणी साहुकाराकरून मेलविले. प्रस्तुत लोकास दोन दोन रोजमुरे दिल्हे. पुढे येथून कूच करून गुजरात प्रांती गेल्यास मुलुक वगैरे मारून फौजेचाही खर्च चालवावा व आप(ला)ही खर्च चालवावा यैसे आहे. कारभाऱ्यास संकष्ट होते की कोन्हेही प्रकारे गायेकवाडाची येथून रुकसती करून गुजरात प्रांती पाठवावे. गायेकवाडाचेही मानस होते की सत्वरच येथून रुकसत होऊन गुजरात प्रांती

जाऊन फौजेचे व आपले पोट भरावे. प्रस्तुत गायेकवाडाची रुकसती जाली. याणी गुजरात प्रांती जाऊन सोनगडास पलटने वगैरे आहेत त्याचे पारपत्य करावे. मुलुक ताराज करून पैका मेलवावा व ठाणी वगैरे घ्यावी या अर्थी गायेकवाडाची रवाणगी गुजरात प्रांती जाली. सत्वरच येथून कूच करून जाणार. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. विदित होये. छ २० माहे मजकूर रोज शणवार. राजश्री भवाणी सिवराम यासमागमे फौज देऊन कोंडाईबारीकडे गुजरात प्रांती रवाणां करावे यैसा निश्चये आहे. दुसरी वदंता आहे की भवाणी सिवराम यासमागमे पंधरावीस हजार फौजेची नेमनूक करून हिंदुस्थाण प्रांती पाठवावे यैसी वार्ता घातली आहे. परंतु हिंदुस्थाण प्रांती त्यास पाठवितील तरी वीस हजार फौज पाहिजे, त्यास पैकां पाहिजे. प्रस्तुत पैक्याचीही अनकूलतां थोडी व फौजही यां प्राणे जमा नाही. तेव्हा हिंदुस्थाण प्रांती त्यास पाठवायाची यौजणा कैसी होते? वंदता मात्र आहे. परंतु त्यासमागमे दोनतीन हजार फौज देऊन कोंडाईबारीकडे रवाणां करणार यैसे निश्चयात आहे. मग निश्चये होऊन भवाणी सिवराम यास कोणीकडे रवाणां करतील हे लेखण केले जाईल. शृत होये. होलकर वाफगावास आहेत. त्याचे पुत्राचे लग्न माघ मासी आहे. लग्नास श्रीमंत व कारभारी वगैरे जाणार यैसी वदंता आहे. परंतु श्रीमतास तो कारभारी लग्नास पाठविणार नाहीत. कारभारी वगैर जातील यैसे आहे. शृत होये. नाना हरिपताचे डेऱ्यांस च्यार घटका दिवस शेश राहता गेले होते. उभयेताचा खिलवत जाला. उपरांतिक नाना आपले घरास आले. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की गायेकवाडाचे कूच लवकर करवावे व भवाणी सिवराम वगैर याचीही नेमनूक करून रवाणां करावे व कितिक आपले दौलतीचा बदोबंस्ताविशी या अर्थी खिलवत जाला. विदित होये. राजेश्री कृष्टरावजीकडील पत्रें आली. पत्राचा भाव यैकिल्यात आला कीं माहालात वगैरचा जाबसाल रूबकार आहे या अर्थी रावजीस वरचेवर पत्रे लिहितात व येजमानसाहेबास

कै. म. म. द. वा. पोतदार

कारभारी अर्जिया वगैरे लिहितात. शृत होये. राजश्री बज्याबा पुरंधरे कैदेत आहेत. त्याचे मध्येस्थीत धोडोबा आपां पुरधरे पडले आहेत कीं अडीच लक्ष रुाये घेऊन त्यास मुक्त करावे यैसा निश्चयें जाला आहे हे पूर्वीचे विनंतीपत्री लेखण केले आहे त्याजवरून शृत जाले असेल. त्यास बज्याबापासून अडीच लक्ष रुाये घेऊन मुक्त करावे. धोंडोबा आपानी जामीन व्हावे यैसां निश्चये जाला. अडीच लक्ष रुाये बज्याबापासून मिलतात यैसे नाही. त्यास बज्याबानी पंनास हजार रुाये द्यावे व त्याचे भावानी पंनास हजार रुाये द्यावे. बाकी राहिले दीड लक्ष, त्याची पटी बलवंत आपा व माधव रामचंद्र वगैर ग्रहस्तं बज्याबाचे मायेंत आहेत त्याजपासून घ्यावे याप्रमाणे निश्चये होऊन अडीच लक्ष रुाये घेऊ(न ब)ज्याबास मुक्त करून त्यानी सास(वडास) राहावे यैसे ठरले आहे. मग बज्याबा (म. फा.) ऊन पुन्यास आलिया लेखन केले जाईल. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे (म. फा.)

A. R. No. 168

२४ मोहरम ११९६ हिजरी
९ जानेवारी १७८२

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ताा छ २४ मोहरम पौष्य वद्य दशमी सौम्यवासरपर्यंत मोा पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष पूर्वी छ २१ माहे माारीं हुजूर अर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र चिरंजीवांचे नांवचे लिफाफ्यासहित पाठविलें तें दारोग्याचे विद्यमानें हुजूर गुजरून स्वामीस पावलें असेल. सांप्रतचें वर्तमान छ माारपर्यंत हुजूर व स्वामीचे सेवेसी पृथक पत्रीं लिहून डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें हुजूर गुजरतील व

स्वामीचे सेवेसी प्रविष्ट होओील. मुंबईकर जनरालाचें पत्र कारपरदाजांस आले व यांचें तरफेनें प्रत्योतर गेलें. कसरेकम महिना जाहला. कृष्टणराव बलाळांचे पुत्र गोविंदराव कृष्टण यानीं छ २३ माहे माारीं सेवकास बोलाऊन नेलें व सांगितलें कीं मुंबईकराचें पत्र कारपरदाजास आलें होतें कीं वकील पाठऊन देतों.त्यावरून कारपरदाजानीं प्रत्योतर पाठविलें की पाठऊन देणें, याप्रमाणें बालाजीपंतनानानीं आम्हांस काल म्हणजे छ २२ सोमवारीं सांगितलें, यास्तव तुम्हास म्हणजे सेवकास सांगतों. तुम्हीं हुजूर लिहिणें व आपण कृष्टणरावजीस लिहितों याप्रमाणें प्रतरणा करून सांगितलें. सेवकानें गोविंदराव यांसीं कांहीं विवाद केला नांहीं. हुजूर लिहितों म्हणोन उतर केलें. त्यास गोविंदराव कृष्टण आरंभापासून शरीक मसलहत आहेत व कृष्टणरावजीसहीं वर्तमान लिहिलें आसेल. त्यानंतर कृष्टणरावजीनीं हुजूर अर्ज केला किंवा केला नांहीं याची इतिला सेवकास नांहीं व इप्तदायपासून कचें वर्तमान ज्या तऱ्हेनें यैकतों त्याप्रमाणें हुजूर व स्वामीचे सेवेसी लिहीत आहें. या वर्तमानाची गौप्यता करावयाचें प्रयोजन कांहीं दिसत नांहीं. परंतु फार राजदारी केली याचें कारण पर्यायेंकरून जें वर्तमान सेवकास विदित होईल तें लिहीन. मुंबईहून वकील रवाना जाहला व पुण्यास येतो. त्याचे द्रिष्टीस कारपरदाजांचा बंदोबस्त व तळेगांवापासून

२

श्रीनिवास

पुरवणी पत्र श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

पुण्यापर्यंत मकानोमकान फौजेसहित सरदार उतरले आहेत हें दिसावयाकरितां सखाराम पानसे वगैरे कूच करून गेले. भवानी सिवरामास बंगाल्याचे मोहिमेकरितां माहदाजी सिंद्यासमीप पाठवितों म्हणोन नूरमाखान व नरसिंगराव वकील नि।। हैदरअलीखान

यांस कारपरदाजानीं सांगितलें व खान माारास लिहून पाठविलें आहे व पांचसात दिवसांत भवानी सिवराम डेरे दाखल होणार म्हणून चर्चा. परंतु भवानी सिवरामासमागमें फौज व सरदार कोणते द्यावे याची तजवीज व भवानीपंताचे जातीचे हजारपांचसे स्वार याची निगाहदास्त अद्यापि नांहीं. यावरून दिसतें जे इंगरेजांवर दाब विशेष पडावा म्हणोन भवानी सिवरामाचे रवानगीची तजवीज करून हैदरअलीखानास लिहून पाठविलें व वर्तमान सर्वत्र प्रसिद्ध जाहलें आहे. सारांश, नकशाप्रमाणें इंगरेजांची तंबी हुजूर मंजूर होत नांहीं व चौथाईचे तहाकरितां कसिस बहुत होत आहे यास्तव येथील कारपरदाजानीं इंगरेजाकडील वकीलास बोलाविलें व दारमदारविषईं परस्परें बोलणार. मुंबईकर वकील पुण्यांस आल्यानंतर जे वर्तमान सेवकास कळेल तें हुजूर व स्वामीचे सेवेसी विनती लिहीन. बहुत काय लिहिणें हे विनंती.

———

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २१ मोहरम लगायत छ २४ माहे माार सन ११९६ हिजरी पौष्य बुधवार.

हैदरअलीखान याचे सूचनेनुरूप बंगाल्याचे मोहिमेकरितां भवानी सिवराम यांस दाहा हजार फौजेनसीं माहदाजी सिंद्यासमीप पाठऊन द्यावयाची तजवीज कारपरदाजानीं केली आहे व माघ शुध द्वितीया, छ ३० माहे माारीं किंवा छ ५ सफरी भवानी सिवरामानीं डेरे दाखल होण्याविषईं मुहूर्त नेमिला आहे व गोविंदराव गाइकवाडास येथील कारपरदाजानीं रुखसत केलें परंतु रुपयाची सरजामी कारपरदाजाकडून जाहली नांहीं व सावकार कोण्हीं कर्ज देत नांहीं याकरितां गाइकवाड माार अद्यापि पुण्यासमीप दोन कोसी आहे यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्याउपरी

प्रत्यक्ष वर्तलें व यैकिलें वर्तमान दफेवार स्वामीचे सेवेसी व हुजूर लिहिलं असे.

छ २२ माहे माारीं बालाजीपंत हरीपंतांचे डेऱ्यास गेले होते. त्रितीय प्रहरापासून साहा घटका रात्रपर्यंत उभयतां खिलवतेंत होते. गोविंदराव कृष्टण व विसाजी आपाजी नि।। हरीपंत कांहीं माार बोलण्याचे संधींत उभयतां कारपरदाजासीं शरीक मसलहत होते. सातवें घटके रात्रीस बालाजीपंत आपले हवेलीस आले.

छ २१ माहे माारीं सखाराम पानसे व भवानजी भोंसले व गंगाधरराव रास्ते यानीं व प्रतिनिधीकडील फौजेंचे कूच होऊन पुण्याहून पांचसात कोसी तळेगांवाचे रुखें जाऊन उतरलें. सखाराम पानसे चिंचवडाहून कोसभर केवळ्यासमीप पवना नदीचे कांठीं व रास्ते चिखलीसमीप व प्रतिनिधीची फौज इंद्रायणी नदीवर तळेगांवीहून आलीकडें दोन कासावर येणेंप्रमाणें जाऊन उतरले.

छ २३ माहे माारीं हरीपंतानी गारपीरापासून कूच करून मुळा व मुठा नदीचा संगम जाहला आहे त्या दोन्ही नद्याचे मध्यें पुण्याहून पाव कोसाचे तफावतीनें हरकत मकान करून उतरले.

पागा व सिलेदार वगैरे स्वार व प्यादे पुण्याचे गिर्दनवाह व पुण्यांत जे लोक आहेत त्यास बालाजीपंतानीं ताकीद केली आहे कीं हरीपंतासमीप जाऊन उतरणें.

२

पुरवणी आखबार छ २४ मोहरम सन ११९६ हिजरी.

मुंबईकर जनरालाचें पत्र पंतप्रधानांस वकील पाठऊन देतों म्हणोन आलें होते. त्याचे उतर पंतप्रधानाचे तरफेनें कारपरदाजानीं पाठऊन दिधलें कीं हैदरआलीखानाकडील व आम्हाकडील ज्वाबसाल करणें आसलियां लिहून पाठवणें म्हणजे वकील येण्याविषईं दस्तक

पाठऊन देऊं त्याप्रमाणें वकीलास पाठऊन देणें हा माार पूर्वील पत्रीं लिहिला आहे. सांप्रत अजी छ माारीं मातबर श्नेहिताचे मुखें यैकिलें कीं वकील येण्याविषईं कारपरदाजानीं दस्तक पाठविलें होतें त्यावरून मुंबईकरांचे तरफेचा वकील बोरघांटाखालें मौजे खोंपवलीस आला म्हणोन येथील कारपरदाजांस वर्तमान छ २१ माहे माारीं आलें. सत्वरच पुण्यास येणार. समागमें बार वगैरे पांचसातसें लोक आहेत म्हणोन यैकिलें. याउपरी कारपरदाजास विचारून त्याचे जुबानीचा इजहार सेवेसी सूचना लिहीन.

चेतसिंग कासीकर जमीदाराचा वकील येरंडोल खानदेशांत आला व आजारी जाहला याकरितां येरंडोलेंत कांहीं दिवस राहिला आहे म्हणोन पूर्वील पत्री लिहिलें आहे. सांप्रत छ २४ माहे माारीं चेतसिंगाकडील वकील पुण्यांस आला. मंगळवार पेठेंत उतरला आहे. निकाहत अद्यापि आहे सबब म्याना व दोन घोडीं व उंट वगैरे सरजाम समागमें आहे.

सटवाजी भोंसले व बाजीराव बरवे रघुनाथरायांपासून अलाहिदा होऊन आलीमोहनचे सरहदेंत गेले. तेथोन सटवाजी भोसल्या बाजीराव बरव्यापासून अलाहिदा जाहला व त्या प्रांतात धामधूम करितो व बाजीराव बरवे महेश्वरास अहिल्याबाई होलकरसमीप गेले व कांहीं फंदफितूर करीत नांहीं, तुमचे आसऱ्यास राहतों याप्रमाणें करार करून समागमीचे लोक तमाम बरतरफ केले व जातीनें येकला महेश्वरीं राहिला आहे म्हणोन अहिल्याबाईनीं येथील कारपरदाजांस वर्तमान लिहून पाठविलें याप्रकारें गोविंदराव कृष्टण यांचे जुबानीं यैकिलें. खारिज वदंता आहे कीं सटवाजी भोंसले व बाजीराव बरवे उभयतांस अहिल्याबाईनें तशफी करून आपल्यासमीप ठेविलें आहे.

याउपरी जें वर्तमान यैकिल्यांत येईल तें सेवेसी लिहीन हे विनती.

———

A. R. No. 169

२४ मोहरम ११९६ हिजरी
९ जानेवारी १७८२

श्रीशंकर

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ (२४) माहे मोहरम मुा काा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून स्वानंद लेखण आज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेषे येथील वर्तमान छ २१ माहे मजकूर रोज रविवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान तिसरे प्रहरी राजेश्री नाना हरिपंताचे डेऱ्यास गेले होते. हरिपंताचा व नानाचा खिलवत जाला. उपरांतिक नाना आपले घरास आले. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की गायेकवाड याची रुकसती जाली. त्याची काहीयेक खर्चावेंचाची सोये करून वाटेस लावावे. दुसरे, कृष्टणरावजीकडे पत्रें लिहिणार व येजमानसाहेबांसही आर्जियां लिहिणार या अर्थी खिलवत जाला. शृत होये. गायेकवाडाची रुकसती गुजरात प्रांती जाली हे वर्तमान पूर्वी येकदोन विनंतीपत्री लेखण केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. गायेकवाड मजकूर याजवल दोन हजार फौज जमली होती. येथून कूच करून गेल्यावर गंगेपावेतो दाहाबारा हजार फौज जमा व्हावीं यैसा नेम आहे. त्यास गायेकवाड मजकूर याणी आत कोसाचे कूच केले. लोकास खर्चावयाची सोये नाही म्हणून फौजे लोक तळावरच राहिले. सातसे आठसे लोक त्याचेसमागमे मात्र मुकामापावेतो गेले. बाकी लोक तळावरच राहिले. कारण कीं लोकाचे पैक्याची सोये नाही. पैक्याची सोये जाल्यास गोविंदराव गायेकवाडापासी फौज जमेल यैसे आहे. येविशी गायेकवाडांकडील कारभारी नानासी व हरिपंतासी रदबदली करितात कीं खर्चाची सोये केल्यास आमचे जाणे होईल. नाहीतरी कलतच आहे. अशानसी सरकारातून लाख पऊन लाख रुपये देतील. परंतु प्रस्तुत

थोडे तऱ्ही दाहापंधरा लक्ष रुपये पाहिजेत तेव्हां गायेकवाड मजकूर याचे फौजेची सचरणी होईल तेव्हां कोंडाईबारीपावेतो हे पोहचतील यैसे आहे. प्रस्तुत गायेकवाडाची रवाणगी जाली आहे. येथून दोनतीन कोसावर हजारा रावतानसी मुकाम करून आहेत. सोये जाल्यास पुढे कोडाईबारीकडे जातील. नाहीतरी त्याचा गाव दावडी आहे तेथे जाऊन मुकाम करतील. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. विदित होये. छ २२ माहे मजकूर रोज सोमवार. करनेल गाडर इंग्रज तो ममईस आहे. पांचच्यार पलटने कल्यानी व विठलवाडी वगैरेवर आहेत. प्रस्तुत वर्तमान आहे की विठलवाडीहून दोन पलटने तीन कोस पुढे बदलापुरावर आली. पुढे ते घाटाकडे येतात किंवा कोणीकडे जातात हे पाहावे. परंतु वदंता आहे की दोन पलटने पुढे आली याआर्थी पाणसे वगैरे येथून साहासातां कोसावर आहेत तेही बोरघाटाकडे जाणार आणि काही किरकोल पतके येथून रवाणां करणार. दुसरे, हरिपंतही तळ ढाळून नदीपार संगमावर मुकाम करणार यैसे आहे. मागती इंग्रजाकडील वर्तमान आलियां लेखण केले जाईल. शृत होये. गणेशपंत बेहरे वगैरे पांचच्यार हजार फौजेनसी कोंडाईबारीवर आहेत व इंग्रजाची पलटने व फतेसिंग गायेकवाडाकडील हजार दोन हजार स्वार व सटोजी भोसले व बाजीराव बर्वे वगैरे फौज सोनगडास आहे ते पुढे चाल करून कोंडाईबारीकडे येनार. त्याजवरून येथून काही किरकोल पतकेही गनेशपंताकडे रवाना करितात व गोविंदराव गायेकवाडाचीही रवाणगी जाली आहे. परंतु याचे जाणे दीर्घसूत्रावर आहे. सोनगडावर पलटने आहेत ते पुढे चाल करून येणार यैसे वर्तमान आहे. मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. छ २३ माहे मजकूर रोज मंगलवार. राजश्री हरिपंत गारपीरावर पुण्याबाहेर मुकाम करून होते तेथून तळ ढाळून पुण्याचे नदीपार संगमावर मुकाम करून राहिले. रुख तळेगावचां दिल्हा आहे. तळ ढाळावयाचे कारण कीं त्याच जागेवर मुकाम फार जाले. दुसरे, इंग्रजाचेही वर्तमान आहे की दोन पलटने बदलापुरावर आली. त्याजवर शह पडावां या अर्थी हरिपंत

तळ ढाळून संगमावर आले. पाव कोसाचे कूच केले. उगाच तळ ढालला. प्रस्तुत हरिपंत पुण्याबाहेर संगमावर मुकाम करून आहेत. हरिपंताजवळ फौज दोनतीन हजार कसर कम आहे. रास्तियाची फौज दोनअडीच हजार येथून पांचच्यार कोसावर आहे. शृत होये. प्रस्तुत इंग्रज घाटाकडे येऊन उपद्रव करितात यैसा प्रकार नाही. कारण कीं मुलखगिरीचे दिवस थोडके. यां अर्थी ते उद्योग करून येणार नाहीत. परंतु आवयां मात्र आहेत. मागती तिकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. नाना फडनीस घाडगे म्हणोन सरदार आहेत त्याचे येथे बहुमानास गेले होते. घटकाभर बसून मागती आपल्या वाड्यास आले. विदित होये. राजेश्री भवाणी सिवराम याची रवाणगी हिंदुस्थाण प्रांती सिंद्याकडे करावी यैसा निश्चये आहे. दुसरां निश्चये आहे की गुजरात प्रांती कोंडाईबारीकडे पाठवावे, यैसे दोन निश्चये आहेत. हिंदुस्थाण प्रांती पाठवितील तरी मातबर फौजेची सचणी करून दिल्हयास जातील. परंतु दोनतीन हजार फौज देऊन भवाणी सिवरामास कोंडाईबारीकडे पाठवितील. मग काये निश्चये करून कोन्हीकडे त्याची रवाणगी करितील हे लेखण केले जाईल. शृत होये. छ २४ माहे मजकूर रोज बुधवार. सिंदे हिंदुस्थाण प्रांती आहेत. तिकडील राजेरजवाडे त्यास मिलाले आहेत. त्या प्रांताचा बंदोबस्त करितात यैसे वर्तमान आहे. शृत होये. राजश्री रंगराव वोढेकर पाचच्यारसे रावतानसी आज येथे आले. हरिपंताचे जवल येऊन उतरले आहेत. विदित होये. होलकराचे मुलाचे लग्न माघ मासी आहे म्हणोन होलकर मजकूर वाफगावास मुकाम करून आहेत. शृत होये. हैदर नायेकाकडील वकील कारभाऱ्याकडे आले होते. कारभाऱ्यासी व वकीलासी खिलवत जाला. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला की नाईक मजकुरास पत्रे लिहिनार. शृत होये. कासीच्या राज्याकडील वकील येथे येतो. खाणदेशात आला. त्यास समाधान वाटत नवते म्हणोन त्यास आणावयास येथून कारकून पाठविला होतां हे पूर्वी लेखण केले होते. त्यास वकील मजकूर राज्याकडील आज येथे आले. पुढे वकीलासी व कारभाऱ्यासी

भेट होऊन काये जे वर्तमान असेल हे ध्यानास आणून लेखण केले जाईल. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 170

२७ मोहरम ११९६ हिजरी
१२ जानेवारी १७८२

पैाा छ ४ सफर सन ११९६ हिजरी मये दारोगे हरकारे.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ २५ मोहरम लगायत छ २७ माहे माार दोन प्रहर दिवस सन ११९६ हिजरी.

मुंबईकर जनरालाचे तरफेनें वकील मौजे खोंपवलीस घांटाखालें आला म्हणोन वर्तमान आलें. रास्ते व प्रतिनिधि वगैरेची फौज तळेगांवांचे रुखें गेली व हरिपंतानी गारपीरापासून हरकत करून मुळा व मुठा नदीचे संगमासमीप जाऊन उतरले व चेतसिंग कासीकर जमीदाराचा वकील येरंडोळासमीप होता तो पुण्यास आला याविंतरिक्त अन्यत्र वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान दफेवार लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल.

मुंबईकर इंगरेजाकडील वकील पुण्यास येणार त्याचे बातनीकरितां सेवकाकडील तैनाती हरकारे गेले आहेत त्यापैकीं काल छ २६ माहे माारीं हरकारे खबर घेऊन आले. त्यांचे जुबानीची खबर इंगरेजांकडील वकील मौजे खोंपवलीस च्यारपांचसे बार व अवांतर माणसे पांचसें येकून हजार जमियेतसुधां आला. घांटतोडीं दोन तीनसे प्यादे पंतप्रधानाकडील चौकीस आहेत त्यानीं अटकाव केला कीं बालाजीपंत फडनीसांची परवानगी येईल त्याप्रमाणें जमीयत

हमराह घेऊन येणे. त्यावरून मुंबईकर वकीलासमागमें बालाजी-पंताकडील वकील आहे त्याचें पत्र पंत माारनुलेस आलें कीं मुंबईकर वकीलानी कितेक जमीयतेनसीं घांटावर व पुण्यास यांवें. त्यांचे प्रत्योतर गेले कीं दोनसे लोकानसीं यांवें. त्याप्रमाणें छ २५ माहे माारी मौजे खंडाळ्यास घांटावर इंगरेजाकडील वकील आला. छ २६ माहे माारीं मौजे वडगांव, तळेगांवीहून दोन कास, पुढें पुण्याहून बारा कोस ते स्थळीं वकीलाचा मुकाम जाहला. आजी छ माारीं मौजे चिंचवडासमीप येणार म्हणोन यैकिलें. वडगांवासमीप गंगाधरराव रास्ते व प्रतिनिधि व होळकराकडील मिळोन तीन हजार फौज आहे. याचप्रमाणें तीनच्यार कोसाचे फासल्याने पुण्यापर्यंत हजार दोन हजार फौजेचे सरदार ठेविले आहेत. राजश्री हरीपंतासमीप च्यार हजारपर्यंत लाहान मोठीं घोडीं व मुसा नारंज व मुसा मोतरम वगैरे फरासीस हजारबारासे बार व पनाससाठपर्यंत गोरेसुधां लष्करांत आहेत. बाणाच्या कैच्या पंचेवीस व तोफा पंधरा जरब यावितरिक्त जगी सरजामासुधां जलुसी लष्कर उतरविलें आहे. डेरे दांडे दुचंद सरजाम उभा केला आहे.

२

पुरवणी अखबार छ २७ मोहरम सन ११९६ हिजरी.

मुंबईकर वकीलाचें नांवें करनल इष्टन* म्हणोन यैकिलें. पुन्हां तहकीक करून लिहून पाठऊं. वकीलासमागमें सरंजाम दोनसे बारचे जवान व पंचेवीस तुरक स्वार व साहा पालखीनिसीन इंगरेज व दोन हाथी, पैकी येकावर हौदा व येक खेमे वगैरे बारबरदारीचा व शागिर्दपेशा व कामाठी वगैरे दोनसे माणसें येणेप्रमाणें सरंजाम आहे म्हणून यैकिलें.

छ २९ माहे माार माघ शुध प्रतिपदेस मुंबईकर इंगरेजांकडील

*हा मुंबईकडचा वकील म्हणजे कर्नल वादर्स्टन. अखबारनवीसानीं याच्या नांवाचा तऱ्हेवाईक अपभ्रंश केलेला आहे. पुढील अखबारांतून याच्या नांवाचे 'इष्टन' 'दीष्टण' 'उदेष्टण' इत्यादी प्रकार आढळतात.

वकील पुण्यास येणार व छ माारींच येथील कारपरदाजांची भेट घेणार म्हणोन यैकिलें आहे.

वकीलास पुण्यापर्यंत आणावयाकरितां येथील कारभाऱ्यांचे सूचनेनुरूप आजी छ माारीं राजश्री माधवराव सदासिव पुण्याहून चिंचवडास गेले. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैाा छ ४ सफर सन ११९६ हिजरी मये दारोगे हरकारे.

श्रीनिवास

विनंती जे वोढेकर खंडेराव त्र्यंबक पांचसे स्वारानसी छ २४ माहे माारीं पुण्यास आले. छ २९ माहे माारीं पंतप्रधान व कारभाऱ्याची भेट घेणार हे विनती.

पैाा छ ४ सफर सन ११९६ हिजरी मये दारोगे हरकारे.

A. R. No. 171

२७ मोहरम ११९६ हिजरी
१२ जानेवारी १७८२

पौा छ ४ सफर सन ११९६ हिजरी मये दारोगे हरकारे.

श्री

विनती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २७ माहे मोहरम मुाा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २५ माहे मजकूर रोज गुरुवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी प्राा केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान इंग्रजाची पलटणे दोनतीन आली व पुढे ते बोरघाटाकडे येणार यैसे वर्तमान होते त्याजवरून सेवेसी लेखन केले होते. दों प्रहरा येथे वर्तमान आले कीं इंग्रजाकडील वकील येथे येतो. त्याजवरून याणीहीं येथून जासूदजोडचा वगैरे बोरघाटाकडे पाठविले कीं कितीक जमावनसी येतो यैसी बातनी

घेऊन येणे. संध्याकाली मागती वर्तमान आले कीं वकील मजकूर बोरघाट चढूंन खंडाल्यावर मुकामास आला. वकीलासमागमे दोनसे तुरक स्वार व हजारयेक मनुष्य होते. या जमावनसी येत होते. श्रीमंताकडील फौजा व माणसे घाटावर होती. त्यानी वकीलास सागून पाठविले कीं इतक्या जमावनसी यावे यैसी आज्ञा नांही. तीन च्यारसे मनुष्यानसी वरते यावे यैसी आज्ञा आहे. त्याजवरून इंग्रजाकडील वकील तीनच्यारसे मनुष्ये व तीसचालीस तुरक स्वार व दोन हाती या जमावनसी घाट चढून खंडाल्यास मुकामास आले. येथून दोनसे स्वार व येक कारकून वकीलास आणावयास गेले. उदईक वकीलाचा मुकाम तलेगांवापुढे दोन कोस वडगांवास आहे. येथून वडगांव दाहाआकरा कोस आहे. वकील मजकूर ममईवाल्याकडून येतो. पूर्वीही येकदोन पत्रे ममईवाल्याकडून येथे या संधानाची आली होती. त्याजवरून यांचेही उतरे गेली कीं वकील जाबसालास येऊ द्यावा. त्याजवरून ममईवाल्यानी वकीलाची रवानगी करून पाठविला. वकील मजकूर येथून दाहाअकरा कोसावर आले. घाटांहून खाले साहासाता कोसावर बदलापुरास त्यांची दोनतीन पलटणे आहेत. वकील मजकूर येथे येका दो दिवसानी दाखल होणार. वकील मजकूर येथें यावयाचे कारण कीं ममईवाल्याचे चितात कीं कोणेही प्रकारे दारमदार होऊन सलुक व्हावा, वसई वगैरे स्थले यांची यांस द्यावी व दादासाहेबाचाही येखादा दारमदार करावा. दुसरे, ममई वगैरे बंदराचे माल बंद पडले आहेत त्याची मोकलीक व्हावी. दारमदार होऊन सलुक व्हावा याअन्वये वकील इंग्रजाकडील येथे येतात. येका दो दिवसानी येथे येऊन दाखल होणार. दाखल होऊन कारभारियाच्या व वकीलाच्या भेटी होऊन काये जे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. वकीलाच्या भेटी बाहेरच व्हाव्या म्हणोन नानानीही आपला डेरा हरीपंताच्या लस्करांत उभा केला. भेटी बाहेर डेऱ्यासच होणार. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैरे कामकाज जाले. विदित होये. छ २६ रोज शुक्रवार, शंक्रमणाचा दिवस म्हणोन श्रीमंतानी व कारभारियाणी

दरबार वगैरे केला होता. तमाम मुछदी व कारभारी व सरदार व सिलेदार वगैरे लोकानी श्रीमंतास तील दिल्हे. या प्रो तीलाचा समारंभ जाला. श्रुत होये. इंग्रजाकडील वकील घाट चढून खंडाल्यास होते. तेथून कूच करून वडगावास आलेत येका दो दिवसा येंथे येऊन दाखल होणार. वकीलास आणावयास उदईक राजश्री माधवराव सदासिव जाणार. वकीलासमागमे दोनसे गाडदी व सातआठ गोरे पालखीनसीन व दोनसे मनुष्य शागीर्दपेशा वगैरे व दोन हाती व तीस च्यालीसेक तुरक स्वार इतका जमाव आहे म्हणोन वर्तमान आहे. सोमवारी वकीलाच्या भेटी होणार. वकील मजकूर येथे आल्यावर भेटी होऊन वर्तमान लेखन केले जाईल. वकील मजकूर येथे येतात म्हणोन हरीपंत वगैरे आपले फौजेची खबरदारी करितात व तोफा वगैरे लस्करात नेऊन ठेवल्या. जागा जागा लोक होते त्यासही जवल आणविले. घाटाचे बंदोबस्तास प्रतिनिधिकडील व रास्त्याकडील व पानशाकडील वगैरे पांच्यार हजार फौज आहे ते घाटाच्याच रखवालीस आहे. श्रुत होये. कासीचे राज्याकडील वकील येथे आला हे पूर्वी विनंतीपत्री लेखन केले त्याजवरून ध्यानास आले असेल. वकीलाची भेट उदईक शनवारी होणार. राज्याकडील वकील येथे यावयाचे कारण यैकिल्यांत आले कीं कासीचा राजा सिंद्यास येऊन भेटला. त्यानी सिंद्यासी पैगाम केला कीं वीस लक्ष रुपये घ्यावे व इंग्रजाचे पारपत्य करून कासीचे ठाणे आमचे आम्हांस इंग्रजापासून घेऊन द्यावे. प्रस्तुत इंग्रजासी व सिंद्यासी दारमदार जाला आहे. त्यासी हे गोष्ट कैसी घडते ? सिंद्यानी राज्याचे मनोगत धरून राज्यासी जाबसाल केला की पाऊण क्रोड रुाये दिल्हचास तुमचे साहित्य आम्ही करूं. हे राज्यास मान्ये न होता येथे वकील पाठविला कीं वीस लक्ष रुाये घेऊन आमचे साहित्य करून फौजेची नेमणूक करून पाठवावी. प्रस्तुत राज्याकडील वकील येथे आला आहे. कारभारी याच्या भेटी होऊन काये जे ठरल ते पाहावे. भवानी सिवराम यांची रवानगी हिंदुस्थान प्रांती करावी यैसी यौजना आहे. मग राज्याच्या साहित्यास त्याची रवानगी करितात किंवा काये निश्चये करितात हे

मागाहून लेखन केले जाईल. परंतु कासीचे राज्याचे वकीलासमागमे वीस लक्ष रुोयाच्या हुंड्या आहेत म्हणौन वदंता आहे. श्रुत होये. सिंद्याचे वर्तमान आहे कीं कालपीस आहे. तिकडील राजे वगैर त्यास भेटले. तिकडील मुलकाचा बंदोबस्त करितात यैसे वर्तमान आहे. शृत होये. छ २७ रोज शनवार इग्रजाचे वकीलाचा मुकाम चिचवडचा आहे. त्यास अनावयास माधवराव सदासिव जातात. सोमवारी वकीलाच्या भेटी होनार. शृत होये. राजश्री नाना हरिपंताचे डेऱ्यास गेले आहेत. खलवत वगैर होऊन मागती घरास येनार. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 172

२९ मोहरम ११९६ हिजरी
१४ जानेवारी १७८२

पैा छ ६ सफर सन ११९६ हिजरी इंदुवासर सांइंकाल मये दारोगे हरकारे.

श्रीनिवास १।४

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ता छ २९ मोहरम माघ शुध प्रतिपदा इंदुवासरपर्यंत मो पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष यापूर्वी छ २७ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी डांकेवर पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. त्यानंतर छ माारीं मुंबईकर इंगरेजांकडील वकील दीष्टण पुण्याहून अद कोस बागांत येऊन उतरला व बालाजीपंतांचे डेऱ्यास येऊन भेट घेतली याचा तपसील अखबारच बंदांत लिहिला आहे त्यावरून सेवेसी व हुजूर श्रुत होईल. हुजूर अर्जी व अखबार पाठविली ते व स्वामीचे

सेवेसी पत्र दारोग्याचे विद्यमानें पावले. इंगरेजांचे भेटीचे समारंभात सर्वत्रास कारपरदाजानीं बोलाविलें होतें. सेवकासहीं येणे म्हणोन चोपदार आला होता. सेवकाची प्रकृतीं स्वस्थत नव्हती याकरितां चिरजीव केशवराव यांस पाठविलें होतें. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पैा छ ६ सफर सन ११९६ हिजरी मये दांरोगे हरकारे इंदुवारी साइंकाळी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ २८ मोहरम लगायत छ २९ माहे माार सन ११९६ हिजरी माघ मास सोमवार.

मुंबईकर इंगरेजांचे तरफेचा वकील वडगांवास आला व छ २८ तारखेस चिंचवडास येणार व येथील कारपरदाजानीं माधवराव सदासिव यांस छ २७ माहे माारीं वकील माराकडें रवाना केलें म्हणोन अखबार हुजूर व स्वामीचे सेवेसी पत्र लिहून डांकेवर रवाना केले तें पाऊन वर्तमान कळलें असेल. त्याउपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें आहे.

छ २७ माहे माारीं वडगांवीहून चिंचवडचे मुकामास मुंबईकराचा वकील दीष्टंन येणार याकरितां येथील कारपरदाजानीं माधवराव सदासिव यांस रवाना केलें. माारनुले पुण्याहून तीन कोस मौजे आंउदपर्यंत गेले. तेथें वर्तमान यैकिलें कीं रास्ते व होळकरांकडील सरदारानीं वकीलास कूच करून जाण्याविषईं मना केलें कीं बालाजीपंताकडील परवानगी आणविली आहे, आल्यानंतर जाणें. दोन प्रहर दिवसानंतर बाळाजीपंताकडील सुतरस्वार जाऊन पोंहचला. त्यानंतर वडगावीहून कूच करून जाण्याविषईं परवानगी दिधली. परंतु वकील माारानीं मुकाम केला. याप्रकारें वर्तमान यैकिल्यानंतर माधवराव सदासिव माघारा पुण्यांस आले.

छ २८ माहे माारीं दीष्टन, मुंबईकरांचा वकील, वडगावीहून कूच करून मौजे आंउंद येथें मुळा नदीचे कांठीं पुण्याहून तीन कोसी येऊन मुकाम केला. बालाजीपंताचे तरफेचा वकील हरीपंत नामे दीष्टणासमागमें आहे. त्यास बालाजीपंतानीं सांगोन पाठविलें कीं उदईक माधवराव सदासिव दीष्टण वकीलाकडें येतील. त्यानंतर वकील माारास भेटीस घेऊन येणें.

छ २९ माहे माारीं चवदा घटका दिवसानंतर माधवराव सदासव दीष्टण वकीलाचे डेऱ्यास मौजे आउंद येथे गेले. समागमें हाती अंबारीसहित व शंभर बारचे जवान कारपरदाजानी दिल्हे. त्यानंतर बालाजीपंत फडनीस आपले हवेलीहून स्वार होऊन हरीपंताचे लश्करांत डेरे दिधले होते तेथें गेले. लक्ष्मणराव रास्ते व कृष्टणराव बळवंत वगैरे लाहान मोठे तमाम सरदार व नूरमाखान व नरसिंगराव व मुधोजी भोंसल्याकडील वकील व सेवकासहीं बालाजीपंतानी बोलाविलें होतें त्याप्रमाणें सर्वत्र समाज डेऱ्यांत हाजर होता. बख्तरपोष वगैरे शंभर आसामी डेऱ्यांत बसविले होते व लश्करापासून येक कोसपर्यंत

———

पैाा छ ६ सफर सन ११९६ हिजरी इंदुवार सांइकाल मये दारोगे.

२

पुरवणी आखबार छ २९ मोहरम सन ११९६ हिजरी.

दुरस्ता स्वार उभे केले होते. त्याउपरी च्यार घटका दिवस बाकी राहिला त्यासमईं दीष्टण वगैरे पांच असामी इंगरेज पालखीनिसीन व दीडसें बारचे ज्वान व पनास स्वार कंदारी तुरक स्वार बालाजीपंताचे डेऱ्यास आले व पांच आसामी व शागिर्दपेश्याचे लोक सातआठ येणेप्रमाणें डेऱ्यांत येऊन माधवराव सदासिवाचे विद्यमानें वीस असामीस भेटले. त्याउपरी हरीपंत व बालाजीपंत उभयतां

भेटले. पाव घटका डेऱ्यांत बसले. त्यानंतर बालाजीपंत व हरीपंत खिलवतेचे डेऱ्यांत गेले. माधवराव सदासिव व दीष्टण वगैरे वकील व पंतप्रधानाकडील मातबर सरदार व मातबर मुतसदी व उमद्याकडील वकील बमोजिब तलब खिलवतेचे डेऱ्यांत गेले. दोन घटकापर्यंत निशस्त जाहली. दीष्टण माार फारसीख्वान व फारसीगो आहे व दुभासी सेणवी आहे. कारपरदाजाचे तरफेनं माधवराव सदासिव फारसी जुबानें करून कुशल वर्तमान व मुंबईहून निघोन किती दिवस जाहले व गाडर व जनरालाचें वर्तमान विचारिलें. दिष्टणानें फारसीनें उतर केलें. त्याउपरी अतरपानदान देऊन दिष्टण वगैरेस रुखसत केलें. ते समई तुरक स्वारांपैकीं तीन आसामी मातबर होते त्यांस डेऱ्यांत बोलाऊन बालाजीपंताकडून विडे देविले. तुरक स्वारानी नजर धरली होती ते बालाजीपंतानीं कबूल केली नांहीं. त्यानंतर दीष्टण माार स्वार होऊन अद कोसचे फासल्यानें बागांत डेरे देविले तेथें जाऊन उतरले. वकील माार बालाजीपंताचे डेऱ्यांत आले ते समई पांचा इस्मानी टोप्या काहडल्या होत्या. ते रुखसत घेऊन डेऱ्याबाहेर गेले ते समई टोप्या घातल्या. कारपरदाजानी खुष्क व तर मेवेजात व मिठाई वकीलाचे डेऱ्यास पाठऊन दिधली. हरीपंताचे लश्कराचे आघाडीपासून बाणअंदाज दीष्टण वकील उतरला आहे व लश्करचे आघाडीस तोपखाना व मुसा नारज व मुसा मोतरम हजारबारासे बारचे जवानासहित उतरले आहेत. बालाजीपंतानी तमाम लोकांस रुखसत करून च्यार घटका रात्रीस आपले हवेलीस आले.

कासीकर चेतसिंग जमीदाराचा वकील नारोपंत नामे छ माारीं बालाजीपंतास भेटला. जमीदार माराकडून पारचे वगैरे जिनस पंतप्रधानाकरितां आणिले आहे तें बालाजीपंतास दाखविले व पंत माारास वस्त्रें जमीदार माराकडील दिधलीं. शालजोडी व चिरा व बंगा–

३

पुरवणी आखबार छ २९ मोहरम सन ११९६ हिजरी.

ली ज्यामेवार सफेद दोन थानें व कासीचा दुपटा बादली व पितांबर नेसावयाचे दोन बालाजीपंतास दिधले व याचप्रमाणें पंत-प्रधानाकरितां वस्त्रें आणलीं आहेंत. जवाहरपैकीं कंठी मोत्याची आहे. श्रीमंतांचे समक्ष भेटीनंतर वस्त्रें व जवाहर वकील देईल.

मुंबईकर वकीलासमागमें तुरक स्वार पंचवीसतीसपर्यंत आहेत म्हणोन हरकाऱ्याचे जुबानी यैकिल्या प्राा पूर्वी लिहिलें होतें. प्रस्तुत तहकीक करितां पनास स्वार व दाहाबारा याबू व वकील वगैरे इंगरेजांची दाहा घोडीं व उंट वीस व हाती दोन व दोनसें बारचे जवान व दोनअडीचसें माणसें येणेप्रमाणें सरजाम आहे. याउपरी जें आमलांत येईल त्याची सूचना सेवेसी लिहीन हे विनती.

पैाा छ ६ सफर सन ११९६ हिजरी मये दारोगे हरकारे इंदुवारी साइंकाळ.

A. R. No. 173

३० मोहरम ११९६ हिजरी
१५ जानेवारी १७८२

पैाा छ ६ माहे सफर सन ११९६ हिजरी रोज इदुवासर साइं-काल मये दारोगे हरकारे.

श्री १।२

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ३० माहे मोहरम मुाा काा पुणं स्वामीचे कृपावलोकणेकरून स्वानंद लेखण आज्ञा करीत

असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २७ माहे मजकूर रोज शणंवारी संध्याकाळी विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. इंग्रजाकडील वकील आले. सोमवारी कारभाऱ्याच्या व त्याच्या भेटी होणार. त्यास आणावयास पेशवा राजश्री माधोराव (सदा) सिव गेले हे वर्तमान सविस्तर विनंतीपत्री लेखण केले होते त्याजवरून शृत जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान इंग्रजाकडील वकील इंग्रज पांचसाहा आसाम्या आहेत त्याची नावनवेसी व त्याजबरोबर सरंजाम वगैर आहे त्याची याद अलाहिदां करून पाठविली आहे त्याजवरून ध्याणास येईल. छ २९ माहे मजकुरी वकीलाच्या भेटी होनार. वकीलासमागमे दुभाशा हरबा नामे म्हणोन आहे. वकीलाच्या भेटीकरितां राजश्री नानानी डेरे हरीपंताचे लस्करात दिल्हे. डेऱ्यातच त्याची भेट होणार. विदित होये. छ २८ माहे मजकूर रोज रविवार. इंग्रजाकडील वकील याणी वडगावीहून कूच्य केले ते अवंधास येथून दो अडचा कोसावर मुकाम केला. उदईक पुण्याजवल येणार. कारभाऱ्याच्या व वकीलाच्या भेटी होनार. शृत होये. कासीच्या राज्याकडील वकील आले आहेत. त्याजकडील वर्तमान सविस्तर विनंतीपत्री लेखण केले होते त्याजवरून ध्याणास आले असेल. उदईक सोमवारी त्याची व कारभाऱ्याची भेटी होणार. भेटीनंतर त्याजकडील काये जे वर्तमान ध्याणास येईल ते लेखण केले जाईल शृत होये. दरबार वगैरे जाला होता. विदित होये. छ २९ माहे मजकूर रोज सोमवार. इंग्रजाकडील वकील येथून दो कोसावर होते. त्यास आणावयास प्राःथकालीच माधोराव सदासिव गेले. वकील मजकूर दो प्रहरां हरीपंताच्या लस्करांजवल पाव कोसाचे तफावतीने उभे होते. दो प्रहरानंतर नाना फडनीस डेऱ्यास गेले. वकीलाच्या भेटी होतात म्हणोन तमाम सरदार व सिलेदार वगैरे बोलाऊन जमाव केला. जमाव करून डेऱ्यांत बसले होते. फौज वगैरे तयार करून डेऱ्याबाहेर दुरस्ता उभी केली होती. इंग्रजाकडील वकील इंग्रज पांच आसाम्या तिसरे प्रहरी नानाचे डेऱ्यास आले. नाना व हरिपंत वगैरे

डेऱ्यात बसले होते. इंग्रजाकडील वकील डेऱ्यास आले. नाना व हरिपंत वगैरे याच्या व इंग्रजाचे वकीलांच्या डेऱ्यात भेटी जाल्या. इंग्रजाकडील वकील डेऱ्यास येता कारभाऱ्यास पाहून टोप्या काढून उभे राहिले. उपरांतिक बसले. दोन घटका बसून पान अतर वगैरे समारंभ जाला. उपरांतिक वकील मजकूर पालख्यात बसून आपले बिऱ्हाडास गेले. वकीलास उतरावयास जागा हरीपंताचे लस्करापासून पाव कोसावर बाग आहे त्या बागात उतरावयास जागा दिल्ही. त्या बागांत खपरल आहे त्यात वकील राहिले. बाकी लोक वगैरे डेरे राहुटियां देऊन राहिले. प्रस्तुत इंग्रजाकडील वकीलांच्या भेटी जाल्यां. पुढे येका दो दिवसानी त्याचे खिलवत होणार. खिलवत होऊन काये जे वर्तमान ध्याणास येईल ते लेखण केले जाईल. इंग्रजाचे वकीलाचे भेटीचे समई हैदर नायेकाकडीलही वकील बोलाऊन नेले होते. इंग्रजाकडील वकील आले व भेटी वगैरे जाल्यां हे वर्तमान कारभारी हैदर नायेकास लिहिणार व त्याजकडील वकीलही लिहिणार. पत्रे लेहून येका दो दिवसानी कासदजोडी नाईक मजकुराकडे रवाणां होनार. वदंता आहे की तिकडे नाईक मजकुरासी व इंग्रजासी दार-मदार लागला आहे. शृत होये. कासीच्या राज्याकडील वकील येथे आले. त्याची भेट आज होणार होती ते रहित जाली. कारण कीं आज इंग्रजाचे वकीलाची भेट जाली म्हणोन त्या कासीच्या राज्याचे वकीलाची भेट जाली नाही. येका दो रोजानी कासीच्या राज्याचे वकीलाची भेट होनार. शृत होये. इंग्रजाच्या वकीलाच्या भेटी वगैरे डेऱ्यापास जाले. कुल वकील मजकूर आपल्या बिऱ्हाडास गेले. उपरांतिक नाना डेऱ्याहून आपले घरास आले. शृत होये. संक्रमणाचे तील शर्करायुक्त छ २७ माहे मजकुरी विनंतीपत्र सेवेसी रवाना डांकेसमागमे केले. लाखोटियांत तिलाच्यां पिसव्या घालून पाठविल्यात त्या पावतील. पावलीचे उतर सादर जाले पाहिजे. शृत होये. पुढें जे प्रसंगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

डॉ. ब. म. द. पा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

A. R. No. 174 ३ सफर ११९६ हिजरी
१८ जानेवारी १७८२

पैा छ १० माहे सफर संन १९९६ हिजरी रोज शुक्रवार चार घटका दिवस राहता डांकेवर मै दारोगा. बंद चार.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ताा छ ३ सेफर माघ शुध पंचमी भृगुवासरपर्यंत वास्तव्य पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ३० सफरी* हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन वर्तमान हुजूर व स्वामीस श्रुत जाहलें असेल. त्यानंतर कृपापत्र छ २३ मोहरमचें पाठविलें तें चिरंजीवांचे लिफाफ्यासहित छ २ माहे सफर गुरुवारीं पाऊन संतोष जाहला. सांप्रत येथील अखबार हुजूर व स्वामीचे सेवेसी पृथक पत्रीं लिहून डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें पावतील. चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यांस पत्र पाठविलें आहें, स्वामी देंतील. बहुत काय लिहिणें हे विनंती.

२

†
पुरवणी अखबार छ ३ सफर सन ११९६ हिजरी.

बज्याबा पुरंदरे यास कैदेतून सोडणार याचा माार पूर्वी लिहिला आहे. सांप्रत यैकिलें कीं पुरंदरे माारानीं अडीच लाख रुपये देऊन सासवडीं स्नानसंध्या करून राहांवें. धोंडो आपा पुरंदरे जामीन जाहले. पंतप्रधानांचे तरफेची चौकी ठेवणार होते ते मवकूफ केली. रुपयाची निशा होणें आहे. निशा जाहल्यानंतर गडाहून उतरवितील.

*"मोहरम". सफर नव्हें. हा दोष मुळांतच आढळतो.

†प्रस्तुत अखबारची पूर्वीचीं पानें अनुपलब्ध.

रो। भवानी सिवरामानीं येथील कारपरदाज्यांचे सूचनेनुरूप छ ३० मोहरमीं डेरे बाहेर दिधले. छ ५ सफरी डेरे दाखल होणे म्हणोन कारपरदाज म्हणत आहेत. परंतु भवानी सिवरामासमीप स्वार वगैरे सरंजाम कांहीं दिसत नांहीं व बंगाल्यास रवाना करितों म्हणोन शोहरत जाहली. परंतु कारपरदाजाचे तरफेनें रवानगीची सुस्ती दिसती आहे. हैदरअलीखानाकडून पेशकशीचे रुपये घेणें व इंगरेजांवर दाब पडावा याकरितां भवानी सिवरामाचे रवानगीची शकल कारपरदाजानीं काहाडली आहे.

गोविंदराव गाइकवाडास बालाजीपंतानी उमेदवार केलें. परंतु येक रुपया दिधला नांहीं व सावकार येक रुपया देत नांहीत. गाइकवाड माार व रास्त्यांची फौज कोंडाईबारीकडें पाठवितों म्हणोन शोहरत इंगरेजांवर दाब पडावा याकरितां कारपरदाजाकडून दिसतें. सेवेसी श्रुत होय.

उदेष्टेण वकीलास दररोज पनासा मनुष्याचा सिदा व दाहा बारा घोंडीं व उंट वगैरेस दाणा व वैरण छ ३ माहे माारपर्यंत कारपरदाजानीं पाठविली.

पैा छ १० माहे सफर संन ११९६ हिजरी रोज शुक्रवार चार घटका दिवस राहता डांकेवर मै दारोगा.

A. R. No. 175

४ सफर ११९६ हिजरी
१९ जानेवारी १७८२

पौा छ १० माहे सफर संन ११९६ हिजरी रोज शुक्रवार चार घटका दिवस राहता डांकेवर मै दारोगा हरकारा.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ४ माहे सफर मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखण

आज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ३० माहे मोहरम रोज मंगलवारी प्राथकाली विनंतीपत्र इंग्रजांच्या वकीलाच्या भेटी जाल्याचे सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणा केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान तिसरे प्रहरी राजेश्री नाना घराहून बाहेर डेऱ्यास गेले होते. इग्रजांकडील वकील येक आसामी मुख्यं व हरबा दुभासे यैसे उभयेता नानानी डेरा दिल्हा तेथे आले होते. नाना व हरीपंत व माधोराव सदासिव व इंग्रजाकडील वकील यैसे याचा खिलवत डेऱ्यात येक प्रहरपर्यंत जाला. खिलवतीचे वेलेस डेऱ्याजवल आसपास कोन्ही मणुश उभे राहू दिल्हे नाही. खिलवत वगैरे होऊन इंग्रजाकडील वकील आपले डेऱ्यास गेले. संध्याकाळी नाना डेऱ्याहून आपले घरास आले. खिलवतीचा भाव अद्याप कांही प्रगटात आला नाहीं. परंतु आंतस्थे वर्तमान आहे कीं कोन्हेही प्रकारे दारमदार करून सलूक करावा. कारणं की उभयेपक्षी कलहामुळे खर्चात आले याअर्थी दारमदार करून तह करावा यैसे उभयेपक्षीही मानस आहे. कारभाऱ्याचेही मानस आहे की कोन्हेही प्रकारे दारमदार करून सलूक करावा. इंग्रजाचेही मानस आहे की कलहामुळे खराबी फार जाली. ममई वगैर येथील साहुकार वगैर याचां माल बंद पडला. खरीदी फरोख्ती न चाले याअर्थी साहुकार आर्जुदा. याअर्थी दारमदार करून सलूक करावा याजकरितां वकील मजकूर येथे आले. भेटी होऊन येक खिलवत जाला. पुढे खिलवत वगैर होऊन काये निश्चये होऊन दारमदार ठैरतो हे पाहावे. इकडील मुदे कारभाऱ्याचे आहेत की वसई वगैर स्थळे घेतली आहेत ते द्यावी व दादासाहेबांचा पक्ष न करतां त्यास आमच्यां हवाला करावे. आणिकही कितिका प्रकारचे याचे मुदे आहेत. इंग्रजाकडीलही मुदे आहेत की दादासाहेबामुळे आम्ही खर्चात फार आलो. त्याची सोये करून द्यावी व दादासाहेबाचाही बंदोबस्त करून द्यावा याप्राणे तिकडीलही मुदे आहेत. मग काये निश्चये होऊन उभयेपक्षी दारमदार होईल ते पाहावे. शृत होये. छ १ माहे सफर रोज

बुधवार वितिपात म्हणोन नाना डेऱ्यास गेलें नाहीत. घरीच होते. इंग्रजाकडील वकीलास मेजमाणी हजार रुपये नख्त व सिधां व मेवां वगैर मिठाई पाठविली. शृत होये. वदंता आहे की इंग्रजाचे बोलणे कीं वसई वगैर स्थळें तुमची घेतली आहेत हे घ्यावी व दादासाहेबाचा बंदोबस्त करून द्यावा व हैदर नायेकाचे बिघाड करावा यैसे आतस्थे बोलणे त्याचे आहे यैसे वर्तमान यैकिल्यात आले. परंतु प्रस्तुत हैदर नायेकाचे बिघाडाचां मुदां हे यैकतील यैसा अर्थ दिसत नाही यैसे आंतस्थे कितिक त्याचे बोलणे आहे यैसा भाव यैकिल्यात आला. मग निश्चयेरूप कायें बोलणे होऊन यैकिल्यात आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. दरबार वगैरे जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. विदित होये. छ २ माहे मजकूर रोज गुरुवार. कासीच्या राज्याची वकीलाची भेट जाली. वकीलानी कारभाऱ्यास दोन वस्त्रे दिल्ही. वकील मजकूर सामान पक्षातच आहेत. तीनचार घोडी व दाहा पांच मणुश्यं त्यासमागमे आहेत. विशेषे नाहीत. कासीच्या राज्याचा वकील यावयास कारण की कासीचे ठाणे वगैर इग्रंजानी घेतले आहे यां अर्थी आमची मदतगिरी करून फौज वगैर देऊन इंग्रजाचे पारपत्य केल्यास वीस लक्ष रुपये देऊ यैसे राज्याकडील बोलणे आहे. राज्याकडील वकीलाची भेट मात्र जाली. खिलवत वगैर अद्याप जाला नाही. खिलवत वगैर होऊन काये जे वर्तमान ध्याणास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. शृत होये. हैदर नायेकाकडील वकील दरबारास आले होते. नानाचा व वकीलाचा खिलवत जाला. खिलवताचा भाव यैकिल्यात आला की हैदर नायेकास ममतापूर्वक पत्रे लिहिली यैसे यैकिल्यात आले. विदित होये. छ ३ माहे मजकूर रोज शुक्रवार. राजश्री गणेशपंत बेहरे कोडाईबारीवर आहेत. रा गोविंदराव गायेकवाड याची रवाणगी गुजरात प्रांताकडे जाली आहे. येथून कोस दीड कोस कूच करून मुकाम केला आहे. त्याची खर्चावेचाची अद्याप बंदोबस्ती नाही हे पूर्वी विनंतीपत्री लेखण केले आहे त्याजवरून शृत जाले असेल. गायेकवाड

मजकूर याची खर्चाची बेगमी होऊन जाणे दीर्घसूत्रावर आहे. येथून दीड दो कोसावर मुकाम करून आहेत. शृत होये. राजश्री कृष्टणरावजीकडील पत्रे आली. पत्राचा भावार्थ विशेष कलल्यात आलां नाहीं. विदित होये. येथे वदंता आहे की येजमानसाहेब डेऱ्या-दाखल जाले. बेदराकडे जाणार यैसे वर्तमान आहे. शृत होये. इंग्रजाकडील वकील बागात हरीपंताचे लस्कराजवल डेरे देऊन उतरले आहेत. आसपास श्रीमंताकडील गाडदी वगैर उतरले आहेत. विदित होये. वारानसीचे राज्याकडील वकील आले आहेत त्यास मेजमानी दीडसे रुपये दिल्हे व सिधा दिल्हा. शृत होये. पुढे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. छ २३ माहे मोहरमचे आज्ञापत्र सरकारचे डाकेसमागमे सादर केले ते छ २ माहे माारी सेवकास पावले. पावोन संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काय लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 176

७ सफर ११९६ हिजरी
२२ जानेवारी १७८२

पैाा छ १५ सफर बुधवारी सरकारच्या डांकेवर आली पत्रे सन ११९६ हिजरी.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान तााा छ ७ माहे सफर माघ शुत्ध नवमी भौमवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष छ ४ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें ते दारोग्यांचे विद्यमानें पावलें असेल. सांप्रत हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पृथक पत्रीं अखबार लिहिली

आहे ते दारोग्याचे विद्यमाने पत्रें पाऊन वर्तमान श्रुत होईल. कृपापत्र छ २९ मोहरमचे पाठविलें ते छ ६ सफरी पाऊन बहुत संतोष जाहला. चिरंजीवाचें पत्राचा लिफाफा पावला. सांप्रत चिरंजिवास पत्र पाठविलें आहे ते पावेल. इंगरेजाचे वकीलाचें व येथील कारपरदाजाचे बोलण्याचा खुलासा कोण्ही श्नेहिताचे मुखें सेवकाने यैकिल्याप्रमाणें पृथक पत्री वर्तमान लिहिलें आहे. कृष्टणरावजीचे पुत्र गोविंदराव प्रथम दिवसी भेटीचे समई सर्वत्र समाजांत होते. त्याउपरी आजी छ ७ माहे माारपर्यंत गोविंदराव कृष्टण यास येथील कारपरदाजांनी शरीक मसलहत केले नांही व कृष्टणराव यांसहित वर्तमान लिहून पाठविलें नांहीं. राजश्री गोपाळराव गु।। मुनसी यानी स्वामीस पत्र व तिलशर्करेची थैली पाठवण्याविषईं सेवकाचे स्वाधीन केली ते पाठविली आहे. त्यांचे पत्राचे उतर पाठविल्यास पावतें होईल. बहुत कांय लिहिणें हे विनंती.

पौा छ १५ सफर.

श्रीनिवास

विनंती जे मुंबईकर इंगरेजाकडील वकील उदेष्टेण पुण्यांस आला आहे व पंतप्रधानांचे कारपरदाजासीं व वकील माारासीं दोन बैठकी जाहल्या. येकांती बोलण्याचा भाव प्रसिध न व्हावा येविषईंची तकयुद बहुत केली आहे याकरितां तहकीक वर्तमानाचा शोध सांकल्यतेकडून कळत नाहीं. परंतु जे शरीक मसलहत आहेत त्याचे जे मुकरब त्यांजसमीप कांहींयेक उदगार निघत आहे. त्या मुकरबापैकी कोण्ही श्नेहिताचे द्वारें कांहीं वर्तमान यैकिलें ते सेवेसी लिहितों. इंगरेजांकडील सिलसिला बंदगानआलीकडें आहे व हैदरअलीखानाकडेंहीं आहे. पंतप्रधानांकडें कांहींच सिलसिला नांहीं त्या अर्थीं कारपरदाज मनसुबेबाज व तरदुदी नांहीत. केबळ ज्याहिल आहेत हा दोष लागतो. याकरितां येथील कारपरदाजानीं आपले तरफेचा पैगाम दिसू न देतां ज्वाबसालाकरितां

मुंबईकर व गाडराचे तरफेनें वकील यावा म्हणोन सिलसिले जुंबानीं केली. त्यावरून प्रथमतां मुंबईकरानीं पत्र पाठविलें व वकील पाठवण्याविषई कारपरदाजांचे समत घेऊन उदेष्टेणास रवाना केलें. तो पुण्यास आला. कारपरदाजांचे व वकीलांचे बोलण्यांत बदकौली व बदअहदीचा दोष इंगरेजांकडें लाविला. त्याचें उतर वकीलानें केलें कीं रघुनाथराव आश्रयास आले त्यांची दस्त-गिरी करणें सांप्रदाय सरदारीचा आहे. याकरितां इतका बखेडा जाहला. सांप्रत करनल इपटेनाचें विद्यमानें जो करार होऊन तहनामा जाहला आहे तोच प्रमाण. त्याचे अन्वयानें पंतप्रधानानीं व इंगरेजानीं अमल करावा. करारांतिरिक्त मुळुक व किले नवीन इंगरेजानीं जे घेतले आहेत ते माघारा द्यावे व अहमदाबाद वगैरे गुजरात प्रांत व सुरत प्रांती जो रुपया इंगरेजानी घेतला आहे तो पंतप्रधानास माघारा द्यावा व रघुनाथरायांचे कुमकेकरितां सिबंदी वगैरे जो खर्च इंगरेजास पडला आहे तो पंतप्रधानानीं द्यावा व हैदरअलीखानासीं व इंगरेजासीं बिगाड आहे, इंगरेजांची कुमक पंतप्रधानानीं करावी. मददखर्च देऊं. कुमक न केली तरी इंगरेज व हैदरअलीखान परस्परें समजून घेतील. पंतप्रधानांचें सरदारानी व पंतप्रधानानीं दोघाचीही कुमक न करावी याप्रमाणे उदेष्टेण बोलिला. याचें उतर कारपरदाजानी केलें.

पाा छ १५ सफर.

२

पुरवणीपत्र श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

रघुनाथराव यांचे निमित्त करून प्रथमतां साष्टीचा किला घेतला व अहदसिकनी केली. त्याउपरी इपटेनाचे विद्यमानें करार होऊन कलकतेवाल्याचे मोहरनसीं तहनामा जाहला असतां पुन्हां इंगरेजानीं बदमामली केली. त्यास पंतप्रधान जबदरदस्त आहेत

त्या अर्थीं चिंता नांहीं. इंगरेजास हार येतील. सांप्रत दारमदार करणें आहे तरी बमयसाष्टी समग्र किले व मुलुक इंगरेजानी जो घेतला आहे तो सोडावा व हैदरअलीखान पंतप्रधानाचा शरीक मसलहत आहे त्यासी चिनापटणवाल्याकडून जो पैगाम असेल त्याप्रमाणें किले व मुलुक द्यावा व सिबंदीचा खर्च खान माारास जो पडला आहे ते रुपये देऊन बाकी मुलुक सोडून घ्यावा याप्रमाणें आम्हीं म्हणतों. परंतु हैदरअलीखानांकडील वकीलास तुमचे व आमचे बोलण्याचें वर्तमान सांगून खान माारास पत्रें लिहून पाठऊं. त्याजकडून उतर येईल त्याप्रमाणें तुम्हांसी बोलूं. परंतु पंतप्रधानाचे मनोदयाप्रमाणें तुम्हीं श्नेह केल्यास हैदरअलीखानासी व इंगरेजासीं श्नेह परस्परें नुकसानी न होता करून देऊं. याप्रमाणें येथील कारपरदाजाचें व उदेष्टेणाचें बोलणे जाहलें. त्यानंतर उदेष्टेणाने गाडर व मुंबईवाल्यास पत्र पाठविले व येथील कारपरदाज आपले तरफेने व लक्ष्मणराव रास्ते व नूरमााखान व नरसिंगराव यांचीं पत्रें हैदरअलीखानास लिहून पाठवणार. खान माराकडून प्रत्योतर येईल त्याप्रमाणें इंगरेजाचे वकीलासी बोलतील. सदरहूअन्वयें खिलवतेचे बोलण्याचा भाव यैकिला तो सेवेसी व हुजूर लिहिला आहे. श्रुत होय हे विनंती.

पैाा छ १५ सफर.

श्रीनिवास १/२

अखबार पुणें अज इाा छ ४ सफर लगायत छ ७ माहे माार सन ११९६ हिजरी माघ शुध मंगळवार.

छ ३० मोहरमीं उदेष्टेण वकील हरिपंताचे डेऱ्यास आला होता. बालाजी जनार्दन व माधवराव सदासिव यांनी बइतिफाक हरीपंत वकील माारासी येकांत जाहला व इंगरेजाकडील वकीलाचे लश्करांत व डेऱ्यास परवानगीवितरिक्त कोण्हीं न जावें याची तकयुद जाहली व हैदरअलीखानानें चिनूर व त्रिपासूरचा किला घेऊन चिनाप-

डॉ. ब. ब. व. मा. पोतदार
ग्रंथ संग्रह

टणाचे रुखें गेला यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित पत्र पाठविले तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत प्रत्यक्ष जाहलें व यैकिलें वर्तमान दफेवार लिहिलें असे. छ ४ माहे माारीं बालाजीपंत हरीपंताचे डेऱ्यास जाऊन उदेष्टेणास बोलाऊं पाठविलें. वकील माार बमोजिब तलब आला. हरीपंत व माधवराव सदासिव व दुभासी शरीक मसलहत होते. दोन घटका दिवस राहिला होता त्या समयापासून सात घटका रात्रपर्यंत खिलवत जाहली. त्यानंतर उदेष्टेण आपले डेऱ्यास गेला. इतर सर्वत्र आपले स्थळास गेले.

छ ३० मोहरमीं भवानी सिवरामानीं बंगाल्याचे मोहिमेस जावयाकरितां डेरे बाहेर उभे केले म्हणोन पूर्वील पत्रीं वर्तमान लिहिलें आहे. छ ५ माहे सफरी बालाजीपंत पंतप्रधानांचे दरबारास गेले. भवानी सिवराम बमोजिब तलब रुखसतीकरितां दरबारास गेले. पंतप्रधानानीं पैठणी दोन वस्त्रें सेला व पागोटें व मोत्याची कंठी बमय पदक जमरुदी भवानी सिवरामास देऊन रुखसत केलें. छ माारीं भवानी सिवराम डेरे दाखल जाहलें. दोनसें स्वार समागमें आहेत. तजवीज बंगाल्यास पाठवावयाची परंतु सरंजामाची तयारी अद्यापि कांहीं दिसत नांहीं.

छ ६ माहे माारीं उदेष्टेणांची पत्रें मुंबईस रवाना जाहली. घांटापर्यंत चौकी पार करावयाकरितां पंतप्रधानांची जासूदजोडी जात आहे.

उदेष्टेण वकील पुण्यांस आल्यानंतर कोकणांत बलाळगड म्हणोन टकमकचे गंडासमीप आहे व बलाळगड इंगरेजांचे स्वाधीन, त्या गडचे लोकासीं व टकमकवाल्यांसी लढाई जाहली. इंगरेजांचे लोक थोडके होते व बलाळगडावर जंगी सरंजाम नव्हता याकरितां सिकस्त जाहली व गड सोडून गेले. पंतप्रधानाचे लोक टकमकचे त्यानी बळाळगडांत ठाणे कायम केले.

———

पैा छ १५ सफर.

२

श्रीनिवास

पुरवणी अखबार पुणें छ ७ सफर सन ११९६ हिजरी. छ ७ माहे माारी त्रितीय प्रहरीं बाळाजीपंत हरीपंताचे डेऱ्यास गेले व लक्ष्मणराव रास्ते बमोजिब तलब गेले. दोन घटका दिवस बाकी राहजोपर्यंत त्रिवर्गाचें खिलवत जाहलें. त्यानंतर उदेष्टेणाचा हमराही दुभासी हरीपंत यांस बोलाविलें व अस्तमानपर्यंत चौघांचा येकांत जाहला. त्यानंतर नूरमाादखान व नरसिंगराव यांस बोलाऊन आणिलें. सर्वत्राचे बइतिफाक आठ घटका रात्रपर्यंत खिलवतेचें बोलणें जाहलें. त्याउपरी सर्वत्र आपले मकानास गेले. छ माारीं माधवराव सदासिव शरीक मसलहत नव्हते. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

A. R. No. 177

८ सफर ११९६ हिजरी
२३ जानेवारी १७८२

पैा छ १५ सफर बुधवार सरकारच्या डांकेबराबर आली. सन ११९६ हिजरी.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ८ माहे सफर मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ४ माहे मजकूर रोज शनवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान तिसरे प्रहरी इंग्रजाकडील वकील उदेष्टीन नामे हरीपंताचे डेऱ्यास आले होते. नानाही डेरियास गेले होते. नाना व हरीपंत व माधवराव सदासिव व इंग्रजाकडील वकील याचा

खलवत जाला. खिलवताचे वेलेस शागिर्दपेशा वगैर लोक तमाम डेऱ्याबाहेर काढिले. उपरांतिक खलवत येक प्रहरपावेतो जाहला. इंग्रजाच्या बोलण्यात राजश्री माधवराव सदासिव आहेत. दुसरे कोणी नांही. खिलवताचा भाव यैकिल्यात आलां कीं इंग्रजाकडील वकील बोलतो कीं श्रीमंत दादासाहेबास त्रिंबकचा किला द्यावा. आनंदवली गंगातीरास ते राहतील. त्यांजवल दोन पलटणे असावी. पूर्वी त्यास माधराव कैलासवासी याणी जागीर दिल्ही होती त्यापेक्षा दाहापधरा लक्षाची आधिक द्यावी व दादासाहेबाचे पुत्राणी श्रीमंताजवल असावे. आमचा खर्चवेच दादासाहेबाचे समंधे जाला आहे याचा निकाल करून द्यावा व हैदर नाइकासी बिघाड करावा. या प्रौा जाल्यास तुमचा आमचा दारमदार होईल. तुमची वसई वगैर स्थले घेतली आहेत हे तुमची तुम्हास माघारे देऊ. सिवाय साष्टी व अरूणचा किला हे दोन स्थले देणार नाही या प्रौा इंग्रजाचे वकीलानी भाषण केले. त्याजवरून कारभारी याणी उतर केले कीं दादासाहेबास तुम्हीं आमचे स्वाधीन करून द्यावे. पलटणे वगैर राहावयाचे आनकूल पडणार नाही. त्यानी आनंदवलीस राहावे. चौकीस फौज आमची राहील. पूर्वी त्यास जागीर नेमून दिल्ही आहे त्या प्रौा त्यानी घ्यावी आणि स्वस्त असावे. दुसरे, वसई वगैर स्थले तुम्हीं घेतली आहेत ते आमची आम्हांस द्यावी. हैदर नाइकासी प्रस्तुत बिघाड करावा हेही होत नाहीं. पांचार वरषे जाली. तुम्हांमुळे आमचे स्वारीचा उद्योग राहिला यामुले आम्ही तहखर्चात आलो. तुम्हीहीं दादासाहेबामुले खर्चात आला. परस्परे यैसी गोष्ट जाली. काही दिकत न घेता दादासाहेबास आमचे स्वाधीन करून द्यावे व आमचे स्थले सोडून द्यावी म्हणजे सहजच तुमचा आमचा दारमदार होईल. तुम्हीं व आम्हीं प्रसंगोचित येकत्र जाल्यास, मग पुढे कोणासी बिघाड करणे अथवा सलूख करणे हे घडून येईल यैसे परस्परे उभयेपक्षी मुदे भारी आहेत. त्याजकडील मुदे यांस कबूल करणे कठीण आहेत. यांजकडील त्यास कबूल करणे कठीण आहेत यैसे परस्परे भाषणे आहेत. उभयेपक्षी

मुदे भारी तेंव्हा राजकारण होणे दीर्घसूत्रावर आहे. प्रस्तुत तो या प्रो। उभयेपक्षी बोलणे आहे. मग पुढे काये निश्चयात येऊन वर्तमान यैकिल्यास लेखन केले जाईल. परस्परे भाषणे जाल्याचे पत्रे इंग्रजाकडील वकीलाची व कारभारियाची ममईस गाडराकडे गेली आहेत. मग तेथील उतर काये येईल हे ध्यानास आलिया लेखन केले जाईल. या प्रो। खलवत वगैर होऊन इंग्रजाकडील वकील आपले डेऱ्यास गेले व नाना वगैर आपले घरास आले. विदित होये. छ ५ रोज रविवार. राजश्री भवानी सिवराम डेरे दाखल जाले. पां च्यारसे राऊत प्रस्तुत त्यांजवल आहेत. वदंता घातली आहे कीं भवानी सिवराम यांची रवानगी बंगाल्याकडे केली आहे यैसी आवई घातली आहे. परंतु बंगाल्याकडे त्यांची रवानगी केल्यास पंचवीस हजार फौज पाहिजे व खर्चावयास वीसपंचवीस लक्ष रुपये तूर्त पाहिजे. त्यास प्रस्तुत फौजेचेही अनकूल नाही. व पैशाचेही अनकूल नाही. यैसे असतां त्यांची रवानगी बंगाल्यात कैसी होते. त्यामध्ये मुलुकगिरीचे दिवसही थोडके राहिले. असो. बंगालियाची आवई घालून भवानी सिवराम यांस डेरे दाखल करविले आहे. कदाचित जाले तर त्यांस दोनतीन हजार फौजेनसी कोंडाईबारीवर गणेशपंताकडे रवाना करितील. बंगाल्याकडे तो रवाना करणे दीर्घसूत्रावर आहे. प्रस्तुत तो भवानी सिवराम डेरे दाखल जाले. मग त्यांची रवानगी कोणीकडे करितील हे लेखन केले जाईल. श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. श्रुत होये. छ ६ सोमवार. श्रीमंत पर्वतीचे दर्शनास गेले होते. दर्शन वगैर करून संध्याकाली घरास आले. श्रुत होये. राजश्री बज्याबा पुरंधरे यांचा अडीच लक्ष रुपये खंड जाला. त्यास सोडणार हे पूर्वी तपसीलवार लेखन केले आहे त्याजवरून ध्यानास आले असेल. त्यांस यैवजाची निशा बोलून बज्याबास सोडणार यैसे आहे. सोडल्यावर लेखन केले जाईल. श्रुत होये. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेस आहेत. दादासाहेबाकडील बाजीराव बरवे हजार दीड हजार फौजेनसी

महेश्वराकडे गेले होते. त्यास अहिल्याबाई होलकरीन याणी त्यास धरले. हे पूर्वी लेखन केले होते. प्रस्तुत वर्तमान आहे कीं बाजीराव बरवे यास अहिल्याबाईने धरले. श्रुत होये. सिंदे हिंदुस्थान प्रांतीच आहेत. अलिकडे त्यांजकडील कांही वर्तमान आले नाही. आल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये. हैदर नाइकाचे वकील दरबारास आले होते. कारभारियासी व त्यांसी खलवत जाला. खिलवतीचा भाव यैकिल्यात आला कीं हैदर नाइकाचे चितात कीं इंग्रजाचे राजकारण आपल्या मुद्या प्रो जाले तर करावे. नाहीतर पंचवीसतीस हजार फौज कृष्णातीराकडे पाठवावी. मग जे मसलत करणे ते करूर यैसे नाइकाकडील वकीलाचे बोलण्याचा भाव यैकिल्यांत आला. श्रुत होये. छ ७ रोज मगलवार. नाना हरीपंताचे डेरियास गेले होते. उभयेताचा खिलवत जाला. खिलवत होऊन नाना आपले घरास आले. खलवतीचा भाव यैकिल्यांत आला कीं इंग्र

पैा छ १५ सफर सन ११९६ हिजरी.

२

पुरवणी

जाचे राजकारणाविसी जाला. त्यास इंग्रजाचे बालण्यात मुदे भारीच आहेत व कारभारियाचेही बोलण्यात मुदे भारीच आहेत. त्यास उभयेपक्षी राजकारण होऊन दारमदार होणे कठीण आहे. प्रस्तुत तो याप्रकारे प्रसंगाचे बोलणे आहे. पुढे जे वर्तमान यैकिल्यात येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. विदित होये. येजमान-साहेब छ २१ मोहरमीस डेरे दाखल होऊन छ २५ कूच दो कोसाचे जाले. बेदराकडे येतात यैसे वर्तमान येथे आहे. विदित होये. पुढे जे प्रसंगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. श्रुत होये. सेवकाचे गांव खेडचापासून सिवरामपंत थते, फडणीस खांदेशचे सुभ्याचे, यांणी दहकपटी व सुभेपटी मिळोन मनमाने तो यैवज जमाबंदी प्रोाच घेतला.

येविसी सरकारची पत्रे त्यांस सादर जाली कीं मोगलाई जागिरी-पासून दहकपटी व सुभेपटी घ्यावयाचे प्रयोजन नांही, यैवज घेतला आसेल तो माघारा देणे. यैसी पत्रे असतां व कृष्णरावजीनी त्यास समक्ष ताकीद केली असतां ते यैवज माघारा देत नाहीत. धटाई-च्या गोष्टी सांगतात. दुसरे, याजकडील होलकर वगैर सरदार यांणी घासदाणा म्हणौन मनमाने तो यैवज घेतला तो उपद्रव कोठपर्यंत ल्याहावा. येविसी पूर्वीही दोनच्यार विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. प्रस्तुत कृष्ण-रावजी तेथे आहेत. त्यांस निक्षुण ताकीद करून सांगितले पाहिजे कीं सिवरामपंत वगैर यांणी यैवज घेतला आहे तो माघारा देवणे. या प्रो त्यांस निक्षुण ताकीद जाली पा येविसी रावजीचे पत्र येथे त्यांचे चिरजीवास आले पाहिजे. सर्वप्रकारे सेवकाचे आभिमानी स्वामी आहेत. पहिलेपासून सर्व साहिता स्वामीपासूनच होत आली आहे. विनंती मान्ये करून येविसी रावजीस सांगोन रावजीचे पत्र त्याचे चिरजीवास आले पाहिजे कीं सिवरामपंत वगैर याणी यैवज घेतला आहे तो पत्रदर्शनी माघारा देणे यैसे पत्र अगत्य आले पाहिजे. शृत होये. छ २९ माहे मोहरमचे आज्ञापत्र सादर डाकेसमागमे जाले ते छ ६ माहे माारी पावले. पावोन बहुत संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 178

११ सफर ११९६ हिजरी
२६ जानेवारी १७८२

पैाा छ १८ माहे सफर संन ११९६ हिजरी रोज शेनिवार संध्या-काळी डांकेवर मै दारोगा प्रहर रात्री.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ साष्टांग नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ताा छ ११ सफर माघ शुध द्वादसी मंदवासरपर्यंत वास्तव्य

पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ८ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें ते दारोग्याचे विद्यमानें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत हुजूर अर्जी व अखबार व पृथक पत्रीं अखबार आपले सेवेसी लिहून डांकेंवर पत्रें रवाना केलीं आहेंत. भवानी सिवराम बंगाल्याचे मोहिमेस जावयाकरितां डेरे दाखल जाहले व गाडराकडील वकील उदेष्टेण ज्वाबसालाकरितां पुण्यास आला आहे. उभयतांकडील वर्तमान हैदरअलीखानास लिहून पाठविलें आहे. करारप्रमाणें पेशकसी बाा रुपये बारा लाख व कर्ज हसना आठ लाख, येकोन वीस लाख रुपये व इंगरेजासीं दारमदार कोणे तऱ्हेनें करावा येविषईंची सलाह याचें उतर खान माारनुलेकडून आल्यानंतर भवानी सिवरामाची रवानगी व उदेष्टेण वकीलासीं उतर प्रत्योतर करतील. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ ८ सफर लगायत छ ११ माहे माार सन ११९६ हिजरी शनिवार.

बंगाल्याचे मोहिमेस जावयाकरितां भवानी सिवराम यांस छ ५ माहे माारीं पंतप्रधानानीं वस्त्रें व मोत्याची कंठी देऊन रुखसत केलें व छ ७ माहे माारीं हैदरअलीखानाचे वकीलासीं व कारपरदाजासीं खिलवत जाहलीं व वकीलानीं खान माराकडें पत्रें रवाना केलीं यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र लिहून डांकेवर रवाना केलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान दफेवार लिहिलं आहे.

तुकोजी होळकराचे पुत्राचा विवाह माघ मासी होणार म्हणोन पूर्वी वर्तमान लिहून पाठविलं आहे. माघ वद्य सप्तमी छ २० सफरी लग्नतिथीचा निश्चय जाहला. श्रीमंत पंतप्रधान व कारपरदाजांस लग्नास

येण्यांची सूचना व आक्षेते द्यावयाकरितां छ १० माहे माारी रात्रौ तुकोजी होळकर दोनसे स्वारानसीं वाफगांवीहून पुण्यास आले व हरीपंतासमीप उतरले. छ ११ माहे माारी हरीपंतानीं होळकरांस भोजनास बोलाऊन भांवी मंगल सूचनेचे शादीकरितां होळकरास च्यार वस्त्रें पैठणी, सेला व मुडासें व किमखाब व जामेवार महमुदी व हमराही वीस असामीस सेला व मुडासें हरयेकास दिधलें. छ माारीं रात्रौ शनिप्रदोषाकरितां बालाजीपंतानीं होळकरास ज्याफत केली. भोजनोतर होळकर व च्यारपांच आसामी मातबरास च्यार सनगें सेला व पागोटे व महमुदी व किमखाब येणेंप्रमाणें व तीस आसामीस सेला व मुडासें देऊन रुखसत केले. उदईक प्राथःकाली छ १२ रोजी होळकर माार पंतप्रधानास आक्षत देतील व श्रीमंताची ज्याफत भोजन व वस्त्रें घेऊन तुकोजी होळकर वाफगांवास जाणार.

करनल गाडराची पलटणें कल्याणीसमीप आहेंत. त्यां लोकांवर इंगरेजांची तकयुद बहुत याकरितां दोनसे मनुष्येंपर्यंत बमय बदुक व हत्यारें पळोन घांटासमीप आली. पंतप्रधानाकडील चौकीचे लोकानी आटकाव करून कारपरदाजांस सूचना लिहून पाठविली. येऊ देणें म्हणोन परवानगी गेल्यानंतर दोनसे माणूस पुण्यांसमीप येऊन उतरलें आहे व नौकर राहवयाचे उमेदवार येथील कारपरदाजानी त्यां लोकावर तकयुद चौकीची केली आहे.

पैाा छ १८ माहे सफर संन ११९६ हिजरी रोज शेनिवार डांकेवर संध्याकाळी प्रहर रात्री.

———

२

पुरवणी अखबार छ ११ सफर सन ११९६ हिजरी.

गोविंदराव गाइकवाडास कारपरदाजानी उमेदवार करून ठेविलें व गुजरात प्रांतात जावयाकरितां पंतप्रधा(ना)कडून रुखसत देविली.

परंतु खर्चास येक रुपया दिधला नांहीं व सावकारासमीप गाइकवाड माराची पत येक पैश्याची नांहीं यास्तव हमराही लोकानीं फाकेकसी करून उठोन गेले. गोविंदरायासही फाक्यापर्यंत नौबत आली याकरितां छ ९ माहे माारी मौजे दावडीं निंबगांव, माारनुलेचा वतनी गांव, तेथें गेला.

कृष्णराव जोसी वकील याची पत्रें मरकूम छ २२ मोहरमचीं छ ८ सफरीं हैदरअलीखानाचे लश्करीहून कारपरदाजास आली. त्रिपासूरचें मकान घेऊन इंगरेजांचे लोकास कतल करून चंद्रगरीचा किला घेतला व आरकाटचे रुखं गेला. जनराल कूटानें जंगी सरंजामाची तयारी करून चिनापटणीहून पुन्हां त्रिपुसुरास आला म्हणोन खारिज यैकिलें.

कोळेंबें बदरास फरासीसांची जाहाजें जंगी सरंजामासुधां आलीं म्हणोन पूर्वी लिहिलं आहे. सांप्रत यैकिलें कीं चिनापटणवाल्यानीं पांच जाहाजे जंगी सरजामसुधां फरासीसांचे जाहाजाचे मुकाबिल्यास पाठविलीं होतीं. परस्परें लढाईंत इंगरेजाची सिकस्त जाहली. दोनतीन जाहाजें फरासीसानी दस्तगीर केलीं व दोन जाहजें पळोन चिनापटणास आलीं म्हणोन खारिज यैकिलें. सेवेसी श्रुत होय हे विनती.

पैाा छ १८ माहे सफर संन ११९६ हिजरी रोज शेनिवार संध्याकाळी डांकेवर मै दारोगा प्रहर रात्री.

A. R. No. 179

१६ सफर ११९६ हिजरी
३१ जानेवारी १७८२

पैाा छ २३ रोज गुरुवार माहे सफर सन ११९६ हिजरी सरकारच्या डांकेबराबर आले.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान तााा छ १६ सफर माघ वद्य द्वितीया गुरुवासरपर्यंत वास्तव्य पुणें

स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ १२ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत अखबार व अर्जी हुजूर व पृथक पत्रीं वर्तमान लिहून डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें हुजूर व सेवेसी पावतील. अपाजीराम म्हणोन सेणवई ग्रहस्त हैदरआलीखानाचे तरफेनें श्रीमंत पंतप्रधानासमीप वकीलीस पूर्वी होता. सांप्रत बतरीक मुसाहब खान माारासमीप आहे. त्यास स्वाराचे निगाहदास्तीकरितां रवाना केलें व बादामीस येणार म्हणोन यैकिलें. याचे सिलसिल्याचा तपसील चिरंजीव राजश्री राय रघोतमराव यांनी सेवेसी विनती केला आहे. विशेष काय विनती ल्याहावी. राजकारणी लोंकाची चाल सर्व स्वामीस विदित आहे. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

पैाा छ २३ सफर गुरुवार.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ १२ सफर लगायत छ १६ माहे माार सन ११९६ हिजरी माघ वद्य गुरुवासर.

तुकोजी होळकर श्रीमंत पंतप्रधानास लग्नसंमधी आक्षत द्यावया-करितां वाफगांवीहून पुण्यांस आले व हरीपंत व बालाजीपंतानी ज्या-फत केली व मुंबईकर इंगरेजांची जमीयत कल्याणीसमीप आहे त्या-पैकी दोनसे लोक बेरुखसत उठून पुण्यास आले आहेत व हैदरअलीखान आरकाटेसमीप व जनराल कूट चिनापटणाहून पुन्हां त्रिंपासूरास आला म्हणोन व याविंतरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व आख-बार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें आसेल. सांप्रतचें वर्तमान हुजूर व स्वामीचे सेवेसी दफेवार लिहिलें आहे.

छ १२ माहे माारीं तुकोजी होळकरांनी पंतप्रधानास लग्नसंमधी निमंत्रण येण्याविषईं केलें. श्रीमंतानी होळकर माारास ज्याफत करून वस्त्रें दिधलीं. त्याउपरी रास्ते वगैरे सरदारांचे घरास तुकोजी होळकर आक्षतेकरितां गेले होते. बापुजी होळकर व भिकाजी होळकर, तुकोजीचे पुतने, पुण्यांतील समग्र मातबराचे घरास आक्षेतेस गेले. तुकोजी होळकर छ १३ रोजीं पुण्याहून वाफगांवास गेले व बापुजी व भिकाजी होळकर छ १४ रोजी गेले. बापुजी होळकर सेवकाचे बिऱ्हाडास आक्षेतेकरितां आले होते. तुकोजी होळकर वगैरेस पंतप्रधानानीं वस्त्रें दिधली त्याचा तपसील.

माारनुले

मुडासें पैठणी	सेला पैठणी	ज्यामेवार	किमखाब
१	१	बऱ्हानपूर रगखाद :	१
	———	१	
	४		

बापुजी व भिकाजी होळकर व आसामी पनास हमराही लोकांस पैठणी सेला व मुंडासें प्राा.

माहादाजी सिंदें बइतफाक चेतसिंग जमीदार कालपीस गेले म्हणोन येथील कारपरदाजांचे सांगितल्याप्रमाणें पूर्वी वर्तमान लिहिलं आहे. सांप्रत खारिज वर्तमान यैकिलें कीं सिंदे माार माघारा झांसीस येणार व छावणीकरितां उजनीस जावयाचा निश्चय आहे.

हैदरआलीखान आरकाटेसमीप लाला पेंटेवर व जनराल कूट त्रिपासुरासमीप आहे म्हणोन पूर्वी लिहिलं आहे. सांप्रत खारिज यैकिलें कीं खान माराचे तरफेनें आपाजीराम फौजेचे निगाहदास्तीकरितां रवाना जाहला आहे. बादामीस येऊन विज्यापूर वगैरे जिल्यांतील स्वारांची निगाहदास्त करणार.

इंगरेजांचे निसबती सवदागरी जाहाजें दोन लवंगा वगैरे किरान्याचीं कालीकोट बंदरीहून मुंबईस येत होती तें पंतप्रधानांचे तालुकियांत विजयदुर्गवाल्यानीं समुद्रातून पाडाऊ करून विजयदुर्गास आणलीं म्हणोन गोविंदराव कृष्टण यांचे जुबानीं यैकिलें.

छ १५ व छ १६ रोजी बालाजीपंत लश्करांत हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. छ १५ माहे माारी उदेष्टेण वकीलासी खिलवत जाहली. छ १६ रोजी लक्ष्मणराव रास्ते खिलवतेंत होते.

———

पैाा छ २३ सफर.

२

पुरवणी आखबार पुणें छ १६ सफर सन ११९६ हिजरी.

लग्नोत्सहाकरितां पंतप्रधानानीं वाफगांवास यांवें म्हणोन तुकोजी होळकरानीं बहुत आग्रहपूर्वक बालाजीपंतास सांगोन गेले. त्यास पंतप्रधान लग्नाकरितां जाणार व छ १७ माहे माारीं डेरे दाखल होणार म्हणोन खारिज वदंता आहे. कारपरदाजांचे जुबानीं जाण्याचा निश्चय नांहीं. बालाजी जनार्दन छ १७ रोजीं डेरे दाखल होऊन छ १८ माहे माारीं स्वार होऊन वाफगांवास जाणार व सत्वरच माघारा येणार. बालाजीपंत माघारा आल्यानंतर हरीपंत जाणार म्हणोन यैकिलें.

पंतप्रधानांची व उदेष्टण वकीलांची कासदजोडी पत्रासहित कासीस मेस्तर हिस्तैनाकडें रवाना जाहली.

उदेष्टेण वकील व येथील कारपरदाजांचे खिलवतेचा खुलासा पूर्वील पत्रीं खारिज यैकिल्याप्राा लिहिला आहे. त्याहून विशेष कांहीं सांप्रत यैकिल्यांत आलें नांहीं.

भवानी सिवराम स्वारांची निगाहदास्त करीत आहे. च्यारपांचसेपर्यंत लोक जमा जाहले आहेत. हाजरी घेऊन नावनिसी व राजमरा देण्याचा करार केला आहे.

इंगरेजाकडील दोनसें लोक पळोन आले. त्यास बालाजीपंतानी चौकीपाह-याचे तकयुदीनें ठेविलें आहे व ते लोक नौकरीचे उमेदवार. परंतु इंगरेजांचे निसबती लोकांचा विश्वास नांहीं याकरितां बंदुखा घेऊन सोडणार म्हणोन यैकिलें. सेवेसी श्रुत होय हे विनती.

A. R. No. 180

१७ सफर ११९६ हिज़री
१ फेब्रुवारी १७८२

पैा छ २३ माहे सफर संन ११९६ हिजरी रोज गुरुवार डांकेवर मै दारोगा हरकारा.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ १७ माहे सफर मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेषे येथील वर्तमान छ १२ माहे मजकूर रोज रविवारी प्राथःकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले आसेल. तदनंतर येथील वर्तमान होलकराचे येथे लग्न आहे म्हणोन होलकर खासां येथे आक्षत श्रीमंतास वगैर द्यावयास आले होते हे विनंतीपत्री लेखण केले होते त्याजवरून ध्यानास आले आसेल. होलकरानी श्रीमंतास व कारभाऱ्यास वगैर लग्नाची आक्षत देऊन येक दिवस येथे राहून मागती वाफगावास गेले. होलकर आक्षतेस आले होते म्हणोन श्रीमंतानी व कारभाऱ्यानी वगैर होलकरास वस्त्रे दिल्हीं. होलकराचे पुत्राचे लग्न माहे मजकुरी वद्य ७ सप्तमीस आहे. लग्नास श्रीमंत वाफगावास जाणार यैसी वदंता आहे परंतु निश्चयात नाही. मग जातात किंवा राहतात हे पाहवे. परंतु नाना व हरीपंत वगैर सर्वत्र होलकराचे येथे लग्नास जाणार. लग्नाचा समारंभ करून मागती पुण्यास येनार. मग कारभारी वगैर लग्नास गेल्यावर लेखण केले जाईल. शृत होये. इंग्रजाकडील सौदागिरी ज्याहाज बंदराकडून येत होते. त्यास सुवर्णदुर्गाचा किला श्रीमंता-

कडे आहे तेथील किलेदारानी ते सौदागीरी ज्याहाज वळून आणिले. सरकारदाखल केले. ज्याहाजात दोनतीन लक्ष रुपयाचा माल होतां व दाहापंधरा तोफा ज्याहाजात सापडल्यां यैसे वर्तमान आले. शृत होये. दरबार वगैर जाला होतां. माली मुलकी वगैर कामकाज जाले. विदित होये. छ १३ माहे मजकूर रोज सोमवार इंग्रजाचे वकीलाकडील हरबा णामे दुभासे हरीपंताचे डेऱ्यास आले होते. नानाही हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. नाना व हरीपंत व माधोराव सदासिव व इंग्रजाकडील वकीलाचा कारभारी याचा खिलवत जाला. खिलवत वगैर होऊन नाना आपले घरास आले व इंग्रजाकडील कारभारी आपल्या डेऱ्यास गेले. खिलवतीचा भाव यैकिल्यात आलां की इंग्रजाकडील वकीलानी मम-ईस गाडरास पत्रे लिहिली होती त्याची उतरे आली यैसे वर्तमान यैकिल्यात आले. दुसरी वंदता आहे की उतरे आद्याप आली नाहीत यां आन्वये खिलवत जाला. इंग्रजाकडील ममईहून काये जे उतरे येतील हे वर्तमान कलल्यास लेखण केले जाईल. मुख्य प्रकार इंग्रजाचे बोलणे आहे की हैदर नायेकासी बिघाड केल्यास सर्व दारमदार होतील. कार-भाऱ्याचे मानस आहे की नाईक मजकुरासी बिघाड न होता दारमदार जाल्यास करावा व श्रीमंत दादासाहेबास हाती घ्यावे यैसे येथील कार-भाऱ्याचे मानस आहे. परंतु इंग्रजाचे मानस आहे की हैदर नायेकासी बिघाड तुम्ही केल्यास मग तुमचे दारमदार जे करणे ते करू यैसी त्या-ची भाषणे आहेत. उभयेपक्षी बोलण्याचे भाव यांप्रकारचे आहेत. मग काये निश्चये होऊन ठरेल हे पाहावे. उभयेपक्षी बोलणे अवघडच आहे. निश्चयात येणे दीर्घसूत्रांवर दिसते. मग पाहावे. विदित होये. इंग्रजाचे पातशाहाकडील नव ज्याहाजे विलायेतीहून ममईस आली. ज्याहज्यात पांचपाचसे सातसातसे मणुश आहे व काही गोरेही आहेत यैसे वर्त-मान येथे आले. त्या ज्याहाजातून काही ज्याहाजे चिणांपटनास इंग्र-जाचे साहित्यास जाणांर यैसे वर्तमान आहे. प्रस्तुत इंग्रजानी सर्व जमाव चिणांपटणाकडे मातबर केला आहे. ममईस वगैर पांचसात पलटने मात्र आहेत. बाकीं सर्व पलटणाचा जमाव चिणांपटणाकडेच त्याणी केला आहे. हैदर नायेकासी व त्यासी तिकडे लडाईचाच प्रसंग आहे

यैसे वर्तमान आहे. विदित होये राजश्री गोविंदराव गायेकवाड येथून दाहापंधरा कोस कूच करून गेले. घोडनदीवर मुकाम करून आहेत. पुढे कांडाईबरीकडे जाणार. प्रस्तुत त्यांजवल हजार दोन हजार स्वार आहेत. त्याची खर्चाची सोये नाही. देण्याचा गवगवा विशेषे. नेमल्याप्राणे फौज जमा नाहीं यैसे आहे. प्रस्तुत रोा गायेकवाड मजकूर येथून कूच करून गेले. घोडनदीवर आहेत. काही खर्चाची वगैर सोये जाल्यास व फौज जमा जाल्यास पुढे कूच करून जातील यैसे त्याजकडील वर्तमान आहे. मागती गायेकवाडाकडील काये जे वर्तमान येईल ते लेखण केले जाईल. शृत होये. छ १४ माहे मजकूर रोज मंगलवार इंग्रजाकडील वकीलाचे बोलण्याचे भाव वगैर सर्व लेहून सिंद्यास व हैदर नायेकास लिहून पाठविले आहेत. उभयेपक्षी उतरे आल्यावर इंग्रजाचे वकीलासी बोलणे ते बोलावे यैसेही यांचे मानस आहे. परंतु सिंद्याचे उतराची मार्गप्रतिक्ष्यां विशेषे आहे. त्याचे लिहिल्याप्राणे वकीलासी बोलावे यैसे आहे. शृत होये. ममईस इंग्रजाचे वकीलानी काही मेवा वगैरच्या बंग्या पाठविल्या. इंग्रजाचे वकीलाभोंवती याची चौकी आहे. तिकडे कोन्ही जात नाही. याजकडील येक फिरंगी तिकडे गेला होतां त्यास कैद करून गडास पाठविले. येकदोन बोहरी माल पाहण्यास गेला होता त्यास आनून सिक्ष्यां केली यैसे आहे. शृत होये. छ १५ माहे मजकूर रोज बुधवार. नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. इंग्रजाकडील वकीलही हरीपंतांचे डेऱ्यास आले होते. नाना व हरीपंत व माधोराव सदासिव व इंग्रजाकडील वकील याचा खिलवत प्रहर रात्रपूर्वपर्यंत जाला. उपरांतिक नानां आपले घरास आले. इंग्रजाकडील वकीलही आपल्या डेऱ्यास गेले. खिलवतीचा भाव मुख्य प्रकार यैकिल्यात आला कीं इंग्रजाचे मानस हैदर नायेकासी बिघाड करावां, आमचे मदतेस फौज द्यावी, हैदरचे पारपत्य करावे. हा प्रकार जाल्यास तुमचे आमचे दारमदार सर्व होतील. वसई वगैर स्थळे तुमची तुम्हास देऊ यैसी त्याची बोलणे आहे. कारभाऱ्यानी वकीलाचा खुलासां पाहण्यास उतर केले की तुम्ही हैदरसी बिघाड करा म्हणतां व फौज मागतां त्यास आम्हास तुमचे मसलतीमुळे खर्च फार जाला व कोठीलही मोहिम न जाली फौजेचे

खर्चास क्रोड रुपये तुम्ही दिल्हयास हाही प्रकार घडल. आणिक कितिक प्रकारे भाशणे जाली या आन्वये खिलवतीचे वर्तमान यैकिल्यात आले. पुढे येविशीचे वर्तमान जे ध्याणास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. शृत होये. प्रस्तुत हरीपंत वगैर मिळून येथे फौज नवदाहा हजारापर्यंत येथे जमा आहे. शृत होये. पहिले हैदर नायेकानी यास पत्रे लिहिली होती की बंगाल्यास फौज तुम्ही रवाणा केल्यास पंचवीस लक्ष रुपये खंडणीचा यैवज दुसाला तुम्हास पाठऊन देऊ. त्याजवरून बंगाल्याचे मोहिबीस भवाणी सिवराम यास डेरे दाखल करविले आहे. नाईक मजकुराकडून खंडणीचा यैवज आल्यास पुढे भवाणी सिवराम याचे रवाणगीचा विचार यैसे आहे. शृत होये. छ १६ रोज गुरुवार राजश्री बज्याबा पुरधरे याचा खड अडीच लक्ष रुपये जाला. त्यास सोडितात हे पूर्वी येक दोन पत्री लेखन केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. बज्याबास आनावयास दोनसे स्वार व येक कारकून गेला. बज्याबा पुन्यास येणार. येथेच राहनार. शृत होये. राजश्री नाना हरीपंताचे डेऱ्यास गेले होते. उभयेताचा खिलवत जाला. उपरातिक नाना आपले घरास आले. खिलवताचा भाव यैकिन्यात आला की उदईक श्रीमंत व नाना होलकराचे येथे लग्नास जाणार व हरीपंत येथे राहनार यैसा निश्चये जाला. त्यास उदईक शुक्रवारी श्रीमंत व नाना होलकराचे येथे लग्नास वाफगावी जाणार. शृत होये. कासीचे राज्याकडील वकील येथे आला आहे. त्याची व कारभाऱ्याची भेट जाली होती. श्रीमताची भेट जाली नवती. त्यास आज श्रीमताची भेट कासीचे राज्याकडील वकीलानी घेतली. श्रीमतास वस्त्रें वगैर दिल्ही. शृत होये. उदईक शुकरवारी दो प्रहरा श्रीमत व नाना वाफगावी होलकराचे येथे लग्नास जातात. शृत होये. पुढे जे प्रसंगाचे वर्तमान ध्यानास येईल ते लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 181

१८ सफर ११९६ हिजरी
२ फेब्रुवारी १७८२

पैा छ२५ माहे सफर सन ११९६ हिजरी, शनिवार च्यार घटिका दिवस शेष राहेसमई मये दारोगे हरकारे.

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सां नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान ताा छ १८ सफर, माघ वद्य पंचमी, शनिवारपर्यंत वास्तव्य पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ१७ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत हुजूर अर्जी व अखबार व पृथक पुरवणी पत्रीं स्वामीचे सेवेसी वर्तमान लिहून डांकेवर रवानगी केली आहे. दारोग्याचे विद्यमानें पत्रें हुजूर व स्वामीचे सेवेसी पावतील. माहदाजी सिंद्यानीं तोतियाचें पारपत्य केले व सखारामपंत व मोरो बाबूराव वगैरेस कैद केलें याचा गरूर बहुत जाहला व समग्र कारभार आपण करावयाची इछा करीत होते. याकरितां हरीपंत वगैरे कारपरदाजांस असाध्य होऊन सिंद्यांस खारज केले व होळकरांचे बानीकार हरीपंत जाहले याकरितां होळकराची खातरदारी हरीपंत व बालाजीपंतास बहुत आहे. सांप्रत तुकोजी होळकराचे इछेप्रमाणें वाफगांवास लग्नास जावयाकरितां छ १८ माहे माारीं पंतप्रधान डेरे दाखल जाहले. उदईक छ १९ रविवारीं कारभाऱ्यांसहित स्वार होऊन वाफगांवास जाणार. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनती.

———

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ १७ सफर लगायत छ १८ माहे माार सन ११९६ हिजरी, माघ मास शनिवार.

तुकोजी होळकरांनी पंतप्रधानास लग्नास यावयाची आक्षत देऊन छ १३ रोजीं वाफगांवास गेले. माहदाजी सिंदे झासीस येणार व छावणी उजनीस करणार म्हणोन खारिज वर्तमान हैदरआली-खानाचे तरफेनें आपाजीराम फौजेचे निगाहदास्तीकरितां बादामीस येणार म्हणोन खारिज यैकिलें व पंतप्रधान व बाळाजी जनार्दन वाफगांवास लग्नांकरितां जाणार यावितरिक्त अवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व आखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान हुजूर व स्वामीचे सेवेसी श्रुत जाहलें आसेल. त्याउपरी प्रत्यक्ष व यैकिलें वर्तमान दफेवार सेवेसी लिहिलें आहे.

वाफगांवास होळकरांचेथें लग्नास जाण्याकरितां छ १७ माहे माार शुक्रवारीं अस्तमानीं बालाजीपंत डेरे दाखल जाहले व पंतप्रधानानीं सुमुहूर्तानें प्राथःकालीं डेरे दाखल व्हांवें म्हणोन निश्चय केला.

छ १८ माहे माार शनिवारीं अरुणोदई पंतप्रधान हवेलीहून स्वार होऊन डेरे दाखल जाहले. बालाजीपंत व हरीपंत वगैरे लोकानी नजरा केल्या. तोफांची शलक जाहली. छ माारीं मुकाम जाहला. छ १९ माहे माार रविवारीं नव कोसाचे कूच्याचा नेम जाहला. भीमातीर पिंपळगांवासमीप मुकाम होणार. छ २० सोमवारी वाफगांवास जातील. हरीपंत वगैरे तमाम सरदारांनी हमराह जांवें म्हणोन तजवीज जाहली आहे. भवानी सिवराम व खंडेराव त्र्यंबक वोछेकर पुण्यासमीप राहणार.

बज्याबा पुरंदरे चंदनगडावर कैदेंत आहेत. त्यास गडाहून काढून पुण्यास आणावयाची तजवीज कारपरदाजानीं केली आहे. कारकून व पागाचे स्वार शंभर छ १७ माहे माारी रवाना जाहले आहेत. मुंबईस इंगरेजांची जाहाजें सतरा जंगी सरजामासुधां आलीं म्हणोन खारिज यैकिलें.

पंतप्रधानासमागमें पांचसात हजार फौज व दोनतीन हजार बार वगैरे जाणार. डेऱ्याचे गिर्दनवाह व स्वारींत नेमिले लोकानीं चालावें व राहावें व चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त विशेष केला आहे.

नूरमा।खान व नरसिंगराव वकील नि।। हैदरआलीखान वगैरे समग्र श्रीमंतासमागमें जाणार. याउपरी जे विशेष वर्तमान होईल ते सेवेसी लिहीन हे विनती.

A. R. No. 182

१९ सफर ११९६ हिजरी
३ फेब्रुवारी १७८२

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ १९ माहे सफर मुा काा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ १७ माहे मजकूर रोज शुक्रवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान होळकराचे येथे लग्नास श्रीमंत व नाना वगैरे कारभारी जाणार यैसा निश्चये ठरला होता हे विनंतीपत्री लेखन केले होते. मागती निश्चये कारभारी याणी ठराविला कीं श्रीमंतास न नेता आपणच जावे व हरीपंतानी येथेच राहावे. यैसा निश्चय करून दोन घटका दिवस शेष राहातां नाना लग्नास जावयाकरितां डेरे दाखल जाले. प्रथम प्रहररात्रीस वाफगांवाहून होलकराकडून रोा पाराजीपंत येथे आले. कारभारी याची भेट घेतली, सांगितले कीं होलकरानी लग्नास श्रीमतांस व आपणास अगत्यरूप बोलाविले आहे. त्याजवरून कारभारी याणी निश्चये ठराविला कीं श्रीमंतासही लग्नास घेऊन जावे. मागील दोन घटिका रात्र शेष राहाता मोहर्त करून श्रीमंत वाफगावी होलकराचे येथे लग्नास जावयाकरितां डेरे दाखल होणार. श्रुत होये. छ १८ रोज शनवार दोन घटिका रात्र शेष राहाता श्रीमंत पंतप्रधान वाफगावी होलकराचे येथे लग्नास जावयाकरितां डेरे दाखल जाले. डेरे दाखल होता तोफा वगैरेची सिलक जाली. तमाम मुत्सदी वगैरेही लग्नास जातात. श्रीमंताचा मुकाम आज डेऱ्यास जाला. उदईक रविवारी श्रीमंत पंतप्रधान व नाना व हरीपंत वगैरे कूच करून

वाफगांवी होलकराचे येथे लग्नास जातात. येथून वाफगाव तेराचवदा कोस आहे. मधे येक मुकाम करून सोमवारी लग्नाचे दिवसी वाफगावी पोहोंचणार. तीनच्यार दिवस वाफगावी राहून लग्न-समारंभ करून मागती श्रीमंत व कारभारी वगैर पुण्यास येणार. श्रीमंतासमागमे पांचसात हजार फौज जाणार. इंग्रजाकडील वकील येथे आहेत. त्यांसही समागमे घेऊन जाणार, यैसी योजना केली आहे. श्रुत होये. गणेशपंत बेहरे पांच्यार हजार फौजेनसी कोडाई-बारीवर होते, त्यास होलकराकडील कांहीं हजार दोन हजार फौज व दोनतीन हजार पेंढारी मिलाले. याप्रो गणेशपंतापासी जमाव जाला. प्रस्तुत वर्तमान आहे कीं गणेशपंत पांचसात हजार फौजेनसी कोंडाईबारी उतरून खाले गेले. इंग्रजाकडील पलटणे दोनतीन व कांही फतेसिंग गायेकवाडाकडील फौज सोनगडास आहे. त्या पलटणासी व गणेशपंत बेहरे यांसी लडाई होणार यैसी वदंता आहे. मागती तिकडील वर्तमान आलिया लेखन केले जाईल. श्रुत होये. इंग्रजाचे पातशहाकडून विलायेतीहून नवदहा जहाजे जंगी ममईस आली हे विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून श्रुत जाले असेल. प्रस्तुत वर्तमान आहे कीं विलायेतीहून इंग्रजाची जाहजे जंगी चवदापंधरा ममईस आली. ते जहाजे चिनापटणास इंग्रजाचे मदतीस जाणार. चिनापटणाकडे इंग्रजासी व हैदर नाइकासी लडाईचा प्रसंग आहे यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. इंग्रजाकडील वकील येथे आहे. त्या पो॥ येक इंग्रज ममईस गाडराकडे कांही जाबसालास जाणार यैसे वर्तमान आहे. गेल्यास सेवेसी लेखन केले जाईल. श्रुत होये. उदईक रविवारी श्रीमंत व कारभारी भोज्यनउतर स्वार होऊन वाफ-गावास जाणार. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. छ १० माहे माारचे आज्ञापत्र डाकेसमागमे सादर केले ते छ १७ माहे माारी पावले. पावोन संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. N. 183 २५ सफर ११९६ हिजरी

९ फेब्रुवारी १७८२

पैा छ ३ रबिलावल सन ११९६ हिजरी शनिवार अडीच प्रहर दिवस आल्यावर मये दारोगे हरकारे.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल तां छ २५ माहे सफर मुा पुणे स्वामीचे कृपोवलोकणेकरून येथास्थित जाणून स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २१ माहे मजकूर रोज मंगलवारी प्रहर दिवस चढतां वाफगावचे मुकामीहून विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान श्रीमंत व कारभारी वगैर होलकरांचे येथे मांडवात गेले होते. नाच वगैर जाला. उप्रांतिक श्रीमंतास येक पोशाक दिल्हा. चार घटका नाच वगैर पाहून उप्रांतिक श्रीमंत व कारभारी वगैर आपल्या डेऱ्यास आले. शृत होये. छ २२ माहे मजकूर रोज बुधवार चार घटका दिवस शेश राहतां श्रीमंत होलकराचे घरास गेले होते. होलकराचा वाडा वगैर पाहिला. दोन घटका वाड्यांत बसले होते. उप्रांतिक श्रीमंत व कारभारी वगैर वाड्यांतून मांडवात आले. घटका नाच वगैर पाहिला. होलकरानी श्रीमंतास बादली पोशाक दिल्हा व मोत्याची कंठी दिल्हीं व सिरपेंच दिल्हा व हाती येक लाहाणं छावा त्याजवर जरी जिण व जरी झूल होती. यां सरंजामानसी हांती दिल्हा व येक घोडां दिल्हां. याप्रमाणे श्रीमंतास देऊन मांडवापासून येका बाणांचे अंतरांने टेकडी होती त्या टेकडीवर श्रीमंतास व कारभारी वगैर यांस आतशबाजीचा तमाश्या पाहावयास होलकराने नेले. दोन घटका आतशबाजीचा तमाशां पाहिला. उप्रांतिक श्रीमंत व कारभारी आपल्या डेऱ्यास आले. उदईक श्रीमंत रुकसत होऊन पुण्यास कारभाऱ्यासहित जाणार. शृत होये, छ २३

माहे मजकूर रोज गुरुवारी श्रीमंत व कारभारी वगैर याचे कूच जाले. होलकराचे येथे निरोपास श्रीमंत व कारभारी व मानकरी सरदार वगैर मुतसदी गेले. श्रीमंतास येक बादली पोशांक दिल्हां व नानास पोशाक व सिरपेंच दिल्हा व हरीपंतास पोशाक व येक सिरपेंच दिल्हा व मानकरी व मन्हाटें सरदार व मुतसदी वगैर यांस साडेतीन वस्त्रे दिल्हीं. याप्रमाणे रुकसती होऊन प्रहर दिवस शेश राहातां श्रीमंत व कारभारी वगैर वाफगावीहून स्वार जाले ते पांच कोस मुकामास पिंपगावास आले. उदईक शुक्रवारी दोन घटका दिवस पूर्व येतां वाड्यात दाखल व्हावे मुहूर्तानसी म्हणोन मध्येरात्री कूचाचा नगारां केला. दीड प्रहर रात्र शेश राहतां श्रीमंत व कारभारी वगैर स्वार जाले ते शुक्रवारी प्रा:थकाली पुण्यास दाखल जाले. मुहूर्तानसी श्रीमंत व कारभारी वगैर आपल्या वाड्यात दाखल जाले. शृत होये. छ २४ माहे मजकूर रोज शुक्रवार श्रीमंत येक घटका दिवस पूर्व येतां पुण्यास आपले वाड्यांत दाखल जाले. तोफाची वगैर सिलक जाली. नानाही आपले वाड्यात दाखल जाले व हरिपंत बाहेर आपले डेऱ्यास राहिले. पांचच्यार दिवस लग्नप्रसंगाचाच समारंभ जाला. विशेष काही वर्तमान नाहीं. श्रीमंत व कारभारी वगैर तीनच्यार दिवस लग्नप्रसंगास वाफगावी होते. नित्य येक पोशाख श्रीमंतास होलकर देत होते. रुकसतीच्यां वेलेस हांती व घोडां व जोहर वगैर श्रीमंतास होलकरानी दिल्हे व नानासही तीन पोशाक दिल्हे व हरीपंतासही दोनतीन पोशाक दिल्हे. बाकी लोकास वगैर वस्त्रे दिल्हीं. याप्रमाणे पाचच्यार दिवस लग्नसमारंभ होऊन श्रीमंत व कारभारी वगैर पुण्यास आले. श्रीमंतासमागमे पांचसात हजार फौज होती. शृत होये. राजेश्री बज्याबा पुरंधरे याची मुक्तता जाली. त्यास आणांवयास स्वार व कारकून गेले होते. हे पूर्वी येकदोन पत्री लेखण केले होते त्याजवरून शृत जाले असेल. आज बज्याबा पुरंधरे पुण्यास येऊन आपले वाड्यात दाखल जाले. श्रीमंताची व कारभाऱ्याची भेट उदईक होणार. भेटी वगैर जाल्यानंतर लेखण केले जाईल.

विदित होये. पुढे जे प्रसंगाचे वर्तमान ध्यानास येईल ते लेखण केले जाईल. शृत होये. छ १७ माहे मजकूरचे आज्ञापत्र डांके-समागमे सादर जाले ते छ २४ माहे मजकुरी पावले. पाऊन बहुत संतोष जाला. पहिले दोनतीन विनंतीपत्री गावखेडयाविशी मजकूर लिहिला होता की सिवरामपंत वगैर यानी यैवज घेतला आहे ते देत नाहीत, येविशी कृष्टणरावजीस सांगावे. त्याजवरून आज्ञापत्री सादर केले की तुमचेविशी रावजीस सांगतो. त्यास सर्व प्रकारे आमचा अभिमान स्वामीस आहे. आम्हांविशी कृष्टणरावजीस खचित सांगावे की गावखेडयास उपद्रव न होये. घेतला यैवज माघारा ये, याप्रमाणे रावजीस ताकीद व्हावी. सर्व प्रकारे माझा अभिमान स्वामीस आहे. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 184

२६ सफर ११९६ हिजरी
१० फेब्रुवारी १७८२

पैा छ ४ रबिलावल सन ११९६ हिजरी रोज रविवार मये दारोगे हरकार तीन प्रहर दिवस आल्यास पावले.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा २६ माहे सफर मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २५ माहे मजकूर रोज शणवारी प्रा:थकाली विनंतीपत्र श्रीमंत व कारभारी वगैर वाफगावीहून लग्नप्रसंग होलकराचे येथील करून पुण्यास आल्याचे व राजश्री बज्याबा पुरंधरे किल्याहून मुक्त करून पुण्यास आणिले हे सविस्तर वर्तमान लेखण करून डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्याणास येईल. तदनंतर येथील वर्तमान

राजश्री बज्याबा पुरंधरे पुण्यास आपले वाडयात आहेत. सत्रा आठरां मानसे त्याचे निसबतीस पहिलेपासून ठेविले आहेत तितके मात्र त्याजपासी आहेत. बाकी आसपास चौकसीस आसपास पंचवीस तीस गारदी आहेत. येका दो दिवसानी श्रीमंताची व कारभारी वगैर याची व बज्याबाची भेट होणार. भेटी जाल्यानंतर चौकी वगैर उठवितील यैसे आहे. राजश्री धोंडोबा आपा पुरंधरे बज्याबास जामीन जाले आहेत. अडीच लक्ष रूो त्याचा खंड जाला. प्रस्तुत बज्याबा आपले वाडयात आहेत. पुढे त्याजकडील जे वर्तमान ध्याणास येईल ते लेखण केले जाईल. इंग्रजाकडील वकील येथे आहेत. त्याजला कासीकडील इंग्रजाचे पत्रे आली. ते पत्रे कारभाऱ्याकडे धरली आली. पत्रे फोडून त्याची चौकसी करणार. पत्राची चौकसी होऊन वर्तमान कलल्यावर लेखण केले जाईल. शृत होये. श्रीमंत पर्वतीस देवदर्शणास गेले होते. दर्शण करून संध्याकाली वाडयात आले. विदित होये. श्रीमंतास होलकरानी लग्नप्रसंगात तीनच्यार पोशाक व हांती व घोडां व ज्यव्हायेर वगैर दिल्हे व कारभारियास वस्त्रे वगैर दिल्ही हे वर्तमान विनंतीपत्री लेखण केले होते त्याजवरून ध्यानास येईल. विदित होये. पुढे जे प्रसगाचें वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 185 २ रबिलावल ११९६ हिजरी
१५ फेब्रुवारी १७८२

पैा छ ९ रावल फाल्गुण शुध दशमी रविवार प्रथम प्रहर डाकेबरोबर पत्रे आली सन ११९६ हिजरी.

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ २ माहे रबिलावल मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनकरून येथास्थित जाणोन स्वानंद

लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २६ माह सफर रोज रविवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान सिवरात्र म्हणोन श्रीमंत व नाना वगैर पाशाणास दोन कोस देवदर्शनास गेले होते. दर्शन करून संध्याकाली वाड्यात आले. श्रुत होये. दरबार वगैर जाला न होता. विदित होये. छ २७ रोज सोमवार इंग्रजाचे वकील येथे आहेत. पहिले त्यांचा येकदोन खलवत जाला. त्याचा भाव पूर्वीच विनंतीपत्री लेखन केला होता त्याजवरून ध्यानास आले असेल. प्रस्तुत आठपंधरा दिवस जाले त्यांचे कांही खिलवत जाले नाही. उभयेपक्षींही मुदे भारीच. तेव्हां राजकारण होणे कठीण आहे. वकीलानी ममईस पत्रे लिहिली आहेत त्याचे उतर प्रतिउतर काये येऊन जाबसाल होईल हे पाहावे. परंतु इंग्रजाचे राजकारण होणे दीर्घसूत्रावर आहे. श्रुत होये. हैदर नाइकाकडील वकील होलकराचे येथे लग्नास गेले होते. नाईक मजकुराकडील आहेर वकीलानी होलकरास येणे प्रो केला. वस्त्रे व येक मोत्याची कंठी व येक सिरपेंच या प्रो आहेर केला. आहेराचा मुबादला होलकर नाईक माारास वस्त्रे वगैर जवाहराचे डागिने येकदोन पाठविणार. श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. श्रुत होये. छ २८ रोज मगलवार राजश्री मानाजी फांकडे हे इकडे बालेघाटाकडे होते. तेथून से दोनसे रावतानसी निघोन अजंठ्याचे घाटाखाले फरदापुराजवल खांदेश प्रांती डोंगरात वशागडावर भिल वगैर मेलऊन खूळ केले हे पूर्वी विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून श्रुत जाले असेल. त्यास फाकडे मजकूर याणी सें दोनसे राऊत व भिल वगैर पांचसातसे माणसे मेलऊन वशागडावर खूळ केले आहे त्याचे पारपत्यास येथून दोनतीन पागा मिळून पांचसातसे राऊत पाठवावे यैसा निश्चये जाला आहे. येका दो दिवसानी पागा रवाना होणार. रवाना जालिया लेखन केले जाईल. दुसरे, फाकडे मजकूर याणी खूळ केले म्हणून त्याचे पारपत्यास

शहरीहून सुभ्याकडून कांही धौस गेली यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. राजश्री बज्याबा पुरंधरे येथे आले हे येकदोन विनंतीपत्री लेखन केले होते त्याजवरून श्रुत जाले असल. बज्याबाची व श्रीमंताची व कारभारी वगैर यांची अद्याप भेट जाली नांही. अद्याप त्यांजवर चौकीपाहरा आहे. जामनी वगैरचा फडशा जाल्यावर त्यांजवरून चौकी उठवावी यैसा निश्चये जाला आहे. श्रुत होये. छ २९ माहे सफर रोज बुधवार श्रीमंत पंतप्रधान व नाना जेजुरीस व मोरेश्वरास व जोगाईचे आंब्यास व सिध्धटेंकास वगैर देवदर्शनास जावे, सर्वत्र देवाचे दर्शन करून पंधरा दिवसांत पुण्यास यावे यैसी यौजना जाली आहे. छ २ माहे मजकुरी शुक्रवारी दो प्रहरानंतर निघणार यैसा निश्चये आहे. निघाल्यावर लेखन केले जाईल. श्रुत होये. हैदर नाइकाकडून वर्तमान आहे कीं नाईक मजकुरासी व इंग्रजासी चिनापटणाकडे मोकाबला आहे. परस्परे लढाईही होत असते. उभयेंपक्षीही जमाव भारी आहेत यैसे वर्तमान आहे. श्रुत होये. राजश्री कृष्णरावजी माहे मजकुरी येजमानसाहेबाचा निरोप घेऊन येथे येणार यैसी वदंता आहे. श्रुत होये. दरबार वगैर जाला होता. माली व मुलकी वगैर कामकाज जाले. श्रुत होये. छ १ माहे मजकूर रोज गुरुवार श्रीमंत पंतप्रधान व नाना वगैर मुत्सदी मंडली श्रीजेजुरीस व मोरेश्वरास व सिध्धटेंकास वगैर देवदर्शनास जांवे यैसा निश्चये जाला. सर्वत्र देवदर्शने करून दाहापंधरा दिवसांत पुण्यात यावे यैसा निश्चये करून उदईक शुक्रवारी दो प्रहरानंतर श्रीमंत व नाना वगैर निघणार. नानाचा निश्चये आहे कीं श्रीमंतासमागमे जेजुरीपावेतो जावे, तेथून आपण मेनोलीस कृष्णातीरास जाणार व श्रीमंत मोरेश्वर वगैरस देवदर्शनास जाणार यैसे ठरले आहे. उदईक शुक्रवारी मोहोर्त करून श्रीमंत व नाना निघणार. हरीपंत येथे राहणार. मजमदाराचे येथे लग्न आहे. तेही श्रीमंतासी व कारभारी यासी रदबदली करितात कीं लग्नप्रसंग करून दो चौ दिवसानी निघावे. त्यांचे येथे उदईक शुक्रवारचे लग्न आहे म्हणून ते रदबदली करितात. परंतु श्रीमंताचा व नानाचा निश्चये

उदईक निघावयाचा जाला आहे. दो प्रहरानंतर निघणार. तयारी वगैर करितात. मोहर्त करून निघोन स्वार जाल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये. राजश्री नाना हरिपंताचे डेरियास गेले होते. उभयेताचा खलवत जाला. खलवत होऊन नाना आपले घरास आले. खलवताचा भाव यैकिल्यात आला कीं उदईक शुक्रवारी छ मजकूर माहे माारी दो प्रहरानंतर श्रीमंत पंतप्रधान व नाना वगैर बाहेर निघोन जेजुरी वगैर देवाचे दर्शनास जाणार व हरीपंत येथे राहणार. श्रीमंत वगैर स्वार जालिया लेखन केले जाईल. श्रुत होये. राजश्री धोडोबा आपा पुरंधरे, बज्याबाचे चुलते, ते बज्याबास जामीन होणार होते. त्यांचेच विद्येमाने बज्याबा आले. त्यांस दोनतीन दिवस समाधान वाटत नहोते. आज धोडोबा आपा पुरंधरे शांत जाले. बज्याबास सुतक आहे. श्रुत होये. शक्रमनाचे तील शर्क्रायुक्त सादर केले ते पावले. तील पावले, अज्ञापत्रे नव्हती. तील बहुत प्रीतीकरून स्वीकारिले. सदैव आज्ञापत्री परामृश होत असावा. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 186

३ रबिलावल ११९६ हिजरी
१६ फेब्रुवारी १७८२

पैाा छ १० माहे रबिलावल संन ११९६ हिजरी रोज शेनिवार घटका रात्री डांकेवर मै दारोगा हरकारा.

श्रीनिवास १।४

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार विनती उपरी येथील वर्तमान तााा छ ३ माहे रबिलावल फाल्गुण शुध चतुर्थी शनिवारपर्यंत वास्तव्य पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ २ माहे माारीं हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र डांकेवर रवाना केलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें

असेल सांप्रत अखबारेसहित अर्जी व पृथक पत्रीं येथील वर्तमान लिहून स्वामीचे सेवेसी पाठविलें आहे. दारोग्याचे विद्यमानें पत्रें सेवेसी पाऊन वर्तमान श्रुत होईल. हैदरआलीखानांचे वकीलासीं व उभयतां कारभाऱ्यासी छ २ माहे माारचे रात्रीस व छ ३ शनिवारी येकांत बहुत जाहला. कोण्ही इनेहिताचे मुखं खिलवतेचा खुलासा यैकिला कीं मुंबईकर इंगरेजाचा वकील उदेष्टेण ज्वाबसालाकरिता आला आहे. त्यास निश्चयरूप रुखसत करावें व कृष्टणराव बलाळ यांस हुजूरीहून बोलाऊन आणांवें, दारमदाराचा ज्वाबासाल सर्वथैव इंगरेजासीं न करावा येविषईचा निश्चय कारभाऱ्यांपासून वकीलानी करून घेतला आहे. बालाजीपंत फडनीस मेनवलीहून आल्यानंतर जें आमलांत येईल व पुन्हां तहकीक वर्तमान कळेल तें हुजूर व स्वामीस लिहून पाठवीन. मौजे मुधळवाडीचे दहकचे यैवजीं व जमीदाराचा हक रुसूम त्यांस न देतां श्रीमंतास द्यावा या दोन्ही बाबतीचे यैवजावर पांचसे रुपये हवल माहावत पागे यास रुपये देणे म्हणोन कारभाऱ्यानीं वरात सेवकावर केली याचा विस्तार पृथक पुरवणींत लिहिला आहे. जमीदार जबरदस्तीनें स्वार प्यादे पाठऊन हक रुसूम नेत आहेत व दहकचे रुपये रयतीस सिवाय जमाबंदी मागितल्यास पळून जातात या अर्थीं यैन मालात द्यावे व दोनच्यार वेळा पटी जाहली. परंतु सेवकास तगादा जाहला नांही. सांप्रत तगादा जाहला या अर्थीं रुपये व इनामी सनदा राजश्री बालाजीपंत नाना व हरीपंतासमीप नेऊन देतों. सारांश, हुजूरचे लोकांचा उपयोगी कांहीं नांहीं याकरितां बेगरजीनें उपेक्षा करीत आहेत. पुरवणीपत्रावरून वर्तमान सेवेसी श्रुत होईल ब चिरंजीवहीं विनती करतील. बहुत काय लिहिणें हे विनती.

पैा छ १० माहे रबिलावल सन ११९६ हिजरी रोज शनिवार.

श्रीनिवास

पुरवणीपत्र श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनती जे सेवक हुजूरचे तरफेनें सतराअठरा वर्षें श्रीमंत पंतप्रधानांचे सेवेंत

आहे. वैकुंठवासी माधवराव कृपा करीत होते व त्या समयापासून अजीपर्यंत कारभाऱ्यांची कृपा चितापासून होती. राजश्री कृष्टण-रावजीनीं हुजूरचा इनायतनामा मुतजमनतलब यावा याकरितां चिरजीव राजश्री राय रघोतमराव यांचा गौरव कोणते प्रकारें करून चिरजीवास हुजूर मार्गस्त केलें हें रावजीसच विदित. हुजूर गेल्यानंतर रावजी पंतप्रधानांचे नौकर असून हुजूरचे येकनिष्ठ याकरितां रावजीनीं चिरंजीवाचा परित्याग करून आपले मसलहतीतून खारिज केलें व रावजीस व येथील कारपरदाजांस स्पष्ट उमजलें कीं हैबतराव गोपाळ यांसीं आम्हांस कांहीच गरज नांहीं व सेवकाची रीत येक-निष्ठतेची, दुरुई नांहीं. येक हुजूरचीच दौलतख्वाहीचें लक्ष व हुजूरचा नफा होऊन पंतप्रधानांची सेवा घडावयाचें जे काम त्याजविषईं पूर्वीं बहुत वार सेवा केली व सांप्रत कृष्टणरावजीस इनायतनामा येण्याचा उपाय करून रावजीस हुजूर नेलें हें सर्वत्र प्रसिध. परंतु येथील कारपरदाजांस स्पष्ट उमजलें कीं हैबतराव यांजवर रियायत करावयाचें प्रयोजन नांहीं. छ ४ माहे मारीं पंतप्रधानासमागमें जावयाकरितां सेवक सिधता करून जावयाचे उद्योगांत. या संधीत मुधोळवाडीचे दहकाची वरात पांचसे रुपयाची सेवकाचे नांवें जाहली हें वर्तमान कळलें व फडनीसाचे कारकुनानीं सेवकाचे गुमास्त्यास बोलाऊन सांगितलें व अस्तमानीं हवल माहावतानें वरात व माणसें पा-ठविलीं कीं रुपये बरातेप्रमाणे बारगीर लोकांचा तगादा सख्त याकरितां राजश्री हरिपंताकडें चिरजीव केशवराव यांस पाठविलें व निरोप पाठविला कीं मौजे मुधोळवाडी दरोबस्त गांव सरकारांत घेणें, सनदा माघारा आणून देतों. त्यावरून हरिपंततात्यानीं हवल माहावतास सागोन पाठविलें कीं बालाजीपंतनाना येजोपर्यंत तगादा न करणें. त्यावरून फडनीस येजोपर्यंत तगादा होणार नांहीं यैसें वाटतें. बालाजी-पंतनाना व हरीपंत पुण्यास आले म्हणजे वरातेप्रमाणें पांचसे रुपये व इनामी सनदा रो॥ हरीपंतास व नानास नेऊन देतों. इतका किसा ल्याहावयाचें कारण यैसे जे स्वामीं प्रतिष्ठेनें आम्हास ठेवतील तरीच येथें प्रतिष्ठा व हे लोक भीड वागवितील. यजमानसाहबांसमीप

आमची मातबरी व येतमाद नांही त्यापक्षीं यानीं किमर्थं भीड धरावी हे विनंती.

पैा।छ १० माहे रबिलावल रोज शनिवार घटका रात्रीं डांकेवर.

श्रीनिवास

अखबार लष्कर पंतप्रधान अज इा। छ २ रबिलावल लगायत छ ३ माहे माार सन ११९६ हिजरी शनिवार.

श्री जेजोरी व मोरेश्वरचे यात्रेकरितां पंतप्रधान छ २ माहे माारीं कूच करून थेऊरचे मुकामास जाणार. बालाजीपंत व हरिपंत पंतप्रधानाचे समागमें जात आहेत व मानाजी फांकड्याचे तंबीकरितां दारकोजी निंबाळकर, पागे व खंडेराव त्र्यंबक वगैरे तीन हजार फौजेनसी जात आहेत यावितरिक्त आवांतर वर्तमानासहित हुजूर अर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचे वर्तमान दफेवार लिहिलें आहे.

छ २ माहे माार शुक्रवारीं अडीच प्रहर दिवस आल्यानंतर पंतप्रधान आपले हवेलीहून पालखीत बसून स्वार जाहले व पुण्याहून दोन कोसाचे फासल्यानें मौजे वानवडीसमीप डेरे दाखल जाहले. बालाजीपंत व हरीपंत पंतप्रधानांचे हमराह मुकाम माारीं डेऱ्यास गेले. पंतप्रधान थेऊरचे मुकामास जाणार म्हणोन पूर्वील अखबारेंत लिहिलें होते. त्यांस राजश्री बालाजीपंतास मौजे निधोने म्हणोन पुण्यांहून आठ कोस पश्चमेस आहे तेथें माहापुरुष नवीन दोन वर्षापासून उत्पन्न जाहला आहे त्याचे दर्शनास जाणें जरूर व तेथोन मेनवलीसहीं जाण्याची जरूरी. द्वितीय संमध करीत आहेत म्हणोन सर्वत्र जनवदंता याकरितां कितेक मातबर, मिसल लक्ष्मणराव रास्ते यांनी बालाजीपंतास विचारिलें. जनचर्चा लटकी म्हणोन उतर केलें. सारांश, बालाजीपंतास छ ४ माहे माार रविवारीं निधोन्यास जाणें व हैदरअलीखानाचे वकीलासी बोलून खान माराकडें पत्रे लिहून पाठवणें याकरितां थेऊरास मुकाम करावयाची तजवीज मवकूफ करून वानवडीसमीप मुकाम केला.

छ २ माहे माार शुक्रवारचे रात्रीस लक्ष्मणराव रास्ते व नूरमाखान व नरसिंगराव वकील नि।। हैदरअलीखान लष्करांत बालाजीपंताचे डेऱ्यास गेले. हरीपंत व बालाजीपंत बइतिफाक उभयतां वकील व लक्ष्मणराव रास्ते यांसीं नव घटका रात्रपर्यंत खिलवत जाहली. त्या उपरी रास्ते पुण्यास आले. छ ३ माहे माार शनिवारीं हैदरअली खानाचे वकीलासी पुन्हां खिलवत करून दोन प्रहर दिवसानंतर बालाजीपंतानी कूच करून निधोन्यास जांवें व पंतप्रधानाचा मुकाम होऊन दोन प्रहर रात्रीं कूच करून जावयाची तजवीज सिध जाहली. छ ३ माहे माारीं पंतप्रधानांचा वानवडीसमीप मुकाम जाहला. हैदर अलीखानांचे वकील नूरमाखान व नरसिंगराव बालाजीपंताचे डेऱ्यास आले.

२

पुरवणी अखबार लश्कर पंतप्रधान छ ३ रबिलावल सन ११९६ हिजरी. तीनच्यार घटका खिलवत जाहली. त्याउपरी वकील माार पुण्यांस आले व बालाजीपंतानी कूच करून मौजे निधोन्यास सित्धपुरुषाचे दर्शनास गेले. छ माारचे रात्रीस पंतप्रधानांचे कूच होऊन वडकीचे घांटानें जेजोरीस जाणार. समागमें हरिपंत व पांचसात हजार फौज व दोन रहकले आहेत.

मौजे निधोनें, पुण्याहून आठ कोस तेथें श्री भैरवानाथ देव आहे. त्या देवाचा पुजारी गुरव, त्यानें बारा वर्षेपर्यंत अन्न न खातां दूध पिऊन देवाची सेवा व अनुष्टान केलें. देव प्रसन्न होऊन जें बोलसील त्याप्रमाणें कार्य होईल म्हणोन स्वप्नांत देवानें सांगितलें. त्याउपरी वर्षपर्यंत निधोनचे राहणार लोकास चमत्कार आले. या गोष्टीची चर्चा प्रसिध जाहली व पालखीनिसीन व हतीनिसीन लोक यात्रेस येऊन माहापुरुषाचें दर्शन घेऊन दोन महिने च्यार महिने राहत आहेत. ज्यास संतान नांहीं त्यास पुत्र जाहले व रोग्यांचे रोग जात आहेत म्हणोन सर्वत्र लोक बोलत आहेत. राजश्री बालाजीपंत फडनवीस यांस पुत्रसंतान नांहीं व स्त्रिया तीनच्यार शांत जाहल्या व सांप्रत जे स्त्री आहे ते

रोगग्रस्त याकरितां बालाजीपंत फडनवीस साल गु॥ चिंचवडचे मुकामीहून तीनच्यारदां निधोन्यास गेले होते व त्याउपरी नेहमी कारकून व ब्राम्हण निधोन्यांत आहेत. सांप्रत बालाजीपंत सिधपुरुषाचे दर्शनास गेले. शनिवार व रविवारीं ज्याची जे कामना असेल त्यास दाहाबारा महिने प्रति आदित्यवारीं निधोन्यास येत जांवें किंवा नेहमी राहांवें म्हणोन सांगत आहे. शंभर मनुष्यांत दाहापांचास चमत्कार येत आहे म्हणोन लोक बोलतात. प्रति आदित्यवारीं पांच हजार सात हजार लोक् जमा होत आहेत.

मानाजी फांकड्या तलुक वेताळासमीप वोस्वागडाचे आश्रयानें राहून पंतप्रधानाचे तालुकियांत ताख्ततराज करीत आहे याकरितां छ ३ माहे माारीं दारकोजी निबाळकर वगैरे दोनअडीच हजार स्वार फाकडे माराचे तंबीकरितां रवाना जाहले.

बालाजीपंत फडनीस द्वितीय विवाह करावा याकरितां मेनवलीस जात आहेत. छ ७ माहे माारीं लग्नतिथीचा निश्चय आहे म्हणोन तहकीक खारिज यैकिलें.

कृष्टणराव बलाळांचे पुत्र गोविंदराव, भाचीचे लग्नाकरितां बारामतीस गेले आहेत.

पैा छ १० माहे रबिलावल संन ११९६ हिजरी रोज शनिवार घटका रात्री डांकेवर.

A. R. No. 187

४ रबिलावल ११९६ हिजरी
१७ फेब्रुवारी १७८२

पैा छ १० माहे रबिलावल रोज शनिवार संन ११९६ हिजरी घटका रात्रीं मै डांक व दारोगा.

श्री

विनंती विज्ञापणा यैसी जे येथील कुशल ता छ ४ माहे रौावल मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २ माहे मजकूर रोज शुक्रवारी प्रा:थकाळी विनंती

पत्र सरकारचे डांकेसमागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित होईल. विनंतीपत्र प्राथःकाळी रवाणां केले. विनंती-पत्री लेखण केले होते की दो प्रहरा श्रीमंत पंतप्रधान व नाना व हरी-पंत वगैर मुहूर्त करून जेजुरी वगैर देवदर्शणास निघनार. त्यास दो प्रहरांनंतर श्रीमंत पंतप्रधान व नाना व हरीपंत वगैर स्वार घेऊन येथून कोस दीड कोस वानुडीस मुकामास गेले. उदईक शणवारी मध्ये मुकाम करून रविवारी जेजुरीस जाणार या अर्थी येथून कूच करून वानोडीस गेले. निश्चय ठैरला होता कीं श्रीमंत व नाना वगैर याणी जेजुरास वगैर देवदर्शणास जावे. जेजुरीहून नानानी मेणोवलीस जावे व हरीपंतानी येथे राहावे यैसे ठैरले होते. उप्रांतिक निश्चये जाला कीं नाना मणोलीस जानार. श्रीमंतासमागमे कोन्ही नाही यां अर्थी हरिपंतानी श्रीमंतासमागमे असावे. त्याजवरून हरिपंतही श्रीमंता-समागमे कूच करून गेले. शृत होये. छ ३ माहे मजकूर रोज शणवार आज श्रीमंताचा व हरिपंताचा मुकाम वांनोडीवरच जाला. कुच्य जाले नाहीं. राजश्री नाना फडनीस कूच करून निधोन्यास गेले. तेथे देवदर्शणं करून परस्परे मेणोलीस कृष्णातीरास जाणार. तेथे आपले खासगत लग्न करून दाहाबारां दिवसानी पुण्यास येनार. उदईक रवि-वारी श्रीमंत व हरीपंत वगैर वानोडीहून कुच्य बारातेरा कोसाचे करून श्री जेजुरीस जाणार. जेजुरीहून साहा कोस मोरेश्वर आहे. जेजु-रीस येकदोन दिवस राहून उप्रांतिक मोरेश्वरी गणपतीचे दर्शणास जाणार. मोरेश्वरीं येकदोन दिवस राहून माघारा फिरून पुण्यास येनार. पांचसहा दिवसातच माघारा परतून येणार यैसे ठैरले आहे. येथून श्रीमंत वगैर कुच्य करून गेले त्या वेलेस निश्चये होता की जेजुरी व मोरेश्वर व कुरकुंब व सिधटेक वगैर देवदर्शणे करून माघारा यावे. प्रस्तुत निश्चयात आणिले आहे की सिधटेका-पावेतो न जातां जेजुरीस व मोरेश्वरास देवदर्शण करून पांचसहा दिवसात पुण्यास यावे. मग जेजुरी व मोरेश्वर करून पुढे सिधटेका-पावेतो जातात किंवा माघारा येतात हे पाहावे. विदित होये. उदईक रविवारी कूच्य करणार. दो प्रहरांचे संधीस जेजुरीस दाखल होनार.

जेजुरीस येकदोन दिवस राहून मोरेश्वरी जाणार. मोरेश्वरी येक दिवस राहून श्रीमंत व हरीपंत वगैर पुण्यास येनार यैसा निश्चये आहे. शृत होये. छ १ माहे मजकुरी पुण्याचे मुकामीं नाना व हरीपंत याचे खिलवत होऊन दुसरे दिवसी कूच्य जाले. खिलवतात इंग्रजाकडील वकीलास बोलाऊन आणिले होते. इंग्रजाचे वकीलासी खिलवत जाला. खिलवत होऊन इंग्रजाचे वकील आपले डेऱ्यास गेले. खिलवतास माधोराव सदासिव नवते. कारण की त्याची सूण शांत जाली म्हणोन त्यास सुतक आहे. खिलवताचा भाव यैकिल्यांत आला कीं कारभाऱ्यानी इंग्रजाचे वकीलास पुसले कीं तुमची पत्रें ममईस गाडरांकडे गेली आहेत त्यास तीन वार होत आले. अद्याप उतरे येत नाहीत याचा अर्थ काय? त्याजवरून वकीलानी उतर केले कीं आमची पत्रें ममईस गाडराकडे गेली. गाडरानी आमचे पत्राचा भाव कलकत्यास लिहिला आहे. कलकत्याहून पत्रे गाडराकडे येतील त्या अन्वये गाडर मजकूर ममईहून आम्हांस लिहील यैसी संध आहे. ममईहून आमची उतरे आल्यानंतर आपणांस शृत करूं यैसे वकीलानी उतर केले. परंतु उभयेपक्षी मुदे भारी आहेत. राजकारण होणे दीर्घसुत्रावर आहे. ममईहून त्याची पत्रे वगैर आल्यास काये वर्तमान ध्यानास येईल ते लेखण केले जाईल. शृत होये. श्रीमंत उदईक रविवारी वानोडीहून कुच्य करून जेजोरीस जाणार. समागमे पांचसहा हजार फौज आहे. विदित होये. माहादाजी सिंदे आनंदीबाई निंबालकरीन इचे बंधु त्यास आनंदीबाईनी आपले बंदोबस्ताकरितां सिंद्यास लिहिले होते कीं आमचे जाबसालाकरितां पुण्यास कोणास पाठवावे. त्याजवरून सिंद्यानी राजश्री रायाजी पाा याजला कितिक कामे यौजून व आनंदीबाईचे जाबसालास पाठविले. रायाजी पाा येथे येऊन दाखल जाले. सिंद्याकडील कागदपत्र दिल्हे व खिलवत वगैर कितिक कामाविशी जाला. दुसरे, आनंदीबाई निंबालकर याचे जाबसालाविशी सिंद्याचे पत्रे कारभाऱ्यास दिल्हे व आनंदीबाईची पत्रे कारभाऱ्यास होती ते रायाजी पाा याणी कारभाऱ्यास दिल्हीं पुढे येविशीचे वर्तमान जे ध्यानास येईल ते लेखण केले जाईल. शृत होये.

राजश्री मानाजी फाकडे यानी पाचसातसे स्वार व पाचसातसे मनुश भिल वगैर मेलऊन अजठ्याचे घाटाजवल वोशागडास खूल केले आहे. त्याचे पारपत्यास राजश्री दारकोजी निबालकर दि॥ पागा व रंगराव वोढेकर वगैर हजार दोन हजार स्वार रवाना केले. शृत होये. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 188

९ रबिलावल ११९६ हिजरी
२२ फेब्रुवारी १७८२

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे यथील कुशल ताा छ ९ माहे रौावल मुाा पुण स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ६ माहे मजकूर रोज मंगलवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचें डाकेसमागमे सेवेसी रवाना केले कीं श्रीमंतानी श्री जेजुरीस देवदर्शन केले, देवास वस्त्रे वगैर दिल्ही, जेजुरीहून कूच करून मोरेश्वरी गणपतीचे दर्शनास जाणार, दर्शन करून येकादो दिवसा पुण्यास दाखल होणार हे सविस्तर लेखन केले होते त्याजवरून श्रुत जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान प्रहर दिवसपूर्व येतां जेजुरीहून साहा कोसाचे कूच केले. मोरेश्वरी देवदर्शन करून मोरेश्वराआलिकडे दोन कोसावर पांडेश्वरी मुकाम केला. मोरेश्वरी देवदर्शन करून माघारा मुकामास आले. उदईक बुधवारी लोणीस राहणार. गुरुवारी पुण्यास दाखल होणार. श्रुत होये. छ ७ माहे मजकूर रोज बुधवारी श्रीमंतानी कूच केले. भापकराचे लोणीस येऊन मुकाम केला. मध्यें आंबीकर रामचंद्रपंत बाबा यांचे बागात घटिकाभर बसले होते. त्यानी वस्त्रे वगैर श्रीमंतास दिल्ही. तेथून स्वार जाले ते आमल्यास खंडेराव दरेकराचे घरी गेले होते. तेथे घटकाभर बसले होते. दरेकरानी श्रीमंतास वस्त्रे व सिरपेंच दिल्हा व हरीपंतास वस्त्रे दिल्ही. तेथू(न) निघाले तो

सध्याकाली डेऱ्यास श्रीमंत वगैर लोणीस मुकामास आले. श्रुत होये. छ ८ माहे मजकूर रोज गुरुवारी प्रहर रात्र मागील शेष राहतां श्रीमंतानी लोणीहून कूच साहा कोसाचे केले. पांच घटिका दिवसपूर्व येता महूर्तनिसी पुण्यास आपले वाड्यात दाखल जाले व हरीपंत वगैर बाहेर आपल्या डेरियास गेले. श्रीमंत आपले वाड्यांत दाखल जाल्यावर तोफा वगैरची सिलक केली. श्रुत होये. वैशाखमासी श्रीमंताचे लग्नाचा निश्चये जाला. सरंजाम वगैर करितात. लग्नाचे पूर्वी सातारियास जाऊन राज्याची वस्त्रे घ्यावी यैसी यौजना जाली आहे. दुसरा निश्चये आहे कीं हुताशनी जालियावर पंचमीस स्वार होऊन नाशकाजवल गंगापूर आहे तेथे गोपिकाबाई श्रीमंताची आजी आहे, तिचे दर्शन करून पुण्यास यावे, वैशाख मासी लग्न करून उपरांतिक सातारियास वस्त्रे घ्यावयास जावे यैसाही निश्चये आहे. मग हुताशनी जालियावर पंचमीचे महूर्तेआधी श्रीमंत सातरियास जातात किंवा गंगापुरास बाईचे दर्शनास जातात हे पाहावें. मग जो निश्चये होईल तो सेवेसी लेखन केले जाईल. परंतु हुताशनी जालियावर पंचमीस श्रीमंत सातारियास जातील आथवा गंगापुरास जातील यैसे आहे. मग काये निश्चये करितील ते लेखन केले जाईल. विदित होये. इंग्रजाकडील वकील येथे आहेत त्या पैाा येक गोरा ममईस जाबसालाकरिता गेला आहे. तो आद्याप गाडराकडून माघारा आला नांही. इंग्रजाचे वकीलानी ममईस व कलकत्यास पत्रे लिहिली आहेत. तेथून उतर आल्यावर पुढे जाबसाल होणार यैसे आहे. श्रुत होये. सिंदे हिंदुस्थान प्रांती आहेत. सिद्यास कासीचा राजा येऊन भेटला आहे. सिंद्यास कासीचा राजा म्हणतो कीं पंचवीस लक्ष रुपये घ्यावे व कासीचे ठाणे इंग्रजापासून आमचे घेऊन द्यावे. सिंदे म्हणतात कीं पाऊण क्रोड रुपये द्यावे, तुमचे कासीचे ठाणे आम्ही घेऊन देऊं यैसे सिद्याकडील वर्तमान आले आहे. विदित होये. राजश्री नाना फडणीस मेणोलीस गेले आहेत ते छ १२ माहे माारी पुण्यास येणार. श्रुत होये. होलकर वाफगावास आहेत. शृत होये. पुढे जे प्रसगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. शृत होये. छ २७ माहे सफरचे आज्ञापत्र

डाकेसमागमे सादर केले ते छ ७ माहे माारी पावले. पावोन संतोश जाला. सदैव याचप्रकारे आज्ञापत्रे सादर होत असावी. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 189

११ रबिलावल ११९६ हिजरी
२४ फेब्रुवारी १७८२

श्री

पैा छ १९ रोा सोमवार माहे रबिलावल संन ११९६ हिजरी डांकेवर मै दारोगा हरकारा.

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल ताा छ ११ माहे रबिलावल मुा पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ९ माहे मजकूर रोज शुक्रवारी प्रातःकाली विनंतीपत्र सरकारचें डाकेसमागमे सेवेसी रवाना केले ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान राजश्री केशोपंत दातार, नारो शंकराकडील बागी होऊन गुलज्यारखानास मिलोन धूमधाम करीत होते. त्यांचे पारपत्यास पहिले फौजा गेल्या होत्या. केशोपंत सुरत प्रांताकडे होते. राजेश्री चिंगोजी कदम, नारो शंकराकडील, यांसी व त्रिबकराव नारायेण यांसी नाखुसी आहे म्हणोन कदम मजकूर येथे कारभारी यापासी आहेत. त्यांस केशोपंत दातार याणी चिंगोजी कदम यांचे विद्येमाने सूत्र लाविले कीं सरकारचा कौल व अभये आल्यास आम्ही येऊन भेटू. त्याजवरून केशोपंत दातार यांस यावयाविसीं कौल सरकारचा पाठविला. सरकारचे कौलावरून केशोपंत दातार येथे आले. श्रीमंतास विसाजीपंत आठवले यांचे विद्येमाने भेटले व हरिपंत वगैर यांची भेट घेतली. येथे आहेत. नारो शंकराचे जागीरी पौा केशोपंत दातार यास पांच हजार रुाची जागीर द्यावी यैसा करार जाला आहे. पांच हजार रुाा ची जागीर त्यानी घेऊन स्वस्त असावे यैसे ठरले आहे. श्रुत होये. राजश्री बाजीराव बरवे इकून पूर्वी श्रीमंत राजश्री दादा-

साहेबाकडे गेले होते. तेथे त्यांची सोये न होता महेश्वरास ते अहिल्याबाई होलकरीन इजकडे गेले. बाईपासी बाजीराव बरवे आहेत. त्यास बाजीराव बरवे यांसहि येथे येण्याविसी सरकारातून कौल पाठविला आहे. तेही येथे येणार यैसे वर्तमान आहे. सटोजी भोसले व बाजीराव बरवे यैसे उभयेता मिळोन सुरतेकडे गेले होते. त्यास बाजीराव बरवे तो महेश्वरास आहेत. त्यांजला तो कौल पाठविला आहे. सटोजी भोंसले दाहापांच राउतानसी पळोन इकडे आले. कोन्ही म्हणतात कीं मानाजी फांकडे यांस भेटले. कोन्ही म्हणतात कीं येसाजी सिंदे याजकडे कोल्हापुराकडे गेले यैसे वर्तमान आहे. मागती त्यांजकडील वर्तमान तथ्य कळल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये. छ १० रोज शनवार राजेश्री नाना मणोलीहून येका दो दिवसानी येथे येणार. श्रुत होये. वैशाख मासी श्रीमंताचे लग्न करावे यैसा निश्चये आहे. त्यास लग्नापूर्वी सातारियास जाऊन राज्याचे दर्शन घेऊन वस्त्रे घ्यावी, उपरांतिक लग्न करावे यैसी योजना आहे. नाना येथे आल्यानंतर हा सिध्धांत ठैरून हुताशनी होऊन पंचमी जाल्यावर श्रीमंतानी सातारियास कारभारी यासहवर्तमान राजवस्त्रे घ्यावयास जावे यैसी यौजना आहे. वस्त्रे घेऊन आल्यानंतर गंगापुरास नाशकाजवल गोपिकाबाईचे दर्शनास जावे, उपरांतिक लग्न वैशाख मासी करावे यैसी घटवटणा आहे. मग काये सिध्धांत होऊन प्रथम सातारियास जातात किवा गंगापुरास बाईचे दर्शनास जातात हा निश्चये होऊन ठरल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये. राजेश्री मानाजी सिंदे याणी पांचच्यारसे राऊत व पांचसातसे भिल वगैर मेळवून अजंटचाजवल पांचसात कोसी वोशागडास खूळ केले आहे. त्याचे पारपत्यास येथून दोन हजार फौज गेली हे सविस्तर वर्तमान येकदोन विनंतीपत्री सेवेसी लेखन केले होते त्याजवरून ध्यानास आले असेल. त्यास मानाजी सिंदे याणी वोशागडास खूळ केले आहे. त्याचे पारपत्यास दोन हजार फौज पाठविली आहे. आणिकही पांचसातसे फौज पाठविणार. श्रुत होये. राजश्री बज्याबा पुरंधरे यांस आणोन आपल्या वाडचात ठेविले आहे. त्याजवर चौकी पहारा अद्याप त्यांजवर आहेच. बज्याबास येथे आणिले

के. ज. म. इ. ना. पोतदार;
ग्रंथ संग्रह

त्याअर्थी मोरोबा फडणीस यांसही येथे आणून आपल्या वाड्यांत ठेवावे यैसीही योजना करितात. परंतु मोरोबाचा संशये कारभारी यास विशेष आहे. त्याअर्थी मोरोबास आणावयाचा प्रकार दीर्घसूत्री. परंतु त्यास आणावे यैसी अंतस्ते वदंता आहे. मागती त्याजकडील वर्तमान कलल्यास लेखन केले जाईल. श्रुत होये. होलकर वाफगावास आहेत. शृत होये. पुढे जे प्रसंगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखन केले जाईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती. छ २ माहे मजकूरचे आज्ञापत्र डाकेसमागमे सादर केले ते छ १० माहे माारी पावले. पावोन संतोश जाला. सदैं (व) याचप्रकारे आज्ञा पत्रे सादर होत असावी हे विज्ञाप्ती.

A. R. No. 190

१३ रबिलावल ११९६ हिजरी
२६ फेब्रुवारी १७८२

श्रीनिवास

पोष्य हैबतराव गोपाळ सांा नमस्कार. विनती उपरी येथील वर्तमान तााा छ १३ रबिलावल, फालगुण शुध चर्तुदसी, भौमवासर-पर्यंत मोा पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पुर्वी छ ११ माहे माारीं हुजूर आर्जी व अखबार व स्वामीचे सेवेसी पत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रत हुजूर आर्जी व अखबार व पृथक पत्रीं अखबार स्वामीचे सेवेसी लिहून डांकेवर पत्रें रवाना केलीं आहेंत. दारोग्याचे विद्यमानें पत्रें पावतील व गुजरतील. गाडराकडील वकील उदेष्टेण यास रुखसत करितों म्हणोन येथील कारपरदाजानीं हैदरअली-खानास लिहून पाठविलें व नरसिंगराव नूरमाखानांसी करार केला आहे. परंतु हुताशनीचे उत्सहाकरितां पांचसाहा दिवस जरूरी कामावितरिक्त दरबार होणार नांहीं. त्याउपरी जें कर्तव्य अमलांत येईल तें सेवेसी व हुजूर लिहून पाठवीन. बहुत काय लिहिणे हे विनंती.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इा छ ११ रबिलावल लगायत छ १३ माहे माार सन ११९६ हिजरी मंगळवार.

गोपिकाबाईचे भेटीकरितां पंतप्रधान नासिकास जाणार म्हणोन चर्चा होती परंतु जात नांहींत व बालाजीपंत मेनवलीस गेले आहेत ते लग्न करीत नांहीत व छ १२ माहे माारीं पुण्यास येणार व हैदरआलीखानानें कारपरदाजास व नूरमाखान व नरसिंगराव वकीलास पत्र पाठविलें आहे कीं इंगरेजाकडील वकील उदष्टेण आला आहे त्यासी दारमदार हरगिज न करणें याप्रमाणें हरीपंताचे जुबांनी व अवांतर वर्तमानासहित पत्र स्वामीचे सेवेसी व हुजूर अखबार पाठविली ते पाऊन वर्तमान श्रुत जाहलें असेल. सांप्रतचें वर्तमान दफेवार लिहिलं आसे.

बालाजी जनार्दनानीं मेनवलीस अनुष्ठान करविलें होतें. अनुष्ठान समाप्तीनंतर होम व ब्रांह्मणभोजन व दक्षणा देऊन पंत माार छ १२ माहे माार मंगळवारीं पुण्यास आले.

पंतप्रधानानीं पेशवाईची वस्त्रें सातारेकर राज्यापासून कारपरदाजास पाठऊन पूर्वीच आणविलीं आहेंत. परंतु राज्याची भेट जाहली नांहीं याकरितां छ २१ माहे माारीं पंतप्रधान कारपरदाजासहित साताऱ्यास जात आहेत म्हणोन खारिज चर्चा सर्वतोमुखं यैकिली आहे. कारपरदाजासमीप वर्तमानाचा शोध घेऊन माघाऊन तहकीक लिहून पाठवीन.

हैदरआलीखानाकडील ताजे वर्तमान आलें नांहीं. लालापेंठनजीक आरकाटेसमीप खान माार आहे व फरासीसाकडील जमीयत येणार त्याची इंतजारी आसे म्हणोन वकीलांचे जुबानीं यैकिलें.

माहदाजी सिंदे दतियासमीप आहेत. इंगरेजाकडील वकील इंद्रसेन माारनुलेसमीप आला आहे तो गोहदकर जाटाचे विद्यमानें सिंदे माारासीं दारमदाराकरितां कांही ज्वाबसाल करीत आहे म्हणोन खारिज यैकिलें.

गणेशपंत बहिरे कोंडाईबारीचें घाटाखालें हळदवणासमीप व इंग्रजांची पलटणें दोन व फतेसिंग गाइकवाडाची फौज सोनगडाचे जिल्यांत आहे. गणेशपंताचे हजारबारासे स्वार सुरत प्रांतात दौडे-

स गेले होते. सुरतेहून इगरेजांकडील लोक मुकाबल्यास आले तेसमई गणेशपंताचे लोकांनी दाहाबारा घोडीं इंगरेजाकडील पाडाऊ करून आणिलीं म्हणोन गोविदराव कृष्टण यांचे जुबानीं यैकिलें. याचे बरखिलाफ खारिज यैकिलें की इंगरेजाकडील लोकानीं दाहाबारा घोडीं गणेशपंताकडील पाडाऊ करून नेलीं.

मानाजी फांकड्या तलुक वेताळवाडीसमीप वोसागडचे आसाऱ्यानें आहे. त्याचे तंबीस पंतप्रधानाकडील सरदार दारकोजी निंबाळकर वगैरे दोन हजार स्वार गेले आहेत म्हणोन पूर्वी लिहिलें आहे. सांप्रत यैकिलें कीं सुभानराव जाधवाचे तीनच्यारसे स्वार फांकडे माराचे तंबीस गेले होते. परस्पर लढाई जाहली. जाधवाकडील लोक पसपा जाहले व पांचसात घोडीं व माणसें ठार जाहलीं व कांही लोक जखमी जाहले. फांकड्या मार भिल वगैरे जमीयत मेळऊन पंतप्रधानाचा तालुका ताख्तताराज करीत आहे व हरयेक गांवास चिठी घासदाण्याची रघुनाथराव यांचे निसबतीची करितो म्हणोन यैकिलें. दारकोजी निंबाळकर वगैरे कांसारबारीचा घांट उतरोन गेल्याचें वर्तमान आलें.

A. R. No. 191

१४ रबिलावल ११९६ हिजरी
२७ फेब्रुवारी १७८२

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल तागा छ २४ माहे रौवल मु ।। पुणं स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणोन स्वानंद

लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेषे येथील वर्तमान छ ११ माहे मजकुरी रोज रविवारी प्राथकाळीं विनंतीपत्रें सरकारचे डांके-समागमे सेवेसी रवाणां केले ते पाऊन सविस्तर वर्तमान विदित जाले असेल. तदनंतर येथील वर्तमान श्रीमंतानी वाड्यात वाघ व हांती वगैरे आणविले होते. दोन घटका वाघाचा व हांतीचां तमाश्यां केला. पाण्यातील सुसर धरून आणिली होती ती वाड्यात श्रीमंताकडे आणिली होती. श्रीमंतानी त्या सुसरीवर वाघ घालविला. वाघाणी सुसर मारिली. यां प्राणे दोन घटका तमाशा जाला. उप्रांतिक घोडी वगैरे श्रीमंतानी वाड्यात फिरविली. शृत होये. (उ) दईक नाना पुण्यात येऊन दाखल होनार. विदित होये. छ १२ रोज सोमवार नाना मेणोलीस गेले होते. दो प्रहरां पुण्यास येऊन आपले वाड्यात दाखल जाले. मेणोलीस नाना आपले लग्न करणारं यैसे वर्तमान होते. त्यास लग्न रहित होऊन नानानी लग्न केले नाही. पांच दिवस मेणोलीस होते. कृष्टणाश्नाणं वगैरे करून मेणोलीहून दो दिवसा नाना येथे येऊन दाखल जाले. मेणोलीहून पांच कोस राये किला आहे. किला पाहाण्यास गेले होते. किला पाहून मागती मेणोलीस आले. पांचच्यार दिवस राहून पुण्यास आले. शृत होये. श्रीमंताची व कारभारी वगैर याची वदंता आहे कीं साताऱ्यास राज्याचें दर्शणास जानार. दर्शण करून वस्त्रे घेणार यैसे वर्तमान आहे. परंतु अद्याप निश्चये नाहीं. नाना आले. नानाचे व हरीपंताचे विच्यारे साताऱ्यास जावयाचां योग ठैरल्यांस लेखण केले जाईल. विदित होये. हैदर नायेकाकडील पत्रे आली. पत्राचा भावगर्भ कलल्यात आला नाही. कलल्यास लेखण केले जाईल. नाईक मजकुरासी व इंग्रजासी शह रूबकार आहे यैसे वर्तमान आहे. शृत होये. छ १३ रोज मंगलवार. श्रीमंताचे लग्न वैशाख मासी आहे. लग्नाचे सरंजामाकरितां तमाम माहालोमाहाल चिटियां करितातं व पुण्यातही सरंजाम करितात. समंधाची यौजणां राजश्री परशरामपंत मिरजकर याची कंन्या आहे. दुसरे, नासिककर कोन्ही दीक्षित आहेत त्याची कंन्या आहे. मग कोणते मुलीचां निश्चये होईल हे पाहावे. शृत होये. सिंद्याकडील रायाजी

पा व रामजी पा नानाकडे आले होते. नानाचा व त्याचा खिलवत जाला. खिलवताचा भाव यैकिल्यात आला कीं सिंद्यास श्रीमंताचे लग्न वगैरचा मजकुराची पत्रे लिहिनार. विदित होये. अजंट्याजवल वोशागडावर मानाजी सिंदे याणी खूळ केले आहे. त्याजवर येथून फौज गेली आहे. वाघुलीकर जाधव याची पागा अधीच मानाजी सिंदे याचे पारपत्यास गेली आहे. त्या पागेसी व मानाजी सिंद्यासी लढाई होऊन जाधवाकडील दोनतीन घोडी त्याणी नेली यैसे वर्तमान आहे. मागती त्याजकडील वर्तमान आल्यास लेखण केले जाईल. शृत होये. राजश्री गनेशपंत बेहेरे कोडाईबारी उतरून खाले गेले आहेत. ते सोनगडाजवल इंग्रजाची पलटने दोनतीन व फतेसिग गायेकवाड याची दोन हजार फौज आहे. त्यासी व गनेशपंत बेहेरे यासी लढाई होनार यैसे वर्तमान आहे. शृत होये. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 192

२८ जमादिलाखर ११९६ हिजरी
१० जून १७८२

३

श्रीनिवास

अखबार पुणें छ २८ माहे जा।।लाखर सन ११९६ हिजरी.

येशवंतराव नाईक निंबाळकर दहींगावकर यानें फौज जमा करून करमाळें वगैरे तालुकियांत कितेक मातबर मकानें लुटलीं व मुलुक ताराज केला. त्याचे तंबीकरितां हुजूरीहून खौलत जंग बहादर तंई जाहले तेसमईं नाईक माार पळोन दहींगावचे आसऱ्यास येऊन राहिला. खौलत जंग बहादरनीं पंतप्रधानांचे कारपरदाजास पत्र पाठविलें कीं नाईक पुन्हां शरारत याप्रमाणें न करी व त्याजसमीप कोण्ही लोक मुतफिक न व्हांवे याप्रमाणें ताकीद प्रखर करावीत. त्यास कारपरदाजांनी जाहिरा येशवंतराव नाईकास पत्र पाठविलें व त्यानेंही प्रत्योतर लिहिलें कीं या उपरी आपण सरकारआलीचे तालुकियास उपसर्ग लावणार नांहीं. परंतु नाइकास प्रखर चितापासून ताकीद केली नांहीं व परशरामपंत मिरजकर दहींगावचे जवळपासून गेले परंतु त्यांनी उपेक्षा केली. सांप्रत

वर्तमान कोण्ही मातबराचे मुखें यैकिलें कीं यशवंतराव नाईक व मानाजी फांकडे व बाजीराव बरवे यानीं पंतप्रधानाचे कारपरदाजासीं अंतस्थ यैक्यता केली व यांचे इतख्यानें फौज जमा करून सरकारआलीचे तालुकियांत जेथवर मकदूर होईल तेथवर धामधूम करून मुलुक मारावा व खंडणी घ्यावी व इकडील कारपरदाजांचें अंग किमपि दाखऊं नये. किंबहुना कारपरदाजाकडून हजारपांचसे फौज त्याजवर तई होईल. परंतु अंतरंगी यांचेच आश्रयानें येशवंतराव वगैरे सरकारचे तालुकियांत हगामा करणार. यैकिल्याप्रमाणे लिहिलें असे. याप्रकारचें वर्तमान पुण्याकडील अखबारनविसानी लिहिलें म्हणून हुजूरीहून जिवाजीपंतास न कळांवें म्हणोन विनंती आहे हे विनंती.

पैा छ १० माहे रजेब सन ११९६ हिजरी. मंगळवार साईंकाळ मै डांक सरकार.

A. R. No. 193

१५ शाबान ११९९ हिजरी
२३ जून १७८५

पैा छ २१ माहे शाबान सन ११९९ हिजरी.

श्रीनिवास

वडिलाचे सेवेसी अपत्यें रघोतमरायानें चरणारविंदी मस्तक ठिऊन सां नमस्कार विज्ञापना जे यथील वर्तमान ता छ १५ माहे शाबान ज्यष्ठ वद्य प्रतिपदा गुरुवासरपर्यंत मुकाम पुणें वडिलांचे आसीर्वादेंकरून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ९ माहें माारीं सरकारचे डांकेवर हुजूर अर्जी व आखबार व वडिलाचे सेवेसी विनतीपत्र नवाब मुषीरुलमुलक बहादुराचे पत्रासहित पाठविलें तें व त्यानंतर छ १४ रोजी प्रातःकाळी तैनाती जोडीसमागमें विनतीपत्र पाठविलें तें यैसी दोन्हीं पत्रें पाऊन वर्तमान श्रुत जालें आसेल. सांप्रत छ १५ माहे माारपर्यंत यैकिलें व जालें वर्तमान लिहून

सांप्रदायाप्रमाणें पत्रें सरकारचे डांकेवर रखमाजी नाइकाचे विद्यमाने रवाना केली आहेत. दारोगे हरकारें सेवेसी प्रविष्ट करतील. आसिर्वाद-पत्र तैनाती जोडीसमागमें छ २६ रजबचें व सरकारचें डांकेंवर छ १ माहे शाबानचें पाठविलें तें छ ९ माहे माारीं पावलियाचें उतर छ १४ रोजी जोडी रवाना जाली त्याजसमागमें लिहिलें आसे. त्यानंतर छ २ माहे माारचे पत्र तैनाती जोडीसमागमें पाठविलें तें आजच छ १५ रोजी पाऊन बहुत संतोष जाला. माहाराव निंबाळकराकडील वाजबुल-अर्ज दस्तखत होऊन आली त्याची नकल पाठविली ते पावली. सविस्तारें छ १४ रोजी लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ती.

———

पैाा छ २१ माहे शाबान सन ११९९ हिजरी.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ ९ माहे शाबान लगायत छ १५ माहे माार सन ११९९ हिजरी.

पूर्वी छ ८ माहे माारपर्यंत अखबार लिहून छ ९ रोजी सरकारचे डांकेसमागमें पत्रें पाठविली तें पाऊन वर्तमान श्रुत जालें असेल. सांप्रत छ १५ माहे माारपर्यंत यैकिलें व जालें वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफे-वार लिहिलें आसे.

फतेआलीखानाचे जमीयतीपैकीं पैदल व तोफा नरगुंद्याचे माहा-सन्यावर आहेत. सवार वगैरे जमीयत धारवाड प्रांती राहून पंतप्रधाना-कडील तालुका कृष्टणेंपार आहे तेथें हंगामा करीत आहेत. जमखंडी व यादवाड व मुरगुड वगैरें मकाने घेतली व शाहापूर बेळगांवचा किला घेणार म्हणून कारभारी यांस बातमी आली. त्याजवरून छ २ माहे शाबानीं शाहापूर बेळगांवचे किल्याचे बंदोबस्तीस च्यार तोफा कार-भारी यांणी पाठविल्या आहेत. कृष्टणेस पूर नसल्यास तोफा शाहा-पुरास जातील.

कासीपंत नामें हजार दोन हजार गाडदी व तोफा च्यार घेऊन गणेशपंताकडे गेले होते. त्यास कासीपंताकडील गाडद्यापैकीं च्यार पांचसे गाडदी फितूर करून फतेआलीखानाचे जमीयतीत गेले म्हणून यैकिलें.

पैाा छ २१ माहे शाबान सन ११९९.

२

मुधोजी भोंसल्याचे रुखसतीचा निश्चय नांहीं. बाळाजीपंताचे जुबानीं कळलें कीं येंका दो दिवसात छावणीस राहण्याचा किंवा जाण्याचा निश्चय होंईल यैसे छ १३ माहे माारीं बाळाजीपंत सेवकासी बोंलले.

हरिपंतास दर्दसिकम आहें. या दिवसात शूळ क्षणक्षणा विशेष होत असतों. औषधी व दैवी उपाय बहुत करितेत परंतु आराम होत नांहीं. बाळाजीपंत बहुत चिंता करीत आसतेत.

हरिपंताचे घरास छ ११ रोजी मुधोजी भोंसलें व छ १२ रोजी तुकोजी होळकर व छ १३ रोजी बाळाजीपंत गेले होते. छ १३ रोजी बाळाजीपंतासी व हरिपंतासी खिलवत येक प्रहरपर्यंत जाली.

कार्तिकस्वामीची मूर्तीची स्थापना करावयाकरितां छ ९ रोजी राव पंतप्रधान पर्वतीस गेले होते. स्थापनेचे समईं मूर्ती भंगली यास्तव स्थापना न करितां माघारा आपले हवेलीस आलें.

पुण्यांत हवेल्या आहेत त्याची खानेसुमारी कारभारी यानी करविली आहें. खानेसुमारी जाल्यानंतर हवेलीचे किमतीप्रमाणें पटी करून घेणार म्हणून यैकिलें.

कृष्टणराव बलाळ यांस पुण्याची हवा मवाफिकत करीत नांहीं व सध्या मसलहतही दरपेश नांहीं म्हणून राव माार बारामतीस जाणार आहेत. छ १५ रोजी मुधोजी भोंसले हरीपंताचे हवेलीस आले होते. च्यारपांच घटका बसले होते. बहुशा राव पंतप्रधानाची रुखसत देवितो यैसे हरीपंत बोलले म्हणून यैकिले.

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

कितुरकर जमीदारापासून गतवर्षी परशरामपंतानीं पेशकश घेतली होती व जमीदार माार राव पंतप्रधानाचे स्नेहात होता. सांप्रत वर्तमान यैकिलें कीं फतेअलीखानाने जमीदार माारासी पैगाम केला. दरसाल तीन लक्ष रुाये पेशकश देणे. अथवा पांचसे सवार व तीन हजार जमीयत पयदल घेऊन नौकरीस येणें. जमीदार माारानें नौकरी करणे कबूल केले व खान मााराचें ममतेत मिळाला म्हणून यैकिले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

A. R. No. 194 १६ शाबान ११९९ हिजरी
२४ जून १७८५

पैा छ २१ माहे शाबान सन ११९९ हिजरी.

श्रीशंकर

विनंती विज्ञापणा यैसी जे येथील कुशल तागाइत छ १६ माहे साबान मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणोन स्वानंद कुशल लेखण आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ९ माहे मजकूर रोज शुकरवारी प्राथकाली विनंतीपत्र सरकारचे डाकेबोार सेवेसी पाठविले ते सेवेसी पाऊन सविस्तर मजकूर ध्यानास आला असेल. तदनंतर येथील वर्तमान त्रितीये प्रहरी श्रीमंत व नाना वगैरे बागांत गेले होते. च्यार घटका बागाची सैर करून उपरांतिक सांइकाली आपले हवेलीत दाखल जाले व नाना आपले घरास आले. श्रुत होये. चिमणलाल मुनसी गुरंडूर फिरंगी कलकतेवाले याजकडें वस्त्रें वगैरे देऊन पाठविली म्हणोन सेवेसी सविस्तर सेवेसी लेखण केले होते. त्यास चिमणलाल पांच्यार दिवस कांहीं गुतियामुळे राहिला होता. प्रस्तुत चिमणलाल स्वार होऊन कलकत्यास गेले. विदित होये. हुजूरांहून खिलयेत व जवाहेर आले आहे ते नानाकडे रोा गोविंदराव कृष्ण व गोविंदराव मामा घेऊन गेले होते. नानाही जवाहर अवलोकण केले. अद्याप जवाहेर व खिलयेत वांटावयास नानाची आज्ञा जाली

नाही. खिलयेत व जवाहेर वगैरे वाटिल्यास सविस्तर सेवेसी लेखण केले जाईल. सिद्याकडील वर्तमान आहे की सिद्यानी पातशाही फर्मान कायेमुदौले यांचे नावे पाठऊन सुरतेस जप्ती पाठविली व कायेमुदौले यांजला पदच्युत केलें या प्रा वर्तमान आले. मागती येविसीचे वर्तमान ध्याणास आलियां सेवेसी लेखण केले जाईल. रा हरीपंततात्या यानी नवी हवेली बांधली. त्यास त्या हवेलीची वास्तुशांत जाली परंतु तात्या अद्याप पहिलेच हवेलीत आहेत. शरीराची भावना दोन दिवस बरी व दोन दिवस शूळाचा उपद्रव असतो. बाहेर दरबार वगैरेस कोठें जात नाहीत. विदित होये. छ १३ माहे मजकूर रोज मंगलवारी भोसले घाडगे म्हणोन सरदार मऱ्हाटे भोंसल्याचे स्वकीय आहेत त्यांचे घरी मेजमाणीस भोसले आले होते. मेजमाणी होऊन उपरांतिक आपले डेऱ्यास भोसलें गेले. विदित होये. छ १४ माहे मजकूर रोज बुधवारी कृष्णरावजी व गोविंदराव भगवंत रा हरीपंततात्याचे वाडयांत आले होते. च्यार घटका रावजी तात्यापासी बसले होते. उपरांतिक रावजी आपले घरास आले. विदित होये. रा मुधोजी भोंसले अद्याप येथेंच आहेत. रुखसती जाली नाही व होलकरही येथे आहेत. सेवेसी शृत होये. छ १५ माहे मजकूर रोज गुरुवारी भोसलें हरीपंततात्याचे घरी आले होते. च्यार सा घटका भोसलें तात्याचे वाडयांत बसले होते. उपरांतिक साइकाळी स्वार होऊन आपले डेऱ्यास गेले. विदित होये. पुढे जे प्रसंगाचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. विदित होये. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 195 (पो. ता.) २१ शाबान ११९९ हिजरी
२९ जून १७८५

पैा छ २१ माहे शाबान सन ११९९ हिजरी.

श्रीनिवास

पुा पत्र तीर्थस्वरूप राजश्री नाना स्वामी वडिलाचे सेवेसी

विज्ञापना जे आसिर्वादपत्रीं आज्ञा कीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीची सनद मौजे रायपूरची श्रीमंत राजश्री राजे रायरायां दियानतबंतजी तात्याचे नांवें पाठविली ते पावली. परंतु त्याजमध्ये इा तारीख अमकी यैसे नांहीं, याचे कसे करावें? दुसरें, राजश्री रायसाहेब आपारायजीचें नांव दाखल नांहीं. त्यास तेथील पधत विदित नांहीं. वाकफकारीने अपत्यानें केलें असेंल. उगऊन उतर लिहिणें म्हणून आज्ञा त्यास इा तारीख लिहिण्याचा सांप्रदाय नांहीं. जर जप्ती जाली असती तर तारीख लिहिणें जरूर होतें. त्यास यांचे दफ्तरी जप्तीचा अमल नांहीं. सबब कैलासवासी तीर्थस्वरूप स्वामीचे यैवजी इतके लिहून सनद मवफी कायदा दफ्तरचे मुतसद्यानीं दिल्ही याची चौकसी अपत्यानें करून मग सनद घेतली. धाकटे रायसाहेबाचें नांव दाखल नांही. त्यास उभयतांचे नांवें सनद मागितली. राजश्री बाळाजीपंत नाना म्हणालें जागीरीचा अमल कैलासवासीप्रमाणें म्हटलें म्हणजे सहजच उभयतांचा विभाग, प्रत्यक नांव न लगे यैसे म्हणाले. यास्तव संक्षप केला. याजवरही रायसाहेबाचे नांव दाखल असलें पाहिजे यैसी आज्ञा व्हावी, त्याचा उद्योग करीन हे विज्ञापना.

राजश्री बाळाजीपंत हिंदवी(न)वीस मुनसी वडीलांचे सरकारचें बहुशा घरास गेले आहेत. अपत्याचें तरफेनें राजश्री आनंदराव सभापती सेवेसी हजर आहेत. मजकडील विनतीपत्राचें प्रत्योतराची आज्ञा राजश्रीकडे होत आहे. वरकडही पत्रें लिहिण्याची आज्ञा राजश्रीस जाहल्यास शबेरोज हजर राहून पत्रें लिहिणें तें लिहीत जातील. माझे तरफेंने सेवेसी आहेत तें वडिलांचे संग्रहीचे जाणून अमर्यादायुक्त विनंती लिहिली असे हे विज्ञापना.

A. R. No. 196

२४ रजब १२०४ हिजरी
९ अेप्रिल १७९०

श्री

विनंती विज्ञापना अैसी जे येथील कुशल तागाइत छ २४ माहे

रजब, मुा पुणे, स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे, विशेष येथील वर्तमान छ १७ माहे माार रोज शनवारी दो प्रहरा दिवसा अखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान त्रितीय प्रहरी राजश्री नाना फडनवीस श्रीमंताचे वाडचात गेले. दरबार जाला. दोन घटिका अर्शेमाहालात बसोन माली मुलकी कामकाज जाले. नंतर श्रीमंत व मदारूलमहाम सातखणी वर गेले. दफ्तरचे दरकदार यास बोलाऊन मामलतप्रकरणी ताळेबंदे वगैर कागदपत्र अवलोकण करून मागील दोन घटिका दिवस (राहता) दाखल जाहले. तेथोन निघोन (अस्पष्ट मजकूर) विदित होये. छ १८ रोज रविवारी प्रथम दोन घटका दिवस येता, राजश्री हरिपंत फडके याणी रााा गमाजी पाटील वकील नि।। गाइकवाड यासी बोलाऊन आणविल्यावर उभयेताचे खिलवत प्रहर सहा घटिका जालेनंतर दहा घटिका दिवस येता, माारनिले आपले घरास गेले. त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे वाडचात मुत्सदी व दरकदार वगैर आले होते. दोन घटिका कामकाज जाले. राजश्री जोत्याजी जाधवराव वाडीकर आपले खासगत कामाकरिता आले होते. एक घटिका मदारुलमहाम यासी बोलणे बोलोण नंतर पानदान विडे देऊन जाधव मजकूर आपले हवेलीस गेले. या उपरांत मागील पाच घटिका दिवस राहता राजश्री नाना फडनवीस आपले वाडचातून निघोन राजश्री हरिपंत फडके याचे वाडचात गेले. तेथे रााा गमाजी पाटील आल्यावर त्रिवर्गाचे खिलवत दोन घटिका जाले. नंतर राजश्री बहिरोपंत मेहेंदळे आलें. त्यासी एक घटिका भाषण करून, मागील दोन घटिका दिवस राहता मदारुलमहाम आपले घरास आले. खिलवताचा भाव राजश्री मानाजी गाइकवाड याजकडील बोलणे रााा गमाजी पाटील बोलावयासी येथे आले आहेत. जाबसाल शुरू जाला आहे. नमूदात आल्यावर सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होये. छ १९ रोज सोमवारी मागील प्रहर दिवस राहता मदारुलमाहाम याचे वाडचात मामलेदार व दरकदार आदिकरून आले होते.

नंतर राजश्री बहिरो रघुनाथ मेहेंदले येऊन दोन घटिका बोलोण गेले. या उपरांत राजश्री बाबा फडके मदारुलमाहाम याचे वाडयात आले, तो मागाहून रा गमाजी पा आले. त्यासी दोन घटिका बोलणे जाल्यानंतर मशारनिलें माघारा आपले घरास गेले. दफ्तरचे कारकून आले होते, तेव्हा नाशिक वगैरे माहालचे हिसेबाची चौकसी होऊन नंतर अस्तमित होता राजश्री नाना बेलबागात जाऊन आले. श्रीमंताची स्वारी घोडी फिरवावयासी मागील सहा घटिका दिवस शेष राहाता रमन्यात गेली होती. च्यार घटका तेथे घोडी फिरवून बो (का.फा.) ली त्यास आपले समक्ष दाणा चारऊन नंतर तेथोन माघारा निघाले ते साइंकाली आपले वाडयात दाखल जाले. हाजरत शाहासाहेब शहर औरंगाबादकर याजकडील अंगुराच्या डाल्या श्रीमंत व राजश्री नाना व हरिपंत फडके यास आल्या त्या पत्रासहित प्रविष्ट जाल्या. वरकड मुत्सदी परचुरे व पारसनीस व चिटणीस वगैरे याजला सालाबाद पाठवीत असतात त्या प्रो आताही सर्वत्रास पावत्या जाल्या. शृत होये. छ २० रोज मंगलवारी मदारुलमाहाम याचे वाडयात सर्वत्र आले होते. अस्तमितपर्यंत मामलतसमंधी कामे जाली व पागा वगैरे सरंजामी लोक याच्या रोजमऱ्याचे यादीवरी तारखा करून दिधल्या. जेजुरी येथे चैत्री पौर्णिमेचे दिवसी श्रीदेवाचे दर्शणास यात्रेचे लोक गडावर गेले होते. त्यास ईस्वरी इछा कैसी काये जाली तो तीनच्यारसे माणसे तेथे मृत्य पावली. अनर्थाचा प्रकार बहुतच जाला. अैसे अघटित जाल्याचे वर्तमान साद्यंत पेशजीचे अखबारी-

त सेवेसी लेखण केलेच आहे. अैसीयासी येविसींचा शास्त्रार्थ राजश्री नाना फडनवीस याणी राजश्री ओयोशास्त्री आदिकरून शास्त्री यास विच्यारावयासी सागून ग्रंथांतरीचे संमत ध्यानास आणिले. त्याजवरून राजश्री विठलपंत वाकेनवीस सरकारचे याजला जेजुरीस आज दो प्रहरा दिवसा रवाना केले. समागमे राहोटचा व कनाता वगैरे सरंजाम दिल्हा आहे. तेथे आधी शांतिकविधी करून हावन करावे, व देवास आभिषक व ब्रांम्हणसंतर्पन व दानधर्म विधियुक्त करून याप्रो धर्मकृत्य कार्ये करावी म्हणोन सागितले

आहे. त्याजप्रो माारनिले जेजुरीस करून माघारा येतील. शृत होये. छ २१ रोज बुधवारी मागील दाहा घटिका दिवस राहाता श्रीमंताचे वाड्यात दरबार जाला. राजश्री नाना फडनवीस आदिकरून मंडली व मामलेदार व दरकदार अैसे आले होते. दोन घटिका माली मुलकी कामकाज जाल्यावर सातखणीवर जाऊन पो नासिक वगैरे माहलचे तचकरियाची चौकसी जाली. नंतर राजश्री नाना (का.फा.) च्यार घटिका दिवस राहाता श्रीमंताची आज्ञा घेऊन तेथोन निघाले तो राजश्री परशरामपंत पटवर्धन मिरकर श्रीमंताचे दर्शणास आले. मदारुलमाहम आपले वाड्यात येऊन औषध नित्याचे घेतले. रा कृष्णांजीपंत सेलूकर मामलेदार पो उमरखेड, भेटीस आले होते. त्यास विडे देऊन मार्गस्त केले. नंतर बेलबागात जाऊन साइंकाली आपले वाड्यात आले. राजश्री भगवंतराव नारायेण पारसनीस नाशकास गंगाश्नाकरिता सिव्हस्त यात्रेस जातात सबब माारनिले याणी श्रीमंताची आज्ञा घेऊन नंतर साइंकाली मदारुलमाहम याचे निरोपास आले होते. रा बाबूराव केशव कुटुंबासहवर्तमान नाशकास गेले. राजश्री तुकोजी होलकर याचे पुत्र राजश्री मल्हारराव होलकर हे आपल्या तीर्थरुपासी रुसवा करून महेश्वरी आले होते. तेथोन आंहिल्याबाईस न पुसता दोनतीनसे स्वारानसी निघोन जेजुरीस जातो म्हणोन इकडे आले. खांदेश प्रांती माहालोमाहाल घासदाणा पटीचें रो घेतले. चालीसगाव येथें तीन मुकाम होते. तेथील घासदाणा घेऊन नंतर मेहूणबोकर याजवरून धुले परगण्यात गेले. पुढे थालनेराकडे किंवा चादवडीस पाहावे कोणीकडे जातात. त्याचे समजाविसीस रा रामाजी बुळे म्हणोन सरदार महेश्वरीहून रवाना जाले आहेत. त्याची याची गाठ पडल्यावर माघारा जातील की जेजुरीस येतील हे न कले. याप्रो वर्तमान आले होते. शृत होये. छ २२ रोज गुरुवारी प्रथम दोन घटिका दिवस येता श्रीमंत घोडी फिरवावयासी रमन्यात गेले होते. च्यार घटिका तेथे घोडे फिरवावयाची शयेर करून प्रहर दिवस येता माघारा आपले वाड्यात आले. त्रितीय प्रहरी

मदारुलमाहम याचे वाड्यात मुत्सदी व दरकदार व सुभे व मामलेदार आले होते. दोन घटिका जरुरियात कामे करून नंतर आपले वाड्यातून मागील साहा घटिका दिवसा निघाले ते राजश्री परशराम-पंतभाऊ मिरजकराचे येथे गेले. तेथे जाऊन उभयेताचेच खिलवत च्यार घटिका जाले. नंतर अतर पानदान वगैरे जाल्यावर मदारुल-माहम तेथोन निघोन आपले वाड्यात आले. साइंकालचे संध्या-वंदन जाले. राजश्री खंडोजी जाधव मोकासी गाडापुरकर सातारियास पागेसुधा कार्तिक मासी रवाना केले होते ते सांप्रत माघारा आले. सबब जाधव माार राजश्री नानाच्या भेटीस आले होते. त्याची भेटी जाल्यावर त्यास विडे पानदान देऊन मार्गस्त केले आणि आपण घटिका रात्रीस बेलबागात जाऊन दोन घटिका तेथे राहून तिसरे घटिकेस माघारा आपले वाड्यात आले. शृत होये. छ २३ रोज शुकुरवारी पहिले दीढा प्रहरा दिवसा राजश्री गमाजी पाटील, वकील गाइकवाड याजकडील, मदारुलमाहाम याचे वाड्यात आला. राजश्री नानानी भोजन केल्यानंतर उभयेताचे बोलणे दोन घटिका होऊन माारनिले दो प्रहराचे संधीत माघारा आपले घरास गेले. मागील नव घटिका दिवस राहाता मदारुलमाहाम निद्रा करून उठिल्यावर भागानगरचे डाकेची पत्रे छ १८ माहे

३

मजकूरची राजश्री गोविंदराव कृष्णं याची आली ते राजश्री आपाजी कोडाजी याणी मदारुलमाहम यास प्रविष्ट केली. राजश्री दाजीबा व लक्ष्मणराव फडके व राजश्री नाना अैसे त्रिवर्ग बसोन पत्राचे अवलोकण केले. राजश्री हरिपंत फडके याची प्रकृत नीट जाहाली म्हणोन त्याजला बोलाऊन पत्रे पाहावयासी दिल्ही. आणि मागील च्यार घटिका दिवस राहाता मदारुलमाहम आपले वाड्यातून निघाले ते अलीमरदाखा जादार गारदी याचा सरकारात चाकर आहे त्याचे येथे शादी म्हणोन पठाण मजकुराने बहुत बाजीदी केली होती. सबब त्याचे येथे गेले. सेला व पागोटे त्यास आहेर केला. येक घटिका तेथे होते. तोपर्यंत अतर पानदान व नाच जाल्यावर तेथोन निघोन बेलबागात येऊन नंतर आपले वाड्यात एक घटिका दिवस

शेष राहता आले. तोपर्यंत राजश्री हरिपंततात्या व दाजीबा व लक्ष्मणराव फडके बसलेच होते. तेथे मदारुलमाहम जाऊन तीन घटिकापावेतो खिलवत जाले. मध्येवरती राजश्री बहिरोपंत मेहेंदळे याजला बोलाविले होते. या प्रो बोलणे जाल्यावर फडके आदिकरून सर्वत्र आपलाले घरास गेले. टिपूकडील वकील वाईस आला आहे. त्यास राजश्री लक्ष्मणराव रास्ते येथे येण्हार त्याजसमागमे वकील मजकूर येईल तेव्हा बोलण्याचा भावगर्भ समजलियात येईल. कनकगिरी येथील राज्याचा हाती तेथे विकावयासी आला होता. तो श्रीमंताचे सरकारात खरीदी केला. राजश्री नाना फडनवीस सिव्हस्थ यात्रेस गंगास्ना(ना)स टोक्यास वैशाख मासी जावयाचा संकेत आहे. त्यास स्वारी जाण्याकरिता शुध्धपक्षी अष्टमीचे महूर्तही विच्यारून ठेविले आहे व खास पागा वगैरे सरंजाम यास ताकिदही जाली आहे. परंतु अद्यापि निश्चंये जाला नाही. संध्धिक्त आहे. ठरेल त्याप्रमाणे सेवेसी लेखण केले जाईल. मदारुलमाहम व राजश्री परशरामपंत मिरजकर हे उभयेता शुध ८ स नाशकास जातात म्हणोन हेही वर्तमान आहे. शृत होये. याउपरी पुढे प्रसंगीचें वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव कृपा करून आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाळ करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 197

९ शाबान १२०४ हिजरी
२४ एप्रिल १७९०

श्री

विनंती विज्ञापना अैसी जे येथील कुशल तागाईत छ ९ माहे साबान मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २ माहे मजकूर रोज शनवारी त्रितीय प्रहरी अखबारपत्र सरकारचे

डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान रोज मजकुरी मागील प्रहर दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस याचे वाडचात राजश्री हरीपंत फडके व बहिरोपंत मेहेदले आले. उपरांत राजश्री रघुनाथराव पटवर्धन कुरंदवाडेकर मदारुलमाहाम याचे भेटीस आले होते. दोन घटिका परस्परे भाषण होऊन माारनिले आपले हावेलीस गेले. नंतर राजश्री नाना व हरिपंततात्या व मेहेदले मजकूर याच खिलवत इंग्रेजप्रकर्णी दोन घटिका रात्रपावेतो जाले. यावर सर्वत्र आपलाले घरास गेले. श्रीमंताची स्वारी घोडी फिरवावयासी रमन्यात मागील साहा घटिका दिवस राहाता गेली होती. तेथोन माघारे येताना येक घटिका गारा पडल्या. उपरांत पाऊस पडो लागला. तैश्यात श्रीमंत आपले वाडचात मागील दो घटिका दिवसा आले. मदारुलमाहाम साता घटिका रात्रीस आपले वाडचातून निघोन काळचा वावरात राजश्री सदासिवभट दाते याचे येथे कीर्तन श्रवण करावयाकरिता जाऊन अकरा घटिका रात्रीस माघारा आपले घरास आले. श्रुत होये. छ ३ रोज रविवारी त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडचात मुत्सदी व दरकदार व मामलेदार वगैरे आले होते. राजश्री हरीपंत फडके व मेहेदलेही आले. मामलतसमंधी च्यार घटिका बोलणे दरकदार दफ्तरचे याणी येऊन केले. आली बाहादर याजकडील पत्रे व मेवेजात मथुरेचे मुकामीहून आली ते त्याजकडील कारभारी याणी श्रीमंतास व मदारुलमाहाम यास पावती केली. राजश्री नाना व हरीपंत फडके, बहादराकडील पत्रे आली ते आस्तमितपर्यंत वाचीत बसले होते. पत्राचा भावगर्भ त्याणी आपले खासगत फौजेचे वगैरे खर्चाचा मजकूर लिहिला होता. गोसावी याची व सिंदे याची सफाई पूर्वीच जाली. आता कामकाज एके विच्यारे करून होत असते म्हणौन लिहिले होते. शाहाजी भोसले आकलकोटकर पेशजी कार्तिक मासी मृत्य पावले त्याजवरून भोसले मजकूर याचे दोघे पुत्र राजश्री फतेसिंग व तुलजाजी भोसले चैत्र वाा दशमीस आकलकोटीहून निघोन मजल दर मजल श्रीमंताचे भेटीस येथे यावयाचे केले. रोज माारी

भोसले याचा मुकाम लोणी, येथून आट कोस आहे तेथे जाल्याचें वर्तमान शुतरसवार घेऊन आला. ते पत्रे राा जिवाजीपंत वकील दिाा मजकूर याणी मदारुलमाहाम व फडके यास दिल्हीं. उदईक वानोडीवर येऊन भेटीचा योग व्हावा अैसा निश्चयै जाला. शृत होये. छ ४ रोज सोमवारी मागील दीड प्रहर दिवस राहता राजश्री हरीपंत फडके मदारुलमाहाम याचे वाडचात गेले. दोन घटिका बोलने करून नंतर श्रीमंताचे वाडचात जाऊन (भो)सले याचे भेटीस जावया-विसी फडके माार याणी श्रीमंतास विनंती केली. त्याजवरून स्वारीची सिध्धता होऊन मागील प्रहर दिवस राहाता श्रीमंत आपले वाडचातून निघाले तो स्वारीसमागमे राा हरीपंत फडके व माधोराव फडके व परशरामपंत व रघुनाथराव मिरजकर व माधोराव पानसे व रास्ते व बिनीवाले व पेठे व घोरपडे व पाटणकर आदिकरून सरदार मानकरी व सरंजामी गेले होते. राा फतेसिंग भोसले लोणीहून कूच प्राथःकालीच करून वानोडीस मुकामास येऊन आपण उभयेता बंधु सरंजामसुधा श्रीमंताचे भेटीस राा घासीराम कोतवाल याचे तल्या-पलीकडे आले तो इकडौन श्रीमंताची स्वारी त्या स्थली गेलियावरी आधी मानकरी सरदार याच्या भेटी जाल्या. नंतरी श्रीमंताची व उभयेता भोसले याची भेटी जाली. तो परजंन्ये आतिषयेसी वोळला याकरिता काहीयेक बैठक होऊन बोलणे विशेष जाले नाही. भोसले मजकूर माघारा निघाले ते मुकाम मजकुरी आपले लस्करात गेले आणि श्रीमंत तैश्याच पडल्या पाव

२

सात माघारा निघाले ते हातीचे आंबारीत स्वार होऊन मागील दोन घटिका दिवस शेष राहाता आपले वाडचात दाखल जाले. या उपर राा हरीपंततात्या याणी श्रीमंताची आज्ञा घेऊन निघाले ते मदारुल-महाम याचे वाडचात आले. स्वारीसमागमे राजश्री नाना गेले नाहीत. राा बहिरोपंत मेहेदले व सदासिवपंत गुणे वकील व लक्ष्मणपंत कोपर-कर पागे वगैरे मुत्सदी यासी बोलत होते तो तेथे फडके माार याणी येऊन भेटी जाल्याचे वर्तमान सांगितले आणि तैसेच निघोन राजश्री

परशरामपंत मिरजकर याचे घरास गेले. मदारुलमहाम अस्तमिती बेलबागात जाऊन आल्यावर दो घटिका रात्रीस फडके मजकूर मिरजकराचे येथोन राजेश्री नानाच्या वाडचात मागती येऊन दोन घटिका बोलोन पाचा घटिका रात्रीस आपले घरास गेले. बोलण्याचा भावगर्भ ध्यानास आला कीं मिरजकर सिव्हस्ताकरिता गंगास्नानास नाशकास जावयाचा निरोप मागतात. त्यास मदारुलमहाम याचे म्हंणे की आम्हीं टोक्यास जात असता मसलतीचे प्रसंगामुले तूर्त राहावयाचे केले याअर्थी तुम्हींही जाऊ नये. कारण की इंग्रेज याजकडील राजकारण लागले आहे याकरिता फौजेची नेमनूक करून देऊन तुमची रवानगी लवकरच मिरजेस करावयाची आहे. त्यास अैसे प्रसंगास जावयाचे ठीक नाही. मिरजकर पाच लक्ष रुप्ये फौजेचे सरंजामीस मागतात त्याचे उतर की सांप्रत काही द्यावयाचे नाही. बाद बरसात पाहून घेऊ म्हणौन बोलणे लागले आहे. पहावे काये ठैरते. शृत होये. छ ५ रोज मंगलवारी मागील सवा प्रहर दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस याचे वाडचात राजश्री हरीपंततात्या व बाबा फडके व मिरजकर व मेहदले अैसे आले. दोन घटिका रात्रपावेतो बैठक होऊन खिलवत जाले. श्रीमंत मागील सहा घटिका दिवस राहाता रमन्यात घोडी फिरवायासी जाऊन साइकाली माघारा आपले वाडचात आले. रा महादाजीपंत गुरुजी निरोप घेऊन नाशकास गेले. वो रो गोविंदभट निरचेऊर त्रिबकीहून माघारा काल येथे आले. शृत होये. छ ६ रोज बुधवारी तृतीये प्रहरी मदारूलमाहाम याचे वाडचात रा हरीपंततात्या व बाबा व लक्ष्मणराव फडके आले. आकलकोटकर भोसले याजकडील बोलणे च्यार घटिका जाल्यावर मेहेदले मजकूर येऊन दोन घटिका रात्रपावेतो खिलवत जाले. भोसले मजकूर याणी वानोडीहून कूच करून रा घासीराम कोतवाल याचे तल्याजवल भवानी पेठेच्या सरहादीस उतरले आहेत. समागमे पाच हाती व पाचच्यारसे स्वार वगैरे सरंजाम आहे. शृत होये. छ ७ रोज गुरुवारी मागील दाहा घटिका दिवस राहाता रा बहिरोपंत मेहेदले राजश्री नानाच्या वाडचात येऊन उभयेताचे बोलणे होत

होते. तो रा धोंडो महादेव किलेदार त्र्यंबक व येशवंतराव माहादेव किलेदार आमदानगर हे उभयेता येऊन संस्थान मजकूरचे बोलणे केले तो राजश्री हरीपंत फडके येऊन दोन घटिका खिलवत जाले. स्वारीबराबर दरबारचा डेरा नवा तयार बहुत थोरला करविंला आहे. त्याच्या खाबास लोखंडाचे किलावे तोफखान्यात करविले होते ते सिध्ध जाले म्हणौन रा सकारामपंत पानसे येऊन च्यार्‍ही किलावे राजश्री नानास व फडके यास दाखविल्यावर फरासखान्यात ठेवावे म्हणौन सागितले. मिरजकरा बोार दाहा तोफा व पानसे याजकडील कारभारी द्यावयाची परवानगी जाली तेविसीचे बोलणे पानसे मजकूर बोलोन गेले. रा फतेसिंग भोसले याची व मदारुलमहाम याची भेटी रोज माारी व्हावयाची म्हणौन सिध्धता जाली होती. मागील च्यार घटिका दिवस राहाता भोसले मजकूर उभयेता बंधू से पंनासा खाश्यानसी आले. राजश्री नाना व हरीपंततात्या चौकाचे दक्षणेकडील वोसरीवर येऊन बसले होते. शाहाजी भोसले याचे वेलेस मदारुलमाहाम याणी आपले वाड्याबाहेर निघोन त्यास घेऊन यावे तो सिरस्ता चालावा म्हणौन भोसले मजकूर याचे लक्ष वकीलानी विनंती येविसी केली. भोसले राजश्री नानाच्या वाड्याचे आत येऊन आधी मानकरी लोकाच्या भेटी करविंल्या. मदारुलमाहाम याचे मानस पूर्व सांप्रदायाचे रीतीचे नाही अैसे ध्यानास आल्यावर भोसलेही पुढे येऊन बैठकीचे स्थलीच भेटी जाल्या. आर्ध घटिका बेसले होते. परस्परे भाषणे होऊन नंतर आतर पानदान भोसले यास दिल्हे. वरकड मऱ्हाटे लोकास विडे दिल्ह्यावर भोसले मजकूर माघारा निघोन आपले डेऱ्यास गेले. राजश्री नाना व हरीपंत फडके आर्ध घटिका तेथेच बसोन नंतर राजश्री नाना बेलबागात जाऊन साइंकाली माघारा आपले वाड्यात आले. श्रुत होये. छ ८ रोज शुकुरवारी प्रातःकालीच श्रीमंत रमन्यात घोडी फिरवावयासी गेले होते. प्रहरा दिवसा माघारा आपले वाड्यात आले. पागे व मऱ्हाटे सरदार व मानकरी शंभर सवासे आसामीस श्रीमंतणी भोजनास बोलविले होते. दीढा प्रहरा सर्वत्र सरकारवाड्यात येऊन भोजने

डॉ. म. म. द. पा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

जाली. यावर श्रीमंत दिवानखान्यात येऊन बसले आणि सर्वत्रास विडे व सुगंधी साहित्य व फुलाचे हार व गजरे या प्रो बहुमान करून मार्गस्त केले. त्रितीय प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडचात मुत्सदी व दरकदार वगैरे आले होते. रा बहिरोपंत मेदले येऊन राजश्री नानासी बोलत आसता राजश्री हरीपंततात्याही आले. नंतर उभयेताचेच खिलवत दोन घटिका जाले. यानंतर मेदारुलमाहाम मागील च्यार घटिका दिवस शेष राहाता निघाले ते राजश्री आपा बलवंत याचे डेऱ्यास गेले. फडकेही होते. तेव्हा त्रिवर्गाचे खिलवत साइंकालपर्यंत जाले. यानंतर राजश्री नाना व तात्या माघारा निघोन आपले घरास फडके मजकूर आले आणि राजश्री नाना परभरा तोफखान्यात जाऊन श्रीव्यंकटेशाचे दर्शण करून दो घटिका रात्रीस आपले वाडचात आले. करनाटकचे स्वारीस मिरजकर याजला रवाना करीतच आहेत. परंतु राजश्री आपा बलवंत याजलाही पाठविनार म्हणौन वर्तमान आहे. येविसीचा इत्य ठैरल्यावर सेवेसी लेखण केले जाईल. बोलणे लागले आहे. राजश्री नाना फडनवीस पोर्णिमेचे चंद्रग्रहाणास तुला-पुरास जाणार अैसी वार्ता आहे. रा गमाजी पाटील वकील दिा गाइकवाड याजला समाधान नाही. माारनिलेची पत्रे राजश्री मानाजी गाइकवाड याजकडे बडोद्यास गेली आहेत. त्याचे उतर आद्यापि आले नाही. आल्यावर तहात गोष्ट येईल अैसे आहे. टिपूकडील वकील वाईसच आहेत. त्याजकडील बोलणे, रास्ते मध्यस्त आहेत ते बोलतात. मदारुलमाहाम याचे मानस की वकील माार अैवज घेऊन आले आहेत, तो हास्तगत करावा, वकील येथे न येता सामदाम करून पैका घ्यावा आणि तेथोनच माघारे जावे अैसे आहे. याउपर काये निश्चंये होतो पाहावे. शृत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. कृपा करून सदैव आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विज्ञापना. नवाब कायेमुंदौला सुरतकर याचा काल छ २४ माहे जाखरीस जाल्याचे वर्तमान आले व नवाब नजीमु-दौला खंबायेतकरही मृत्य पावले, शृत होये. हे विज्ञापना.

A. R. No. 198 १५ शाबान १२०४ हिजरी

३० अेप्रिल १७९०

(प्रारंभीच्या ओळी फाटल्या आहेत)

हिजरी रोज शुक्रवार.

पूर्वी छ ८ माहे मजकूरपर्यंत वर्तमान लिहून छ ९ रोंजी सरकारचे डांकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान श्रुत जालें असेंल. सांप्रत छ१५ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिले असें.

परशराम रामचंद्र मिरजवाले याची रवानगी शाबानचे महिन्यात करणार म्हणोन पूर्वी लिहिले आहें. त्यास परशरामपंत मिरजवाल्यासमागमे पंचवीस हजार फौजेची नेमणूक केली आहे. त्यास कृष्णराव बलवंत यासमागमे जरीपटका व पागा व हुजरातचें लोक व सरंजामी वगैरें दाहा हजार फौजे देऊन परशरामपंत मिरजवाल्यासमागमें कृष्णराव बलवंतास रवाने करणार म्हणोंन यैकिलें.

परशरामपंताचे हमराह दाहा तोफा व दोन गरनाला देणार. त्यास बालाजीपंतानी तोफखान्याचे दारोग्यास सूचना केली कीं दाहा तोफा व दोन गरनाला सरंजामसहित गारपीरानजीक जाऊन उतरवणें. त्याजवरून छ ९ रोजीं गारपीरानजीक तोफा व गरनाला मिळून बारां व गाडदी सेंभर जाऊन उतरले आहेंत. हरिपंत फडक्याची तबियत दर्दसिकमाने छ १२ रोजपासून काहिली आहें. दरबारास जात नांहींत.

छ ९ रोज शेनिवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन कवालाचे गायेन यैकून स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून कागजावर दसखते केली. नंतर आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सात मजली बंगल्यात बसून गंजिफा आस्तमानपर्यंत खेळून रात्रौ संध्या व भोजन करून आरामास माहलात गेलें.

बालाजीपंतानी छं माारी तिसरे प्रहरी हरीपंत व बहिरोपंत मेंदळ्यास आपले हवेलीस बोलाऊन आणऊन दोन घटका रात्रपर्यंत त्रिवर्गाची खिलवत जाली. नंतर बालाजीपंत बेलबागात जाऊन देवदर्शन घेऊन हवेलीस गेले. हरिपंत व मेंदळें मजकूर आपले हवेलीस गेले.

छ १० रोज रविवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन येकादसी म्हणून स्वारी तयार करऊन आणऊन हाथीवर स्वार होऊन पर्वतीस देवदर्शनाकरितां गेले. राव मवसुफासमागमें रघुनाथराव नीलकंठ मिरजवाले व गंगाधरराव रास्तें व रघुनाथराव नारायेण व माधवराव रामचंद्र व सखारामपंत पानसें व बिनिवालें व घोरपडे व पाटणकर व दरेकर व निंबालकर व घांटगे व पंवार वगैरे सरदार व मुतसदी मंडली व स्वार च्यारपांच हाजार व गाडदी व शागिर्दपेशा वगैरें जमीयेत होती. राव पंतप्रधानानी पर्वतीसच स्नानसंध्यादिक करून देवदर्शन घेऊन सरदार मुतसद्यासहित उपहार करून पुन्हा हाथीवर स्वार होऊन दाहा घटका दिवसास बेलबागात जाऊन विष्णुच दर्शन घेऊन हवेलीस जाऊन आराम केला. आडीच प्रहर दिवसास पुन्हा उपहार करून सात मजली बंगल्यावर जाऊन बसले होते. रात्रौ संध्या व उपहार करून कवालाचे गायेन यैकून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंताने छ माारी तिसरे प्रहरी आपले हवेलीस हरिपंत व परशराम रामचंद्र मिरजवालें व बहिरोपंत मेंदळे यासी बोलाऊन आणऊन अस्तमानपर्यंत खिलंवत केली. उपरांतिक बालाजीपंत बेलबागात न जाता आपले खास बागात जाऊन बागाची सयर करून तेथे संध्या करून दोन घटेका रात्रीस आपले हवेलीस गेले. हरिपंत व मेंदले मजकूर आपले हवेलीस गेले परशराम रामचंद्र राव पंतप्रधानाचे हवेलीस जाऊन राव मवसुफासी यक घटका बोलून आपले मकानास गेले.

छ ११ रोंज सोमवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तालिमखान्यात जाऊन तालमीचा हुनेर सिकून स्नानसंध्या देवपूजन करून भोजन केले. नंतर कागजावर दसखते करून अराम केला. अडीच प्रहर दिवसास उपहार करून स्वारी तयार करऊन लक्ष्मणराव व माधवराव फडके व रघुनाथराव नीलकंठ मिरजवाले व रास्ते व जाधव व पाटणकर व घोरपडे व पंवार व भापकर व निबालकर वगैरें सरदार व स्वार तीनच्यार हजार व गाडदी हजार दीड हजार व शागिर्दपेशा वगैरें जमियेत घेऊन राव मवसूफ तिसरे प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन दोनतीन घटका घोडी फेरून हरणाचे रमण्यात जाऊन स्वार व गाडदी हरणाचे आसपास उभे करून हरणें धरावी इतकियात हरणे आवग्र पळून गेली. सांपडली नाहीत म्हणून आस्तमानी हवेलीस गेले. रात्रौ संध्या व भोजन करून कवालाचे गायेन तीनच्यार घटका यैकून आरामास गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी हरिपंतास आपले हवेंलीस बोलाऊन आणऊन दोनतीन घटका खिलवत केली. इतकियात रामजी पाटील जाधव निं।। सिंदे व नारायेणभट दीक्षित सातारकर आले म्हणून त्यासी पंत माारनिलेनी बोलून मार्गस्त करून पुन्हा बालाजीपंताची व हरिपंताची दोनतीन घटका खिलवत जाली. नंतर बालाजीपंत प्रदोष म्हणून आपले बागात आस्तमानी भोजनाकरिता जाऊन बागातच भोजन करून प्रहर रात्रपर्येत तवाफाचा नाच पाहून हवेलीस गेले. हरिपंत आस्तमानीच आपले हवेलीस गेले.

छ १२ रोज मंगलवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्यादिक करून भोजन केले. नंतर कागजावर दसखते करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून फील-खान्यातील हथी आणऊन नजरंदाजी करून सात मजली बंगल्यावर-ते जाऊन आस्तमानपर्येंत चवसर खेळून रात्रौ संध्या व भोजन करून कवालाचे गायेन यैकून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी परशराम रामचंद्र मिरजवाले यास आपले हवेलीस बोलाऊन आणऊन अस्तमानपर्यंत मिरजवाले मजकुरासी बोलून मार्गस्त केले.

हरिपंत फडके छ मजकुरी दर्दशिकमाने बहुतच काहिली. बालाजीपंतानी यकदोन बोलाऊ पाठविली. परंतु पंत मजकूर बालाजीपंताचे हवेलीस गेले नांहींत.

गमाजी पाटील दिा मानाजी गाइकवाड छ मजकुरी बारा घटका दिवसास बालाजीपंताचे हवेलीस जाऊन दोनतीन घटका पंत माारनिलेसी गाइकवाडप्रकर्णी बोलून आपले मकानास गेलें.

बालाजीपंत छ मजकुरी प्रहर रात्रीस बालकृष्णपंत सपरें याचे घरास जाऊन दोनतीन घटका बसून हरिकथा यैकून आपले हवेलीस गेले.

छ १३ रोज बुधवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तीन घटका तीरंदाजी करून स्नानसंध्या देवपूजन करून भोजन केले. उपरातिक गंजिफा तीनच्यार घटका खेळून आराम केला. अडीच प्रहर दिवहसास द्वितीये भोजन करून सात मजली बंगल्यात बसून कवालाचे गायेन यैकून बंगल्यावरील छेज्यावर जाऊन पुण्याचे आबादी वगैरेंची सयर करून रात्रौ चंद्रगहण म्हणून घटका दिवस राहता भोजन करून प्रहर रात्रपर्यंत चवसर खेळून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीतच बसून माहलाती वगैरें हिशब मनास आणोन दोन घटका दिवस राहता बेलबागात जाऊन देवदर्शन घेऊन हवेलीस गेले.

छ १४ रोज गुरुवारी राव पंतप्रधान चंद्रगहण म्हणोन प्रहररात्र पिछेली राहता बेदार होऊन ग्रहणसंधीत स्नान हवेलीतच करून प्रथम यक गोदान दिल्हे. नंतर अश्वदान द्यावे म्हणून पागेतील निळा

घोडा आणऊन मये सरंजाम व रुप्याची सांकली व ब्राम्हणास पोशाक तयारी व ढाल तलवार व तरकश व दक्षणा नख्त रुपये ५०० येणे-प्रमाणें ब्राम्हणास देऊन वरकड ब्राहणास हजारबारासे रुपये खैरात करून होम हवन इत्यादिक करून तीन घटका दिवसा पुन्हा स्नान करून अल्प उपहार करून हरणें व बाज वगैरें आणऊन तमाशा पाहून आराम केला. तिसरे प्रहरी सात मजली बंगल्यात बसून गजिफा व चवसर खेळून रात्रौ चंद्रोदंई भोजन करून लवकरच माहलात आरामास गेले.

बालाजीपंतानी चंद्रगहणसमई आपले हवेलीतच स्नान करून ब्राम्हणास खैरात व गोदाने दिल्हीं व छ मजकुरी हवेलीतच होते. दोन घटका दिवस राहता बेलबागात जाऊन विष्णुच दर्शन घेऊन हवेलीस जाऊन रात्रौ चंद्रोदंई भोजन केले.

छ १५ रोज शुक्रवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून गंजिफा तीनच्यार घटका खेळून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून स्वारी तयार करऊन लक्ष्मणराव व माधवराव फडकें व नीलकंठराव खास-गीवालें व माधवराव रामचंद्र व जाधव व भापकर व निंबालकर व पाटणकर व घोरपडे वगैरें सरदार व स्वार तीनच्यार हजार व गाडदी वगैरें जमीयेत राव मवसुफानी समागमे घेऊन तिसरे प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन तीनच्यार घटका घोडी फेरून घटका दिवस राहता राव मवसूफ हवेलीस जाऊन रात्रौ संध्या व भोजन करून कवालाचे गायन यैकून आराम केंला.

बालाजीपंतानी छ मजकुरी आस्तमानी आपले बागात मिरज-वाल्यास भोजनास बोलाविले होते. भोजन जाल्यावर परशराम रामचंद्र व माारनिलेचे कनिष्ठ पुत्र व रघुनाथराव नीलकंठ व सिवराव नीलकंठ यास साडेतीन पारचेप्रमाणें वस्त्रें व हमराही इस्म पंधरा यास पागोटी, सेले, पैठणी देऊन बालाजीपंतानी मिरजवाले मजकुराची

मुदारात केली. नंतर परशरामपंत वगैरें आपले हवेलीस गेले. बालाजीपंत दाहा घटका रात्रीस बागातून आपले हवेलीस गेले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

A. R. No. 199 ६ रमजान १२०४ हिजरी

२० मे १७९०

(आरंभीचा मजकूर फाटलेला आहे.)

पूर्वी छ २९ माहे शाबान (मजकूर फाटला) मान लिहून छ ३० रोजी सरकारचे डांकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान श्रुत जालें असेल. सांप्रत छ ६ माहे रमजानपर्यंत यैकिलें व जालें वर्तमान सांप्रदाया प्रो दफेवार लिहिलें असे.

परशराम रामचंद्र मिरजवालें छ ४ माहे रमजानी मौजे वानवडीहून कूंच करून मौजे हडपसरानजीक जाऊन मुकामात करून राहिले आहेंत. परशरामपंताचे समागमेचा तोफखाना वगैरें सरंजाम छ ७ माहे रमजानी मिरजेस पुढे रवाना करणार. परशराम रामचंद्र छ ९ रोजी हडफसराहून कूच करून जाणार म्हणोन यैकिलें.

फतेंअलीखानाकडील वकील वांईस आले आहेत. लक्ष्मणराव रास्ते समागमे घेऊन पुण्यास येणार म्हणोन लिहिले आहें. त्यास लक्ष्मणराव रास्तें छ ४ माहे रमजानी पुण्यास आलें. राव पंतप्रधानाची व बालाजीपंताची भेटी घेंतली. छ ५ रोजी अबदुलनबीखान व गुलामहुशनखान वकील निं।। फतेअलीखान पुण्यांस आले. राव पंतप्रधानानी विश्वासराव चिंतामण पागेवाले वकील मजकुरांस इस्तकबाल पाठविले होते. वकील मजकुरास लक्ष्मणराव रास्ते याचे पेठत राहवयास मकान दिल्हें आहे व वकीलाचे समागमे बेवीस बैल होनाचे आहेंत. एकंदर दोनतीन लक्ष आहेत व पांचसहा लक्ष रुपयाच्या हुंड्या आहेंत म्हणोन यैकिलें.

पुण्यात शहरात रात्रौ पांचसाहा दिवसापासून चौकीपाहाऱ्याचा बंदोबस्त होत आहें. आबादीत जागाजागा नाके आहेत. तेथे हजार पांचसे स्वार तयार होऊन उभे राहत आहेत व गस्त रात्रौ दोनतीनसे स्वाराची कुल आबादीत फिरत आहें. राव पंतप्रधानाचे हवेलीतही चौकीपाहऱ्याची बंदोबस्ती बाळाजीपंतानी करविली आहें. याची खुलस कलत नांहीं. शोध करून मागाहून लिहिले जाईल.

मुंबईहून मिस्तर उकीट इंगरेज मिस्तर मालट वकील इंगरजाचे भेटीस पुण्यास येणार. सबब बालाजीपंताची परवानगी मिस्तर मालट वकीलानें घेतली. से पन्नास मनुशानिसी यावे म्हणून राव पंतप्रधानाचे दस्तके राहदारीचे देविलें.

अंबोजी इंगले व बापोजी होळकर जयेपूरवाल्याचे मुकाबिल्यास होते. त्यास सांप्रत आबोजी इंगल्याचे फौजेसी व जयपूरवाल्याचे कहीवाल्याचे समागमीचे फौजेसी लढाई जाली. से दोनसे लोक ठार व जखमी उभयताकडील जाली. आंबोजी इंगल्याकडील सिकस्त जाली व इस्मालबेग जयेपूरवाल्यासी सामिल जाला आहे म्हणून वर्तमान यैकिलें.

राव पंतप्रधानाचे हवेलीत बालाजीपंतानीं पांचसाहा दिवसांपासून बहुत चौकीपाहरियाची बंदोबस्ती करविली आहे. हररोज राघोपंत गडबोले राव मवसुफाचे हवेलीतच निद्रा रात्रीस करीत आहेंत.

छ ३० रोज शनिवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन व भोंजन करूंन च्यारपांच घटका गंजिफा खेळून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून कवालाचे गायेन यैकत बसले होते. तिसरे प्रहरी यैनेमाहलात दरबार करून बसले. बालाजीपंत वगैरें मुतसदी हजर जाले होते. दोनतीन घटका राव मवसूफ दरबारात बसून हरयक जवाबसाल मनास आणोन बालाजीपंतासहित खिलवतीस जाऊन तीनच्यार घटका खिलवत

करून राव मवसूफ बरखास्त होऊन गेले. बालाजीपंत आपले हवेलीस गेले. राव मवसुफानी रात्रौ संध्या व भोजन करून चवसर खेळून आराम केलां.

बालाजीपंतानी छ मजकुरी रात्रौ कवालाचे गायेन प्रहर रात्रपर्यंत यैकून निद्रा केली.

हरीपंत छ मजकुरी तिसरे प्रहरी गुलटेंकडीनजीक बागात चिंतामणराव वगैरें पुत्रासहित गेले होते. तिकडून परशराम रामचंद्र मिरजवालेही बागात गेले. च्यार घट(का)पर्यंत हरिपंताचे व मिरजवाले मजकुराचे बोलणे जालें. नंतर बागातच रात्रौ भोजने जाली. नव घटका रात्री हरीपंत आपले हवेलीस गेले. मिरजेवाले मजकूर आपले मुकामास गेले.

बालाजी केशेव नाईक थथे, राव पंतप्रधानाचे मेंव्हणे, याचे स्त्री काहिली होती. छ मजकुरी प्रहर रात्रीस थथे मजकुराचे स्त्रीचा काल जाला.

छ १ माहे रमजान रोज रविवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तालीमखान्यात जाऊन तालमीचा हुनरे सिकून स्नान संध्या देवपूजन करून भोजन केले. नंतर आराम केंला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून चिंतामणराव फडक्यास बोलाऊन आणऊन आस्तमानपर्यंत सात मजली बंगल्यात चवसर व गंजिफा खेळून रात्रौ संध्या व भोजन करून कवालाचे गायेन यैकून आरामास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस हरिपंतास व बहिरोपंत मेंदळचास बोलाऊन आणऊन दोनतीन घटका खिलवत केली. इतकियात मिस्तर मालट वकील इंगरेजाकडील बोलावणे मेंदळें मजकुरास आले. सबब मेंदळे मजकूर मिस्तर मालट वकिलाचे मकानास गेल्यावर पुन्हा अस्तमानपर्यंत बालाजीपंताची व हरीपंताची खिलवत जाली. उपरांतिक बालाजीपंत संध्येस उठले. हरीपंत आपले हवेलीस गेले.

मिस्तर मालट वकील इंगरेंजाने परशराम रामचंद्र मिरजवालें यांस छ माारी तिसरे प्रहरी ज्याफतीस येण्याविसी प्रातःकालीच सूचना केली. त्याजवरून मिरजवाले मजकूर इंगरेजाचे मकानास गेले होते. मिस्तर मजकूर बंगल्याबाहिर येऊन परशरामपंत व रघुनाथराव नीलकंठ वगैरेस घेऊन गेला. च्यारपांच घटकां तवाफाचा नाच जाला. उपरांतिक मिस्तर मालट वकीलाने मिरजवाले मजकुरास जंवाहिर व वस्त्रें वगैरें दिल्ही. त्यांचा तपसींल.

१ परशराम रामचंद्र आसामी येक

२ जवाहिर रकमें

१ सिरपेंच मुरसा

१ जिगा

२

८ वस्त्रें सनगें

१ पागोटे पैठणी

१ सेला पैठणी

३ ज्यामेवार थाने सुमार

१ पटका

१ किमखाबी थान

१ दुशाला गुलाबी

८

५ हत्यारें

१ पस्तोल

१ पेशकबज

१ तलवार

१ दस्ताना

१ पेटी लोखंडी

५

१ घोडा रास

रघुनाथराव नीलकंठ आ।। १

२ जवाहिर रकमें

१ सिरपेंच मुरसा

१ जिगा

२

७ वस्त्रें सनगें

१ पागोटे

१ सेला

२ ज्यामेवार थानें

१ पटका

१ दुशाला पिवली

१ किमखाबी थान

७

२ हत्यारें

१ पस्तोल

१ दस्ताना

२

हमराही इस्म सुमार ८ यास च्यारच्यार पारचे वस्त्राप्रमाणे वस्त्रें दिल्हीं.

येणेंप्रमाणें जवाहिर व वस्त्रें वगैरें मिरजवाल्यास देऊन तवाजा केली. पांदान घेऊन मिरजवाले आपले खेम्यास गेले.

छ २ रोज सोमवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून आराम केला. आडीच प्रहर दिवसास द्वितीये भोज़न करून स्वारी सिध करऊन लक्ष्मणराव व माधवराव फडके व नीलकंठराव खासगीवालें व माधवराव रामचंद्र व

घोरपडे व जाधव व भापकर व निबालकर व नाईक वगैरें सरदार व दोन आडीच हजार स्वार व गाडदी वगैरें जमीयेत समागमे घेऊन राव मवसूफ तिसरें प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक मैदानात जाऊन दोनतीन घटका घोडी फेरून हरणाचे रमण्यात जाऊन हरणाचा वगैरें तमाशा आस्तमानपर्यंत पाहून दोन घटका रात्रीस हवेलीस जाऊन रात्रौ संध्या व भोजन करून आराम केला.

बालाजीपंत आपले हवेलीतच होते. रामजी पाटील जाधव निं॥ सिंदे छ मजकुरी तिसरे प्रहरी पंत माारनिलेचे हवेलीस गेले होते. च्यारपांच घटका खिलवत जाली. नंतर बालाजीपंत संध्येस उठलें. रात्रौ बालाजीपंतानी तवाफाचा नाच प्रहर रात्रीपर्यंत पाहिला.

परशराम रामचंद्र मिरजवाल्याचे मकानास मिस्तर मालट वकील इंगरेज छ मजकुरी तिसरे प्रहरी मिरजवाले मजकुराचे सूचनेप्रमाणे ज्याफतीकरितां गेले होते. दोनतीन घटका मिस्तर मालट वकील मिरजवाल्याचे खेम्यात बसला. तवाफाचा नाचही जाला. उपरांतिक जवाहिर व वस्त्रें दिल्हीं.

१ मिस्तर मालट वकीलास
- १ सिरपेंच मुरसा
- १ कलगी
- १ घोडी रास

१ वस्त्रें
- १ पागोटे
- १ सेला
- ३ ज्यामेवार थान
- १ पटका
- १ किमखाबी थान
- १ शालजोडी

८

१ तलवार

१ मिस्तर हरण यास च्यार पारचे वस्त्रें
१ मिस्तर इठाव यास च्यार पारचें वस्त्रें
१ हमराही इस्म आ।। ५ यास सेले पागोटीं
१ बहिरोपंत मेंदळचास साडेतीन वस्त्रें
१ दुभासी यास च्यार पारचे वस्त्रें

येणेंप्रमाणें जवाहिर व वस्त्रें देऊन मुदारात केली. नंतर मिस्तर मालट वकील इंगरेज आपले मकानास गेंला.

बालाजीपंत छ मजकुरी प्रातःकालीच भास्करपंत भानूस आराम नांही म्हणून पंत माारनिले परामृशास गेले होते.

छ ३ रोज मंगलवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन कवालाचें गायेन यैकून स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून तीन च्यार घटका गंजिफा खेळून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सातमजली बंगल्यात बसून अस्तमानपर्यंत चवसर व शेतरंज खेळून रात्रौ संध्या व भोजन केले. उपरातिक आरामास गेले.

बालाजीपंत मजकुरी तिसरे प्रहरी पर्शराम रामचंद्र मिरजवाले वानवडीनजीक आहेत तेथे जाऊन तीनच्यार घटका मिरजवाले मजकुरासी खिलवत करून हवेलीस गेले. नंतर बालाजी केशव नाईक थथे व रंगराव त्रिबक याचे घरास मातमीस जाऊन आपले हवेलीस गेले.

छ ४ रोज बुधवारी राव पंतप्रधान प्राथःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून तीरंदाजी तीनच्यार घटका खेळून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून जेगदेवराव नाईक निंबालकर अकुलुजकरास इस्तकबाल जावयाकरिता स्वारी सिध करऊन लक्ष्मणराव व माधवराव फडके व रघुनाथराव

नीलकंठ मिरजवाले व घोरपडे व जाधव पाटणकर व भापकर वगैरे सरदार व स्वार दोनतीन हजार व गाडदीं सभर दोन हजार व शागिर्द वगैरे जेमियेत समागमे घेऊन राव मवसूफ तिसरे प्रहरी हाथीवर स्वार होऊन कोंतवाल तलावानजीक गेले. तिकडून जेगदेवराव नाईक निबालकर आलें. नाईक निबालकर याची स्वारी घोड्यावर म्हणून राव पंतप्रधानही हाथीवरून घोड्यावर स्वार जालें, नंतर भेटी जाली. राव मवसूफ तेथेच घोडी फेरायास गेले. निबालकर मजकूर बालाजीपंत व हरीपंताचे भेटीकरिता गेले. राव मवसूफानी तीनच्यार घटका घोडी फेरून आस्तमानी हवेलीस जाऊन रात्रौ संध्या व भोजन करून कवालाचे गायेन यैकून आराम केला.

बालाजीपंत छ मजकुरी आपले हवेलीतच होते. तिसरे प्रहरी बहिरोपंत मेंदळे व चिंतामणराव फडके आले त्यासी खिलवत करीत बसले. इतकियात लक्ष्मणराव रास्ते भेटीकरिता आले. भेटी जाली नंतर गेले. उपरांतिक जंगदेवराव नाईक निंबालकर पंत माारनिलेचे भेटीस आले. त्याचीही भेटी जाली. इतकियात भास्करपंत भानू काहिली होते ते मृत पावले. भानू मजकूर बालाजीपंताचे चिचेरे बंधु सबब अवरोध बालाजीपंतास आला. त्याजवरून सर्वत्र बरखास्त जालें.

लक्ष्मणराव रास्तें छ मजकुरी वांईहून फतेअलीखानाकडील वकील समागमे घेऊन पुण्यास आलें. अवल बालाजीपंताची भेटी घेऊन साहा घटका रात्रीस राव पंतप्रधानाची मुलाजमत जाली. फतेअलीखानाकडील वकील पुण्याहून दोन कोसावर राहिले. छ ५ रोजी पुण्यास येतील.

परशराम रामचंद्र मिरजवाले वानवडीनजीक मुकामात करून होते. छ मजकुरी कूच करून मौजे हडपसरानजीक जाऊन राहिले आहेंत.

छ ५ रोज गुरुवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन कवालचे गायेन यैकून स्नानसंध्या देवपूजन व भोंजन करून आराम

केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सातमजली बंगल्यावर जाऊन चवसर व गंजिफा अस्तमानपर्यंत खेळून रात्रौ संध्या व भोजन करून आराम करावयास गेले.

बालाजीपंत आवरोधामुळें आपले हवेलीतच छ मजकुरी होते. चिंतामणराव फडक्यासी अस्तमानपर्यंत खिलवत जाली.

अबदुलनबीखान व गुलामहुशनखान वकील निाा फतेअलीखान छ मजकुरी तिसरे प्रहरी पुण्यानजीक बालाजी नाईक भिडचाचे बागा-समीप आले. राव पंतप्रधानाकडील विश्वासराव चिंतामण पाग-वाले इस्तकबाल गेले. भेटी जाल्यानंतर वकील मजकुराने विश्वासराव यास च्यार पारचे वस्त्रें दिल्ही. उपरांतिक विश्वासराव चिंतामण बालाजीपंताकडे जाऊन वर्तमान सांगितलें. वकील मजकूर लक्ष्मणराव रास्ते याचे पेठत मकान नेमून दिल्हे तेथे राहिलें. त्यासमागमे दोन तीनसे गाडदी वगैरें जमीयेत आहे. राव पंतप्रधानाकरिता दोन हाथी व जेवाहिर व वस्त्रें आणली आहेत व खंडणीचे यैवजाचे बेवीस बैल होन भरून आणले आहेत.

छ ६ रोज शुक्रवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन कवालाचे गायेन यैकून स्नानसंध्यादिक करून भोजन केले. नंतर तीरंअदाजी दोन घटका करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सात मजली बंगल्यात बसून अस्तमानपर्यंत गंजिफा व शेतरंज खेळून रात्रौ संध्या व भोजन करून आरामास गेले.

बालाजीपंत छ मजकुरी आपले हवेलीतच होते. तिसरे प्रहरी दफ्तरचे कारकुनास आणऊन कांही हिशब पाहिले. नंतर बहिरोपंत मेंदले व सदासिव दिनकर निाा नारो सिवदेवासी अस्तमानपर्यंत खिलवत

(पुढील मजकूर फाटलेला आहे)

———

A. R. No. 200

१४ रमजान १२०४ हिजरी
२८ मे १७९०

श्री

विनंती विज्ञापना ऐसी जे येथील कुशल तागाइत छ १४ माहे रमजान मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ ७ माहे मजकूर रोज शनवार त्रितीये प्रहर दिवसा अखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले, ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतरी येथील वर्तमान त्रितीय प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडयात राजश्री बाबा व लक्ष्मणराव फडके व मुत्सदी वगैरे आले होते. राजश्री रघुनाथराव पटवर्धन कुरंदवाडेकर राजश्री नाना फडनवीस याचे भेटीस येऊन येक घटिका मोहीमप्रकर्णीचे बोलणे बोलोन माघारा गेले. नंतर अस्तमितपर्यंत किरकोली कामकाजे होऊन फडके व मुत्सदी वगैरे आपलाले घरास गेले. श्रीमंताची स्वारी मागील साहा घटिका दिवस राहाता रमन्यात गेली होती. तेथे घोडी फिरऊन माघारा निघाले ते साइंकाली आपल्या वाडयात आले. राजश्री हरिपंत फडके गुलटेकडीचे बागात गेले होते. तो त्रितीय प्रहरी राजश्री परसराम रामचंद्र पटवर्धन हाडपसरीहून निघोन फडके मजकूर याचे भेटीस बागात आले. उभयताचे खिलवत होत असता राजश्री आपा बलवंत भिडयाचे बागातून निघाले ते तेथेच गेले व राा बहिरो रघुनाथ मेहेदले त्या स्थली येऊन चौघाचे खिलवत च्यार घटिका रात्रपावेतो जाले. उपरांत सर्वत्राणी तेथेच फराल केले. पानदान विडे व सुगंधी साहित्य व फुलाचे हार व गजरे या प्रेा जाल्यानंतर प्रहरा रात्री मिरजकर मजकूर व आपा बलवंत तेथोन निघाले ते आपलाले डेऱ्यास गेले. व फडके व मेंहेदले अकरा घटिका रात्रीस शहरात येऊन आपलाले घरास आले. खिलवताचा भाव ध्यानास आला की मिरजकर मजकूर

मोहिमीस निघावयाकरिता श्रीमंताची आज्ञा घेऊन महूर्तेकरून डेरे दाखल जाले. त्यावर कूच करून वानोडीस येऊन राहिले असता माार-निले याचे मुदबखाचे डेऱ्यातून चोराणे भाडी वगैरे वस्तभाव नेली. तेव्हा त्या महूर्ताचे जाणे ठीक नाही. संशये प्राप्त जाला म्हणौन मदा-रुलमाहाम व फडके याचा विच्यार जाला की त्याजला माघारा याव-याचे करवावे आणि मागती श्रीमंताचे दर्शण घेऊन जावे. त्याजवरून राजश्री हरीपंततात्या रोज मजकुरी बागात जाऊन येविशीची सला करून निश्चंये ठैराविला. त्यांस उदईक मिरजकर मजकूर महूर्त ठाळा-वयाकरिता आपले हावेलीस येणार. दुसरे, पेशजी तिघेजन शोदे कोण्ही येक फिरस्ते होते. त्याणी रात्रौ कसबी लोकाचे घरास येऊन राहिले आणि दग्याचे कर्म करून तिघी कळवातनीस जिवे मारून त्याची वस्त-भाव घेऊन पळाले. हे वर्तमान कोतवालास कळल्यावर त्याची चौकसी करून शोध करताना ते सापडले. सरकारात वर्तमान सागितले आणि त्याजला कैद करून ठेविले. त्यास कितिक दिवस गुजरले तेव्हां तिघे-जना पैाा येक निराप (रा) ध दिसोन आला. त्याजला सोडोन दिल्हे आणि दोघे आंन्याई खरे असे सिद्ध जाल्यावर सरकारातून आज्ञा जाली की त्याजला हातीचे पाई बाधून शहरात फिरवावे. त्याजवरून दोघा-चोरास दो हातीचे पाई बाधोन फिरविताच बुधवार पेठेचे चावडी-जवल त्याचे प्राण गेले. श्रुत होये. छ ८ रोज रविवारी मागील सवा प्रहर दिवस राहाता मदारुलमाहाम याचे वाडचात राजश्री सदासिव दिनकर वकील येऊन त्याचे खिलवत दोन घटिका जाहाले तो राजश्री हरीपंत फडके आले. तेव्हां वकील मजकूर बरखास्त होऊन फडके व मदारुलमाहाम या उभयेताचे खिलवत होताना मेहेदले यास बोलाऊ पाठविले. त्यास तेही आल्यावर त्रिवर्ग बसोन चार घटिका इंग्रेज-प्रकर्णी मसलतीचे बोलणे होत आहे तो राजश्री परशराम रामचंद्र मिरजकर हाडपसरचे मुकामीहून सडे स्वारीनसी निघोन येक घटिका दिवस शेष राहाता गावात येऊन राजश्री नाना फडनवीस याचे वा-डचात आले. तेव्हा मदारुलमाहाम व हरीपंततात्या व मिरजकर व मेहेदले माार असे दोन घटिका रात्रपावेतो बसोन खिलवत जाले.

मागील तीन घटिका रात्रीस हस्त नक्षेत्रावर मिरजकर याणी श्रीमंताचा निरोप घेऊन स्वार होऊन जावे अैसे निश्चयात आले. त्याजवरून

२

राजश्री परसरामपंत मिरजकर याणी मदारुलमाहाम यासी बोलणे करून निरोप घेऊन निघाले ते ती घटिका रात्री आपले हावेलीस गेले. नंतर अर्ध घटिकानी फडके व मेहेंदले मदारुलमाहाम याचे येथून निघोन आपलाले घरास गेले. राजश्री गणपत आनंदराव मेहेंदले याजला दोन हजार फौज ठेवावयाविसी मदारुलमाहाम याणी सागितले आणि मिरजकराबराबर जावयाची नेमणूक केली आहे, त्याजवरून माारनिले पाचच्यारशे स्वार तूर्त ठेविले आहेत. रोज मजकुरी त्याचे महूर्त बाहेर निघावयाचे. सबब मेहेंदले मजकूर प्रहरा रात्री श्रीमंताचे वाडचात गेले होते. त्यास त्याजला वस्त्रे रुकसतीची देऊन विडे दिल्हे. माारनिले आज्ञा घेऊन निघाले ते राजश्री नानाचे वाडचात आले. दोन घटिकापर्यंत बोलणे होऊन निरोप घेतला आणि महूर्त करून आपले घरीहून स्वार जाले ते मोतीबागात जाऊन डेरे दाखल जाले. श्रुत होये. छ ९ रोज सोमवारी मागील च्यार घटिका रात्र शेष राहाता राजश्री हरीपंत फडके आपले घरीहून निघोन श्रीमंताचे वाडचात गेले. तो मागाहून येका घटिकानी राजश्री परसराम रामचंद्रही सरकारवाडचात आले. श्रीमंत गणपतीचे दिवानखान्यांत येऊन बैठक जाहली. फडके मजकूर याणी श्रीमंतास विनंती करून साद्यंत वृत पेशजी विदित केलेच आहे. त्याजवरून श्रीमंताणी मिरजकर यास रुकसतीचे समई पोशाक वगैरे दिल्हे.

१ पोशाक	१ ढाल	
१ सिरपेच	१ तरवार	
१ मोत्याची कंठी	१ नौबतीचा हाती	साहेबनौबत
३	सरकारातून दिल्ही.	
	३	

सदरहू या प्रो देऊन पानदान विडे दिल्हे. मागील दीड घटिका रात्र

शेष राहाता हास्त नक्षत्रावर मिरजकर याणी महूर्तेकरून श्रीमंताची आज्ञा घेतली आणि तैसेच निघाले ते हाडपसरास आपले लस्करात जाऊन नंतर तेथोन रोज माारी चौ कोसाचा कूच करून लोणीस मुकामास गेले. रा जगदेवराव निंबालकर अकलोद येथील याची नेमणूक मिरजकराबराबर जावयाची जाली. सबब निंबालकर मजकूर श्रीमंताचे वाड्यात येऊन आज्ञा घेतली. त्याजलाही वस्त्रे व विडे श्रीमंताणी दिल्हे. माारनिले आपले सरंजामानसी मिरजकरा बोार स्वार होऊन गेले या प्रो मिरजकर वगैरे याजला श्रीमंताणी रुकसत केले आणि प्रातःस्नान करून सूर्योदयापूर्वी येकादसी करिता निघाले ते दोन घटिका दिवस येता पर्वतीस गेले. च्यार घटिका श्रीदेवीचे पूजन जाल्यावर नंतर मडलीसही तेथेच फराल करून प्रहरा दिवसा स्वारी माघारा निघाली ते येताना बेलबागात येऊन देवदर्शण घेतले आणि सवा प्रहरा दिवसाचे संधीत आपले वाड्यात दाखल जाले. मदारुलमाहाम याचे वाड्यात च्यार सा घटिका प्रथम दिवस येता राजश्री लक्ष्मणराव रास्ते आले होते. दोन घटिका खिलवत जाले तो रा बहिरोपंत मेहेंदले तेथे आले. यावर रास्ते मजकूर माघारा निघोन आपले हवेलीस गेले. मेहेंदले मजकूर दो घटिकानी तेथून पर-भाराच इंग्रेजाकडे गेले. त्रितिये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाड्यात रा सदासिव दिनकर व मुत्छदी व मामलेदार व दरकदार आले होते. त्यास दरकदार यास बोलाहून दफ्तरचे कामकाज दोन घटिका जाले. तो मेहेंदले मजकूर आल्यावर राजश्री नाना व मेहेंदले याचे खिलवत च्यार घटिकापावेतो जाहाले. फिरंगी याची दोन पलटने आंबेगावचे बारीने पुळचाचे गणपतीवरून सावताचे वाडीपलीकडून जावयास मार्ग दिल्हा आहे. सबब तिकडूनच येतात. हे बातमीचे वर्तमान मदारुल-माहाम यासी कलल्यावर राजश्री सिद्धेश्वरराव बिनीवाले याचे कारभारियास बोलाऊन सांगितले की तुमची पागा शाहापूर बेलगावचे बारीस जाऊन तिकडौन दोन पलटने फिरगियाची येत आहेत त्याजला घेऊन येऊन तासगावचे सुमारे आणौन राजश्री परशराम रामचंद्र याज-पासी दाखल करणे अैसे सागितले. श्रुत होये. छ १० रोज मंगलवारी

तिसरे प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडयात राजश्री हरीपंत फडके व दाजीबा व बाबा फडके व बहिरो रघुनाथ वगैरे आले होते. त्यास राजश्री नाना व फडके व मेहेंदले अैसे त्रिवर्ग बसोन च्यार घटिका खिलवत जाले. नंतर मेहेंदले मजकूर रुकसत घेऊन आपले घरास गेल्यावर उभयेता दोन घटिका रात्रपावेतो बसले होते. नंतर फडके वगैरे आपलाले घरास गेले. मागील साहा घटिका दिवस राहाता श्रीमंताची स्वारी घोडी फेरावयासी रमन्यात जाऊन दोन घटिका दिवस शेष राहता आपले वाडयात आले. श्रुत होये. छ ११ रोज बुधवारी त्रितीये प्रहरी राजश्री नाना फडनवीस याचे वाडयात रा सदासिवपंत गुणे येऊन माारनिलेची रवानगी नागपुरास होत आहे तेविसीचे बोलणे

३

च्यार घटिका जाले. मेस्तर माालिट इंग्रेज याणी पेशजी श्रीमंताची मेजमानी केली होती तेव्हा हाती वगैरे नजर केले. त्यास तो हाती नापसंद जाला, सबब माघारा दिल्हा होता म्हणौन इंग्रेज याणी कनकगिरीचे राजियाचा हाती विकाऊं आला होता तोच खरेदी करून घेतला आणि श्रीमंतास द्यावयाकरिता पाठविला. रो बहिरोपंत मेहेंदले याणी येऊन मदारुलमाहाम यास वर्तमान सागितले आणि हाती आणऊन दाखविला तो पाहून नंतर श्रीमंताकडे घेऊन गेले. हाती मध्येम प्रतीचा होता. पसंद करून फीलखान्यात पाठविला. राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा साल गुदस्ता येथे आले होते ते वेलेस सेनाधुरंधरीची वस्त्रे राजश्री मनाबापू यास द्यावयाचा निश्चये जाला होता. त्यास सांप्रत राजश्री सदासिवपंत गुणे वकील येथोन नागपुरास जातात. त्याजसमागमे येक हाती व वस्त्रे वगैरे त्याजला पाठवितात म्हणौन दुसरा हाती पहावयासी आणविला होता. तोही मदारुलमाहाम याणी पाहून ठेवविला. गुणे मजकूर सत्वरच जानार. कासीराव रास्ते याचा काळ रोज मजकुरी जाला. त्याची स्त्री सती निघाली याकरिता राजश्री लक्ष्मणराव व गंगाधरराव रास्ते

याजला अवरोध पडला आहे. तो निवृंती जालियावर टिपुकडील वकीलाचा जाबसाल शुरू होईल, तोवर मंद आहे. श्रुत होये. छ १२ रोज गुरुवासरी मागील दाहा घटिका दिवस राहता राजश्री नाना फडनवीस याचे येथे दरकदार व मुत्सदी वगैरे आले होते. राजश्री सदासिव दिनकर वकील श्रीमंताकडील निाा सिंदे हे आपले गांवास दो महिन्याची आज्ञा घेऊन जाणार यास्तव माारनिले येऊन दोन घटिका खिलवत करून गेले. नंतर दरकदार दफ्तरचा हिसेब घेऊन आले व वसई संस्थान येथील राजश्री माहदाजीपंत काले कारभारी येऊन अस्तमितपावेतो कामकाज जाले. नंतर सर्वत्र आपलाले घरास गेले. राजश्री परशरामपंत मिरजकर मोरगावास छ ११ पोा मुकामास गल्याचे वर्तमान आले. श्रुत होये. छ १३ रोा शुकुरवारी प्रथम प्रहरात रााा गमाजी पाटील वकील दिाा गाइकवाड राजश्री नाना फडनवीस याचे वाड्यात येऊन दोन घटिका खिलवत जाले. नंतर माानिले आपले घरासी गेले. गाइकवाड माार याजला वकीलाणी येथील बोलण्याचा भावगर्भ येक दोण वेला लिाा असता त्याचे ध्यानास येऊन तहात गोष्ट येत नाही. याकरितां मदारुलमाहाम याणी मसलत लाबनीवर ठाकिली आहे. पाहावे निश्चंये जो ठैरल्यात येईल तो सेवेसी लेखण केले जाईल. त्रितीय प्रहरी रााा गणपतराव जिवाजी, सरसुभे संस्थान वसई प्रांत कोकण, याणी तेथून शाहागोशचे बचे पिंजऱ्यात घालोन श्रीमंतास नजर पाठविले ते प्रथम राजश्री नाना फडनवीस याचे वाड्यात आनिले होते. नंतर श्रीमंताकडे घेऊन गेले. ते अवलोकण करून सिकारखान्यात पाठविले. त्रितीय प्रहरी मदारुलमाहाम याचे येथे मुत्सदी वगैरे येऊन किरकोली कामकाजे करून अस्तमिती माघारे गेले. हिंदुस्थान प्रांतीचे वर्तमान माचडीवाल्याचे मुलकात इस्माईलबेग फौजनसी आहे. त्याजवर मथुरेहून राजश्री बापूजी होलकर व बालोजी इंगले व राणेखा वगैरे पंचवीसतीस हजार फौजेनसी गेले होते. त्यास कहीवरून याची त्याची लढाईचा प्रसंग जाला. म्हणौन तोफखान्या पौा राजश्री माहदजी सिंदे याजकडील तोफ च्यार वाटेतून जाता इस्माईलबेगाचे फौजने सदरहू तोफ च्याऱ्ही वलौन नेल्या व येकदोन हाती वगैरे नेले

अैसे वर्तमान अैकिन्यात आले आहे. जैपूर व उदेपूर व जोतपूर वगैरे फितुरात आहेत. इस्मांईलबेगचे मिलनीत मिलोन विरुद्ध लागले आहे. हे वर्तमान मथुरेस कलतांच आणखी फौजा वगैरे सरंजाम मदतेस पाठविला. कुरूक्षेत्रावर राा कासीराव होलकर वगैरे सरदार फौजनसी सिंकाचे पारपत्यास आहेत. जैपूरवाल्याचे वकील होलकराकडे येऊन खडणीचे बोलणे करितात ते सिंदे याचे चितास येत नाही. जैपूरकराचे मुलकाची खराबी करून अजमेरचा किला घ्यावा. नंतर खंडणीचा तह मुदेमाफिक जाल्यास करणे तर करावा अैसे आहे. नवाब महाबत जंगबहादुर याजकडील खरिदीस पेशजी रोशनराये म्हणौन आले होते. त्याणी पाचसे सिपाई चाकर ठेऊन तिकडे पोा हाली च्यारसे बंदुखी गारदी याच्या घेऊन पाठविल्या. श्रुत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव आज्ञापत्रे पाठऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 201

२८ रमजान १२०४ हिजरी
११ जून १७९०

श्री

विनंती विज्ञापना अैसी जे येथील कुशल तागाईत छ २८ माह रमजान मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २१ माहे मजकूर रोज शनवार दोन प्रहर दिवसा आखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले. ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान तृतीये प्रहरी राजश्री नाना फडणवीस याचे वाड्यात राजश्री हरीपंत फडके व बहिरोपंत मेहदले व मुत्सदी व दरकदार वगैरे आले होते. त्यास

महालसमंधी कामकाज च्यार घटिका जाल्यावर, मदारुलमाहाम व फडके व मेहेंदले याचे खिलवत इंग्रेजप्रकर्णी अस्तमितपावेतो जाले. याचा भाव ध्यानास आला की ममईहून फिरंगी असामी २ येथे मुबादल्यास देऊन येथील इठाव व हारण फिरंगी अैसे दोन आ (का. फा.) त्या पलटनात जानार. यास्तव त्याजला श्रीमंताचा रू (का.फा.) पाहिजे. याअर्थी उदईक फिरंगी मजकूर आज्ञा घ्यावयासी येऊन नंतर मंगलवारी स्वार होऊन जानार येविशीचा निश्चये ठैरला. उपरांत साइंकाली फडके व मेहेंदले वगैरे आपलाले घरास गेले. राा माहदजी पाा वारीकर येथे आले होते. त्यास ठोके याजकडील कामाकाजाचा बदोबस्त जाला. सरंजामी माहाल प्रोा डांगरी वगैरे प्रांत खांदेश येथील मामलत पाटील मजकुराकडे करार होऊन दोन गाव प्रोा मजकूरपैकी मीरखा ठोके याचे स्त्रीस सरकारांतून जागीर जातीचे खर्चास देविले. साहेबखा ठोके येथेच राहिले आणि पाटील मजकूर आज्ञा घेऊन आपले गावास गेले. राजश्री सदासिव दिनकरही स्वार होऊन उभयेता बराबरच गेले. श्रुत होये. छ २२ रोज रविवारी मागील सवा प्रहर दिवस राहाता राजश्री हरीपंततात्या व मेहेंदले मदारुलमाहाम याचे वाड्यात आले. यावर दो घटिकानी मेस्तर मालिट इंग्रेज राजश्री नाना फडनवीस याचे वाड्यात आले. तेव्हा इंग्रेज मजकूर यासी वरचेवर बोलणे होऊन मदारुलमाहाम याणी त्या फिरंगियास वस्त्रे दिल्ही. याउपर श्रीमंताची रुकसत घ्यावयाची सबब मदारुलमाहाम व फडके व मेहेंदले अैसे सरकारवाड्यात गेले. मागाहून इंग्रेजही तेथेच गेले. गणपतीचे दिवानखान्यांत बैटक जाली होती. श्रीमंत त्या स्थली आले. दरबार जाला. रुकसतीची वस्त्रे फिरंगी इठाव मजकूर यास दिल्ही व सिरपेच १ व साडेतीन वस्त्रे अैसी दिल्हयांवर पानदान विडे रुकसतचे घेऊन मागील च्यार घटिका दिवस राहाता इंग्रेज मजकूर आपले स्थलास गेले. नंतर श्रीमंत उठौन आर्शेमाहालात गेले. आणि मदारुलमाहाम व फडके व मेहेंदले त्याच दिवाणखान्यात बसोन अस्तमितपावेतो खिलवत इंग्रेजप्रकर्णीच जाले. रो

खंडेराव बलाल आंबडापूरकर पेशजी येथे आले होते. कारण की माारनिलेस सरकारातून पालखी वगैरेचा सरंजाम दिल्हा आहे. यैसियासी माारनिलेचा वृध्धापकाल जाला. यापुढे येथे यावयाचा भरवसा नाही. यास्तव चिरंजीव समागमे आणिला आहे. त्याचे नावे सरंजाम करून सनदपत्र करावे म्हणौन मदारुलमाहाम यास विनंती केली. च्यार सा महिणे आर्जव करून राहिले होते, त्यास श्रीमंत कृ(का. फा.) केली ते जात-जाबता तूर्त त्याचे पुत्राचे नावे जाला. पुढे बादबरसात त्याणी येऊन कागदपत्राचा गुंता उरकावा अैसे ठैरून माारनिले व त्याचे पुत्र या उभयेतास वस्त्रे जाली. गावास जाण्याकरिता श्रीमंताणी आज्ञा जाली याप्रो जाल्यावर मदारुलमाहाम आदिकरून तेथोन निघाले ते आपलाले घरास गेले. राजश्री नाना बेलबागात जाऊन साइंकाली आपले वाडयात आले. श्रुत होये. छ २३ रोज सोमवारी राजश्री नाना फडनवीस याचे तीर्थरूपाचे श्राध जाले म्हणौन त्रितीय प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडयात मुत्सदी वगैरे मंडली कोण्ही बहुतसे आले नाहीत. मागील दोन घटिका दिवस शेष राहाता राजश्री बाबा फडके व मेहेंदले मजकूर या दोघोस बोला-ऊन दोन घटिका बोलणे जाले. नंतर ते आपलाले घरास गेले. मागील साहा घटिका दिवस राहाता श्रीमंताची स्वारी रमन्यात गेली होती. च्यार घटिका तेथे घोड़ी फिरऊन माघारा निघाले ते आस्तमिती आपले वाडयात येऊन दाखल जाले. रोज मजकुरी राजश्री लक्ष्मणराव रास्तें त्रितीये प्रहरी राजश्री हरीपंत फडके याचे येथे येऊन आस्तमीतपर्यंत उभयेताचे बोलणे जाले. टिंपूकडील वकील येथे आले आहेत, त्याची भेटी जाहाली पाहिजे येविशींचे बोलणे होऊन

२

उदईक मुलाजमत व्हावी अैसा निश्चये ठैरल्यात आला, श्रुत होये. छ २४ रोज मंगलवारी येकादसीस प्राथःकालीच श्रीमंत पर्वतीस गेले होते. देवदर्शण पूज्या इत्यादिक सहा घटिकापर्यंत

जाल्यावर फराल तेथेच करून प्रहरा दिवसा माघारा निघाले, येताना बेलबागात येऊन श्रीविष्णुंमूर्तीचे दर्शण घेतले आणि तैसेच निघोन सवा प्रहरा दिवसा आपले वाडचात आले. राजश्री नाना फडनवीसही प्रति येकादशी प्रो बेलबागात जाऊन ११ घटिका दिवस येता आपले घरास आले. टिपूकडील गुलामहूसेन व अबदुलनबी वकील रोजमाारी श्रीमंताचे भेटीस येण्हार म्हणौन मदारुलमाहाम याणी राजश्री नारोपंत चेक्रदेव बक्षी याजला बोलाऊन तमाम सरदार मानकरी व सरंजामी व पागे वगैरें यांस सागून, सरकारवाडचात अडचा प्रहरा दिवसा यावयाविशी सागितले व सरकारवाडचात हाजारा कारंज्याकडील दिवाणखान्यात बैठक करावी व गारदी व स्वार वगैरे बदोबस्त करण्याविसीं रो राघोपंत गोडबोले व दिनकरपंत भडभडे यास ताकीद (का. फा.) दीड प्रहर दिवस राहाता राजश्री हरिपंत फडके मदारुलमाहाम याचे वाडचात आले. रास्ते याजकडील रा बालाजीपंत व नरसिंगराव वकील पुढे येऊन राजश्री नाना फडनवीस यांस विनंती केली. त्याजवरून मागील दाहा घटिका दिवस राहता मदारुलमाहाम व फडके श्रीमंताचे वाडचात आले, ते आर्शेमाहालात बसोन दोन घटिका माली मुलकी कामकाजे जाली. वकील माार रास्ते याचे पेठेतून निघोन इकडे यावयाचे बातमीचे समजलियावरी मदारुलमाहाम व फडके याणी दरबार बरखास्त करून तेथोन उठौन हाजाऱ्याचे हौजाकडे गेले. पेशजी ताकीद केल्या प्रौ तमाम सरदार व पागे व मानकरी से दोनसे येऊन हाजर जालेच होते. तेथे राजश्री नाना व हरीपंततात्या गेले. यावरी श्रीमंत त्या स्थली आले. राजश्री लक्ष्मणराव व गंगाधरराव रास्ते टिपूचे वकीलास घेऊन मागील साहा घटिका दिवस राहाता सरकारवाडचात दिली दरवांज्याने येऊन दिवानखान्यात आले. वकील माार याणी हातीचे छचावे नग २ दोन आणिले होते ते श्रीमंतास नजर केले. कारचोबी बादली पोशाक येणे प्रो तौ चीरा १ जामेवार थान २ पटका १ किनखाब थान १ येकूण पाच सनगें होती, ते खोनात घालोन नजर

केली. पानदान विडे व खुशबोई सरंजाम वकील मजकुरास दिल्हयावर माारनिले रुकसत घेऊन माघारा आपले स्थलास गेले. राजश्री विठलराव परशराम पटवर्धन, राजश्री परसरामपंत मिरजकर याचे मधील पुत्र, येथे राहिले होते ते सांप्रत्य मिरजेस जातात याकरिता श्रीमंताचे निरोपास आले होते. त्याजला पैठणी लाल रंगाचे सेला व पागोटे व पानदान विडे देऊन मार्गस्त केले. याउपरांत श्रीमंत तेथोन उठौन आर्शेमाहालात आले. मदारुलमाहाम व फडके याणी इमारतीचे कारखाण्याचे काम पाहून तैसेच तेही आर्षेमाहलात आले. मुत्सदी वगैरे सर्वत्रास बरखास्त करून श्रीमंत व राजश्री नाना व हरीपंत फडके अैसे त्रिवर्ग बसोन खिलवत च्यार घटिका जाले. नंतर मागील दोन घटिका दिवस शेष राहाता मदारुल-महाम तेथोन निघोन आपले वाडचात येऊन नित्य कृत्याचे औषध घेऊन तैसेच निघाले, ते बंगल्याचे बागात गेले. साइंकालचे संध्यावंदन तेथेच करून दोन घटिका रात्र होता माघारा आपले घरास आले. रोज माारी मागील च्यार घटिका रात्र राहाता इठाव फिरंगी स्वार होऊन गेला. समागमे गार (का.फा.) येत पाचपंणास गेले. माारनिले दोही पलटणात जावयाकरिता येथून गेला. राजश्री आपा बलवंत भिडचाचे बागाजवल राहिले होते. त्यास त्याणी रोज माारी तेथून तळ ढालून दो बानाचे आंतरे करून गारपीराजवल किराड नवे तळे बाधीत आहे तेथे येऊन उतरले. श्रुत होये. छ २५ रोज बुधवारी मागील सात घटिका दिवस राहाता श्रीमंत आपले वाडचातून निघोन रा बालाजी नाईक भिडे याचे बागात राजश्री आमरसिंग जाधव येऊन राहिलें आहेत त्याचे भेटीस गेले. कारण कीं जाधव मजकूर श्रीकासीयात्रेस गेले होते ते यात्रा करून आले आणि मानकरी सरकारचे, सातारियाचे राज्याचे आप्तवर्गात निकट, त्याचे येथे जावयाचा सांप्रदाये या-करिता स्वारी तेथे गेली. समागमे राजश्री नाना फडनवीस व हरीपंत फडके आदिकरून सरदार व पागे वगैरे गेले होते. तेथे गेल्यावर जाधवराव माार याणी आपले डेऱ्याबाहेर इस्तकबाल

पुढे येऊन श्रीमंतास भेटले अणि डेऱ्यात घेऊन गेले. नंतर मदारुलमाहाम व फडके व पागे सरदार मानकरी याच्या भेटी जाल्या. दोन घटिका बैठक होऊन यात्रेचे वगैरे वर्तमान भाषनात आले. या उपरांत माारनिले

३

याणी वस्त्रे द्यावयासी आणिली. पोशाक व सेले पागोटी बितौा.

१ श्रीमंतास पोशाक बऱ्हानंपुरी उंतम प्रतीचा.

१ मदारुलमाहाम यास कंदीपो शाक.

१ हरीपंत फडके यासही कंदी पोशाक.

२ मऱ्हाटे सरदार आाा २.

१ दारकोजी निंबालकर सेला पागोटे.

१ सटवाजी गावडे सेंला व पागोटे.

२

१ बालाजीपंत होसर सेला पागोटे

१ राघोपंत गोडबोले सेला पागोटे.

१ दिनकरपंत भडभडे यासी सेला व पागोटे.

१ बालाजीपंत केलकर सेला पागोटे.

४

५ ९

सदरहू येणे प्रौा नव पोशाक व सेले पागोटी दिल्ही. आतर पानदान जाल्यावर श्रीमंताची स्वारी तेथोन माघारा निघाली ते मागील दोन घटिका दिवस राहाता आपले वाडचात आले. मदारुल-माहाम येताना बेलबागात येऊन देवदर्शण घेऊन नंतर आपले घरास आले. श्रुत होये. छ २६ रोज गुरुवारी त्रितीये प्रहरी मदारुल-माहाम याचे वाडचात मुत्सदी व दरकदार व मामलेदार आले होते. राजश्री दाजीबा फडके व लक्ष्मणराव फडके व सकारामपंत पानसे आले होते. ज्येष्ट वाा ७ रोज शुाावारी छ २० माहे मजकूर आरंबी सन तिसैनचे आखर साल होऊन छ २१ रोज शनवारीपासून मृगनक्षत्रापासून पुढे नवे साल, सन इहिदे तिसैनचे अवल साल शुरू जाले. यैसियासी आरब वगैरे गारदी सरकारात चाकर आहेत त्याची हाजरी आखर साली मदारुलमाहाम आपण आपले समक्ष घेत अस-तात. सबब रोज माारी हाजरी घ्यावयाची शुरुवात केली. रौा राघोपंत

गोडबोले यासी बोलाऊन सैद अहमद जागीदार अर्बाचा याचे बिरादरी पैा थोडीबहुत हाजरी आस्तमितपर्यंत घेतली. नंतर बेलबागात जाऊन आले. श्रीमंत मागील साहा घटिका दिवस राहता रमण्यात गेले होते. तेथून माघारा आस्तमिती येऊन आपले वाडचात दाखल जाले. पाच घटिका रात्रीस मदारुलमाहाम याणी राजश्री सदासिवपंत गुणे वकील यास जैनाबादी सेला पागोटे देऊन नागपुरास जावयासी निरोप दिल्हा. माारनिले आमावाश्या जालियावर सत्वरच स्वार होऊन जाणार. श्रुत होये. छ २७ रोज शुकुरवारी त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याणी सैद आहामद आरबाचे जागीदार याचे बिरादरीची हाजरी घेतली. नंतर मागील तीन घटिका दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस आपले वाडचातून निघोन मोरोपंत ढमढेरे दरकदार दफ्तरचे याचा मृत्य जाला म्हणौन माारनिलेचे घरी जाऊन त्याचे बंधूस सेला पाघरविला आणि तेथून निघाले ते बेलबागात गेले. देवदर्श करून तैसेच परभारा बंगल्याचे बागात जाऊन संध्यावंदन तेथेच केले. आणि दोन घटिका रात्र होता माघारा येऊन आपले वाडचात आले. टिपूकडील वकील यास पाचाश्या मानसाचे बेगमीचा सिदा श्रीमंताचे सरकारचा मदारुलमाहाम याणी यादी ठैराऊन दिल्हीं, त्या प्रोा पाटविला. राजश्री परशराम रघुनाथ तासगावीहून पुढे मिरजेचे नजीक कृष्णांतीरास जाऊन मुकाम केला आहे. येथून तोफखाना व फौजा वगैरे सरंजाम त्याजकडे जावयाचा, त्याची मार्गप्रतीक्ष्या करितात. साहा तोफा येथून गेल्या. च्यार आणिक जाणार आहेत. पागे व सरदार व गारद वगैरे नेमणुकी प्रोा रवाना होत आहे. इंग्रेज याजकडील पलटने २ दोन ममईहून आंबेगांवचे बारीने येऊन मिरजकराचे फौजेत मिळनार. पलटणे घाठाजवल आली आहेत. श्रुत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव कृपा करून आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 202 १२ शवाल १२०४ हिजरी

२५ जून १७९०

विनंती विज्ञापना ऐसी ज येथील कुशल तागाइत छ १२ माहे शवाल मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत असले पाहिजे विशेष येथील वर्तमान छ ५ माहे मजकूर रोज शनवारी त्रितीये प्रहर दिवसा अखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान राजश्री नाना फडणवीस याचे वाड्यात मागील प्रहर दिवस राहाता मुत्सदी व दरकदार आदि-करून सर्वत्र आले होते. त्यास काही जरूरियात कामकाजे दोन घटिका जाहाली. यानंतर दिली शहर येथील आखबार आली होती. ते पत्रे व आणखी संस्थान वगैरे जागाची पत्रे आली ते मदारुलमाहाम याणी येकीकडे बसोन अस्तमीतपर्यंत वाचून पाहिली. उपरांत सर्वत्र आपलाले घरास गेले रोज मजकूर

(ओळ फाटली)

डी फेरावयासी गेले होते. ते (का. फा.) स्वारी माघारा येऊन आपले वाड्यात दाखल जाले. श्रुत होये. छ ६ रोज रविवारी मदारुलमाहाम मागील सवा प्रहर दिवस राहाता निद्रा करून उठिल्यावर आलीमर्दाखा जमादार याचे बिरादरीची हाजरी पाच घटिकापर्यंत बसोन घेतली. नंतर राजश्री त्रिंबकराव सबनीस याणी आपले राहावयाची हावेली नवी बाधिली आहे. माडी वगैरे जागा तरतूतीची केली म्हणौन माारनि-लेनी राजश्री नाना फडनवीस यासी विनंती करून जागा पाहावयासी मेजमानीचे निमित्य न्यावे ऐसा संकेत जाहाला होता. त्याजवरून मागील च्यार घटिका दिवस राहता मदारुलमाहाम सबनीस मजकूर याचे घरास गेले. तो तिकडून परभारा राजश्री हरिपंत फडकेही तेथेच आले. यावर दोन घटिका नाच जाला. आतर पानदान होऊन नंतर माारनिले याणी वस्त्रे येणे प्रो

१ मदारुलमाहाम यासी केशरी पागोटे व दुपठा.
१ बाबूराव केशव सेला व पागोटे चदेरीचे सुफेद.
१ हरिपंत फडके यासी (सेला) व पागोटे चदेरीचे सफेद.
१ राघोपंत गोडबोले सेला व पागोटे पैठणी कुसंबी.

सदरहू दिल्हयावर मदारुलमाहाम मागील दोन घटिका दिवस राहाता आपले घरास आले व फडके वगैरे आपलाले घरास गेले. यावर रो गोपाळजी गुंड मदारुलमाहाम याजकडील यास सबनीस याणी बोलाऊन सेला पागोटे दिल्हे. वसई किला प्रांत कोकण येथील (का.फा.) साळवे हावलदार संस्थान मजकूरचे येथे आले आहेत. सबब माार-निलेस राजश्री माहादाजीपंत काले कारभारी दिा सरसुभा याणी मदारुलमाहाम यास भेटविले. त्याणी सेला व पागोटे देऊन भेट घेतली. राजश्री बलवंतराव कासी पेशजी भिलाचे पारपत्याकरिता खांदेश प्रांती पाठविले होते. त्यास भिलाचा बदोबस्त येथे समक्ष होऊन कन्हेरगड किला राजश्री मालोजी जाधवराव वाघोलीकर याजकडेस सागितला आणि माारनिलेस बोलाविले होते. त्याजवरून त्याणी सरकार आज्ञे प्रो किला जाधवराव मजकूर याचे जिमेस करून आपण गारद वगैरे सरंजामसुधा माघारा येथे आले. सबब माारनिले याणी श्रीमंताचे दर्शण घेऊन नंतर मदारुलमाहाम याची भेटी घेऊन आपले घरास गेले. श्रुत होये. छ ७ रोज सोमवारी पहिले दीढा प्रहरा दिवसा राजश्री नाना फडनवीस याचे वाडयात रा

(ओळ फाटली)

यासी दोन घटिका खिलवत आपले येथे घरकृत्य कलहे लागला आहे ते (का.फा.) चे करून माघारा गेले. नंतर त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम (का.फा.) साहा घटिकापावेतो शामीरखा जादार याचे बिरादरीचे आरब व गारद आहेत त्याची हाजरी घेतली. नंतर राजश्री हरिपंत फडके व रामजी पाटील वकील निा सिंदे अैसे आले. यैसियासी सुरत शहर, प्रांत गुजराथ, येथे कोण्ही गुजराथी वगैरे याचे गुरू राहातात

ते प्रतिवर्षी श्रीमंत व रौा नाना फडनवीस व हरिपंत फडके याजला वस्त्रे पाठवीत असतात. त्या प्रौा सांप्रत्यही त्रिवर्गास वस्त्रे आली आहेत. ते रामजी पाा घेऊन आले होते. त्यास मदारुलमाहम याची वस्त्रे देऊन श्रीमंताची वस्त्रे राजश्री नानास दाखविलीं. याउपरी श्रीमंताचे सेवेसी प्रविष्ट करतील. फडके याची वस्त्रे होती ते त्यास दिल्ही. राजे बहादर राजश्री रघुपतराव नारायेण व रंगराव त्रिंबक या उभयेतामधे कटाक्ष आज सात वर्षे लागला आहे. यैसियासी त्याचा कजिया विल्हे लाऊन बदोबस्त करून घ्यावा म्हणौन (का.फा.) माहादजी सिंदे याची पत्रे मदारुलमाहाम व फडके यास येतात. हाली दोघाची वाटणी व्हावीसे ठैरले आहे. दोन हिसे रंगराव त्रिंबक

२

याचे आणि रघुपतराव दतपुत्र म्हणौन त्याचा येक हिसा या प्रोा बोलण्यात येऊन यादी जाहल्या आहेत. मालेगाव प्रोा निंबाईत प्रांत खांदेश येथे कैलासवासी नारो शकर याणी किंला मातबर बाधिला आहे. त्यास तेविंसी उभयेताचा लढा पडला आहे म्हणौन फडके मजकूर व रामजी पाटील मदारुलमाहम यासी बोलावयासी आले होते. आद्यापि निश्चंये ठैरला नाही, पाहावे. दोन घटिका बलोण फडके व वकील माार माघारा आपलाले घरास गेले आणि आस्तमिती राजश्री नाना बेलबागात जाऊन आले. श्रुत होये. छ ८ रोज मंगळवारी येकादसी म्हणौन प्राथःकालीच श्रीमंताची स्वारी पर्वतीस गेली होती. त्यास प्रहरा दिवसा तेथोन माघारा निघोन येताना बेलबागात आले. तेथे श्री विष्णुंमूर्तीचे दर्शण घेतले आणि दाहा घटिका दिवस येता आपले वाड्यात आले. त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याणी च्यार घटिका गारद्याची हाजरी घेऊन नंतर दफ्तरचे कारकून बोलाऊन दोन घटिका हिसेबाचे कामकाज जाहले. यावर राजश्री नाना मागील दोन घटिका शेष दिवस राहाता आपले वाड्यातून निघाले ते वोा राजश्री गोविंद-भट निरचेऊर याचे जेष्ट बंधु मृत्य पावले निमित्य त्याचे घरास सेला पाघरवावयाकरिता जाऊन तेथोन बेलबागात गेले. देवदर्शण करून सांइकाली मागती आपले वाड्यात आले. हिंदुस्थान प्रांतीचे वर्तमान जैपूर व जोतपूर वगैरे येथील राजेरजवाडे यासी व इस्माईल-

बेग यासी अैक्येता होऊन आलीबाहादर व सिंदे व होलकर या त्रिवर्गासी व त्यासी वैमनस्व लागले आहे म्हणौन मथुरेहून राजश्री बापूजी होलकर व आंबोजी इंगले व आबा चिटणीस वगैरे फौजा त्याचे पारपत्यास गेल्या असता सांप्रत त्याची व याची लढाई जाली. इस्माईलबेग याजपासी दोनच्यार हाजार गारद वगैरे होती. त्यात होलकर व इंगले याणी फितूर करून त्याजला दोन लक्ष रुपये देऊ केले आणि करार ठैराविला की समयास तुम्हीं कामकाज करू नये, अैसे जाले होते. तेव्हा लढाईचा प्रसंग छ ८ रमजानीस येऊन प्राप्त जाला ते समई त्याणी संकेता प्रौा कमती केली. तेणेकरून इस्माईलबेग याचे फौजेची सिकास्त जाली. पाचच्यार कोस हाटून मागे पलाले तेव्हा त्याचे तळावर होलकर व इंगले याणी जाऊन मुकाम केला. च्यारपाचसे माणूस लढाईत कामास आले. या प्रो जाल्यामुळे तूर्त त्याचा मोड होऊन कमजोर जाले. गारद वगैरे याणी फितूर करून फोडली होती. ते याजपासी (का.फा.) मिलाले. पैक्याचा करार त्यासी केला होता. त्यास येक लक्ष रूपये त्याजला दिल्हे आणि आपल्याजवलच ठेऊन घेतले आहे. राजश्री कासीराव होलकर वगैरे फौज गुलाम कादर याचे भावावर वसिकावर गेले होते. त्यास त्याचीही लढाई पूर्वी येकदोन जाली. तेणेकरून सिक भागीर्थीपार माघारा टळून गेले. इकडे लढाईचा प्रसंग पडल्यामुळे रो बापूजी होंलकर याणी रा कासीराव होलकर याजला फौजेसुधा आपले मदतेस बोलाऊन घेतले व मथुरेहूनही पत्रे त्यास या प्रोाच गेली. त्याजवरून कासीराव होलकर ते संध्धान सोडून याजकडे यावयासी माधारा निघाले. येक कंपू फिरंगी बापू होलकर वगैरे याजपासी मथुरेहून मदत गेले. जमीयेत पोख्त जाली. हे इस्माईलबेग व जैपूरवाले यासी समजले. त्याजवरून सख्यत्वाचा पैगाम वकील मथुरेस आहेत ते आलीबहादर याचे विद्यमाने बोलणार. आजमेरचा किला माघारा द्यावा हे सिंदे याचे बोलणे. त्यास बहुतेक किंलाही माघारा देऊन खंडणीचा तह करतील यैसे वर्तमान डाकेवरून आले आहे. पाहावे काये ठरते ते न कले. श्रुत होये. छ ९ रोज बुधवारी दुसरी येकादसी राजश्री नाना फडनवीस याची

याआर्थी प्रातःकालीच बेलबागात जाऊन स्नानसंध्या व देवाचे पूजन येका प्रहरात करून नंतर माघारा आपले घरास आले. त्रितीये प्रहरी च्यार घटिका गारद्याची हाजरी जाली. या उपरी रास्ते याजकडील वकील टिपूकडील जाबसाल बोलावयासी आले होते. राजश्री तात्या जोसी या बोलण्यात आहेत. तेही आले होते. दोन घटिका खिलवत करून गेले. नंतर वो। राजश्री गोविंदभट निरचेऊर येऊन राजे बाहादर याजकडील बोलणे अस्तमीतपावेतो बोलोन गेले. (का. फा.) दाजीबा फडके व सखारामपंत पानसे व बाबुराव केशव वगैरे आले होते. काही कामकाजही जाले. श्रीमंताची स्वारी रमन्यात गेली होती तेव्हा पाच घटिका दिवस होता. त्यास च्यार घटिका तेथे घोडी फिरवून साइंकाली माघारा आले. स्वारीसमागमे राजश्री माधवराव रामचंद्र व लक्ष्मणराव व माधोराव फडके व माहादाजी-पंत बेहरे व बिनीवाले व पेटे व पागे व सरदार या प्रो। गेले होते. दाहा तोफा पौा च्यार तोफा जाणे राहिल्या होत्या. त्याही येथून रवाना होऊन राजश्री परसराम रामचंद्र मिरजकर याचे लस्करात गेल्या. श्रुत होये.

A. R. No. 203 १९ शव्वाल १२०४ हिजरी
२ जुलै १७९०

श्री

विनंती विज्ञापना ऐसी जे येथील कुशल तागाईत छ १९ माहे शवाल मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणोन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ १२ माहे मजकूर रोज शनवारीं मागील प्रहर दिवस राहाता आखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले, ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान मागील सवा प्रहर दिवसा मदारुल-माहाम याचे वाडयात मुत्सदी व दरकदार व मामलेदार वगैरे सर्वत्र आले होते. राजश्री बहिरो रघुनाथ मेहेंदले आपले कुलदेवीचे दर्शणास गेले होते. ते काल माघारे आले. सबब माारनिले राजश्री

नाना फडनवीस याचे भेटीस येऊन वरचेवर तैसेच आपले घरास गेले. यावर राजश्री हरीपंत फडके तेथे आले. तेव्हां काहीयेक कामाकाजा (का.फा.) मामलेदार याचे दोन घटिका जाले. नंतर मदारुलमाहाम (का. फा.) खिलवत सहा घटिकापावेतो जाले. त्याचा भावगर्भ ध्यानास आला की टिपू याणी वकीलाबराबर येक साला अैवज पाठविला आहे. रास्ते मध्येस्ततेविसीं बोलणे करितांत की त्याणी जो अैवज पाठविला आहे तो घ्यावा माघारा फिरऊ नये. यैसियांस राजश्री परशराम रामचंद्र याचीही पत्र आली की च्यार साला खंडणीचे करारा प्रो पैका यावयाचा. त्यात येक साला बारा लक्ष रुपये आले आहेत ते तूर्त घ्यावे. त्याजवरून उभयेताचा विच्यार होऊन अैवज दाखल करावयाविसी रास्ते यास सांगितले. मोहोरा व पुतळ्या व होण या प्रो भरती आहे. त्यास रोज माारी पाचा लक्ष्या रुप्यांचा भरणा सरकारचे जामदारखान्यात केला. आस्तमीतपर्यंत मसलतप्रकरणीं उभयेताचे बोलणे होऊन फडके आदिकरून आपलाले घरास गेले आणि राजश्री नाना बेलबागात जाऊन आले. मागील साहा घटिका दिवस शेष राहता श्रीमंत रमन्यात गेले होते. तेथे गेल्यावर च्यार घटिका घोडी फिरविलीं. या उपरांत श्रीमंत तळ्यावर जाऊन रमन्यातील हारणे कालवीट वगैरे आणविलीं. त्याची परस्परे लढाई लावविली होती. ते आवलोकण करून त्यास दाणा भक्ष्यावयासी देवविला आणि आस्तमिती स्वारी तेथोन माघारा निघोन दो घटिका रात्रीस आपले वाड्यात दाखल जाले. श्रुत होये. छ १३ रोज रविवारी मागील दीड प्रहर दिवस राहता राजश्री नाना फडनवीस निद्रा करून उठिल्यावर राजश्री हरिपंततात्या याजला बोलाऊ पाठविले. दरकदार दफ्तरचे व मामलेदार वगैरे हाजर जाले होते. त्यासी मामलतीचे बोलणे दोन घटिका जाले. तो फडके मजकूर तेथे आले. रास्ते याचे यावयाचा संकेत जाला होता. यास्तव याजकडील रो बालाजीपंत ढेकने वगैरे पुढे येऊन मदारुलमाहाम व फडके यासी विचारिले. त्याजवरून मागील साहा घटिका दिवस राहाता राजश्री लक्षमणराव व गंगाधरराव रास्ते राजश्री नानाचे वाड्यात आले. तेव्हां मदारुलमाहाम व फडकेव रास्ते याचे

खिलवत च्यार घटिकापर्यंत जाले. यावर मागील दोन घटिका दिवस राहता रास्ते मो॥ माघारा निघोन परभारा राजश्री हरिपंततात्याचे वाडचात गेले. आस्तमिती फडके मजकूरही आपले घरास आल्यावर दाहा घटिका रात्रपावेतो रास्ते तेथे राहून बोलणे बहुतच जाले. नंतर रास्ते मजकूर (का.फा.) गेले. खिलवताचा भाव ध्यानास आला की (का. फा.) परशराम रामचंद्र तासगावा (का. फा.) दो को- (सावर) कौठे म्हणौन गाव कृष्णेच्या उतर तीरास आहे तेथे उतरले आहेत. परंतु तेथून टिपूचे सरहादेचे गाव आहेत. त्यास उपद्रव करावा या उद्योगात आहेत. विरुध्याचा प्रकार जाणौन कलहे निर्मान करावा या आर्थी हा विच्यार यौजून उपद्रवास कारण करनार. इंग्रेज याज- कडील दोन पलटने व तोफा व चालीस गा (?) पंनास गोरा मिरजकरा- जवल येऊन मुकाम केला. येथून नेमनुकी प्रो॥ सरदार फौजासुधा तेथे जाऊन पोहोचावे हे मार्गप्रतीक्ष्या करितात आणि येविसी त्याची पत्रे दर- रोज येत आहेत. यैसियासी हे सविस्तर वर्तमान टिपूस कळल्यावरून त्याणे रास्ते यास व आपले वकीलास पत्रे पाठविली. ते काल दीढा प्रहरा रात्रीस येथे पावली. तेविसीचे बोलणे रास्ते बोलावयासी आले होते की वकील मा॥ बारा लक्ष रुप्यांचा भरणा करून देतात. पुढे जाबसाल लागलाच आहे, या आर्थी तूर्त उतावली मिरजकर याणी करू नये, यैसी रदबदलीचा जाबसाल लागला आहे. पाहावे काये निश्चये होतो. रा॥ परशरामपंत याचे पुत्र रा॥ हरराव याजला बहुत समाधान न होते सांप्रत काहीयेक

२

आराम आहे. श्रुत होये. छ १४ रोज सोमवारी राजश्री नाना फडनवीस याणी धोडवन केले. शंभरदीडशे ब्रांम्हण दीढा प्रहरा दिवसा भोजनास आपले वाडचात घेउन आधेली दक्षणा या प्रो॥ सर्वास दिल्हे. त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडचात राजश्री हरिपंत फडके आले. राजश्री लक्षमणपंत कोपरकर याजकडे हुजरात पागेचे हिसेबाचे दफ्तरे आहेत, यास्तव कोपरकर मजकूर यास बोलाऊन च्यार घटिकापावेतो पागा याचे हिसेब ध्यानास आणिले. नंतर मदारुलमा-

हाम व फडके याचे भाषण दोन घटिका जाले. रो। गणपतराव जिवाजी सरसुभे प्रांत कोकण यासी बोलाऊन आस्तमितपर्यंत त्याजकडील बोलणे प्रांत मजकूर वसई किला येथील संस्थानचे जाले. या उपरांत फडके वगैरे सांइकाली आपलाले घरास गेले आणि राजश्री नाना फडनवीस बेलबागात जाऊन घटिका रात्रीस आपले घरास आले. रा। गणपत आनंदराव मेहेदले घासीराम कोतवाल याचे तल्यावरून कूच करून गेले. ते हाडपसर व वानोडी दोहीचे दरमियान जाऊन मुकाम केला. टिपूकडील येक साला खंडणीचा अैवज बारा लक्ष रुपये याचा भरणा होण व पुतल्या व मोहोरा या प्रो। सरकारात दाखल जाले. श्रुत होये. छ १५ रोज मंगळवारी राजश्री नाना फडनवीस याचे येथे त्रितीये प्रहरी राजश्री रंगराव त्रिंबक राजे बहादर येऊन दोन घटिका खिलवत करून गेले. नंतर मुत्छदी व दफ्तरचे कारकून वगैरे याच्या कामाकाजाची बोलणी जाली. तो राजश्री हरिपंत फडके तेथे आले. यावर कोकणप्रकर्ण वसईकर सरसुभे याणी दोन घटिका बोलणे केले. या उपरांत मदारुलमाहाम व फडके याचे खिलवत होऊन मागील दोन घटिका दिवस शेष राहाता फडके आदिकरून आपलाले घरास गेले आणि राजश्री नाना फडनवीस बंगल्याचे बागात जाऊन आस्तमिति बेलबागात आले. तेथेच संध्यावंदन करून देवदर्शण घेतले. यावर माघारा निघोन दो घटिका रात्री आपले घरास आले. श्रीमंताची स्वारी मागील साहा घटिका दिवस राहाता निघाली ते रोज मजकुरी आंगारिका चेतोर्थी म्हणौन श्रीगणपतीचे दर्शणास कसब्यात गेले होते. नंतर तेथोन माघारा निघोन तैसेच परभारा स्वारी रमन्यात गेली. ते घटिका रात्र होता माघारा येऊन आपले वाड्यात दाखल, जाले. रो। दादा गजरे, किले रायेगड येथील सरसुभे, याणी मदारुलमाहाम याची मेजमानी केली. सबब पाचा घटिका रात्रीस राजश्री नाना फडनवीस गजरे मजकूर याचे घरास गेले. रात्रीचे भोजन तेथेच केले. नंतर आतर पानदान जाल्यावर च्यार घटिका नाच जाला. गजरे मजकूर याणी मदारुलमाहाम यास केशरी पागोटे व दुपठा दिल्हा. या उपरांत आकरा घटिका रात्रीस तेथोन माघारा निघाले ते आपले हावेलीस आले. श्रुत होये. छ १६ रोज बुधवारी

डॉ. ब. ब. द. वा. पोतदार,

श्रीमंत सौवती मातुश्री रमाबाईसाहेब आपले माहेरास बुधवार पेठेत राजश्री बालाजी केशव थते याचे येथे गेली होतीत. त्यास तेथोन आडचा प्रहरा दिवसा माघारा निघोन स्वारी आपले वाड्यात येत आसता राजश्री माहालिंगराव घोरपडे त्याच रस्त्या जात होते. तो बाजारचा रस्ता स्वारीचे जिलेबीचे लोक खासबरदार व खिागार वगैरे यासी व घोरपडे याचे लोकासी परस्परे दाटी जाल्यामुळे उपाध जाली. श्रीमंत बाईसाहेब याची स्वारी पालखीत होती. त्यास पालखी तो वाड्यात दाखल जाली. मागे लोकासी कटकट वाहडली. हे घोरपडे मजकूर याणी पाहून समजूत करावी आणि कटकटीचे निवारण करावे अैसे आसता सरकारवाड्यातून व मदारुलमाहाम याचे वाड्यातून लोक तेथे आले. त्याणी बेकैदीचा प्रकार पाहिल्यावरून घोरपडे माार यासी बोलिले आणि माारनिलेस घोड्याखाले उतरऊन त्याजला राजश्री नानाच्या वाड्यात घेऊन गेले. घोरपडे मजकूर तेथे आल्यावर सदर बारगीर व सिलेदार लोक चौकीस आसतात तेथे बसोन भाषण केले की आमचा आपराध काये जाला की सरकारचे लोकाणी गैर-आबरू करून येथे घेऊन आलें. याची चौकसी करावी. तेव्हा मदारुल-माहाम याणी निद्रा करून उठिल्यावर राजश्री हरिपंत फडके यासी बोलाऊन आणविले. आणखीही मुत्सदी वगैरे दरोबस्त आले होते. तो फडके मजकूर येऊन आधी मदारुलमाहाम यासी बोलोन नंतर घोर-पडे बसले होते त्याजपासी आले. समाधानाच्या च्यार गोष्टी सांगि-तल्या त्या प्रथम त्याच्या ध्यानास न आल्या म्हणौन काही दाब व काही समजूत या प्रो बोलोन घोरपडे यांसी फडके माार याणी आपले वाड्यात वाटे लाविले. राजश्री नारोपंत चेक्रदेव बक्षी त्याचे समागमे दिल्हे की याजला समजाऊन वाटे लावावे. या प्रो करून घोरपडे यांसी फडके माार याणी तूर्त आपले हावेलीस पाठऊन आपण मागती राजश्री नानाजवल गेले. यावर मदारुलमाहाम व फडके व बहिरोपंत मेहेदले याचे खिलवत इंग्रेजप्रकर्णी च्यार घटिका जाले व काही कामकाजे यादी वगैरे कागदपत्र अैसे दोन घटिका रात्र पो जाल्यावर सर्वत्र आप-लाले घरास गेले. फडके मजकूरही आपले वाड्यात गेले. तो तोपर्यंत

राजश्री माहालिंगराव घोरपडे तेथेच बसले होते. तेव्हा फडके मजकूर याणी त्याचा समजाविश करून च्यार

३

घटिका रात्रीस घरास वाटे लाविले. सारांश घोरपडे मजकूर मातबर सरदार, मानकरी सरकारचे पदरचे, त्याची भीड विशेष जाणौन महत्व ठेवितात. श्रुत होये. छ १७ रोज गुरुवारी मागील दाहा घटिका दिवस राहता राजश्री नाना फडनवीस याचे वाडयात मुत्सदी व दरकदार आदिकरून सर्वत्र आले होते. राजश्री हरिपंत फडके आल्यावर रौा रामजी पाटील वकील निाा सिंदे मदारुल-माहाम याचे भेटीस आले होते. उंतर प्रांतीची पत्रे आली होती ते त्याणी वाचून दाखविली. राजश्री सिवाजी विंटल विंचुरकर सरदार पाचा हाजारा फौजेनसी राजश्री माहदजी सिंदे याजबराबर आहेत. त्यास त्याचे पुत्र आमृंतराव होते त्याचा काल जेष्ट वद्ये ३० आमावा-श्येस जाला. तेही त्याच प्रांती लस्करात होते. हे वर्तपत्रात लिाा होते ते मदारुलमाहाम व फडके याणी श्रवण करून बहुतच असंतोष मा-निला. पाटील माार यासी दोन घटिका बोलणे जाल्यावर माारनिले आपले घरास गेले. गढेकोठा प्रांत हिंदुस्थान येथील राजश्री मईनसिंग राजे याणी तेथून श्रीमंतास पोशाक वगैरे नजर पर्वतीसिंग वकील याज-बोार पाठविले. ते पेशजीच भामरडचात येऊन राहिले आहेत. मदारुल यास वस्त्र वगैरे पाठविले आहेत. ते रोज माारी वकील माार याणी आणोन राजश्री ना(ना) फडनवीस यास पोशाक १ व बंदूख सोनेरी मुलमेदार १ यैसे व घोडा १ यैसे दिल्हे. राजश्री हरिपंततात्या याजलाही या प्रोाच आनिले आहे ते तेथेच दाखऊन नंतर फडके याचे घरी पावते केले. वकीलाणी फडके मजकूर याचे विद्येमाने भेट घेतली. यावर विडे देऊन त्याजला मार्गस्त केले. श्रीमंतास पोशाक वगैर आणिले आहेत ते राजश्री नानास दाखविले. दरबार होईल ते दिवस द्यावयाचा निश्चंये सागि-(त) ला. या उपरांत मदारुलमाहाम व फडके व बहिरोपंत मेदले अैसे बोलत बसले होते तो रेाा मोरो गंगाधर निफडकर ग्रहस्त श्री कासीयात्रेहून आले म्हणौन माारनिले राजश्री नानाचे भेटीस येऊन

सेला पागोटे दिल्हे. नंतर मूसा मूतरम फिरंगी येथे आहे ते मदारुल-माहाम याचे भेटीस आले. त्याजलाही विडे देऊन रुकसत केले. यावर हिसेब वगैरे कागदपत्र व कामकाजे आस्तमितपर्यंत होऊन राजश्री नाना फडनवीस बेलबागात जाउन दो घटिका रात्रीस आपले वाड्यात आले. श्रुत होये. छ १८ रोज शुक्रवारी मागील दाहा घटिका दिवस राहाता मदारुलमाहाम श्रीमंताचे वाड्यात गेले. राजश्री हरिपंत फडके आदिकरून मुत्सदी व दफ्तरचे कारकून व संस्थानिक सुभे व मामलेदार वगैरे सर्वत्र आले. आर्शेमाहालात श्रीमंत आल्यावर दरबार जाला. च्यार घटिका माली मुलकी कामे जाली. राजश्री मईनसिंग राजे गढेकोटेकर याजकडील वकील पर्वसिंग याजला फडके याणी श्रीमंताचे भेटीस आणिले होते. वकील माार याणी येक मोहोर नजर करून भेटी घेतली. पोशाक वगैरे येणे प्रो श्रीमंतास

१ पोशाक
१ पागोटे
१ शालजोडी १ फर्दा २
२ जामेवार
१ किनखाब थान
२ आंबटे रंगीन

१ बंदूख सोनेरी मुलमेदार
१ ढाल गेडयाची

९ सदरहू दिल्हे. श्रीमंताची स्वारी रमन्यात जावयांसी सिद्ध जाली. तेव्हा दरबार बरखास्त करून श्रीमंत सातखणीवर गेले. बराबर मदा-रुलमाहाम व फडके जाऊन येक घटिका खिलवत केले. राजश्री नाना फडनवीस सिव्हस्तश्नानाकरिता गंगातीरास जावयाचे त्याचा निश्चये. छ २१ माहे माार रोज सोमवारी मागील दोन घटिका दिवस राहाता रेवती नक्षेत्रावर आपले वाड्यातून निघोन बंगल्याचे बागात जाऊन प्रस्तांनी राहावे आसे ठैरले. गंगातीरचे सुभे व मामलेदार यास पत्रे साहित्याविसी गेली. पंधरा निदान वीसा दिवसात जाऊन माघारे यावेसे बोलण्यात आले. मागील पाच घटि दिवस राहाता श्रीमंत घोडी फेरा-वयासी जाताना गढेकोटेकर वकील यास विडे दिल्हे आणि स्वारी रम-

न्यात गेली. मदारुलमाहाम व फडके व कार्याकारण मुत्सदी वगैरे सातखणीवरच बसोन कागदपत्र व जाबसाल कामाकाजाचे जाले. यावर मागील दोन घटिका दिवस राहाता राजश्री नाना तेथोन आपले वाडयात आले आणि औषध घेऊन तैसेच निघाले ते तोफखान्याजवल श्रीव्यंकटेश आहेत त्याचे दर्शणास जाऊन बेलबागात आले. तेथोन घटिका रात्र होता माघारे आपले घरास आले. याउपरांत श्रीमंताची स्वारी रमन्यातून माघारा येऊन दो घटिका रात्री आपले वाडयात दाखल जाले. श्रुत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव कृपा करून आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाळ करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 204 २२ जमादिलावल १२०५ हिजरी
२७ जानेवारी १७९१

श्री

अखबार पुणें अज इा छ १९ माहे जमादिलावल ताा छ २२ माहे मजकूर सन १२०५ हिजरी रोज गुरुवार.

पूर्वी छ १८ माहे मजकूरपर्यंत वर्तमान लिहून छ १९ रोजी सरकारचे डांकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान शृत जाले असेल. सांप्रत छ २२ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिले असें.

हरिपंत सिध्धटेकावर मुकामात करून होते. त्यास तेथून कूच करून पंढरपुरास जाण्याविशी बालाजीपंताची पत्रें गेली. त्याजवरून हरिपंतानी सिध्धटेकाहून कूंच छ १९ रोजी करून पंढरपुरास दरकूच गेले.

भीमाशंकरास जाऊन माहदेवचे दर्शन घ्यावे म्हणून बालाजी-पंताचे बहुत दिवसापासून मानस आहे. त्यास आजपर्यंत जाणें जाले नांहीं. याजकरिता सांप्रत जमादिसानीचे महिन्यात भीमाशंकरास जाऊन देवदर्शन घेऊंन यावें म्हणून पंत माारनिलेनी निश्चये केला आहे म्हणून यैकिले. शोध करून मागाहून लिहू.

बालाजीपंतास दोघी स्त्रिया. त्यापैकी वडील स्त्रीस छ २२ रोजी उषःकालीच ऋतु प्राप्त जाला. ऋतुशांति जमादिलाखरचे महिन्यांत करणार.

माहदाजी सिंदे अजमेरीवर आहेत. जोतपूरवाल्याकडील पेश-कसीचा जवाबसाल ठरून सलूक होंणार म्हणून पेशजी लिहिले आहे. त्यास साट लक्ष रुपये व अजमेर वगैरें च्यार मकानें देऊन सलूक जाला. जयेपूरवाल्याकडील जवाबसाल लागला आहे म्हणून रामजी पाटील जाधव वकील निाा सिंदे याजला सिंदे मजकूरानी लिहिले आहें. परंतु राव पंतप्रधानास आद्यापि पत्रें आली नांहींत. मागाहून येणार म्हणोन यैकिलें.

परशराम रामचंद्र मिरजवाले यानीं धारवाडचे किल्यानजीक मोरचे चालविले आहेंत. कामाटी लाऊन किल्याचा खंदक भरायास लागले आहेंत. खंदक जमीनीसमान करून हला करून लवकरच किला हस्तगत करितो. किल्यातील लोक हवालदिल जाले आहेंत म्हणून छ २२ रोंजी मिरजवाले मजकूराची पत्रें बालाजीपंतास आली.

बालाजीपंताचे स्त्रीस ऋतु प्राप्त जाला आहे. त्यास ऋतूशांति छ ३ माहे जमा(दि)लाखरी करणार.

छ १९ रोज सोमवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तालीमखान्यात जाऊन तालमीचा हुनेर सिकून स्नानसंध्या देवपूजन समई कवालाचे गायेन यैकून भोजन करून आराम केला. अडीच प्रहर

दिवसास द्वितीये भोजन करून कागजावर दसखते केली. तीरंदाजी करून पतंग उडविले होते त्याची सयेर अस्तमानपर्यंत करून रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन करून गंजिफा वगैरें खेळून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस बहिरोपंत मेंदले व गोविंदभट निदसुरेस बोलाऊन आणऊन अस्तमानपर्यंत खिलवत करून पंत माारनिले बेलबागात जाऊन संध्या करून देवदर्शन घेऊन तीन घटका रात्रीस आपले हवेलीस गेले.

छ २० रोज मंगलवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन करून कवालाचे गायेन यैकून भोजन केले. नंतर आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून कागजावर दसखते केली. तीरंद्राजी करून राव मवसूफ यैनेमाहालातील दिवाणखान्यात बसून कृष्णराव बलवंत व चिंतामणराव फडक्यास बोलाऊन नेऊन दोन घटका खिलवत करून बरखास्त होऊन गेले. रात्रौ संध्यासमई कवालाचे गायेन यैकून भोजन करून गंजिफा व चवसर खेळून राव मवसूफ आरामास माहालात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपलें हवेलीस चिंतामणराव फडकें व रामचंद्रराव फडके व कृष्णराव बलवंतास बोलाऊन आणऊ पत्रें लिहून हरिपंताकडे शुतरस्वारासमागमे रवाने करून बहिरोपंत मेंदले व गोविंदभट निदसुरेस बोलाऊन घेऊन दोन घटका रात्रपर्यंत खिलवत करून पंत माारनिले बेलबागात जाऊन संध्या करून देंवदर्शन घेऊन च्यार घटका रात्रीस बालाजीपंत आपले हवेलीस गेले.

परशरामपंत मिरजवाल्याकडील छ माारी तिसरे प्रहरी बालाजीपंतास पत्रें आली. नारोपंत चक्रदेव दफ्तरनवीसास छ मजकुरी प्रातःकाली बालाजीपंतानी वस्त्रें सेला पागोटे देऊन हरीपंताकडे जाण्याकरिता निरोप दिल्हा.

छ २१ रोज बुधवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन कवालाचे गायेन यैकून स्नानसंध्या देवपूजन करून भोंजन करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून कागजावर दसखते करून स्वारी सिध करविली. चिंतामणराव फडके व नीलकंठराव खासगीवाले व गोविंदराव बाजी व सयाजीराव भापकर व वेंकटराव घोरपडें व देवलाते वगैरे सरदार व स्वार दोनतीनसे व गाडदी वगैरें जामियेंत आणऊन राव मवसूफ तिसरें प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन च्यार घटका घोडी फरून घटका दिवस राहता हवेलीस जाऊन पतंग उडविले होते त्याची सयर घटकारात्रपर्यंत करून संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन करून गंजिफा वगैर खेळून आराम केंला.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस चिंतामणराव फडकें व रामचंद्रराव फडके व गोविंदभट निदसुरें व बहिरोपंत मेंदल्यास बोलाऊन घेऊन दोनतीन घटका खिलवत करून वेतालपेटेत माहपुरुषाचे दर्शनास जाऊन माहपुरुषास शालजोडी पांघरऊन बालाजीपंत लेल्याचेथे जाऊन लेले मजकुराचे पुत्राची समाधानी करून हवेलीस जाऊन मेंदले मजकूर व निदसुरेसी घटका रात्रपर्यंत खिलवत करून पंत माारनिले संध्येस उठून गेले.

लक्ष्मणराव फडके व माधवराव फडके व नारोपंत चक्रदेंव छ मजकुरी पुण्याहून हरिपंताकडे गेले.

छ २२ रोज गुरुवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन करून प्रहर दिवसास भोजन करून मस्त हाथी मौजे भांबरड पुण्यानजीक तेथील कफेदस्त मैदानात हाथीचे गंडस्थली चिरकुठाचा पुतला बसऊन सोंडला होता. त्याची सयेर सात मजली बंगल्यावरून दुर्बिनीतून तिसरे प्रहरपर्यंत करून यैनेमाहालातील दिवाणखान्यात जाऊन बालाजीपंतास बोंलाऊन घेऊन यक घटका खिलवत करून पुन्हा राव मवसूफ सात मजली बंगल्यावर

जाऊन अस्तमानपर्यंत हाथीचा तमाशा पाहून हाथी माणस मारील म्हणून राव मवसूफानी हाथीच आसपास च्यारपांचसे स्वार पाठविले होते. रात्रौ राव मवसूफानी संध्या व भोजन करून कवालचे गायेन यैकून आरामास माहलात गेले. बालाजीपंत आपले हवेलीस जाऊन बहिरोपंत गोविंदभट निदसुरेसी खिलवत घटका रात्रपर्यंत करून पंत माारनिले संध्येस उठलें.

बालाजीपंतास दोघी स्त्रिया त्यापैकी वडील स्त्रीस छ मजकुरी उषःकालीच ऋतू प्राप्त जाला.

रघुनाथराव चिमणाजी संचीव मौजे भोराहून छ मजकुरी पुण्यास येऊन बालाजीपंताचे हवेलीस तिसरे प्रहरी जाऊन पंत माारनिलेची भेटी घेऊन आपले हवेलीस गेले.

राव पंतप्रधानांनी छ मजकुरी च्यारपांच चोर कैदेत होते त्याचे सिरछेद करविलें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

A. R. No. 205 १३ जमादिलाखर १२०५ हिजरी
१७ फेब्रुवारी १७९१

(आरंभीचें पान अनुपलब्ध)

२

श्रुत होये. छ ९ रोज रविवारी मागील साहा घटिका दिवस राहता मदारुलमाहाम आपले घरीहून निघोन आलीबाहादर याचे वाडयात गेले. कारण की श्रीमंत तेथे आहेर करावयाचा संकत जाला होता तेव्हा श्रीमंतही तेथे आले. बहादर याचे चिरंजीवास आहेर केला. बितपसील.

१ वस्त्रे बादळी पोशाक मै किनखाब वगैरे.
१ कंठी मोत्याची,
१ सिरपेच,

३

या प्रो आहेर केल्यावर आतर पादान घेऊन अगोधर राजश्री नाना फडनवीस तेथोन निघाले ते राजश्री लक्ष्मणराव रास्ते याचे हवेलीस आले. श्रीमंताचे स्वारीची सिद्धता जाहली होती. त्यास मागील च्यार घटिका दिवस राहाता श्रीमंत निघाले ते अंबारीत स्वार जाले. खवासीत रा दाजीबा फडके बसोन स्वारी निघाली ते रास्ते मार याचे हवेलीजवल सिवपुरीत श्रीमंत दाखल जाले. सांप्रदाया प्रो रा लक्ष्मणराव रास्ते इस्तकबाल येऊन श्रीमंतास बैठकीचे स्थलीं घेऊन गेले तो नाचाची शुरूवात जाली. तेव्हा रास्ते मार याणी मेजवानीची वस्त्रे वगैरे येणेप्रमाणे

श्रीमंतास	राजश्री नाना फडनवीस यास
१ मोत्याची कंठी	बऱ्हानपुरी सेला १ व पागोटे १
१ पोशाक बऱ्हानपुरी जरी बुटीदार	लाल बुटीचे रंगाचे व जामेवार व किनखाब थान येकूण
१ सिरंगी घोडी रास येक	च्यार वस्त्रे मिळून पोशाक १

——— सरंजामसुधा.

३

यासिवाये राजश्री बाबा पुरंधरे व आपा बलवंत व दाजीबा फडके व खासगीवाले व माधोराव रामचंद्र व राघोपंत गोडबोले आदिकरून तीस असामीस सेले पागोटी दिल्ही. आतर पानदान बिडे व फुलाचे हार गजरे यैसे दोन घटिका जाल्यावर रास्ते याणी श्रीमंतास व मदारुलमाहाम वगैरे यांस आपली नवी हवेली दरोबस्त दाखविली. नंतर बाहेर आल्यावर नवे पाणी आनिले आहे तो होजे व नवे देवांल्ये होत आहे ते यैसे सर्व दाखविले. याउपरांत श्रीमंत तेथोन निघाले ते आस्तमिति माघारे आपल्या वाडयात आले. राजश्री नाना आपले घरी आल्यावर मागती तैसेच निघाले ते गावात ग्रहस्त मंडली व भिक्षुक मंडली याचे घरी लग्न व मुंजी आहेत म्हणोन चौ पाचा घरास जाऊन आहेर करून तीन घटिका रात्रीस माघारे आपले वाडयात आले. रात्रौ अलीबहादर याचे येथील शर्गस्त निघाली

होती. श्रीमंताणी बहादर मजकुराचें घरी शादीचें खर्चाकरिता रोख पाच हजार रूपये व साहित्य सरंजाम मिळून बारा पंधरा सहस्रापर्यंत दिल्हे. श्रुत होये. छ १० रोज सोमवारी एकादसीस मागील तीन घटिका रात्र शेष राहाता राजश्री नाना फडनवीस बेलबागात जाऊन पूजन करून प्रहरा दिवसा आपले घरास आले. आणि श्रीमंत मागील दो घटिका रात्रीस पर्वतीस गेले. देवाची पुज्या जाल्यावर फराल करून स्वारी माघारा येता बेलबागात येऊन श्री विष्णु-मूर्तीचे दर्शण घेतले. नंतर आपले वाडचात दाहा घटिका दिवसा दाखले जाले. त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडचात सर्वत्र आले होते. मागील साहा घटिका दिवसा श्रीमंत मेजमानीस रो॥ कृष्णंराव भिवजी सेलुकर सुभे आमदाबाद याचे येथे गेले. समागमे रो॥ आपा बलवंत व दाजीबा फडके व बाबूराव केशव व खासगीवाले वगैरे होते. सेलूकर याणी श्रीमंतास पोशाक बऱ्हानपुरी पिवले रंगाचा व जामेवार व किनखाब येकूण पाच वस्त्रे व कंठी मोत्याची १ व सिर-पेच १ यैसे दिल्हे. वरकड मंडलीस सेले पागोटी दाहाबारा आसामीस देऊन अतर पानदान जाले. नाचही जाला. या प्रो॥ दोन घटिका होऊन श्रीमंत तेथोन माघारे निघाले ते साडेतीन घटिका दिवस शेष राहाता आपले वाडचात आले. राजेश्री नाना फडनवीस याचे येथे सर्वत्र आल्यावर किरकोली कामकाजे च्यार घटिकापावेतो जाली. मागील दोन घटि दिवस राहाता मदारुलमाहाम आहेर करावयासी निघाले ते

१ बलवंतराव जकातदार
१ त्रिंबकराव सबनीस
१ गोविंदपंत देवधरे
१ प्रतिनिधीचें बालाजीपंत
१ माहादाजीपंत ढेरे
१ रामचंद्रपंत गोडबोले

यैसे पाचसाहा ग्रहस्ताचें घरी जाऊन आहेर करून च्यार घटिका रात्रीस आपले वाडचात माघारा आले. समसेर बाहादर, अलीबहादराचे पुत्र, याच्या सुंता रोज मजकुरी तेरा घटिका दिवसा जाल्या. सबब दाहा बार तोफेचे जाले. राजश्री हरीपंततात्या भंडारकोठ्यास दाखल जाले श्रुत होये. छ ११ रोज मंगलवारी त्रितीये प्रहरी श्रीमंताचे वाडचात जेठी याची कुस्ती होणार म्हणौन मागील सा घटिका दिवसा

मदारुलमाहाम सरकारवाड्यांत गेले. रो॥ आपा बलवंत व दाजीबा फडके व बाबा पुरंधरे व बहिरो रघुनाथ मेहेदले व खासगीवाले वगैरे आल्यावर हजारा कारंज्याचे दिवानखान्यात बैठक जाली होती. तेथे श्रीमंत आले. त्यास प्रथम पाचसात पहिलवानाच्या जोडीच्या कुस्त्या जाल्या. नंतर नरसू व फुंला जेठी या दोघासी वज्रमुष्टीची शुरुवात जाली. ते च्यार घटिकापर्यंत कडो विकडीचे प्रकार दोघाचे बहुतच जाले. कसब होताना दोंघेही समतोलच राहिले. त्यात एकाची जुंज कोवतल काहीयेक जास्त जाल्यावरून श्रीमंताणी त्याजला सोण्याचे कडे वजन आठरा तोल्याचे देविले व दुसरियासी पंधरा तोल्याचे. येकूण दोन कडी दोघास सेले पागोटी या प्रो॥ बक्षीस दिल्हे. मागील दोन घटिका दिवस राहता बरखास्त होऊन सर्वत्र आपंलाले घरास गेले. पाच घटिका रात्रीस राजश्री नाना फडनवीस रो॥ कृष्णराव भिवाजी सेलुकर सुभे आमदाबाद याचे येथे मेजमानीस गेले. समागमे राघोपंत गोडबोले वगैरे गेले होते. आधिकोतर मंडली कोण्हीच नवते. सेलूकर याणी मदारुलमाहाम याजला मोत्याची कंठी १ व सेला पागोटे बसमेदार व जामेवार व किनखाब थान येकूण पोशाकाची वस्त्रे उतम प्रतीची दिल्ही. गोडबोले व यादोराव देवकाते राजपागे वगैरे यास सेले पागोटी दिल्ही अतर पानदान जाल्यावर च्यार घटिका पर्यंत नाच जाला. उपरांत राजश्री नाना तेथोन माघारा निघोन बारा घटिका रात्रीस आपले वाड्यात आले. श्रुत होये. छ १२ रोज बुधवारी त्रितीये प्रहरी राजश्री नाना फडनवीस याचे येथे सर्वत्र आले होते. राजश्री आपा बलवंत व सकाराम येशवंत पानसे व बाजीराव बरवे व माधोराव रामचंद्र वगैरे पागे राजश्री हरीपंत फडके याचे लस्करात जावयाकरिता श्रीमंताची आज्ञा घेऊन नंतर मदारुलमाहाम याचा निरोप घेऊन गेले. आपा बलवंत सासोडास जाऊन नंतर तेथोन परभारा लस्करास जाणार व राजश्री बाबा पुरंधरे याचे द्वितीये संमधाचा निश्चये जाला म्हणौन माारनिले लग्न करावायासी सासोडास निरोप घेऊन गेले. नंतर राजेश्री रंगराव त्रिंबक राजे बाहादर व दाजीबा फडके व गोविंदभट निरचेऊर येऊन च्यार घटिका बाहादर

माराचें सरंजाम वाटनीविसींचे बोलणे जालयावर मागील दो घटिका दिवसा राजश्री नाना आपले घरीहून निघाले ते शनवार पेठेत श्री आमृतेश्वर माहादेव याचे देवाल्य श्रीमंताणी जीर्नोद्धार करून नवे सिध्ध करविले, रोज माारी देवाची स्थापना जाहाली म्हणौन दर्शणाकरिता जाऊन बेलबागात आले. संध्यावंदन नवे हवेलीस करून माघारे निघाले ते घटिका रात्रीस आपले घरास आले. मागील सहा घटिका दिवस राहता श्रीमंत रमान्यात गेले होते. त्यास अस्तमिती स्वारी माघारा येऊन साइंकाल होता आपले वाडयात दाखल जाले. श्रुत होये. छ १३ रोज गुरुवारी रो। कृष्णराव भिवाजी सुभे आमदावाद याजला मदारुलमाहाम याणी बन्हानपुरी सेला व पागोटे व त्याचे उभयेता चिरंजीवास बन्हानपुरी कचे रंगाची सेले व पागोटी उंच पासीची देऊन माारनिले संस्थान माारी जातात. सबब निरोप काल दिल्हां. रोज माारी त्रितीये प्रहरी राजेश्री नाना फडनवीस याचे वाडयात सर्वत्र आले. यावर रो। बहिरो रघुनाथ मेहेदले येऊन मदारुलमाहाम याचे व मेहेदळे माार या उभयेताचे खिलवत मसलत प्रकर्णी साइंकालपर्यंत येऊन सर्वत्र आपलाले घरास गेले. खिलवताखेरीज आणखी कामकाज जाहले नाही. हिंदुस्थान प्रांतीचे वर्तमान राजेश्री माहादजी सिंदे आजमेरीकडून निघोन मेवाड प्रांती आले. शापूर देवले येथे मुकाम आहे. सीकानी चाल पुढे बहुत केली. मथुरेस येऊन दोन पुरे लुटून गेले. उपद्रव फारच केला. राजेरजवाडे व इस्माल-बेग व सीक वगैरे येकचित जाले आहेत. होलकर व अलीबहादर याचेही सूत्र आतून राज्यासी आहे. खंडनी किंवा सलूख जोतपूर व जैपूरकराचा व्हावा यैसे ठीक दिसत नाही. पुढे सिकानी चाल करून मागे गिलचेही आहेत. पाहावे काये करतील ते न कले. सिंदे याचे कुटुंब किले ग्वालेरीस होते ते उज्येनीस रवाना करविले आणि आपणही उज्येनीस

(अपूर्ण)

डॉ. ब. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

A. R. No. 206 १९ रजब १२०५ हिजरी
२४ मार्च १७९१

(आरंभीची पाने अनुपलब्ध)

३

श्रीमंताचे वाडचात दाहा घटिका रात्रपर्यंत नाच व तमाशा जाला. श्रुत होये. छ १५ रोज सोमवारी श्रीमंत दो घटिका दिवसा आपले वाडचाबाहेर आले. तो फडके आदिकरून सर्वत्र आले. हे वर्तमान समजताच राजश्री नाना फडनवीस तेथेच गेले. साहा घटिका पावेतो सर्वाचे खेळने जाल्यावर मदारुलमाहाम माघारे आपले घरास आले. आणि श्रीमंत आपले वाडचात जाऊन दिवानखान्यात बसले. पहिलवान व जेटी व शागिर्द पेशा वगैरे हजरच होते. त्यानी कुस्त्या व नाना प्रकारचे खेल बारा घटिका दिवसपर्यंत केले. ते जाल्यानंतर सर्वत्र आज्ञा घेऊन आपलाले घरास गेले. त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे वाडचात सर्वत्र आले होते. त्यास रो॥ माहादाजीपंत गुरुजी याचे घरी लग्न जाले म्हणौन त्याचे येथे राजश्री नाना फडनवीस मेजमानीस गेले. तेव्हा माारनिलेनी मदारुलमाहाम यास सेला व पागोटे जामेवार व किनखाबाचे थान यैसी च्यार वस्त्रे दिल्ही. आतर पानदान जाले. दोन घटिका नाच जाल्यावर राजश्री नाना माघारे आपले घरास आले. वो॥ रो॥ गोविंदभट निरचेऊर व बहिरोपंत मेहेदले आ(ल्यावर) त्यासी दोन घटिका बोलणे जाले. नंतर रो॥ त्रिबकराव परचुरे वगैरे दरकदार येऊन मामलतीचे कामकाज थोडेबहुत होऊन साइंकाली सर्वत्र माघारे गेले. सरकारवाडचात नाच दीड प्रहर रात्रपर्यंत जाला. श्रुत होये. छ १६ रोज मंगलवारी श्रीमंत प्राथःकाली वाडचाबाहेर येऊन दरोबस्त मंडलीस बोलाविले. रा॥ दाजीबा फडके याचे शरीर बहुत आशक्त यास्तव त्याचे यावयाचा आनमान. तेव्हा श्रीमंताणी दफ्तरचे कारकून याजला फडके माराकडें पाठऊन त्याजला आणविले आणि विनोदार्थ फारच शोभा करविली. चिखलमाती डाहारियात घालोन मंडलीस त्यात परस्परे लोटविले. रा॥ नारो निलकंठ मजमदार याजलाही डाहारियात ठकविले होते. साहा घटिका दिवसा मदारुल-

माहाम तेथे आले. ते दोन घटिका बसोन मागती आपले घरास गेले. नंतर खेळ पहिलवानाचा जाला. या प्रो सिमग्याचे माहात्म प्रतिपदे-पासोन चालत आहे. दीढा प्रहरा दिवसा मंडलीस आज्ञा देऊन श्रीमंत भोजनास आपले वाडयात गेले. नंतर त्रितीये प्रहरी रमन्यात स्वारी जाऊन तेथे घोडी फिरविली. अस्तमित होता माघारी निघाले ते आपले वाडयात आले. मागील प्रहर दिवसा मदारुलमाहाम याचे येथे मुत्सदी व दरकदार व सुभे मामलेदार यैसे येऊन आपलाले निस-बतची कामकाजे च्यार सा घटिकापर्यंत जाली. नंतर मागील दोन घटिका दिवस शेष राहाता राजश्री नाना फडनवीस बेलबागात जाऊन साइंकाली आपले घरास आले. रात्रौ नाच व तमाशा श्रीमंताचे वाडयात व मदारुलमाहम याचे येथे दीड पावणेदोन प्रहर रात्रपर्यंत जाला. श्रुत होये. छ १७ रोज बुधवारी श्रीमंताचे वाडयापुढे दीड प्रहरपर्यंत चिखलमातीचा खेळ जाला. नंतर त्रितीये प्रहरी मदारुलमाहाम याचे येथे सर्वत्र आले होते. रा॥ विसाजीपंत वार्धेकर वकील दि॥राजश्री परशराम रामचंद्र येऊन च्यार घटिका त्यासी खिलवत जाले. त्याचा भाव ध्यानास आला की धारवाड येथून मिरजकराणी निघोन पुढे व्हावे. हे मानस येथील मुख्याचे. परंतु विरश्रीत गोष्ट पडली आहे. याआर्थी हे सल्हा मिरजकर माार याचे ध्यानास येत नाही म्हणौन वार्धेकर वकील मजकूर याजला धारवाडासी पाठऊन मिरज-करासी बोलणे करावे यैसा काहीयेक विच्यार दिसे. येदर्थी च्यार घटिकापर्यंत खिलवत होऊन रा॥ नाना फडनवीस आपले घरीहून निघाले. ते आहेर करावयासी रो॥ कुशाबा भानु फडनवीस सातारेकर याचे येथे जाऊन तेथून माधोराव सदासिव याचे घरास गेले. नंतर नारायेणपेठेत कोणे ग्रहस्ताचे येथून होऊन आपले घरास दोन घटिका दिवस शेष राहाता आले. तो सातारेकर कोण्ही रा॥ त्रिंबकजी भोसले येथे आले होते. ते भेटीस आले होते. त्याजला विडे देऊन मार्गस्त केले. नंतर रा॥ बहिरो रघुनाथ मेहेंदले आले. त्यासी येक घटिका बोलणे होऊन आस्तमानी मदारुलमाहाम नव्या वाडयात गेले. बेलबाग करून तेथून दो घटिका रात्रीस माघारें आपले वाडयात आले. रात्रौ नाच

तमाशे श्रीमंताचे वाडयात व मदारुलमहाम व राा हरिपंत फडके याचे येथे जाले. किले धारवाड येथे दारुगोल्याचे शंभर उट भरून पेशजी राा जनार्धनपंत सिलेदार कारकून याजबोा किले मजकुरी पाठऊन दिल्हे होते ते कारकून माार पावते करून माघारा आला. आणखीही सरंजाम मिरजकराकडे जावयाचा. सबब मदारुलमाहाम याणी मेस्तर मालीट वकील दिाा इंग्रेज याजला सागोन ममईहून परभारा दारू वगैरे सरंजाम

४

धारवाडास पावता करविला. हिंदुस्तान प्रांतीचे वर्तमान तर राजश्री माहादजी सिंदे याचे ठाणे आजमेरचे किल्यात छ २३ माहे जमादिलाखरीस दाखल जाले. सांप्रत सिंदेही तेथेच आहेत. किल्याची सैर करितात. होलकर व आलीबहादर जैपूर प्रांतीच आहेत. या प्रोा वर्तमान यैकिल्यात येत आहे. राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याची फौज च्यार हाजार राा बलवंतराव भवानी घेऊन निघाले ते वर्धा नदी उतरून वासीम प्रांती आले आहेत. मजल दर मजल जाऊन राजश्री हरिपंत फडके याजला भेटनार. श्रुत होये. छ १८ रोज गुरुवारी प्रथम प्रहरी राा बलवंतराव कासी धारवाडास जावयाकरिता श्रीमंताची आज्ञा घेऊन नंतर मदारुलमाहाम याचा निरोप घेतला. राा विसाजीपंत वार्धेकर वकील मिरजकराकडील याची रवानगी धारवाडास होते. सबब वकील माार प्रस्थानी जाऊन राहिले आहेत. रोज माारी पंचमीचा रंग श्रीमंताचे वाडयात होणार म्हणौन मागील साहा घटिका दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस आपले येथून निघोन श्रीमंताचे वाडयात गेले. फडाचे दिवानखान्यात बैठक जाली. दरोबस्त मंडलीस बोलावनी गेली होती. त्याजवरून राजश्री पंतसचिव व बाबा पुरधरे व माधोराव पेठे व रामचंद्र नारायेण व त्रिंबकराव जनार्धन सरसुभा प्रांत पुणे व रंगराव त्रिंबक व रघुपतराव नारायेण राजे बाहादर व माहाराव निंबालकर व मानाजी सिंदे फाकडे व सयाजीराव भापकर व माहालिंगराव घोरपडे व पाटणकर व पाग व मानकरी सरदार व सिलेदार व सरंजामी व नारो निलकंठ मजमदार

व त्रिंबकराव चिटणीस बहिरोपंत मेहेंदले व गोविंदभट निरचेऊर व दाजीबा व बाबा फडके व पानसे व खासगीवाले व थते व साठे आदिकरून मुत्सदी व दफ्तरचे दरकदार व वकील संस्थानिक वगैरे सर्वत्र श्रीमंताचे वाडचात आल्यावर श्रीमंत त्या दिवानखान्यात मागाहून आले. मदारुलमाहम येक घटिका बसोन पुढे रंगाचा समारंभ होणार या आर्थी श्रीमंताची आज्ञा घेऊन राजश्री नाना फडनवीस विडे घेऊन निघाले ते बेलबागात गेले. इकडे श्रीमंताचे वाडचात सर्वत्र आल्यावर आरंभी सर्वास विडे दिल्हे. नंतर आतर व फुलले व गुलाल व बुका याची भडमार जाली. उपरांत रंगाची शुरुवात जाली. ते च्यार घटिकापर्यंत मोठीच धूम जाली. रंगे करून सर्वत्र त्तर करून दिल्हे. दोन घटिका नाचही जाला. याप्रो रंगाचा समारंभ येथास्थित जाल्यावर मागील दोन घटिका दिवस शेष राहाता सर्वत्राणी श्रीमंताची आज्ञा घेऊन आपलाले हवेलीस गेले छ १२ माहे रजबची आखबार राजश्री रामचंद्र उद्धव याची सरकारात आली. त्या आखबारीतील वर्तमान ध्यानास आले की हजरत बंदगानआलीसाहेब याणी पानगलाहून राजश्री हरिपंत फडके याचे भेटीचे उद्येशे कूच करून गदवालचे शुमारे आले व राजश्री गोविंदराव कृष्ण याणी हुजूरची आज्ञा फडके माार याजकडे जावयाची घेऊन उभयेता गोविंदराव याच्या भेटी छ १२ रजबी राजश्री हरिपंततात्या याच्या जाल्या. पुढे हुजूरच्या भेटी सत्वरच होणार म्हणौन वर्तमान आले. श्रुत होये. याउपर पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव कृपा करून आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 207

८ शाबान १२०५ हिजरी
१२ एप्रिल १७९१

श्री

पोष्य बळवंतराव नागनाथ सां नमस्कार विज्ञापना जे येथील

वर्तमान ताा छ ८ माहे शााबान चैत्र शुध नवमी भौमवासरपर्यंत वास्तव्य पुणें येथें स्वामीचे कृपेकरून स्वस्थ जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ५ माहे मजकुरी सरकारचे डांकेवर हुजूर आर्जी व आखबार व नवाब आजमलउमरा बहादर व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र पाठविलें ते पाऊन सविस्तार वर्तमान श्रुत जाले असेल. सांप्रत छ ८ रोजपर्यंत वर्तमान लिहून सांप्रदायाप्रमाणें पत्राची रवानगी केली आहे. पत्रावलोकनी विस्तारें वर्तमान ध्यानारूढ होईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

A. R. No. 208

१९ शाबान १२०५ हिजरी
२३ एप्रिल १७९१

श्री

पोष्य बळवंतराव नागनाथ सांा नमस्कार. विज्ञापना जे येथील वर्तमान ताा छ १९ माहे शाबान चैत्र वद्य पंचमी मंदवासरपर्यंत वास्तव्य पुणें येथें स्वामीचे कृपेकरून स्वस्थ जाणून स्वानंद लेखनज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ १३ माहे मजकूरी सरकारचे डांकेवर हुजूर आर्जी व आखबार व नवाब आजमलउमरा बाहादर व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र पाठविलें ते पाऊन सविस्तर वर्तमान श्रुत जालें आसेंल. सांप्रत छ १९ रोजपर्यंत वर्तमान लिहून सांप्रदाया प्रो पत्राची रवानगी केली आहे पत्रावलोकनी विस्तार वर्तमान ध्यानारूढ होईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

श्री

अखबार पुणें अज ज्ञा छ १३ माहे शाबान ताा छ १९ माहे मजकूर सन १२०५ हिजरी रोज शेनिवार.

पूर्वी छ १२ माहे मजकूरपर्यंत वर्तमान लिहून छ १३ रोजी सरकारचे डांकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान श्रुत जाले असेल. सांप्रत छ १९ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिले असे.

इंगरेजाकडील कुल जमियेत बेंगरूळानजिक आहे व फतेअलीखान घाठाखाली होता. ते इंगरेजानी बेंगरूलचा किला घेतल्याचे वर्तमान यैकून उडबालचे घाठाने वरते येऊन इंगरेजाचे गिर्दनवाहीस आहे. इंगरेजाकडील कहीकबाडे व रस्त खान मजकुराने बंद केली आहे व हररोज गोळागोली होत आहे म्हणून यैकिलें.

हुजूरची जमियेत इंगरेजास कुमक गेली हे वर्तमान फतेअलीखानाने यैकून हुजूरचे जमियेतीचे रुखावर खान मजकुराने पूरणयासमागमे जमियैत देऊन रवानें केले म्हणून यैकिले.

परशराम रामचंद्र धारवाडाहून कूच करून श्रीरंगपटणचे रुखे तुंगभद्रा नदीपर्यंत गेल्याचे वर्तमान आले. तेथून दरकूच सिऱ्याचे जंगलात जाणांर म्हणून यैकिलें.

फतेअलीखानाकडील पत्रें राव पंतप्रधानास लक्ष्मणराव रास्त्याचे मारफातीने आली आहेत म्हणून पेशजी लिहिलेच आहें. त्यास रास्ते मजकुराकडील सुबराव नामे वकील याजला बालाजीपंतानी पुन्हा छ १४ माहे शाबानी राव रास्त्याकडे वांईस रवाना केले आहे. जवाबसाल ठरून उतर येईल त्याप्रमाणे खान मजकुराचें पत्राचा जवाब देणार म्हणून यैकिलें.

माहदजी सिंदे आजमेरीहून जरीदा पुष्करतीर्थाचे स्नानास गेले आहेंत. त्यास सिंदे मजकुरानी आजमेरचे किल्यास रस्त पाठविली होती. त्यास मार्गात दोनतीन हजार बेंदडे येऊन रस्त लुटून नेली. त्यास जयपूर प्रांती तुकोजी होळकर व अलीबहादर आहेंत. या उभयता सरदारानीच रस्त लुटून नेंली. याखेरीज या प्रांती रस्त लुटून नेणार कोण म्हणून सिंदे मजकुरानी बालाजीपंतास पत्र छ १ माहे

शाबानचे पुष्करतीर्थाचे मुकामीहून पाठविले ते पंत माारनिलेस छ १८ रोंजी आली.

होळकराची व माहदजी सिंद्याची फारच नाखुषी आली आहे म्हणून यैकिलें.

मल्हारजी होळकर पैठणावर मुकामात करून तालुकियात उपद्रव केला. सबब अजमुलमुलक बाहदराकडील जमियत सातआठश व राव पंतप्रधानाकडील पांचसातसे जमियत यकत्र होऊन होळकर मजकुरावर चालून गेली. छ ९ माहे शाबानी लढाई जाली. त्यास बाहदर मवसूफाकडील व होळकराकडील शे दोनसे माणूस जखमी व ठार जाली म्हणून राव पंतप्रधानास वर्तमान आले. त्याजवरून बालाजीपंतानी बहिरो आनत पागेवाले सरदाराची छ १९ रोजी पुण्याहून रवानगी केली. त्यासमागमे पांचसात पागा व केशव माहदेव कोपरगावी दोन हजार जमियतीने आहे त्यापैकी हजार जमियत रवाने केली.

पुरंधरचे किल्यावर दारूगोली व जकीरा दाणे वगैरें कमी म्हणून बालाजीपंतानी किले मजकूरचे किलेदारास बोलाऊन आणऊन दारूगोली व दाणे व वैरण वगैर जंगी सरंजाम तयार करून ठेवण्याविशी ताकीद केली. त्याजवरून सरंजाम ज्यारी आहें व हरयक किलेदारास याचप्रमाणे सूचना केली आहें.

छ १३ रोज रविवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन वख्ती कवालाचे गायेन यैकून भोजन करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून तिसरे प्रहरी मिस्तर मालट वकील इंगरेज आपले हवेलीस येणार म्हणून बालाजीपंतास तेसमई हजरं होण्याविशी तलब केली. त्याजवरून पंत माारनिले राव मवसूफासमीप हजर जाले होते. इतकियात मिस्तर मालट वकील राव मवसूफाचे हवेलीनजीक येताच बालाजीपंत गणपतीचे माहलात गेले. वकील मजकूरही पंत माारनिलेसमीप

जाऊन बसला. बाद राव पंतप्रधानही जाऊन बसले. धारवाडचे किल्याची फते जाल्याचे वर्तमान यैकून वकील मजकूर मुबारकबादी करितां आले आहेंत म्हणून बालाजीपंतानी राव मवसूफास सांगितलें. उपरांतिक लाड कानवस इंगरेजाचे पत्राची थैली वकील मजकुराने राव मवसूफास दिल्हीं. दोन घटका निशस्त जाली. नंतर राव मवसूफानी अतरपांदान देऊन बरखास्त होऊन गेले. मिस्तर मालट वकील इंगरेज आपले मकानास गेला. बाद राव पंतप्रधान पुन्हा गणपतीचे दिवाण-खान्यात जाऊन बसले. बालाजीपंत व बहिरोपंत मेंदले हजर होते. फतेअलीखान कोणते घाठाने बेंगरुळानजीक आला म्हणून नकशा पाहिला. बातनीचे पत्र आलें होते ते पाहून दोन घटका खिलवत करून राव मवसूफ बरखास्त होऊन यैनेमाहलात जाऊन तीरंदाजी करून रात्रौ संध्या व भोजन केले. कवालाचे गायेन यैकून आराम करायास माहलात गेले. बालाजीपंत आपले हवेलीस अस्तमानीच गेले.

छ १४ रोज सोमवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्यादिक व भोजन करून कागजावर दसखते केलीं. नंतर आराम केला. दोन प्रहर दिवसास रात्रौ चंद्रग्रहण म्हणून भोजन करून दाने करायाची नेमणूक करून पांच घटका रात्रीस चंद्रग्रहण-समई राव मवसूफानी आपले हवेलीतच हावजावर स्नान करून अश्वदान यक व गोदाने व दक्षणा वगैरें च्यारपांच हजार रुपयेपर्यंत ब्राम्हणास खैरात केली. नतर जपज्याप करून बारा घटका रात्री नंतर मुक्तस्नान करून भोजन केले. राव मवसूफाचे कबील्यानेही गोदाने वगैरें खैरात केलीं.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस राम-चंद्रराव फडके व बहिरोंपंत मेंदले गोविंदभट निदसुरेस बोलाऊन आणऊन च्यार घटका खिलवत करून पंत माारनिले दीक्षितबावा माहपुरुषाचेथे हणमंतजयती म्हणून तेथे जाऊन क्षणभर बसून बेलबागात गेले. संध्या करून देवदर्शन घेऊन हवेलीस गेले. चंद्रग्रहण-

समई स्नान दान व गोदान व दक्षणा वगैरें देऊन बारा घटका रात्रीस मुक्तस्नान करून उपहार केला. नंतर निद्रा केली.

छ १५ रोज मंगलवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तालीमखान्यात जाऊन तालमीचे कितेक हुनर सिकून स्नान संध्या देवपूजनसमई कवालाचे गायेन गायेन यैकून भोजन केले. नंतर आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून स्वारी तयार करायास सांगून नीलकंठराव खासगीवाले व नारोपंत मुजमदार व वेंकटराव घोरपडे व जोत्याजीराव व मलोजीराव जाधव वगैरें सरदार व स्वार हजारबारासे व गाडदी सातआठश वगैरें जमियत आणऊन राव मवसूफ तिसरे प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन दोनतीन घटका घोडी फेरून शराचे व हाथीचे लढाईचा तमाशा पाहून राव मवसूफ हाथीचे किलावियात स्वार होऊन अस्तमानी हवेलीस जाऊन रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. चवसर खेळून आरामास गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस गोविंद-भट निदसुरे व बहिरो रघुनाथ मेंदल्यास बोलाऊन घेऊन अस्तमान-पर्यंत खिलवत करून पंत माारनिले बेलबागात जाऊन संध्या तेथेच करून विष्णुदर्शन घेऊन आपले हवेली दोनतीन घटका रात्री गेले.

हरीपंताची व गोविंद कृष्णाकडील पत्रें छ ७ रोजची छ मज-कुरी प्रातःकाली बालाजीपंतास आली.

छ १६ रोज बुधवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन कवालाचे गायेन यैकून स्नानसंध्या देवपूजन करून भोजन केले. कागजावर दसखते करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सात मजली बंगल्यात च्यार घटका बसून चवसर खेळून यैनेमाहलात जाऊन तीरंदाजी केली. रात्रौ संध्यासमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. नंतर शतरंज खेळून आरामास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस राम-चंद्रराव व चिंतामणराव फडके व गोविंदभट निदसुरे व बहिरोपंत

मेंदल्यास बोलाऊन आणऊन सोलापूरवाले आमीलाचे हिशबची चवकसी दोनतीन घटका करून चिंतामणराव फडक्यासी आस्तमानपर्यंत खिलवत जाली. उपरांतिक बालाजीपंत बेलबागात जाऊन तेथेंच संध्या करून देवदर्शन तीन घटका रात्रीनंतर हवेलीस गेले.

छ १७ रोज गुरुवारी राव पंतप्रधान प्रातःकालीच बेदार होऊन तालीमखान्यात जाऊन तालमीचे कितेक हुनर सिकून स्नानसंध्या देवपूजनसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. कागजावर दसखते करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून दोन तीन घटका हरणाचे लढाईचा तमाशा पाहून च्यारपांच हाथी आणऊन फेर देविले. अस्तमानी यैनेमाहलात जाऊन दोन घटका बसले. रामचेंद्रराव फडके वगैरें हजर होते. नंतर राव मवसूफ बरखास्त होऊन गेले. संध्येसमई कवालीचे गायेन यैकून भोजन केले. गंजिफा दाहा घटेका रात्रपर्यंत खेळून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकूरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस रामचंद्रराव फडके व गोविंदभट निदसुरे व बहिरोपंत मेंदल्यास बोलाऊन घेऊन दोन घटका बोलून रंगराव त्रिंबक आले त्यासी दोन घटका खिलवत केली. नंतर पंत माारनिले पुन्हा आस्तमानपर्यंत निदसुरे व मेंदले मजकुरासी खिलवत करून बहिरो आनंत पागेवाल्यास बोलाऊन घेऊन मल्हारजी होळकराचे पारपत्यास जाण्याविशी निरोप देऊन बेलबागात गेले. बागात संध्या करून देवदर्शन घेऊन च्यार घटका रात्रीस आपले हवेलीस गेले.

गोविंदराव कृष्णाकडील पत्र छ ११रोजची ते छ मजकुरी तिसरे प्रहरी बालाजीपंतास आली.

छ १८ रोज शुक्रवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजनसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. कागजावर दसखते करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून स्वारी सिध करायास सांगून चिंतामणराव फडके व

नारो नीलकंठ मुजमदार व जोत्याजीराव व मलोजीराव व संभाजीराव जाधव व धायेगोडे वगैरें सरदार व स्वार सातआठश व गाडदी वगैरें जमियत आणऊन राव मवसूफ तिसरे प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन दोनतीन घटका घोडी फेरून हरणाचे रमण्यात जाऊन हरणे नजीक आणऊन दाणे घालून अस्तमानपर्यंत तमाशा पाहून राव मवसूफ हाथीचे किलावियात स्वार होऊन दोन घटका रात्रीस हवेलीस जाऊन संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. चवसर खेळून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंत छ मजकुरी प्रातःकालीच आपले बागात जाऊन स्नान संध्यादिक करून बागातच भोजन केले. दोन प्रहर दिवसास हवेलीस आराम करायास गेले. तिसरे प्रहरी रामचंद्रराव फडके व गोविंदभट निदसुरेस बोलाऊन घेऊन हरिपंताकडील व गोविदराव कृष्णाकडील पत्राचे जवाब घटका रात्रपर्यंत लिहून पत्रें रवाने करून पंत माारनिले बेलबागात जाऊन देवदर्शन घेऊन आपले हवेलीस गेले.

माहदजी सिंद्याकडील छ १ माहे शाबानची पत्रें छ मजकुरी तिसरे प्रहरी बालाजीपंतास आली.

छ १९ रोज शनिवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्यादिक व भोजन करून आराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून चिंतामणराव फडके व नारोपंत मुजमदार व जोत्याजीराव व मलोजीराव व संभाजीराव जाधव वगैरें सरदार व स्वार आणविले. परंतु स्वारीस न जाता च्यार घटका कागजावर दसखते करून तीरंदाजी केली. रामचंद्र सिवाजी किलेदार सोलापूर-वाल्यासी दोन घटका बोलून रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन करून आराम करायास महालात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस चिंता-मणराव फडके व बहिरोपंत मेंदल्यास बोलाऊन घेऊन दोन घटका-बोलून रामचंद्र सिवाजी किलेदार सोलापूरवाल्यासी दोनतीन

घटका खिलवत करून किलेदार मजकुरास सोलापूरास जावयाकरिता निरोप देऊन गोविंदभट निदसुरेस बोलाऊन घेऊन दोन घटका बोलून बेलबागात जाऊन देवदर्शन घेऊन हवेलीस गेले.

बहिरो आनंत पागेवाल्यास छ मजकुरी बालाजीपंतानी मल्हारजी होलकराचे पारपत्याकरिता पुण्याहून रवाने केले. पागेवाले मजकूर वाघोलीचे मुकामास गेले. तेथून दरकूच पैठणास जाणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

A. R. No. 209

१७ रमजान १२०५ हिजरी
२० मे १७९१

श्री

पोष्य बळवंतराव नागनाथ सांा नमस्कार. विज्ञापना जे येथील वर्तमान तााा छ १७ माहे रमजान वैशाख वद्य चतुर्थी मंदवासरपर्यंत वास्तव्य पुणें येथे स्वामीचे कृपेकरून स्वस्थ जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ११ माहे मजकुरी सरकारचे डांकेवर हुजूर आर्जी व आखबार व नवाब अजमलउमरा बाहादर व स्वामीचे सेवेसी विनतीपत्र पाठविलें ते पाऊन सविस्तार वर्तमान श्रुत जालें असेल. सांप्रत छ १७ रोजपर्यंत वर्तमान लिहून डांकेवर पत्राची रवानगी केली आहे. पत्रावलोकनी विस्तार वर्तमान ध्यानारूढ होईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणें हे विनती.

(दुसऱ्या पानावरील आरंभीचा मजकूर फाटला आहे)

वर मुकामात करून होते. साप्रत तेथून कूच छ २६ माहे शाबानी करून आजमेर व किसनगडचे दरम्यान मुकामांत करून राहिल्याचे वर्तमान राव पंतप्रधानास व बालाजीपंतास आलें.

तयेमूरशा बादशाकडील वकील माहदजी सिंद्याकडे आला होता,

त्यासमागमें सिदे मजकूर बादशास जवाहीर वगैरें रवाने करणार म्हणून पेशजी लिहिल आहें. त्याप्रमाणे सांप्रत जवाहीर व वस्त्रें व हाथी घोडा व तोफा रवान्या केल्याच वर्तमान राव पंतप्रधानास आलें.

हरिपंत हंडे आनताचे मुकामीहून इंगरेजाकडे छ २४ माह शाबानी कूच करून गेल्याची पत्रें राव पंतप्रधानास व बालाजीपंतास छ ४ माहे रमजानी आली.

छ ११ रोज रविवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजनसंमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. कागजावर दसखते करून अराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून स्वारी सिध करायास सांगून बाबूराव केशव व नारोपंत मुजमदार व सदासिव रघुनाथ व राघोपंत गोडबोले व साबाजी नाईक निंबांलकर वगैरें सरदार व स्वार च्यारपांचसे व गाडदी वगैरें जमीयत आणऊन राव मवसूफ तिसरे प्रहरी घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन दोनतीन घटका घोडी फेरून बोथाटचा खेळून हाथीचे किलावियात स्वार होऊन अस्तमानी हवेलीस जाऊन रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन करून अराम केला.

बालाजीपंतानी छ माारी तिसरे प्रहरी अपले हवेलीस रामचंद्रराव फडके व बहिरोपंत मेंहले व गोविंदभट निदसुरे व गोपाल भगवंत नायब मुनसीस बोलाऊन घेऊन आलाहिदा अलाहिदा बोलून च्यारपांच मकानी मुतसदी याचेथे शादी म्हणोन पंत माारनिलें गेले. वस्त्रें देऊन बेलबागात जाऊन देवदर्शन घेऊन अपले हवेलीस गेले. रात्रौ यशवंत नरसिंगराव पाग्याचे घरी नरसिव्हजयंतीचा उत्साहा. सबब प्रहर रात्रीस तेथे जाऊन हरिकथा दोनतीन घटका यैकून हवेलीस गेले. भवानराव घांटगे मलवडीकर यास राव पंतप्रधानानी हरीपंताकडे जावयाकरिता छ मजकुरी तिसरे प्रहरी रुखसत केले.

छ १२ रोज सोमवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्यादिक व भोजन करून अराम केला. अडीच प्रहर दिवसात

द्वितीये भोजन करून हरणे आणवून च्यार घटका तमाशा पाहून तीरंदाजी दोनतीन घटका केली. रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. गंजिफा खेळून अराम केला.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी अपले हवेलीस रामचंद्रराव फडके व गोविंदभट निदसुरे व बहिरोपंत मेंदल्यास बोलाऊन आणून आलाहिदा अलाहिदा खिलवत करून रामजी पाटील जाधव वकील निाा महादजी सिंद्यास बोलाऊन घेऊन सिंदेप्रकर्णीची खिलवत अस्तमानपर्यंत करून पंत माारनिले संध्येस उठून गेले.

छ १३ रोज मंगलवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून अराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सात मजली बंगल्यांत च्यार घटका बसून चवसर खेळून यैनेमाहलांत जाऊन तीरंदाजी दोनतीन घटका करून रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकिले. नंतर भोजन करून प्रहररात्रपर्यंत गंजिफा व चवसर खेळून आराम करायास माहलात गेले.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी अपले हवेलीस गोविंदभट निदसुरेस बोलाऊन घेऊन दोनतीन घटका खिलवत करून रामजी पाटील जाधव निाा माहदजी सिंद्यासी अस्तमानपर्यंत खिलवत जाली. नंतर पंत माारनिले संध्येस उठून गेले.

छ १४ रोज बुधवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तालीमखान्यात जाऊन तालमीचे कित्येक हुनर सिकून स्नानसंध्या देवपूजन व भोजन करून अराम केला. अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून स्वारी घोडी फेरायास जावयाकरिता सिध करून आणविली. इतकियात प्रजन्य आला म्हणून राव मवसुफानी स्वारी मवकूफ करऊन कागजावर दसखते केली. रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. गंजिफा खेळून अराम केला.

बालाजीपंत छ मजकुरी आपले हवेलीतच तिसरे प्रहरी बसून फडनविसी दसखते दोनतीन घटका कागजावर करून माहादाजीपंत जत्फते व विसाजी भिकाजी जकातदाराचेथे शादीचे मजलसीत जाऊन वस्त्रे देऊन बेलबागांत जाऊन देवदर्शन घेऊन आपले बागात गेले. रात्रौ बागातच भोजन करून बारा घटका रात्रपर्यंत तवाफाचा नाच पाहून हवेलीस गेले.

छ मजकुरी दिवसा व रात्री प्रजन्य अतिशये पडला. बिजली पडून पर्वतीस स्वामी कार्तिकाचे देवलाचा कलस पडला व देवल्यही भंग जाला.

छ १५ रोज गुरुवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन तालमीचे हुनेर सिकून स्नानसंध्या देवपूजनसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. कागजावर दसखते करून अराम केला अडीच प्रहर दिवसास द्वितीये भोजन करून सात मजली बंगल्यात बसून दुर्बिनीतून जंगलाची व पर्वतीची च्यार घटका सयर करून तीरंदाजी दोनतीन घटका केली. रात्रौ संध्येसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. चवसर खेळून अराम केला.

बालाजीपंतानी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस रामचंद्रराव फडकें व गोविंदभट निदसुरे व बहिरोपंत मेंदल्यास बोलाऊन घेऊन अस्तमानपर्यंत खिलवत करून पंत माारनिले बेलबागात जाऊन विष्णुदर्शन घेऊन घटका रात्रीस आपले हवेलीस गेले.

बालाजीपंत मुनसी वकील निाा गाइकवाड व गोपालराव वकील निाा फिरंगी गोवेकर छ मजकुरी तिसरे प्रहरी बालाजीपंताचे हवेलीस जाऊन पंत माारनिलेसी आलाहिदा आलाहिदा बोलून आपले मकानास गेले.

छ १६ रोज शुक्रवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसध्या देवपूजन करून भोजन केले. कागजावर दसखते करून

अराम केला. तिसरे प्रहरी चिंतामणराव फडके व नारो नीलकंठ मुजमदार व सदासिव रघुनाथ व साबाजी नाईक निंबालकर व जाधव वगैरें सरदार व स्वार सातआटश व गाडदी वगैरें जमियेत आणऊन राव मवसूफ घोड्यावर स्वार होऊन पर्वतीनजीक जाऊन दोनतीन घटका घोडी फेरून बोथाट्या खेळून हाथी आणऊन फटेकड्यावर घालऊन दोन घटका तमाशा पाहून हाथीचे किलावियात स्वार होऊन घटका दिवस राहता हवेलीस जाऊन रात्रौ संध्या व भोजन करून कवालाचे गायेन यैकून अरामास माहालात गेले.

बालाजीपंतांनी छ मजकुरी तिसरे प्रहरी आपले हवेलीस रामचंद्रराव फडके व बहिरोपंत मेंदल्यास बोलाऊन आणऊन अस्तमानपर्यंत खिलवत करून पंत माारनिले रामचंद्र नाईक पराजपे याचे घरी लग्न म्हणून तेथे जाऊन पराजपे मजकुरास वस्त्रें देऊन बेलबागात गेले. विष्णुदर्शन घेऊन दोन घटका रात्रीस आपले हवेलीस गेले.

भवानी शंकर पंत राजआज्ञा लग्न म्हणून बालाजीपंताचे हवेलीस जाऊन पंत माारनिलेस आक्षद देऊन गेले.

छ १७ रोज शेनिवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसध्या व देवपूजन करून भोजन केले. कागजावर दसखते करून अराम केला. अडीच प्रहर दिवसास बालाजीपंतास दरबारास यण्याविशी सूचना केली होती. त्याप्रमाणे पंत माारनिले राव पंतप्रधानाचें हवेलीस जाऊन थोरले चौकातील चापेखणात च्यार घटका बसून दिवाणी फडनविसी दसखते कागजावर करून राव मवसूफ यैनेमहालांत बसले होते तेथे जाऊन अस्तमानपर्यंत खिलवत जाली. उपरांतिक राव पंतप्रधान बरखास्त होऊन गेले.

(अपूर्ण)

A. R. No. 210

५ मोहरम १२०६ हिजरी
४ सप्टेंबर १७९१

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल तागाईत छ ५ माहे मोहरम मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ १ माहे मजकूर रोज गुरुवार त्रितीये प्रहर दिवसा अखबार पत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान. मागील प्रहर दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस याचे येथे सर्वत्र आले होते. मागाहून रा॥ गोविंदभट निरचेऊर व बहिरो रघुनाथ मेहेदले आल्यावर उभयेता व मदारुलमहाम या त्रिवर्गाचे खिलवत मसलतसमंधी वगैरे मागील च्यार घटिका दिवसापासोन ते पाच घटिका रात्रपावेतो जाले. उपरांत निरचेऊर आदिकरून आपलाले घरास गेले आणि प्रहरा रात्रीस मदारुलमहाम आपले येथून निघाले ते बेलबागात जाऊन तेथून परभारा रा॥ बलवंतराव घोठोलेकर याचे घरी गेले. दोन घटिकापर्यंत कीर्तन श्रवण केल्यावर माघारा निघाले ते दीढा प्रहरा रात्रीस आपले घरास आले. सरकारवाड्यात त्रितीये प्रहरापासोन च्यार घटिका नाच जाला. नंतर दो घटिका रात्रीस कीर्तनास आरंभ होऊन दाहा घटिका रात्री समाप्ती जाली. यैसे प्रतिपदेपासोन नित्यशा होत आहे. श्रुत होय. छ २ रोज शुकुरवारी भाद्रपद शु॥ ४ स श्रीगणपतीचे उछाहाचा दिवस. त्यास श्रीमंताचे वाड्यात सर्व साहित्याची सिध्धता जाली. दीढा प्रहरा मृत्तिकेचे गणपतीची स्थापना होऊन पूज्याअर्च्या मोठ्या गजेर करून जाली. वीसपंचवीस तोफेचे बार जाले व गारद्याच्या सिलका वगैरे जाल्या. या प्रा॥ राजश्री नाना फडनवीस याचे येथे व राजश्री दाजीबा फडके याचे येथे पूज्याविधी येथास्थित जाली. त्रितीये प्रहरी श्रीमंत आपले वाड्यातून निघाले ते राजश्री नाना फडनवीस याचे वाड्यात

आले. श्री (गण)पतीचे दर्शण घेऊन अैनेमाहालात दोन घटिका बैठक जाली. मदारुलमहाम याणी श्रीमंतास पोशाक हिरवा बऱ्हानपुरी दिल्हा. अतर पानदान व सर्वास विडे व फुलांचे हार व गजरे यैसे दिल्हें. यावर श्रीमंत तेथून निघाले ते आइतवार पेठेत राजश्री दाजीबा फडके याचे हावेलीस गेले. मदारुलमाहाम समागमेच होते. तेथे देवदर्शण जाल्यावर येक घटिका स्थिर जाले. तेव्हा फडके मजकूर याणी श्रीमंतास कुसंबी पोशाक दिल्हां. आतर पानदान इत्यादिक मुदारतीचें साहित्यं सर्वास पावल्यावर, श्रीमंत तेथून निघाले ते कसब्यात श्री गणपतीचे देवाल्ये आहे त्याचे दर्शणास येऊन, नंतर तैसेच आपले वाड्यात माघारा गेले. राजश्री नाना फडनवीस व दाजीबा फडके आदिकरून सर्वत्र सरदार सरकारवाड्यात येऊन गणपतीचे दिवानखान्यात श्रीमंत जाऊन बसल्यावर नाच व गायेंनादिक तीन घटिकापर्येंत जाले. नंतर सर्वास विडे दिल्हयावर मदारुलमहाम वगैरे आज्ञा घेऊन निघाले ते आपलाले घरास माघारा आले. रात्रौ श्रीमंताचे वाड्यात व मदारुलमहाम व दाजीबा फडके वगैरे याचे घरी कीर्तन जाले. घासीराम कोतवाल मेला. गेला. त्याचे कलेवर गारपीरापलीकडे दोन दिवस तैसेच पडले होते. आग्निसंस्कार जाला नाही तेव्हा सरकारची परवानगी मोठ्या रदबदली करून जाली. पाच मन लाकडे देविंली.

२

माारनिलेचा मेहुना वगैरे पाचसात जने जाऊन घासीरामाचे शरीर आग्नीत घातले. माारनिलेची स्त्री व दोघे पुत्र व सुना व मेहुने व कारकून व दिवान कारभारी व जागादार व प्यादे यैसे दरोबस्त कैद केले आहेत. त्यात दोघे पुत्राचे व दिवान कारभारी वगैरे जे जे अग्रसर का(मा)काजात होते त्याचे पायांत शंकळा घातल्या. (घरास) तोडा पेशजीच जाला आहे. त्याची आता मौजुदाद व द(रो)बस्त चौकसी होत आहे. चौकसीचे आंन्वये जे जे ठिकानी पडेल तेथवर सरकारात जप्त होईल. तूर्त कोतवालीचे कामाची देखरेख राा राघो विस्वनाथ गोडबोले याजकडे सागितली आहे.

पुढे निवल जाल्यावर कोण्हाकडे निश्चंये होऊन कामकाज सागतील ते पाहावे. घासीराम याचे अविच्यार वर्तनुकीचा विच्यार केवलच अघटित होता. त्याचा विस्तार आता सर्वास जाहिरा समजल्यात येऊ लागला. पापाचरण अतिषयेसी केले. ते आजपर्यंत लोटले गेले. सेवटी उघड जाले तेव्हा माारनिलेचे कोठे ठिकान राहिले नाहीं. चौकसी होत आहे. साद्यंत पकेपणे ध्यानास आल्यावर सेवेसी लेखण केले जाईल. तळघरात चौतीसा ब्रांम्हणापैकी बारा ब्रांम्हण सजीव राहिले होते. त्यात पाच ब्रांम्हण व येक ब्रांम्हण स्त्री यैसी साहाजने मेली. येकूण पहिले व हालीचे मिलोन सतावीस जीव मृत्य पावले. आणखी काये होईल ते न कले. श्रुत होये. छ ३ रोज शनवारी मागील प्रहर दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस आपले येथून निघाले ते सरकारवाडचात गेले. आर्शेमाहालात येक घटिका बसोन कागदापत्रावर तेरखा वगैरे केल्या तो श्रीमंत तेथे आले. तैसेच बंगल्यावर गेले. मदारुलमहामही तेथे जाऊन अर्ध घटिका उभयेताचे खिलवत जाले. नंतर श्रीमंत व रोा नाना फडनवीस गणपतीचे दिवानखान्यात आले. नाचाची शुरवात जाली होती. त्यास राजश्री महाराव निंबालकर व व्यंकटराव घोरपडे व खंडेराव वोढेकर व रामजी पाटील जाधव वकील निाा सिंदे व पानसे व खासगीवाले व यादोराव मोरेश्वर आदिकरून सरदार मानकरी व मुत्सदी व दरकदार व सुभे यैसे बोलाविले होते. सांप्रदाया प्रोा दस्तूरच्या यादी सालाबांद नावनिसीवार जाऊन त्या प्रोा सर्वत्र बोलावण्याचे आंन्वये येतात. त्यास सदरहू प्रोा तेथे आले होते. च्यार घटिका नाच जाला. आतर पानदान व विडे सर्वास दिल्हे. नंतर मागील दोन घटिका दिवस शेष राहाता निंबालकर आदिकरून आपलाले घरास गेले. मदारुलमहाम आपले वाडचांत आल्यावर वोा रोा गोविंदभट निरचेऊर यासी बोलाऊन साइंकालपर्यंत त्यासी भाषण केले. नंतर सहा घटिका रात्रीस राजश्री नाना फडनवीस आपले येथोन निघोन राजश्री दाजीबा फडके याचे येथे कथा श्रवण करावयांकरिता गेलें. दोन घटिका

नंतर माघारा निघाले ते आपले घरास आले. श्रुत होये. छ ४ रोज रविवारी प्राथःकाली श्रीमंताची स्वारी आपले वाडयातून निघोन मौजे भामरडयास गेले. शामसुंदर हाती मस्त तेथे बांधविला आहे. त्याजला सोडऊन त्याचे माहोताकडौन त्या हाती फेरविले. नंतर श्रीमंताणी दोन घटिका तेथे घोडी फेरून माघारा निघाले. ते प्रहरा दिवसा आपले वाडयात येऊन दाखल जाले. त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे येथे सर्वत्र आले. रो बहिरोपंत मेहेदले येऊन त्यांसी दोन घटिका खिलवत जाले. उपरांत राजश्री नाना आपले येथून (निघोन) सरकारवाडयात गेले ते आर्शेमाहालात अर्ध घटिका बसोन कागदपत्र जरुरियात केले. श्रीमंतही तेथे आले होते तो तसेच बंगल्यावर जाऊन श्रीमंत व मदारुलमहाम याचें भाषण होत होते. रो मानाजी सिंदे फाकडे याजला राजश्री दाजीबा फडके याणी आपले येथून बोलाऊ पाठविले की नाचास यावे. यैसियासी सिंदे मजकूर

३

याचे समजल्यात आले की सरकारवाडयातील बोलावणे आहे. सबब सिंदे माार वाडयात येऊन आर्शेमाहालात आले. हे वर्तमान विदित जाल्यावर श्रीमंत व मदारुलमहाम बंगल्यावरून तेथे आले. सिंदे माार यासी भाषण वरचेवर जाले. नंतर आतर पानदान दिल्हे. ते घेऊन रा मानाजी फाकडे माघारा आज्ञा घेऊन निघाले ते फडके माार याचे येथे येऊन नंतर आपले ठिकानास भवानी पेठेत गेले. श्रीमंत व रा नाना मागती बगल्यावर जाऊन येक घटिका बोलणे जाले. रोज माारी पंडित व शास्त्री यास बोलाविले होते. त्याजकडून ते समस्त येऊन गणपतीचे दिवानखाण्यात सभा जाली. तेथे श्रीमंत व मदारुलमहाम गेले. च्यार घटिकापर्यंत नाच जाला. सर्वास सुगंध द्रव्ये येथास्थित देऊन नंतर श्रीमंत उठौन देवग्रहात गेले. आणि राजश्री नाना आपले घरास आले तो बहिरोपंत मेहेदले व गोविंदभट निरचेऊर बसलेच होते. त्यासी बोलणे साइंकालपर्यंत होऊन सर्वत्र माघारा गेले. राजश्री

मल्हारराव होलकर छ २ माहे माार रोज शुकुरवारी वाफगावीहून बाहेर येऊन राजश्री रंगराव त्रिंबक राजेबहादर यासी भेटले. रा॥ भगवंतराव बलाल दिवान पूर्वीच लस्करात आला होता. होलकर मजकूर आल्यावर इथःपर येथे यावे. त्यांसी सिंदी वगैरे गारद होलकरापासी चाकर आहे. त्याणी आपले तलबेकरिता गौगंवा केलां. हे वर्तमान सविस्तर राजेबहादर याणी येथे लेहून पाठविले. त्याचे उतर गेले की गारदी वगैरे याचा हिसेब करून तुम्हीं हावाला घ्यावा. त्याजवरून हिसेब होत आहे. काही यैवजही येथून रंगरावजीकडे रवाना जाला. काल छ ३ रोज शनवारी होलकर माार 'यास रंगराव याणी मेजमानी केली. येका दो दिवसात सिबंदीचे लोकाचा निकाल पडल्यावर होलकर याजला घेऊन रंगराव वगैरे फौज येथे सत्वरच येणार. होलकर रंगरावजीचे लस्कराजवलच उतरले आहेत. वाफगावी बज्याबा वगैरे दोन-तीनसें स्वार ठेविले आहेत. या प्रो॥ होलकराकडील वर्तमान आहे. घासीराम कोतवाल याचा भाऊ शहर अवरंगाबादेस होता. तो काल येथे आला. त्याजलाही कैद केले. नित्यशा माारनिलेचे वस्तभाव वगैरेची चौकसी होत आहे. साठ हाजार रुपये हाली सिका व चालीस हाजार रुपये सिका चादवड व च्यार हाजार मोहोरा यासिवाये सोणे व रुपे याचे डागिने व बाहेर सावकाऱ्यात वगैरे अमानती या प्रो॥ माारनिलेचे येथे निघाले. आणखी शोध कर्ता काये काये जे ठिकानी लागेल ते न कले. कंण्यागत समाप्त होत आला यास्तव कृष्णांश्नानास श्रीमंत जातात. द्वादसीसह त्रयोदसी रोज शुकुरवारचे मुहूर्त आहे. राजश्री नाना फडनवीस हेही स्वारी-बराबर जाणार म्हणौन वर्तमान आहे. येक वर्तमान की श्रीमंतच जातात, मदारुलमहाम तूर्त जात नाहीत. यैसी दोण्हीही वर्तमाने आहेत. याचा निश्चंये अद्यापि जाला नाही. आजउद्यात सिध्धांत जाल्यावर ध्यानास येईल. सारांष, स्वारी कृष्णांश्नानास जात आहे यात गुंता नाही. पुढे आस्विन मासी पोर्णिमेस चंद्र-ग्रहण आहे. हेही संध्धी आहे. स्वारी मास पक्ष बाहेर राहून

कृष्णांश्नान व धुम महाबळेश्वर इत्यादिक देवदर्शण करावयास जाणार यैसी वदंता दाट आहे. रोज माारी च्यार घटिका रात्रीस श्रीमंत आपले वाड्यातून निघाले ते राजश्री दाजीबा फडके याचे येथे गेले. मागाहून मदारुलमहाम बेलबाग करून तेथे आले. तीन घटिकापर्यंत बैठक होऊन कीर्तन श्रवण केले. नंतर आतर पानदान घेऊन तेथून श्रीमंत माघारा निघाले ते सात घटिका रात्र होता आपले वाड्यात आले. उपरांत वाड्यातील कीर्तनाची समाप्ती जाली. मदारुलमहाम फडके याचे येथून निघोन राा नारो नीलकंठ मजमदार व जिवबा चिटणीस व दादा गद्रे याचे येथे जाऊन कीर्तन श्रवणानंतर अकरा घटिका रात्रीस आपले घरास माघारा आले. श्रुत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 211

१० जमादिलावल १२०६ हिजरी
५ जानेवारी १७९२

श्री

पोष्य बळवंतराव नागनाथ सां नमस्कार. विज्ञापना जे येथील वर्तमान तााा छ १० माहे जााावल पौष्य शुध द्वादसी गुरुवासरपर्यंत वास्तव्य पुणें येथे स्वामीचे कृपेकरून स्वस्थ जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पूर्वी छ ४ माहे माारी सरकारचे डांकेवर हुजूर आर्जी आखबार व नवाब आजमलउमरा बाहादर स्वामीचे सेवेसी विनतीपत्र पाठविले ते पाऊन ते सविस्तार वर्तमान श्रुत जालें आसेल. सांप्रत छ १० रोजपर्यंत वर्तमान लिहून सांप्रदायाप्रमाणें पत्राची रवानगी केली आहे. पत्रावलोकनी विस्तार वर्तमान ध्यानारूढ होईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

A. R. No. 212 १ जमादिलाखर १२०६ हिजरी
२६ जानेवारी १७९२

पैा छ १३ जाखर

श्रीनिवास

श्रीमंत राजश्री राज्याजी स्वामीचे सेवेसी

पो हायेपतीराये गोपाल सां नमस्कार. विनंती उपरी यथील कुशल माघ शुध्ध ३ त्रितीया छ १ जमादिसानी गुरुवार यथास्थित जाणौन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष चिरंजीव राजश्री राजे रघोत्तमरायेदादा याची पत्रं पानगलीहून चिरंजीव राजश्री मारायेणरायबापू याजकडें दुर्गास पां तें पत्र बापूनी खेडास पाठविलीं. त्या पत्राचें प्रत्योत्तर चिरंजीव राजश्रीचे नावे लिफाफा करोन पाठविला आहे. कृपा करोन सरकारचे डाके बोार रवाणा करोन द्यावा. पूर्वी मदनूरचे मार्ग चिरंजीव राजश्रीचे नांवचं पत्र लिफाफा आपले सेवेसी पाठविला होता तो चिरजीवाकडं रवाना जाहला असेल. बहुत काय लिहिणं, कृपावृधी करावी हे विनती.

A. R. No. 213 २ रजब १२०६ हिजरी
२५ फेब्रुवारी १७९२

श्री

विनंती विज्ञापना अैसी जे येथील कुशल तागाईत छ २ माहे रजब मुकाम पुणे स्वामीचे कृपावलोकणेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत असिले पाहिजे. विशष येथील वर्तमान छ २८ माहे जमादिलाखर रोज बुधवारी प्रथम प्रहर दिवसा आख-बारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे येथे राा सदासिव दिनकर वकील आले होते. त्याणी राजश्री नानासी दोन घटिका भाषण केले. नंतर मामलत-आजमास वगैरे कागदपत्र अवलोकण होऊन राजश्री दाजीबा फडके संमधी दरकदार दफ्तरचे व मामलतदार येऊन दोन घटिका माहलचे

याचे व मदारुलमहाम याचे खिलवत सांइकालपर्यंत होऊन सर्वत्र आपलाले घरास गेले. प्रहरा रात्रीस मदारुलमहाम आपले येथून निघाले ते रा बापू मोघे याचे घरी कीर्तन श्रवणास गेले होते ते आकरा घटिका रात्रीस माघारे आपले येथे आले. रोज मारी मागील पाच घटिका दिवस शेष राहाता श्रीमंत रमन्यात गेले होते. ते दो घटिका रात्रीस माघारे आपले वाडचात येऊन दाखल जाले. श्रुत होये. छ २९ माहे जाखर रोज गुरुवारी मागील प्रहर दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस निद्रा करून उठिले ते बेलबागात जाऊन देवदर्शण करून आपले घरास आले. मुत्सदी व दरकदार आदिकरून सर्वत्र मदारुल-महाम याचे वाडचात आलें होते. राजश्री व्यंकटराव घोरपडे येऊन राजश्री नानासी भाषण करून वरचेवर माघारे गेले. नंतर मदारुल-महाम याणी कागदपत्र दोन घटिका केले. यावर मागील तीन घटिका दिवस शेष राहाता पानगलची डाक आली होती ते पत्रे रा आपाजी कोंडाजी याणी आणौन दिल्हचावर मदारुलमहाम याणी ते पत्रे वाचून उपरांत रा बहिरोपंत मेहेदले यासी बोलणे तीन घटिका-पर्यंत होऊन घटिका रात्रीस सर्वत्र माघारे गेले. श्रुत होये. छ १ माहे रजब रोज शुकुरवारी आंमृतसिध्धीयौगावर राजश्री नाना फडनवीस याचे कनिष्ट स्त्रीचे फलशोभन जाहाले. स्त्रीस रज्योदर्शण जाल्यास तो दिवसगत जाले परंतु रुतुशांती केली नाही. कारण की वो राजश्री शंकर जोसी राजश्री नाना फडनवीस याजपासी आहेत. ते ज्योतिषविद्येत बहुत निपुन आहेत. त्याणी नेम सागितला होता त्या प्रो शांतीचा विधी करावा यैसे होते. सांप्रत महूर्ताची संध्धी जोसी मार याचे विच्यारास आली आणि रुतूचा योगही घडून आला म्हणौन कालपूर्व दिवसी

२

शांतीचे हावण मात्र केले आणि आज गर्भाधानविधीचा निश्चये जाला होता त्या प्रो प्रथम प्रहर दिवसात फलशोभन जाले. राजश्री दाजीबा फडके व बाबूराव केशव व दांदा गजरे व मेहेदले

आदिकरून सर्वत्र विधीप्रसंगाचे समई आले होते. सर्वही आहेर आणिले होते. परंतु राजश्री नाना फडनवीस याणी आपले श्वशुराचा आहेर मात्र घेतला. वरकड आणखी कोणाचा आहेर येकरूप घेतलाच नाही. राजश्री दाजीबा फडके वगैरे याणी विच्यारून पाहिले. परंतु नकाराचेंच उतर जाले. आठदाहा घटिकापर्यंत शांतीचा समारंभ येथास्थित जाल्यावर सर्वत्रास विडे दिल्हें. नंतर फडके आदिकरून आपलाले घरास गेले. त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे वाडयात मुत्सदी व दरकदार व सुभे मामलतदार आले होते. राजश्री रंगराव त्रिंबकराव राजे बहादुर आले होते. त्यासी येक घटिका भाषण जाल्यावर बाहादर माार माघारे गेले. नंतर काही कागदपत्र तेरखा वगैरे करून दिल्हे. उपरांत मागील च्यार घटिका दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस आपले येथून निघाले ते सरकारवाडयात जाऊन आर्शेमाहालाचे बंगल्यावर गेले. श्रीमंत तेथेच होते तेव्हा मदारुल याणी श्रीमंतासी अर्ध घटिका वरचेवर भाषण केले तो रमन्यात स्वारी जावयाची सिध्धता जाली होती तेव्हा तीन घटिका दिवस शेष राहाता श्रीमंत बंगल्यावरून उतरोन आपले वाडयाबाहेर निघाले ते रमन्यात गेले आणि मदारुलमहाम तेथून आपले घरास आले तो राा माहादाजीपंत काले, कारभारी दिा सुभा वसई, प्रांत कोकण, याजला बोलाऊन रत्नगिरी तालोक्याचे तफावतीचे बोंलणे आस्तमितपर्यंत जाले व किरकोली लोकाची बोलणीं जरूरयातीची होणे होती तेही थोंडीबहुत जाहाली. सांइंकाली सर्वत्र माघारे आपलाले घरास गेले ते राजश्री माहादजी सिंदे उज्येनीहून तीसा कोसावर होते ते बारापंधरा कोस देवाशास आले. तेथे रा कृष्णाजी पवार याचे घरी मेजमानी होणार. नंतर मजल दर मजल पुढे येऊन हुताशणी बऱ्हानपूरचे शुमारास करतील. महेश्वरावरून आंहिल्याबाईची भेट घेऊन येणार. येक वर्तमान की परभाराच येणार. मग पाहावे कोणत्या मार्गे येतात. दक्षणेकडील वर्तमान राजश्री परशराम रामचंद्र कूच करून पटनाकडे आले. बीसा कोसाचा तफावत राजश्री हरिपंततात्यासी राहिला होता म्हणौन पत्रे आली होती. श्रुत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान

ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव कृपा करून आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काये लिहिणे, कृपालोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 214

९ रजब १२०६ हिजरी
३ मार्च १७९२

श्री

विनंती विज्ञापना अैसी जे येथील कुशल तागाईत छ ९ माहे रजब मुकाम पुणे स्वामीचे कृपावकनेकरून येथास्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २ माहे मजकूर रोज शनवारी प्रथम प्रहर दिवसा आखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान त्रितीय प्रहरी मदारुलमहाम याचे वाडचात राजश्री बाबा फडके व बाबूराव केशव आदिकरून मुत्सदी व दरकदार वगैरे आले होते. दोन घटिका दफ्तरचे कामकाज जाल्यावर छ २५ माहे जमादिलाखरची पानगलची डाकेची पत्रे आली ते मदारुलमहाम याणी वाचून पाहिल्यानंतर रा बहिरो रघुनाथ मेहेदले याजला बोलाऊन आस्तमितपर्यंत मसलतप्रकर्णी खिलवत करून सांइंकाली राजश्री नाना बेलबागात जाऊन दो घटिका रात्रीस माघारे आपले घरास आले. पत्राचा भाव ध्यानास आला की पटनावर छ १० माहे जाखरीस टिपूसी व आपले फौजेसी लढाई मातबर जाली. टिपूने सिकस्त खाऊन मागे निघोन गेला. पटनानजीक बातेऱ्या होत्या त्या आपले फौजेने घेऊन तेथे मोरचे कायम केले. या प्रो वर्तमान पानगलास आले. खुसीच्या तोफा जाल्या. ईस्वरसतेकरून शत्रूचे पारपत्य लौकरच व्हावे यैसे वर्तमान आले. परंतु राजश्री हरिपंत फडके याची पत्रे आद्यापि आली नाहीत. श्रुत होये. छ ३ रोज रविवारी राजश्री नाना फडनवीस बंगल्याचे बागात प्राथकालीच भोजनास गेले. स्नानसंध्यादि

तेथेच करून दीढा प्रहरा भोजने जाली. पानदान विडे घेऊन माघारें येताना बेलबाग करून दो प्रहरा आपले घरास आले. त्रितीये प्रहरी राजश्री नाना आपले यथून निघाले ते सरकारवाडयात गेले. ते आर्शे-माहालाचे बंगल्यावर गेले. तेथे राजश्री बालाजीपंत ढेकने दिाा रास्ते याजला बोलाऊन दोन घटिका त्यासी बोलणे जाले. श्रीमंताची स्वारी कृष्णांस्नानास वांईस गेली होती. तेसमई रास्ते याणी दोन लक्ष रुपये नजर द्यावयाचे भाषणात आणिले आहे. तेविसीचे माारनिलेसी बोलोन माघारे माारनिले गेले. उपरांत राा बहिरोपंत मेहेंदले व राघो विस्व-नाथ गोडबोले यांसी आस्तमितपावेतो खिलवत होऊन मदारुलमहाम साइंकाली आपले घरास आले. मागील पाच घटि दिवस राहाता श्रीमंत रमन्यात गेले होते. घोडी फिरविल्यावर हातीचा तमाशा दोन घटिका पाहिला. नंतर तेथून स्वारी माघारे निघोन दो घटिका रात्रीस आपले वाडयात आले. शृत होये. छ ४ रोज सोमवारी श्रीबनेश्वर माहादेव येथून बारा कोस आहे त्याचे दर्शणास श्रीमंताची स्वारी जावयाची रोज माारचा नेम जाला होता. त्याजवरून डेरे राहुटचा वगैरे सरंजाम काल पूर्व दिवसी येथून रवाना होऊन तेथे तरतूत जाली. हाती व रथ व घोडी याच्या डाका जागा जागा बसविल्या की आजच स्वारी तेथे जाऊन माघारे यावे म्हणौन मागील प्रहर साहा घटिका रात्रीपासोन स्वारीची तयारी

२

जाली. च्यार घटिका रात्र शेष राहाता श्रीमंत आपलें (वा) डयातून निघोन आंबारीत स्वार जाले. खवासीत राा दाजीबा फडके होते. राजश्री नारो नीलकंठ मजमदार व त्रिंबकराव चिटणीस व सदासिव रघुनाथ गजरे व व्यंकटराव घोरपडे व व्यंकटराव रास्ते व पेठे व पानसे आदिकरून मुत्सदी व सरदार सरंजामी मिलोन दोनतीन हाजार स्वार व दोन हाजार गारद वगैरे सरंजाम स्वारीबराबर होता. कातरजचे घाठाने स्वारी जाऊन साहा घटिका दिवस येता श्रीमंत बनेश्वरी दाखल जाले. तेथे स्नानसंध्या जाल्यावर दीढा प्रहरा भोजने

जाली. मुत्सदी व दरकदार व मानकरी मन्हाटे सरदार पंचवीस चालीस येकूण शंभर पात्र भोजनास जाले. नंतर पानदान विडे सर्वास दिल्हे. दोन घटि बैठक होऊन दो प्रहरा श्रीमंत तेथून माघारे निघाले ते डाकेवर हाती व रथ व घोडे स्वारीस ठेविले होते त्याजवर बसोन कातरजचे तल्यावर आले. तेथे बागात द्वितीये समईचे भोजन त्रितीये प्रहरी जाले. तल्याचा तमासा पाहिला. उपरांत आंबारीत बसोन निघाले ते मागील तीन घटिका दिवस शेष राहाता श्रीमंत आपले वाड्यात येऊन दाखल जाले. श्रीबनेश्वर माहादेव याजपासी श्रीमंताणी येक मोहोर व येक श्रीफळ ठेविले. मदारुलमहाम येथेच होते. त्रितीये प्रहरी राजश्री नाना फडनवीस याचे वाड्यात सर्वत्र आले होते. कागदापत्रावर तेरखा वगैरे कामकाज होऊन मागील च्यार घटिका दिवस राहाता मदारुलमहाम आपले घरीहून निघाले ते सदासिव पेठेत राजश्री सदासिवभट दांत्ये याचे येथे लग्नाचे मेजमानीस गेले. दांत्ये माार याणी राजश्री नानास बऱ्हानपुरी आबासी रंगाचा पोशाक दिल्हा. नाच जाला. आतर पानदान घेऊन निघाले ते व्यंकटराव दाभोलकर याचे घरी मेजमानीस आले. तेथे माारनिलेनी मदारुलमहाम यांस केशरी पोशाक दिल्हां. आतर पानदान जाल्यावर माघारे निघाले ते आपले नवे वाड्यात येऊन तेथे संध्या केली. उपरांत बेलबागात देवदर्शण घेऊन निघाले ते घटिका रात्र होता आपले वाड्यात आलें. शृत होये. छ ५ रोज मंगलवारी मागील साहा घटिका दिवस शेष राहाता मदारुलमहाम याचे वाड्यात मिस्तर मालिट वकील व दुसरा मेस्तर असामी येक व नुरदी हुसेनखा दुभासिया वगैरे आले. कारण की छ १० माहे जाखरची लढाई पटनावर जाल्याची पत्रे इंग्रेजाची आली सबब वकील माार पत्रे घेऊन वर्तमान सागावयासी आले. मदारुलमहाम यास पत्राचे वर्तमान निवेदन केले. उपरांत मदारुलमहाम व बहिरोपंत मेहेदले व मेस्तर माार व दुभासिया यैसे बसोन च्यार घटिकापर्यंत मसलतप्रकर्णी खिलवत जाले. यावर मागील दोन घटिका दिवस शेष राहाता वकील माार वगैरे माघारे निघोन आपले ठिकानास गेले. उपरांत राजश्री नाना फडनवीस आपले येथून निघाले ते राा बालाजी हरी भिडे याचे येथे

मेजमानीस गेले. भिडे माार याणी मदारुलमहाम यांस आंबासी पोशाक दिल्हा. येक घटिका नाच जाला. आतर पानदान घेऊन माघारे निघाले ते बेलबागात येऊन देवदर्शण घेतलें आणि घटिका रात्र जाली तो आपले घरास आले. पाचा घटिका रात्रीस भोजन जाले. उपरांत साहावीचें आमलात मदारुलमहाम मागती आपले येथून निघाले ते राजश्री बापूजी बलाल लेले, फडचे सरदफ्तरदार याचे घरी लग्न माारनिलेचेच पेशजी जाले आहे सबब त्याचे

३

येथे मेजमानीस गेले. लेले मजकूर याणी मदारुलमहाम यास कंदी पोशाक दिल्हा व वो राजश्री गोविंदभट निरचेऊर यास सेला पागोटे दिल्हे. नाच दोन घटिका जाला. अतर पानदान घेऊन माघारे निघाले ते नव घटिका रात्रीस आपले वाड्यात आले. शृत होये. छ६ रोज बुधवारी मागील सात घटिका दिवस राहाता राजश्री नाना फडनवीस आपले येथून निघोन सरकारवाड्यात गेले. रोज माारी मिस्तर मालिट वकील निाा इंग्रेज कलकतेकर याचे येण्याचा निश्चय ठैरला होता. त्याजवरून गणपतीचे दिवानखान्यात बैठक जाली. मदारुलमहाम तेथे गेले. रोा बहिरो रघुनाथ मेहेदले व जरूरियात मंडली दरकदार वगैरे तेथे आले. यावर पाच घटिका दिवस शेष राहाता मिस्तर मालिट वकील व च्यार असामी मिस्तर आणखी व नुरदी हुसेनखा वगैरे यैसे दिवानखान्यात आले. तेव्हा मदारुलमहाम यासी व वकील माार व दुभासिया व मेहेदले यासी दक्षण प्रांती छ १० माहे जाखरीस लढाई जाली तेविसीचे बोलणे होत आहे तो श्रीमंत तेथे आले. लढाई जाल्याची पत्रे इंग्रेजाची आली होती. त्याचे वर्तमान वकील माार याणे श्रीमंतास विदित केले. चौदावे तेरखीस लालबाग घेतला. पटनाजवल बातेऱ्या होत्या त्या घेऊन आपले मोरचे पटनास लागू जाले. टिपूची सिकस्त जाली. मागे हाटून गेला म्हणौन आपल्याकडील फते जाल्याचें वर्तमान आले ते श्रीमंतास वकील माराणे निवेदन केले. त्याजवरून इंग्रेजाचे वकीलाची खातरपाश, सबब पंनास तोफा खुसीच्या सोडावयाची परवानगी

जाली. आज्ञे प्राा पानसे याणी सदरहू पंनास तोफा सोडिल्या. दोन घटिका वकील याची बैठक जाली. आतर पानदान दिल्हचावर माार-निले रुकसत घेऊन आपले ठिकानास माघारे गेला. स्वारी रमन्यात जावयाची तंयारी जाली होती. मागील तीन घटिका दिवस शेष राहाता श्रीमंत रमन्यात गेले होते ते दोन घटिका रात्रीस माघारे येऊन आपले वाडचात दाखल जाले. मदारुलमहाम सरकारवाडचातून निघाले ते गावातील ग्रहस्त मंडली राजश्री कृष्णाजी भयेराव थते वगैरे याचे साहा सात घरास जाऊन लग्नाचे आहेर केले आणि बेलबागात येऊन दो घटिका रात्रीस आपले घरास माघारे आले. कैलासवासी दादासाहेब याचे दतपुत्र राजश्री आंमृतराव कोपरगावी आहेत. त्याची स्त्री कार्तिक मासी निवर्तली. द्वितीये संमध करावयाचा म्हणौन वधू येथून न्यावयास कारकून व पंचवीस स्वार वगैरे सरंजाम घेऊन कोपरगावीहून येथे आले होते. ते वधूस घेऊन रोज माारी कोपरगावास गेले. त्याज बोार सरकारचा कारकून व गारदी वगैरे दिल्हे आणि रवाना केले. शृत होये. छ ७ रोा गुरुवारी त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे येथे राजश्री रंगराव त्रिबक राजे बहादर व दाजीबा व बाबा फडके व बहिरोपंत मेहेदले व धारराव सिंदे आदिकरून मुत्सदी व दरकदार वगैरे सर्वत्र आले होते. राजश्री तुकोजी होलकर याणी मुकाम देवासेनजीक जैपूर येथून विलायेती मेवेजातच्या बहग्या श्रीमंतास व मदारुलमहाम यास पाठविल्या. दालिंबे व बिदाना आंगूर व सेव व नासपाती वगैरे मेवा पाठविला. तो राजश्री दादाजी गंगाधर दिवान दिाा माारनिले याणी श्रीमंतास डाल्या व राजश्री नाना फडनवीस यास डाल्या येणे प्रोा प्रविष्ट केल्या व कंबू जनावर येक पाठविले आहे ते व मेवा यैसे श्रीमं-ताचे नजर गुजरानिले. राजश्री माहाराव निंबालकर मदारुलमहाम याचे भेटीस आले होते. भेट घेऊन पानदान विडे दिल्हचावर निंबालकर माार वरचेवर माहावारीचे यैवजाविसीची सूचनार्थ बोलोन माघारे आपले हावेलीस गेले. साइंकालपर्यंत लोकाची कामकाजे होऊन सर्वत्र आपलाले घरास गेले आणि राजश्री नाना बेलबाग करून दो घटिका रात्रीस आपले घरास आले. रोज माारी श्रीमंत रमन्यात गेले होते. तेथे

घोडी फिरविल्यावर हातीचा व हारणे रमन्यातील आणऊन त्याचा तमाशा पाहिला. नंतर साइंकाली श्रीमंत तेथून माघारा निघाले ते तिसरे घटिकेचे आमलात आपले वाडचात दाखल जाले. किले राजमाची येथील किल्याचा हवालदार येथे आला आहे. त्यास माारनिलेने सेला पागोटे पैठनी देऊन मदारुलमहाम याची भेट घेतली.

४

श्रुत होये. छ८ रोज शुकुरवारी बंगल्याचे बागात मिस्तर मालिट,वकील इंग्रेज कलकतेकर याजकडील, याजला गुलाला पाहावयासी बोलाविले. होते सबब राजश्री नाना फडनवीस सात घटिका दिवस मागील राहा (ता) बंगल्याचे बागात गेले. रोा बहिरो रघुनाथ मेहेदले याजला बोलाऊन आनिल्यावर मागील सा घटिका दिवस राहाता मिस्तर मालिट वकील वगैरे मिस्तर आसामी पाच व नुरदीहुसेनखा यैसे बागात आले. तेथे बैठक होऊन नाचाची शुरवात जाली. मेवेजात जिनस वकील माराकडे देंविली. आतर पानदान जाले. मदारुलमहाम याणी मिस्तर मालिट वकील यास हि-याची आंगोठी १ येक दिल्ही. च्यार घटिका नाच वगैरे या प्रेाा जाले व गुलांला याचे तत्खियाजवल बैठक जाली होती. सदरहू तरतूत फार चागलीच करविली होती. मागील शेष दोन घटिका दिवस राहाता मिस्तर मजकूर रुकसत घेऊन तेथून निघाले ते आपले ठिकानास गेले. नंतर राजश्री नाना फडनवीस बागातून निघोन नवे वाडचात आले. संध्या करून देवदर्शण बेलबागात घेतले. उपरांत दोन घटिका रात्र होता माघारे निघाले ते आपले वाडचात आले. राजश्री माहादजी सिंदे नर्मदातीरास आले आहेत. हांडियाचे घाटे आशेरीस येणार. आशेर किला पाहून हुताशनी शहर बऱ्हानपूर येथे करावी, नंतर मजल दर मजल इकडे यावे. सिंदे याज बोार दाहा हाजार फौज वगैरे सरंजाम आहे. इकडे येऊन पुण्यास श्रीमंताचे भेटीस यावयाचा निश्चंये ठैरल ते ध्यानास आल्यावर मागाहून सेवेसी लेखण केले जाईल. श्रुत होये. सदैव कृपा करून आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. आपणापासी आज्ञा घेऊन स्वार

जालो ते काल छ ८ माहे मजकूर रोज शुकुरवारी येथे पुणियास येऊन पोहोचलो. येका दो दिवसानी श्रीमंताची व मदारुलमहाम याची भेट घेतो. येथील प्रसंगाचे वर्तमान सविस्तर आखबारपत्रा व वरून ध्यानास येईल. याउपर प्रसंगीचे वर्तमान सेवेसी लेखण केले जाईल. सांप्रदाया-प्रो हुजूरचे जवाबी इनायेतनामे सादर होत असावे व आपणास विनंती-पत्रे पाा आहेत याची उतरे आज्ञापत्री सादर होत असावी. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

A. R. No. 215 सुमारें २० शवाल १२०६ हिजरी
११ जून १७९२

(आरंभीची पाने अनुपलब्ध)

५

घटिका दिवस राहाता राजश्री आपा बलवंत तेथे आले ते खिल-वतात दाखल जाले. या प्रो येक घटिका रात्रपर्यंत बोलणे होऊन नंतर फडके आदिकरून आपलाले घरास गेले. रोज माारी मागील पाच घटिका दिवस शेष राहाता श्रीमंत रमन्यात गेले. तेथे घोडी फिरविंली व हांती सोडविले होते त्याचा तमाशा पाहून अस्तमिति स्वारी तेथून माघारा निघोन घटिका रात्र होता श्रीमंत आपले वाडचात दाखल जाले. राजश्री माहादजी सिंदे याणि कोरेगावीहून कूच करून निघाले ते नव कोस येऊन पुण्याबाहेर मुळामुठा नदीचे पलिकडे लस्करचा मुकाम करून राहिले. छ २२ माहे माार रोज बुधवारी मागील पाच घटिका दिवस शेष राहाता श्रीमंताच्या व सिंदे मजकूर याच्या भेटी व्हावयाचा निश्चंये जाहाला आहे त्या प्रो ते दिवसी भेटी होतील. सिंदे माार याजबरोबर च्यारपाच हाजार स्वार व तीनच्यार पलटने येकून आजमासे फौज आठदाहा हाजार व सिवाये किरकोली बाहिर-बुनगे आहे. तोफखाना पंनाससाट तोफा जिलेबी व मोटया. त्यापैकी

चवदा तोफा हाली बराबर आल्या आहेत. वरकड मागाहून येणार. राजश्री राजे कंल्याणराव निबालकर व बाबाराव वकील हेही सिंदे याचेसमागमे आले आहेत. उदईक भेटीचा समारंभ होईल तेव्हा मागाहून सविस्तर वर्तमान सेवेसी लेखण केले जाईल. राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याजकडील फौज पाच हाजार कर्नाटकचे मोहिमीस बराबर होती त्यास मोहीम फते होऊन स्वारी माघारे आली. त्याजबराबर भोसले याचीही फौज माघारा येऊन सदरहू फौज तो तुंगभद्रेवरूनच परभारा नागपुरास गेली. फौजेचे सरदार राजश्री बलवंतराव भवानी होते. ते दोनसे स्वारानसी राजश्री हरीपंत फडके याजबराबर येथे आले आहेत. ते तूर्त (का. फा.) ही येथेच आहेत. श्रुत होये. हुजूरचे जवाबी इनायेतनामे आलिकडे सेवकास सादर जाहले नाहीत. यास्तव विनंती लिा जाते की पूर्ववत सांप्रदाया प्रो सरकारचे जवाबी इनायेतनामे व स्वामीची आज्ञापत्रे सादर होत असावी. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

A. R. No. 216

२ मोहरम १२०७ हिजरी
२० आगस्ट १७९२

श्री

विनंती विज्ञापना यैसी जे येथील कुशल तागाईत छ २ माहे मोरम मुा पुणे स्वामीचे कृपावलोकनेकरून येथांस्थित जाणौन स्वानंद लेखण आज्ञा करीत आसिले पाहिजे. विशेष येथील वर्तमान छ २८ माहे जिल्हेज रोज शुकुरवारी त्रितीये प्रहरी अखबारपत्र सरकारचे डाकेवरून सेवेसी रवाना केले ते पाऊन सविस्तर वर्तमान ध्यानास आले असेल. तदनंतर येथील वर्तमान त्रितीये प्रहरी मदारुलमहाम याचे येथे मुत्सदी व दरकदार व सुभे मामलेदार आदिकरून सर्वत्र आले

होते. मामलतप्रकर्णी कागदपत्राचें कामकाज तीन घटिका जाल्यावर राजश्री रामजी पाा बकील तेथे आले. मागाहून राजश्री हरीपंततात्या आल्यावर त्रिवर्गाचे खिलवत तीन घटिकापर्यंत जाले. नंतर वकील मजकूर माघांरा गेल्यावर राजश्री नाना फडनवीस व हरीपंत फडके याचे बोलणे अस्तमीतपावेतो होऊन फडके आदिकरून सर्वत्र आपलाले घरास गेले. रोज मजकुरी मागील पाच घटिका दिवस शेष राहाता श्रीमंत आपले वाड्यातून निघाले ते मौजे आबे वडगाव येथील रम-न्यात हारणाचा तमाशा पाहावयास गेले होते ते साइंकाली माघारे येऊन आपले वाड्यात दाखल जाले. श्रुत होये. छ २९ रोज शनवारी भाद्रपद शुध्ध १ प्रतिपदेपासोन श्रीमंताचे वाड्यात श्रीगणपतीचे उछाहास आरंभ म्हणौन सरकारवाड्यात गणपतीचे दिवानखान्यात सालाबाद प्रो मखर वगैरे सर्व साहित्याची सिध्धता जाली. प्रहरा दिवसा राजश्री नाना फडनवीस यांणी आपले येथे स्नानसंध्यादि करून बेलबागात गेले. तेथून माघारे आले ते तैसेच परभारे मदारुल-महाम सरकारवाड्यात गेले. तो शास्त्री पंडित आदिकरून सर्वत्र जमा जालें होते. महूर्ताचा समये समीप येताच श्रीमंत तेथे आले. तेव्हा दाहा घटिका दिवस येता महूर्तेकरून श्रीमंताणी सुवर्णाची श्रीगणपतीची मूर्ती आहे त्या मूर्तीची स्थापना त्या दिवा (नखा) न्याचे मखरात केली. पुज्याआर्च्या सर्व विधीपूर्वक जाल्यावर आर्तीचे समई वाद्ये गजर नाना प्रकारचा जाला. तोफखान्यातील तोफेचे वीस बार जाले व दिली दरवाज्यापुढे पाच सा तोफा आनविल्या आहेत त्याचे बारापंधरा बार या प्रो दोहीकडील तोफेचे तीस पस्तीस बार जाले. समारंभ बहुत चागला जाला. या प्रो जाल्यावर राजश्री नाना आपले घरासी आले.

A. R. No. 217

१३ मोहरम १२०७ हिजरी

३१ आगस्ट १७९२

श्री

अखबार पुणें अज इाा छ १० माहे माहरम ताा छ १३ माहे मजकूर सन १२०७ हिजरी, रोज शनिवार,

पूर्वी छ ९ माहे मजकूरपर्यंत वर्तमान लिहून छ १० रोजी सरकारचे डाकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान श्रुत जाले असेल. सांप्रत छ १३ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिले असें.

माहदजी सिंदे छ ११ माहे मोहरमी तिसरे प्रहरी राव पंतप्रधानाचे हवेलीस जाऊन राव मवसुफासी दोनतीन घटेका खिलवत जाली. बालाजीपंत व रामचंद्रराव फडके व कृष्णराव बलवंत व दौलतराव सिंदे व अबाजी रघुनाथ व कृष्णराव रघुनाथ व कडोजी सितोले व रामजी पाटील जाधव खिलवतीत शेरीक होते. यक घटका राव पंतप्रधानाची व सिंदे मजकूर व बालाजीपंत व अबाजी रघुनाथ चिटनवीस याची खिलवत अलाहिदा जाली. छ १२ रोज शुक्रवारी बारा घटका दिवसास माहदजी सिंदे राव मवसूफा

(अपूर्ण)

A. R. No. 218 २५ मोहरम १२०७ हिजरी

१२ सप्टेंबर १७९२

(आरंभीची पानें अनुपलब्ध)

४

यास होत आले. अद्यापि मनोदयानरूप होत नाही येविसी मीर सिकारी यास सागौन अस्तमिती स्वारी तेथून माघारी निघाली. त्यास मार्गी येता श्रीमंताणी नदीवर साइंकाल समयाचे संध्यावंदन अंबारीत स्वार जाले. खवासीत रो॥ अपा बलवंत होते. घटिका रात्र होता श्रीमंत आपले वाडचात येऊन दाखल जाले. नंतर मागाहून दो घटिका रात्रीस राजश्री नाना फडनवीस आपले घरास आले. श्रुत होये. छ २५ रोज गुरुवारी त्रितीये प्रहरी मदारुलमहाम आपले येथून निघाले ते सरकारवाडचात जाऊन आर्शेमाहालचे बंगल्यावर गेले. तेथे रा॥ नारायेणराव यादव भागवत, कमाविसदार प्रो॥ आमोद वगैरे माहाल प्रांत गुजराथ,

यांस बंगल्यावर बोलाऊन मामलतप्रकर्णी येक घटिका बोलणे जाले तो श्रीमंतही त्या स्थली आले. नंतर राा बाबूराव केशव व त्रिंबकराव परचुरे वगैरे मत्सदी व दरकदार आले होते त्यासी बोलणे जाले. उपरांत दसरियाचे कापड सालाबांदचे सांप्रदाया प्रो सातारे व कोपरगाव व भागानगर इत्यादिक जागा जागा रवाना करावयाचे आहे. त्यास ते पोशाक व कापड यैसे बंगल्यावर आनऊन श्रीमंताचे समक्ष रवानगी कापडाची करणे त्याची नेमणूक केलियावर मदारुलमहाम तेथून निघाले ते कापडाचे जामदारखान्यात गेले. तेथेही हेच कार्ये कापड पाहावयाचे जाल्यावर मागील दोन घटिका दिवस शष राहाता राजश्री नाना सरकारवाड्यातून माघारी निघाले ते रोज माारी प्रदोष आहें म्हणौन परभारा बंगल्याचे बागात भोजनास गेले. तेथे घरमंडली व उभयेता स्त्रियास आणंविले होते. भोजनोतर च्यार घटिका नाच होऊन आकरा घटिका रात्रीस मदारुलमहाम बागातून माघारी येऊन आपले घरास आले. शृत होये. याउपरी पुढे प्रसंगीचे वर्तमान ध्यानास येईल ते सेवेसी लेखण केले जाईल. सदैव आज्ञापत्रे सादर होऊन सेवकाचा सांभाल करनार स्वामी समर्थ. पूर्वीप्रमाणे सरकारचे ज्यवाबी इनायेतनामे व स्वामीची आज्ञापत्रे सादर होत नाहीत. त्यास ज्यवाबी इनायेतनामे व आज्ञापत्रे साप्रदायेप्रमाणे सादर होत असावी. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

———

A. R. No. 219

३ रजब १२०७ हिजरी
१४ फेब्रुवारी १७९३

श्रीनिवास

पोष्य रघोतम हैबतराव सां नमस्कार. विनती जे येथील वर्तमान ताा छ ३ माहे रजब फालगुण शुध पंचेमी शुक्रवारपर्यंत मुकाम पुणें स्वामीचे कृपेंकडून क्षेम जाणून स्वानंद लेखनाज्ञा जाली पाहिजे. विशेष व पूर्वी छ २६ माहे जाखरी सरकारचें डांकेवर हुजूर अर्जी व अखबार

नवाब अजमुलउमरा बहादुर व स्वामीचे सेवेसी विनंतीपत्रें पाठविले त्याजवरून वर्तमान शृत जाले असेल. सांप्रत छ २ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान लिहून सांप्रदायाप्रमाणें पत्राची रवानगी केली असे विस्तारें पत्रावलोकनी ध्यानारूढ होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

A. R. No. 220

२६ रमजान १२०७ हिजरी
७ मे १७९३

श्रीनिवास

अखबार पुणे अज इा छ २५ माहे रमजान ताा छ २६ माहे माार सन १२०७ हिजरी रोज बुधवार.

पूर्वी छ २४ माहे मजकूरपर्यंत वर्तमान लिहून छ २५ रोजी सरकारचे डांकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान श्रुत जाले असेल. सांप्रत छ २६ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान सांप्रदाया प्रों दफेवार लिहिले असे.

छ २४ रोजी बालाजीपंत माहदजी सिंद्याचे खेम्यास जाऊन तसफियाचा मजकूर बोलून आले म्हणून म्हणोन पेशजी लिहिले आहेच. त्यास छ २४ माहे मजकुरीच बालाजीपंत व सिंदे बहादुर याची कसम अकसाम जाली. पंत माारनिलेनी तुळसी सालीग्रामाच्या सिंद्यास दिल्हया व सिंद्यानी आपल्या गुरूची उदी अंगरा बाळाजीपंतास दिल्हा. परस्परें जररावर नसावें. आबरू हुरमत उभयताची यक याप्रमाणें ठरले म्हणून यैकिलें.

सिंदे मजकूर बरसातीत जामगांवी छावणी करणार. शवाल आखर येथून जामगावास जाणार म्हणून यैकिलें. निश्चये ठरल व जातील ते समई लिहू. तूर्त यैकिल्या प्रो लिहिले असें.

हिंदुस्तानात होलकरासी व सिंद्याकडील जमियेतीसी बहुतकरून लढाई जाली असेल किंवा होईल या प्रों बोलत आहेंत.

मिस्तर मालिट वकील इंगरेज मुंबईस जाणार म्हणौन पेशजी लिहिले आहेच. त्यास छ २६ रोजी राव पंतप्रधानाचे हवेलीस भोजनास वकील माार आला होता. दाहाबारा असामीनी भोजने केली. नंतर राव पंतप्रधानानी वकील मजकुरास यक रकम कंठी मरवारिद व सिरपेंच मुरसा व चार पारचे व हमराही अहलनसार तीन असामीस च्यार पारचे व नुरदीहुशनखान वगैरें सातआठ असामीस सेले पागोटी येणे प्रों देऊन वकील माारास रुखसत केले. नंतर मालिट मजकूर बालाजीपंताचे हवेलीस आला. बालाजीपंतानी वकील माारास पांच पारचे वस्त्रें देऊन रुखसत केले. मिस्तर मालिट लवकरच जाणार.

परशरामपंत मिरजकरास टिपूकडील मुलक सुटला त्यापैकी गदक लक्ष्मेश्वर वगैरें तीन लक्षाचे माहल कदीम जागीरीत होते ते बदस्तूर कदीम देयाचा करार केला. सनदपत्र करून देणार.

छ २५ रोज मंगलवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्या देवपूजनसमई कवालाचे गायेन यैकून भोजन केले. आखरवख्ती दोनतीन घटका दिवाणखान्यात बसले होते. रात्रौ संध्या व भोजन करून आराम केला.

बालाजीपंतानी छ मजकुरी आखरवख्ती हरिपंतास बोलाऊन घेतले व रामजी पाटील वकील आला त्यासी तीनच्यार घटका बोलणे जाले. उपरांतिक गोविंदराव भगवंतास बोलाऊन च्यार घटका रात्रपर्यंत खिलवत जाली. उपरातिक बालाजीपंत संध्येस उठून गेले. हरिपंत आपले हवेलीस गेले.

छ २६ रोज बुधवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नानसंध्यादिक व भोजन करून आराम केला. आखरवख्ती दाहा

घटका दिवस बाकीस राहता मिस्तर मालट वकील इंगरेज सूचने प्रो भोजनास आला. भोजनसमई राव पंतप्रधान बालाजीपंत व हरिपंतासहित वकीलचे परामृषास पाव घटका बसले. नंतर गणपतीचे दिवाणखान्यात जाऊन बसले. तवाफाचा नाच शुरू करविला होता. मिस्तर मालटास राव मवसूफानी कंठी मोत्याची व सिरपेंच मुरसा व च्यार पारचे वस्त्रें व हमराही तीन असामीस च्यारच्यार पारचे व नुरदीहुशनखान वगैरे आठ असामीस सेले पागोटी दिल्ही. नंतर दुसरे मकानी राव मवसूफ वकील मजकुरासहित बसले. वकील राव पंत-प्रधानास काही बिलवरी जिनस व वकलीचा काही जिनस देऊन बालाजीपंताचेथे जाऊन यक घटका पंत माारनिलेसी बोलणे जाले. बालाजीपंतानी वकीलास पांच पारचे वस्त्रें देऊन रुखसत करून बालाजीपंत बेलबागात जाऊन देवदर्शन घेऊन हवेलीस गेले व हरि-पंत आपले हवेलीस गेलें. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

A. R. No. 221

७ जिल्काद १२०७ हिजरी
१६ जून १७९३

श्रीनिवास

पोष्य रघोतम हैबतराव साष्टाग नमस्कार. विनंती जे यथील वर्तमान ताा छ ७ माहे जिल्काद जेष्ठ शुध नवमी सोमवारपर्यंत मुकाम पुणें स्वामीचे कृपेकरून क्षेम जाणून स्वानद लेखनाज्ञा जाली पाहिजे. विशेष पूर्वी छ ५ रोजी सरकार डांकेवर हुजूर अर्जी व अखबार व नवाब अजमुलउमरा बहादूर व स्वामीचे सेवेसी विनंतीपत्रें पाठविले त्याजवरून वर्तमान श्रुत जाले असेल. सांप्रत छ ६ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान लिहून सांप्रदायाप्रमाणे पत्राची रवानगी केली असे. विस्तारें पत्रावलोकनी ध्यानारूढ होईल. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विनंती.

श्रीनिवास

अखबार पुणें अज इाा छ ५ माहे जिलकाद ताा छ ६ माहे मजकूर सन १२०७ हिजरी रोज रविवार.

पूर्वी छ ४ रोजचे वर्तमान लिहून छ ५ रोजी सरकारचे डांकेवर हुजूर अखबार पाठविली त्याजवरून वर्तमान श्रुत जाले असेल. सांप्रत छ ६ रोजपर्यंत यैकिले व जाले वर्तमान सांप्रदाया प्रोा दफेवार लिहिले असें.

माहदजी सिंद्याकडील सरदारासी व कासीराव व बापूजी होलकर वगैरेंसी लढाई छ १७ व छ १८ व छ २१ माहे शवाली जाली. याचे वर्तमान पेशजी लिहिलच आहे. सांप्रत तुकोजी होळकर व कासीराव व बापूजी होलकर वगैरें रामपुरा व भानपुरा व हिंगळाजगडचे रुखे आले व सिंद्याकडील सरदार चंमेल नदी उतरून होळकराचे ताकुबावर आहेंत. छ २१माहे शवालचे लढाईत होळकराची खराबी फार जाली. सध्या होलकर पांच हजार जमलें. वरकड बुनग वगैरें फार. लुटले म्हणौन यैकिले.

अली बहादर झरने परण्याचे मकानास बहुत दिवसपासून महसरा करून होते. त्यास छ १० शवाली तेथील बारी घेतली त्याज (व)रून धोकलसिंग राजा पटवी व खठोले नामी मकान आहे तेथे पलून गेले. बाद अलीबाहदरानी झरने परण्यात ठाणें छ ११ शवाली बसविले. दोन हाथी व बारा तोफा बाहदर मवसूफास सापडलें म्हणून यैकिलें. झरने परणे तालुका वीस पंचेवीस लक्ष रुपयाचा आहे म्हणून वर्तमान आलें.

छ ५ रोज शनिवारी राव पंतप्रधान प्रातःकाली बेदार होऊन स्नान संध्यादिक व भोजन केले. आखरवख्ती राव मवसूफानी बालाजीपंत व हरिपंतास तलब केली. बमोजिब तलब उभयेता पंत माारनिले

